जागृत सा

लेखकः-



प्रकाशक- लोकसेवा संघ सातारा

जागृत-सातारा

(१८०२ ते १९६५ चे राष्ट्रीय समालोचन)

आ यद्वामीय चक्षसा मित्र वयंच सूरयः ।
व्यचिष्टे बहुपाय्ये यते महि स्वराज्ये ॥ (ऋ. ५।६६।६)

" हे व्यापक दृष्टीचे मित्रहो, आम्ही व आपण विद्वान मिळून विस्तृत आणि बहुविध उद्योगांच्या स्वराज्यामध्ये प्रयत्नशील राहूया. "

" स्वदेश हिताविषयी पूर्ण दक्षता व स्वतःविषयी पूर्ण अभिमान जर आम्ही टाकला नाही, तर थोड्याच वर्षांत आमचा भाग्योदय झाला पाहिजे. "

— गो. ग. आगरकर

लेखक : **पुरुषोत्तम पांडुरंग गोखले**, कराड

लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा

१९६६

किंमत : रु. १०/—

• • •

आवृत्ति १ ली १९३५
,, २ री १९६६
(सुधारून वाढविलेली)

• • •

• • •

प्रकाशक, :
रा. ना. गोडबोले,
अध्यक्ष :
लोकसेवा संघ, सातारा.

मुद्रक :
म. ना. चापेकर,
विमा मुद्रक व प्रकाशक लि.,
यांचा विमा छापखाना, सातारा.

पुरस्कार

संरक्षण मंत्री
नवी दिल्ली,
दिनांक ११ मार्च ६६

श्री. बाबुराव गोखले यांनी लिहिलेला "जागृत सातारा" हा सातारा जिल्ह्याचा इतिहास अद्यावत स्वरुपात प्रसिद्ध होत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. जागृत सातारा पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली होती तेव्हा ती मी मोठ्या उत्सुकतेने वाचली होती. सातारा जिल्ह्याचा इतिहास लिहिण्याचे काम श्री. बाबुराव गोखले यांच्यासारख्या एका ज्येष्ठ व्यासंगी लेखकावर सोपविण्यात श्री. भाऊसाहेब सोमण यांनी मोठी योजकता दाखविली होती. श्री. बाबुराव गोखले हे जसे व्यासंगी लेखक आहेत तसेच ते त्यागी देशभक्तही आहेत. त्यांनी सातारा जिल्ह्यात घडलेला इतिहास जसा व्यासंगी दृष्टीने न्याहाळला आहे तसाच तो इतिहास घडविणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांतील ते एक असल्यामुळे तो इतिहास काही अंशी त्यांनी अनुभविलाही आहे. इतिहास–लेखनासाठी लेखकाजवळ वस्तुनिष्ठ दृष्टिकोन असावा लागतो, तसाच, इतिहास ज्या सामाजिक शक्तींच्या संघर्षातून उभा राहत असतो त्या सामाजिक शक्ती मनोभावे समजण्यासाठी आन्तरिक जिव्हाळाही असावा लागतो. श्री. गोखले यांच्याजवळ ही दोन्हीही असल्यामुळे हा इतिहास लिहिण्याचा त्यांचा अधिकार सर्वमान्य आहे.

सातारा जिल्ह्याचा इतिहास महाराष्ट्राच्या इतिहासापासून व महाराष्ट्राचा इतिहास भारताच्या इतिहासापासून संपूर्णतः अलग करून लिहिता येणार नाही व समजणारहि नाही. जिल्ह्यात वा महाराष्ट्रात जे घडले त्याची पार्श्वभूमि ही नेहमीच भारतीय स्वरुपाची आहे. जी सामाजिक व राजकीय परिवर्तने देशात घडत होती त्यांचे प्रतिबिंब व प्रतिध्वनी महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या सामाजिक जीवनावर, राजकीय क्षेत्रातील घटनांवर उठणे स्वाभाविकच होते. या संदर्भात जिल्ह्यांच्या इतिहासाचे परिशीलन व परीक्षण करावे लागेल. राजकीय व सामाजिक क्षेत्रात भारताच्या जीवनात जे क्रांतिकारी व पुरोगामी स्वरुपाचे विचारप्रवाह सुरू झाले त्या सर्व नव्या शक्तीना साथ देण्याची वृत्ती व शक्ती सातारा जिल्ह्याच्या व महाराष्ट्राच्या जनजीवनात होती हे या इतिहासाचे मी काढलेले सार

आहे. भारतामध्ये नवजीवन उभारण्याची जी अस्मिता गेल्या दीड, दोन शतकात विकसित होत होती तिचा पाठपुरावा करून शक्तीनुसार तिच्यामध्ये भर घालण्याचे सामर्थ्य मराठी जनजीवनात होते हाच प्रत्यय या इतिहासाची ही पाने वाचल्यानंतर आल्याशिवाय राहत नाही. जिल्ह्यांचा इतिहास लिहिताना हीच कसोटी असावी की राष्ट्रीय जीवनाशी किती प्रमाणात छोट्या छोट्या विभागांचे संवादित्व होते, हे संवादित्व असले तर कसे त्याची हकिगत द्यावी, त्याची कारणमीमांसा द्यावी, नसले तर का, त्याचीही कारणमीमांसा द्यावी. ही कसोटी मानली तर तिच्या पूर्तीसाठी तयार होणाऱ्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याइतकी विविध तऱ्हेची माहिती या ग्रंथात उपलब्ध करून दिली आहे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

श्री. बाबुराव गोखले यांनी परिश्रमपूर्वक हा महत्त्वाचा इतिहासग्रंथ लिहिला त्याबद्दल त्यांना माझे मनःपूर्वक धन्यवाद आहेत.

—यशवंतराव चव्हाण

११ मार्च १९६६



भारताच्या अभ्युदयासाठी

आपले नांवही न निघावे
इतक्या निरपेक्ष
त्याग भूमीवरून एकनिष्ठ
सेवा करणाऱ्या

सातारा जिल्ह्यातील

सर्व ज्ञाताज्ञात देशभक्तांस
सदर इतिहास सादर समर्पण

लाखो सैनिक रक्त सांडिति रणी, सेनानीचे नांव हो
लाखो सेवक घाम गाळिति खरे चातुर्य पावो जयो
कोठे सैनिक-सेवकास गणती ? शून्यात त्यांच्या परी
पुण्याची भरली परार्ध-शतके—ती ईश्वराची परी

सेवाभक्ति तशी कृतिकृतिमधी, अध्यात्म ते जीवनी
ते हो संस्कृति भारतीय बहुधा आविष्कृता सद्गुणी
व्हावा शिष्य गुरूहुनी, बहुगुणी, ताताहुनी संतती
होवो दिव्य भविष्य, शून्य करूनी की वर्तमाना प्रती

– पु. पां. गोखले

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशकांचे हृद्गत-

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सातारा जिल्ह्याने भारतीयांच्या प्रशंसेस पात्र अशी अतुल्य कामगिरी केली म्हणूनच भारत-स्वातंत्र्यार्थ प्राणपणाने व तनमनाने झगडणारे वीर व भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दीड तप देशाच्या शासनाची धुरा वाहणारे भारत-भाग्य-विधाते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी "जय सातारा" असे धन्योद्गार काढले.

१८०२ च्या वसईच्या तहापासून ब्रिटिशांची मगरमिठी भारतावर व्यापकतेने आपला प्रभाव पसरू लागली. त्यांच्या कुटिल राजनीतीला व भारतीय फुटीरवृत्तीला उधाण येऊन स्वतंत्रबाण्याचे मराठे व शीख १८५० पर्यंत निष्प्रभ झाले आणि सर्व भारतावर ब्रिटिशांच्या युनियन जॅकचा प्रभाव फडकू लागला. परंतु या वाढत्या ब्रिटिश वर्चस्वाच्या काळातहि स्वातंत्र्य वृत्तीची स्फुल्लिंगे आपला जिवंतपणा तेजाळित होतीच. १८५७ साली तर भारताच्या कानाकोपऱ्यातून सुद्धा ब्रिटिशवर्चस्व झुगारून देण्याचा सर्वव्यापी उठाव झाला. ब्रिटिशांच्या दैवानुकूल्यामुळे, आमच्या कमकुवत संघटनेमुळे व स्वार्थी फुटीर वृत्तीमुळे चतुर इंग्रजांनी भारतीय आशाळभुतांची मने आत्मसात करून प्रसंगावधानाने व धीर चित्त राहून आपल्यावरील विकट संकट निवारले. यावेळी हिटलरी होरपळीला लाजविणारे रणकंदन करून अमानुष हत्याकांड केले, वरपांगी दया, क्षमा यांची भाषा बोलत राहून न्याय निष्ठुरतेचा आव आणून अखिल भारतास निःशस्त्र केले, बंडाच्या भेसूर, उग्र, कठोर घडामोडींनी बेचैन झालेल्या भारतीय मनांना ब्रिटिशांच्या गोडव्या भाषेने आपलेसे करून घेतले. वरपांगी दिपविणाऱ्या इंग्रजी 'न्याय्य' कारभाराला सुरवात झाली. अशा दिखाऊ शांतिब्रम्ह कारभाराला अनेक भारतीय भुलून गेले. परंतु स्वातंत्र्याची ज्योत भारतीयातून नष्ट न होता दबून आतून आपली प्रखरता तेजाळित होती. पण असे वैयक्तिक उठाव इंग्रजांनी लीलेने नेस्त नाबूद केले. श्री शिवछत्रपती व समर्थ यांचे स्वातंत्र्याचे बाळकडू त्यांच्या आनंदवन भुवनात (सातारा जिल्ह्यात) राहणाऱ्या जनसामान्यांच्या नसानसातून भिनले असल्यामुळे संधि साधेल त्याप्रमाणे ते आपल्या तेजाचा आविष्कार करीत होते. स्वातंत्र्याची, स्वदेशाभिमानाची प्रखर ज्योत सातारा भागात निष्प्रभ झाली नसून प्रसंगाने ती आपली दाहकता दाखविते याची कल्पना सूक्ष्म दृष्टीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांस वेळोवेळी दिली होती.

विसाव्या शतकाच्या अगोदरपासून सातारा जिल्ह्याने भारतीय स्वातंत्र्याच्या संघटनात्मक प्रयत्नास निष्ठेने पाठिंबा दिलाच. पण ब्रिटिशासारख्या चाणाक्ष, धुरंधर, कुटिल नीतिपटु राजकर्त्यांशी सामना देताना खेड्यापाड्यातील सामान्यपातळीतील लोकांचे हित डोळ्यापुढे ठेवूनच जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी आपल्या प्रयत्नांची उभारणी केली. प्रभावी संघटित पक्षाच्या मार्गदर्शनाचा काटेकोर अवलंब करून स्वातंत्र्य ध्येय सिध्यर्थ तळमळीने झटणाऱ्या स्वकीय भिन्न मार्गी बांधवांची सहानुभूती मिळवूनच त्यांनी कार्य चालविले व स्वपक्षीयांच्या एककल्लीपणास मुरड घालावयास लावली.

अर्जविनंत्या करून जनहित साधणारे, सभा, परिषदामधून सामुदायिक संघटितरीत्या लोकमताविष्कार करणारे, राजवट चालविण्यात ब्रिटिशांशी सहभागी होऊन जनहित साधणारे, सनदशीर मार्गांनी इंग्रजाशी झगडत देशहितार्थ झटणारे, दहशत मार्गाचा अवलंब करून स्वराज्य व सुराज्य जवळ आणू पहाणारे, प्रत्यक्ष बंडाचा उठाव करणारे, जगाच्या व्यापक जमान्याच्या आंतर राष्ट्रीय राजकारणात घुसून भारताबाहेरच्या राष्ट्रांची भारतीय स्वातंत्र्य प्रयत्नास सक्रिय सहानुभूती मिळविणारे, सर्वच अंतरी भारतीय हितेच्छू व स्वातंत्र्यार्थी होते; त्यांची स्वातंत्र्य तळमळ कमजास्त तीव्रतेची होती एवढेच. तेव्हा आपल्याच तत्त्वप्रणालीने चालून आपले अनुयायी वाढवून आपला पक्ष–प्रयत्न प्रभावी करताना भिन्नमार्गी स्वबांधवांना न हेटाळता, त्याशी सहानुभूतीने वागून, जरूर व शक्य तेव्हा आपल्या जमान्यात बंधुत्वाच्या भावनेने त्यास सामावून घेऊन पक्षनिरपेक्ष संघटनात्मक विशाल दृष्टीने आपली पाऊले टाकण्याची मनोवृत्ती सातारा जिल्ह्याने स्वातंत्र्याच्या झगड्यात नेहमी प्रभावीपणे स्वीकारली व पुढेहि निष्ठेने आजतागायत चालू ठेवली आहे.

स्वातंत्र्याच्या झगड्याचे १८०२ ते १८५७; १८५७ ते १८८५; १८८५ ते १९२०; १९२० ते १९४७ असे चार प्रमुख टप्पे आपण लक्षात घेतले तर पहिल्या टप्प्यात सशस्त्र बंडाचे उघड प्रयत्न झाले. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर लगेच भारताचे नि:शस्त्रीकरण झाले तरी राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपर्यंत ब्रिटिश दबावाला न जुमानता वैयक्तिक सशस्त्र बंडरुपाने कांही महाभाग आपली स्वातंत्र्यज्योत प्रकटवीत होते. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून सनदशीर मार्गाचे प्रतियोगी सहकाराचे लोकमान्य टिळकांचे राजकारण प्रभावी होते. लोकमान्यांच्या पश्चात महात्मा गांधींचे अनत्याचारी असहकाराचे व सत्याग्रहाचे युग आले. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या मार्गांचा सातारा जिल्ह्याने निष्ठेने अवलंब केला तरी इतर मार्गीयांना अवहेलनात्मक दृष्टीने लेखण्याची वृत्ती सातारा जिल्हा धुरीणांनी कधीच अवलंबिली नाही. उलट

पक्षनेत्यांवर आपल्या सहकार-समन्वय वृत्तीचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न चिकाटीने केला आहे.

दीडशे वर्षांच्या या अनेकांगी गुंतागुंतीच्या व खडतर झगड्यात सातारा जिल्ह्याने जे जे प्रयत्न केले त्यांचा इतिहास अत्यंत क्लिष्ट व सामान्य माणसास सहजासहजी न उकलणारा आहे. अनत्याचारी असहकाराच्या व सत्याग्रहाच्या मार्गाने सर्व देश भारावून गेला असताना १९४२ साली "छोडो भारत," "चलो दिल्ली," "करेंगे या मरेंगे" या उठावांनी ब्रिटिशास सतावून सोडले असताना प्रतिसरकार निर्माण करून ते यशस्वी मार्गाला लावण्यात सातारा जिल्हा अग्रेसर होता. स्वातंत्र्यार्थ झटणाऱ्या भिन्नमार्गीयांची सक्रिय सहानुभूती, ब्रिटिश राजवटीतील सरकारी स्वकीय अधिकाऱ्यांची अंतरीची मदत मिळवून, सर्वांशी एकदिल होऊन सातारा जिल्ह्याला आपली अतुल्य कामगिरी यशस्वी करता आली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही देशाच्या विकास प्रधान घडणीत लोकशाही समाजवादी तत्त्वाचा अवलंब करून आपले सरकार जे जे प्रयत्न करीत आहे त्याशी सातारा जिल्हा समरस झालाच आहे. शिवाय आपली सहकार समन्वयाची, एकात्मतेची वृत्ती त्याने कायम राखली आहे. पाकिस्तानी व चिनी आक्रमणाला तोंड देताना स्वाभिमानाने स्वदेश संरक्षणाचे प्रयत्न जिद्दीने चालविलेल्या भारत सरकारच्या उद्योगाला सातारा जिल्हा सहकार समन्वयी एकात्मतेचे धोरण कायम राखून निःसंदिग्ध साथ देत आहे.

या स्वातंत्र्याच्या व बहुजन हित साध्य करण्याच्या सातारा जिल्ह्याच्या सर्व प्रयत्नांचे ऐतिहासिक यथातथ्य समालोचन संशोधकाच्या निर्लेप, न्यायनिष्ठुर, व्यापक दृष्टीचे, पक्षनिरपेक्ष राहून करण्याचे अवघड काम समाज सेवकाग्रणी श्री. बाबूराव गोखले यांनी "जागृत सातारा" हे पुस्तक १९३५ साली लिहून प्रथम केले; पण त्यावेळी ब्रिटिश राजवट असल्यामुळे लेखकाच्या लेखणीला तारेवरचा नाच करावा लागला. अनेक धीर गंभीर चिरकाल स्फूर्तीदायक व अभिमानास्पद घटनांचा उल्लेखही करता आला नाही. स्वातंत्र्य प्राप्ती होऊन आता दीडतप होत आले. तेव्हा १८०२ ते १९६५ या दीर्घकालीन जिल्ह्यातील ऐतिहासिक घडामोडींचे पक्षनिरपेक्ष राहून खरे दिग्दर्शन करण्याचे काम बहुरंगी, बहुगुणी, विवेकी, तत्त्वनिष्ठ समाज सेवक बाबूराव गोखले यांनीच करावे अशी इच्छा लोकसेवा संघाने श्री. बाबूराव गोखले यांना प्रकट केली. गेल्या साडेतीन तपाच्या काळात स्वातंत्र्याच्या झगड्यात ते हिरिरीने पडले. त्यांनी सरकारी पाहुणचार अनेक वेळा घेतला. पक्षनेत्याशी मधून मधून पक्षसमरसतेने त्यांना वागता आले नाही. स्वातंत्र्योत्थापनात ते तनमनधनाने समरस झाले होते. उत्थानातील बारीकसारीक खाचाखोचा त्यांना अवगत होत्या. या दीर्घकालाच्या घडणीत काही मनःस्ताप देणाऱ्या तत्त्व-

च्युतीच्या घटनाही घडल्या. या सर्वांचे विवेकी, क्षमाशील विवेचक व्यापक दृष्टीने निरीक्षण करून त्यात अनुस्यूत असलेली तत्त्व प्रणाली कशी प्रभावी होती व आहे हे मार्मिकपणे लेखनात उतरविण्याचे अत्यंत बिकट काम त्यांनी अंगिकारले. बाबूरावांची सूक्ष्मगामी तल्लख प्रज्ञा जन्मजातच आहे. आपला अभ्यासक्रम संपवून पदवी संपन्न होताच ब्रिटिश राजवटीतील उच्च पदाच्या जागेचे आमिष त्यांच्या तत्त्वनिष्ठ त्यागी मनास भुरळ पाडू शकले नाही. भारताच्या स्वातंत्र्यार्थ व बहुजन हितार्थ झटणाऱ्या संघटित पक्षास साथ देत आपली "कृष्णाकाठची माती" राबवावयाची या बाण्याने त्यांनी आपल्या खडतर राष्ट्रसेवेच्या जीवनास सुरुवात केली. गेली चार तपे राष्ट्रसेवेशिवाय कोणताही पाश आपल्या शारीरिक व बौद्धिक सामर्थ्यास त्यांनी लावून घेतला नाही. भारताच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, अध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक, शैक्षणिक, वाङ्मयीन अशा अनेक व्यापक क्षेत्रात आपल्या सूक्ष्म, विवेचक, अभ्यासूवृत्तीने त्यांनी नैपुण्य मिळविले आहे. त्यांची पक्षांधवृत्ती नसल्यामुळे त्यांची तत्त्वनिष्ठ विचारधारा स्वपक्षीयासही अंतर्मुख करते. सरस्वतीचा वरद हस्त त्यांच्यावर असल्यामुळे त्यांच्या लेखणीतून प्रभावी विचार उतरतात. अशा सन्यस्तवृत्तीच्या प्रभावी रामदास भक्तावर जागृत साताऱ्याच्या दुसऱ्या आवृत्तीची जबाबदारी पडताच मोठ्या दीर्घोद्योगाने अनेक साधनांनी आणि मार्गांनी उपयुक्त माहिती संचित केली. त्या आधारे तारीख तागायत घडामोडींचा समावेश त्यांनी या आपल्या लिखाणांत केला आहे. मंदिराच्या उभारणीत इमारतीच्या पायातील माल कधीच दृग्गोचर होत नसतो. जमिनीपासून कळसापर्यंतचे भाग आपले अस्तित्व दृग्गोचर करीत असले तरी देवालयांतील मूर्ती सान्निध्याची सर सर्वांस सारखीच येणार नाही. पण हा काही रचनाकाराचा दोष नाही. या व्यापक दृष्टीने या लेखनाकडे सर्वांनी बघावे. आमची खात्री आहे की बाबूराव यांची ही कृती सर्वादरास पात्र अशीच झाली आहे.

'जागृत सातारा' या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ती काढणे हे ऐतिहासिक दृष्ट्या कसे अत्यंत आवश्यक आहे व ती श्री. पु. पां. गोखले यांनीच परिपूर्ण करणे कसे इष्ट आहे हे लोकसेवा संघाच्या आपल्या विश्वस्त-बांधवास पटवून त्यांची मान्यता आमचे इतिहासज्ञ, राष्ट्रप्रेमी, त्यागी, सेवावृत्तीचे गुरुजी दत्तोपंत परांजपे यानी मिळविली. लोकसेवा संघाची योजना श्री. बाबूराव गोखले यास स्पष्ट करून पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत करावी लागणारी हरप्रकारचीं कामे अविश्रांत वृत्तीच्या आमच्या गुरुजींनी केली म्हणूनच दुसऱ्या आवृत्तीच्या प्रसिद्धीकरणाचा योग आला आहे. श्री. दत्तोपंत गुरुजींच्या अमाप परिश्रमाचे उतराई होण्याचा कृतार्थतेने त्यास विनम्र अभिवादन करण्याचा एकच मार्ग दिसतो.

बाबूरावांच्या या थोर बहुमोल सेवेबद्दल कृतज्ञतेची हार्दिक पाठ थोपटणी करण्याशिवाय दुसरा मार्ग कोणता? बाबुरावांच्या लिखाणाची मुद्रकांना हवी अशी प्रत करण्यात व मुद्रिते शुद्ध करण्यात श्री. सीतारामपंत गरूड यांनी दाखविलेली चिकाटी व आत्मियता, विमामुद्रकाचे मॅनेजर श्री. मधुकरराव चापेकर यांनी दाखविलेली छपाई दक्षता, श्री. अनंतराव कुलकर्णी यांचे बहुमोल मार्गदर्शन, साताऱ्यांतील निरनिराळ्या छापखान्यांच्या मालकांनी, संस्था चालकांनी व्यक्तींनी पुस्तकांतील छायाचित्रांचे ब्लॉक्स देण्यात दाखविलेली उदार वृत्ती, खरोखरीच अभिनंदनोल्लेखनीय आहेत. चित्रशाळेने सातारा जिल्ह्याचा नकाशा व पुस्तकाचे बाहेरचे आकर्षक आच्छादन काढून, सर्व चित्रे व बाह्याच्छादन सुबक छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून श्री. बाबूराव यांचे अभीष्ट चिंतन अंतःकरणपूर्वक करितो.

ना. यशवंतराव यांनी पुस्तक प्रकाशन करण्याच्या समारंभाचे आमंत्रण आपले यशस्वी चारित्र्य घडविणाऱ्या जिल्ह्याच्या प्रेमाने व सहकारी बंधुत्वाच्या जिव्हाळ्याने स्वीकारून आम्हास उपकृत केले त्याबद्दल त्यांचे आभार अंतःकरणपूर्वक मानतो. लोकसेवा संघाच्या या प्रकाशनास सातारा जिल्ह्यातील वाचनालये, शैक्षणिक संस्था व लोकहितैषी कार्यकर्ते सक्रिय सहानुभूती दाखवितील व पुढील पिढीस हा सातारा जिल्ह्याचा इतिहास उपलब्ध करतील असा विश्वास व्यक्त करतो.

सातारा
ता. १९-१-६६

रा. ना. गोडबोले,
अध्यक्ष लोकसेवा संघ, सातारा.

विवेकी वाचकाचे सादर सेवेसी

महाशय, झेप घेऊन सुरकांडी मारण्याची दक्षता पटाईत पोहणारा बाळगतो; याचे कारण नदीच्या काठाचे पाणी गाळ उठून घाण होऊ नये. तारीख तागायत इतिहास लिहिणाऱ्याला तीच काळजी घ्यावी लागते. चालू इतिहासाच्या घडणीत जवळदूरच्या कसल्याही अन्वयाने भाग घेणाऱ्या अगर अल्पस्वल्प संबंध असणाऱ्या लेखकाची वरील काळजी नेहमीच दुणावते. इतकी की कार्लाईलचा सार्टर–रिसार्टर "ठिगळचा शिंपी" अगर चिंध्या चिंधड्यातून चांगली गोधडी निर्माण करणारी आजीबाई ज्या निरलस दक्षतेने व टीपेने चालते त्याच टीपेने इतिहास–संबंधी लेखकाला चालावे लागते. म्हणून शक्य तेवढे व्यक्तित्व विसरून, शिष्टाचार, कायदा, नागरनीति व ऐतिहासिक परिपक्वता येण्यास आड येणारे कालाचे सान्निध्य यांच्या मर्यादा ओळखून आणि "नामूलं लिख्यते किंचित्।" हा न्याय राखून व "प्रत्ययाचे बोलणे प्रत्ययेंचि पहावे।" अशी अपेक्षा करून, सातारा जिल्हयाची राष्ट्रीय चित्ररेखा देण्याचा हा प्रयत्न केला आहे. त्यातील दोष माझ्या इतक्या तीव्रपणे कोणासच ठाऊक असणार नाहीत. कारण ते सर्वस्वी माझे आहेत. जे गुण आहेत, ते जनता जनार्दनाने केलेल्या सहाय्याचे आहेत.

ब्रिटिश रियासत सुरू झाल्यावर सातारा जिल्ह्यातील इतिहास–संशोधकांनी नांव केले. मिरजेचे वासुदेव शास्त्री खरे, भाऊसाहेबांची बखर कर्ते (वाईकर) शंकरराव जोशी, झांशीच्या राणीचे चरित्रकार रा. ब. दत्तोपंत पारसनीस. कालगावचे कृष्णाजी विष्णु आचार्य गुरूजी "महाराष्ट्राची चार दैवते" कर्ते ग. ह. खरे आणि पेशवे दप्तरात लक्ष घालणारे प्रा. कृ. पां. कुलकर्णी हे ते संशोधक होत. "राजधानी सातारा" या पुस्तकाचे कर्ते प्रा. कुंभारे हे नांव देखील न विसरण्या सारखेच आहे. गुणवत्तेत बिनतोड, दर्जाने अजोड, कृतिस्फूर्तीने जिव्हाळयाचा, भाव विलासाने एकुलता एक, विवेक मर्यादेने आदर्शांचा आढळ देणारा, परिणामी प्रबोधनाने अचूक आणि जागतिक मूल्य मापनाच्या कसोटीस उतरणारा भारताचा स्वयंप्रज्ञ इतिहास अजून तयार व्हावयाचा आहे, असे सांगली जवळील हरिपूरचे हरिपंत पंडित (१८४९ ते १८९९) या काव्य संग्रहात "वयस्य" म्हणून कविता लिहिणाऱ्या आणि 'विविधज्ञान विस्तारात' "नागपूरकर भोसल्यांचा इतिहास" लिहिणाऱ्या (महावीर चरित व नारायणराव पेशवे–वध या नाटकांचा कर्ता असलेल्या) टीका–परीक्षण लेखकाचे स्पष्ट मत होते. अजूनही तसेच मत

कोणी प्रतिपादिले तर त्याला चुकला म्हणण्यासारखी परिस्थिती नाही. तरीही "आकाश–अंत न कळूनहि अंतरिक्षी। शक्तीनुसार करतात विहार पक्षी॥" या न्यायाने "हिंदुस्तानचे इतिहास" तयार होत आले आहेतच. त्यातलाच हा सातारा जिल्ह्याचा इतिहास असे अभ्यासकांना वाटले तर मुलखावेगळे काही नाही.

सातारा जिल्ह्याच्या इतिहासाची ही दुसरी व सुधारून वाढविलेली आवृत्ती आहे. पहिल्या आवृत्तीचा आधार माझे "लोकप्रिय भाऊसाहेब सोमण" चरित्र व "आठराशे सत्तावनचा महाराष्ट्र" या पुस्तकांप्रमाणेच महाराष्ट्र सरकारने नवीनच काढलेल्या सातारा जिल्हा गॅझिटियरला घेतला आहे; त्याचप्रमाणे सातारा–कऱ्हाड आदि नगर पालिकांनी आपआपल्या शतसांवत्सरिक स्मारक–ग्रंथातील इतिहास विभागासाठी घेतला आहे; आणि लंडन लायब्ररीत "आगरकराशी ओळख" हा माझा ग्रंथ १९४६ मध्येच ब्रि. सरकारने खरेदि करून ठेवला आहे. तशाच तोलाने ही "जागृत सातारा" ची दुसरी आवृत्तीही तयार केली आहे. पहिल्या आवृत्तीपेक्षा, क्रांतिकारकांचे कार्य, आर्थिक औद्योगिक वास्तव आणि कैसरी कंदन, हिटलरी होरपळ, पाक भारत-झुंज यातील सातारा–रणमर्दांचे विक्रम, हे भाग या नवीन आवृत्तीत नवीन आहेत. ऐतिहासिक कथनाचा ओघही १८०२ च्या वसईचे तहापासून शक्य तेवढा १९६५ ची अखेरी साधणारा असून पहिल्या आवृत्ती प्रमाणेच "जागृत सातारा" ची ही दुसरी आवृत्ती सातारा जिल्ह्याचा संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता पावेल तरच तिचे चीज झाले, असे मजप्रमाणेच सर्वांनाही वाटेल.

अखिल भारतात सातारा जिल्ह्याचाच असा इतिहास उपलब्ध आहे, असे मला अनेकानेक अभ्यासकांनी सांगितले. खरे असेल तर, राष्ट्रीय सभेच्या सुवर्णमहोत्सवाचेवेळी कल्पना सुचताच मला निकड लावून तिला मूर्त स्वरूप देणाऱ्या बाबू रावजी (विनायक शंकर) वैद्यांचे आणि कर्त्या पुढाऱ्याला साजेसे आपले समर्थ आशीर्वाद माझ्या प्रयत्नांच्या पाठीशी उभे करणाऱ्या पूजनीय भाऊसाहेब सोमणांचे ते श्रेय आहे. जिल्ह्या जिल्ह्याचे, प्रांताप्रांताचे आणि सर्व भारत वर्षाचे सरकारी करभारासंबंधीचे सालवार अहवाल कोणतीही रियासत तयार ठेवतेच. तसे सरकारला अनुकूल असलेल्या सर्व साधनांच्या अभावीही लोकपक्षीय चळवळीचे पांच पन्नास वर्षांनी तरी एकएकदा जिल्हा-निहाय होत राहिले, तर इतिहासकाराला ती अधिकृत साधने होतील. ही एकच भावना जागृत सातारा हे पुस्तक प्रथम लिहिताना होती आणि आता काँग्रेसच्या अशीती (ऐंशी वर्षांच्या) महोत्सवाचे वेळी ही नवी आवृत्ती काढताना, त्या पहिल्या भावनेत फारसा बदल आहे, असे म्हणता यावयाचे नाही.

सदर पुस्तकाचे पुनः प्रवाशन करण्याचे मनावर आणि अंगावर घेणाऱ्या सातारच्या लोकसेवा संघाविषयी अभिवादनपूर्वक कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय मला राहवत नाही. " जागृत सातारा " ची ही दुसरी आवृत्ती तयार करताना, मी केवळ निमित्त मात्र असून, माझे लिखाण मुद्रण योग्य करून ते रेखीव-बांधीव स्वरूपात प्रगट करण्याची सर्व जबाबदारी माझे स्नेहांकित श्री. सीताराम जयराम गरूड आणि सातारचे सेवायोगी गु. श्री. दत्तोपंत परांजपे यांनी जिव्हाळ्याने स्वीकारली म्हणूनच सर्व काही निभावले आहे. आणि तरीही मराठीचे शुद्धलेखन आज चहूबाजूनी जसे व्यक्तिस्वातंत्र्य भोगीत आहे, तसे त्याने या पुस्तकातही इतके भोगले आहे की सामासिक शब्दांचे घटकही त्याना अपवाद नाहीत. म्हणून या बावी सुद्धा सर्व बारीक सारीक तपशिलाबद्दलही हात जोडून " येथे न्यून ते पुरते । अधिक ते सरते । करुनि घ्यावे तुमते । विनवीतसे ॥ "

ज्या १९६६ त सातारा जिल्ह्याची ही वाङ्मयी पूजा दुसऱ्यानदा होत आहे, ते ऐतिहासिक दृष्टया पावन वर्ष आहे. स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ चिटणीसांची तिसरी जन्मशताब्दि, हैदराबादचे चंदुलाल नारायणदास यांची दुसरी जन्म शताब्दि व डॉ. गणनाथ सेन, गणपत शिवराम पवार (ज्योतिषी) आणि भारत सेवक नामदार गोपाल कृष्ण गोखले यांची पहिली जन्म शताब्दि यावर्षात आहे. औरंगाबादचे सन्त कवि गोपाळनाथ यांची दुसरी समाधि–शताब्दि तर काशीचे हिंदी कवि जगन्नाथ पुरषोत्तमदास आणि महाराष्ट्रात नव्या युगाची तुतारी फुंकणारे केशवसुत यांचीही या वर्षात जन्म शताब्दि आहे. सातारा जिल्ह्या पुरतेच बोलावयाचे तर सुधारकाचार्य आगरकर यांची एकाहत्तरावी, दादासाहेब करंदीकर व अप्पासाहेब आळतेकर यांची एकतिसावी, रा. ब. काळे यांची तिसावी आणि भाऊसाहेब सोमण यांची अकरावी पुण्यतिथी यावर्षी आहे. कर्तृत्वाच्या या सर्व पुण्य पुरुषासह या पुस्तकाच्या सर्व सहाय्यकांस व आपणा सर्वांस विनम्र प्रणिपात.

१९–१–६६

— **पुरुषोत्तम पांडुरंग तथा बाबूराव गोखले,**

कऱ्हाड.

नजर-भेट

[प्रकरणाचा अंक, प्रकरणाचे नाव, पुढे पोट मथळे आणि त्याचे पृथक् पृथक् पृष्ठांक दिले आहेत.]

भाग १ ला

५. **हरि ठेवील तैसे रहावे !** :– " ध्येयं वा साधयेत । देहं वा पातयेत् ॥ " व्रती पुन्हा घरी गेले नाहीत. त्र्यंबकजी ऊर्फ शाहू वा काशिराजा–जंगली महाराज. ३०; सुशिक्षित हक्क हिरावून घेतील आणि विरोध झाला तर, चालते व्हा, म्हणतील. पारतंत्र्याचा वीट हा " बंडवाल्यांचा " वारसा. ३१; " वारिस " हा शब्द फक्त औरस संततीला. आबासाहेब महाराज. सत्तेपुढे शहाणपणाचा तसाच जळफळाटाचा तरी काय उपयोग ? ताटाबरोबर काठही गेला. ३३; छत्रपती घराणे व जनता यांची आपुलकी. ३४.

६. **जुन्यातून नव्याकडे**:–छत्रपतीना महाराष्ट्राच्या हृदयाचे सिंहासन. ३५; राज्य देवाचे आणि धर्माचे हवे. इंग्रजीराज्य ईश्वरी प्रसाद कसा ? ३६; आमचे घोर दारिद्र्य हा इंग्रजी राज्याचा परिणाम. तडजोडीच्या राजकारणाचा आटापीट. ३७; असंतोषाचे धुमारे. ३८.

७. **सार्वजनिक सभा**:–एकोणीसाव्या शतकाची सत्तरी म्हणजे स्वाभिमान-पूर्वक स्वोन्नतीचा श्रीगणेशाय नमः. ३९; सरकारी नोकराने भूतदयेच्या कामात तरी लोकाबरोबरीने भाग घ्यावा. ४०; राणीच्या राज्यारोहणा-निमित्त ठराव. ४१; दादासाहेब करंदीकरानी सातारा जिल्ह्याची कुंडली मांडली. ४२; शेतकऱ्याना दिवाळी ठाऊक असण्याचे कारण काय ? ४३,

८. **छोटी काँग्रेस**:–काँग्रेसचे एकनिष्ठ वारकरी. ४४; इंग्रजी कारभाराचे नागमोडी वळण. ४५; काँग्रेससाठी घरामागे एकएक पैसा ४६; जेथून कायदे होतात ते स्थान शुद्ध झाले पाहिजे. ४७; वाळव्याच्या काँग्रेसला ह्यूम, टिळक, गोखले व दहा हजार शेतकरी. ४८; काँग्रेस गरिबाकरिता. वाईची छोटी काँग्रेस. ४९; जिल्हा सभेचे वेध. ५०; राष्ट्रीय सभेला आमंत्रण, ५१.

९. **" छोट्या काँग्रेसच्या " सुमारास**:–लोकांच्या अंगी कलेक्टरास नोटीसा देण्यापर्यंत धीटपणा आला. ५१; कऱ्हाड–पाटण तालुक्याचे शेतकरी कलेक्टरचे बंगल्यावर. हिंदुमुसलमानांचे प्रेम. ५२; म्हैसाळकरांच्या सर्कसचे तंबूत १८९५ चे काँग्रेसकरता प्रतिनिधी निवडण्यासाठी जिल्ह्याची सभा. ५३.

१०. **स्वावलंबनाची वळणे**:–स्वावलंबनाची शिडी उभारली पाहिजे ही घोषणा इसलामपुरास झाली. ५४; तासगावचे रामभाऊ कुलकर्ण्यांनी कुलकर्ण सोडले. ५५; शेतसाऱ्याची गैरशिस्त वसुली व लोकांचा संघटित प्रतिकार. मुंबई सरकारचे लॅंडरेव्हेन्य–बिल व म्युनिसिपल-बिलातील पिछेहाटीचे फेरफार. प्लेगचा जुलूम व केळकर मामले-दाराची माफी. ५६; रमेशचंद्र दत्तांचे उद्बोधन, स्वदेशी चळवळ

धोरण, ९६; कैसरी-कंदनात सातारा-जवानांची बहादुरी. ९६–९७; मॉंटफोर्ड सुधारणा इंग्लंडने देऊ करणे व हिंदुस्थानने स्वीकारणे कमीपणाचे! तह परिषदेत लोकमान्याना घ्या, ही मागणी ९८; स्वराज्यसंघास पाठिंबा. चिरोल-केस-फंड. दुष्काळ-इन्फ्लूएंझात लोकशुश्रुषा.; सहकारी चळवळीस सुरवात. ९९.

१५. **मित्र प्रवृत्ति** :–तोंडावर साखर, अंतःकरणात सुरी. १००; प्रागतिकांचे गुणग्रहण. १०१; रा. ब. काळे यांची त्यागमय सेवा व कामगिरी, न्यायमूर्ती रानडयांची पुण्यतिथी १०२; नामदारांचे स्मरण, माणूसकीच्या हक्कासाठी सत्यसमाज १०३; जाधवानी मराठ्याकरिता जागा मिळविल्या, जवळकरांचे सामने शहाणपण, ऐक्याबद्दल दक्षता. १०४.

१६. **असहकाराचा ऐन भर** :– असहकार योगाचे रहस्य, महात्मा गांधींचा असहकारासाठी दौरा, नाथ घाणेकर कामास लागले. १०५; असहकाराचे आचरण व टिळक स्वराज्य फंड, मुळशी सत्याग्रह व राष्ट्रीय सप्ताह. १०६; खादीचा प्रसार व कऱ्हाडची दसरा-मिरवणूक, दारूवरील निरोधन व बास्कर व्हिले यांचे पराक्रम. १०७; युवराज्याच्या आगमनावरील 'बहिष्कार,' तासगाव तालुक्यातील ग्रामसंघटन. १०८; खटावचे रजिस्ट्रार प्रकरण व उडाणटप्पूचे खटले. १०९; कायदेमंडळावरील बहिष्काराविरुद्ध मतप्रदर्शन, कोयना धरणाची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठी फिरती. ११०; वाई तालुक्यात खादी-प्रचार, काकाराव पंडीत व येळगावकराचे इनाम जप्त. १११.

१७ **उतरण**:– राजकारणात बहात्तर रोगावर एकच औषध सांपडले नाही ११२; स्वराज्य पक्षातर्फे सोमणांची निवडणूक आणि कौन्सिलातील लढा ११३; तुकडे पट्टी बिलामुळे लक्ष्मणराव देशपांड्यांचा जनता संपर्क खादी प्रचार ११४;

१८ **बहुरंगी तीन वर्षे**:– खादी हेच स्वदेशीचे शुद्ध स्वरूप म्हणून महात्माजींचा दौरा ११५; परचुरे शास्त्र्यांच्या खेड्यातील यात्रा; कऱ्हाड तालुक्यातील तराळकी ११६; नेहरू रिपोर्टचा प्रचार, सातारा तालुका खेडकरी परिषद ११७, तुकडे पट्टी बिलाचे सार्वत्रिक निषेध ११८ तालुका तालुक्याच्या आणि इसलामपूर येथील जिल्हा शेतकरी परिषद, दारुबाबत जिल्हा कोरडा करण्याबद्दल मागणी ११९, कोयना धरणाचा प्रश्न धसाला लागला १२०, चवथी राष्ट्रीय शिक्षण परिषद १२१ राष्ट्रपति अय्यंगार यांचा दौरा आणि हिंदुस्थानी सेवादलाचा उपक्रम व शिबीर १२२; सायमन सप्तकाच्या स्वागताचा बहिष्कार; लालाजीवरील लाठी हल्याचा निषेध १२३; सातारा जिल्ह्यात

भाग २ रा

भाग १ ला

जागृत सातारा

१ : पूर्वरंग

पिढ्यान्पिढ्यांच्या कर्तबगारीने इतिहास रंगत असतो. बापापेक्षा बेटा आणि गुरुपेक्षा शिष्य सवाई व्हावा असे म्हणण्यात "चढत्या वाढत्या पदवीने" इतिहास रंगावा अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण करावयास तरुण पिढीपुढे वडील पिढीने केलेल्या कामाचा आढावा असेल, तर आपल्या कार्यक्षेत्राचा क्षितिज आपणास किती वाढविता येईल याचा बहुशः बिनचुक अंदाज तरुणांना घेता येतो, महत्त्वाकांक्षेला तजेला चढतो व आत्मविश्वास वाढतो. यादृष्टीनेच सातारा जिल्ह्यात झालेल्या राष्ट्रीय चळवळीचा थोडक्यात शब्दपट मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे. नुसतीच "सांगे वडिलांची कीर्ती" तो समर्थांच्या दृष्टीने "एक मूर्ख" ठरत असेल, पण सवाई कर्तबगारीच्या राष्ट्रसेवेने पितृ-ऋण फेडू इच्छिणाऱ्या तडफेच्या तरुणांना "वडिलांची कीर्ती" हा एक उठाव ठरतो, ही एक उज्ज्वल पार्श्वभूमी ठरते.

सातारा जिल्ह्याच्या जुन्या इतिहासाचा गौरव प्रतापगड, अजिंक्यतारा, सज्जनगड, वसंतगड, वैराटगड, वासोटा हे डोंगरी किल्ले आपल्या हवापाण्या-नेच बोलत असतात असे नव्हे, तर आपल्या छातीच्या दगडावरील खुणाखुणांनी सांगत असतात. त्याचप्रमाणे "सबसे बडा प्रचारक" म्हणून महात्माजींच्या मताने ठरलेल्या सन्त रामदासांचे प्रबोधक वाङ्मयही सांगत असते. पण प्राचीन इतिहासाच्या खुणाही जिल्ह्यात कमी नाहीत. आगाशिवाच्या डोंगरातील बौद्ध लेणी इ. सनापूर्वी अडीचशे वर्षांपासूनची असून "गोपाल पुरास संघमितस लेण दैयधर्म" म्हणजे गोपाळाचा पुत्र संघमित्र याचा दानधर्म असे एक लेणे आहे. मगध विद्यापीठाची शाखा आगाशिवाच्या लेण्यात होती.

इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून तेराव्या अखेर साताऱ्यात चालुक्य, राष्ट्रकूट, सिंघण, शिलाहार, यादव यांचा अंमल होता. चौदाव्या शतकात देवगिरीचे राज्य संपले व बहामनी राज्याची अस्मानी सुलतानी सुरू झाली. सन १५०० साली अदिलशहाने जावळीप्रांत मोरे घराण्याकडे दिला. मोरे

यांनी मर्दुमकी गाजवून परिंड्याच्या लढाईत बुर्हण निजामशहाचा पराभव केला. १६३७ साली शहाजीराजे भोसले अदिलशाहीकडे चाकर होते. त्यावेळी अहमद अदिलशहाने शहाजीस कऱ्हाड प्रांती बावीस गावांची जहागिरी दिली. मराठे सरदारात शहाजी सर्वात मातब्बर आणि शूर. स्वराज्य स्थापण्याची त्याची महत्त्वाकांक्षा ('मराठी सत्तेचा उत्कर्ष' पहा) सन १६३९ साली शहाजीच्या मदतीने मुधोजी आणि बजाजी निंबाळकर साताऱ्याच्या किल्यातून सुटून फिरून फलटणचे जहागीरदार झाले. पुढील साली (१६४०) बजाजीची बहीण सईबाई हिचे "शाहपुत्र शिवाजीशी" लग्न झाले.

"मोडली देवळे मांडावी" म्हणून नारायण सूर्याजी ठोसर उर्फ सन्त रामदास आपली भारत–तीर्थ यात्रा आटोपून आपल्या कर्मभूमीचा शोध घेत असता, "शाहसूनू शिवाजी" सारख्या धर्माच्या कैंपक्षीचे कार्य चालत होते, ते आपल्या धर्मकार्यास उपयुक्त होईल म्हणून चाफळ ते महाबळेश्वर या टापूत रामदास ठाण मांडून बसले. टाकळीस तपश्चर्या करीत असताच १६३१–३२ साली त्यांचा शहाजी राजाशी परिचय झाला होता. सन १६४४ साली शहाजीराजांच्या जहागिरीत समर्थ रामदासांनी मसूर येथे पहिला सार्वजनिक रामोत्सव केला. शहाजीचे मामलतदार चाफळास नरसीमलनाथ अंबरखाने होते, ते समर्थांचे शिष्य झाले. १६४८ त चाफळचे राममंदीर बांधून पूर्ण झाले. १६७३ त परळीचा किल्ला शिवाजी राजांनी घेतल्यावर त्यास सज्जनगड हे नांव तेथील रामदासस्वामींच्या वास्तव्याने रूढ झाले, तेथे राम स्थापना झाली. चाफळ खोऱ्यातून तारळेखोरे, तारळे खोऱ्यातून परळी-खोरे आणि परळी खोऱ्यातून महाबळेश्वरास डोंगर माथ्यावरून जाणारा गुप्त मार्ग रामदासांनी आखला व रूळवला होता. धर्मराजकारणाचा प्रीति-संगम म्हणून प्रतापगड व सज्जनगड प्रसिद्धच आहेत. १६५९ साली "रणमल्ल खरा अफझुल्ला" शिवाजीने चीत करून त्याच्या कबरेस "नंदादीप चालू केला!" आणि महाबळेश्वर ते कऱ्हाडपर्यंत कृष्णा नदीचा परिसर स्वराज्यात सामील करण्यात आला.

शिवाजीच्या मृत्यूनंतर दख्खन पादाक्रांत करण्याकरता औरंगझेब धुमाकूळ घालू लागला असता, संभाजी महाराजांचा प्रभावीपणे पण दुःखद शेवट होऊन हाहाःकार उडाला असता, १६९९ मध्ये राजारामानी सातारा ही मराठ्यांची राजधानी केली. साताऱ्यावरील मोहिमेत मग औरंगझेब स्वतः हिरिरीने आला. मराठ्यांनी पराक्रमाची शर्थ करून एक वर्षभर सातारा व परळी हे किल्ले लढविले. पण "संगर तुंबळ" होऊन ते किल्ले शत्रू हाती गेल्यावर मराठे "वासोटचा" च्या सोटाचे आधाराने राहिले. मग मात्र औरंगझेबाला आपले मोर्चे नगराकडे वळवावे लागले. १७०६ त मग परशुराम

त्रिंबक प्रतिनिधी... सातारा व परळी हे किल्ले परत जिंकले. १७०७ मध्ये औरंगझेबच पैगंबरवासी झाल्यामुळे संभाजीपुत्र शाहूची मोंगल नजरबंदीतून सुटका झाली. तेव्हा सातारा किल्याचा ठाणेदार शेखमिरे याला वश करून घेऊन सातारा हीच शाहूने राजधानी केली. धनाजी जाधवाचा कारकून बाळाजी विश्वनाथ याची अलौकिक बुद्धिमत्ता व चातुर्य पाहून शाहूने त्यास विश्वासात घेतले आणि १७१४ मध्ये त्यास आपला मुख्य प्रधान उर्फ पेशवा बनविले. १७४९ पर्यंतच्या शाहूच्या कारकीर्दीत बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, नानासाहेब असे तीन पेशवे झाले व शिंदे, होळकर, रघूजी भोसले, पटवर्धन, पंतसचीव वगैरे बरेचसे सरदार ऊर्जितावस्थेस येऊन त्यांनी मराठी राज्यविस्तार नागपूर–बंगालपर्यंत वाढविला. पुढे मराठ्यांचा दसरा व दरारा सर्व हिंदुस्थानभर पसरला. तरीसुद्धा शाहू महाराजांचा वचक सर्वांवर असे. दिल्लीच्या मोंगलाईचे लगाम अठराव्या शतकाचे शेवटी शेवटी महादजी शिंद्यांच्याच हाती होते, असे म्हटले तरी चालेल. पण त्यांच्या मृत्यूनंतर (१७९४) मराठेशाहीच ओहोटीस लागली आणि १८०० त नाना फडणविसाचा मृत्यू झाल्यावर पुण्याचे "गलथान" ठरलेले पेशवे बाजीराव रघुनाथ यांनी वसईचा तह करून इंग्रजांचे पारतंत्र्य महाराष्ट्रावर ओढवून घेतले.

शाहूनंतर (१७४९) सातारच्या राजांमध्ये तितक्या तेजाचा संघटक व नियंत्रक प्रतापसिंहच निघाला. १८०२ चा वसईचा तह होईपर्यंत साताऱ्यास राजेशाहीच होती. पण तो तह होताच त्याची जाग राजघराण्यातील चतुरसिंग भोसल्यानी घेतली आणि नव्या मनूला सुरुवात केली.

२ : राजदर्शन

ईस्ट इंडिया कंपनीचे राजकारण म्हणजे एक उंटाचे पिल्लू आहे याची खातरजमा फक्त महादजी शिंद्यांना होती, आणि म्हणून त्याला हाणून पाडण्यासाठी त्यांनी सगळ्या मराठेशाहीची कंबर नेहमी कसलेली ठेवली होती. त्यांच्या (१७९४) मृत्यूनंतर १८०२ साली जो वसईचा तह झाला, त्याच्या शर्ती इंग्रजांच्या मुत्सद्देगिरीचा डिंडीम ठरला. मराठी साम्राज्याच्या अंतर्गत कारभारात हात घालण्याचा अधिकारही इंग्रजांनी त्यात मिळविला. विचारी व वीरवृत्तीच्या लोकांना तळमळ लागून राहिली होती की, वसईच्या तहाच्या चिंधड्या उडाल्या पाहिजेत. सातारच्या चतुरसिंग भोसल्यांची खरी इच्छा अशी होती की, मराठी साम्राज्याचा खरा स्वामी सातारचा राजा असल्याने त्याने आपल्या हाती सगळा कारभार घ्यावा. उपयोग झाला नाही. उलट, दुसरा शाहू १८०८ मध्ये वारल्यावर प्रतापसिंहाची आई माईसाहेब हिने कारस्थान केले. इंग्रजांना मिळण्याच्या कारस्थानात सदोबा नांवाचा एक गृहस्थ होता. शिवाय नरसू काकडे नांवाचा एक शिंपी होता. या नरसू काकड्यास प्रतापसिंह महाराजांनी पुढे जामदारी दिली. त्याला बांधून दिलेला वाडा भवानी पेठेत आहे. (श्री. वासुदेव वि. जोशी 'ऐक्य' १३ डिसेंबर १९३६) चतुरसिंग हा सातारच्या प्रतापसिंहाचा चुलता. मराठी साम्राज्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत हिंडून, सर्व मराठ्यांनी मिळून टाळक्यावर कोसळणाऱ्या इंग्रजशाहीला एकमुखाने तोंड द्यावे म्हणून त्याने जिवाचे रान केले. नागपूरकर भोसल्याशिवाय त्याला कोणी जिव्हाळ्याचा दोस्त भेटला नाही. त्याच्या मदतीने त्याने असई आणि अशीरगड येथे ब्रिटिशांशी मातबर सामना केला. पण तेरा वर्षांचा वनवास काढूनच त्याला १५ एप्रिल १८१८ रोजी (१८११ पासूनचा) कैदी म्हणूनच इहलोक सोडण्याचे कपाळी आले. त्यानंतर उमाजी नाईकाने बंड चालविले असता १८२९ त तो सरळ साताऱ्यास प्रतापसिंहास भेटला आणि मराठी साम्राज्याचा मूळ धनी म्हणून त्याच्याकडेच आपल्या पुरंदरच्या वतनांची मागणी करून राहिला. उपयोग झाला नाही. १८३२ मध्ये १३ फेब्रुवारीला उमाजीला फाशी चढविल्यावर, चार वर्षांनी (१८३६) पेशवाई उडविली ती पचली, आता सातारची गादी उडवावयास हरकत नाही, असे इंग्रजांच्या मनाने घेतले. त्यादृष्टीने त्यांच्या कारवाया सुरू झाल्या.

तारीख ११ फेब्रुवारी १८१८ च्या माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन कमि-

शनरच्या जाहीरनाम्यात स्पष्ट म्हटले होते की " सातारे किल्ल्यावर महाराज यांचे झेंडा कायेम करून त्यांचे तर्फेचे लोक होते त्यांची खात्री केली आहे. त्यात जो मुलुक महाराज याजकडे होईल त्यात न्याय, इन्साफ व हुकूम अम्मल ते करतील. कंपनी सरकारात मुलुक राहील तेथे कंपनी सरकारचा अम्मल राहील. पण कोणाचे वतनास व देवस्थानचे खर्चास व खैरातीस व कोणाचे जातीचे धर्मास खलेल न होता वाजवी असेल तसे सुरळीत चालेल." या जाहीर-नाम्याची अब्रु किती हे रॉबर्ट नाइट याच्या " दि इंडियन कमिशन अन्-मास्कड " या पुस्तकात (पृष्ठ ४५–४६) दिलेल्या कमिशनर विल्यम चौपडीन याच्या ता. २५ एप्रिल १८२२ चे उद्गारावरून स्पष्ट आहे. " जाहीर-नाम्याच्या दृश्य स्वरूपाला मराठ्यांनी की आमच्या सरकारने जास्त महत्त्व दिले, ते सांगणे कठीण आहे. सत्य सांगावयाचे तर बाजीरावाला आम्ही जाहीरनाम्याने प्रथम लढत दिली आणि नंतर सातारच्या राजघराण्याने दिली. जाहीर-नाम्यातील आश्वासनाने व सातारा गादीचे पुनरज्जीवनाने पेशव्यांचे पारिपत्य केले, आणि आता आम्ही जो वचनभंग आरंभला आहे, त्याबद्दल मिळणाऱ्या कानपिचक्या यथायोग्यच आहेत." हा वचनभंग म्हणजे साम्राज्याऐवजी प्रतापसिंहाना नीरा कृष्णा यांच्या मधील राज्याचा तुकडा मिळाला तो ! नीरा व वारणा यांच्या मधील भीमा कृष्णेच्या संगमापावतचे, चौदा लक्षांच्या मुलखाचे राज्य म्हणजेच आगोदर एल्फिन्स्टन्च्या मुत्सद्देगिरीने मराठी मुलखावर टाकलेला एक फासा होता. १८१८ त पुण्याला युद्ध सुरू होऊन इंग्रजाकडून खडकी, कोरेगाव येथे पराभव पावलेला रावबाजी साताऱ्यास प्रतापसिंहाना भेटण्यास आला आणि साहाय्यार्थ पंचवीस हजार सैन्य देऊ करून इंग्रजांशी चाललेल्या युद्धात पुढाकार घेण्यासाठी आग्रहाने विनवू लागला; छत्रपतींच्या गुरुघराण्याची, चाफळकर स्वामींची जामीनकीही रावबाजीने पटविली ! तसे शूर व देशाभिमानी महाराज इंग्रजाला तोंड देण्यास तयार झाले. अशा वेळी एल्फिन्स्टन सोहबाने " बाजीरावाचे सारे साम्राज्य छत्रपतींच्या पदरात टाकण्याचा इरादा " प्रकट करून छत्रपतींना इंग्रजाकडे मिळवून घेतले. छत्रपतींच्या या बुद्धिभेदास त्यावेळच्या मुत्सद्यांची वागणूक कमी जबाबदार नाही. पण अष्टाच्या रण–संग्रामात पेशव्यांचा पाडाव केल्यावर साम्राज्याऐवजी प्रतापसिंहाना ज्यावेळी राज्याचा " तुकडा " मिळाला त्यावेळीच अंतःकरणात किती कालवाकालव झाली असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !!

सातारचे राज्य प्रतापसिंह महाराजांना देताना ता. २५ सप्टेंबर १८१९ रोजी जो चौदा पेट्यांच्या संस्थानाचा आकरा कलमी (ठराव) तह केला त्यात ते राज्य छत्रपतींच्या फर्जंद, व वारीस व कायम मुक्काम, यांच्याकडे

चालविले जाईल असे शब्द होते. (आर. डब्ल्यू फ्रेझर कृत 'ब्रिटिश इंडिया' पहा) तरीही व्हिक्टोरिया राणीसाहेब इंग्लंडच्या गादीवर येऊ घातल्या असताना, भारतातील छत्रपतींची नांवनिशाणी उडविण्याचा खटाटोप ईस्ट इंडिया कंपनीच्या धूर्तांनी आरंभिला आणि १८३६ मध्ये बाळाजीपंत नातू प्रभृतींच्या कारवाईमुळे इंग्रजाविरुद्ध प्रतापसिंह कट करीत असल्याचा संशय प्रकट करून रेसिडेंट कर्नल लॉडविक प्रभृतींचे गुप्त कमिशन बसले व त्याच्या निर्णयानुसार प्रतापसिंहाला चौदा लक्षांचे राज्य सोडावे लागले ! ! लॉडविक-कमिशनच्या निर्णयाचे वैय्यर्थ्य दाखविण्यास ता. ९ आगस्ट १८३७ रोजी रंगो बापूजींनी इंग्रजाकडे धाडलेल्या खलित्यात म्हटले आहे की, "— हल्ली या पृथ्वीचे पाठीवर इंग्रजी सरकारचे सन्मुख कोणी लढाई देण्यास उभा राहीलसा मोठा सामर्थ्यवान् नाही– तहनामा इंग्रजी सरकारनीच आपले विचारे ठरवून करून आणला तो कमजास्त पाहू न देता सर्वयेविसी कंपनी इंग्रज सरकारचे वचनावर भरंवसा ठेवावा" हे ग्रांटसाहेब बोलले. तेव्हा तोच तहनामा मुक्रर केला.

"हबसी यासी फितूर केला म्हणे ! तरी हबसी याजपासी मुलुक व सरंजाम आहे तो कितीक ? जबरीने बोलू लागल्यास व करू लागल्यास मात्र लाचारी आहे. वोलख राहिली नाही. मान मर्यादा सुटली."

तथापि अशा निषेधखलित्यांना विचारतो कोण ? ता. ५ सप्टेंबर १८३९ रोजी प्रतापसिंह महाराजांना सुमारे एकवीस वर्षे (१८०८ पासून) प्रजाहितदक्षतेने व इंग्रजांनी देखील विलायतेहून रत्नजडित तलवार नजर करण्याइतक्या चतुराईने हाकलेल्या राज्यास हातोहात मुकावे लागले ! तेव्हा छत्रपतीवरील सर्व अन्यायाचे परिमार्जन करण्याकरिता कुंपणी सरकारच्या माहेरघरी म्हणजे इंग्लंडातच रंगो बापूजी १८३९ तच गेले. आपले सर्वस्व गमावूनसुद्धा कुंपणीचे डायरेक्टर, पार्लमेंटचे सभासद, वजनदार इंग्रज गृहस्थ या सर्वांच्या पुढे त्यांनी छत्रपतींची कैफियत न्यायास अनुसरून अशी जोरदार मांडली की, एखादा हिरण्यकश्यपू विदुर झाला असता ! पण खरेखोटे कागद करणारा लार्ड क्लाईव्ह आणि बेगमांना लुटणारा वॉरन हेस्टिंग्ज ज्या न्याय निष्ठुरतेने निर्दोषी ठरला, तीच न्यायनिष्ठुरता छत्रपतींच्या बाबत हिंदुस्थानातल्या अधिकाऱ्यांचे निर्णय वज्रलेप केल्याशिवाय कशी राहणार ! त्या न्यायनिष्ठुरतेला काय मातब्बरी की प्रतापसिंह हा राजा वैय्याकरणी व विद्वान यांना उत्तेजन देणारा, जुने धर्मग्रंथ नव्या छापखान्याचे कलेने अमर करणारा, सुधारलेल्या पाश्चिमात्यांच्या तोडीस तोड असे दवाखाने आपल्या राज्यात चालविणारा, मुलांबरोबर मुलींनाही शालेय आणि लष्करी शिक्षण देणारा, 'गागाभट्टीसह' शिवराज्याभिषेकापासून भोसल्यांच्या पंचकुळीपर्यंत पारंपारिक

रीतीरिवाजांची स्मृती अमर करणारा, आपली दैनंदिनी लिहून हिशोबी चालणारा, आपल्या राज्यात रस्त्यांची, पाण्याची व वृक्षांची सोय करणारा, कालबाह्य व बुद्धीस न पटणाऱ्या रूढींना महत्त्व न देणारा असून,

'वैद्यं पानरतं, नटं, कुपठितं, स्वाध्यायहीनं द्विजं ।
योधं कापुरुषं, हयं गतरथं मूर्खं परिव्राजकं ॥
राजानं च कुमंत्रिभिः परिवृतं देशंच सोपद्रवं ।
भार्या यौवनगर्भितां पररतां मुञ्चन्ति ते पंडिताः ॥'

अशा पंडितात मोडण्यासारखा तो छत्रपती होता. एका रात्री त्या छत्रपतीला चौकी पहाऱ्यात पळवून "लिंब" येथील गोठ्यात ठेवण्यात आले होते आणि त्या स्थानबद्धतेच्या एक महिन्यानंतर काशी येथे हद्दपार करण्यात आले होते!!! म्हणूनच रंगो बापूजींचे अंतःकरण तिळतिळ तुटले व न्याय मिळविण्यासाठी त्यांनी विलायत गाठली!! दरम्यान, प्रतापसिंहावर झालेल्या अन्यायाविरुद्ध बंड करून उठला कोळे येथील धारराव पवार. १८४० च्या एप्रिलपासून सातारा जिल्ह्याच्या कऱ्हाड ते प्रचीतगड एवढ्या भागात मे महिन्याचे मध्यापर्यंत इंग्रेजी राजवट आहे की नाही अशी अवस्था त्याने आणून सोडली होती. धारराव पवाराच्या अनुषंगिक असलेल्या एकशेतीस कर्त्या पुरुषांना इंग्रजांनी सातारचा तुरुंग दाखविला. पण त्या उठावाचे सर्वस्व बनलेला धारराव पवार इंग्रजांचे हाती कधीच लागला नाही. इतके होऊनही १८४४ मध्ये सुभाना निकम याने उठाव केलाच! लिंबचा राघो जनार्दन आपटे हा सुभानाचा साथीदार होता. त्यानी लष्करी हालचाली सुरू केल्या व इंग्रजांची टपालव्यवस्था सर्व गोंधळून सोडली. याच सुमारास कोल्हापुराकडील सामानगड येथे इंग्रजांचे विरुद्ध बंड उठले होते, तेथेच सुभाना निकमाने तळ दिला होता. त्याच्याजवळ पांचशे बंडखोर होते. प्रतापसिंहाच्या सर्व पक्षपात्यांना वठणीवर आणण्याचे काम सातारचा रेसिडेंड कर्नल ओव्हॅन्सकडे होते. प्रतापसिंहाच्या पक्षपात्यांच्या हाती पन्हाळा व पावनगड पडलेले पाहिल्यावर १८४५ च्या जानेवारीत ओव्हॅन्स साताऱ्याहून कोल्हापुराकडे धावत चालला, पण कऱ्हाडपासून दहा मैलावरील कासेगावात बंडखोरांनी ओव्हॅन्सला कैद केले व पन्हाळ्यावर पळवून बंदिस्त केले. तथापि १८४५ च्या एप्रिलमध्ये सामानगडाचे बंड शमल्यावर सातारकर मंडळींचाही समाचार घेण्यास ईस्ट इंडिया कंपनीने कमी केले नाही. कर्नल ओव्हॅन्स मोकळा झाला व सुभाना निकमास बंदी होणे आले. ओव्हॅन्सचा बंदिवास ईस्ट इंडिया कंपनीच्या अंतःकरणाला येवढा भिडला होता की, १५ एप्रिल १८४५ रोजी इसलामपुरास शंभर घोडेस्वारांचा लष्करी तळ कंपनीने बसविला. सामान-

गडच्या बंडात त्या भागातील तीनशे लोकांनी त्यात भाग घेतला असल्या-कारणाने बंडखोर इसलामपुरास नवे केंद्र उभारतील असा कंपनीचा अंदाज होता. (सातारा दफ्तर पहा)

सामानगड प्रभृतींचे गडकरी ईस्टइंडिया कंपनीच्या इनाम कमिशनने इनामे जप्त केल्यामुळे व कोल्हापुरास चालू असलेल्या दाजी पंडिताच्या कारभारामुळे उसळले होते. पंधरा घोडेस्वार व चाळीस शिबंदी एवढ्याच सामुग्रीनिशी प्रचीतगडावर प्रथम बंडाचे निशाण लागले. पण यशवंत विठ्ठल शिरगांवकर याने फितुरी केल्यामुळे सगळाच मामला संपुष्टात आला, आणि जिकडे तिकडे शांत शांत झाले !! बंडखोरांच्या तलवारी यावेळी म्यान झाल्या. पण इंग्रजी राज्याबद्दलची रुखरुख शमलीच नव्हती. मराठ्यांच्या इतिहासातील शेवटचा मुत्सद्दी व इंग्रजी राजवटीतील सनदशीर चळवळीचा कडेलोट करणारा इंग्लंडात गेलेला पहिला भारतीय वकील रंगो बापूजी गुप्ते–देशपांडे–रोहिडेकर याने प्रतापसिंह राजांची बाजू ब्रिटिश पार्लमेंटपुढे मांडून इंग्रजांची बोटे इंग्रजांच्याच डोळ्यात घालण्याची पराकाष्ठा केली. आपल्या (१८४० पासून १८५३) सुमारे १४ वर्षांच्या इंग्लंडमधील रहिवासात याने २५ सभा घेतल्या आणि (स्वतःला मुळात इंग्रजी येत नसताही इंग्रजी भाषा आत्मसात करून) इंग्रजी जनतेला प्रतापसिंहावरील अन्यायाची जाणीव एवढी करून दिली की, १८४७ चा इंग्लंडचा अर्थसंकल्प पार्लमेंटात मंजूर होईल की नाही, अशी काही काळ धास्ती निर्माण झाली होती. पण, शेवटी रंगो बापूजीला निराश होऊन परतावे लागले. त्याच सुमारास बाजीरावास चालू असलेले पेन्शन आपणास मिळावे म्हणून बाजीरावचा दत्तक मुलगा नानासाहेब याने खटपट चालविली होती, तिलाही अपयश आले होते. सातारकर आणि पेशवे यांच्या, विलायतेहून हिंदुस्थानात निराशेने परत येत असलेल्या वकीलांना, क्रिमियन वॉरमध्ये इंग्लंडविरुद्ध काय काय युरोपात घडत होते याची थोडी फार कल्पना माल्टा येथे आली. " इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचे संधिसाधन " हे पुढे प्रचलित झालेले सूत्र या वेळी या मंडळींना सुचले होते की नाही, ठाऊक नाही; पण हिंदुस्थानात आल्यावर ही मंडळी ज्या खटपटीला लागली, त्यातून १८५७ चा उठाव जोरास लागला. कारण हिंदुस्थानातही दक्षिणेत व उत्तरेत ब्रिटिश राजवटी बद्दल असंतोष पसरला होता, व तो स्फोट घेण्याच्या क्षणाची वाट पहात होता. वसईच्या तहापासून रंगो बापूजी इंग्लंडहून परत येईपर्यंत महाराष्ट्रातही इंग्रजांचेविरुद्ध जे उठाव झाले, ते सर्व विस्कळित नसले तरी विरलेले होते; संघटित नव्हते. १८५७ च्या उठावाला काहीसे संघटित स्वरूप आणि तेही अखिल भारतीय सशस्त्र अशा पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचे आहे. दरम्यान १८४७ साली राजे प्रतापसिंह महाराज यांचाच कैलासवास झाला. तेव्हा रंगो बापूजी

हिंदुस्थानात परत आल्यावर त्यानी काशीस प्रतापसिंहाच्या राण्यांची गांठ घेतली व त्या नंतर १८५४ साली सातारचा राणीवसा सातारला परत आला. तेव्हापासून त्यांनी इंग्रजी राजवटीबद्दल कट उभारण्यास सुरवात केली होती, आणि त्याचे कारण " इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्तानचे संधिसाधन " करता येईल, अशी भावना त्यांना इंग्लंडचे जे रशियाशी बिनसले होते त्यावरून झाली असावी! ! (सातारा गॅझेटियर पहा)

ता. १६ मे १८५३ चा 'ज्ञानप्रकाश' साफ सांगतो की नानासाहेब पेशव्यांनी वडिलांचे पेन्शन आपणास मिळावे म्हणून जरी आपले दिवाण पिराजीराव, मिस्तर बेल्डईडा आणि होमर्सजी हे पारशी गृहस्थ मिळून मातबर शिष्टमंडळ पाठविले असले तरी नानासाहेबांची निराशा झाल्यावर, प्रतापसिंह महाराजांचा वकील म्हणून गेलेल्या व हात हालवीत परत यावे लागलेल्या रंगो बापूजीने प्रथम सातारा येथे काशीहून परत आलेल्या राणीसाहेबांशी सल्ला मसलत केली आणि नंतर नानासाहेब पेशव्यांचीही गांठ घेतली. तेवढयावरच रंगो बापूजी थांबले नाहीत. त्यांनी तात्या टोपे यांचेशी 'गुफ्तगू' केले. तात्या टोपे त्यावेळी बहादूरशहा बादशहाची महाराणी झिन्नतमहाल यांच्याशी बातचीत करीत होते. या साऱ्या गाठीभेटींचा व सल्लामसलतींचा रोख इंग्रजाविरुद्ध उघड उघड सशस्त्र बंड उभारण्याचा होता. या संबंधात कॉक्स यांनी लिहिलेला मुंबई इलाख्याचा इतिहास आणि सांगली संस्थानचे दफ्तरी असलेली रोजनिशी अभ्यसनीय ठरतील. त्याप्रमाणे धागेदोरे जुळविल्यावर महाराष्ट्रीय बरकंदाजांनी पुढाकार घेऊन सत्तावनचा उठाव साजरा केला. उत्तर हिंदुस्थानातील त्या 'दंग्याची' बातमी महाराष्ट्रात प्रथम साताऱ्यास आली. ती एका खासगत पत्रातून.

१८५७ च्या जूनचे प्रारंभास ती बातमी आली. त्यावरून हे स्पष्ट झाले की त्या उठावाच्या सामर्थ्यसंपन्न पुढाऱ्यांपैकी एक जे धोंडोपंत नानासाहेब पेशवे ते पुणे, सातारा, कोल्हापूर येथील मंडळीशी गुप्त पत्रव्यवहार करीत होते आणि त्या मंडळीतील सातारचे रंगो बापूजी गुप्ते व कोल्हापूरच्या राजांचे बंधू चिमासाहेब या मातबर मंडळींची नांवे इतिहासाने शिरोधार्य मानली आहेत.

पैकी रंगो बापूजी उत्तरेतून नानासाहेब पेशव्यांची गाठ घेऊन आल्यावर परळी खोऱ्यात (सज्जनगड, सातारा) सहा महिने राहिले व येथे त्यांनी लष्करी भरतीही व्यवस्थित केली. परळी खोऱ्यातील आणि भोर संस्थानचे हद्दीतील म्हणजे शिवाजी महाराजांच्या प्रिय डोंगरी भागातील मावळे आणि रामोशी मंडळीमधूनच ही भरती मुख्यत: झाली. इराणमध्ये पाठविलेल्या ब्रिटिश सैन्यातील मंडळी तेथून परत येण्यापूर्वीच वरील भरती बहुधा होऊन

गेली होती. भरती झालेल्या मंडळींच्यामधून एक लष्करी तुकडी उभारण्यात आली. सातारच्या राजासाठी आपल्या रंगोभाऊनी ऊर्फ रंगोबापूजींनी खटपट करून पदरी आलेल्या निराशेचा बदला घेण्याचा त्यांचा निश्चय झालेला पाहून, आपल्या राजासाठी खटपट करणाऱ्या त्या निष्ठावंताच्या शब्दाला मान देऊन भराभर भरती होऊ शकली. सातारा, भोर, पंढरपूर, बेळगांव एवढ्या सर्व भागात रंगोबापूजीनी काशीवासातच कैलासवास केलेल्या प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू महाराज यांच्या नांवाने बंड उभारण्याचे ठरविले होते. सदर शाहू महाराज हे प्रतापसिंहानी दत्तक घेतलेले चिरंजीव असून ते मूळ प्रतापसिंहाचे सेनापती बाळामहाराज यांच्या पत्नीला काशीच्या वाटेवरून जंगलात झालेमुळे 'जंगली महाराज' या नांवाने प्रसिद्ध होते आणि काशीहून परत येऊन साताऱ्यास राहिल्यावर 'सातारचे काशीकर राजे' या नांवाने ओळखले जाऊ लागले होते. त्यांच्या नांवाने बंड उभारण्याची कल्पना लोकांना एवढी पटली की त्या भोर बेळगाव पट्यातून लोक लष्करात प्रेमाने भरती होऊ लागले. कारण अनेक अपयशातूनच शेवटी यश येते हे लोकांना ठाऊक होते. रंगो बापूजीनी आता शस्त्र बंडाचा पाठपुरावा करणेचे मनावर घेतले याचा लोकांना आनंद झाला. कारण सातारच्या राजांचे नांवाने देखील बंडाचे अगदी आरंभी जे प्रयत्न झाले ते व्यक्तिशः व विखुरलेले होते. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाल्यावर, सातारच्या राजाला आपल्या हातचे बाहुले करून इंग्रजच खरे राज्यकर्ते झाले. या घटनेने संतापलेले गोपाळ हरी पटवर्धन, आण्णाजी शेंडे आणि विठुजी कुंडलकर तसेच संतू घाटगा व यशवंतराव चव्हाण यांनी सन १८२१ सालीच बंड उभारले होते. पण त्या पांचही जणांना कॅप्टन रॉबर्टसन याने ता. ३० आक्टोबर १८२१ रोजी पुण्यास गिरफदार करून, ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड केल्याच्या आरोपावरून न्यायासनासमोर उभे केले होते, याची आठवण १८५६ सालीही लोकांस झाल्याशिवाय राहिली नाही. ब्रिटिश लष्करातील शिपाई वश करून घ्यावे आणि तुरुंगावरील पहारेकऱ्यांचे हात ओले करून घ्यावे; अशातऱ्हेने कैदेतील मोकळे झालेले कैदी व ब्रिटिशांच्या फौजेतून विटलेले शिपाई यांच्या जोरावर बंड उभारावे असा त्या पटवर्धन–चव्हाण प्रभृती पंचकडीचा प्रयत्न होता. त्याप्रमाणे काही यशाची पावले टाकलीही होती. सातारच्या लष्करातील शिपायांना बनवून त्यांना बंडास प्रवृत्त करण्याच्या कारस्थानावरून 'रूपसिंग' परदेशी सापडला. त्याला इंग्रजांनी बंदीखान्यातही कोंडले. पण तेथून कडेकोट बंदोबस्तावर ताण करून रूपसिंग निसटला आणि आप्पासाहेब राजे असे नांव धारण करून बंडाचे निशाण उभारताच, लष्करातून फुटलेले शिपाई तर त्याला मिळालेच पण इतरही पांचशे रंगरूट त्याच्याकडे भरती झाले. त्या कटवाल्यांनी एकंदर दोन

हजार माणसे बंडासाठी उभी केली. आणि ब्रिटिशांच्या तीन बटॅलियन्सवर हल्ला करून तोफखाना पेटवून देण्याचा मनसुबा टाकला होता. न्याय मंदीरापुढे हे सर्व सिद्ध झाल्यावर गोपाळ हरी पटवर्धन यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना प्रथम देहांतप्रायःश्चिताचीच शिक्षा सुनावण्यात आली होती; पण पुढे तिचे रूपांतर जन्मठेप सश्रम काळे पाण्याची शिक्षा म्हणून झाले. आण्णाजी शेंडे यांनी जामीनावर मोकळे रहावे अगर बंदिखान्याचा मार्ग सुधारावा असा हुकूम झाला. विठूजी कुंडलकराच्या कपाळी तोच भोग आला. सन्तू घाटगे निर्दोषी सुटला पण यशवंतराव चव्हाणाला दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. पुणे येथील कमिशनर विल्यम चॅपलिन यांना यासंबंधात राबर्टसनने केलेला रिपोर्ट सांगतो की ब्राम्हणांना इंग्रज काय किंमत देतात–विशेषतः पुण्याच्या ब्राह्मणांना–ते कळावे म्हणूनच वर सांगितल्याप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या (मुंबई दफ्तर १८२२ पहा). या पाव शतकापूर्वीच्या घटनांचे स्मरण रंगो बापूजी रंगरूट भरती करीत असताना लोकांना होते, असे दिसते. कारण रंगो बापूजींच्या रंगरूट भरतीच्या मोहिमेत वरील गोष्टी आठवून आठवूनच होणाऱ्या परिणामाला तोंड देण्याच्या तयारीने लोक बंडात सामील होत होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनाही रंगो बापूजी बंडाबिंडाच्या पेचात सापडावा अशी मनापासून इच्छा होती. रंगो बापूजींनी इंग्लंडात जाऊन साताऱ्च्या राजांची वकिली केली हाच त्यांचा भयंकर अपराध असे ते अधिकारी मानीत होते. काही ब्रिटिश अधिकाऱ्यांना तर रंगो बापूजींच्या रक्ताचीच तहान लागली होती. कारण १८५७ च्या बंडाला प्रवर्तक अशी इतर कोणतीही कारणे असोत, त्याची इंग्लंडमधील शिष्टाई ही बहुतांशी कारणीभूत आहे, अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे इंग्रजांचा नक्षा उतरविण्याला जेवढे रंगो बापूजी टपले होते, तेवढाच इंग्रजही रंगो बापूजीवर टपला होता. या सामन्याला आलेले अटीतटीचे रूप हे असे रंगले आणि त्याने दक्षिणेतही असा व्यापकपणा घेतला की पार कानाकोपऱ्यातील खेड्यापाड्यातूनसुद्धा, आठदहा वर्षांची पोरेढोरेही बंडाच्या घडामोडींची चर्चा करीत असे विनायक कोंडदेव ओकांनी आपल्या 'शिपायाचे बंड' पुस्तकात नमूद केले आहे.

३ : सातारा छत्रपतींच्याकडील उठाव

इंग्लंडहून प्रतापसिंहाची वकिली करून परत फिरलेले रंगो बापूजी माल्टा येथे काही काळ थांबून १८५४ च्या फेब्रुवारीत हिंदुस्थानात परत आले. यानंतर जुलै १८५४ पासून डिसेंबर १८५५ पर्यंत ते 'गुप्तरूपे' हिंडले. त्यात त्यांनी कानपूर येथे नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांच्याशी केलेल्या 'गुफ्तगू' ला अनुसरून काशिराजा उर्फ प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू यांच्या नांवाने दक्षिण महाराष्ट्रभर रंगरूट भरती केली असली तरी स्वतः राजपुत्राने त्या कामी प्रत्यक्ष भाग घेतल्याचे दिसत नाही. तरीपण राजघराण्यातील 'काकासाहेबांनी' म्हणजे प्रतापसिंहाच्या सेनापतीचे चुलत्यांनी रंगो बापूजी आणि त्यांची मंडळी जे करीत होती त्या कामी थेट ११ जून १८५७ पर्यंत आस्थेने लक्ष घातलेच होते. रंगो बापूजींनी अखिल भारतीय उठावाला मदत करण्याकरिता आणि प्रत्यक्ष साताऱ्यात उठाव करण्याकरता डिसेंबर १८५६ पासून जिवापाड मेहनत घेतली आणि आपला पुतण्या वासुदेव गुप्ते याच्या हाताखाली पांचशे माणसांची कुमक नानासाहेब पेशव्यांकडे प्रथम पाठवून दिली. (मुंबई गॅझीटिअरचा सातारा जिल्हा विभाग)

डिसेंबर १८५६ पासूनच्या पुढील सहामाहीत रंगो बापूजी तेवढाच उद्योग करून थांबले नाहीत; तर त्या काळच्या उत्तरार्धात रंगो बापूजी आणि त्यांच्या साथीदारांनी आपल्या हेतूपूर्तीसाठी माणूसबळ, द्रव्यबळ आणि साधन–बळ मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. येनवडे, वाठार, देऊर, वर्धनगड, वारूगड, आरवी, कळंबी, कऱ्हाड, अरळे, अर्बुजगड, येकमुल्ली, जकातवाडी, फलटण पंढरपूर, बेळगाव, शहापूर आणि कोल्हापूर असे रंगरूट भरतीचे मुख्यमुख्य चव्हाटे होते. एप्रिल १८५७ पासून तर रंगो बापूजीच्या पायाला दम नव्हता. त्याचे मुख्य ठाणे साताराच–म्हणजे सातारा–मेढे रस्त्यावरील (अ)हमदाबाद होते. खुद्द साताऱ्यात देखील रंगो बापूजी निरनिराळ्या ठिकाणी मुक्काम ठोकीत. मंगळवार पेठेतील बाळाजी शिंप्याचे घर, कृष्णेश्वर मंदिराजवळील गोसावीवाडा आणि विठोबाचे नळाजवळील सखाराम दाजी काबाडे यांचे बिऱ्हाड, ही रंगो बापूजींची मुख्य आश्रयस्थाने होती. कोल्हापुरास असलेला सातारचा तात्या फडणीस, कऱ्हाड येथील दौलता पवार, कोकणातील रंगो बापूजीचा मेहुणा केशव नीलकंठ उर्फ आण्णा मामा चित्रे, भोरमधील शेटचे बन्धू, सातारच्या बावीसावे नेटिव पलटणीचे दफ्तरदार असलेले गणेश

सखाराम कारखानीस, अशी काही नांवे रंगो बापूजींचे अनुयायी आणि प्रतिनिधी म्हणून आढळात येतात. त्यांच्या सहाय्याने कमीत कमी दोन हजार माणसांची अव्वल कुमक मिळवावी आणि तिच्या सहाय्याने साताऱ्यात इंग्रजी कैदखान्यात असलेले तीनशे कैदी मोकळे करावेत, सातारा–यवतेश्वर–महाबळेश्वर येथील युरोपियनांच्यावर हल्ला करून त्यांना यमसदनालाही पाठवावे; शिवाय सरकारी तिजोरीवरही डल्ला मारावा आणि साताऱ्यात उठावणी करावी, अशी आखणी रंगो बापूजींनी केली होती. ही आखणी करताना रंगो बापूजी व त्यांचे साथी यांनी आपल्या अनुयायांपुढे ठेवलेले ध्येय असे होते की, साताऱ्यास छत्रपतींच्या गादीची पुन्हा स्थापना करावयाची, तिच्यावर प्रतापसिंहाचे दत्तक चिरंजीव शाहू उर्फ काशीराजा अथवा घरगुती वर्तुळातून ओळखला जाणारा जंगली महाराज किंवा बोवा महाराज याला गादीवर बसवावयाचे आणि हिंदुस्थानात इंग्रजाविरुद्ध जो उठाव होतो आहे त्याला हातभार लावावयाचा. याकामी सुलभता यावी म्हणून साताऱ्यास इंग्रजांनी ठेऊन दिलेली बावीसावी नेटिव फलटण फितूर करून घ्यावयाची असाही मनसुबा होता. हिंदुस्थानात व्हावयाच्या उठावाच्या बातमीचा प्रसार चहूकडे करीत करीत जानेवारी १८५७ पासून रंगो बापूजी ठिकठिकाणी कटवाल्यांच्या सभाही घेत आले होते. शेवटच्या सभेत ‘पराभवाने आपणाकडून शेवटची पाठ फिरविली पाहिजे.’ असा निकराचा प्रयत्न करण्याचे वचन रंगो बापूजीला मिळाले होते. मानसिंग हा एक मामुली शिपाई; सातारा तुरुंगाचा पहारेकरी; पण त्यानेदेखील रंगो बापूजीना वचन दिले की आपण बावीसावी फलटणच काय पण ‘घेंडा रेजिमेंट’ म्हणजेच स्थानिक घोडदळ, तसेच मुंगलाई सवार अथवा दक्षिण–मराठा–रेग्युलर घोडदळ सहाय्य करून घेऊ ! या सैन्याबरोबर जो काय दारुगोळा मिळेल त्याशिवाय भोरमध्ये दारूचे कोठार आणि तोफेचे कुल्फी गोळे रंगो बापूजींनी तयार ठेवले. त्यांचा पाठिराखा आत्माराम उर्फ आप्पा ऐतवडेकर याने स्वतःच आठशेवीस स्फोटक चेंडू तयार ठेवले होते; तर बाकीच्या साथ्यांनी तरवारीसारखी जुनी शस्त्रास्त्रेही जमवून ठेवली होती. तेव्हा दोन हजार माणसांनिशी हल्ला चढवावयाचा, तीनशे कैदी साताऱ्यातून मुक्त करावयाचे आणि भोरच्या पंतसचीवांनी या कामी सर्वथैव सहाय्यक व्हावयाचे तर बाकीच्या पेशवे छत्रपतींच्या मांडलिकांनी योग्य मोका मिळताच त्या उठावाला येऊन मिळावयाचे, असा संकेत करून आणि साताराच्या राजवाड्यात राहणाऱ्या राजघराण्याला बित्तंबातमी पुरवून सगळा कारभार चालवायचा, असा शेवटचे सभेत निर्णय घेणेस रंगो बापूजी कचरले नव्हते.

रंगो बापूजींनी अशी तयारी चालविली असतानाच, ईस्ट इंडिया कंपनीकडील सातारा–पोलिसांचे प्रमुख व बोवासाहेब या नांवाने ओळखले

जाणारे अंबाजी राजे शिर्के यांना सातारच्या राणीसाहेबांनी चांगलेच वळवून घेतले होते. प्रतापसिंहाच्या थोरल्या राणीसाहेबांची ही करामत होती. उठाव होईल त्यावेळी सर्व पोलीस हात जोडून बसविण्याचे त्यांनी मान्य केले होते. आदले साली म्हणजे १८५६ साली साताऱ्यास चाळीस हजार रोहिला आणविण्याच्या कारस्थानात राजे शिर्के होतेच. भोरपासून खानापूर (बेळगाव) तालुक्याच्या शेवटच्या टोकापर्यंत इंग्रजाविरुद्धच्या उठावासाठी गुप्तपणे पैसाही उभारण्यात येत होता. कोल्हापूरकडील खालीलभागाशी संबंध अबाधित राखण्यासाठी वाळवे हे केंद्र तयार करण्यात आले होते व तेथून बऱ्याच धामधुमी चालत. दक्षिण महाराष्ट्राच्या दक्षिण केंद्राचा संचालक म्हणून कोल्हापुरचे चिमासाहेब काम पाहत होते आणि त्यांचे सल्लामसलतीनेच सावंतवाडीपर्यंत आपल्या उठावाचे धागेदोरे रंगो बापूजींनी विणले होते.

‘परमेश्वरी कृपा’

अशा या सज्जतेनिशी कानपुरी ज्या ता. १२ जून १८५७ रोजी इंग्रजविरोधी उठावाचा बार उडविण्याचे ठरविले होते, त्याच तारखेस साताऱ्यास रंगो बापूजींनी उचल करण्याचे ठरविले होते. त्यासाठी प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू आणि सेनापती (प्रतापसिंहाचे सेनापती बाळासाहेब यांचे दत्तक चिरंजीव) दुर्गासिंह यांचे घोडे जेरबंद करून सज्ज ठेवण्यात आले व त्या दोघांनी स्वातंत्र्यसंग्रामाच्या उठावाचा पुढाकार घेण्याकरिता बाहेर पडावयाचे म्हणून एक रात्रौ सर्व सिद्धता झाली. या सिद्धतेची सूचना मानसिंगाला मिळताच ता ११ जून १८५७ रोजी बावीसाव्या फलटणीतील वजनदार आणि मातबर माणसे फितविण्याचा त्याने कसून प्रयत्न केला. पण ‘परमेश्वरी कृपेने’ हा सर्व कट ईस्टइंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळला! ही ‘परमेश्वरी कृपा’ म्हणजे दुसरे तिसरे काही नसून महाराष्ट्राच्या पांचवीला पुजलेली फंदफितूरीच होय! सन १८३१ मध्ये उमाजी नायकाला ज्याने पकडण्यासाठी इंग्रजांना साहाय्य केले तोच रामोशी नाना रहा चव्हाण यावेळीही पुढे झाला. आणि पंतसचीवांनी याला नोकरीतून कमी केले असल्याकारणाने या असंतुष्ट आत्म्याने भोरकरांचा काटा काढण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचे कानाशी लगट केली. बातमी मिळण्याचा आवकाश की सातारचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट रोज यांनी हालचालीस सुरुवात केली आणि लोकांच्या उठावावर घणाचे घाव घालण्याचे निश्चयाने कामास लागले. तावडतोब त्यांनी मानसिंगास धरले. लष्करी कोर्टापुढे उभे केले आणि ता. १२ जून रोजी मानसिंगाला त्यांनी तोफेच्या तोंडी दिले. तोफेच्या तोंडी जाताना भोवताली जमलेल्या लोकांना उद्देशून मानसिंग गरजला कीं, “तुम्ही जातिवंत हिंदू आणि जातिवंत मुसलमान असाल, तर तुम्ही

या गोऱ्या लोकांचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही." ज्ञानप्रकाश (२१ जून १८५७) हे वृत्त जसे देतो तसेच १७ ऑगस्ट १८५७ ज्ञानप्रकाश असेही वृत्त देतो की, "गेले गुरुवारी सातारच्या थोरल्या राणीसाहेबांचे दत्तक चिरंजीव, काशी महाराज, यांना भल्या सकाळी सहा वाजता धरून नेण्यात आले. राजवाड्याला मुगलसवार फलटणीतील दोनशे सोजिरांनी वेढा घातला होता. दोन भरून आणलेल्या तोफाही आणण्यात आल्या होत्या. आपण बंडात सामील असल्याचा वहीम कंपनीसरकारास आला असून आपणाला पकडून पुण्यास पाठविण्याबद्दल गव्हर्नरसाहेबांनी हुकूम केला आहे, असेही प्रथम काशीराजांना सांगण्यात आले होते. त्यांच्या मातोश्रीनाही तसेच सांगण्यात आले. नंतर काशीमहाराज, प्रतापसिंहाच्या सेनापतींचे चिरंजीव आणि प्रतापसिंहाच्या सेनापतीचे चुलत्याचे चिरंजीव परशुराम बाबा या तिघांना एका रथात घालून, त्यांच्या मागोमाग, माईसाहेब, राणीसाहेब, (आईसाहेब) आणि परशुराम बाबांच्या पत्नी एका गाडीतून चालविल्या व त्यांना थेट खडकीला नेणेत आले."

त्यानंतर लेफ्टनंट केर याचे मार्फत बोबासाहेब शिर्क्यांचा वाडा इग्रजांनी मातीस मिळविला. मग 'काकासाहेबासंबंधी' चौकशी करण्यात आली आणि राजद्रोहाचा गुन्हा त्यांच्यावर शाबीत झाला असे धरून त्यांची सर्व माल मिळकत तर जप्त करण्यात आलीच, पण त्यांना जन्मठेपेची शिक्षाही देण्यात आली. म्हाताऱ्याला हा अपमान सहन झाला नाही. त्यांना साताऱ्याहून हलविण्याची तयारी होते न होते तोच त्यांचा सात्विक संतापाने एकाएकी मृत्यू ओढवला त्यांच्या पोटच्या प्रजेला उपासमारीशिवाय काही उरले नाही. विनायक कोंडदेव ओकांच्या लेखणीलाही ते दृश्य वर्णवेना!

सातारच्या राजघराण्याचे आणि त्यांच्या सहाय्यकांचे दुर्दैव एवढ्यानेही संपले नाही. विनायक कोंडदेव ओक आपल्या 'शिपायांचे बंड' या पुस्तकात लिहितात की, प्रतापसिंहाच्या मागे सातारच्या गादीवर नाममात्र बसविलेल्या त्यांच्या भावाच्या म्हणजेच आप्पासाहेब महाराजांचे दत्तक चिरंजीव व्यंकोजीमहाराज, अर्थात काशीराजाचे चुलत बंधु त्यांची दत्तक आई वगैरे मंडळीनाही मुंबईच्या वाटेला इंग्रजांनी लावले. कारण होळकर आणि १८५४ मध्ये इंग्लंडहून निराशेने परत आलेले रंगो बापूजी यांच्या चिथावणीने ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुद्ध कट करण्यात सामील असल्याबद्दल सातारच्या राजघराण्याला व विशेषतः त्यातील राण्यांना जबाबदार धरले होते. त्या सर्व मंडळींची रवानगी मुंबई जवळील खाटीक-बेटात १८५७ च्या ऑगस्टात केली. शाहू व दुर्गासिंग यांनी बंडातील सामिलीची कबुली दिली. सर्वांना अहमदनगरच्या किल्यात १८५८ मार्च महिन्यात हालविण्यात आले. तरी त्यातूनहि प्रतापसिंह पुत्र शाहूला उचलून कराची येथे स्थानबद्ध करण्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या

लोकांनी रंगो बापूजीसाठी जीव पाखडला. पांचशे रुपयांचे बक्षीसहि पकडून देणारास लावले पण शेवटपर्यंत तो महाभाग इंग्रजांच्या हाती लागला नाही. तेव्हा त्याचा मुलगा सीताराम आणि दुसरे सोळा साथीदार यांच्या मागे कंपनी हात धुऊनच लागली म्हटले तरी चालेल.

रंगो बापूजी भूमिगत

ऑगस्ट २७ च्या सुमारास कंपनी सरकारच्या संशोधनात असे आढळून आले की रंगो बापूजीचा कट रंगारूपाला आणण्यात चांगल्या ऐंशी माणसांचे हात गुंतले असून त्यांतील चौतीस माणसे मातबर होती. ऑगस्टच्या मध्यास या चौतीसांपैकी सतरा कंपनीच्या हाती लागली; पण कटाचा पुढारी रंगो बापूजी हा आपले सोळा साथी–दौलतराव पवार, केशवराव किवे, गंगाराम भोसले, रावजी सोनार पावसकर, काळू कुणबी वगैरेसह जो तारीख ५ जुलई १८५७ पासून इंग्रजांच्या नजरेपार झाला, तो असा की तेल घालून पाहणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीच्या डोळ्याला ह्यांपैकी एकही आढळला नाही. मानसिंगाची दैवरेषा कशी उमटली याची कल्पना आल्याबरोबरच बाकी कटाचा सुगावा लागू नये या धोरणाने ही मंडळी भूमीगत झाली ती झालीच. तरीहि पांच एक कटवाल्यांच्या तलवारी इंग्रजांच्या हाती लागल्या. आप्पा ऐतवेडकरांच्या सातशे अठ्याण्णव चेंडू–गोळ्या त्यांना सापडल्या, पंधरा माफीचे साक्षीदार आणि त्यांचे कबुलीजबाब त्यांना मिळाले. त्या पुराव्यावरून २७ ऑगस्ट १८५७ पासून ७ सप्टेंबर १८५७ पर्यंत चार्लस फोर्बस हा कार्याध्यक्ष आणि कर्नल जी. मालकम् व कॅप्टन जे. रोज हे सभासद असलेल्या तिघांच्या लष्करी न्यायासनापुढे १८५७ च्या १४ व्या रेग्युलेशन खालील ७ व्या कलमा प्रमाणे खटला चालला. निकालाच्या दुसरेच दिवशी म्हणजे ता. ८ सप्टेंबर १८५७ रोजी १) नारायण (नाना) बापू पावसकर (सोनार) २) केशव नीलकंठ चित्रे ३) शिवराम मोरेश्वर बहुश्रुत (कुलकर्णी) ४) विठ्ठल कोंडी (तात्या) व ५) सीताराम रंगो गुप्ते या पांच जणास मरेपर्यंत गळफास लावून फाशी देण्यात आले. १) मुनाजी ऊर्फ बापू (नारायण) बाबर ऊर्फ भांदिर्गे २) सखाराम बळवंत शेटये ३) बाब्या नाथ्या गायकवाड (मांग) ४) येशा नाथ्या गायकवाड (मांग) ५) गणेश सखाराम कारखाननीस ६) नाना उमाजी रामोशी या सहा जणांना तोफेच्या तोंडी देण्यात आले. आणि १) रामजी बापूजी ऊर्फ रामसिंग चव्हाण २) बाब्या हाणगू (कानगू) शिरतोडे (रामोशी) ३) नाम्या नाईक रामोशी ४) शिवाजी सोमाजी पाटोळे ५) पर्वती विठूजी (गणेश) पाटोळे ६) पाटलू येसू या सहा जणांस गोळ्या घालून ठार करण्यात आले. कारण त्या सर्वांवर राजद्रोहाचा आरोप सिद्ध झाला होता. त्या सर्व अपराध्यांची खाजगी मालमत्ता



श्री छत्रपति प्रतापसिंह महाराज राजे भोसले



श्री. रंगो बापूजी गुप्ते (रोहिडखोरेकर)



श्री. दादाभाई नौरोजी



न्या. मू. महादेव गोविंद रानडे



ना. गोपाळ कृष्ण गोखले

जप्त करण्यात आली व सर्वांची पाळेमुळे खणण्यात कमीपणा मानण्यात आला नाही. कारण न्याय मंदिराच्या निकाल पत्रातच म्हटल्याचे प्रसिद्ध आहे की ' कठोर शिक्षेचे उदाहरण आरंभीच घालून देणे ही परिणामत: मोठ्यात मोठी दया ठरते आणि गुन्हा घडल्याबरोबर तावडतोब शिक्षा देण्याने इतर लोकांस इशारा म्हणून ती शिक्षा चांगलीच चमकावते. '

न्यायमंदिरापुढे आलेल्या पुराव्यावरून असे सिद्ध मानण्यात आले की आपले चिरंजीव सीताराम, मेहुणे केशव नीलकंठ चित्रे आणि गणेश सखाराम कारखानीस यांच्या मदतीने प्रथम ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार लुळा–आंधळा करून टाकावयाचा आणि कंपनीच्या जागी प्रतापसिंहाचा दत्तक मुलगा शाहू याला गादीवर बसवावयाचा, असा कट रंगो बापूजी गुप्ते यांनी रचला व तो पार पाडण्याची तारीख त्याने कानपुरास ज्या दिवशी नानासाहेब पेशवा भारतीय उठावात सामील झाला ती १२ जूनच धरली होती. कटाची पहिल्यापासून माहिती नाझर कोर्टातील कारकून सखाराम दाजी काबाडे, जकातवाडीचा सोनार, हरी राघोजी देवरूख, भोर संस्थानातील पाराहूरचा बाळकृष्ण वामन प्रधान, कुशाबा उर्फ कृष्णाजी दाजी प्रधान, आत्माराम उर्फ आप्पा बाबा भट ऐतवडेकर कुलकर्णी, काशीळचा गोपाळ रामचंद्र शेणवी, अरळे येथील अंताजी कारी क्षीरसागर, शिंदखेडचा मार्तंड भगवंत (पण दत्तक म्हणून मार्तंड पांडुरंग) दिघे, ल्हासुर्ण्याचा गणेश अनंत गुभणे, वाळवे — बोरगावचा हैबती उर्फ हैवी वल्लद सकू, सातारचा वेंकू बाळशास्त्री नांदेकर, बोरगांवचा बळवंत नारोजी जाणकर, भोर संस्थानातील धावडीचा बाळाजी हरी राऊत, गोडेखानगांवचा पीरखान वल्लद चांदखान शेख, तासगाव तालुक्यातील चोरे गांवचा राघो व्यंकटेश बहुश्रुत कुलकर्णी, सातारचा सुपारी–व्यापारी बाळाजी बापूजी यादव, आणि मानसिंगाची बायको गंगा परदेशी, ही सर्व मंडळी थोडीफार या कटात मिसळली होती व त्यांचा हातही त्यात होता. पण एका परमेश्वराला आणि ईस्ट इंडिया कंपनीलाच ठाऊक असलेल्या कारणासाठी त्यांना माफीचे साक्षीदार करण्यात आले. त्यांनी चव्हाट्यावर मांडले की, भोरपासून बेळगावपर्यंतच्या पट्यात आपल्या कटासाठी मांग, रामोशी, कोळी या लोकातून रंगो बापूजी रंगरूट भरती करीत होते. यावर्षी हिंदुस्थानभर बंड होणार असे भाकीत आरळ्याच्या नागाई देवीने केल्याचे पिकविण्यात आले. तथापि, खरसुंडीच्या देवीने तसा कौल न दिल्याने लोकांचा पहिल्या पिकवलेल्या बातमीवर बसावा तसा विश्वास बसला नाही. प्रचार म्हणून असेही सांगण्यात येत होते की सातारच्या गादीवर ईस्ट इंडिया कंपनीने केलेला अन्याय मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांना पटला असून त्यानेंच रंगो बापूजीला बंड उभारण्यास सांगितले आहे व बंड उभे राहताच तो शरण येणार आहे.

मधील लिंगायत स्वामींच्या साहाय्याने पांच हजार सैनिक जमवून उठाव केला. त्यात तो इटारसीच्या आसपास कामास आला. नरसाजी आपल्या भावास साताऱ्यापासून कल्याणपर्यंत साथ देत राहिला. तो १८५९ मध्ये इंग्रजांच्या हाती लागला व तोफेच्या तोंडी गेला.

इंग्रजाविरुद्धच्या उठावातील सातारासूत्रधाराच्या म्हणजे रंगोबापूजींच्या उठावाचा व्याप निजाम–हैदराबाद–वऱ्हाडपर्यंत–होता. १८५२ साली निजामकडून इंग्रजांनी वऱ्हाड मिळविले. तेव्हा त्या असंतुष्टाला रंगोबापूजींनी आपल्याकडे मिळविले. हैदराबादचे रामान्, माहुरचे उदाराम राजे, दारव्हयाचे रामकृष्ण चितामण मोहरीर, करंजाचे घुडे अशी मातबर साथ मिळवून रंगोबापूजींनी गार्वानगडाजवळील एलिचपूर आणि माहूर जवळील दारव्हा ही आपली संघटना-केंद्रे उभारली होती. १८५२ मध्येच दारव्हयास राममाऊ परांजपे (तपस्वी बाबासाहेब परांजपे यांचे चुलते) तरुणांच्या लष्करी कवायती शिक्षणाची जिद्दीने जिम्मेदारी घेऊन होते. पण ब्रिटिशांच्या लँडरेकार्डस्मधील परांजप्यांची बदली १८५३ साली पुण्यास झाल्यावर, रंगो बापूजींनी यांच्याकडे लष्करी संघटनेच्या शिक्षणाचे काम चिंचवड येथील केंद्राकडे सोपवून, चतुःशृंगीच्या मैदानावरील गुप्तपणे चाललेल्या नेमबाजीच्या शिक्षणाची निगा घ्यावयास सांगितली आणि दारव्हयास लक्ष्मण रंगनाथ दाणी या एकनाथ वंशीयास केंद्रसंघटक नेमले. पुण्यास तर जंगली महाराज मठात पांचशे तरुण लष्करी जवान म्हणून तयार करण्याचे प्रयत्न जारी होते. असा या तयारीचा पंचवार्षिक विकास झाला. सातारला उठाव होऊन रंगोबापूजीचा मुलगा ८ सप्टेंबर १८५७ ला ब्रिटिशांनी बळी घेतला, तरी रंगोबापूजी डगमगला नव्हता. तो भूमीगत होऊन उठावाची निशाणे हालवीत होता. तथापि बोवासाहेब शिर्के यांच्यावरील खटला १८५८ साली २४ मार्चला संपल्यावर व राणी लक्ष्मीची झाशी पडल्यावर, निजाम रंगो बापूजीची फळी सोडून उघड उघड इंग्रजांची कड घेऊ लागले. दरम्यान रंगोबापूजी पुण्यास भूमिगत वावरत असताना बजाबा प्रधान काशीकर याने दगा दिल्यामुळे पकडले गेले होते, ग्वाल्हेरीच्या तुरुंगात कोंडलेही गेले होते. पण अटकेच्या नवव्याच दिवशी तेथून ते शिताफीने निसटलेही होते. सन १८५८ च्या दसऱ्यापर्यंत ते डोळ्यात तेल घालून सर्व दक्षिण, उत्तरेकडचे संधान राखून हिंडले आणि त्यांची खात्री झाली की " तेथे परमेश्वराचे अधिष्ठान पाहिजे "! म्हणून मग उठावाची उठाठेव जेथल्या तेथे थांबविण्याचा त्यांनी निर्णय घेतला, आणि आपल्या कार्यकर्त्यांना तसे कळविण्याचा सपाटा चालविला. त्यानंतर परमेश्वरी अधिष्ठानाच्या प्राप्तीसाठी रंगो बापूजी इतर निश्चितार्थी धीरवीराप्रमाणे गोसावी झाले.

साताऱ्याहून गुप्त झाल्यापासूनच्या बारा वर्षात रंगोबाजींनी योग मार्गाचा अभ्यास करून १८७० मध्ये ते दारव्हा (द्वारावती) येथे एकाएकी प्रगट झाले. संत बैरागीबुवा या नांवाने लोक त्यांना ओळखत. प्रथम तेथील मल्लिकार्जुन मंदिरात ते राहत. पण दररोज आदिनाथ महाराजांच्या समाधीच्या दर्शनास येत. ते वैष्णव भक्त व रामानुज सांप्रदायी होते. कपाळावर त्रिपुंड गंध लावीत; गळ्यात माळा व अंगावर भगवी वस्त्रे असत. शरीराने मजबूत, जाडजूड व गोरेपान होते. मराठी, संस्कृत, हिंदी व इंग्रजी भाषा त्यांना १८७० त येत. साताऱ्याहून गुप्त झाल्यानंतर प्रथम ते माहूरकराकडे येत. शेवटी १८७५ पासून दहा वर्षे माहूर रस्त्यावर कुपटी व नागझरी यांच्या संगमाजवळ एक मठ करून ते राहिले.तेथे वाघ व मोठाले सर्प त्यांच्या दर्शनास येत असे सांगतात. त्यांनी १८८५ मध्ये त्याच मठात समाधी घेतली (वैशाख शुद्ध पौर्णिमा). दर गुरुवारी लोक त्यांच्या समाधी दर्शनास येतात. दरसाल पुण्यतिथीस यात्रा होते. (परत-वड्याचे स्वामी योगानंदानी दिलेली माहिती).

साताऱ्च्या राजघराण्याचा वंश वेल

मालोजीराव भोसले

शहाजी राजे

संभाजी — छत्रपति शिवाजी महाराज

(छत्रपति शिवाजी महाराज) — संभाजी — राजाराम

(संभाजी) — शाहू महाराज (१ ले) १७०८–१७४९

रामराजे (कोल्हापूरच्या वेड्या शिवाजीचे दत्तक घेतले ते राजारामाचा नातू) १७४९–१७७८

थाकटे शाहू महाराज (दुसरे) उर्फ आबासाहेब महाराज वावीच्या त्र्यंबकजी भोसल्यांचे दत्तक घेतले ते १७७८–१८०८

प्रतापसिंह १८०८ ते १८३९ त पदच्युत मृ. १८४७ — राजाराम — शहाजी ऊर्फ अप्पासाहेब १८३९ ते १८४८

(प्रतापसिंह) — शाहू ऊर्फ जंगली महाराज ऊर्फ काशीराजा (१८५७ चे उठावात) मृत्यु १८९२

(शहाजी ऊर्फ अप्पासाहेब) — व्यंकोजी (दत्तक) १८४८ ते १८६४

आबासाहेब (शहाजींच्या पत्नी सगुणाबाई ऊर्फ आईसाहेब यांनी घेतलेला दत्तक) १८६४ ते १९०४

अण्णासाहेब १९०४ ते १९१४ — भाऊसाहेब १९१४ ते १९२५

(भाऊसाहेब) — शाहू २८ मे १९२५ ते १९५० (भाऊसाहेबांच्या पत्नी ताराराणी यांचा दत्तक) | (पत्नी सुमित्राराजे राणीसाहेब)

प्रतापसिंह — विजयसिंह — अभयसिंह — शिवाजी

४ : कोल्हापूर छत्रपतींकडील उठाव

सर्व जातीमध्ये उठाव

खुद्द साताऱ्यातील बंडाच्या उठावणीला कुरूप आले म्हणून दुसरीकडे जनता स्वस्थ होती असे नव्हे. मानसिंग परदेशी साताऱ्यास तोफेच्या तोंडी गेल्या-पासून एक महिन्याने आणि सीताराम रंगो गुप्ते प्रभृतीवरील खटला सुरू होण्याचे आगोदर सुमारे दीड महिना म्हणजे ता. १३ जुलै १८५७ रोजी पंढरपूर येथील ठाणे, खजिना आणि मामलेदार यांच्यावर हल्ला चढविण्यात आला. हा हल्ला करणारात कनोजी पंडे,– कन्हय्यालाल जगन्नाथ मिश्र, व किसनलाल जगन्नाथ मिश्र – असे दोन निजाम हद्दीतील २८ व २६ वर्षांचे भाऊ भाऊ होते; उमराव परदेशी हा वीस वर्षांचा रजपूत होता, सीताराम प्रसाद सुकुल हा २१ वर्षांचा कायस्थ ब्राह्मण व पिरा अप्पा पवार हा २० वर्षांचा मराठा असे सोलापूरचे उमदे तरूण होते; किसन संतुराम हा १६ वर्षांचा चिमुरडा अहमदनगरचा कायस्थ बाह्मण होता; कन्हैया बेळूजी व धर्मा सुभाना असे ऐन तिशीतले सातारचे दोन मांग होते; गणू बापू चव्हाण हा पंचविशीतील रामोशी आणि येडल पाटलू बागल हा २८ वर्षांचा मराठा, असे दोन खुद्द पंढरपूरकरच होते. त्यांनी कैद्यांना सोडविण्याचाहि घाट घातला होता. त्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे मामलेदार नागेश राघवेन्द्र आणि त्याचे दोन शिपाई शेख कासीम व शेख हुसेन हे कामास आले. येशा नांवाच्या एका इसमाला जखम झाली पण बारा दिवसांनी म्हणजे २५ जुलई १८५७ला तो मरण पावला. विठोबा या महाराष्ट्राचे दैवताचे क्षेत्रात हा हल्ला झाला, त्याचा खटला साताऱ्यास चालला. पंढरपूर त्यावेळी सातारा जिल्ह्यात होते. गिरजाप्पा त्रिपण्णा वाणी या गृहस्थाने पुरावा केला; त्या तीस वर्षांच्या तरुणाला काही पैसे देऊन कन्हय्यालालने विट्ठल कृष्ण, बापू बाळूजी, यांच्या विरुद्ध बालंट उभे केले. पण उपयोग झाला नाही. ता. ३० जुलई पासून ३ ऑगस्ट पर्यंत खटला चालला आणि ता. ४ ऑगस्ट रोजी मिश्र बंधूंना तोफेच्या तोंडी देण्यात येऊन बाकीच्यांना जन्मठेपेवर पाठविले. सदर शिक्षा योग्य अशाच झाल्याचा अभिप्राय ता, १० ऑगस्ट १८५७ च्या ज्ञान-प्रकाशने व्यक्त केला असून २४ सप्टेंबर १८५७ चा ज्ञानप्रकाश सांगतो की, 'मामलेदार साहेबांच्या पत्नीला सरकारने दरमहा तीस रुपयांचे पेन्शन सुरू केले असून मेलेल्या शिपायांच्या पत्न्यांना प्रत्येकी दोन रुपये पेन्शन दिले आहे.

ज्यांनी आरोपीना पकडून दिले त्या प्रत्येकाला शंभर रुपये बक्षीस कंपनी सरकारने दिले.'

सातारा जिल्ह्यातील या दोन उठावांची अशी वाट लागली तरी साताराचे लोक दबले नव्हते. १८५९ च्या एप्रिल अखेरी पर्यंत एका वा दुसऱ्या सातारकराचा इंग्रजा विरुद्ध उठाव झाल्याचा बोभाट होतच होता. स्वतःला सातारचा राजा म्हणविणारा एक इसम कॅप्टन मरे याने दक्षिण हैदराबादेस एप्रिलला १८५९ मध्येच पकडला होता. त्याच्या हाती आणखी एक इसम लागला होता. या दुसऱ्या इसमाजवळ तर कर्नाटकातील सूरपूरच्या बेंदरेना द्यावयाची काही मोहोरबंद पत्रे आढळली. त्या पत्रात इंग्रजाविरुद्ध उठाव करण्यास प्रोत्साहन देणारे एक सही शिक्याचे आज्ञापत्रहि होते. ता. १० एप्रिलला एक ब्राह्मण गिरफदार करण्यात आला, त्याच्याजवळ नानासाहेब पेशव्यांचे जाहीरनामे आणि भिंतीपत्रके सापडली. कॅप्टन बुलॉक याने त्या ब्राह्मणाचे खटले चालविले व त्याला देहान्ताची शिक्षा दिली. हैद्राबादेस असे झगझगीत उदाहरण व्हावयास हवे असे आपले मत ता. २३ एप्रिल १८५९ च्या इंग्लिशमन पत्राने दिले असून त्याचबरोबर अशीहि बातमी दिली आहे की, "हैद्राबाद रेसिडेंट हा ता. १५ डिसेंबर १८५७ पासून चौकशी चालवितो आहे की, नारायण विठ्ठल भुणकर ऊर्फ नानाबुवा ही काय चीज आहे? या नानाबुवाचे वास्तव्य पैठणला असल्याचे बोलण्यात आहे. त्याला पकडल्यावर सातारकडे पाठविण्याचे हुकूमही दिले आहेत. हा यशवंतरावाचा वकील दिसतो. राजांचे शिक्का मोर्तब त्याच्याजवळच होते. प्रत्येकी वीस रुपये पगारावर अनेकानेक रंगरूट मिळावेत, असे यशवंतरावाने या नानाबुवास लिहिलेले दिसते. अशा रंगरूटाकडून इंग्रजांना येथून घालवावयाचे आहे. पैठणात असलेला सातारचा राजा गोसावी आहे."

सगळ्या हिंदुस्थानात असलेल्या एकशेवीस भोसले घराण्यापैकी सर्व स्वतः राजे म्हणवून घेत असले तरी सातारचे व कोल्हापूरचे, अशी दोनच घराणी स्वतःला छत्रपती म्हणवून घेत. त्यापैकी वडील घराणे सातारचे. त्याने व त्याच्या अभिमान्यांनी सत्तावनच्या इंग्रजाविरुद्ध झालेल्या सार्वत्रिक उठावात घेतलेल्या भागाचे व त्याच्या पर्यवसानाचे वर्णन 'चीत झाले तरी चेतना गेली नाही' या शब्दांनी केलेले आढळते. आता साहाजिकच आपले लक्ष छत्रपतींच्या दुसऱ्या घराण्याकडे म्हणजे कोल्हापुराकडे वळेल. त्यावेळी सातारचा पदभ्रष्ट सेनापती आणि तोफखाने यांच्यावर बंड उभारण्या संबंधात नानासाहेब पेशव्यांशी पत्रव्यवहाराचा आरोप सिद्ध धरल्यावर बंडात सामील झालेल्यांची त्यांनी जेव्हा नांवे सांगितली, तेव्हा लष्करी न्यायमंदिराने उद्‌गार काढले की 'हे सगळे गरीब गाईचे बाप दिसले, पण वाघिणीचे पिताजी निघाले' या

गोष्टीची आठवण ताजी झाल्याशिवाय राहणार नाही, आणि 'मला तोफेच्या तोंडी द्या' अशी विनंती सेनापतीने केली असता, त्याला इंग्रजांनी टांगून फाशी दिले हेही स्मृतीतून जाणार नाही. (ता. १ नोव्हेंबर १८५८ चा ज्ञानोदय)

त्या स्मृतीनिशी कोल्हापूरकडे नजर वळताच आपल्या चटकन् ध्यानी येते की, बेळगाव-धारवाडच्या रेजिमेंट्स प्रमाणेच कोल्हापूरच्या रेजिमेंटनेहि ता. ३१ जुलई ५७ रोजीच बंड करण्याचे ठरविले होते. तेथपासून १८५८ च्या मार्चपर्यंत कोल्हापूरने उठाव घेतला होता. कोल्हापूरच्या राजाचा भाऊ चिमासाहेब हाच या उठावाचा पुढारी होता. त्याला साहाय्यक म्हणून त्याचा दिवाण यशवंत आप्पाजी फडणीस, सातारचे व कोल्हापूरचे वतनदार बळवंतराव ऊर्फ बाळासाहेब नाईक निंबाळकर, सातारचा आण्णा फडणीस आणि रामसिंग परदेशी असे चिमासाहेबांचे हस्तक होते. कोल्हापूर हे अगोदरच दक्षिण महाराष्ट्राचा तापदायक भाग म्हणून इंग्रजांच्या डोक्यात भरला होता. त्यामुळे इंग्रजांनी तेथे लष्करही ठेवले होते व रेसिडेंटही ठेवला होता. सत्तावनच्या उठावाची उत्तरेची बातमी हळूहळू दक्षिणेतून झिरपत झिरपत कोल्हापूरास येऊन थडकत होती. नानासाहेब पेशव्यांनी ज्योतिराव ऊर्फ भाऊसाहेब घाटगे यांना कोल्हापुरी चिमासाहेबाकडे लावून देऊन लखनौ येथील एक शियापंथीय अक्षर संदेश असलेली चांदीच्या मुठीची तलवार नजर म्हणून पाठविली होती आणि उठावाला उठाव आणण्याची विनंती केली होती. उत्तरेत बंडाने उठाव घेण्याचे अगोदरच ग्वाल्हेर सोडून बाळासाहेब नाईक निंबाळकर यांनी येऊन २७ वी नेटिव इन्फंट्री थोडीफार फोडली होती. त्यांना मदत करावयास राजेसाहेबांचे विश्वासू दौलतराव मोहिते आणि हंबीरराव मोहिते हे २७ व्या फलटणीतील काही अधिकाऱ्यांच्या गांठी घेऊन काही गडबड चालवून बसले होते. आण्णा फडणीस या खाजगी कारभाऱ्याचे सातारच्या राजांच्या मुनिमाशी संबंध असल्यामुळे त्यानेहि कोल्हापुरची सत्ताविसावी नेटिव पलटण हाताळून ठेवली होती. १८४४-४५ पासून इंग्रजाविरुद्ध उठाव करण्यास सरावलेल्या रामसिंगाने आपल्या बापासह गडकरी मंडळीस उत्तेजन दिले. या रामसिंगाचा सातारच्या सीताराम रंगो-बापू गुप्ते याशी पत्रव्यवहारहि होता. अशा सर्व सज्जतेच्या भरवशावर ता. ३१ जुलई १८५७ रोजी २७ व्या बॉम्बे नेटिव इन्फंट्रीच्या दोनशे माणसांनी कोल्हापुरात बंड उभारले.

खजिन्याची लूट

त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांच्या राहत्या-राबत्यावरच प्रथम हल्ला चढविला.

लिहिता वाचता येणारांना वरच्याजागा मिळाल्या पाहिजेत आणि रामजी शिरसाट याला हवालदाराच्या खालच्या जागेवर घातल्या कारणाने न्याय-मंदिराकडून चौकशी व्हावयास हवी, असा मागणीचा लकडा त्यांनी लावला होता. हल्ला होताच, त्यांचा कॅप्टन कर्नल पॉवेल आणि दुसरेहि काही अधिकारी यांनी रेसिडेन्सीकडे सुरक्षिततेसाडी पळ काढला ! तथापि तीन सैनिकी अधि-काऱ्यांना रेसिडेन्सी गाठता आली नाही, त्यांनी सोलंकूर या खेड्यात तोंड लपविले. पण तेथील पाटील व कुलकर्णी बंडखोरांनाच मिळाले मग उठाव वाल्यांनी कँपमधील खजिन्याची लूट केली—आणि त्या सैनिकी तीन अधिकाऱ्यांस सोलंकूर गावातच वनवाशासारखे हाल हाल करून मारले. त्यानंतर उठाववाले बळकट तट असलेल्या पागेत घुसले. त्यांच्या पाठीमागे लेफ्टनंट केर धावत आला. त्याच्याशी तटाचा आश्रय घेऊन उठाववाल्यांनी सामना दिला. ता. ३ ऑगस्ट १८५७ रोजी उठाववाले टेकीला आले तरी शरण गेले नाहीत. मग फंद फितुरीची मात्रा इंग्रजांनी उगाळली. तटातील गुप्त दरवाजाचा माग त्या फितुरीमुळे त्यांना लागला. त्या गुप्त दरवाजाने इंग्रजांनी प्रवेश मिळविताच सामना हातघाईवर आला. तरीहि शरणाई देण्यापेक्षा उठाववाल्यांनी मरण-घाई स्वीकारली.

हे प्रकरण एवढ्यावरच थांबणारे नाही, हे कोल्हापूरच्या महाराजांनी ओळखले होते, कोल्हापूरचे लोकांचा बंगाली सैन्याशी पत्रव्यवहार चालू होता. तेव्हा ता. १५ ऑगस्ट १८५७ रोजी कोल्हापूर महाराजांनी पोलिटिकल सुपरिंटेन्डेंटाची गांठ घेतली आणि इंग्रजी पायदळावर पुढे मागे हल्ला होणार असल्याची भीति बोलून दाखविली (विनायक कोंडदेव ओकांच्या 'शिपायांचे बंड'). ता. १० ऑगस्ट १८५७ चा ज्ञानप्रकश तर महाराजांच्या त्या भीतीवर लख्खच प्रकाश पाडतो. कारण शुक्रवार ता. ४ ऑगस्ट १८५७ रोजी रात्रौ ९ चे सुमारास २७ व्या नेटिव फलटणीचे आवारात पुरभय्ये व मुसलमान अशी शंभर एक मंडळी नवखी आढळली. त्यांनी प्रथम भटारखान्यात पाय ठेवला पण तेथे कोणीच युरोपियन अधिकारी नव्हता. पोलिटिकल सुपरिंटेन्डेंटला हे कळताच कर्नल महानसाहेब यांचेकडून कोल्हापूर—पायदळ, दक्षिण-मराठा-रेग्युलर-घोडदळ आणि रिसाल्यातील रेड-शर्टस् यांच्या मधील निवडक मंडळी उठाववाल्यांवर घालण्यात आली. तोपर्यंत उठाववाल्यांनी कँपमधील काही दुकाने लुटली होती, कोल्हापूर शहरात प्रवेश मिळवला होता आणि आदितवार व मंगळवार या वेसांचा कबजा केला होता. त्या दोन्ही वेसा मात्र त्यांना फोडता आल्या नव्हत्या. त्यामुळे शुक्रवारी रात्रीच ४०।५० माणसांना अटक झाली होती. शनिवारी सकाळी तर कर्नल मॅन्, कॅप्टन स्नेटर, डॉक्टर ब्रेटन यांनी आपल्याबरोबर कोल्हापूर पायदळाची एक तुकडी घेऊन मंगळवार

वेशीत प्रवेश केला. तेथे त्यांची व उठाववाल्यांची झडलीच. कोल्हापूर-पायदळाला रेटत रेटत उठाववाल्यांनी पन्हाळ्याच्या पागेत रेटले. तेथे उठाववाले सुरक्षितच होते. बोळ अरुंद होता. आणि उठाववाल्यावर हल्ला करणे पायदळ तुकडीला शक्य नव्हते. ५०–६० उठाववाल्यांना गिरफदार करण्यासाठी पायदळाच्या तुकडीला जीव धोक्यात घालवयास सांगणे कर्नलसाहेबांनाही बरे वाटले नाही. म्हणून ते मग बावड्यास गेले. तथापि उठाववाल्यांनी दुकानदारांना त्रास देऊ नये असा बंदोबस्त करून गेले. उठाववालेहि मग कागल मार्गे बेळगावकडे रवाना झाले.

आणि तरीहि या ना त्या प्रकाराने इंग्रजांच्या-विरुद्ध कारवाया चालूच होत्या. तेव्हा ऑगस्टच्या शेवटी शेवटी कर्नल जेकब भरपूर सैन्यबळ घेऊन कोल्हापुरास आला, आणि त्याने जो जो म्हणून संशयी वाटला, त्याची त्याची शस्त्रे काढून घेतली, हिसकावून घेतली. उठाववाल्यांना तर त्याने लष्करी कोर्टापुढेच खेचले व गोळ्या घालून यमसदनाला पाठविले. ही क्रिया चालू असता गोळी घालण्यासाठी एका जखमी माणसाला आणण्याची पाळी आली. दुसऱ्या लोकांच्या खांद्यावरून ज्यावेळी त्याला वाहून नेऊ लागले, त्यावेळी त्याने त्यांना तिरस्काराने बाजूला सारले आणि आपल्या जखमांचे सर्व दुखणे बाजूला ठेवून स्वारी आपल्या पायांनी मरण-मोक्यावर जाऊ लागली. जवळच असलेल्या जेकबचे अंतःकरण त्यामुळे हलले, तो म्हणाला–" भल्या गृहस्था, तू केवढा शूर आहेस ! तुझ्या दुर्दैवाची मला कीव येते ! पण ते तुझ्या राजद्रोहाचे फळ आहे. जिवावर उदार होऊन तू भलत्या महत्त्वाकांक्षेच्या नादाला लागलास. त्या कामी तुला कोणीतरी भर दिली असली पाहिजे. जर तू सत्य सांगशील, तर तुला क्षमा होईल, असे मी पाहीन." या पांडित्याला तो शूर शिपाई नुसताच हसला. तो एवढेच उत्तरला की " साहेब जेकाब मी केले आहे, ते मी माझी जबाबदारी पूर्णपणे ओळखून केले आहे " उत्तराबरोबर अर्थातच त्याला गोळी बसली.

कोल्हापूरचा कबजा

इंग्रजांच्या विरुद्ध उठावात सामील झालेला एक सैनिकच अशा पिळाचा होता, असे नव्हे, तर मेजर ग्रॅहॅमने आपल्या १८५८ च्या रिपोर्टात म्हटल्या प्रमाणे कोल्हापूरची सर्व जनताच राष्ट्रीय भावनेने उद्दीपित झाली होती. इंग्रजांनी वाटेल तेवढा पैसा देऊ केला तरी परदेशात लढाईला जावयास लोक तयार नव्हतेच; पण परकीय सत्तेखालीहि लोक रहावयास तयार नव्हते. तेव्हा आपले ईप्सित साध्य होणार अशा आत्मविश्वासाने कोल्हापूर महाराजांचा भाऊ चिमासाहेब याने सप्टेंबर १८५७ पासून आपले नांव उठावाशी जोडले जाण्यात काही वावगे होते आहे, असे मानले नाही. इंग्रजांनी किल्लेकोट

निकामी केले, त्यामुळे गडकरी रिकामे झाले. कोल्हापूरच्या आवती भोवतीच्या खेड्यातून हळूहळू उठाव होऊ लागले आणि त्या सर्व मंडळींची एकजूट होऊन ता. ५ डिसेंबर १८५७ रोजी उठाववाल्यांनी कोल्हापूर शहरातच प्रवेश केला. फिरंगोजी शिंदा या गडकऱ्याने रात्री कोल्हापूरचे तटावरून उडी मारून प्रवेश केला. त्याला एका संत्र्याने मारले. त्यांना २७ व्या नेटिव फलटणीचे लोक मिळाले. त्यांनी बाजार लुटला, हाती आला तेवढा दारूगोळा लांबविला आणि पन्नास हजारांचा खजिना घेऊन गेले. २७ व्या नेटिव फलटणीला फितूर करण्याच्या आरोपावरून ता. १० ऑक्टोबर रोजी तीन माणसांना टांगून मारल्याचा दाखला ज्ञानोदयाच्या तारीख १ नोव्हेंबर १८५७ चे अंकात मिळत असतांना दीडच महिन्यात वरील घटना घडली हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. कर्नल जेकब त्यांना तोंड द्यावयास खडाच होता. त्याला झुकांडी देऊन उठाववाल्यांनी सावंतवाडीकडील जंगलाचा आश्रय केला. फिरून ता. ६ डिसेंबर १८५७ चे सकाळी पांच वाजता उठाववाल्यांनी कोल्हापुरात प्रवेश केला व सर्व वेशी बंद करून घेतल्या. सकाळी ७ वाजता कर्नल जेकबने सोमवार वेस फोडली आणि संध्याकाळपर्यंत त्याने सगळ्या शहराचा कबजा घेतला. त्या एका दिवसात ८ उठाववाले मारले गेले व ५० गिरफदार झाले. त्यांपैकी छत्तीस जणांची ताबडतोब चौकशी करण्यात आली व राजवाड्या-समोरच त्यांना ताबडतोब फाशी देणेत आले. त्याच वेळी दोन सरदारानांहि गोळ्या घालण्यात आल्या. हे दोन सरदार म्हणजे दिनकरराव गायकवाड आणि रावजी वाकनीस होत. त्यांच्या मिळकतीही जप्त करण्यात आल्या. या संबंधात ता. १ जानेवारी १८५८ च्या ज्ञानोदयातील वर्णन व मेजर ग्रॅहॅम याचा रिपोर्ट अभ्यासण्यासारखा आहे.

तेवढ्या एकाच दिवसाने जेकबच्या मागचा उद्योग संपला नाही. ता. १४ डिसेंबर १८५७ रोजी कर्नल जेकबने कोल्हापूरची शनिवार वेस फोडून शहरात प्रवेश मिळविला. उठाववाल्यांनी मामलेदार कचेरीतील आणि कोतवाल चावडीतील सगळे कैदी मोकळे केले असल्याचे त्यास आढळून आले. त्यांनी उठाववाल्यांनी राजवाड्यालाही वेढा घातल्याचे त्यास आढळले. पण रात्रौ बारा वाजता जेकबने सर्व बंड आटोक्यात आणले. उठाववाल्यांनी कोल्हापूरच्या बुवासाहेब महाराजावरहि हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता पण तो फसला. कारण तो ‘ चांगलाच वागला ’ असे जेकबचे मत आहे. कोतवाल चावडीतून कैदी सोडताना दाजी देसाईला चांगलाच चोप मिळाल्याचे आढळले. जेकबने त्या दोन सज्जनांच्या मदतीने पुष्कळसे उठाववाले पकडले आणि त्यातील मुख्य मुख्य पुढाऱ्यांना फाशी देऊन बाकीच्यास लहान मोठ्या शिक्षा ठोठावल्या. मेजर ग्रॅहॅम याने आपल्या १८५७ च्या रिपोर्टीत म्हटल्या-

प्रमाणे वरील तऱ्हेने कोल्हापूर येथील १८५७ चा उठाव पांच महिने गाजला. तथापि मार्च १८५८ पर्यंत त्याच्या ताटकळचा लोक देतच होते.

चिमासाहेबांचा मृत्यु

कोल्हापूरचे महाराजांचे धाकटे बंधू चिमासाहेब ऊर्फ शंभूराजे हेच या कोल्हापूरच्या बंडाचे पहिल्यापासून प्रमुख पुढारी होते. नानासाहेब पेशवे आदिकरून उत्तरेकडील उठाववाल्यांशी आणि रंगोबापूजी सारख्या दक्षिणेतील उठाववाल्यांशी त्यांचे संगनमत असून दक्षिणेतील महाराष्ट्र व कर्नाटक कोकण भागात प्रेरकशक्ति होऊन उठाववाल्यांना त्यांनी हरतऱ्हेने मदत केली. ता. ५ व ६ डिसेंबर तारखांना कोल्हापुरास घडलेले प्रकार चिमासाहेबाशिवाय घडलेच नाहीत, याबद्दल इंग्रजांनी आपल्या मनाशी खात्री बाळगली होती, कारण पांच डिसेंबरला ज्यावेळी कॅप्टन स्नेटर मोठ्या शिताफीने राजवाड्यात घुसला होता आणि त्याने राजवाड्याचा मधला चौक ताब्यात घेतला होता, त्यावेळी तेथे एक छोटी बंदुक पडली होती आणि तिच्या शेजारीच एक मृत देह पडला होता. भोवताली पुष्कळ लोक उभे, बसलेले होते अगर खिडक्याखिडक्यातून ते दृश्य पहात होते. पण त्या सर्वांना सशस्त्र सैनिकांचे संरक्षण होते. इंग्रजांची कड घेणाराची काय अवस्था होते, हे दृश्य दाखविण्याची ती करामत चिमासाहेबाशिवाय कोणाचीहि नाही, अशी खूणगांठ इंग्रजाने पक्की बांधली होती. तेव्हा मार्च १८५८ मध्ये कोल्हापूरच्या उठावाचा पुरेपूर बीमोड केल्यावर चिमासाहेबांना बुवासाहेबाने इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्याला कराची येथे देशोधडीस लावून देण्यात आले, हे इंग्रजांच्या दृष्टीने सरळच होते. चिमासाहेबांनी इंग्रजांच्या कैदेतच १८६९ साली कराचीस देह ठेवला !!! तेथे त्यांची छत्री आहे.

कोल्हापूरच्या उठावात एकंदर त्रेपन्न उठाववाल्यांना फाशी जावे लागले. त्याशिवाय चिमासाहेबांच्या सहाय्यकांस शिक्षा झाल्या त्या निराळ्याच ! चिमासाहेबांचा दिवाण यशवंत अण्णाजी फडणीस याला जन्मठेपेची शिक्षा देऊन ठाण्याच्या तुरुंगात ठेवले आणि चिमासाहेबांचा कट त्याने फोडावा म्हणून छळ करावयाची बाकी ठेवली नाही. पण, काही झाले तरी निष्ठावंत दिवाणाने काडीचीहि दाद दिली नाही. कोल्हापूर गॅझीटीअर आणि मोडकक्रत कोल्हापूरचा इतिहास याबाबत उद्बोधक आहेत. बाळासाहेब नाईक निंबाळकर यांना ग्वॉलेरहून ३० ऑगस्ट १८५७ रोजी व ज्योतिराव घाटग्यांना २९ सप्टेंबर १८५७ रोजी पुण्यास पकडून कोल्हापूरास पाठविले होते. त्यांच्यावरहि काही मात्रा चालली नाही. तेव्हा त्यांना आणि सातारकरांपैकी अण्णा फडणीस यांना जन्मठेपेच्या शिक्षा सुनावण्यात आल्या.

५ ; हरि ठेवील तैसे रहावे !

१८५७ चा उठाव हा असंतोषातून उद्‌भवला होता; पण असंघटित मनुष्यबळाने संघटित शक्तीशी विरोध करताना आणि ताज्या दमाच्या पल्लेदार शस्त्रांना तोंड देताना, भारतवासियांना निभले नाही आणि तरीहि 'ध्येयं वा साधयेत्, देहं वा पातयेत्"। यांपैकी काहीच न साधलेले व्रती पुन्हा घरी गेले नाहीत की संसारात पडले नाहीत. ओळख पटली तर कित्येकास तोफेच्या तोंडी जावे लागले असते, हे खरे; पण ही मंडळी काही मृत्यूला भिणारी नव्हती. म्हणून त्यांच्या मनाने असे घेतले की आपल्या उठावाला असावे तसे परमेश्वराचे अधिष्ठान नसल्यामुळेच आपणांवर नामुष्कीचा प्रसंग आला. त्यामुळे ते सर्व संन्यासी, बैरागी किंवा फकीर झाले.

प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करून काशीस नेत असताना त्यांचा सेनापती व जवळचा आप्त बळवंतराव राजाज्ञे याची बायको खानदेशाच्या रानात सांगवीजवळ अत्यंत अडचणीत १२ जानेवारी १८४० रोजी प्रसूत झाली. इच्या मुलाचे नांव त्र्यंबकजी ठेवण्यात आले. तरी जंगलीमहाराज म्हणूनच तो संबोधला गेला. प्रतापसिंहांनी त्यास ता. २५ जानेवारी १८४७ रोजी दत्तक घेऊन त्याचे नांव शाहू असे ठेविले. त्याचे जनक वडील त्याचे जन्मानंतर दोनच महिन्यानी माहूर जवळ वारले. १८५७ च्या स्वातंत्र्यसंगरात रंगो बापूजी या स्वामीनिष्ठाने आपली आहुती देण्याचे ठरवून सातारच्या गादीवर सदर शाहूस बसवावयचा घाट घातला. १८५४ साली काशीहून प्रतापसिंहाचे राजकुटुंब साताऱ्यास परत आल्यापासून आपला चुलत भाऊ व्यंकोजी याजबरोबर शाहूही एकाच वाड्यात रहात असे. त्या कारणाने १८५७ मध्ये आपल्या वडील दत्तक आईचे म्हणजे श्री. अंबिकाराजे यांचे संमतीने शाहूने ऊर्फ 'काशीराजाने' व व्यंकोजीने रंगो बापूजीचे मदतनीस म्हणून खटपट करण्यात कमी केले नाही. अर्थात सातारचे सर्व राजकुटुंब मुंबई जवळच्या खाटीक–बेटावर प्रथम स्थानबद्ध करण्यात आले, व १८५८ च्या मार्चमध्ये शाहूस कराचीस हलविण्यात आले. तेथून शाहूला १८८५ च्या जुलई महिन्यात सोडण्यात आले. शाहू थेट पुण्यास आला व भवानी पेठ घर नं. ५४३ मध्ये राहू लागला. देवेंद्रनाथ टागोरांचे "श्रीब्राह्मधर्म" या पुस्तकाचे ओवीबद्ध रूपांतर या राजपुत्राने केले असून, शाहूपेक्षा शहाजी हे आपल्याला आवडणारे नांवच या पुस्तकावर त्याने घातले आहे. 'ब्राह्मस्मृती' या नांवाचे त्याचे

दुसरेहि पुस्तक आहे. कराचीस असतानाच या राजपुत्राने 'ब्रह्मोसमाजाची' दीक्षा घेतली असावी. १८९२ च्या तारीख १ जूनला सदर राजपुत्र इहलोक सोडून गेला. त्याची छत्री पुण्याच्या भवानी पेठेत आहे. याला होळकर दरबारातून अठ्ठावीस हजारांची नेमणूक होती.

ज्ञानोदय (नगर) च्या ता. मे १८४९ च्या अंकात म्हटल्याप्रमाणे त्यावेळेसच म्हणजे प्रत्यक्ष बंडाचा उठाव होण्यापूर्वी आठ वर्षे आणि सातारची गादी इंग्रजांनी खलास केली, त्यासुमारास "इंग्रजांची जिरवायला कोणीतरी अवतार घ्यावा अशी पुष्कळ माणसांची इच्छा आहे. पण असले दैववादाचे नमुने आता दिवसेदिवस कमी होत जातील. इंग्रज आज हिंदुस्थानातील लोकांना शिक्षण देत आहेत, पण हे शिक्षित लोक इंग्रजांशी इमानेइतबारे वागतील असा नियम नाही ! हे शिक्षित लोकच प्रामुख्याने इंग्रजाविरुद्ध जातील, असाच दाट संभव आहे. या भूमीच्या मूळ सुकन्यांचे व सुपुत्रांचे कल्याण इंग्रजी राज्यकर्त्यांचे डोळ्यासमोर मुळीच नाही. त्यामुळे ते लोक जसजसे शहाणे होत जातील, तसतसे आपले हक्क इंग्रजांपासून हिरावून घेतील आणि त्यांना जर का विरोध झाला तर ते इंग्रजांना या (हिंदुस्थान) देशातून चालते व्हा असे स्पष्ट सांगतील." तसे सांगण्याचा प्रारंभ म्हणूनच १८५७–५८ चा उठाव झाला आणि फसला. तो फसावयास बेभान झालेल्या इंग्रज सरकारनी निःशस्त्रीकरणाचा जो बूट काढला, त्यामुळे खालचा समाज जेवढा चिडला, तेवढा वरचा समाज चिडला चरफडला नाही. याबाबत ता. १५ जुलई १९५८ चा ज्ञानोदय म्हणतो की, "मुंबई इलाख्यात लोकांच्या हातातील शस्त्रास्त्रे आता काढून घेण्यात येत असून घिसाड्याकडून त्या शस्त्रांचा चक्काचूर करण्यात येत आहे." इंग्रजांच्या डोक्यात प्रजेच्या निःशस्त्रीकरणाची कल्पना १८५७ च्या जून, जुलई पासूनच घोळत असावी. आस्ते कदम त्यांनी ती कशी अमलात आणली ? लार्ड रॉबर्टने लिहिलेले "हिंदुस्थानातील एकेचाळीस वर्षे" हे पुस्तक याबाबत वाचनीय आहे. बंड फसले आणि इंग्रजी राज्य अधिक उठावाने हिंदुस्थानच्या डोक्यावर बसले. तरी पारतंत्र्याचा वीट हा वारसा बंडवाल्यांनी 'पुढीलांकरिता' येवढ्या प्रमाणात ठेवला की, मराठ्यांना लष्करी दृष्ट्या खच्ची केले तरी पील कमिटीच्या रिपोर्टात म्हटल्याप्रमाणे हिंदी व त्यातल्या त्यात बंडवाल्यांच्या धर्तीवर स्वातंत्र्याचे साधतील तसे प्रयत्न करीत राहण्याचे व्रत पुढील पन्नास वर्षे अनेक देशभक्तांनी ालविले. तशा युद्ध प्रयत्नांचा उपयोग नाही, असे कालौघाचा चिकित्सापूर्वक .वचार करून ज्यांचे मत झाले होते, त्यांनीहि आपली साधने व भाषा बदलली असली तरी ब्रिटिशराजवटीबद्दलचा असंतोष आणि स्वाभिमानजागृती यांचा वारसा अखंडपणे चालविण्यात भूषणच मानले. बंडवाल्यांच्या वारस

देशभक्तांना आपला सारा उठाव अर्थातच नव्या जमान्यात करावा लागला. कारण बंडाचा एक तात्कालिक परिणाम असा झाला होता की, ईस्ट इंडिया कंपनीला कारभार करता येत नाही, असे इंग्लंडचे लोकमत प्रक्षुब्ध झाले होते. म्हणून इंग्लंडच्या राज्यसंस्थेनेच हिंदुस्थानचा राज्य कारभार हाती घेतला होता.

प्रतापसिंहांना पोर्तुगीजांच्या सहाय्याने बंड करीत असल्याच्या आरोपावरून १८३९ मध्ये पदच्युत केल्यानंतर त्यांचे धाकटे बंधु छत्रपती शहाजी हे गादीवर ठेवण्यात आले होते. पण ते १८४८ साली वारले आणि त्यांना औरस संतती नसल्यामुळे त्यांनी विधिपूर्वक दत्तक घेतलेला रेसिडेंटने मान्यता दिलेला मुलगा व्यंकोजी हाच शाहाजीच्या गादीचा वारस होता. पण रेसिडेंट आणि जनता यांचे हे मत गव्हर्नर जनरल डलहौसी यास पटले नाही. (लीवॉर्नरकृत डलहौसीचे चरित्र भाग २ पृ. २५ पहा) २५ सप्टेंबर १८१९ च्या तहातील "वारिस" हा शब्द फक्त औरस संततीलाच लागू करावयाचा अशी त्याला ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरनी अनुमती देताच सातारचे राज्य खालसा झाले होते!!! राज्याला मुकण्याचा अशुभसा प्रसंग सातारचे दत्तक छत्रपती व्यंकोजी यांचेवर आल्यावर रंगो बापूजींच्या प्रयत्नाव्यतिरिक्त स्वराज्य संपादनाचा प्रयत्न साताऱ्याचे राजघराण्याकडूनच काय, पण त्यांच्या साताऱ्यातहि फारसा झालेला दिसत नाही! खुद्द छत्रपती घराण्याने तर "सुसरबाई तुझी पाठ मऊ" म्हणूनच नेकीने दिवस काढण्याचे ठरविलेले दिसते. राज्याला मुकलेल्या शहाजी राजांच्या पत्नी सगुणाबाई ऊर्फ आईसाहेब महाराज यांना दरमहा पांच हजार रुपयांच्या नेमणुकीवरच दिवस कंठावे लागले! आयाळ व नख्या काढलेल्या सिंहाप्रमाणे बंडानंतर जे जिते जागते बंडखोर दक्षिणेत विखुरले, त्यांपैकी कित्येक जोगी बैराग्याच्या वेशाने "बहुत देरतक" हिंडत असल्याच्या आणि त्यातील काहीनी वाई नी वाळवे तालुक्यात व शिराळे पेट्यात काही काळ तळ दिल्याच्या कर्णकथा क्वचित प्रचलित आहेत. पण सातारा जिल्ह्यात एखादा खरा खोटा नानासाहेब पेशवा पकडलाहि गेला नाही की त्याचा एकादा साथ्या म्हणून कोणा गोसाव्यावर आळ आला नाही.

असो. अशा रीतीते दिवस जात असता १८६४ साली व्यंकोजी महाराज नगर येथे मरण पावले आणि १८६५ च्या मे महिन्यात शेडगांव (नगर) च्या एका मुलाला आईसाहेबांनी दत्तक घेतले, ·या द्वितीय दत्तकाचे नांव आबासाहेब महाराज होय. संस्कृत व इंग्रजीचे जरूरीपुरते ज्ञान, घोडा फेकणे, निशाण मारणे, भाला बोथाटी चालविणे, कुस्ती करणे त्यांना असे अवगत होते की, महाराष्ट्र राज्याचे संस्थापक थोरले आबासाहेब महाराजा-

सारखा पराक्रम, काल अनुकूल असता तर, याही आबासाहेबांच्या हस्ते झाला असता, असे म्हणतात.

ता. १९ जून १८६९ रोजी आबासाहेबांना पुत्ररत्न झाले. तेव्हा राजवाड्यात मोठा उत्सव झाला खरा; पण त्याच्यावर सत्ताहीनतेची विषण्ण छाया होतीच. १८५८ सालीच आईसाहेब महाराजांनी दिवाणी व फौजदारी दप्तरे बंद केली होती; त्याच सालच्या ४ डिसेंबर रोजी सेनापतीचे वाड्यातील मामलेदार कचेरी खेरीज करून सर्व वाडा रा. बळवंतराव पटवर्धनांनी ३०१० रुपयास खरेदी केला होता व राज्याचा विस्तार तर केव्हाच "लिंबात" येऊन बसला होता. छत्रपतींच्या या विपन्नावस्थेची परिसीमा शनिवार ता. २१ मार्च १८७४ रोजी झाली. त्या दिवशी रंगमहालच्या इमारतीस आग लागून अधिकाऱ्यांच्या हयगयीमुळे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले! याचा जणो आघात आगोदरच आजारी असलेल्या आईसाहेबांना बसला आणि मंगळवार २४ मार्च १८७४ रोजी त्यांचा कैलासवास झाला!!

आईसाहेबांचा कैलासवास झाल्यावर चार महिन्याच्या आतच सातारकरांच्या सात इमारतीवर इंग्रजांचा पोलिस पहारा बसला. राजेपणाचे एकही द्योतक छत्रपतींच्या घरण्यात नांदू द्यावयाचे नाही, असा जणू मनसुबा झाल्याचा संशय जनतेस आल्यामुळेच ता. ७ सप्टेंबर रोजी तात्यासाहेब दिवाणांच्या वाड्यात "सातारच्या राजघराण्यावरील प्रसंगाबद्दल" विचार करण्याकरिता जनतेची सभा झाली, तिला पंत प्रतिनिधी व चाफळकरस्वामी हजर होते. पण अशा सभांचा अगर खुद्द छत्रपतीनी केलेल्या अर्जांचा विचार नकार घंटेनेच झाला! सदर संबंधात ता. १८ सप्टेंबर १८७४ चा 'शूभसूचक' म्हणतो, "चौदा लक्षांचे राज्य तोंडात टाकून दरमहा पांच हजार रुपयेप्रमाणे सालाचे साठ हजार रुपयांची नेमणूक आबासाहेब महाराजास देण्यास सुद्धा दुःख वाटते, तेव्हा अशा दयाळू सरकारचे गोऱ्या न्यायाचे कृत्य कोण नापसंत करील! शिवाय वाडे हिसकावून घेऊन मराठ्यांचे नांव समूळ बुडवण्यासाठी इच्छा आहेच!" सातारच्या राजांचे अपील गोविंद विनायक खांबेटे व विश्वनाथ नारायण मंडलीक या वकील द्वयाने चालविले. तथापि सत्तेपुढे शहाणपणाचा तसाच जळफळाटाचा तरी कसा उपयोग होणार? म्हणून आबासाहेबांना मासिक अडीच हजारांची नेमणूक स्वीकारून रहावे लागले आणि ११ डिसेंबरच्या शुभसूचकने उद्गार काढले की "ताटाबरोबर काठही गेला!"

तथापि दैवाचे समाधान एवढ्यानेच कोठे होते! १८७५ च्या एप्रिल २३ तारखेस धन्नीच्या बागेतील बंगल्यास आग लागून त्याची राख झाली, तर मे १८७६ अखेर छत्रपतीना "नवा राजवाडा" ब्रिटिश सरकारच्या डि. जज्ज कोर्ट व फ. स. जज्ज कोर्ट यांच्याकरिता खाली करून द्यावा लागला.

दैवाच्या अशा कराल करण्या पाहिल्या, सांगितल्या, तरी एक गोष्ट बिनचुक लक्षात ठेवली पाहिजे की, जनतेतील छत्रपतीबद्दलचा आदरभाव मात्र कमी झाला नाही. उदाहरणेच द्यावयाची तर शिंदे, होळकरांनी छत्रपतींच्या घराण्यावरील सुखदु:खांच्या प्रसंगी सक्रिय सहानुभूति प्रगट केली आहे, इतकेच नव्हे तर शांत व उदार स्वभावाचे आबासाहेब महाराज ८ एप्रिल १९०४ रोजी वयाच्या ५४ व्या वर्षी वारले तेव्हा त्यांच्या अंत्यदर्शनास पुण्यापासून लोक लोटले होते. फार काय शाहू महाराजांचे दत्तविधान ता. २८ मे १९२५ रोजी झाले त्यावेळी चाफळकर बापूसाहेब स्वामी, मुद्गल भटांचे वंशज सरदार पंडितराव, औंधकर बाळासाहेब पंतप्रतिनिधी प्रभृतींनी आपआपली पदप्राप्त कर्तव्ये पूर्वीच्या ऐतिहासिक इतमामाला शोभेल अशा कर्तव्य निष्ठेने पार पाडली, कोल्हापूरच्या छत्रपतींच्या प्रतिनिधींनी आपुलकीने आहेर केले आणि जनतेने तर आनंदाश्रूंचा अभिषेक केला. छत्रपतींचे घराणे आणि जनता यांच्या आपुलकीच्या आविष्करणाचे अगदी अलीकडचे उदाहरण म्हणून नमूद करता येईल की सातारा जिल्ह्याच्या मर्दुमकीच्या सामन्यांचा बक्षिस समारंभ ता. १३ जानेवारी १९२८ रोजी शुक्रवारी बालराजे शाहू यांच्या हस्ते व अध्यक्षतेखाली व्हावा म्हणून जनतेने हार्दिक विनंती करताच बालराजांनी ती स्वीकारली आणि त्यावेळी छोटेच पण हृदयस्पर्शी भाषण करून व सामना मंडळास ५० रुपयांची देणगी देऊन लोकसंग्राहक छत्रपतींच्या घराण्याचे आपण भूषण होऊ असा जनतेच्या मनात विश्वास उत्पन्न केला. १९३८ साली सातारा येथे अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद भरली असता तीमधील आंतर् विभागीय सामन्यांचे उद्घाटन छत्रपति शाहू महाराजांचे हस्ते झाले. हिटलरी होरपळीच्या काळात (१९३९–१९४६) सैन्य भरती करता छत्रपतींनी खटपट केल्यामुळे प्रथम दर्जाचे सरदारापैकी त्यांना "राजे" हा किताब मिळाला होता. त्यांना हेळवाककडे शिकारीस गेले असता २० मार्च १९५० रोजी अपघाती मृत्यू आला तेव्हा सातारा जिल्हा सहाजिकच हळहळला. त्यांच्या पत्नी श्रीमंत सुमित्रादेवी राणीसाहेब महिलांच्या हरएक प्रगतीपर चळवळीस हातभार लावीत आल्या आहेत. आणि त्यांचे पुत्र प्रतापसिंह महाराज आता 'गृहस्थ' झाले असून आपल्या भारतीय जवानांनी काश्मीरमध्ये गाजविलेल्या पराक्रमाचे अभिनंदन सप्टेंबर १९६५ मध्ये करून घराण्याची परंपरा चालवीत आहेत. संस्थानांचे विलिनीकरण (१९४८) मध्ये झाले आणि कूळ कायदा होऊन सरंजामदाऱ्या गेल्या तरी छत्रपती घराण्याकडे "लिंब" या गावाचे इनाम चालवून लोकशाही राज्य सरकारने छत्रपति घराण्याचा मान राखला आहे.

६ : जुन्यातून नव्याकडे

छत्रपतींच्या घराण्याबद्दल जनतेला प्रेम वाटते, याचे कारण महाराष्ट्राचे संस्थापक शिवाजीमहाज यांनी " धर्मासाठी आम्ही घेतली फकिरी " म्हणून जो बाणा धरला तोच पुण्यश्लोक बाणा, जरी प्रतापसिंह महाराजांना राज्य गमवावे लागले तरी, छत्रपति घराण्यात कायम आहे. या बाण्यामुळेच छत्रपतींचा उत्सव महाराष्ट्रीय अंतःकरणातून होत असतो. " इंग्रज नव्हेत, कारण इंग्रज हे पुराणवस्तुसंशोधक व संरक्षक आहेत; पण दुसरे कोणी चोर हिंदुस्थानात आले तर कदाचित रायगडावरील दगडांच्या छातीचे तुझे सिंहासन सुरुंग लावून ते फोडतील; तेव्हा अढळ असे सिंहासन मी तुला देते, आणि ते म्हणजे महाराष्ट्राच्या हृदयाचे सिंहासन होय, असे देवी भवानी शिवाजीराजांना म्हणाली. " काळकर्ते परांजप्यांचे १९२४ साली सातारा येथील ग. व्या. शाळेत गणपत्युत्सवात व्याख्यान झाल्यावर संदेशकार कोल्हटकरांनी जे वरील उद्गार काढले ते छत्रपतींच्या बाण्याने महाराष्ट्रीय अंतःकरणात उत्पन्न केलेल्या कृतज्ञतेचे बोल आहेत, हे कोण नाकबूल करील ? या कृतज्ञतेच्या जाणीवेतूनच लोकमान्य टिळकांनी शिवाजीमहाराजांचा उत्सव सालोसाल करण्यास शिकविले, आणि सातारा जिल्ह्यात तो उत्सव प्रेमाने साजरा होतो. इतकेच नव्हे, तर इतिहाससंशोधकांच्या धुमश्चक्रीमुळे त्रिशत सांवत्सरिक शिवजन्मोत्सव १९२७ व १९३० अशा दोन साली आले असता दोनही वेळा सातारा जिल्ह्याने तो उत्सव सारख्याच जिव्हाळ्याने साजरा केला. १९३० साली सदर उत्सव आणि महात्माजींनी स्वातंत्र्य मार्गावरील कायदेभंगाची जी मोहिम सुरू केली ती एका सुमारासच झाल्याकारणाने महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणेच शिवाजी महाराजांचे नांव घेऊनच सातारा जिल्ह्यातील लोकांनी सदर चळवळीत भाग घेतला. अशा तऱ्हेची उत्कट भक्ति असल्या कारणाने छत्रपतींची निंदा साताऱ्यात सहन झाली नाही तर नवल कसले? १९२७ साली ' पेशवा ' या हसन निजामीच्या दिल्ली येथील पत्रात आणि आणि १९३५ साली कानडी इतिहासाच्या पुस्तकात (१९२९ पासून) शिवाजी महाराजाबद्दल निर्गल प्रलाप येताच त्यांचा तीव्रतम निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्सव सालोसाल जिल्ह्यात होतोच पण ना. यशवंतराव चव्हाणांनी पं. नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावर छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा नोव्हेंबर १९५७ ला बसवला

व नामदार बाळासाहेब देसाईंनी शिवनेरीवर बालशिवाजीचा पुतळा पूज्य जिजामातांच्या सह संस्थापित केला.

काळ पालटला तशी परिस्थिती, लोकांच्या आकांक्षा, अपेक्षा व मार्ग पालटले, हे खरे. पण राज्याचे स्वरूप कोणतेही असले तरी महाराष्ट्राला आनंद-वनभुवन करून सोडणाऱ्या छत्रपतींच्या राज्यासारखेच ते राज्य "देवाचे आणि धर्माचे" असले म्हणजे झाले, हा कटाक्षच छत्रपतींच्या प्रेमाची संतत धार राखण्यात आहे. ब्रिटिश रियासतीच्या आरंभी नवे राज्य म्हणजे "ईश्वरी प्रसाद" असे बहुजन समाजाला आणि अधिकारलोलुप पांढरपेशा वर्गाला वाटले ही गोष्ट काही खोटी नाही. इंग्रजी विद्या, इंग्रजी सुधारणा यांची धुंदी अशी तीव्र होती की गेलेल्या स्वराज्यापेक्षा आलेले परराज्य हेच खरे "छत्रपतींचे रामराज्य" असे लोकांना वाटे. "राजा कालस्य कारणं" हेच या न्यायाने "एतिकेतां" चा म्हणजे इंग्रजी चालचलणुकीचा कित्ता सही उचलण्यात व देवी मदिरेच्या कृपा प्रसादाने पुनीत होऊन गटारस्नाने करण्यात सुशिक्षितांना काही कमीपणा वाटत नसल्याचे उल्लेख सापडतात.

तरीपण छत्रपति घराण्याशी ब्रिटिश बहाद्दुरानी केलेले वर्तन ज्यांच्या ज्यांच्या डोळ्यांना दिसले व खुपल, त्यांनी काळाची रंग पालट लक्षात घेऊन आपलेही पवित्रे बदलले. प्रज्ञावंत पुरुषांच्या दूरदृष्टीला चिकित्सेने काहीहि दिसले तरी, सुशिक्षित समाजाच्या बुद्धिवादाला ते पटल्याशिवाय आणि बहुजन समाजाच्या अंतःकरणाला ते भिडल्याशिवाय, प्रज्ञावंत पुरुषाचे तत्वज्ञान आचरणाच्या अभावी निष्प्रभ ठरते. म्हणून आंग्लाईच्या गोड धुंदीत समाज असताना आणि तो आपली निःशस्त्र, निष्प्रभावी व निःसत्त्व स्थिति हीच नंदनवनाची स्थिति समजत असताना, "लोकांच्या बोलिने बोलावे, लोकांच्या चालीने चालावे" या समर्थ-दंडकास अनुसरून वागणारे त्यावेळचे प्रज्ञावंत देखील बोलले की "ईश्वरी इच्छेनेच इंग्रजांचा आणि आमचा योगायोग आला. कारण हिंदुस्थान बाहेर अफाट जग आहे व वेदविद्येइतकेच विज्ञान प्रभावी आहे हे कळून चुकले."

इंग्लंडाने जी औद्योगिक क्रांति केली होती आणि वतनदार वर्गाबरोबर राजकारणात व्यापारी वर्गाला व सुशिक्षितांना महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यात जे यश रक्तरहित क्रांतीच्या जोरावर मिळविले होते, त्याची छाप जगाच्या मनावर अमर्याद होती. मग मिल्ल स्पेन्सरांचे ग्रंथ आदरणीय मानून त्या ग्रंथांच्या उदार व मुक्तबंध शिकवणीच्या जोरावर इंग्लंडच्या राज्यपद्धतीचे नमुने उठवण्यात अहमहमिका लागली तर काय आश्चर्य? इंग्रजी राज्यामुळे पाश्चात्य ज्ञानभांडार येथे खुले झाले आणि इंग्रजी विद्येच्या द्वारे जागतिक प्रवृत्तीचा ओघ परिचित होऊ लागला; इतकेच नव्हे तर, इंग्रजाला हाडाचे

दुष्मन समजणारासही आपल्या तोटकेपणाची आणि खाकेतील निखाऱ्यांना फुलवून ठेवणाऱ्या परकीय युक्तिबाजीची ओळख झाली, हाच खरोखर इंग्रजी राज्याच्या रूपाने आलेला ईश्वरी प्रसाद होय. एरवी हे सर्वांनी एकमुखानेच म्हटले की " इंग्रजी लोकांचे राज्य झाल्यापासून राजापासून रंकापर्यंत साऱ्यास सारखी निस्तेजता आली आहे. बुद्धीला उत्तेजन, व्यापाराला खप, व कला-कौशल्याला पोशिंदा नाहीसा झाला आहे. जिकडे पहावे तिकडे उत्साह शून्यता दिसते. मोठे औदार्य, मोठे शौर्य, मोठे धाडस, मोठी कल्पकता, सारांश, प्रत्येक प्रकारच्या मोठेपणाचा लोप झाल्यासारखा झाला आहे. लढाई किंवा तह करणे, लोकांच्या सुखासाठी राज्यसंबंधी किंवा व्यापारसंबंधी मोठमोठ्या युक्त्या काढणे, वित्तसर्वस्व व बुद्धिसर्वस्व खर्ची घालून नवीन शोध करणे, निरपेक्षबुद्धीने विद्याव्यासंगात किंवा लोकोपकारात गढून राहणे, देशासाठी किंवा स्वार्थासाठी अचाट कृत्ये करण्यास तयार होणे, टोलेजंग कारखाने समाईक भांडवलाने चालविणे, राज्यविषयक व समाजविषयक सुधारणा करण्यासाठी मंडळ्या सभा स्थापून उत्साहपूर्वक कामे करणे वगैरे सुधारलेल्या स्वतंत्र देशात दृष्टीस पडणाऱ्या गोष्टी येथे क्वचित दृष्टीस पडतात. " फार काय " आमचे घोर दारिद्र्य " हा इंग्रजी राज्याचाच परिणाम असल्याबद्दल हिंदुस्थानचे प्रपितामह दादाभाई नौरोजी व पुनरुज्जीवक न्यायमूर्ती रानडे यांचीहि खात्री होती. तरी इंग्रजी राज्याविरुद्ध शस्त्र उपसण्याची ताकद राष्ट्रात उद्या आली तरी तसे करू नये, असा वरील सत्पुरुषांचा सिद्धांत होता. कारण मिल्ल स्पेन्सर प्रभृतींनी आणिक औद्योगिक सुधारणांनी निर्माण केलेल्या " तडजोडीच्या राजकारणाचे " पुरस्कर्ते इंग्रज होते. आणि इंग्रज मुत्सद्यांपैकी उदारमतवादी लोकाग्रणींची खात्री पटविली तर आपल्या अडी–अडचणींची वाट तेव्हाच लागेल अशी दादाभाई, रानडे यासारख्या लोकाग्रणींची खात्री होती. एवढ्या-करिता हिंदुस्थानाप्रमाणेच विलायतेतहि चळवळ चालवावी, प्रांताप्रांतांनी आपला एक एक माणूस विलायतच्या चळवळीस पुरवावा, पार्लमेंटात हिंदी लोकांनी शिरावे, आणि अशा तऱ्हेने " तडजोडीच्या राजकारणाचा " अटापीट करून ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीकडून १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यात इंग्रजांनी दिलेले वचन पूर्ण करून घ्यावे आणि साम्राज्य संरक्षणासाठी वेळ पडल्यास पैसा आणि माणसे पुरवावीत. कारण इतकी राजनिष्ठा दाखविली नाही, आणि जर यदाकदाचित् रशियासारखे राष्ट्र येथे उद्या राज्य करू लागले तर ब्रिटिश अमलापेक्षाही आपली स्थिती कुत्र्यानिपट होईल. एवढ्याच करिता की " इंग्लंड इतके उदार राष्ट्र जगाच्या पाठीवर दुसरे नाही. " म्हणून डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यामधील इंग्रजाकडे आधिपत्य आल्यामुळे, दगडापेक्षा वीट मऊ म्हणून लोक काहीतरी समाधान मानून घेत असले तरी

शस्त्रे काढून घेतल्याने हिंदुस्थानातील आम्ही लोक हात असून लुळे आहोत (बोधसुधाकर ता. १८–११–८५). ब्रह्मी युद्धाचा खर्च हिंदुस्थानवर धोंडच नाही काय ? (महाराष्ट्र मित्र ता. २६–११–१८८५). इंग्रजी राज्य उर्मट ते आम्ही उमजत नाही (प्रतोद ता. २४–५–१८८६). हिंदुस्थानातील राज्य व्यवस्था म्हणजे भातुकलीचा खेळ ! आम्ही सांगू तो न्याय, आम्ही करू तो कायदा यापेक्षा जास्त वाटाघाट करण्याची हिंदुस्थानच्या प्रजेस परवानगी नाही. याप्रमाणे प्रत्येक कायदेपटु गौरकाय भट्ट म्हणत असतात. (विदूषक ता.५–१२–१८८७) लष्करी कायदा सुधारा; सैन्यांतील हुद्यावर नेटिवाना नेमा; लोकांना (खेळाच्या केपा देखील) खुशीने डोके वर काढू द्या; ते काहीच न करता, राष्ट्रीय सभा ही काही गोऱ्या बाळांच्या मताने इंग्लंडास विघ्न होऊन बसली आहे; म्हणून खेळाच्या केपा – देखील हत्याराचे कायद्यात ! म्हणावे काय याला ? (प्रतोद १८८८–८९). असे असंतोषाचे धुमारे सातारा जिल्ह्यात चालूच होते. १८७४ चे ऑगस्टात विंटर या साताऱ्च्या मॅजिस्ट्रेटने एका मजुराला आपला घोडा धरून राहण्यास सांगितले असता, त्याला हातातले काम साहेबाच्या शब्दासरशी हातावेगळे करता आले नाही म्हणून साहेबाने त्याचे आंगावर छडी फोडली. मग ब्रिटिश अम्मल मोंगलाईचा बाप नव्हे का असा सवाल 'बोधसुधाकरा'ने (५–८–७४) केला होता. तेव्हा विंटरला माफी मागावी लागली होती. तसे काही सतत होत रहावे तरच ब्रिटिश राजवट प्रजाहितदक्ष होईल, असे लोकास वाटे. लोकांचे परस्पराविषयी प्रेम वृद्धिंगत होऊन शारीरिक व मानसिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करावा या उद्देशाने साताऱ्यास १८९२ सालच्या वर्षप्रतिपदेस शिवाजी क्लब स्थापन झाला, त्याच्याकडे फारमोठ्या आशेने लोक पहात होते, ते लोकातील असंतोषाचा निपट व्हावा म्हणूनच ! (हा क्लब वाचनालय व व्यायामशाळा चालवी. १८९३–९४ साली संस्थेने सामाजिक, धर्मासंबंधी, राजकीय अशी बारा व्याख्याने करवली. त्यातील दामोदरपंत दिवेकरांचे व्याख्यानामुळे " सहकार्य-कृत मंडळींचे दुकान " स्थापन झाले. औद्योगिक परिषदेला क्लबचे प्रतिनिधी म्हणून दामोदरपंत दिवेकर गेले होते. अहमदाबाद येथील प्रांतिक परिषदेस व राष्ट्रीय सभेस गेलेल्या प्रतिनिधींचाहि क्लबातर्फे सत्कार करण्यात आला. पण अशाने लोकांचे समाधान थोडेच होते! लोक अनुकूल कालाची वाट पहात होते.)

७ : सार्वजनिक सभा

" परम दयाळू इंग्रजसरकारचा आम्हास लाभ होऊन त्यांचेच कृपेने आपणास आपली अवनती कशी दूर करता येईल हे शिक्षण मिळाले. त्याचाच आजची सभा हा परिणाम आहे. " स्वागताध्यक्ष गोपाळराव वामन फडके, जिल्हा सभा. पाटण १९१८.

जुळते–मिळते घेण्याचा राजकारणीपद्धतीचा हा सातारा जिल्ह्यातील शेवटचा कृतज्ञ उच्चार आहे. उदारमतवादी म्हणून गाजलेल्या इंग्रजी मुत्सद्यांनी काढलेल्या उद्‌गाराना वेदवाक्य म्हणून घेऊन चालणाऱ्या या प्रथेला सातारा जिल्ह्यात जवळ जवळ १८६० पासूनच आरंभ झाल्याची बोलवा आहे. दारूचे मक्ते देणे हे लोकांच्या प्रगतीला व आर्थिक सुबत्तेला घातुक असून ते सरकारने अजीबात बंद करावे, असा त्यावेळी अर्ज झाला होता असे म्हणतात. पण १८५७ ते १८६१ पर्यंत विश्वविद्यालये स्थापन होऊन त्यातून पदवीधर बाहेर पडू लागल्यानंतर, सरकारमान्य मार्गांनी लोकांची गाऱ्हाणी दूर करण्याकरिता " जिल्हा ॲसोसिएशन " नांवाची संस्था स्थापन झाली आणि " घराखालील जमीन मोजणीच्या कायद्यासंबंधी नामदार गव्हर्नर जनरल-साहेब याजकडे शेकडो सह्यानिशी अर्ज " वरील ॲसोसिएशनतर्फे ता. १८ डिसेंबर १८६८ रोजी झाला. सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक राजकीय आयुष्याचा हा लोकसंमत प्रारंभकाळ समजावयास हरकत नाही. एकोणि-साव्या शतकाची ' सत्तरी ' म्हणजे स्वाभिमानपूर्वक स्वोन्नतीचा श्रीगणेशाय नमः जर महाराष्ट्रातच होता, तर सातारा जिल्ह्यातही होताच होता. इंग्रजी राज्य आणि इंग्रजी चालीरीती म्हणजे " देवांचे राज्य आणि स्वर्गीय चाली-रीती " अशा समजुतीला धक्का एकोणिसाव्या शतकाच्या सत्तरीनेच प्रथम दिला. सातारा येथे लायब्ररीत ता. २६ जून १८७० रोजी " स्वाभिमान-पूर्वक सार्वजनिक हितासाठी व तरुण लोकांची सुधारणा व्हावी " या हेतूने एक सभा स्थापन झाली. आणि या विद्वानांच्या सभेत " सरकार जे कायदे करते ते योग्य की अयोग्य हे ठरवीत असत. " ता. ७ आक्टोबर १८७० चा 'शुभसूचक' म्हणतो की–"सांप्रत या सभा भरण्याचा बराच प्रघात पडत चालला आहे. " अशा सभांनी शेतकऱ्यासुद्धा सर्व लोकांना एकत्र जमवून देशस्थिती समजावून देण्याचा प्रयत्न १८७० साली वाई, वाळवे, कऱ्हाड, खटाव येथे

झाले खरे, पण ता. १७ जुलई रोजी सातारा येथील लायब्ररीत झालेल्या शेतकऱ्यांच्या सभे इतकी कोणतीच यशस्वी आढळत नाही. साताराचे स्वदेशी कीर्तनकार भाटे जिल्हाभर नवे वळण नव्या काळास अनुसरून प्रचारीत.

असे विखुरलेले प्रयत्न होत असताच, महाराष्ट्रात एकजीव चळवळ व एकमुखी मतप्रदर्शन करता यावे म्हणून खटपट करणारे पुण्याचे गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे ता. २८ मे १८७१ रोजी साताऱ्यास आले आणि गणेश नारायण कोल्हटकर व कृष्णराव सखाराम महाजनी यांच्या साहाय्याने त्यांनी "सार्वजनिक सभा" स्थापन केली; इतकेच नव्हे तर साठ सभासदही मिळविलेच. याच्या आगोदरच न्यायमूर्ती रानडे यांच्या प्रेरणेने वाईस तेथील कार्यकर्ते श्रीमंत नानासाहेब वैद्य यांनी "सार्वजनिक सभा" स्थापन केली होती. "या सार्वजनिक सभांचे जाळे जिल्हाभर करण्याचे उद्देशाने साताराचे गणेश नारायण कोल्हटकर, नारायण पांडुरंग आगटे व कृष्णाजी वासुदेव जोशी कऱ्हाडास ता. १३ ऑगस्ट १८७१ रोजी आले आणि 'वेदो नारायण' गुण्डाचार्य घळसाशी यांच्या नेतृत्वाखाली 'कऱ्हाड सार्वजनिक सभेचा जन्म' झाला. अशा "सार्वजनिक सभा" मध्ये पंतप्रतिनिधि, पंतसचीव, अध्यक्ष उपाध्यक्ष होऊनसुद्धा भाग घेत आणि "पोलीस पट्टी बद्दलचे कायद्यासंबंधी सरकारास सूचना करण्यासंबंधीचा इंग्रजी अर्ज" पुढे पाठवीत. १८७२ साली 'खानदेश रिलीफ फंड' सार्वजनिक सभांमार्फत जिल्हाभर जमविण्यात आला होता, त्यात कऱ्हाड येथे १०० रु. जमले. पण मामलेदार कचेरीची पै नाही." असा प्रमुख दावा सांगितलेला आढळतो. याचा अर्थ असा की, सरकारी नोकरानी भूतदयेच्या कामात बरोबरीने भाग घेतला नाही तर त्यावेळीसुद्धा लोक चिडत. उलट कऱ्हाड येथील तत्कालीन मुनसफ श्रीपाद अमृत ऊर्फ बाबासाहेब नागपूरकर यांच्यासारखे जे सरकारी नोकर सार्वजनिक हितबुद्धीने रात्रीच्या शाळा, स्त्रीशिक्षण, वक्तृत्वोत्तेजक सभा काढून अगर चालवून लोकात मिसळत, यांच्याबद्दल आदर तर दाखविला जाईलच, पण सुट्टीच्या किंवा फिरतीच्या निमित्ताने ते कोण्या गावात-मग ते साताऱ्यासारखे जिल्ह्याचे ठिकाण का असेना—आले की त्यांच्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शकत्वाचा फायदा लोक पुरेपूर घेत. ता. ३१ मे १८७२ रोजी सातारा जिल्ह्यात जी "मिठावरील कराची ओरड" प्रदर्शित करण्यात आली, किंवा त्यापूर्वीच १९ एप्रिल रोजी, वाई येथील कृष्णेत स्नानास नग्नावस्थेत उतरणाऱ्या लष्करी युरोपियनापासून नेटिवास त्रास होई तो सरकारच्या नजरेस जो आणण्यात आला, त्याला "लोकहितेच्छु सरकारी नोकरांचा" हातभार होता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

या सार्वजनिक सभांचा कटाक्ष राजकीय बाब मुख्य धरून तिच्या अनु-

घंगाने लोकांच्या इतरही गाऱ्हाण्यांचा शेवट लावून घेण्याकडे दिसतो. ता. १५ आक्टोबर १८७४ रोजी सातारा सार्वजनिक सभेतर्फे " सर्वहक्क राजाचे व प्रजेचे काही नाही, " म्हणून व्याख्यानात सदाशिव रावजी गवंडे यांनी ब्रिटिश कारभारावर बरीच टीका केली होती. तर सार्वजनिक काकानी " स्वदेशाभिमान व स्वदेशी कपडा " यांचे महत्त्व लोकांना पटवून दिले होते. " येथील राजांची हल्लीची स्थिति " असा निबंध इंग्रजीमध्ये ता. २१ ऑक्टोबर १८७४ रोजी गोविंद वासुदेव कानिटकर यांनीहि वाचल्याचे आढळते. सातारा जिल्ह्यातील संस्थानी प्रश्नाचा स्वतंत्र विचार म्हणून पहिले महत्त्व या निबंधासच द्यावे लागेल. तथापि १८७५ त मल्हारराव महाराज गायकवाडावर ज्यावेळी किटाळ आले, त्यावेळी वाईच्या सार्वजनिक सभेने जोराने उचल केली आणि ता. २६ जानेवारी रोजी चौकशी कमिशनची मागणी केली. एवढ्यावरच न थांबता नानासाहेब वैद्य प्रभृती वाईकरांच्या प्रोत्साहनानेच ता. २९ एप्रिल १८७५ रोजी सातारचे दिवाणांचे वाड्यात सभा भरून " मल्हाररावास गादीवर बसविणे बद्दल " विनंती करण्यात आली. तथापि एकपरी हे प्रकार किंवा " सातारा जिल्ह्यातील मुलकी व दिवाणी खात्यापैकी कित्येक अधिकारी व त्यांचे हाताखालील नोकर एकाच जागी पुष्कळ वर्षे काम करीत आहेत, त्यांच्या बदल्या करा " असा ता. २४ मार्च १८७४ रोजी " शिराळे " करानी केलेला अर्ज, अगर १८७६ च्या दुष्काळानिमित्ताने तासगाव येथील लोकांनी धान्य आणण्यासाठी दस्तुऱ्यांची माफी मागितली पण सरकारने ती नाकारली वगैरे वृत्तांत कोणास मामुली वाटतील; पण तो काल बहुशः विचारजागृतीचाच होता ही गोष्ट लक्षात घेतली तर सातारा–जिल्हा–सार्वजनिक सभेची बैठक दिवाणांच्या वाड्यात भरून ता. ३ डिसेंबर १८७६ रोजी खालील ठराव पास केलेले पाहिले म्हणजे खरोखर कौतुक वाटेल. १८७७ च्या जानेवारी १ तारखेस व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणानिमित्त हे ठराव झाले होते. ते असे:–

१) राजकीय मोठाले प्रकरणात सर्व राजे यांच्या संमती घेत जाव्या. २) लष्करी व दिवाणी खात्यात मोठाली हुद्याची कामे नेटिवास द्यावीत ३) सातारा व वऱ्हाड अन्यायाने घेतले ते परत मिळावे ४) हिंदुस्थानातील जमिनीचा सारा जास्ती वाढलेला आहे तो कमी करून निरंतर कायम घ्यावा व ऐनजिन्नस सारा घेत जावा ५) लोकांस निःशस्त्र केले आहे ती शस्त्रे देण्याचा विचार व्हावा. ६) हिंदुस्थानवर कर्ज आहे त्याचे व्याज इंग्लंडातील कर्जाप्रमाणे कमी व्हावे. ७) विलायतचे पार्लमेंटात हिंदुस्थानचे लोकातर्फे प्रतिनिधी असावे व कायदे कौन्सिलात लोकांनी निवडलेले सभासद असावेत.

या ठरावातील पायाशुद्ध विचार–सरणी व धीटपणा अवलोकन केला, म्हणजे " सरकारानी स्थापन केलेल्या कोर्टातून पक्षकारांचे तंटे चालविण्यास

खर्च फार लागतो व निष्कारण वेळ जातो; आणि एकमेकात अति वैर माजून मोठ मोठाली नुकसाने होतात. देशातील तंटे जेवढे कमी होतील तितका देशास व राज्यास फायदा आहे व देशात तंटे कमी असणे हे राज्यास भूषण आहे. असे समजून तंटे आपसात मांडून तोडण्याकरिता " ता. ७ जुलई १८७६ रोजी सार्वजनिक काकांच्या हस्ते सातान्यास व राव ब. माधवराव रामचंद्र (पेन्शनर डेप्युटी कलेक्टर) यांच्या हस्ते ता. १५ ऑगस्ट १८७७ रोजी वाईस लवाद कोर्टे स्थापन केली, अथवा हायस्कूलचे हेडमास्तर जठार व कृ. पां. आगटे यांनी सातारा म्युनिसिपालीटीत " साखरेचा कारखाना काढण्याचे ठरविले " हे अगदी सहाजिक वाटते.

मात्र दरिद्र्याच्या मनोरथाप्रमाणे सदर साखरेचा कारखाना त्यावेळी कागदीच प्रगती करू शकला. ता. १७ नोव्हेंबर १८८२चा 'शुभसूचक-' मात्र सांगतो की सातारा जिल्ह्यातील गणेश गोपाळ पंडीत, बी. ए. आणि विठ्ठल महादेव गोखले आय. सी. ई या दोन गृहस्थांनी अहमदाबादेस छिटाची गिरणी काढली व टर्कीरेड सूत तयार केले.

निबंधमालेने व न्यायमूर्ती रानड्यांनी स्फूर्ती दिलेल्या महाराष्ट्राने १८८० साली न्यू स्कूलच्या जन्माबरोबर जे नवीन वळण गिरवण्यास सुरवात केली होती तीमधीलच सातारा जिल्ह्याची एक लपेट म्हणून वरील छिटाच्या गिरणीचा गौरव करता येईल. खुद्द सातारा जिल्ह्यात बघता, केसरीवरील बर्वे प्रकर–णाच्या खटल्याकरता फंड जमविण्यात आला, आणि त्यानिमित्ताने दादासाहेब करंदीकरांनी आजकालच्या सातारा जिल्ह्याची कुंडली मांडली.

मराठा-केसरीकर्त्यांस झालेली शिक्षा सरकारने दया करून माफ करावी म्हणून ता. ११ ऑगस्ट १८८२ रोजी सातान्याहून व त्याच तारखेच्या आसपास वाई-कऱ्हाडहून अर्ज झाले खरे, पण त्यासालची सातारा जिल्ह्यातील खरी चळवळ म्हणजे स्थानिक स्वराज्यासंबंधीची होय. यासंबंधात पुण्याच्या सार्वजनिक सभेचे एजंट रामचंद्र नारायण करकरे यांच्या डिसेंबर महिन्यांतील भेटींचा उल्लेख करणे जरूर असले तरी खुद्द जिल्ह्याची जागरूकता मनात भरण्यासारखीच आहे. ता. २ जुलई रोजी घाटे थिएटरात नारायणराव फडणीस यांचे अध्यक्षते-खाली सभा भरून दादासाहेब करंदीकरांनी रिपनसाहेबांच्या स्थानिक स्वराज्याच्या योजनेवर मुख्य भाषण करून तिची समजूत करून दिली आणि हाय-स्कूलचे फर्स्ट असिस्टंट गोपाळ अनंत भट, गणपतराव कोल्हटकर, आनंद बहिरव पिंगळे व हायस्कूलचे हेड-मास्तर रा. ब. विठ्ठलराव पाठक यांनी त्या योजनेचा उहापोह केल्यावर रिपनसाहेबांना द्यावयाचे मानपत्र सखाराम रामचंद्र किर्लोस्कर यांनी तयार केले. स्थानिक स्वराज्याच्या रिपनकृत योजनेने आनंदाच्या टाळ्या पिटण्यापुरते हुरळून न जाता, ती योजना जिल्हाभर समजून

सांगण्याकरता करंदीकरांच्या प्रेरणेने गंगाधर रामकृष्ण किराणे, कऱ्हाड, वाळवे, तासगाव, पाटण या भागात हिंडले. दरम्यान मुंबई सरकारने स्थानिक स्वराज्य-व्यवस्थेसंबंधाने जो ठराव प्रसिद्ध केला त्या ठरावात हिंदुस्थान सरकारच्या पहिल्या ठरावाविरुद्ध अशा पुष्कळ गोष्टी असल्याने पुन्हा हिंदुस्थान सरकारने ४ ऑक्टोबरचा दुसरा ठराव प्रसिद्ध केला व तो " फार योग्य व पोक्त विचाराचा असल्यामुळे " त्याबद्दल रिपनसाहेबांचे आभार २९ ऑक्टोबर रोजी मानण्यात आले.

वरील सभेतच " शेतकरी-कर्ज-मुक्तीचा कायदा त्रासदायक " म्हणून ठराव ग. पां. आगटे, वि. ल. रांगोळे, ना. स. फडणीस यांनी केला. शेतकरी-कर्जमुक्ततेच्या कायद्याचा परिणाम त्यासाली तरी असा दिसून आला की " शेतकरी अ‍ॅक्टाच्या तडाख्यात बहुतेक व्यापारी सापडल्यामुळे दिवाळीचा सण व्हावा तसा झाला नाही." बिचाऱ्या शेतकऱ्यांना तर दिवाळी ठाऊक असण्याचे कारणच काय ? १८८३ च्या ता. १४ जानेवारीला केशव पांडुरंग नातु व बाळाजी महादेव गोळे यांच्या समवेत दादासाहेब करंदीकर सार्वजनिक सभेचे चिटणीस निवडून आल्यावर, त्यांनी शेतकरी-कर्ज-मुक्ततेच्या कायद्याचा फायदा शेतकऱ्याला भरपूर व्हावा म्हणून फार खटपट केली. त्या कायद्यापायी सातारा जिल्ह्याच्या वाटणीस आलेल्या पोलनसाहेबांची गाठ ता. ४ फेब्रुवारीस घेऊन, " कऱ्हाडचे भास्कर गोपाळ सावरकर हे शेतकऱ्यांची उत्कृष्ट वकिली करतील " असे आश्वासन दिले; पण साहेबास असाही इशारा दिला की, " रा. ब. रानड्यांचा दक्षिणेतील शेतकऱ्यांसंबंधीचा इतिहास व अभिप्राय वाचा." वाईस असाच इशारा नानासाहेब वैद्य व कऱ्हाडास रामचंद्र विष्णु ऊर्फ भाऊसाहेब भागवत यांनी केल्याचे नमूद आहे. पुणे सार्वजनिक सभेचे एजंट काशिनाथ त्रिंबक खरे " शेतकी अ‍ॅक्ट " समजावून देण्याकरिता जिल्ह्यात १८८४ चे जानेवारीत चक्कर मारून गेले. पण या सगळ्या प्रयत्नांचा उपयोग शेतकऱ्यांच्या बाबत उपड्या घड्यावर पाण्याप्रमाणेच झाला.

"नेटिव मॅजिस्ट्रेट ज्युरिस्डिक्शन बिलाचा विचार " ता. १७ जून १८८३ रोजी आगट्यांच्या वाड्यात सुमंत, नातू, करंदीकर वगैरे वीस सभासदांनी करून बळवंतराव सहस्त्रबुद्धे व पांडुरंगराव देसाई यांच्या चिकित्सेने पुणे सार्वजनिक सभेच्या मागणीप्रमाणे एक मेमोरियल पाठविण्यात आले. एवढी एक ठळक गोष्ट नमूद करून " सार्वजनिक सभा " विषयी एक साधारण विधान करता येईल की, नानासाहेब वैद्यांचे देखरेखीखाली वाईची सभा जितकी कार्यकर्ती होती, तितकी कोणतीच नव्हती. रस्त्यावरील म्युनिसिपल कचऱ्यापासून तो थेट प्युनिटी पोलीसपर्यंत सर्व बाबतीत वाई सार्वजनिक सभेने अतिशय जागरूकता दाखविल्याचे तिच्या दप्तरावरून कळते. महाबळेश्वरास जाणाऱ्या

गव्हर्नरास जातायेता केव्हातरी गाठून मानपत्राच्या निमित्ताने आपली गाऱ्हाणी सरकारच्या वेशीवर टांगण्याचा त्या सभेचा जणू शिरस्ताच दिसतो. तोच कित्ता पुढे साताऱ्च्या म्युनिसिपालिटीने उचललेला आढळतो. या व अशा प्रयत्नांचा परिणाम आत्ताच काय, पण त्यावेळी देखील फारसा दृग्गोचर नव्हता. पण पायातील दगडांना चिखलात तोंड खुपसून जमिनीच्या खालीच गडप होऊन रहावे लागते ना ? अशा सर्व खटाटोपांनी एक गोष्ट सुतराम् साधली आणि ती म्हणजे विचार-जागृती. या जागृतीच्या जोरावर १८८५ साली " सार्वराष्ट्रिक कॉन्फरन्स " ऊर्फ राष्ट्रीय सभा जेव्हा होऊ घातली तेव्हा तिच्यापुढे ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणून ता. २१ डिसेंबरचे वाई येथील वृत्तसार पत्र नमूद करते की, " विलायतेत इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड या प्रांतातून पार्लमेंटमध्ये जसे मेंबर पाठविले जातात त्याप्रमाणे हिंदुस्थानच्यातर्फेने काही मेंबर पाठविण्यास आम्हास आधिकार मिळावा, " असे आपले मागणे पार्लमेंट सभेपुढे ठेवलेच पाहिजे.

८ : छोटी कॉंग्रेस

ता. २८ डिसेंबर १८८५ रोजी, पुण्यास अडचण निर्माण झाल्यामुळे, मुंबापुरीस राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. त्या पहिल्या – वहिल्या सभेला सातारा जिल्ह्यातून कोणी हजर असल्याचे आढळत नाही. तथापि अखिल भारताचे एकमुखी मागणे जगापुढे मांडण्याकरता, किंबहुना भारतवर्षाने आपले सार्व-जनिक सामर्थ्य व मतप्रदर्शन करावे आणि धर्म व पंथ यांचा विचार न करता लहान मोठ्या सर्व दर्जांच्या लोकांना आपल्या संपूर्ण व स्वयंपूर्ण वाढीसाठी क्षेत्र निर्माण करावे, अशा रोखाने राष्ट्रीय सभेचा दृष्टीकोन आहे, असे पटताच दादासाहेब करंदीकर हे तिचे एकनिष्ठ " वारकरी " झाले. आणि त्यांनी हे व्रत १९२९ अखेर अव्याहत चालविले होते. दादासाहेबांच्या बरोबरीनेच ज्यांची नांवे कॉंग्रेसनिष्ठेविषयी नमूद करावी लागतील अशी परंपरा चढत्या वाढत्या तोलाने फोफावत गेली आहे, हे खरे; पण राष्ट्रीय सभेच्या जन्माबरोबर तिचे रहस्य समजून राष्ट्रीय सभेचे पाईक होण्यात ज्यांनी धन्यता मानली त्यात दादासाहेबांच्या बरोबरीने बळवंतराव सहस्रबुद्धे (सातारा), बळवंतराव कोल्हटकर (संदेशकार अच्युतराव कोल्हटकर यांचे दत्तक घरचे वडील) व विशेषतः गोविंदराव ऊर्फ रावसाहेब लिमये (अष्टे) यांचा प्रामुख्याने निर्देश

केला पाहिजे. सातारा जिल्ह्याच्या सुखदु:खांना आणि ध्येय-धोरणांना कोणती चार अंगे असतील तर विलायत सरकारच्या हाताला हात लावणारे हिंदुस्थान सरकार, प्रांतिक म्हणून मुंबई सरकार, स्थानिक म्हणून जिल्हाधिकारी या सर्वांचे कारभार व लोकांच्या म्हणून असणाऱ्या गरजा होत. तथापि ज्या हिंदी राष्ट्राच्या ऐहिक उद्धाराकरता राष्ट्रीय सभेचा जन्म झाला, त्या हिंदी राष्ट्राचा सातारा जिल्हा हा एक घटक असल्याकारणाने छत्रपती घराण्याशी झालेल्या इंग्रजी वर्तनाला परिचित असलेला सातारा जिल्हा राष्ट्रीयसभेचा हुकूम–ठराव–सरकारी कायद्याइतक्याच प्रामाणिकपणाने पाळणारा होणे जरूर नाही काय? तसे झाले तरच १९२२ साली वीर वामनराव जोशांनी इसलामपूर येथील जिल्हासभेच्या अध्यक्षस्थानावरून "मराठी राज्याच्या इतिहासाचे शिवाजीपासून राजारामाच्या अंतकाळपर्यंतच्या काळातले अनुकरण करणे इष्ट आहे" असे जे म्हटले होते, ते म्हणण्यात काही तरी तथ्य आहे. कारण "त्या दैदीप्य आणि वैभवशाली कालात ज्यांचे पिंड याच महाराष्ट्रात पोसले गेले व ज्यांचे मर्त्य परंतु कीर्तिशाली देह याच महाराष्ट्रभूमीच्या उदरात एकजीव होऊन गेले अशा तत्कालीन अनेक जातींच्या व पंथांच्या लोकामध्ये ऐक्यभाव व स्वराज्यप्रेम पूर्णपणे नांदत होते."

तथापि १८८५ साली राष्ट्रीय सभेचा जन्म झाला त्यावेळी व पुढे जवळ-जवळ १९०६ सालापर्यंत राष्ट्रीय सभेचे धोरण सरकारी कारभाराच्या धोरणाशी जुळते घेण्याचेच असल्याकारणाने त्या काळात अर्ज विनंत्यांचेच साम्राज्य राष्ट्रीय सभेत होते म्हटले तरी चालेल. सूर्य कधीही न मावळेल असा इंग्लंडचा साम्राज्यविस्तार, इंग्रजी व्यापाऱ्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा, इंग्रजी यंत्रयुगाने निर्माण केलेल्या लँकेशायर प्रभृती शहरांनी उत्पन्न केलेल्या कापड वगैरे मालाचा उठाव होण्यास लागणारे बाजार, तात्पर्य इंग्रजी हित-संबंध अबाधित कसे राहतील आणि त्यातून साधले तर साधेल तेवढे भारताचे किंवा त्याच्या भागाचे थोडेफार कल्याण साधून आपल्या साधुत्वाचा डांगोरा कसा पिटता येईल, एवढेच नागमोडी वळणाच्या इंग्रजी कारभाराचे लक्ष्य असल्याकारणाने पडद्याआडून लॉर्ड डफरीन अगर उघड ए. ओ. ह्यूम यांच्या-सारख्या उदारमनस्क इंग्रजाबरोबर सगळे सहकारी यंत्रही राष्ट्रीय सभेबद्दल प्रारंभी सहानुभूती दाखवीत असे. यद्यपि राष्ट्रीय सभेच्या जन्माबरोबर, 'देवाचे राज्य' हा इंग्रजी राज्याबद्दलचा भ्रम उतरू लागला आणि दादाभाई नौरोजी, डिग्बी, गोखले प्रभृतींनी पुढे स्पष्ट म्हणून दाखविल्याप्रमाणे परकीय राज्यामुळे हिंदुस्थानला जळवा लागल्याचा ध्वनी राष्ट्रीय सभेच्या विनम्र विनंत्यामधून प्रारंभापासूनच निघू लागला. या ध्वनीचा पडसाद भारताच्या इतर भागाप्रमाणे सातारा जिल्ह्यातही १८८९ सालीच ऐकू आला. त्या सालच्या सप्टेंबरात

ता. १७ ला दादासाहेब करंदीकरांच्या दैनंदिनीत नमूद आहे की " राष्ट्रीय सभेच्या चळवळीस मदत करू नका म्हणून कोरेगावच्या मामलेदारांनी खेड्यातील अधिकाऱ्यास सांगितले."

राष्ट्रीय सभेच्या अशा विनम्र पण ध्वनीक्षेपक कार्यक्रमात सातारा जिल्ह्याने मोठीच कामगिरी केली आहे. १८८६ पासून १९०६ पर्यंत राष्ट्र-सभेला प्रतिनिधि निवडण्याच्या निमित्ताने आणि राष्ट्रीय सभेला जाऊन आलेल्या प्रतिनिधींचा सन्मान करण्याच्या निमित्ताने राष्ट्रसभेचे वजन जिल्ह्यात वाढ-विण्याला सातारा जिल्ह्याच्या पुढाऱ्यांनी मदत केलीच; पण संधी सापडली तेव्हा तेव्हा दादासाहेब करंदीकरांनी व विशेषतः बळवंतराव कोल्हाटकरांनी राष्ट्रीय सभेची माहिती करून देण्याकरिता दौरे काढले. कृष्णाजी अबाजी गुरुजी यांचीहि खटपट राष्ट्रीय सभेच्या प्रारंभीच्या वर्षात मोठी जोराची आढ-ळते. " राष्ट्रीय सभेकरता आपण काय केले पाहिजे? तर राष्ट्रीय सभेचे काम सतत चालावे म्हणून तालुका निहाय 'मंडळी' स्थापन केली पाहिजे." म्हणून पटविण्यासाठी "तालुक्याचे गावन्गाव" टिपण्याचे काम बळवंतराव कोल्हाटकरांनी १८८८ त केले, दादासाहेब करंदीकरांनी त्या सालच्या ता. १७ फेब्रुवारी रोजीच नानासाहेब वैद्यांच्या मदतीने वाई तालुक्यात राष्ट्रसभेचे काम करावयास 'मंडळी' तयार केली. कऱ्हाडास २४ सप्टेंबर रोजी तेच काम गुरुजींनी चांदशा काजी यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरवून केले. राष्ट्रीय सभेने विचारार्थ घ्यावयाच्या ठरावासाठी सूचना करण्याचा उपक्रमहि १८८८ सालापासूनच झालेला आढळतो. त्यासाली फ्रामजी मंचरजीचे अध्यक्षतेखाली कृष्णराव महाजनींनी "होम चार्जिस व मुलकी आणि न्याय खात्याच्या विभा-गणीबद्दल बऱ्याच सूचना केल्या होत्या." १८८९ सालापासून राष्ट्रीय सभेसाठी वर्गणी गोळा करणेचा उपक्रम सुरू झाला, इतकेच नाही, तर त्या निमित्ताने जिल्ह्याच्या दक्षिण भागात राष्ट्रीय सभेचा संदेश घरटी पोचविण्याचीही व्यवस्था झाली. या संबंधात ता. २९ जुलई १८८९ चे 'वृत्तसार' लिहिते की:– "राष्ट्रीय सभेच्या संबंधाने आमचे जिल्ह्यापैकी वाळवे तालुक्यातील प्रसिद्ध व लोकप्रिय गृहस्थ गोविंदराव लिमये, केशवरावजी फडके, हरीभाऊ तळवलकर, पांडुरंग रावजी देसाई यांनी वर्गणी गोळा करणेची फारच चांगली व्यवस्था केली आहे. तालुक्यातील प्रत्येक गावाकडून घरापाठीमागे एकेक पैसा घेण्याची सुरवात केली आहे. पैसा घेणारा, घरवाल्यास आपण पैसा कशासाठी देतो व यापासून उप-योग काय हे समजावून सांगतो. तसेच प्रत्येक घरवाल्याने तालुक्यातून जाणारे डेलीगेटास आपली लेखी संमती दिली पाहिजे, अशीही व्यवस्था केली आहे."

या प्रयत्नांचा उपयोग म्हणजे वाळवे तालुक्यातून राष्ट्रीय सभेस ३०० रु. जमले आणि इतर तालुक्यांनी ते उदाहरण घेऊन तालुक्याच्या गावातून पैसे

जमविले, त्यातील प्रसिद्ध आकडे म्हणजे सातारा ५५, वाई ५०, व कऱ्हाड ४० रुपये होत. तथापि गोविंदराव लिमये प्रभृतींचे खरे काम १८८९ च्या राष्ट्रीय सभेसाठी प्रतिनिधी निवडण्याच्या निमित्ताने केलेली "छोटया काँग्रेसची" स्थापना होय. वाळवे तालुक्यात २४ नोव्हेंबर १८८९ रोजी अष्टे येथे सुरू झालेला हा उपक्रम १९०० सालपर्यंत मोठया उत्साहाने चालला होता, तरी १८९७ साली इसलामपुरास कऱ्हाडचे दत्तोबा नाईक काळे यांच्या अध्यक्षतेखालील अधिवेशनानंतर त्यात फारसे तेज उरलेले नव्हते. मात्र पहिली नऊ अधिवेशने अशी होती की राष्ट्रीय सभेचे काम कसे खेडेकऱ्यांना बरोबर घेऊन करावे, किंबहुना राष्ट्रात निढळाच्या घामाने जो वर्ग अन्नादि जरुरीची जीवित साधने उत्पन्न करतो, त्याला वाचा फोडून त्याचे म्हणणे राष्ट्रीय सभेपर्यंत कसे पोचवावे आणि राष्ट्रीय सभेत ठरलेले अखिल भारतीय धोरणाचे लोण शेतकऱ्यापर्यंत कसे पोचवावे याचा तो 'बिवलकरी कित्ता' होईल.

या धोरणास अनुसरून संस्मरणीय झालेल्यापैकी वाळवे तालुक्याची शिराळे येथील १८९० ची छोटी काँग्रेस होय. तिचे वर्णन थोडक्यात असे. दोन मैलावरून पताका दिसत होत्या. "हयूम साहेबांचा विजय" अशी अक्षरे सोनेरी शाईने कमानीवर लिहिलेली आढळत होती. मुख्य पाहुण्यास व सभा चालकास पेशवाई थाटाचे दरबारी आसन तयार केले होते. सभा ता. ३० नोव्हेंबर रोजी भरली होती. गावोगावचे मुखत्यार, मुखत्यार पत्रासह हजर होते. सुमारे दोन हजार लोक हजर होते. अध्यक्ष आप्पासाहेब देशमुख चिकुर्डेकर होते. बळवंतराव सहस्रबुद्धे यांनी "राष्ट्रीयसभा म्हणजे काय" हे समजावून सांगितले. राष्ट्रीय सभेच्याद्वारा आपली दुःखे वेशीवर कशी टांगावीत याचे वक्तृत्वपूर्ण विवेचन बळवंतरावं कोल्हटकरांनी केले. आपली उन्नती करून घेण्यास इंग्रजापासून आपण काय शिकले पाहिजे ते गुरुजींनी सांगितले. "कायदे कौन्सिलात सुधारणा झाली पाहिजे. जेथून कायदे तयार होतात ते स्थान शुद्ध झाले म्हणजे बाकीच्या मागण्यास जोर येईल." असे दादासाहेब करंदीकरांनी प्रतिपादले. नंतर कायमधारा, १८८८ चा ७ वा कायदा जो वारसासंबंधी झाला तो रद्द व्हावा म्हणून मागणी आणि वाळवे तालुक्याला स्टँडिंग कमेटी म्हणून लिमये, फडके, तळवलकर, तगारे यांची नेमणूक करून सभेचे काम संपले.

१८९१ च्या २९ नोव्हेंबरला इसलामपूर येथे आण्णासाहेब मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वाळवे तालुक्याची छोटी काँग्रेस फिरून भरली आणि केशव रावजी फडक्यांनी स्वागत केल्यावर गुरुजींनी राष्ट्रीय सभेचे महत्त्व वर्णन करून दुष्काळासंबंधीचे भावी संकट, जंगलाच्या कायद्यापासून जुलुम, मिठावरील कर, प्राप्तीवरील कर यांविषयी विचार मांडले. कोल्हापूरच्या श्रीपादशास्त्री

देवधरांनी देशी कपडे वापरण्यासंबंधी ठराव मांडला. दादासाहेब करंदीकरांनी " जमिनीचा सारा वाढत आहे याबद्दल राष्ट्रीय सभेने विचार करावा " अशी शिफारस केली. कोंडोपंत सहस्रबुद्धे मास्तर, अष्टेकर, सुपनेकर यांचीही विषयानुसार भाषणे झाली.

पुढील म्हणजे १८९२ च्या बोरगांव येथील अधिवेशनात नामदार दादाभाई नौरोजी पार्लमेंटात निवडून आले म्हणून अभिनंदन करण्यात आले. पण वाळव्याच्या छोट्या कॉंग्रेसचे " माणिक अधिवेशन " ज्याला म्हणता येईल ते १८९३ साली वाळवे येथेच राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूमसाहेब यांचे नेतृत्वाखाली २६ नोव्हेंबर रोजी झाले. प्रतोद, वृत्तसार, केसरी, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश यांच्या बातमीपत्राचा सारांश असा देता येईल:---

" ह्यूमसाहेबांस वाळव्याच्या सभेची दाद ' इंडिया ' मासिकातून बरीच होती. दादासाहेब करंदीकर व रावसाहेब लिमये यांनी खटपट केल्यावरून मार्गन ब्राऊन यास घेऊन ह्यूमसाहेब आले. थोरातांच्या घरी पानसुपारी झाली. इसलामपूरचे मंत्री व निजामचे सरदार रायरंभाराव दत्ताजीराव हजर होते. शेतकऱ्यांसह सरदार–इनामदार कॉंग्रेसच्या कार्यास साहाय्य करीत असल्याबद्दल आपणास आनंद होत असल्याचे ह्यूमसाहेबांनी बोलून दाखविले.

कॉंग्रेसचा मंडप कृष्णेचे दक्षिण भागास उभारला होता. क्षेत्रफळ दहा हजार चौरसफूट होते. सातारा, वाई, तासगांव, इसलामपूर, कऱ्हाड, बेळगांव इचलकरंजी, कोल्हापूर, पुणे वगैरे ठिकाणाहून २०० मंडळी आली होती. त्यात टिळक, गोखले, नामजोशी, आपटे, साने, कुलकर्णी, रानडे होते. ज्ञानप्रकाश, प्रतोद, विद्याविलास, वृत्तसार यांचे रिपोर्टर होते. दहाहजार शेतकरी समूह होता. रावसाहेब लिमये स्वागत करताना म्हणाले " ही सभा राष्ट्रीय सभेचे चित्र आहे. आज जो शेतकरी येथे जमला आहे त्यावरून राष्ट्रीय सभा म्हणजे काय हे त्यास कळले आहे किंवा नाही हे कोणासही अनुमान करता येईल. " मग कुबेरानी सुचविले आणि देसायांनी अनुमोदन दिले तेव्हा सरदार भाऊसाहेब थोरात हे अध्यक्ष झाले. नंतर बोरगावच्या चिटणीसानी राष्ट्रीय सभा शेतकऱ्यांचा फायदा कसा करते हे सांगून ह्यूमसाहेबांस मानपत्र देण्याचा ठराव मांडला. त्याला का. व्यं. तगारे यांनी अनुमोदन दिले. मग वाळव्याचे लोकांचे मानपत्र गणेश हरी हर्डीकर यांनी वाचले. बळवंतराव सहस्रबुद्धे यांनी सातारा जिल्ह्याचे मानपत्र वाचले. नंतर दत्तोपंत पारसनीसकृत ' कीर्तिध्वज " पुस्तकासह ती अर्पण करण्यात आली. बळवंतराव कोल्हटकरांनी ह्यूमसाहेबांच्या उद्योगाविषयी आवेशपर वाणीने चांगला ग्रह उमटविला. मग ह्यूम म्हणाले, कॉंग्रेस श्रीमंत लोकांकरिता

स्थापली नाही. ती गरिबाकरिता की, ज्यास खावयास पोटभर अन्न नाही अशा करिता आहे. ही सभा एकप्रकारे सरकार आहे तिला मदत करा, काँग्रेसशी एकनिष्ठपणाने वागत जा म्हणजे गरीब शेतकरी, मजूर यांचे दुःख निवारणार्थ ती उपयोगी पडेल हे मी खात्रीने सांगतो." लो. टिळकांनी सभेची प्रशंसा करून सांगितले "काँग्रेस गरिबा करता आहे. आपल्या दुःखाचे निवारण करणारी माणसे तिच्याद्वारे उत्पन्न होतील." नंतर सातारचे सहस्रबुद्धे, करंदीकर व तासगावचे नातू हे बोलले. दोघां शेतकऱ्यांनी "महाराज आमची पिके टोळांनी खाल्ली, आमचा सारा कमी करा" अशी विनंती केली, तेव्हा "नामदार नातू कौंसिलात प्रश्न ठेवतील" असे करंदीकरांनी आश्वासन दिले. व लाहोर काँग्रेससाठी दहा प्रतिनिधी निवडले.

काँग्रेसचे कार्य व धोरण बहुजन समाजाच्या दारापाशी नेऊन पोचविण्याकरता गोविंद धोंडदेव ऊर्फ रावसाहेब लिमये यांनी काय परिश्रम घेतले याची सर्वसाधारण कल्पना वरील वर्णनावरून येईल. रावसाहेबांची ही पद्धती ठिकठिकाणी इतकी पटली की वाळव्याच्या छोटया काँग्रेसच्या नकला इतरत्र उठल्या. १८९१ मध्ये २२ नोव्हेंबर रोजी भाऊसाहेब भागवत, विठ्ठलराव सुपनेकर वगैरेनी भरविलेली कऱ्हाड तालुक्याची छोटी काँग्रेस आणि १८९२ व १८९३ सालच्या वाई येथील वाई तालुक्याच्या छोटया काँग्रेसा या विशेष संस्मरणीय झाल्या. ५ डिसेंबर १८९२ रोजीची छोटी काँग्रेस खंडेराव सयाजीराव जाधव (भुईंज) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली आणि काँग्रेसच्या प्रतिनिधीमध्ये खंडेराव सयाजीराव जाधव यांची निवडणूक झाली. ता. ११ डिसेंबर १८९३ ची वाई तालुक्याची छोटी काँग्रेस मात्र वाळवे तालुक्यातील आपल्या बहिणींना शोभण्यासारखीच झाली. तीन हजार शेतकरी तिला हजर होते. इसलामपुराहून लिमये, तगारे, त्रिंबकशास्त्री रानडे, टेंभूचे किराणे, रहिमतपूरचे कान्हेरे, सातारचे प्रतिष्ठित वकील, लिंबचे आपटे, जमखिंडीचे गाडगीळ तिला आले होते. तात्यासाहेब कोठावळ्यांनी स्वागत केल्यावर बाळासाहेब नातू अध्यक्ष झाले. नातू म्हणाले "तुम्हांस काय हवे, हे सध्यांचे सरकार विचारीत नाही. तुम्ही काय देता हे ते विचारते. म्हणून तालुक्यासच काय प्रत्येक गावाला अशा सभा होऊन पायरीपायरीने वर सभा झाल्या पाहिजेत." मग हळब्यांनी दादाभाई नौरोजींना मानपत्र देण्याचा ठराव मांडला. दादासाहेब करंदीकरांनी मानपत्र स्पष्ट करून सांगितले आणि १६ डिसेंबर रोजी मुंबईस जाऊन महादेव वामन भट व रामचंद्र कृष्ण कोठावळे यांनी ते द्यावे असे ठरले. नंतर अहमदाबादच्या प्रांतिक परिषदेतील ठरावांना संमती देऊन मीठ, जंगल, कायमधारा, प्राप्तीवरील कर, हत्यारांचा कायदा, म्युनिसिपल ॲक्ट दुरुस्ती असे मुख्य ठराव होऊन त्यावर बर्वे, सखाराम वर्धू सावंत, वे. भाऊशास्त्री देवकुळे, गंगाधर-

गैरमर्जी राष्ट्रीय सभेवर फिरली, म्हणूनच श्री. नारो विठ्ठल घाटचांनी कऱ्हाडास कृष्णाजीपंत गुरुजीस आणून त्यांचे चांदशा मनेशा काजी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेवर व्याख्यान करविले, हेही पुष्कळ दृष्टींनी बोधप्रद उदाहरण आहे.

१८८७ साली 'विदूषका'तून कलेक्टरास नोटीस देऊन आणि कायदेशीर हातपाय हालवून, सडकेकडची झाडे कऱ्हाडकरांना राहिली नाहीत ती नाहीतच या कटू अनुभवाने शहाणे होऊन ठिकठिकाणची जप्त केलेली गायराने परत मिळावी म्हणून दाद मागण्याकरिता १८९१ च्या ऑगस्ट महिन्याचे शेवटचे आठवड्यात कराड, पाटण वगैरे तालुक्यातून हजारो शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी कलेक्टरसाहेबांच्या बंगल्याभोवती जमा झाल्याचे ता. ४ सप्टेंबर १८९१ चा ' शुभसूचक ' नमूद करतो.

असल्याही प्रयत्नाला धूप मिळत नाही म्हटल्याबरोबर साहजिकच स्वावलंबनाकडे कल वळतो. पण दुबळ्याच्या स्वावलंबनाला यश कशाचे ? हे ज्यांच्या लक्षात आले, ते बहात्तर रोगावरील एक रामबाण औषधाचा प्रयोग करून पाहतात. त्याप्रमाणे राष्ट्रीय सभेची (काँग्रेसची) कास धरल्यावरच आपले कल्याण होईल अशी लाट त्यावेळी जिल्ह्यात उत्पन्न झालेली आढळते. म्हणूनच हिंदु-मुसलमानांचे दंगे इतरत्र बोकाळले असता, सातारा जिल्ह्यात तो झोत फारसा शिरला नाही. उलट १८९० च्या राष्ट्रीय सभेला २०० मुसलमान प्रतिनिधी हजर होते, त्याबद्दल पत्रकारांनी आनंद प्रदर्शित करून " हिंदु-मुसलमानांचे ऐक्य, अशा सभा प्रत्येक शहरी झाल्यास वृद्धिंगत होईल. " असे मत प्रगट केले होते. तेव्हा वाईचे दाऊदशाह काजी हे राष्ट्रीय सभाभक्त झाले यात नवल नाही. पण १८९१ च्या राष्ट्रीय सभेस गेलेल्या मुखत्यारांना ३१ जानेवारी १८९२ रोजी साताऱ्च्या घाटे थिएटरात पानसुपारी झाली त्यावेळी " कृ. आ. गुरुजीस मुसलमान मित्रांनी रुप्याचे पदक लावलेला बनातीचा डगला दिला. " १८९२ च्या राष्ट्रीय सभेला दत्तोपंत पारसनीस प्रतिनिधी म्हणून गेले होते. त्यांनी १० फेब्रुवारी १८९३ रोजी आपले " काँग्रेसचे व विशेष स्थळांचे वर्णन " प्रसिद्ध केले, तेच राष्ट्रीय सभेवरील सातारा जिल्ह्यातील पहिले प्रकाशन होय. शांतवृत्ती पारसनीसांच्या राष्ट्रीय सभेसंबंधीच्या आदराने पुढील साली असा एक दृश्य परिणाम घडवून आणला की १८९३ च्या राष्ट्रीय सभेहून करंदीकर, सहस्रबुद्धे, पारसनीस ही मंडळी परतल्यावर १४ जानेवारी १८९४ रोजी त्यांना शिवाजी क्लबतर्फे जशी पानसुपारी झाली, तसेच २१ जानेवारी रोजी हिंदु-मुसलमानांनी मानपत्रही दिले. १८९५ साली २६ जानेवारीस खानसाहेब बल्लीसाहेब खतीब यांनीच पुढाकार घेऊन साताऱ्यास राष्ट्रीयसभा प्रति-

निधींचे स्वागत केले आणि एप्रिलमध्ये सातारा डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाने टिळकासच मत दिल्यामुळे लोकमान्य मुंबई कायदे मंडळात निवडून आल्यावर ऑगस्टमध्ये त्यांना मानपत्र देताना आपल्या जमातीनिशी खतीबांनी मोठ्या प्रेमाने भाग घेतला. कऱ्हाडास हसन मुजावर प्रभृती मुसलमान पुढाऱ्यांनी तर गणपतीच्या पालख्या आपल्या खांद्यावरून एक नव्हे, दोन नव्हे पांच साल मशीदीवरून नेल्या. हीच सर्वसाधारण दिलजमाईची वृत्ती हिंदुमुसलमानामध्ये जिल्हाभर नांदत असल्या कारणाने भाऊसाहेब सोमण रहिमतपूर येथील (१९२२) जिल्हासभेच्या अध्यक्ष स्थानावरून मोठ्या अभिमानाने म्हणाले की, "सातारा जिल्ह्याच्या एकीच्या व समेटाच्या बाबतीत जो पूर्वापार लौकिक आहे तो लक्षात घेता ब्राह्मण – ब्राह्मणेतर, हिंदु-मुसलमान व मागासलेले आणि पुढारलेले असल्या शुष्क प्रश्नास आमच्या जिल्ह्यात मुळीच थारा मिळणार नाही. " छोट्या काँग्रेसांचे कार्य आणि सार्वजनिक सभांचे अगर वैयक्तिक जबाबदारीवरील प्रगतीकार्य चालू असता १८९५ साली या सर्व कार्याला संघटन क्षमतेची दिशा लागली. ता. ७ एप्रिल रोजी नानासाहेब रास्ते यांच्या अध्यक्षतेखाली वाई येथे सार्वजनिक सभा भरून समकालीन परीक्षेबद्दल पार्लमेंटास अर्ज करणे, पुण्यास होणाऱ्या काँग्रेसला द्रव्यद्वारा मदत करणे व जंगलसंबंधी झालेल्या ठरावांची लोकास समजूत करून देणे हे विषय सर्वानुमते पास झाले. त्यावेळी पुणे सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी विष्णु हरी करंदीकर मुद्दाम आले होते. त्यांनी जिल्ह्यांतील राष्ट्रीय प्रेमाबद्दल धन्योद्गार काढले, इतकेच नव्हे तर पुढे ता. ३ ऑक्टोबर १८९५ रोजी साताऱ्यास लोकमान्यांचे " राष्ट्रीय सभेची तयारी " म्हणून व्याख्यान झाले त्यावेळी त्यांनीही राष्ट्रीय सभानिष्ठ सातारा जिल्ह्याबद्दल धन्योद्गार काढले.

याचे अपेक्षित पर्यवसान बुधवार ता. १८ डिसेंबर १८९५ रोजी पहावयास मिळाले. त्या दिवशी वाई, कऱ्हाड, वाळवे, जावली, कोरेगाव वगैरे ठिकाणाहून सातारा येथे वाड्यापुढील पटांगणात म्हैसाळकर सर्कसच्या भव्य तंबूत पुण्यास म्हणजे महाराष्ट्राच्या हृदयस्थानात भरणाऱ्या काँग्रेसला जिल्ह्यातर्फे पैसा व प्रतिनिधी पुरविण्याचे उद्देशाने कृष्णराव महाजनी यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. त्या सभेत दत्तो कृष्ण जोशी यांनी स्वागतपर भाषण केल्यावर गणपतराव फणसळकर वकिलानी असा ठराव मांडला की साताऱ्यास जिल्ह्याची स्टँडिंग कमेटी ठेवून तिच्या तालुकानिहाय शाखा ठेवाव्यात. सदर ठरावानंतर करंदीकर, घाणेकर, सहस्रबुद्धे, दिवेकर वकील, निजामुद्दीन बोहरी, रे. कासमभाई यांची राष्ट्रीय महत्त्वावर भाषणे झाली. नंतर न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकरानी पुण्याच्या राष्ट्रीय सभेस निवडलेल्या सव्वाशे प्रतिनिधींची नांवे वाचून दाखविली.

अशाप्रकारे सर्व बाजूंनी उत्तेजक वातावरण असल्यामुळे यावेळी नवीन मंडळी पुढे आली त्यात गणपतरावजी फणसळकरांबरोबर ना. कृ. आगाशे, घाणेकर, पांडुआण्णा शिराळकर, सुपनेकर वकील वगैरे मंडळी आढळतात.

म्हैसाळकरांच्या सर्कस तंबूमध्ये झालेली सभा ही पुढे झालेल्या जिल्हा सभांचा जसा श्रीगणेशायनमः होता, तसाच नव्या दमाची मंडळी काँग्रेसच्या कार्याला येऊन मिळण्याचा तो काळ होता. म्हणूनच सुपने-रेठरे भागातून पांडुआण्णा शिराळकर काँग्रेस फंड जमा करून आल्यावर कऱ्हाडास भाऊसाहेब भागवतांनी जसे धन्योद्गार काढले तसे इतर ठिकाणच्याही दूरदृष्टी पुढाऱ्यांनी खात्रीने काढले असतील.

१० : स्वावलंबनाची वळणे

हिंदुस्थानवरील परकीय अंमल हा सर्व बाजूनी शोषण करीत आहे, इतका की स्वाभिमानी माणसाला स्वावलंबनाने हे शोषण थांबविण्याचा प्रयत्न केल्या-शिवाय गप्पच राहवू नये, याची जाणीव जिल्ह्यात हळूहळू होत होती. तोच लोकमान्यांनी १८९३-९५ साली गणपती-उत्सव, शिवाजी-उत्सव सुरू करून त्या जाणिवेस तोंड फोडले. सातारा, कराड, वाई येथे गणपतीचे मेळे व उत्सव जोरात झाले. पोलिसांची विशेष कटकट काय ती कऱ्हाडास झाल्याचे २४ सप्टेंबरचा 'चित्रगुप्त' म्हणतो. पण स्वावलंबनाची शिडी उभारली पाहिजे ही घोषणा इसलामपुरास ता. २९ नोव्हेम्बर रोजी जिल्ह्याने केली.

त्या दिवशी "गणपतराव फणसळकर वकिलांचे अध्यक्षतेखाली वाळवे तालुक्याची छोटी काँग्रेस भरली होती. तीत गोरक्षण, जमिनीवर वाढलेला सारा, इन्कमटॅक्स, दुष्काळ स्थिति, जंगलखाते, वारणाव्हॅली रस्ता, ताकारी रस्ता सुरुंगीदारू परवान्याचा हक्क, राष्टीय सभेपासून फायदे, वगैरे विषयावर पांडुरंग कृष्ण पंढरपुरे (कऱ्हाड), कुबेर, सदाशिवराव गोवंडे, नारायण रामचंद्र घमंडे (पुणे), रावसाहेब लिमये, रामचंद्र नारायण कशाळकर, बाळाजी दामोदर हसबनीस, गोविंद लक्ष्मण देसाई यांनी जी भाषणे केली ती सर्व स्वावलंबना-चाच पाठ देणारी आहेत. तथापि त्या हजार बाराशे समुदायाला देसाई आणि कुबेर यांनी काँग्रेसचे काम वर्षभर चालविण्यासाठी "कायम फंडाची व्यवस्था" केली पाहिजे ही जाणीव जी करून दिली तीच विशेष महत्त्वाची होय"

तथापि १८९७ पासून स्वावलंबनाचे पाऊलच पडले. तासगावचे रामचंद्र

विनायक कुलकर्णी यांनी " सार्वजनिक काम करावयाचे नाही अशी वरिष्ठांची तंबी " मिळाल्यामुळे कुलकर्णीपणच सोडले. या सालची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरवायचे ठरले होते आणि ती झाली असती तर स्वावलंबी चळवळीचा प्रश्न कदाचित त्या सालीच उचल खाता. पण प्लेग, दुष्काळानी सतावल्यामुळे ते शक्य झाले नाही. तरी जिल्हासभा ऊर्फ शूभसूचक (३ डि.) म्हणतो त्याप्रमाणे डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमेटीचे प्रचारक म्हणून नारायण रामचंद्र घमंडे हे काँग्रेसच्या प्रचारासाठी (सातारा तालुक्यात) हिंडू लागले. प्लेग, दुष्काळामुळे १९०० साली भरवावी लागलेली प्रांतिक परिषद संपताच दुसरे दिवशी म्हणजे सोमवार ता. १४ मे रोजी विष्णु गोविंद विजापूरकर यांचे " राष्टीय शिक्षण " या विषयावर व्याख्यान सकाळी झाले, तर दुपारी काळकर्ते परांजपे यांचे आगटयांच्या राम मंदिरात पुराण व सायंकाळी शिवाजी क्लबात " धर्म " या विषयावर व्याख्यान झाले. तीनही प्रवचनांचा निष्कर्ष म्हणजे स्वावलंबनाशिवाय मोक्ष नाही, मग तो ऐहिक असो की पारमार्थिक असो; आणि ऐहिक मोक्षाशिवाय म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय पारमार्थिक मोक्ष फोल होय, असाच होता.

पण आता आकाशात निराळेच ढग जमू लागले. "कऱ्हाड तालुक्यातील शेतसारा गैरशिस्त वसूल झाला व त्याचा दोष सरकारने तांबे कारकूनाच्या माथी मारला, " अशी बातमी ऑगस्टमध्ये पुण्याच्या " मराठा " वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाली. त्या सुमारासच दत्तोपंत सुपनेकर, वकील प्रभृतीनी त्याचा छडा लावावयास सुरवात केली होती. तों तसल्याच रोगाचे एक गळू १९०१ सालच्या जुलईच्या आरंभी वाळवे तालुक्याच्या अंगावर फुटले. ता. १२ जुलईला शुभसूचकच लिहितो की, " वाळवे तालुक्यात जमिनीच्या साऱ्याची बाकी बरीच थकली आहे, पण अलिकडे त्या बाकीचा निकाल झपटयाने होऊ लागला आहे. सारा लवकर भरला नाही तर जमीन खालसा होईल अशी दवंडीही पिटविण्यात आली आहे. " त्यावर 'प्रतोद' टीका करतो की " नवीन दुरस्तीचा हा पूर्वरंग नव्हे काय ? "

हा पूर्वरंग ज्या संकटाचा होता ते संकट म्हणजे मुंबई सरकारचे लँड रेव्हिन्यू बिल होय. लार्ड कर्झन यांनी हिंदी माणसाची सरासरीने वार्षिक प्राप्ती वीस रुपयांची असल्याचे बोलून दाखविले असताही लँड रेव्हिन्यू बिलाचा तडाखा शेतकऱ्याच्या डोक्याची सालडी सोलून काढण्याइतका कठोर आहे म्हणून अभ्यासू समाज सेवकांनी सरकारकडे मेमोरँडमे धाडली. दत्तोपंत सुपनेकरानी कराड तालुक्यातील सर्व गावांच्या शेतऱ्यांची सभा भरवून सरकारकडे शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या सह्यांनी मेमोरँडम धाडले. ता. २१ जानेवारी १९०१ रोजी फॅमिन कमिशनपुढे बाळाजी दामोदर हसबनीस

यांची साक्ष झाली. तीत भीती दाखविल्याप्रमाणे १९०१ चा जून व जुलई महिना तर सबंध जिल्हाभर लँड रेव्हिन्यू बिलाचा शंख सारखा वाजत होता. सांगाव (वाळवे), दुधगांव, लिंब येथून तीसतीस पन्नासपन्नास सह्यांचे अर्ज सभा भरून नंतर रवाना झाले. शिराळ्याला भवानराव देशमुख व सातान्याला वासुदेवराव थत्ते यांनी कायदे कलमांचा कीस काढून लोकांतर्फे टाहो फोडला, पण सरकारच्या कानठळ्या बसल्या असल्याकारणाने कशाचा काही उपयोग झाला नाही. गुजराथेतील साऱ्याबद्दल ना. परेख यांची कामगिरी अभिनंदनीय झाली होती, तिचे अभिनंदनही ता. १० फेब्रुवारी १९०१ रोजी रा. ब. पाठकांचे अध्यक्षतेखाली सातारकरांनी केले होते आणि म्हणूनच मोठ्या आशेने ते यावेळी चळवळ करीत होते; पण १८९९ साली डिसेंबरच्या १२ तारखेपासून "म्युनिसिपल बिलाने फेरफार किती पिछेहाटीचे केले आहेत" हे विशद करण्यास वामनराव घाणेकर वकिलानी सुरवात केल्यापासून सव्वा वर्ष चळवळ होऊन जन्मबहिऱ्या पुढील सारंगीवादनाचा जसा प्रकार झाला, अगदी थेट तोच नमुना, "मेथा गोखले प्रभृती लोक बाजू मांडणाऱ्या सभासदांच्या" सडेतोड विचारसरणीसही न जुमानता रेव्हिन्यू बिल पास करण्याची घाई उडवून मुंबई सरकारने केला. तेव्हा अर्थातच गुरुवार ता. ५ सप्टेंबर रोजी वाई कऱ्हाड वगैरे तालुक्यातून लोकांचे मुखत्यार जमून घाटे यांचे थिएरात डॉ. वासुदेवराव थत्ते यांचे अध्यक्षतेखाली सरकाच्या कृत्याबद्दल नापसंती दर्शविण्यात आली.

याच सुमारास तासगाव तालुक्यात "उस्सेबी जादा" प्रकार चालू होता. १९०१ चे म्हणजे प्लेगचे कहराचे दिवस होते ते. माणसे बाहेर काढून घरे रिकामी करण्याचा आणि लोकांच्या वनवासाबद्दल डोळेझाक करण्याचा सुकाळ नोकरशाहीने चालविला होता. तासगावला त्यावेळी बळवंत गोविंद केळकर मामलेदार होते. अधिकाऱ्याच्या तोऱ्यात माणुसकीचा मागमूस सापडेना तेथे. तेव्हा रामभाऊ कुलकर्ण्यांनी मुंबईच्या गव्हर्नरापर्यंत सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पंधरा तारा ठोकल्या. शेवटी लॉर्ड कर्झन यांनाही दोन तारा दिल्या. तेव्हा १९०२ च्या जून १६ तारखेपर्यंत हे सर्व सोपस्कार होऊन सदर मामलेदारांनी रामभाऊ कुलकर्ण्यांची लेखी माफी मागितली.

एवढ्यावरून शहाणपणा शिकला, तर ती नोकरशाही कसली? १९०३ साली असलाच एक प्रकार झाला असता पण भाऊसाहेब भागवतांच्या चतुराईने "आग तर झाली पण बोंब मारायची सोय नाही." अशी नोकरशाहीची स्थिति झाल्याचे 'विदूषक' वर्णन करतो. त्याप्रसंगाचे वर्णन २३ मार्चचा 'प्रतोद' देतो ते असे "प्लेगच्या वेळी घरे सोडून गेले नाहीत या आरोपावरून कऱ्हाडच्या आठ इसमावर 'नमुन्या' दाखल फिर्यादी देण्याबद्दल मि. चक्रवर्ती

असिस्टंट कलेक्टर यांनी फर्माविले होते. परंतु सदर साहेब व मामलेदार यांखेरीज करून सर्व सभासदांनी 'खर्च मुनिसिपालिटीने द्यावा' असा ठराव केला."

अशा प्रकारे सहानुभूतिशून्य नोकरशाही आणि संकटग्रस्त जनता यांचा कलह चालला असता मिठावरील कर दरमणी आठ आण्याने कमी केल्याने आणि इन्कमटॅक्स हजाराचे आत उत्पन्न असणारांना कमी केल्यामुळे, थोडासा जीव आल्यासारखे प्रजेला वाटले. त्यात ता. ३ मार्च १९०३ रोजी सातारा युनियन क्लबचे मानपत्र घेताना प्रो. रमेशचंद्र दत्त यांनी खालील-प्रमाणे पाणी शिंपले. त्यायोगे प्रजेला थोडी टवटवी आल्याशिवाय राहिली नाही. ते म्हणाले "आमचे राष्ट्र चार हजार वर्षांचे आहे. आपली पूर्वी वाङ्मयात, कलात, शास्त्रात प्रगती झालेली होती. आपले राष्ट्र आजही मृत नाही. त्यास धुगधुगी आहे, व त्याचा जोम जशाचा तसा आहे. जसा आपण पाश्चिमात्य शिक्षणाचा व सुधारणेचा फायदा घेऊ तसे आशेस भरते येत आहे."

१९०५-६ साली, पुणे, सातारा, सोलापूर, नगर जिल्ह्यांना शेतकी ॲक्ट लागू केला. हिंदुस्थानातील पहिली लॅंड सर्व्हे १८६५-६६ साली होती तीच कडक झाली होती. १८९५-९६ साली तीस वर्षापूर्वीच्या शेतसाऱ्यात पुन्हा ७५ टक्के वाढ झाली होती. त्यामुळे शेतकी ॲक्ट लागू होताच ते एक अडच-णीचेच कलम वाटले होते. (ऐक्य ता. १३-६-३६)

स्वावलंबनाच्या कल्पवृक्षाशिवाय दुसरा इलाज नाही अशी दिवसे दिवस खात्री पटविणाऱ्या घडामोडी होत असता "कष्टेविण फळ नाही." या समर्थ शिक-वणीचा सातारा जिल्हा स्वस्थ कसा बसणार ? गुरुवार ता. ८ सप्टेंबर १८९२ रोजीच "देशी कापड वापरण्याचा निश्चय करावा व देशी कापडाचे एक दुकान वाईस स्थापन करावे म्हणून कोल्हापूरचे गणपतराव भुसारी यांनी नानासाहेब गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली सभा भरवली होती. बळवंतराव कोल्हटकरांनी परिणामकारक भाषण केल्यावर ५।५ रुपयांचे ६०० शेअर्स काढावयाचे ठरवून तात्यासाहेब गाडगीळ खजिनदार नेमले. ५४ शेअर्स ताब-डतोब खपले. तथापि पुढे त्याला यावे तसे बाळसे न आल्याकारणाने फिरून जिल्हाभर प्रयत्न करण्याची कल्पना दादासाहेब करंदीकरांस आली. १९०४ चे मे महिन्यात पैसा फंड काळयांचा "राष्ट्रीय फंडासंबंधीचा" दौरा जिल्ह्यात झाला. त्याने करंदीकरांच्या कल्पनेचे मूळ खोल रुजले. तत्राप त्या दौऱ्यापूर्वीचे दादासाहेबांनी स्वावलंबनाच्या शाखेपैकी स्वदेशीचे बी पेरावयास सुरवात केली होती. ता. २४ एप्रिल १९०४ रोजी शिवाजी क्लबच्या शिवाजी उत्स-वात रा. ब. पाठकांच्या हस्ते एक प्रदर्शन उघडवून करंदीकरांनी जाहीर केले की "२० रुपये 'कळक अगर बांबूचा उपयोग' या विषयावर उत्तम निबंध लिहिणारास ८० रुपये 'अती उपयोगी पण स्वस्त' अशा निरनिराळ्या

वस्तू पाठविणारास आणि १०० रुपये केळीच्या सोपटाचे कापड तयार करणारास आणि गुळापासून साखर तयार करण्याच्या जुन्या पद्धतीस अनुसरून एखादी सोपी कृती शोधून काढणारास बक्षीस देऊ केले आहेत." शंभर रुपयांचे बक्षीस देऊ करूनही साखरेबाबत काही झाले नाही, तरी फिरून दादासाहेबांनी १९०५ साली तीनशे रुपये देऊ केले. "भरीला "वंगभंगरद्दीच्या" चळवळीतून उत्पन्न झालेल्या सर्वच सूक्तासूक्त मार्गाची छाया यावेळी देशावर पडली असल्याकारणाने त्या छायेतूनही सातारा जिल्हा सुटून राहिला नाही. गणपत्युत्सवांत स्वदेशीवर व्याख्याने बहरली. त्यात ता. ११ सप्टेंबरचे गणपतराव फणसळकरांचे व्याख्यान हृद्य आहे ('सत्यविजय') समाजातील मुलास त्यावेळी निर्भेळ स्वदेशी टोप्या देण्यात आल्या. त्याच्या आदलेच दिवशी तासगावी माधव रघुनाथ कुलकर्णी हे स्वदेशीचे प्रचारासाठी सभा स्थापून श्रीसिवास लक्ष्मण चिपाडे यांचे अध्यक्षतेखाली "बंगललासहानभूति" म्हणून ठराव करून बसले होते. गुरुवार २६ आक्टोबर रोजी विद्यार्थ्यांनी स्वदेशी व्रत कसे आचरावे हे सांगण्यासाठी कऱ्हाडास हाटकेश्वर मंदिरात कृष्णाजीपंत बहुलेकर वकिलांचे अध्यक्षतेखाली वासुदेव गुण्डो उर्फ आण्णासाहेब धोपाटचांनी व्याख्यान दिले. पण वंग तरुणाशी सहानुभूती प्रगट करण्याच्या बाबतीत जो हातचा राखून कारभार चालला होता, त्याचा खुंटन् खुंट कळंबे मास्तरांनी साफ काढून टाकला. तरीपण बाळकृष्णभाऊ जोशी, कळंबे मास्तर वगैरे 'ट्रेंड' तरुणांच्या उग्र तेजाचे कौतुक बहुलेकर वकिलांना वाटले आणि म्हणूनच पुढे त्यांनी पांडुआण्णा शिराळकराची स्वदेशी कारखान्याची कल्पना व्यवहारास लावली.

सदर म्हणजे ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यातच वाई, खटाव, सोनी वगैरे ठिकाणी स्वदेशीसंबंधी सभा झाल्या, इतकेच नव्हेतर त्या महिन्यांचे पहिले तारखेस कोरेगाव येथे कुस्त्यांचा फड असल्याकारणाने त्यावेळी स्वदेशीवर व्याख्यान देणेसाठी दादासाहेब करंदीकरांना लोकांनी पत्र (ता. २९-९) घालून नेले होते. साताऱ्यास त्यापूर्वी १७ सप्टेंबरला वामन गणेश घाणेकर, रामचंद्र गोपाळ राजोपाध्ये, वामन अनंत भिडे, परशुराम गंगाराम मारवाडी, विष्णु गणेश डिंगणकर, विष्णु लक्ष्मण रांगोळे यांनी व्यापाऱ्यांनी देशी कापडच आणावे म्हणून सभा भरविली आणि भगवानदास नरोत्तमदास गुजर यांनी मंडळीना पत्राने लेखी संमती दिली.

मँचेस्टर लँकेशायर येथून येणारे कापडावरील बहिष्कारानेच जिल्ह्यांतील स्वावलंबनवृत्तीचे समाधान त्यावेळी झालेले दिसत नाही. कऱ्हाड येथील बाबूराव अंगारपूरकर प्रभृती मंडळीनी काही माग आणविण्याची खटपट केली होती. तासगावास श्री. एकसंबेकर हे माहितगार गृहस्थ

भांडवल मिळेल तसे सावण मेणबत्त्या आगपेट्याचा कारखाना काढू पहात होते. पण १८९९ पासूनच विटयास मोरेश्वर विष्णु जोगळेकरांनी शाईचा कारखाना यशस्वी केला होता, आणि साताऱ्यास डॉक्टर सदाशिव रामचंद्र गोखले यांचा साबणाचा कारखाना चालल्यामुळे ते ता. ७ नोव्हेंबर १९०५ च्या सुमारास मेंथाल तयार करीत होते.

" इंग्रजांनी शिकवलेले इतिहासावरून अनुमानिलेले हे स्वदेशीच्या योगाने बहिष्काराचे मार्ग " कितीही आता हितकारक असले तरी, अंतरीची जाणीव बरीक ही की, जिल्ह्याचा शेतकरी म्हणजे जिल्ह्याचा प्राण, तो स्वावलंबी व सुखी झाला पाहिजे म्हणून दादासाहेब करंदीकरांनी गणपतरावजी फणसळकरांच्या सहकार्याने तालुका निहाय शेतकरी सभा १९०४ च्या मे २४ पर्यंत स्थापल्या, त्यात कऱ्हाडाची शेवटची होय. त्यावेळी "शेतकीची सुधारणा करण्याबावतच नव्हे तर शेतकऱ्याला स्वावलंबी करण्याच्या कामी या सभेच्याद्वारा मी सेवा करीन " असे भाऊसाहेब भागवतासारख्या वृद्ध गृहस्थाने सांगताच चळवळीला मूठभर मांस चढले. कारण १९०४ साली राष्ट्रीय सभा मुंबईस व्हावयाची असल्यामुळे " ती बरोबर शेतकी व औद्योगिक प्रदर्शनेही व्हावयाची होती. त्या प्रीत्यर्थ ना. हृ. शि. दिक्षीत आल्यावेळी जिल्ह्यात वर्गणी जमवून दिली होतीच. पण शिवाय डिस्ट्रिक्ट असोशिएशनची स्थापनाही झाली होती."

अशा प्रकारे सातारा जिल्हा स्वावलंबनाच्या निरनिराळ्या पुस्त्या व वळणे काढीत असताच " औद्योगिक परिषदेच्या स्थापनेने मकरसंक्रमण साजरे करण्याबद्दलचे विचार " वातावरण भरून आणि भारून टाकू लागले.

११ : शेतकरी सभा व स्वदेशी

ब्रिटनशाहीने ऐन दुष्काळात केलेले दरबार आणि अकारण लढायांचे खर्च यांच्यामुळे शेतकरी बंड करावयास केव्हा उठेल याचा नियम नाही, असे काँग्रेसच्या जन्माआगोदर ह्यूमसाहेब उद्‌गार काढीत असत असे ह्यूमचे चरित्रकार वेडर्नबर्न यांनी नमूद केले आहे. घरोघर शेतकरी जे बोलतो तेच आपण बोलून दाखवितो, असा ह्यूम साहेबांचा आपल्या आक्षेपकांना आहेर असे. 'राजकारणा'च्या अंती 'रण' आहे आणि ती 'रण' वृत्तीच शेतकऱ्यातून म्हणजे बहुजन समाजातून मारून टाकण्याचे काम राष्ट्रीय सभेने आणि तिच्या निमित्ताने ह्यूमसाहेबांनी केले अशी एक आत्यांतिक टीकाही प्रसिद्ध आहे. तिच्यावर भाष्य करण्याचे हे स्थळ नव्हे. तथापि शेतकऱ्यांची संघटना करून, त्यांच्या हितसंबंधाबद्दल व प्रगतीबद्दल दक्षता बाळगून कालानुरूप आपला जीवन संग्राम त्यांना यशस्वीपणाने करता आला पाहिजे, हे ह्यूमचे उद्‌गार आणि त्यांचे टीकाकारांचे मन या दोहोसही सारखेच प्रमाणभूत असलेले सत्य होय. हिंदुस्थानचा स्वातंत्र्य संकोच म्हणजे सामाजिक, औद्योगिक, आर्थिक सर्व तऱ्हेचे शोषण होय हे ठरल्यानंतर, ते शोषण थांबविण्यासाठी स्वायत्ततेशिवाय उपाय नाही, हे वंगभंगानंतरच्या अश्रुतपूर्व आंदोलनाबरोबर १९०५ च्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष ना. गोखले यांनीच जाहीर केले होते. पण १९०६ साली कलकत्त्यास स्वायत्ततेचा स्पष्ट अर्थ स्वराज्य आणि त्यांच्या संपादनाचे मार्ग म्हणून स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण असे राष्ट्रीय सभेने ठरविले. स्वावलंबनधर्माची ही राजकीय वेदांगेच त्या साली मानली जात. यात शेतकरी व त्याच्या श्रमावर जगणारा समाज तयार पाहिजेत हे जाणूनच तरुण राष्ट्रीय पक्ष देशात हातपाय हलवीत होता. १९०४ पासून दादासाहेब करंदीकरांनी जे शेतकरी संघ स्थापन केले, ती त्यातीलच एक चाल होती.

जावली तालुक्याने शेतकी सभेचे कार्य अभिनंदनीय उत्साहाने केलेले आढळते. १९०६ च्या ११ नोव्हेंबरला जावलीची शेतकी सभा ८०० शेतकऱ्यांची झाली. नारायण गंगाधर देशपांडे हे जावली तालुक्याच्या शेतकी सभेचे स्वयंसेवक असल्या कारणाने, १९०७ च्या ऑक्टोबर १३ ला म्हसवे येथे दत्तात्रय काशिनाथ महाबळेश्वरकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि १९०८ च्या ५ एप्रिलास कसबे-कुडाळ येथे दादासाहेब करंदीकरांच्या अध्यक्षतेखाली जी

जावलीच्या शेतकऱ्यांची अधिवेशने अपूर्व उत्साहाने झाली त्यांचे सर्व श्रेय देशपांडे यांनी जागृती केली होती तिलाच आहे. या जागरूकतेच्या संग्रही गाववार कसे टिपण साधलेले असे, हे येथे दाखविण्यासारखे आहे. १९०७ ला अहमदाबादेस शेतकी प्रदर्शन झाले. त्या निमित्त जिल्हा सभेने आपले पहिले वहिले कार्य म्हणून जिल्हयातून माहिती मागविण्याकरता दादासाहेब करंदीकर व गणपतराव फणसळकर यांच्या सहयांनी एक ३६ प्रश्नांची यादी पाठविली होती. तासगाव व जावली तालुक्यातूनच गाववार व डोळस माहिती आली. "माहिती कामगार-पाटील-कुलकर्णी यांचे हातून लिहून घेऊ नये" असा जिल्हा सभेचा दंडक होता. तेव्हा तासगावात रामचंद्र विनायक कुलकर्णी व जावलीत नरहरपंत जोशी खर्शीकर यांनी माहिती मिळवली. हा एक नमुना पहा —

"कसबे कुडाळ"

"पर्जन्य बरा पडून खरीब ८ आणे व रब्बी ८ आणे पीक झाले. पिकांचा पुरवठा कमी आहे. शेतीसाठी जनावरे अगदी कमी असल्यामुळे शेतात मेहनत व पेरणी वेळेवर होत नाही. घात संपल्यावरही वारंगुळचाचे सहाय्याने पेरणी होते. यामुळे पीक चांगले होत नाही. गाव खालसा असून शेतसारा एकंदर ७५६७ रु; पैकी इनामदाराकडे ३२६४; बाकी निव्वळ सरकार जमा रु ४३०३. पैकी इनामजुडी १६६४ व जमीन बाब २६३९ रु. क्षेत्र एकर २६९७ पैकी बागायत २३० (फॉरेस्ट १५६, पड ४४३) किरकोळ पड खेरीज करून लागवड होणारी जमीन २०५० एकर, लोकसंख्या १९००, घरे ३०७, बैल २४८ व एकंदर जनावरे ७१८. अबकारीपैकी अफू गांजाचा मक्ता ३१५ रुपये, दारूचा मक्ता ३००. गेल्यासाली दारूचा मक्ता ५०० रु. चा होता. यासाली मक्ता घेणार कोणी नव्हते म्हणून कमी झाला. सालात दारूचा खप २००० रु. होतो. तगाई रु. २५००, बाळा रामा तांबोळी यास २० रु. इन्कमटॅक्स द्यावा लागतो. कर भरण्यास लायक नाही. कर सुटण्याबद्दल अपीले केली परंतु दाद नाही. लोकल फंड रु. ४७३. गावात शाळा असून मुले १०२ व मुली ३ शिकत आहेत. प्राथमिक शिक्षण मोफत व नीतीचे धर्माचे शिक्षण पाहिजे. (हेच राष्ट्रीय शिक्षण) पैसाफंडाबद्दल दामोदर लक्ष्मण जोशी व्यवस्था पाहतात. धोंडी बुरकाचा मुलगा वय ६-७ चा अनाथ आहे. जत्रे वेळी कुस्त्या होतात. बक्षीसे, व्याख्याने देण्यासारखे आहे. श्रीरामाची शिल्लक १००० रुपये पंचामार्फत आहेत. रु. ४०० पिंपळेश्वर देवाचे बिनव्याजी लोकास दिले आहेत. दस्त ऐवज खरेदी गहाणाचे पुष्कळ होतात. तगाईबद्दल १ पोट कुळाची जमीन खालसा झाली असोन नव्या शर्तीने दुसऱ्या कुळास

लागण. मोकळे असलेले फॉरेस्ट १० वर्षापूर्वी कापीव रानात सामील केल्यामुळे चारणीस मोफत रान नाही. फॉरेस्टात १ नंबर पास फीचा आहे. परंतु त्यात गवत बिलकूल नसते. यामुळे जनावरास चारण्याची सोय बिलकूल नसल्यामुळे जनावरांची संख्या दिवसेदिवस कमी होत आहे. हत्याराभावामुळे डुकरे व कोल्ही, ऊस, शाळू, भुईमूग वगैरे पिकांचे नुकसान दरसाल ५०० रुपयापर्यंत करतात. शेकडा ५ ते ७ एकरास भरपूर खत घालण्यास पुरते. गावात भुईमूग पुष्कळ पिकतो. परंतु शेंगदाणा होऊन बाहेर विकावयास जातो. यामुळे तेलाचा पुरवठा होत नाही, रॉकेल जाळावे लागते. जनावरास पेंड परठिकाणाहून आणावी लागते. काड्याच्या पेट्या जपान, स्वीडनच्या पैशास २ मिळतात. मुंबईच्याहि येतात. कोष्टी लोक पैशाचे कमतरतेमुळे धंदा सोडून शेतकरी होत आहेत. व्यापारी वर्गहि शेतकीत सुख मानीत आहे. जनावरांची हाडे व कातडी महारलोक परक्या ठिकाणी पाठवितात. दर बुधवारी बाजार भरतो. धने ३०००, भुईमूग ५०००, बडी ३००, हळद २५००, गूळ १००० रु. चा बाहेर जातो. मराठे कुणबी – सोनार वगैरे दारूबाज आहेत. जत्रा चैत्र शु॥ १५ व कृष्ण पंचमीस. दसरा मोठा उत्सव. आषाढ वद्य एकादशीस पिंपळेश्वर उत्सव. रामनवमीचा, गणेशचतुर्थीचा व दशहारात श्री कृष्णोत्सव होतो. कुस्त्या करणारे लोक आहेत. दिवाणी, फौजदारी, मुलकी दावे फार चालतात. लोकांस भिकारी व्हावे लागते. राजाराम लक्ष्मण शिवदे, आबासाहेब देशमुख, वागरे, कृष्णाजी सदाशिव, विष्णु अनंत देशपांडे, अण्णाजी रावजी देशमुख, लक्ष्मण विठू मोरे, आप्पा कोष्टी, जोगू खंडू ननावरे, मोरू तेली, रघुनाथ लक्ष्मण पाटील वगैरे मंडळी अगदी सचोटीने वागणारी आहेत."

हे टिपण स्वतःच इतके बोलके आहे की, त्याला कारण असलेले प्रश्न अगर कालानुरूप अधिक घालण्याची भर यांचा उल्लेखही न करता ते पुष्कळास पुष्कळ तऱ्हेने अजूनही उद्‌बोधक होईल. पण एवढ्या माहितीवरून गावोगाव कामे करून शेतकऱ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या उत्पादनाचे प्रदर्शन हा एक सार्वजनिक शिक्षणाचा मार्ग आहे. त्याचा अवलंबही १९०६ त केलेला आढळतो. गोकुळअष्टमीस कऱ्हाडास असे संस्मरणीय प्रदर्शन झाले. सोमवारातील जुन्या मामलेदार कचेरीत ते भरले. दहा दिवस चालू होते. शेतकरी सभेमध्ये पतपेढी, गोरक्षण, दारूबंदीसंबंधी जशी व्याख्याने व्हावयाची तशीच व्याख्याने निरनिराळ्या दिवशी प्रदर्शनात झाली. त्यातील मुख्य दोन ता. ११ ऑगस्ट रोजी शेतकी खात्याचे दांडेकर, शिंदे यांनी 'कापूस व त्याची लागवड' यावर दिले ते, आणि ता. १२ रोजी भाऊसाहेब भागवतांचे अध्यक्षतेखाली दादासाहेब करंदीकरांनी " प्रदर्शनातील बहुविध शेत जिन्नसाप्रमाणेच शेतकऱ्यांना उपयुक्त असलेल्या बहुविध विषयांची समज देणारे " दुसरे. या

व्याख्यानात " शेतकरी सुखी तर बहुजन सुखी आणि बहुजन समाजसुखी तरच सुशिक्षितांच्या शहाणपणाचा उपयोग " ('सुमंत') असे सांगितले, तेच सप्रमाण व साधार विवेचन व त्याप्रीत्यर्थ सरकारने जरूरीने केलेच पाहिजे ते कर्तव्य. आपल्या शेतकी कमिशन पुढील साक्षीत सातारा जिल्हासभेतर्फे व व्यापारीसंघातर्फे गणपतराव फणसळकर यांनी १९१२ साली सांगितले. शेतकी-कमिशनचे काम साताऱ्यास सहा दिवस चालले. त्यात सरदार फडणीस, रुद्राजीराव महाडीक, भाऊ पाटील (कासेगांव), तात्या पाटील, गणेश अंताजी जोशी वगैरेंच्या साक्षी झाल्या; पण त्यात जिल्हासभेच्या धोरणास सोडून असे काही नव्हतेच.

" मोर्लेसाहेब सुशिक्षितास ' आमचे शत्रू ' म्हणत आहेत; यामुळे तरी इतःपर लोकनायक लोकसमुदायापासून फटकून वागणार नाहीत, व जिल्हासभा चिरस्थायी होतील, अशी आशा आहे. " असे उद्गार १९०७ सालच्या ता. ३० जून रोजी पहिल्या सातारा जिल्हा सभेच्या अध्यक्षपदावरून दादासाहेब करंदीकरांनी काढले आणि राष्ट्रीयसभेच्या हेतूचा प्रसार करणे, राष्ट्रीय सभेला लागणारी माहिती गोळा करणे, जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी झटणे, या उद्देशाने जिल्हा सभा झाली. त्या जिल्हासभेत ज्यानी ज्यानी काम केले त्यानी त्यानी शेतकऱ्यांचे हितसंबंध क्षणमात्र नजरेआड न केल्यामुळे १९०८ च्या उग्र दडपशाही नंतर जिल्हासभेतच कळकळीच्या देशभक्तांच्या शक्ति एकवटू लागल्या. आणि जिल्हासभा हीच दिवसेदिवस शेतकऱ्यासुद्धा सर्वांची प्रातिनिधिक होऊ लागली.

जिल्हासभेचे स्वस्तिक चिन्ह घालतानाच नानासाहेब आगाशे बोलले होते की," स्वदेशी व बहिष्कार यांचे बद्दलची जागृती बहुजन समाजात इतकी झाली पाहिजे की, शिंपी व परीट यांनीसुद्धा परदेशी कापड व कपडा यास स्पर्शही करण्याचे नाकारले पाहिजे. " जिल्ह्यामध्ये एवढी तयारी करावयाची तर स्वदेशीची व्याप्ति व परदेशीचा संकोच कसा व कितपत करावयाची त्याची आखणी करून समाजाच्या मनोवृत्तीतच तसा पालट घडवून आणला पाहिजे म्हणून पूर्वी पासूनच जी तयारी होत होती तिला १९०६ साली भरती आली. मकरसंक्रातीलाच साताऱ्यास " औद्योगिक परिषद " स्थापन झाली. व तिचे लोक जागृतीचे कार्य म्हणून स्वदेशीच्या प्रचाराकरिता लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे आणि तात्यासाहेब केळकर यांना फेब्रुवारीतच निमंत्रिले, ता. ११ फेब्रुवारी रोजी वाईस केळकरांचे व कऱ्हाडास लोकमान्यांच्या अध्यक्षतेखाली परांजपे यांचे ' स्वदेशीवर ' व्याख्यान झाले. खिशाला चाट बसली तरी स्वदेशीच माल प्रत्येक व्यक्तीने खरेदीला पाहिजे कारण त्यात फारतर एकाच व्यक्तीचे पैसे दुसऱ्या व्यक्तीकडे जातात. पण देशातल्या देशात सर्व पैसे राहतात. स्वदेशी मधील ' स्व ' चा विस्तार भारत वर्षाच्या मर्यादापर्यंत असून, प्रत्यक्ष वा

अप्रत्यक्षरीतीने परदेशी पैसा जाणार नाही, गेलाच तर तो सवाई वाढ होऊन परत येण्याशी खात्री असेल तरच जावा असाच त्या व्याख्यानातील प्रतिपादनाचा रोख असून " असंतोषः श्रियोमूलम् " या न्यायाने परांजप्यानी आपल्या उपहासगर्भ भाषणात "ब्रिटिश साम्राज्याने हिमालयापासून कन्या-कुमारीपर्यंत पसरलेल्या सुखाच्या समुद्रात दुष्काळाच्या कामावर तुला सहासहा पैसे मजुरी दिली तरी हिंदुस्थानातील शेतकऱ्या तू मरतोसच !" अशी वाक्ये पेरून हिंदुस्थानची राजकीय कुचंबणा समाजाच्या मनावर बिंबवलीच. इतक्या तीव्रपणाने जिल्ह्यातील कार्यकर्ता त्यावेळी बोलत नसला तरी प्रत्येक जाणता वरील विचारांशी सहमत होता. म्हणूनच मे महिन्यात सदर्न मराठा रेल्वेच्या आसपास नागू दादा ओगले स्वदेशीवर व्याख्याने देत हिंडले. जूनमध्ये कऱ्हाड येथे मॅच फॅक्टरी (काडयाच्या पेटयांचा कारखाना) स्थापण्याचा विचार झाला, साताऱ्यास सप्टेंबर २७ ला डेक्कन ब्रास वर्क्स सुरू करण्यात आले. आणि दसऱ्याला वाईस स्वदेशी दुकान निघाले. १९०६ साली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे मे महिन्यात स्थापन झालेली स्वदेशी कंपनी होय. आण्णासाहेब चिरमुले यांच्या दक्षनेतृत्त्वाखाली ती अशी भरभराटली की पहिल्याच वर्षाला भागीदाराना शेकडा तीस नफा वाटता आला. याच कंपनीच्या यशाच्या पायावर वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनी १९१३ मध्ये सुरू करून ती व स्वदेशी कर्माशिअल बँक व युनायटेड वेस्टर्न बँक चिरमुल्यांनी जिल्ह्याची व महाराष्ट्राची भूषणे करून सोडली.

स्वदेशीची चळवळ जिल्ह्यात एवढयावरच थांबली नाही. जरी स्वदेशीची दुकाने ठिकठिकाणी निघाली तसा पैसाफंडाचा प्रचारही मोठया आस्थेने करण्यात आला. डॉ. विष्णुपंत भिडे प्रभृती मंडळीनी प्रसंग येईल तेथे तेथे म्हणजे जिल्हातालुका सभापासून तो एखाद्या ब्राह्मण भोजनापर्यंत पैसाफंड जमविलाच पण दसरा पाडव्याच्या दिवशी औद्योगिक उन्नतीची ही राष्ट्रीय भिक्षा-घरोघर नियमाने मागितली.

कलकत्याचे १९०६ चे राष्ट्रीय सभेचे नंतर १९१४ पर्यंत म्हणजे महायुद्धाच्या सुरवातीपर्यंत सातारा जिल्हयातील स्वदेशीच्या इतिहासात कऱ्हाड येथे निघालेली मॅच फॅक्टरी प्रामुख्याने नमूद केली पाहिजे. पांडुआण्णा शिराळकर प्रभृती मंडळीनी या फॅक्टरीत पाण्यासारखा पैसा ओतला, बहुलेकर प्रभृतींनी दादासाहेब करंदीकर व रावसाहेब काळे यांच्या सल्ल्याने सर्व फॅक्टरीची आखणी केली, आर्थर कलेक्टरसाहेबांच्या हस्ते ती सुरू करण्यात आली आणि अशा तऱ्हेने हा लोकमान्य राजमान्य स्वदेशी कारखाना सुरू होऊन १९०९ पासून असा भरभराटला की १९११ साली त्याला शेंगा फोडण्याच्या यंत्राची जोड देण्यात आली. १९१२ साली करवीर सरकारानीही सदर कारखान्याच्या मालास

मान्यता दिली. रेल्वेनेही सवलती दिल्या. पण पुढे फॉरेस्टातील लाकडाच्या सवलती नाहीत म्हणून, स्वदेशीच्या अभिमानाचा यंत्रज्ञ नाही म्हणून, तात्पर्य अनेक कारणांनी तो कारखाना उतरणीस असा लागला की, पांडुआण्णा शिराळकर प्रभृतींनी तो चालवावा म्हणून दीड तपाच्यावर अनेकांगानी खटपट करूनही तो तगला तर नाहीच, पण त्याने बहुलेकर वकिलास नऊ हजार व शिराळकरांना वीस हजारांच्या नुकसानीत आणले. मग बाकीच्या भागीदारांना त्यांच्या त्यांच्या प्रमाणात कशी तोशीस लागली असेल याची कल्पनाच केलेली बरी !! भांडवलाचा, बुद्धिमत्तेचा, आणि केसरीपासून सर्व महाराष्ट्राचा पाठिंबा असलेला हा प्रचंड उद्योग जेथे एक 'होम' होऊन बसला, तेथे इसलामपुरास १९०९ मध्ये निघालेला सिसिपेन्सिलीचा कारखाना अगर त्याची भावंडे तग धरू शकली नाहीत म्हणून कसा बोल लावता येईल ? सुरतेस १९०८ साली भरलेल्या तिसऱ्या औद्योगिक परिषदेत गणपतराव फणसळकर वकिलांनी 'पेपर' वाचल्याप्रमाणे सरकारी स्टोअरसाठी स्वदेशी मालाची खरेदी होती तर ? पण बोलण्यात राम काय ?

१२ : साताऱ्यातील क्रांतिसंघटना

लोकांच्या मनात असंतोष धगधगित होता. आठराशे सत्तावनच्या कथा आणि संग्राम-गीते लोकांच्या कानातव मनात घुमत असतानाच शस्त्रबंदी, मीठकर, उत्पन्नकर यांच्या प्रयोगाचे वेळी लोकांनी परकीय सत्तेला, तिच्या प्रजेबद्दलच्या सहानुभूती शून्यतेमुळे, युक्तिपेक्षा शक्तीने विरोध केला. दुष्काळाचे वेळी चार चार वर्षे पोटे मारावयास लागलेल्या प्रजेची दाद लागेना, म्हणून वासुदेव बळवंत फडक्यांनी १८७९ साली इंग्रजी राजवटीला गनिमीकाव्याने लढत देण्याचा प्रयत्न केला. वासुदेव बळवंतांनी आपल्या साथ्यांचे तीन गट केले होते. त्यात हरी रामोशीच्या देखरेखीखाली सातारा गट होता. या गटाने १८७९ चे फेब्रुवारीत पुणे जिल्हयातील बारामतीपर्यंत हात पाय पसरले. तेव्हा हरी रामोशीला सोलापूर येथे पकडून जेजुरी येथे इंग्रजांनी फाशी दिला. तासगाव तालुक्यातील विसापूर जवळील शिरगांव येथील काही रामोशी सातारा जिल्ह्यात आरोपित झाल्याचा दाखला, जुन्यापुराण्या (तासगावचे रा. वि. कुलकर्णी) दैनंदिनीतून सापडतो. वासुदेव बळवंतांच्या सातारा

जिल्ह्यातील सहाय्यक सहानुभूतिकात वावरहिऱ्याचे (दहिवडी जवळील) रावजी घुगुरदरे कुलकर्णींचे चिरंजीव गणुवुवा ! औरंगाबाद-वऱ्हाडपर्यंत वासुदेव बळवंतासाठी यश:साधना करताना त्यांना आढळून आले की परमेश्वरी अधिष्ठानाशिवाय सत्गती नाही. त्यामुळे ते पुढे रामदासी पंथ स्वीकारून गोंदवलेकर महाराज म्हणून सिद्ध पुरुष झाले. वासुदेव बळवंतांचा दुसरा सातारा जिल्ह्यातील साहाय्यक म्हणजे औंध-कऱ्हाड येथील नारायण जोगळेकर. वासुदेव बळवंताला एडनला पाठवून दिल्यावरही इंग्रज याच्या पाठीवर होते. औंध संस्थानाकडेही त्याच्यासाठी इंग्रजांचा तगादा होता. वासुदेव बळवंताच्या जमान्यात सामील होतांना याने आपले घर व मुलगी (वालुताई बर्वे, विटे) कऱ्हाडचे औंधकडील वकील पटवर्धन-पागे यांच्या स्वाधीन केली होती. त्या पटवर्धन-पाग्यांच्या घरात एक दिवस असतानाच नारायण जोगळेकराला पकडण्यासाठी दाराशी इंग्रजांचा संगीन-पहारा खडा असता नारायण जोगळेकर घोड्यावर स्वारी भरून, त्या पहाऱ्यावरून चौखुर उडून गेला तो कायमचाच ! " ध्येयं वा साधयेत् देहं वा पातयेत् ! " हे ज्यांना साधले नाही ते ईश्वराराधनेला तरी लागले किंवा नांवासकट नाहीसे झाले. त्या आठराशे सत्तावन्नपासून चालत आलेल्या जवान मर्दांपैकीच नारायण जोगळेकरही होता. " विश्वामित्र " या नांवाने ओळखला जाणारा वाईच्या गंगापुरीतील 'वेडा' वासुदेव बळवंताचा सातारा जिल्ह्यातील तिसरा " जाणिवेचा " साथीदार होता. सदाशिव नारायण उर्फ बाळूकाका जोशी हे त्याचे नांव. मेणवलीकर भानूकडे हत्यारबंद शिबंदीचे ते मूळ अधिकारी. पंचविशीच्या या तरुणाकडे पुण्यापासून कऱ्हाडपर्यंतचा भाग वासुदेव बळवंतांनी सोपवला होता. दारुगोळ्याची तरतूद करण्यासाठी, सरकारी खजिन्यातील कर रूपाने गोळा झालेला पैसा लोकांचा असल्या कारणाने, घ्यावयास हरकत नाही, असा त्यांचा व्यवहार होता. तसे करताना परकीय सत्तेला टक्कर देऊन धडकीही भरवता येते. इंग्रजांच्या मांडलिकीतील भोर संस्थानातील विंग गावच्या आठनऊ शिपायांची नाके ठेचून बाळूकाकांनी पैसा उभारला. पण त्याच सुमारास त्यांच्या हस्तकातील रामोशांनी धोमच्या कानिटकरांचे येथे दरोडा घातला ! ! आपल्या हस्तकांच्या त्या तत्त्वच्युतीबद्दल बाळूकाका रागावताच त्यांच्या टोळीतील 'टपक्या' नांवाच्या थोटचा मांगाने फितुरी केली. इंग्रजांचा दोनशे घोडेस्वार मांढरदेवाच्या डोंगरात बाळूकाका विश्वासाने झोपले असता त्यांना पकडण्यात यशस्वी झाला. पुढे त्यांच्यावर रीतसर खटला होऊन त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. पण व्हिक्टोरिया राणीचे हाय-कोडतात अपील केल्यावर काकांना जन्मठेपेवर पाठविण्यात आले. अंदमानात पंचवीस वर्षे काढून काका १९०६ साली वयाच्या ६५ व्या वर्षी सुटून आले. लोकमान्यांच्या चतु:सूत्री

आंदोलनाकडे ते आशेने पहात. रुद्र पुरुषसूक्ताचा पाठ करीत करीत तात्या नित्सुरे यांच्या आखाडयाकडे व गणपती मेळयाकडे नजर देत; कार्तिक शु।। १५ मेस दारूचे "बाणांची लढाई" खेळण्यात "उस्तादी" प्रगट करीत. पण टिळक, सावरकरांना शिक्षा झाल्यावर राष्ट्रात आलेल्या शैथिल्यानें विषण्ण होत. अशा अवस्थेतच १९१३ साली ते पंचतत्वास गेले!!

शे दोनशे लोक जमा करून रामभटाने १८८१ साली स्वातंत्र्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर खटला चालू झाला तेव्हा व्हिएन्नाच्या व जर्मनीच्या पत्रात त्याची प्रशंसा आली. तर "कोल्हापूर येथे चालू असलेल्या बंडाव्यास अमृतबझार पत्रिका व हिंदु पेट्रिअट अशा पत्रातील लेखच कारणीभूत होतात" अशी तक्रार लंडनच्या मॉनिंगपोस्टने केली. रामभटजी दंगा व वासुदेव बळवंत बंड यांचा संबंध लंडन टाईम्सने जोडला तर पायोनियरने म्हटले की, "मराठे लोकांची मने द्रव्याने वळविण्याचा रशिया-सरकारचा प्रयत्न चालला आहे. महाराष्ट्र देशातील लोक राजद्रोही असे त्यांच्या बोलण्या-चालण्यावरून उघडकीस येते." हा रामभट मूळ महाबळेश्वरचा.

वासुदेव बळवंत फडक्यांचा फड फसला व बसला तरी त्याचा प्रबोध घेऊन विचारवंतानी लोक–संघटनेचा मार्ग आखला. त्यातूनच काँग्रेसचा जन्म झाला. तथापि ज्याच्या हाती सत्ता त्याच्याकडे भवितव्याचा मक्ता हा व्यावहारिक न्याय "फोडा व झोडा" या नीतीच्या इंग्रजी राजवटीने सारखा प्रत्ययास आणून दिल्यामुळे राजकीय पारतंत्र्याचे उच्चाटन पहिल्या प्रथम कसे होईल यावर विचारवंत तरुण आणि कुचंबलेले कर्तबगार आपली बुद्धी खर्चू लागले. वासुदेव बळवंताच्या उठावानंतर एक तप लोटल्यावर १८९३ हे साल महाराष्ट्राच्या व भारताच्या जीवनक्रमात स्थित्यंतराचेच ठरले. शिकागोच्या सर्व धर्मपरिषदेत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून जाऊन "हे विश्वचि माझे घर"! अशी शिकवण देणाऱ्या भारतीय संस्कृतीची ओळख विवेकानंदानी जगाला करून दिली; दादाभाई नौरोजी ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आले व बाबु अरविंद घोष हिंदुस्थानात परत येऊन त्यांच्या "जुन्या जागी नवे दिवे" या लेखामुळे अर्ज–आर्जवानी राष्ट्रीय जीवनाचा गाडा चालविणाऱ्या "भल्या बुद्धीच्या सागरांना" धक्के बसले.

१८९४ त पुण्यात जो हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला, त्यात दारुवाला पुला-वर नातू बंधूंच्या साहाय्याला असणाऱ्या चाफेकर बंधूंचा, एक लष्करी शिस्तीची मंडळी तयार करणारा, गोफण्या मारुती क्लब पुण्यास निघाला होता. त्यात १८९०–९२ सालापासून "भटजी" या सांकेतिक नांवाने प्रसिद्ध असलेले पेहेलवान दामोदर बळवंत भिडे हे चाफेकर बंधूंचे शाळाबंधूही होते. सन १८९६ पासून देशात गुप्त चळवळी सुरू झाल्या. संघ, शाळा, विद्यालये, तालिमखाने

भजन मंडळ्या, देशी वस्तूंची व किराणा मालांची दुकाने आणि छोटेसे राष्ट्रीय व्यापार, अशा मार्गांनी क्रांतीउत्सव मंडळींनी संघटनेचे प्रयत्न चालविले. शारीरिक शिक्षण देणे, कवायती घेऊन शस्त्रे वापरण्यास शिकणे, बाँब तयार करणे वगैरे सर्व बाजूंनी तरुणांनी उचल केली होती. जिवाची तमा कोणासही नव्हती. फुटकळ सुधारणांचा काथ्याकूट न करता पूर्ण राजकीय स्वातंत्र्य याच ध्येयाची घोषणा निर्भयपणे करून उद्योगास लागले पाहिजे अशा ध्येयाने १८५७ ची अवशिष्ट मंडळी फडके, चाफेकरांचे अनुयायी किंवा त्यांचे उत्स्फूर्त निरनिराळे गट करून काम करीत, गुप्तपणा, निष्ठा व शिस्त ही त्यांची सूत्रे समान होती. बोअरयुद्ध आणि रूसो-जपानीयुद्ध यामध्ये इंग्लंड व रशिया या युरोपियन राष्ट्रांचा पराभव झाला. या वार्ता ऐकून स्वातंत्र्यप्रेमी भारतीय तरुणांना हर्ष झाला. स्वदेशसेवेच्या शपथा त्यांनी स्वतःच्या रक्ताने सह्या करून घेतल्या. शिवाजीमहाराज व राष्ट्रगुरु रामदास यांची कामगिरी डोळ्यापुढे ठेवून लंडनवर भगवा झेंडा लावण्याची आकांक्षा कित्येकांनी धरली. नैतिक अधिष्ठान उच्चत्तम ठेवावयाचे असा त्यांचा कटाक्ष होता. डोळे व कान भरपूर उघडे ठेवावयाचे. हाताला झेपेल एवढ्या पल्ल्याची कामे करायची पण तोंडाला व लेखणीला शक्य तेवढे कुलुप घातलेले असावयाचे असा त्यांचा दंडक होता. मॅझिनी–गॅरिबाल्डी यांची चरित्रे त्यांची स्फूर्तिस्थाने होती तर केसरी–काळ अशी वृत्तपत्रे त्यांचे वेदघोष होते. कर्तव्यस्फूर्ती सारखे सुख वा मोक्ष नाही, अशी त्यांची निष्ठा असे. इतकी की " चिंबलेला सैनिक एकदाच काय तो तुटून पडलेला असतो," या न्यायाने ते हरीवर भरवसा ठेवून असत.

ब्रिटिश सत्ता परकीय म्हणून शत्रुवत असूनही त्याच सरकारच्या न्यायमंदिरात आपले खटले चालवून घेण्यात क्रांतिकारकांचे ध्येय धोरण होते. जनतेत दुधारी हत्यारासारखे धडाडीचे धोरण निर्माण व्हावे; शत्रूला शत्रूच्याच धर्मनियमांनी घायाळ करावे; आपल्यातीलच स्वार्थाने परसत्ता–सामील म्हणजे फितूर वा देशद्रोही कोण हे जनतेला स्पष्ट व्हावे; अजाणतेपणाने देशभक्तांच्या विरुद्ध जाणाऱ्या जनतेला देशभक्तीकडे यावयास विवेकोत्थापनाने लावावे आणि स्वतःला प्राणांतिक शिक्षा झाली तरी परकीय सत्तेबद्दल जनतेत जो तिटकारा स्थापन होईल त्यायोगे जनता उठावाचे नवे पाऊल टाकील या आत्मविश्वासाने कपाळीचे भोग भोगावे, असे क्रांतिकारकांच्या मनाचे समाधान होते. आपणाला जे काही देशाकरता करावेसे वाटते ते केले; त्याचा गवगवाच काय, पण उच्चारही करण्याचे कधीही मनात येणार नाही, अशीच त्या पुष्कळ सच्चा क्रांतिकारकांची मनोवृत्ती होती.

हरी नारायण आपट्यांच्या " उषःकाल " प्रभृती कादंबऱ्यांनी भारावलेले तरुण " उदंड करावे गुप्त रूपे " या पंथाला लागले. रॅन्ड खुनातील

चाफेकरांच्या फाशीबरोबर त्यांच्या गोफण्या मारुती क्लबची काशी झाली असली तरी त्यांच्या महत्त्वाकांक्षेची कावड ठिकठिकाणी नेली जातच होती.

गोफण्या मारुती क्लबच्या पठडीतील भटजीमहाराजांनी दिनकरशास्त्री कानड्यासारख्यांना १९०१ साली क्रांतीची दीक्षा दिली होती. अमेरिकेत उत्पन्न झालेल्या गदर चळवळीचा लागाबांधा त्यामुळेच साताऱ्यापर्यंत राहिला. कारण भटजीमहाराज हे पुढे सातारा न्यू इंग्लिशमध्ये (भिडे) तालीम मास्तर म्हणून रुजू झाले होते. चाफेकरांच्या गोफण्या मारुती क्लबापैकी बाबूराव (तात्या) नित्सुरे, दामुआण्णा भिडे, यांनीच क्रांतीची दीक्षा दिल्यामुळे हणमंतराव कुलकर्णी मुडकीवाडीकर यांनी कोल्हापुरास शिवाजी क्लब सुरू केला.

रँडच्या खुनानंतर दामुआण्णा भिडे मलकापूर-अमरावती (वऱ्हाड) कडे निसटले आणि कुस्तीगीर म्हणून गाजले. बीडला 'रावसाहेब' भट पेशवे आल्याचे कळल्यावरून तिकडे व हैदराबादकडे भिडे गेले आणि इंदूरच्या शिवाजी महाराजामार्फत रशियाशी कारस्थान करण्यासाठी जाण्याचा प्रयत्न करीत असता मनमाडास पकडले गेले तरी निसटले. परदेशी राजकारण शिजविल्याशिवाय काही जमणारे नाही असे इंदोरास कळल्यावर लष्करी जवान तयार करण्याचा एकच छंद धरून भटजींनी धुळ्याच्या कोंडाजी वस्तादाच्या व्यायाम शाळेत पुणे ते नागपूर भागातील स्वातंत्र्यभक्तांना जमविले. ते सर्व स्वातंत्र्यभक्त बंदूक, भाला, बर्ची, घोडदौड या विद्यात प्रवीण होते. सामुदायिक सशस्त्र क्रांतीचा इंग्रजाविरुद्ध उठाव करण्याची वेळ अजून आली नाही; आपण मंडळींनी पायाचे दगड म्हणूनच खपले पाहिजे असा भटजींनी जमविलेल्या देशभक्तांचा निर्णय झाला; मात्र ज्यांना लष्करात भरती होता येईल त्यांनी व्हावे असा संकेत ठरला. विष्णु सीताराम व महादेव सीताराम रणदिवे पांडुरंग महादेव बापट (सेनापती), देवभानकर, खानोलकर, वामन मल्हार जोशी, आण्णासाहेब दास्ताने वगैरे मंडळींनी त्या धुळ्याच्या मेळाव्यातील विचारसरणी आपल्या कॉलेजच्या शिक्षणाचे वेळी बेताबेताने समवयस्कात सोडून दिली. लष्करात फक्त (कॅप्टन) मोडकास भरती व्हावयास जमले व पुढे ते युद्धावरही गेले. भिडे पुढे हैद्राबाद, जालना, इंदोर करून आले आणि वाटेत त्यांनी (वीर) वामनराव जोशी, (लोकनायक) अणे प्रभृतींना क्रांतीची दीक्षाही दिली. पण शेवटी वस्ताद होऊन 'शेलके तरुण' तयार करण्याचे व्रत घेऊन ते सातारा न्यू इंग्लीश स्कूलचे तालीम मास्तर झाले. १९४८ साली ते निधन पावले. साताऱ्यात भिडे व्यायाम मंदीर या त्यांच्या स्मारकाचे उद्घाटन लिंबचे रहिवासी जीवनबलोपासक योगरत्न सांगलीच्या गजानन मिलसचे धनी विष्णुपंत वेलणकर यांच्या हस्ते १९५४ साली झाले.

चाफेकरांच्या गोफण्या मारुती क्लबाचे वारे लागलेले सातारा जिल्ह्या-

तील दुसरे गृहस्थ म्हणजे वाईचे तात्या नित्सुरे. घरच्या अडचणीमुळे पुण्याहून शिक्षण सोडून १९०४ साली हा तरुण देशभक्त वाईस परतला होता. नाशीकच्या अभिनव – भारताच्या झुळकीही त्याच्या उमेदीपर्यंत पोहोचल्या होत्या. तेव्हा कृष्णेच्या वाळवंटात नवतरुणांना केसरी वाचून दाखवावा आणि दामल्यांच्या आखाड्यात त्यांना कसदार बनवावे, हा उद्योग तात्यांनी सुरू केला. या उद्योगाचे पूर्तीसाठी धर्मप्रवर्तक मंडळ त्यांनी काढले, आणि लोकमान्यांच्या चतु:सूत्रीच्या प्रचारार्थ गणपती उत्सवातील मेळ्यांचा उपक्रम केला. वासुदेव बळवंत फडक्यांचे साथी बाळूकाका जोशी त्यामुळेच नित्सुऱ्यांचे उद्योगाकडे आशेने पहात. परिणामतः १९०८ साली नित्सुऱ्यांची तालीमच सरकारने बेकायशीर ठरविली. तेव्हा त्यांनी मधले आळीत पेशवे क्लब सुरू केला. त्यासरसा इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्याचा कट करणारी मंडळी म्हणून राजाभाऊ बनारसे व तात्या नित्सुरे यांना पकडून साताऱ्यास नेण्यात आले ! ! पण दादासाहेब करंदीकरांनी दोघांसही निर्दोष सोडवून घेतले.

स्वातंत्र्यवेड्या तरुणांनी कोल्हापूरचा शिवाजी क्लब, आठल्ये हिंगे यांचा औंध समूह, कृष्णाजी मारुती कळंबे यांचा ' सातारा ', ढापरे बंधूचा ' हनुमान क्लब ' अशा गुप्त्यांच्या क्रांतीसंस्था निर्माण केल्याच्या नोंदी सरकारी बित्तंबातमीदारांच्या खलित्यातून सापडतात. या सर्वांतील सभासदांची माहिती परस्परास कितीही असली तरी सर्वात आखीव कार्यक्रमाची अगर सहकाराची साखळी होती असे मात्र सुतराम म्हणता यावयाचे नाही. तथापि राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या कल्पनेचा प्रसार करणे, गुप्त्यांचे, त्याच्या सहानुभूतिकांचे संख्याबळसुद्धा भरून शस्त्रास्त्रे व द्रव्य जमा करणे, युद्ध शास्त्राचा अभ्यास करून गनिमीकाव्याने लढाई उभारावयाची झाली तर कित्येक कपारीवरील माऱ्याच्या जागा हेरून व हाताळून ठेवणे, देशातील गुप्त्यांच्या संघटनांची समन्वयी शूरता उभी करणे वगैरे कृतीप्रणाली हणमंत-राव कुलकर्णी, कृष्णराव कळंबे, (डॉ.) आठल्ये प्रभृतींनी लोकप्रिय करण्याचा आटोकाट प्रयत्न केला हे काही खोटे नाही. बाकी काही साधो, न साधो, भारतातील ब्रिटिश नोकरशाहीला आणि इंग्लंडातील साम्राज्यवाद्यांना चरकवून आणि चमकवून ठेवले तरी पुष्कळ झाले, अशी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाखेर तरुणांची दृढ भावना झाली होती.

गोफण्या मारुती क्लबच्या मंडळीकडून रॅन्ड साहेबाच्या देहान्त प्राय-श्चित्तानंतर सामुदायकरीत्या फारसे घडले नसले तरी त्याच्या कोल्हापूरच्या भावंडाने पुष्कळच कर्तबगारी केली. राजाराम हायस्कूलात शिकणारे भिमाजी आण्णाजी कुलकर्णी मुरकमळीकर ऊर्फ हणमंतराव यांनी 'बाल गो–रक्षण' सभा स्थापन केली होती. नाशीकच्या मित्र मेळ्याच्या वार्तांनी कोल्हापूरास

जाति–धर्म–पंथ यांच्या अतीत असा 'बालमित्र समाज'ही दत्तोपंत लेले या राजाराम हायस्कूलच्या शिक्षकाकडून स्थापन झाला होता. पुढे त्या दोन्ही संस्था एक होऊन त्या संयुक्त संघटनेचे नांव 'शिवाजी मित्रसमाज' ठेवण्यात आले. हाच तो कोल्हापूरचा शिवाजी क्लब ! त्यामार्फत शिवाजी उत्सव व गणपती उत्सव मोठ्याच प्रमाणावर साजरे होत. त्यात अधिकारी व लोक सहभागी असत. रघुनाथ बाजी रुईकर, केशवराव चिपडे, भाऊसाहेब घाटगे, वगैरे मंडळींनी दत्तो सखाराम सोनटक्के यांच्या प्रोत्साहनाने शिवाजी क्लब स्थापन केला. दामू जोशी, दामू दुसाने सोनार, रामचंद्र अप्पाजी कुलकर्णी, राजाराम बापू वझे, विठ्ठल व्यंकटेश देशपांडे, लक्ष्मण शिवराम पतकी, अमृतराव भिमराव पुंडे, दत्ताजीराव जाधवराव, शिवराम बक्षी, दामोदर चिंतामण केळकर, वैद्य, पांडुरंग नारायण दिवाण, शास्त्रीबुवा खुपेरकर, अशी मातबर आणि घोड्या-वरील रपेट व शस्त्र चलाखी विशेष असलेली मंडळी शिवाजी–क्लबचे प्रथम पासूनच सभासद होती. हणमंतराव कुलकर्णी गोरक्षणाची पदे करीत व म्हणत. दर रविवारी बाजारात उभे राहून ते सभा घेत व ख्रिस्ती उपदेशकांची चांगली हजेरी घेत. त्यांनी व इतरहि सभासदांनी दाण्डपट्टा, तलवार, वगैरेंची विद्या उत्तम रीतीने साध्य करून घेतली होती; कवायतीहि होत. त्याकामी रंगनाथ विष्णु खानविलकर व शिरोळचे अंताजीपंत कुलकर्णी गुरुजी यांचा पुढाकार असे. सभासदांना बखरी, चरित्रे, काळ–केसरी ही वृत्तपत्रे वाचावी लागत. शाहीर कृष्णराव गुरव यांचा शिवाजी वरील पोवाडा (शिवाजी क्लब पुढे नाहीसा झाल्यावरही) भास्करराव जाधवांनी छापून काढला होता. शिवाजी उत्सवात लाठी, फरीगदका, जंबीया इत्यादि शस्त्र-विद्यांच्या चढाओढी होत. वरुण तीर्थावरील मारुतीचे देवळात श्री. द. नागपूरकर, दा. वि. (बाबुराव) गोखले, (डॉक्टर) गोपाळराव पळसुले, उत्तमराव शेणोलीकर ही मंडळी शककर्त्या शिवाजीचा उत्सव करण्यात पुढाकाराने असत.

काळ मधील " चिनी ब्राह्मणाची पत्रे " या लेखमालेतून गुप्त सशस्त्र मंडळ्या स्थापण्याची प्रेरणा शिवाजी क्लबच्या मंडळींना झाली. त्या कामी हणमंतराव कुलकर्णींचा प्रभाव सभासदावर जो पडला होता तो अविस्मरणीय होता. त्यांच्या बौद्धिक व कवाईती वर्गांचे कार्यक्रम प्रथम स्मशान घाटावर व निमजगा माळावर होत. कुस्त्या, मल्लखांबावर जसा त्यांचा भर होता, तसा शस्त्र व शील तेजस्वी ठेवण्यावरहि होता. १८९६ ते १९०० या चार वर्षात शिवाजी क्लबने शेकडो मुला-तरूणात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे प्रेम, शिस्त व नीती यांचे बीजारोपण केले. हणमंतराव कुलकर्णींनी छत्रपती शाहू राजर्षींच्या देखत भाल्याचा एक जीवखाऊ खेळ रेसिडेंट फेरिसला शिताफीने खेळून

दाखविला. दुसऱ्या दिवशी तो " विटा " खेळातील विजय हणमंतराव मिळवीत असताच भालेराव वीस घोडेस्वारांनी हणमंतरावास कोंडीत धरले ! पण आपल्या नांवास साजेसे उड्डाण करून हणमंतराव मृत्युंजय ठरले. त्या सरसा रेसिडेंटच्या मेंदूने चमक मारली. हणमंतरावांची ही लढाईची तयारी शिवाजी क्लबच्या सभासदात उतरली मुरली, तर तीत ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याला धोका असल्याचे त्याच्या मनाने घेतले. पुण्यात रँडला चाफेकर बंधूंनी उडविल्यावर तालमी तालमीकडे व आखाड्या आखाड्याकडे सरकार दग्याच्या संशयाने पाहू लागले. त्याचे धागेदोरे सरकार शिवाजी क्लबापर्यंत आता लांबवू लागले. कोल्हापूरास १८९८-९९ साली प्लेगने धुमाकुळ घातल्यावर, शिवाजीने खजिने लुटले त्याचे राजकीय मर्म न ओळखता, खुळ्या अनुकरणाच्या ईर्षेने काही अपरिपक्व शिवाजी-क्लब सभासदांनी बंद घरे लुटली ! ! त्यामुळे दोनशे मुलांच्या झडत्या झाल्या आणि दामु दुसाने प्रभृतींना १८९९ मध्ये सहा ते चौदा वर्षांच्या शिक्षाही झाल्या. त्याचवेळी हणमंतराव कुलकर्ण्यांना कोल्हापूरचा " वासुदेव बळवंत " ठरविण्याचा प्रयत्न झाल्यामुळे त्यांना ' गुप्ती ' पंथ स्वीकारावा लागला ! भूमिगत व्हावे लागले ! !

हणमंतराव जबलपूर येथील युरोपीयन बर्न कंपनीच्या कौलाच्या कारखान्यात मजूर-कुली म्हणून राहिले. रात्रौ जागून त्यांनी भट्टीची माहिती घेतली, तेथील युरोपीयन ऑफिसरला आपण ' कूली ' नसल्याचा संशय आल्याचा वास येताच, हणमंतराव तेथून निसटले व पुण्यास लोकमान्यांना जाऊन भेटले. आधुनिक शस्त्रांचा कारखाना हाताशी असल्याशिवाय स्वातंत्र्य प्राप्तीचे यश येणार नाही. अशा वाटाघाटी हणमंतरावांनी लोकमान्यांशी केल्या. जबलपुरातील कौल कारखान्याचा अनुभव नेपाळेश्वरांच्या सेवेच्या मिषाने कामी लावण्यास लोकमान्यांनी त्यांना नेपाळात पाठविले. सांगलीस बन्दुकीच्या नेमबाजीचे सरावलेले कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनाही त्यांच्या जोडीस दिले. नेपाळात त्यांनी मंगलोरी कौलेही चांगली बनविली. पण त्या कंकभट्टी वेषाखाली जर्मनीतून यंत्रे आणवून तारीखतागायत युद्ध शस्त्रे निर्माण करण्याचा " गुप्ती " पंथही हणमंत कृष्ण अनुसरत असल्याचा सुगावा, शिवाजी क्लबच्या दामू जोशामार्फत प्रथम शाहू महाराजांना व नंतर त्यांच्या मार्फत इंग्रजांना लागला ! मग साहाजिकच तेथे हणमंतरावांच्या घरास पोलिसांचा गराडा पडला ! ! तथापि ते त्यापूर्वीच भिंतीवरून उडी मारून निसटले होते. पुढे ते काही दिवस पंजाबात वावरत असलेल्या देवलांच्या सर्कसचे आश्रयाने होते. खाडिलकर महाराष्ट्रात परतले; पण हणमंतराव बैराग्याच्या वेषाने हाल अपेष्टा भोगीत केदारनाथचे यात्रेस गेले. शेवटी १९१२ च्या ऑगस्ट महिन्यात हरिद्वार येथे गंगेचे काठी हणमंतरावांनी या नश्वर जगाचा निरोप घेतला ! !

त्यावेळी त्यांच्या सेवेस शिवाजी क्लबचा सभासद दामोदर दुसाने (दामू-सोनार) होता.

दामू जोशी याजकडून जे नेपाळ रहस्य फुटले ते शाहूमहाराजांच्या त्याच्या वरील मोहिनीने, छत्रपतींच्यावर मोहिनी पडली होती १९०१ त इंग्लंडमध्ये झालेल्या आठव्या एडवर्डच्या राज्याभिषेकाचे वेळी "सिटिझन ऑफ इंडिया"चा कर्ता लीवॉर्नर याच्या कान मंत्राची !!! पण उपयोग काय?

अठराशे सत्तावनच्या सार्वत्रिक सशस्त्र उठावानंतर इंग्रज सरकारने लोकांना निःशस्त्र केल्यामुळे पौरुष खच्ची झाले; त्यातच दुष्काळांनी व प्लेग-सारख्या साथीनी लोक हैराण झाले असताच १८७६ साली इंग्लंडची राणी हिंदुस्थानची बादशाहीण झाली म्हणून लिटनशहानी दिल्ली दरबार केला, तर त्याचीच पुनरावृत्ती १८९७ साली व्हिक्टोरिया राणीच्या राज्याभिषेकाला साठ वर्षे झाली म्हणून झालेले गावोगावचे महोत्सव दुष्काळ–प्लेगग्रस्त प्रजेच्या हळहळीवर टिच्चून झाले. त्यातच एकोणीसाव्या शतकाचे अखेरीस कर्झन शाहीचा करडा अम्मल सुरू झाला आणि "खटनटाशीं खटनट, उद्धटाशी उद्धट" या न्यायाने १९०५ साली कर्झनने बंगालची फाळणी करताच क्रांतिकारकांच्या चळवळीलाही धार चढत चालली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भारताबाहेर तयारी करून इंग्रजी राजवटीला भारतातून उठविण्याचे प्रयत्न सुरू झाले. धोमचे वासुकाका जोशी (चित्रशाळा–पुणे) यांना प्रथम प्रथम आशा वाटे की तोलामोलाचे संस्थानिक स्वराज्याच्या चळवळीत प्रामुख्याने भाग घेऊ शकतील. पण लवकरच त्यांचा भ्रम दूर झाला ! ! सामुदायिक भारतव्यापी उठाव होऊ शकत नाही तर निदान इंग्रजांना देशातले देशात दहशत तरी निर्माण करून ठेवावी या दृष्टीने पुण्याच्या चाफेकर बंधूंच्या गोफण्या मारुति-क्लबापासून कोल्हापूरच्या शिवाजी क्लबापर्यंत जसे महाराष्ट्रात संस्था प्रवर्तित प्रयत्न झाले तसे इतरत्रही झाले व पुढे पुढे ते परदेशीही फैलावले. त्या सर्वांस अर्थसाहायादी वासुकाका करीतच होते. पण तेवढ्याने त्यांना समाधान नव्हते. अपेक्षाभंगामुळे नेपाळ अफगाणिस्तानादि देशांची सहानुभूती संपादून काही होते का हे पाहण्याचे त्यांनी ठरविले. पण समाधान लाभले नाही ते नाहीच ! लष्करी वळणाचा आणि युद्ध शास्त्राशी परिचित असलेला ग्वाल्हेरकडील कोणी केतकर नांवाचा पटाईत इसम वासु-काकानी नेपाळात खाडीलकरांच्याकडे पाठविला. केतकरांनी तेथील लष्कराची व युद्ध संरक्षणाच्या साधनसामुग्रीची पाहणी केली. नेपाळच्या हित रक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या शस्त्रसामुग्री निर्मितीची आखणी केली. नेपाळे-श्वरापुढे ती आखणी मांडता यावी म्हणून वासूकाका महिनाभर नेपाळात राहिलेही. पण कोल्हापुरास गौप्यस्फोट झाल्यामुळे सगळेच मुसळ केरात गेले !

(वासुकाका जोशी व त्यांचा काळ; खाडीलकरांचे चरित्र; सिडिशन रिपोर्ट; चिरोलकृत भारतीय असंतोष; पहा.)

एवढ्यावरच वासुकाका कसे गप्प बसणार ? अफगणिस्तानात अनेकानेक महानुभवी होते. काकांनी त्यापैकी एका मठात आपला प्रतिनिधी पाठवून सशस्त्र सामुहिक बंडास तेथून काही साहाय्य मिळते की काय याचा तपास घेतला! पण ताकासतुर लागेना. मग काकांनी छत्र्यांची सर्कस गाठून जपान व अमेरिकेतही सफर केली. चित्रशाळा प्रेसची तारीख तागायत उभारणी साधण्यासाठी आपली सफर चालल्याचे काका सांगत, तरी त्यांच्या चौकशा निराळचाच प्रकाश देत ! चीनच्या राणीपर्यंत काकांनी संधाने बांधली. फिलिफाईन्समध्येही काका खडा टाकण्यास चुकले नाहीत. पण रूसो-जपानी युद्धात जपान विजयी झाल्याबद्दल लोकमान्यांच्या राष्ट्रीय पक्षाने जपानचे उघड अभिनंदन केले असताही, इंग्लंडसारख्या पहिल्या दर्जाचे राष्ट्राविरुद्ध, भारतीय स्वातंत्र्य प्रस्थापित झालेले असले तरी, उभे राहण्याची आपली छाती नाही, असे जपानने सांगितले! ! इतरांचे मग काय ?

कोल्हापूरच्या शिवाजी क्लबच्या प्रत्यक्ष वीर्यशाली वातावरणात तेथे शिकावयास असलेले कृष्णराव मारुतीराव तथा भाऊसाहेब कळंबे ही एक आसामी होती. सातारा जिल्ह्यात बाळजी नाथा शिंदे यांच्यासारखे शिक्षक शाळेचा क्रमिक पुस्तकातील साधे धडे शिकवूनही राष्ट्रीय वृत्तीचे विद्यार्थी तयार करणारे असे एकोणिसाव्या शतकाचे शेवटच्या पंचविशीत होते. त्या पंथापैकीच कऱ्हाड तालुक्यातील सुरली कामथीचे जे दोन कळम्बे शिक्षक होऊन गेले ते भाऊसाहेब कळंब्याचे आजोबा व वडील होते. भाऊसाहेब १९०३ साली पुण्याचे ट्रेनिंग कॉलेजमध्ये दीक्षित व्हावयास आले. तेथे आल्यावर माहुलीचे गणेश विश्वनाथ गिजरे, नारायण कृष्ण भावे प्रभृती समान-शीलांना बरोबर घेऊन कळंब्यांनी ट्रेनिंग कॉलेज वसतीगृहातील बंद पडलेला गणपत्युत्सव पुन्हा सुरू केला व १९०४ च्या नवरात्राच्या उत्सवात विलायती कापडाची होळी केली. त्यासरसा ते पोलिसांच्या डोळ्यावर आले, तरी ते आपल्या निवडक सहकाऱ्यास स्वातंत्र्य संपादनाच्या शपथा देऊ लागले.

शिवाजीसारखा काही पराक्रम करावा, भवानी देवीला प्रसन्न करून घ्यावे, स्वदेशीव्रत कडेकोट पाळावे, अशी त्यांची व्रते असत. ट्रेनिंग कॉलेजमध्ये राकेल तेलाच्या बहिष्कारासाठी आणि स्वदेशी दिवे म्हणून गोड्या तेलाच्या समया सुरू करण्याबद्दल तीन दिवसांचा संपदेखील कळंब्यानी यशस्वी केला.

ट्रेनिंगमधून सुटल्यावर कळंबे कोरेगाव येथे नोकरीवर रुजू झाले. नोकरी करीत असताही ते व त्यांचे व्यवसाय बंधू स्वदेशीवर जाहीर व्याख्याने देत असत. महादेव नारायण कुलकर्णी रेठरेकर या हेडमास्तराना घेऊन कोळ्याच्या

बाजारात नारायण कृष्ण भाव्यानी दिलेले व्याख्यान सरकारी अधिकार्‍यात चर्चेचा विषय झाले होते. कोरेगावास कळंबे नदीकाठावरील बोकिलांच्या वाड्यात रहात आणि एकान्ती क्रांतिकार्याची दीक्षा देत. हटयोग आणि समाधी यांच्या छंदात त्यांना ते सहज साधे. विद्यार्थ्यांकडून कळंबे व त्यांचे साथी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, रामतीर्थ यांचे ग्रंथ वाचून व वाचवून घेत, भगवत्गीता व दासबोधादि वाङ्मय विद्यार्थ्यांस व जनसामान्यास अभ्यासपूर्वक सांगत. वासुदेवानंद सरस्वस्ती बडोद्याचे प्रो. माणिकराव, माहुलीचे कृष्णदास महाराज, इतिहासाचार्य राजवाडे यांचेकडे कळंब्याचे व कळंब्याकडे त्यांचे येणे जाणे असे. पुस्तकी विद्येशिवाय आपल्या निवडक विद्यार्थ्यांना आणि स्नेहांकितांना वरील मंडळीच्या सहवासाचा व विचार-विनिमयाचा एकान्त फायदा तर कळंबे संधि साधून देत असतच; पण पुष्कळ वेळा सज्जनगड, अजिंक्यतारा, मेरुलिंग, नांदगिरी, जरंडा अशा डोंगर किल्यातून विद्यार्थ्यांना रात-बेरात घेऊन जावे, तट चढण्याचा अभ्यास करवावा, शिवशाहीच्या गोष्टी सांगून प्राणपणाने राष्ट्रासाठी झिजण्यात पुण्याई असल्याचे ठसवावे, हाही कळंब्यांचा छंद होता.

त्यांचे सवंगडी रामराव बर्गे (इंदोर कॉलेजमध्ये पुढे प्राध्यापक झालेले) नारायण कृष्ण भावे, बाळकृष्ण भाऊ जोशी, बाळकृष्ण सावळाराम बुधकर आपआपल्या नोकरीच्या गावावरून येऊन रविवारी कळंब्याकडे जमत. आपापल्या शाळात आणि परिसरात राष्ट्रीय दृष्टचा लोकशिक्षण कसे द्यावयाचे, देशभक्त तरुण देशकाल परिस्थितीप्रमाणे कसे तयार करावयाचे याबद्दल उहापोह होई. त्याचबरोबर आठवड्यात कायकाय केले, झाले याचाही अहवाल सादर होई. " भवानी तलवार " म्हणून एक हस्तलिखित असे. त्यात सांकेतिक शब्दांनी या सर्वांची नोंद होई, उद्बोधक लेखही त्यात असत.

अशा जीवनाच्या घडीत १९०८ साली कोल्हापूर शिवाजी क्लबच्या दामू जोशाकडून के. डी. लिमये (हे पुढे सी. आय्. डी. त नोकरीस गेले.) काही कुकर्‍या, पिस्तुले व केमिकल्स असलेली ट्रंक घेऊन तासगावी ना. कृ. भावे याजकडे आले. भाव्यांचे चुलत सासरे कोल्हापुरास व कळंबे मूळ कोल्हापुरास शिकलेले; तेव्हा सुताने स्वर्गास जाऊन पोलिसांनी दोघांकडे चौकशीचा चिमटा लावला. नाशीकचे श्री. कृ. ब. महाबळ गुरुजी समवेत कळंबे प्रभृती प्राथमिक शिक्षक लोकमान्य व त्यांची प्रभावळ यांना भेटत, असा सरकारचा कानोसा असल्यामुळे, १९०८ साली लोकमान्यांना राजद्रोहाची दुसरी शिक्षा झाल्यावर कळंबे क्लबच्या दत्तात्रय कृष्ण तबीब प्रभृती शिक्षक मंडळीनी गंध लावावयाचे नाही, दाढी करावयाची नाही, असा सुतकुला प्रघात जो सुरू केला, त्यावरही सरकार धुमसतच होते. त्यातही १९०९ च्या डिसेंबरमध्ये नाशकास जॅक्सनचा खून झाल्यावर पोलीस चौकशीत कळंबे-बाबुराव अंगापूरकर प्रभृतींची नांवे पुढे

येताच, सरकारचा पारा केवढा चढला असेल ? तशात कऱ्हाडला असलेल्या तवीबला कोरेगावला बोलावून आपल्या जवळची एअरगन् कळंब्यांनी तासगावास भाव्यांचेकडे झाकूनपाकून पाठविली. पण ते नाशीकला न सापडलेले तेरावे (ब्राऊनिंग) पिस्तुल असावे या सरकारी समजुतीमुळे सी. आय्. डी. च्या रशीदखानाने तिघांचाही तीन दिवस उभा छळ मांडला ! वैयक्तिक हत्येवर कळंबे क्लबचा कधीच विश्वास नव्हता. जॅक्सन खुनाच्या उतावळचा परिणामातून बाबूराव अंगापूरकरासारख्या कळंब्यांच्या पुठ्यातील पुरुषांचेच नव्हे तर महाराष्ट्राचे राजकीय जीवन नामोहरम झाले ! त्यातच " गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता " होऊन सातारा जिल्ह्यात औंध-बॉम्ब-केस निर्माण झाली व तिच्यात (पुढे निजामाबादच्या इंदूर बोधन-मठाचे अधिपती झालेले) केशवबुवा बोरगांवकर व (मसुरकर महाराज म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले) विनायक शिवराम जोशी ही मंडळी गुंतविण्याचा बेत दिसताच १९०९ च्या काळात घर सोडून पुणे ट्रेनिंग कॉलेजात, बीड येथे (हैदराबादेस) आणि पुढे सोलापुरास दुकानदारीचे निमित्त करून हिंडणाऱ्या विनायकराव जोशांना कळंब्यांची मंडळी उत्तर हिंदुस्थानात बद्रीकेदारकडची यात्रा करून आल्यावर कृष्णाकाठची यात्रा करावीसी वाटली व रामदासांच्या निग्रहाने, एक वस्त्र, एक लोटा व एक पुस्तक घेऊन त्यांनी ती केल्यावर मसुराश्रमाची कल्पना त्यांना स्फुरली. ती त्यांनी कऱ्हाडास कळंबे यांना आणि किरोलीस भावे यांस बोलून दाखविली. मसुराश्रम निघाला आणि गोमांतकाच्या शुद्धीचे कार्य झाले. मसुराश्रमातून सुविद्य, सशक्त आणि शरणागती न देणाऱ्या तरुणांची संघटना करावयाचीच कल्पना मुख्यतः होती आणि गोमांतकाच्या शुद्धिकरणानंतरही १९३२ च्या चळवळीत आश्रम जप्त होईपर्यंत ती रंगारूपालाही येऊ लागली होती. तेव्हा १९११ चा उत्तरार्ध सुरू झाला तरी हात चोळत बसावे लागलेल्या सरकारने कोल्हापुराहून १९०८ साली आणलेल्या ट्रंकेबाबत शिक्षण खात्यामार्फत नवलधक्याने चौकशी केली. कळंबे व भावे यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रश्नावलीचे सील बंद लखोटे समक्ष डेप्युटी इन्स्पेक्टरनी दिले. कळंब्यांची जबानी झाल्यापासून भाव्यांची व त्यांची गाठ पत्रव्यवहार वा निरोप यांना अवसर न देता, डेप्युटी कोरेगावहून तासगावास आले. कळंबे भाव्याकडून त्यांच्या त्यांच्या हस्ताक्षरात दोन भिन्न ठिकाणी भिन्न भिन्न घेतलेले जबाब डी. एस्. पी. साताराकडे रवाना झाले, ते जेव्हाच्या तेव्हा ! पण आश्चर्याची गोष्ट अशी की ते दोन्ही एकटाकी एकदिलाने दिल्यासारखे निघाले. हे जबाब झालेनंतर आठ दिवसांनी दोघासही नोकरीवरून कमी केल्याचे हुकूम आले. कारण दरम्यान १२ डिसेंबर १९११ चा दिल्ली राज्यारोहण समारंभ झाला. त्या दिवशी कळंबेक्लबच्या शिक्षकांनी शाळेला सुट्टी न देता " घटनात्मक दृष्ट्या इंग्लंडचा राजा हा तेथील मंत्रीमंडळाच्या

धोरणाचा सह्याजीराव असतो " अशी विद्यार्थ्यांना शिकवण दिली होती.

नोकरी सुटल्यावर कळंब कर्‍हाडास व भावे आपल्या गावी किरोलीस गेले; तोच सोलापूर जिल्ह्यात नोकरीवर असलेल्या माहुलीच्या गिजर्‍यांचीही नोकरी गेली. १९०४ पासून त्यांच्यावर असलेली पोलिसांची देखरेख मात्र अधिक करडी झाली. कर्‍हाडास बाळनाथ बुवांच्या मठात राहणे कळंब्यास व किरोलीस आपल्या भावा भावजयांत राहणे भाव्यास अशक्य झाले! गिजर्‍यांना विमा महर्षि चिरमुल्यांनी सातारा स्वदेशी दुकानावर ठेवून घेतले, म्हणून कसेतरी त्यांचे निभावले! पण मुलांना मल्लखांब शिकवितात व शिवाजी व्हायला सांगतात म्हणून उंब्रजच्या शाळेतून कमी झालेले " मारुतीचा कट्टा " कर्ते बाळकृष्ण भाऊ जोशी यांना जसे पोलिसच्या ससेमिर्‍यात मसूर-पंढरपूर-पुणे मार्गे रानावनात गवसणारा भुईमूग व तुरीच्या शेंगा खाऊन व ओढ्या नाल्यावर मिळेल ते पाणी अंगावर घेऊन व पिऊन चित्रशाळेत गेल्यावर मुद्रित तपासनीस म्हणून ठाव मिळाला, तशीच गत भावे-कळंब्यांची, ते गोमान्तकाच्या हद्दीत जाईपर्यंत ब्रिटिश सरकारच्या चारचक्षूनी केली. फोटोग्राफीचा तरी धंदा करावा म्हणून भावे किरोलीतून बाहेर पडले व कळंबे कर्‍हाडच्या एकनाथ महाराजांचे लग्न जमवावे म्हणून बाहेर पडले. भावे-कळंबे मग साखळीकर रावराजे व गावठाणकर प्रभूदेसाई यांच्याकडे गेले. म्हापशास राहून त्यांनी एक शाळा चालविली. त्यांचा तेथील योगक्षेम कर्‍हाडचे दानशूर पांडुआण्णा शिराळकर व कळंबे–भाव्यांचे साथी शिक्षक आपल्या मोजक्या पगारातून तुटपुंजी मदत " गुप्ती " पद्धतीने पाठवून चालवीत.

सन १९१२ पासूत राणेबंधूंच्या संगनमतात असलेले कळंबे-भावे मग (इतिहास-संशोधक) दत्तोपंत आपटे व (तपस्वी) बाबासाहेब परांजपे यांच्या सहकार-समन्वयाने गोवा बंदरात लागलेल्या जर्मन-बोटीवरील कप्तानाशी शस्त्र पुरवठ्याचे करारी बोलणे बोलले. सुएझ कॅनालला जर्मनीने इंग्रजांची कोंडी करताच, हिंदुस्थानात सशस्त्र बंड उभारावयाच्या ईर्षेने महाराष्ट्राने १९१५ साली दोन हजार तरुण जमविण्यासाठी मालदनचे बापूराव काळे व उगारचे माधवराव देवधर यांच्या साहाय्याने मग भावे-कळंबे हालचाल करू लागले. पण पुढे पोर्तुगालच इंग्लंडच्या बाजूने युद्धात पडल्यामुळे सशस्त्र बंडाच्या कळंब्याच्या कल्पना साकार होत नाहीत अशी निराशा झाली!! तेव्हा १९१७ पासून कळंब्यांनी योग साधनेत व शिवमूर्तीच्या शिल्पात आपला काळ घालविला!!!

सन १९०१ ते १९१० ही वर्षे भारतीय स्वातंत्र्यान्दोलनाच्या दृष्टीने पुलकित झालेली आहेत. प्राथमिक शिक्षकांनीही आपल्या राष्ट्रीय कर्तव्याचा बेलभंडारा मुठी भरभरून स्वातंत्र्याच्या शिवशक्तीवर मुक्त हस्ते उधळला. अशा शिक्षकांपैकी सातारा जिल्ह्यातील कृष्णाजी मारुती कळंबे, लक्ष्मण हरी

पराडकर, बाळकृष्ण भाऊ जोशी, नारायण कृष्ण भावे आणि बाळकृष्ण सावळाराम बुधकर यांना शिक्षकाग्रणी "समर्थपंचायतन" असे संबोधण्याची प्रथा इतिहाससंशोधक शिक्षक कृष्णाजी विष्णु आचार्य यांनी सुरू केली. यांचे साथीदार एकनाथ ज्ञानोबा गुरव (भिलवडी), तालीम मास्तर नातू (मसूर), गोपाळ बंडू गुरव (जेऊर), आत्मारामपंत हळवे (तारळे) यांचे माध्यान्ह-रात्री साहाय्य असे. आपली नेमणूक वा बदली कोठे होते याबद्दल तक्रार न करता, नोकरीच्या गांवी आखाडा नसल्यास तो सुरू करणे, मुकाटचा मुकाटचा राष्ट्रीय विचारांची दीक्षा (कायदेशीरपणे प्रतिबंधित असलेले पोवाडे, प्रबंध वाचूनही) देणे, हत्यारे बनविण्याची कला समजाविणे व स्वदेशीचा प्रसार करणे, हे या शिक्षकांचे सर्वसाधारण कार्यक्रम असत. राष्ट्राची रचना शाळाशाळांच्या वर्गावर्गातूनच होत असते, हे या मंडळींचे वर्तनसूत्र होते. भावे-कळंब्याप्रमाणे पराडकर पट्टीचे वक्ते व कविलेखक होते. 'विजयाचे हृद्गत' ही काळमधील लेखमाला त्यांचीच. १९०६ साली खात्याने त्यांचा राजिनामा घेतला ! रामकृष्णदास या नांवाने ते पुढे संचार करू लागले. संगमनेरच्या जंगल सत्याग्रहात (१९३०) त्यांना शिक्षा झाली आणि भागानगर सत्या-ग्रहास जात असताच ते हुतात्मा झाले ! ! पंचायतनापैकी बाळकृष्ण भाऊ जोशानी कळंब्यांच्या बरोबर १९०४ साली विलायती कापडाच्या होळीत भाग घेतला होता म्हणून दंड झाला होता. तो त्यांच्या मित्र मंडळींनीच भरला होता ! ! उन्हाळ्याच्या सुट्टीत बंदुकांच्या नेमबाजीचा सराव करण्याचा त्यांचा परिपाठ असे. हनुमान उपासना ते स्वतः करीत व विद्यार्थ्यांना देत. 'भगवंती जेणे घडे अंतराय। होका बाप माय त्यजावी ते।" हा पाठच-पुस्तकातील अभंग बाळकृष्ण भाऊनी शिकविल्यावर विद्यार्थी ईश्वरप्राप्तीसाठी घर सोडून गेल्याचा एक प्रसंग घडला; तेव्हा ते तरुणाना बिघडवितात व त्यांचा भगवंत म्हणजे भारतीय स्वातंत्र्य असाच अर्थ लोक व सरकारी अधिकारी करीत. १९११ तील वनवासानंतर ते पुण्यास मुद्रणव्यवसाय व वाङ्मय निर्मिती करूनच १९६५ साली देवाचरणी गेले ! !

समर्थ पंचायतनातील बाळकृष्ण सावळाराम बुधकर हे "आहे तरी सर्वा ठायी। पाहो जाता कोठेच नाही॥" या अटीतटीने वागले म्हणून पोलिसी कचाटा होऊनही शेवटपर्यंत सरकारी नोकरीत निभावले. कळंबे, भावे, जोशी, पराडकर यांच्या कार्यात सहकार देण्याशिवाय यांचा स्वतंत्र खाक्या म्हणजे आपल्या निवडक विद्यार्थ्यांकडून व स्वतः कीर्तने–प्रवचने करणे हा ! आणि राष्ट्रीय भावनांचा नुसता नंदादीपच सांभाळला असे नव्हे तर उत्थानाच्या उसळलेल्या डोंबालाही १९४६ अखेर पोसले. या समर्थ पंचायतनाचे साहाय्यक म्हणून कुंभारगावचे बापूसाहेब चव्हाण, सुपन्याचे दादा पाटील,

अनंतदास रामदासी मर्ढेकर, त्र्यंबक गंगाधर मराठे, तासगावचे आबासाहेब जोग, भाऊ गोपाळ पराडकर कार्यतत्पर रहात. पैकी मराठे जॅक्सन खुनामुळे उद्भूत झालेल्या नाशीक कटात "पिस्तुले वाटणारे" म्हणून गोवले गेले व त्यांना प्रदीर्घ कारावासाची शिक्षा झाली. भाऊ पराडकराचे शिवचरित्रावरील नाटक जप्त झाले. व १९०६ पासून देशी माग घालून व स्वदेशी कापडाचे दुकान कऱ्हाडात चालवून, क्रांति सेवा करणारे बाबूराव अंगापूरकर सज्जनगडावरील गुप्त बैठकीहून परत येत असता, सातारला पोलिसांच्या तावडीत सापडले व अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडण्यासारखा मार कऱ्हाडच्या भर चावडीवर खाऊनही पोलिसाला हवा तसा जबाब देईनात, म्हणून त्यांच्या दुकानची व अनुषंगाने त्यांच्या स्नेहीसंबंधितांची झडती होऊनही काही हाती लागले नाही म्हणून कळंब्यांची शस्त्रास्त्रे कोठे आहेत ती दाखविण्याबद्दल अमानुष मार बसला! परिणामतः ते १९११ साली देवाघरी गेले! शिवाजी-उत्सवातील त्यांचे साथी भाऊ गरूड, नारायण पोतनीस व राघवेंद्र पाच्छापूरकर यास शिक्षणास कायमचे मुकावे लागले!! १९०८ साली कऱ्हाड येथील शुक्रवार पेठेच्या वनवासी राममंदिरात शिवाजी उत्सव वैशाख शु॥ २ स चाळीस एक विद्यार्थ्यांनी साजरा केला. कळंबे मास्तर, बाबूराव अंगापूरकर, त्यावेळचे कऱ्हाडचे लोक पुढारी भाऊसाहेब (रामचंद्र विष्णु) भागवत, बाळकृष्ण भाऊ जोशी यांपैकी कोणीतरी हा उत्सव करण्यास सांगितले, असा विद्यार्थ्यांकडून पोलिसास कबुली जबाब हवा होता. त्यांनी राममंदिराचे रस्ते रोखताच छत्तीस विद्यार्थी मंदिराच्या भिंतीवरून उड्या टाकून पसार झाले. पण भाऊकाका (सिद्धेश्वर यज्ञेश्वर) गरूड, नारायणराव पोतनीस, राघवेंद्र शेषो पाच्छापूरकर (पुढे उत्तर प्रदेशचे बाबा राघवदास) हे धीटपणे स्थिर राहिले. व आपण केसरीच्या वाचनाने शिवाजी उत्सव केला असे सांगून इतर कोणाची हजर असणारांची व नसणारांची नांवे न सांगता सगळी जबाबदारी स्वतःवर घेऊन बसले! परिणामतः त्यांना शाळेतून नांवे काढून घ्यावी लागली; कारण न घेते तर इतर विद्यार्थ्यांना व शिक्षकांना त्रास होत होता!! एवढेच नव्हे तर येईल तो धंदा परिस्थिती प्राप्त करून पण देशसेवेची बारिकसारिक कामे नियमितपणे व बाणेदारपणाने करीत करीत योगक्षेम गरुड, पोतनीसांना हालअपेष्टा आणि कष्टात चालवावा लागला!!!

कळंबे मास्तरांच्या संस्थेचे अनंतदास रामदासी मर्ढेकर हे प्राथमिक शिक्षक (ठाणे) सभासद ठाणे जिल्ह्यातील काका नाईकांच्या गुप्तसंस्थेचे ते सहानुभूतिक होते. १९०७ ते १९०९ या तीनही सालात कळंब्यांच्या संस्थेची पुण्यात वार्षिक अधिवेशने झाली. कळंब्यांचे एक फार मोठे सहकारी जसे नरहरपंत पिंपरीकर असत, तसेच मध्वाण्णा मास्तर (भिलवडी) सारखे

छोटे छोटे सहाय्यकही असत. कळंवे संघटनेची सभासद संख्या जवळ जवळ साडेचारशेपर्यंत होती. वार्षिक अधिवेशनास सहानुभूतिक संस्थांचे सभासद येत. पण अशी अधिवेशने उघडे होण्याला आव्हान आहे हे लक्षात येताच ती बंद झाली.

सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेची स्फूर्ती घेऊन अगर लोकमान्यांच्या स्वदेशी चळवळीचा आदेश घेऊन काम करणाऱ्या देशभक्त प्राथमिक शिक्षकांनी सरकारी अभ्यासक्रमाच्या व क्रमिक पुस्तकांच्या खिडक्या–गवाक्षामधून उगवत्या पिढीची मनोवृत्ती राष्ट्रीयत्वाने विणून काढली. लोकमान्यांच्या होमरूल चळवळीत व महत्माजींच्या असहकार चळवळीत जे अनेकानेक नवे नेते आले, ते सगळे प्राथमिक शिक्षकांच्या देश भक्तीने उत्स्फूर्त विद्यार्थी होते. सरकारी नोकरीच्या बालेकिल्यात राहून ही शिक्षक मंडळी काळमधील (जप्त) लेखांचा फैलाव करीत; तसाच सावरकरादिकांचे पोवाडेही प्रसारीत. शाहीर गोविंदाचा अफझूलखानाचा पोवाडा, हा तर हटकून विद्यार्थ्यांच्या तोंडी असावयाचा. ' मराठा मनगट, कोठे तवधट, निगरगट्ट, रे बोल जरा। परक्या अमली तुजला कुमली, तारुण्यातच जरा ? " अशा ओळीनी समाज थरारून सोडण्याची कामगिरी आपल्या गाणाऱ्या व बोलक्या विद्यार्थ्यांकडून कीर्तने करवून सदर शिक्षक करवीत. " पूर्ण जो विसरला जडदेहा । स्वार्थलाभि न कदा मननेहा ।। राष्ट्रलीन मन होईल जेव्हा । राष्ट्रभक्ता म्हणणे मग तेव्हा ।। " अशा कितीतरी कविता नव्या नव्या विद्यार्थ्यांच्या तोंडी असत.

कळंब्याप्रमाणेच कऱ्हाडच्या बापूराव व बळवंतराव ढापरे बंधूचा एक हनुमान क्लब साताऱ्यात शनवार कासारदेवी जवळ होता. बॉम्बच्या सुलभ साधनेसाठी फोटोग्राफर व घड्याळजी असे हे दोन बंधू झाले होते. हा हनुमान क्लब नाशीकच्या अभिनव – भारताशी संबंधित असून त्याला सरदार आण्णासाहेब मुतालिकांचा सार्थ पाठिंबा होता. (श्री शाहू जून १९१० व दादासाहेब करंदीकर रोजनिशी) त्या क्लबात पांडुरंग महादेव बापट आले असताच त्यांना विलायतेस शिक्षण घेण्यासाठी मुतालिकांनी आपल्या भावाचा हुशार वर्ग बंधू म्हणून पूर्वी मोठी रक्कम दिली होती.

औंधचे पलायन पटु ड्रॉइंग मास्तर महादेव रामचंद्र हिंगे हे क्रांतीपथकात रामजी रावजी या नांवाने प्रसिद्ध असत. १९०६ साली कोल्हापूर शिवाजी क्लबच्या कर्तृव छायेतून आलेले (डॉ.) वा. वि. आठल्ये यांच्या सांगीसंगतीने एक क्रांती संस्था उभी केली. तिचे सभासद पुढे नारायण पांडुरंग मेहेंदळे (मूळ अभिनव भारताचे) व नारायणराव इंगळेही झाले. औंधचा रखवालदार दादू रामोशी हाही अभिनव भारताचा सभासद होता.

आठल्ये–हिंगे यांची क्रांतीसंस्था मग कळंबे मास्तरांच्या संस्थेशी सहकार-समन्वय साधू लागली. कोल्हापूर, वाई, पुणे, नाशीक व बेळगांव येथील ‘ गुप्त ’ संस्थांशी आठल्यानी संबंध जोडले. योजनात्मकतेची व दूरदर्शनाची त्या सर्व संस्थामधील उणीव आठल्यांच्या लवकर ध्यानात आली. सर्व गुप्ती–क्रांती-संस्थांचे संघटन करावे, बंगाल मधीलही तत्सदृश्य संस्थांशी एकसूत्र असावे ही कल्पना त्यांनी सर्व संस्थांपुढे ठेवली. कळंब्यांना ती पटली. त्या दृष्टीने डॉ. आठल्यांनी कमालीचा प्रयत्न केला. आठल्यांच्या संस्थेचे दोनशे सभासद झाले. स्वातंत्र्य संपादण्याच्या कल्पनेचा प्रसार, सभासदांची पारखून वाढ, शस्त्रांची जमवाजमव, गनिमी कावा, युद्धशास्त्राचा अभ्यास, गुप्ती संस्थांचे (प्रथम महाराष्ट्रापुरते तरी) एकमुखीकरण, आणि बंगाली संस्थांशी स्नेहसंवर्धन अशा सहा हेतूंनी १९०६ ते १९१० पर्यंत या मंडळीनी जीवापाड खटपट केली. बेळगावच्या मंडळींच्यामार्फत गोव्यातील दादा वैद्यांशी संधाने बांधली. डॉ. सन्यत्सेन यांचे ग्रंथ, तरुण तुर्कीच्या अभिनव प्रयत्नावरील ग्रंथ, रशियन क्रांती संघटना, यांचा आठल्यानी मनःपूर्वक अभ्यास केला. त्याच्या जोरावर आपली संस्था छोटे राज्ययंत्र व्हावे, अशी त्यांची आकांक्षा होती. (सेनापती) बापटांनी आणलेला बॉम्बचा फॉर्म्युला आठल्यांना मिळाला होता; पण महादेवराव हिंग्यानी स्वदेशी स्फोटकांच्या जोरावर स्वदेशीच बॉम्ब बनविला. हिंदुस्थानात व्यापक क्रांती होईल त्यावेळी बलुचिस्तानापासून सरहद्दीवर उठाव होईल अशी व्यवस्था घडवून आणणेचा मनसुबाही आठल्यांनी आखला होता. रौलेट कमेटीचा रिपोर्ट म्हणतो की " त्याकाळी नाशीक, ग्वाल्हेर, अहमदाबाद, सातारा, पुणे येथून दहशतवादी कारवाया होत, त्यांचे अहवाल परस्परांकडे जात आणि या सर्व घडचाळांची किल्ली लंडनप्रमाणेच पॅरिसमध्ये होती. ते दोनही किल्लीदार टिळकांचे ज्वलज्जहाल अनुयायी होते. "

कोल्हापूरच्या रेसिडेंटची मर्जी १८९९ मध्ये कोल्हापूर शिवाजी क्लब विरुद्ध फिरल्याबरोबर, ऐनजिनसी शिवाजी क्लबच बेकायदेशीर असल्याचे छत्रपतीनी जाहीर केले होते. शिवाजी क्लबाचे संबंध आपण होऊन एक हजार रुपये मदत पोचविण्याइतके बीड आणि औरंगाबाद येथील तसल्याच संस्थांशी होते. कारण त्या बाजूस सशस्त्र बंडाची तयारी होत होती. लष्कराने ती मोडली ! त्यामुळे पांच वर्षातच १९०४ साली शिवाजी क्लबचे पुनरुज्जीवन ‘ बेलापूरस्वामी क्लब ’ या नांवाने झाले व लोकमान्य टिळकांच्या जहाल सन-दशीर चळवळीच्या धर्तीवर राजकारणाचे उहापोह सुरू झाले. (लठ्ठेकृत शाहू-चरित्र व चिरोलकृत भारतीय असंतोष पहा). १९०८ साली बेलापूर स्वामी क्लबचे प्रत्यक्ष सभासद नसले तरी जुन्या बाद शिवाजी क्लबचे सभासद म्हणून

कोल्हापूर राजकन्येच्या विवाह प्रसंगी मुंबईच्या राज्यपालासुद्धा जे युरोपियन पाहुणे यावयाचे होते, त्यांची शंभरी भरून टाकावयाची, असा त्यांचा बेत होता. परशुराम सुताराकडे हे दिव्य सोपविले होते. त्याला त्या युरोपियन पाहुण्यात प्रवेश मिळाला नाही. बॉम्ब–प्रेमी पैकी विचारवंताना युरोपियनांच्या सामुदाईक " कानपुरीकरणाला " राजपुत्री विवाहाचा मुहूर्त हा कुमुहूर्त वाटत होता. कारण त्यात स्वत: छत्रपतीना व त्यातल्या त्यात स्वतंत्र संस्थानला धोका होता.

कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचे गंगाधर (नाना) विश्वनाथ गोखले हत्यारे जमविण्याचे आवडीचे होते. पुण्यास सायन्स कॉलेजमध्ये शिकत असता न्यू स्कूल मधील गद्रे मास्तर व नाना नागपूरकर गोखले यांच्या मदतीने बॉम्बची विद्या गोविंदराव बापटांच्याकडून शिकून बसले. नाशीकच्या फिरकीच्या तांब्यात स्फोटके भरून हे बॉम्ब होत. त्यातील काही ट्रंकेत घालून गोखले यांनी कोल्हापुरास नेले व ते फडणीस मास्तराकडे ठेवले. शिवाजी क्लबचे उत्तमराव शेणोलीकर, नारायणराव अंबपकर व दामू जोशी हे बॉम्ब करण्याच्या फंदात होतेच.

दामू जोशी पुण्याचे धाडशी संशोधक गोविंदराव बापटांशी गट्टी करून होता. बापटांनी कॅरडाइटचा शोध लावला, तो दामूकडून रसायने पैदा करून. दामूने कोल्हापूरास स्वतंत्र बॉम्बचा कारखाना काढण्याचा प्रयत्न केला. त्यात शेणोलीकर, पाध्ये, अंबपकर, वडणगेकर, सुतार असे सहाय्यक होते. त्याच्या आगोदर १८९७ साली तीनशे लोकांनी बीड शहर लुटले, त्यात दामूने गाजविली होती. १९०० साली पाटोळे फितूर झाल्याने शिवाजी क्लबची बित्तंबातमी रेसिडेंटकडे फुटल्याने वासुकाका जोशीनी दामूस पुण्यास नेले. पुढे खाडीलकरांबरोबर नेपाळात पाठविले. पुढे १९०८ साली, कोल्हापूर बॉम्ब केसमध्ये नाना गोखले, दामू जोशी प्रभृती सगळेच गोवले गेले व शिक्षा पावले.

रेसिडेंट कर्नल फेरिस कोल्हापूर सोडताना १६–४–१९०८ ला त्याच्या डब्यावर दामू जोशीने दणका उडवला. कोल्हापूरच्या मोडकास कर्नल फेरिसचे खुनाचे चिथावणीचे आरोपाखाली सात वर्षाची शिक्षा झाली. कृ. गो. कर्वे यांचा आप्त जनार्दन नरसिंह थत्ते याने हायकोर्ट जज्जाना धमकीची पत्रे (निनांवी) लिहिली म्हणून मार्च १९११ मध्ये दोन वर्षे सक्तमजुरी झाली. रेसिडेन्टवर बॉम्ब उडताच १९०८ साली, त्याच्या निषेधार्थ छत्रपतीनी जाहीर सभा घेतली होती. तर त्यांचे बगलबच्चाशिवाय तिकडे कोणी फिरकले नव्हते. उलट बॉम्बचा पुरस्कार करणारी शेणोलीकरलिखित भितीपत्रके लागली होती. (चिरोलकृत भारतीय असंतोष पहा.) मग सरकार भडकले व जोडता येतील तसे संबंध जोडून सरकारने खटले केले व १९०९ जानेवारीत आरोपितांस शिक्षा दिल्या. बापट व गोखले यांना सात वर्षे, शेणोलीकर व अंबपकर यांना ५ वर्षे, परशुराम सुतार यास दोन वर्षे, पाडळकर व वहिंगकर यास एक वर्ष,

पाध्ये यास नऊ महिने, दामू जोशी पुराव्या अभावी सुटला. पण घड्याळ चोरीचा आरोप ठेवून त्यास तावडतोब अटक केली. दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दिली. त्यातून तो पळून गेला. बाहेर कामावर गेला असता राजारामपुरीत एका खाणीत काम करीत असता बरोबरीच्या शिपायास बांधून ठेवून पायातील बेड्या तोडून पलायन केले. तो खानदेशात पळून गेला. तेथे दोन वर्षे एका गिरणीचा मॅनेजर म्हणून होता. त्याने सर्व्हिसच्या मोटरी ठेवल्या होत्या; पण त्याचा सुगावा कोल्हापूरच्या पोलिसांना लागला. पकडला गेला. चोवीस वर्षांची शिक्षा झाली. पण १९११ ते १९१९ पर्यंतच ती शिक्षा भोगून पळ काढला व मध्यप्रांतात सखाराम दादा पाटील या नांवाने मोटारीचा धंदा करीत राहिला. त्यावेळी त्याला दामू सोनाराचा वाईला आश्रय होता. पण पुन्हा १९२७ मध्ये तो पकडला गेला आणि पोलिस छळाने नेस्तनाबूत झाला. शेवटी हतबुद्ध स्थितीत तो १९५० साली इहलोक सोडून गेला.

कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचे सभासद श्रीपाद दत्तात्रय ऊर्फ नानासाहेब नागपूरकर हे तोफा–बंदुका तयार करण्याचे शिक्षण घेण्यासाठी वयाच्या १६ व्या वर्षी कोल्हापूरहून हैदराबादेस १८९९ मध्ये पळाले. नेपाळमध्ये जाण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. पण जमले नाही. १९०८ साली आपल्यावर वारंट आहे असे कळताच कोल्हापूर-मिरज करीत ते बेळगाव येथे सी. आय्. डी. च्या कॉलिजर साहेबांचे तंबूत हजर झाले. कोल्हापूर बॉम्ब केसपायी त्यांना दोन वर्षे कच्च्या कैदेत काढावी लागली. पुराव्याचे अभावी क्लेमंट साहेबानी त्यांना निर्दोष सोडले. मग चार वर्षे त्यांनी मुंबई, बिलिमोरिया, अंबरनाथ येथे हमाली करून काढली. सांगलीस समर्थ व्यायाममंदिर म्हणून प्रसिद्ध असलेली संस्था म्हणजे "रघु आपटे" या उस्तादाने स्थापलेली मूळ कुस्तीची तालीम. शारीरिक व्यायामाबरोबर देशभक्तीचे शिक्षण तेथे दिले जाई व निवडक मंडळीकडून स्वतःच्या रक्ताने प्रतिज्ञा पत्रकावर सही घेऊन क्रांती संघटना बांधली जाई. सांगली एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख तोरो, (पुण्याचे) कै. डॉ. बा. चिं. लागूप्रभृति मंडळी त्या प्रतिज्ञाबद्धात होती.

कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचा सभासद दामू (दामोदर) (दुसाने) सोनार हा मूळ कऱ्हाडचा. १८९६-९७ च्या प्लेगात क्लबच्या कांही अपरिपक्व मंडळीनी शस्त्र विद्येसाठी चोऱ्या करून द्रव्य मिळविले. त्याचे सोने चांदी बेमालूम आटवणेसाठी त्या मंडळींची दामूकडील वाढती बैठक डोळयावर आल्यावर पोलिसांची झडप दामूवर आली. १८९९ मध्ये दामूला अकरा महिन्यांची शिक्षा झाली. तुरुंगात चक्की दळणारा हा वीस वर्षांचा दामू दुसाने नंतर "गुप्ते" झाला. कोल्हापूर ते कऱ्हाड व कऱ्हाड ते वऱ्हाड अशा हुलकावण्या देत दामू सोनार रेल्वेत नोकरीस राहिला. आपलाच क्लबबंधू

दामू जोशी याला त्याने आधार देऊन नेपाळात हणमंतराव कुलकर्णीकडे जाण्यास मदत केली. दामू सोनारास पुढे रेल्वेतील नोकरीसही रामराम ठोकावा लागला. त्यानंतर भटकंती करीत नेपाळातून पंजाबात आलेले हणमंतराव कुलकर्णी यांची गांठ १९०९ त पडल्यावर त्यांच्या मृत्यूपर्यंत दामू सोनार त्यांच्या सेवेत होता. त्यानंतर बेलापूर जवळील केशव गोविंदाचे वनात प्रवरेच्या काठी एका जुनाट गुंफेत विद्यानंद सरस्वती स्वामी महाराज (१८५७ च्या अवशिष्ट उत्थापकांपैकी एक) यांच्या समाधी (१९०५) जवळ मनःशान्तीसाठी दामू सोनार असतानाच वऱ्हाडात मोटारीचा धंदा टोपण नांवाने करणाऱ्या दामू जोशाला त्याचा वशिला–आधार होता. पुन्हा दामू जोशी पकडला गेल्यावर दामु सोनार पुण्यास आपल्या कन्येकडे जख्खड होईपर्यंत राहिले.

मिरज संस्थानातील लक्ष्मेश्वरचे डॉ. गोविंद जनार्दन मायदेव यांनी देशभक्तीची दीक्षा दिलेले शं. वि. (बाबा) लेले १९०५ साली सांगलीस शिकावयास राहिल्यावर उगारचे तुळपुळे, खाडिलकर, देसाई मंडळी बरोबर १९०६ साली मिरजेच्या गोपाळराव पाटणकराकडून अभिनव–भारत–संस्थेची दीक्षा घेऊन बसले. १९०८ च्या खुदीराम बोसच्या बॉम्ब फेकीने लेले तिकडे आकर्षित झाले. लेले व तुळपुळे यांचा तयार होत असलेला बॉम्ब उगार येथे अकाली फुटून लेले जखमीच जखमी झाले. दोन तीन महिन्यांनी जखमातून बरे झालेले लेले सांगलीस शाळेत जाऊ लागताच पोलीस तपास मागे लागला ! पण (कळंबे क्लब मधील) माधवराव देवधरांनी तासगावात शंकर गणेश लेले प्लेगने मेला होता त्याचा फायदा घेऊन ‘ शंकर लेले ’ मेला अशी माहिती देऊन शं. वि. लेलेस वाचविले !! पुढे नाना म्हसाळ यास आपलासा करून घेणेसाठी केंपवाडकर मारुतराव पेहेलवान यांच्या मध्यस्थीने लेलेप्रभृती उगारकरांनी प्रयत्न केले, शेडबाळच्या बेरडांची टोळीही बंडास उठतेका पाहिले पण काहीच जमले नाही.

उगारच्या मंडळीपैकी महादेव (शास्त्री) सन १९०६ साली परदेशी कपड्यांची होळी करून बेळगावच्या न्यूप्रिपरेटरी क्लासच्या माडीवर (डॉ.) नारायणराव हर्डीकरासमवेत क्रांतीची शपथ घेऊन राहिला होता. महादेव दिवेकर पुढे सांगलीस मॅट्रीकसाठी आल्यावर (पुढे सोलापुरास सराफ झालेले) नरुभाऊ खाडीलकर यांच्या नेतृत्वाने बॉम्ब करू लागला. सांगलीस पद्माकरपंत भिडयांच्याकडे दोनदा तो खटाटोप झाला. टिळकाना मंडालेची शिक्षा झाल्यामुळे सांगलीतील स. जज्ज बाळासाहेब सोमण यांजकडे बेळगांवचे गंगाधरराव देशपांडे येत म्हणून सोमणांना नोकरीस मुकावे लागले व हायस्कूल शुकशुकाट करण्यात पुढाकार घेणाऱ्या दिवेकराला कारभारी बर्क याने शाळेतून काढून टाकले. मग उगारात दिवेकराने दाण्डपट्टा, बंदुकीची नेमबाजी

याचा आचार–प्रचार केला. श्रीपादराव खाडीलकर हे त्याकामी साथी होते. नंतर तळेगावच्या समर्थ विद्यालयात महादेव दिवेकर गेले. तेथे १९१० पर्यंत दिनकर शास्त्री कानडे यांच्या बरोबर क्रांतीच्या गोष्टी ते करीत. वैयक्तिक जबाबदारीनेही काही क्रांती प्रयत्न जिल्ह्यातील लोकांनी केले.

लोकमान्य टिळकाना शिक्षा झाल्यावर (१९०८) तिचा प्रतिकार करण्यासाठी पंढरपुरास बॉम्ब तयार करू लागलेला व नियमितपणे शिवाजी, गणपत्युत्सव करीत असलेला मारुती गणेश भोसले हा मूळ मिरजेचाच! त्यापेक्षाही नवलाची गोष्ट अशी की, सांगली संस्थानचे ब्रिटिश कारभारी लोकप्रिय होते तरीही त्या संस्थानात केसरीचे लेख वाचून नाना मिसाळ नांवाचा एक तरूण धनगर ब्रिटिशासह संस्थानिक "स्वाहा" झाले तरी चालतील, पण भारत स्वतंत्र झाला पाहिजे अशा विचाराने बंडास प्रवृत्त झाला. कटकोळीच्या तरुणाला १९०६ सालीच न्या. पाटकरांनी शिक्षा लावली. तो १९३६ साली सुटला व पुढे जगातूनही कायमचाच निसटला!! कऱ्हाड कळंबे क्लबाची मंडळी १९१५ च्या बेतात जर्मनीहून काही शस्त्रास्त्रे मिळविण्याच्या बेतात होती, तीत तेरदळचे श्रीनिवास पाटीलही माहितगार होते. सांगली – मिरज – बेळगांव भागातील तरुण लोकमान्यांना शिक्षा झाल्यापासून इंग्रजी राजवटीवर असे चिडलेलेच होते. पहा की १९१० साली एडवर्ड बादशहा दिवंगत झाले, तर ती बातमी आल्याच्या दिवशी सांगलीच्या दत्तात्रय शेवडे या विद्यार्थ्याने साखर वाटली!! त्यामुळे त्याचे थोरले भावास संस्थानी नोकरीस मुकावे लागले व दुसरा भाऊ कचेऱ्याना शाई पुरवी, ती बंद करण्यात आली. एवढेच काय, दत्तात्रय शेवडे व इतर मधुकरी मंडळी यांना संस्थानी मठातून जेवण मिळत असे ते बंद झाले!! १२ डिसेंबर १९११ ला दिल्लीस पंचमजार्ज बादशहाचा राज्यारोहण समारंभ होता तर ११ डिसेंबर १९११ रोजी रात्रौ सांगलीच्या घाटावर द्व्यर्थी पत्रके लागली "बादशहा चिरा – यु होवो (खोडलेले)"–त्याबाबत वासुदेव फडके, गोविंद वझे व महादेव लुगडे यांना वीस, पंधरा व दोन वर्षांची सक्तमजुरी झाली. सहा महिन्यानंतर लुगडे हा लहान म्हणून सुटला!!

रौलेट कमेटीच्या रिपोर्टाप्रमाणे समन्वय सहकाराने एक चळवळ बॉम्बची कलकत्त्यातील अनुशीलन समिती, नाशीक येथील सावरकर सदन, लाहोर मधील भाई परमानंदांचा निवास अशी भारतभर चालू होती. लंडन, पॅरिस येथून त्या चळवळीची सूत्रे हलत. मिरजेचे ब्रिटिश गुप्तचर एस. जी. वैद्य यांच्या दैनंदीनीतील नोंदीप्रमाणे सातारा जिल्ह्यातील या दहशतवादी दलाचे काम करणारी मंडळी म्हणजे कृष्णाजी पांडुरंग भोसेकर, वा. वि. आठल्ये, नारायण पांडुरंग मेहेंदळे, माधवराव हिंगे, इंगळे, ढापरेबंधू, मास्तर कळंबे, आबा-

साहेब जोग व कृष्णाजी ऊर्फ आण्णाजी गोपाळ कर्वे, गोपाळ काशिनाथ पाटणकर, सदाशिव विद्याधर कवडीकर, रामकृष्ण रघुनाथ जोशी, रामचंद्र रघुनाथ जोशी, के. एन. साठे, भालचंद्र मार्तंड वा तात्या नित्सुरे ही प्रामुख्याने होती. याशिवाय बंगालमधील " देशेरकथांचे " संचालक व स्वराज्य शब्द दादाभाई नौरोजीस समजावून, पटवून उच्चारविणारे सखाराम गणेश देऊसकर आणि त्यांचे भाचे व " आज " या हिंदी पत्राचे संपादक बाबूराव पराडकर ही मंडळी साताऱ्येच नांव सांगत. धारवाडचा दादा म्हणून प्रसिद्ध असलेला देशस्थ वैष्णव म्हणजे तीशीचे वय सांगणारा लक्ष्मण पत्की हा कृष्णाजी आबाजी गुरुजीचा चेला असून तो १८९७-९८ त कुरुंदवाडास ह. कुलकर्णी याजबरोबर असे. तो त्या कुलकर्ण्यां-बरोबरच १८९८–९९ मध्ये बीडकडे गेला. तेथील खळबळीनंतर तो पुण्यास कृ. प्र. खाडीलकरांकडे आला व १९०४ मध्ये मुंबईस होता. औरंगाबादकडे त्याच्या १९१० पर्यंत खेपा असतच. पण यांच्यापेक्षाही भोसले (ता. कोरेगाव) येथील कृ. पां. भोसेकर हे एक अद्‌भूतरम्य चरित्र आहे. तारळे येथे १८९१ त्याचा आजोळी जन्म झाला. पुण्याच्या महाराष्ट्र हायस्कूलमध्ये १९०६ त इंग्रजी सातवीचे शिक्षण घेतल्यावर आण्णासाहेब दास्ताने, कृष्णाजी गोपाळ कर्वे, व्यंकटेश परशुराम नागपूरकरादिकांचा हा वर्गबंधू १९०७ मध्ये मुंबईच्या तांत्रिक शिक्षणालयांत गेला. १९०८ मे मध्ये पांडुरंग महादेव बापट हिंदुस्था-नात परत आले असता, त्यांना आण्णासाहेब दास्ताने यांच्या सांगण्यावरून सुरी येथील हरी अनंत थिटयांच्या घरी भोसेकर भेटले. १९०९ मध्येही एप्रिलात तापी-दरीतील नारदना स्टेशनवर भोसेकर भेटले आणि तेथून बापटाना वदवानी येथील केशवराव देवळालीकर यांच्या घरी लपवून परतले. पण १९०९ च्या १७ ते २२ जूनच्या दरम्यान भोसेकरांनी दडी मारली ती धुळयाच्या शंकर वामन जोशांच्याकडे. ता. १९ जून रोजी त्यांनी जोशाना मनमाडला पाठवून आर. व्ही. पराडकरांच्या हस्ते अशी व्यवस्था करावयास लावली की बेलापूरहून जणू भोसेकरांनी गुप्त हेर खात्याच्या डेप्यूटी कमिशनरला केलेल्या तारा त्यांना मिळाव्या, यानंतर खटल्या खोकल्या पार झालेले भोसेकर १९१५ मध्ये आपले मित्र भार्गव कृष्ण गोखले यांना अमेरिके-तील जनरल डिलिव्हरीबर्क्ले (कालिफोर्निया) येथून पत्रव्यवहाराने उमगले. गोखले इंटर नॅशनल हाऊस २०२६ सेंट्रल स्ट्रीट मुंबई येथे रहात होते. पुढे १९१७ जानेवारीत कॅनडा इंडिया लीगचे प्रेसिडेंट जे. ई. डॉब्स् यांचेकडे भोसेकर असल्याचा उमग होतो व तेथून बर्लिन मधील साने याशी संपर्क राखीत होते. गदर चळवळीतील त्यांचा भाग हे अजून बंदिस्त पुस्तक असून ४ फेब्रुवारी १९१९ रोजी अपघातामुळे कालिफोर्नियातील नदी काठच्या इस्पितळात त्यांचा अंत झाल्याचा मात्र दाखला मिळतो.

बोरखळ (ता. सातारा) येथील आठवणीकार सदाशिव विनायक बापट हे टिळकांना मंडालेची शिक्षा झाल्यावर मुंबईचे राज्यपाल सर जार्ज क्लार्क यांच्यावर झालेल्या प्रयोगात सामील होतेच. पुढे नाशीक (जॅक्सन) प्रकरणातील आरोपीचे बचावासाठी यांनी फंड जमविला. नाशीक कटात जी ब्राऊनिंग पिस्तुले विलायतेहून आली होती, त्यातील सहा बसगिरीबुवामार्फत बापटाकडे आली होती. ती त्यांनी गांधी (वकील) वाड्याच्या भुयारात ठेवली होती. त्याची बातमी फुटताच, सी. आय. डी. च्या बाबासाहेब देशपांड्यांनी सदाशिवरावांना हंटरखाली फोडले पण त्यांना पिस्तुले तर राहुद्याच पण त्यासंबंधी काहीही माहिती मिळाली नाही.

सावरकरांच्या अभिनव भारत संस्थेची चळवळ मिरजेत प्रथम विनायकराव ऊर्फ तात्यासाहेब कुर्लेकर यांनी आणली. दहाबारा जणांना त्यांनी शपथबद्ध केले. त्यात दामोदर मोरेश्वर भट होते. १९०७ साली लंडनप्रमाणेच १८५७ च्या उठावाचा अर्धशतसांवत्सरिक उत्सव मिरजेस भटप्रभृतींनी केलाच. शिवाजी उत्सवाचा उपक्रम लोक–जागृतीसाठी अव्याहत व्रताने चालविण्यात भटांची १९६५ पर्यंतही तपश्चर्या आहे. तसेच सातारा हायस्कूलमध्ये शिकत असल्यापासून "वंदेमातरम्" चा घोष भिंतीभिंतीवर लिहिणारा ईस्माईलनूरमहंमद हाकीम येवल्यास रेव्हेन्यू खात्यात नोकरीस लागल्यावर अखिल भारतीय रेव्होल्यूशनरी पार्टीचे सभासद झाले. बालकन संस्थाने व तुर्कस्तान यांचे व इंग्रजांचे १९१० चे सुमारास फिसकटले तेव्हा अफगाणिस्तानने कैसरीकंदनाच्यावेळी हिंदुस्थानला स्वतंत्र होण्यास मदत करावी अशा अपेक्षेने हाकिमांच्या हातचाली सुरू होताच हाकिमाना सिंगापूर येथे १८१८ च्या रेग्युलेशनखाली डेटेन्यू करण्यात आले. तेथून व्हर्सायच्या तहानंतर सुटले.

काळपत्राचे वाचनापासून क्रांती कल्पनांच्या नादात १९०५ ते १९१२ कोरेगांवचे (सात्विक कादंबरीकार) नारायण हरी आपटे सर्व हिंदुस्थानभर हिंडले. कोरेगावी कळंबे भोसेकर क्रांतीवाद शिकवीत असता, आपटे जयपूरला रासबिहारी घोष यांशी सशस्त्र बंडाची खलबते करीत होते. विवेकानंदांच्या बेलूर मठातील क्रांतीकारकांसही आपटे भेटले. दिल्ली प्रवेशाचे वेळी लॉर्ड हार्डिजवर (१९१२) साली बॉंब पडला तेव्हा आपटे तेथे होते. १९१२ साली अर्जुनदास शेठींची शाळा राजद्रोही ठरल्यावर तेथे विचारक्रांतीचे शिक्षक असलेले आपटे दक्षिणेत परतले. बंड उभारण्याच्या कल्पनेने भिल्लापासून मल्लापर्यंत लोक-परीक्षा करीत असता आपट्यांचा आढळ असा झाला की लोक टणक व तेजस्वी आहेत. पण गुणगौरवी नाहीत!!

सुधारकाचार्य आगरकरांचा पुतण्या नारायण विनायक (नाना) १८९२ साली न्यू इंग्लिश स्कूलचा हुशार विद्यार्थी व द्रविडांच्या तालमीचा पेहेलवान

होता. चाफेकर बंधू मूळ त्याच तालमीतील. विदेशी वस्तूंच्या जाळपोळीत व १८९४ च्या हिंदुमुस्लीम दंगलीत दारूवालापुलावर भाग घेणारात नाना होता. चाफेकर बंधूंना द्रविडांनी दगा दिला म्हणून द्रविडांचा काटा काढण्यात नाना होताच. मग स्वारी इंदूरास कतरली व लुगडी गिरणीत नोकरीस राहिली. तेथे रेसिडेंटच्या जिवाशी खेळ खेळण्याचा प्रयत्न केल्यामुळे हा टेंभूकर जन्मठेपेच्या शिक्षेस गेला. तो १९२८ त घरी परत आला व स्वाभिमानी भिकारी म्हणून १९५० त देवाघरी गेला !!

१९०८ ते १३ सरहद्दीवरील पुस्तू भाषा बोलणारे पठाण लोक अत्यंत निष्ठावान् लोक आहेत. पेशावर, लंडी, कोटाल, काबूल, ताशकंदपर्यंत खुष्कीच्या मार्गाने (लॅन्ड लाईन) रिपोर्ट पोचत. रशियन क्रांतीकारकानी ताशकंद इथे आशिया खंडातील क्रांतीकारकाना शिक्षण देण्याचे एक गुप्त केंद्र १९१३ साली उघडले होते. (खरे क्रॉनिकल) त्यात साताऱचे बळवंत दाजी ऊर्फ बाप्पा गोवईकर यांनी तर काबूल येथे १९२८ पर्यंत देशभक्तीचे व लष्करी शिक्षणाचे धडे देणारी प्राथमिक शाळा काढली होती. तीत तयार झालेल्या त्यावेळच्या विद्यार्थ्यांनीच १९४१ साली देशगौरव सुभाषचंद्र बोस यांना ब्रिटिश पकडबंदीच्या पार होण्यास सहाय्य केले, असा त्याकाली लोकध्वनी उमटला होता. ते काही असले तरी वरील सर्व तऱ्हांच्या क्रांतीप्रवण उभारांची बिरूदावली ठरते ती अशी की -- (१) ब्रिटिश साम्राज्यशाहीशी प्रत्यक्ष सामना दिल्याशिवाय पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही. (२) हा सामना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आघाड्यांवर द्यावयाचा. (३) तो यशस्वी करण्यासाठी हिंदुस्थानात, ना तर, बाहेरही भारतीय प्रतिसरकार स्थापावयाचे. (४) या प्रतिसरकारला स्वतःचे स्वातंत्र्य सैन्य हवे. (५) जागतिक युद्धाचा मोका साधून साम्राज्याशी सामना सुरू करावयाचा. (६) त्याची पूर्व तयारी श्रमजीवींच्या लढाऊ संघटनांनी करावयाची. (७) अपरिहार्य तेथें परदेशीयांचे ही साहाय्य घ्यावयाचे. (८) मात्र सामन्याचे नेतृत्व भारतीयच ठेवून त्याच्या हुकमतीतच परकीय पावले चालवावयाची आणि (९) तात्पुरत्या प्रतिसरकारने विजय मिळविला म्हणजे रीतसर लोकशाही घटनात्मक राज्ययंत्रणा निर्माण करावयाची ! हा वारसाच " चलेजाव " चळवळीच्या भूमीगत आंदोलनाकडे होता.

१३ : “ऐक्यवृत्तीचे” संरक्षण

जिल्ह्यात क्रांतीमनोवृत्ती कार्यान्वित असताही कलकत्याच्या (१९०६) राष्ट्रीय सभेने दिलेल्या चतु:सूत्रीपैकी स्वदेशीच्या बरोबरीला राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करता एक दोन ठिकाणी प्राथमिक शाळांचा प्रयत्न झाला, ही गोष्ट खरी; पण त्यापेक्षा प्रो. आण्णासाहेब विजापूरकरांनी सुरू केलेल्या ‘समर्थ विद्याल’यात घरंदाज मुले शिकावयास गेली हीच महत्त्वाची गोष्ट. समर्थ विद्यालय सरकारच्या दडपणाखाली बंद झाल्यावर तेथे काम करणाऱ्यापैकी डॉ. दत्तोपंत पटवर्धन, दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर वगैरे लोकांनी वाईस प्रस्थान ठेवले व कै. नारायणशास्त्री मराठे यांच्या नेतृत्वाखाली प्राज्ञपाठशाळा या संस्थेची उभारणी केली. मूळच्या पाठशाळेचे राष्ट्रीय शिक्षण संस्थेत रूपांतर केले. आणि स्वराज्याच्या बाबतीत बोलावयाचे तर शिवाजी महाराजांचा उत्सव सरकारी करड्या नजरेला न जुमानता झाले, आणि टिळकांचा आणि त्यांचा मतप्रणालीचा अभिमान धरून, वरिष्ठांची लवलवती करणाऱ्याचा तिटकारा करणारे पण कर्तव्यनिष्ठ, आणि तेजस्वी विद्यार्थी उत्पन्न व्हावे म्हणून जिवापाड झटणाऱ्या ट्रेन्ड शिक्षकांना पोलिसांचा ससेमिरा लागल्यामुळे रानोमाळ भटकावे लागले.

सदनशीर चळवळीच्या दृष्टीने पाहता त्या दहशतशाहीच्या काळात जिल्ह्याने स्वराज्याच्या चळवळीत एकदोन हात मारलेच आहेत. सन १९०७ साली व्हाईसरायच्या कौन्सिलपुढे सभा प्रतिबंधक कायदा असता त्याचा निषेध घाणेकर वकीलांच्या अध्यक्षतेखाली ता. २७ आक्टोबर रोजी दादासाहेब करंदीकरांनी ठराव मांडून केला व तो सभेचा ठराव ना. गोखले याजकडे धाडला; १९०८ च्या मार्च ९ तारखेस बिपिनचंद्र पाल सुटल्याबद्दल आर्थर हालमध्ये करंदीकरांच्या अध्यक्षतेखाली एक पर्स (६०० रु.) अर्पण करणेचे ठरले. ता. १२ एप्रिल रोजी जिल्हा सभेतर्फे सार्वजनिक हळदीकुंकवाचा समारंभ होऊन सौ. सत्यभामाबाई आगाशे, कु. मथुराबाई जोशी व सौ. सत्यभामाबाई काळे यांनी स्त्रियामध्ये “स्वदेशीमुळे-स्वराज्य” असे व्याख्यान दिले. एप्रिल महिनाभर प्रामुख्याने करून वाईला व इतरत्र थोडीफार मद्यपान निषेधाची चळवळ झाली. निगडी, लिंब (सातारा) तासगावसारख्या जवळ – लांबच्या ठिकाणी मे जून महिन्यात आगाशे, राजोपाध्ये, गोवईकर, फणसळकर, लक्ष्मणराव जोशी, घाणेकर, डॉ. भिडे, सोमण वगैरे जिल्ह्याच्या ठिकाणची

मंडळी स्वदेशीच्या प्रचारार्थ हिंडली; जुलईमध्ये लोकमान्यांना शिक्षा झाल्यावर तर सर्वत्र हरताळ आणि सभा झाल्या; आणि या गोष्टींनी आपआपल्यापरी त्या दहशतीच्या काळात जनतेच्या मनोवृत्तीला पुष्कळच धीर दिला. ओघानेच १९०६ साली कलकत्त्यास राष्ट्रीय सभेत ठरल्याप्रमाणे राष्ट्रीय सभेच्या कामासाठी जिल्हासभा स्थापण्यासाठी ता. २४ मार्च १९०७ रोजी साताऱ्यास घाणेकर वकिलांचे अध्यक्षतेखाली सभा भरून दादासाहेब करंदीकरांनी जिल्हा सभेचा वृत्तांत सांगितला. तेव्हा भाऊसाहेब सोमणांचे सूचनेवरून दादासाहेबांनी आठ लोकांच्या मदतीने तालुक्यातील लोकांचे सहाय्य मिळवावे असे ठरले. त्याप्रमाणे दादासाहेबांनी खटपट केली. शंकर श्रीधर चितळे यांना प्रचारक नेमले आणि सगळीकडे तालुका सभा स्थापून जिल्हा सभेची पूर्व तयारी केली. या तालुका सभा म्हणजे पूर्वीच्या "छोटया काँग्रेसांच्याच" आवृत्या निघू लागल्या. त्यापैकीच ता. २७ मे १९०७ रोजी तासगाव तालुका सभेचे अधिवेशन सदाशिवशास्त्री भिडे स्वागताध्यक्ष आणि श्रीनिवासराव चिपाडे अध्यक्ष यांनी अपूर्वाईने पार पाडले. सदर सभेस पांचशे शेतकरी जमला होता. तासगाव बरोबरीनेच विटयाचे सभेचा उल्लेख केला पाहिजे. ही १८ जून रोजी झाली आणि तिच्यात पांडु आण्णा शिराळकर, नरहर गोविंद रानडे, दत्ताप्रय श्रीधर रानडे, गणेश आप्पाजी मारूलकर, दत्तो कृष्ण जोशी, करंदीकर आणि विशेष म्हणजे शिवराम महादेव परांजपे यांनी प्रमुख भाग घेतला. विटयाच्या खालोखाल रहिमतपूर येथील शंकरशास्त्री महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली कोरेगांव तालुक्याची सभा होय. हिच्यात शेटेशेट, गोपाळराव परांजपे, करंदीकर वकील, कानिटकर, एरंडे वगैरे गृहस्थांनी उत्साहाने भाग घेतला होता. पण सभात सभा म्हणजे १९०८ च्या २४ मे रोजी झालेली दुसरी खटाव तालुका सभा. डॉ. भिडे अध्यक्ष होते. एक हजार शेतकरी मंडळी होती. "तालुका सभेचे महत्त्व, फॉरेस्ट, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, ग्रामपंचायती, शेतकऱ्यांची स्थिती, धान्याची कोठारे, पैसाफंड यासंबंधी अध्यक्षांचे उद्‌बोधक भाषण झाले." गायराने, स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, जमिनी खालसा होण्याचे अन्याय, गांवपंचायती, दारूबंदी, पाणीसारा यावर ठराव झाले. बापूराव वैद्य, घोडके, दरूजकर, दर्भे, मोतीराम दयाभाई, बाळजीपंत इनामदार यांनी भाषणे केलीच, पण सभेचे यश त्यांच्याच श्रमाचे फल होय. खटावच्या सभेचाच सही नमुना १९०९ ला पाटणची तिसरी तालुका परिषद नानासाहेब आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली भरली ती होय.

पण मागे एकदा उल्लेख केल्याप्रमाणे सिडनहॅम कारकीर्दीचा वरवंटा इलाख्यावर आणि म्हणूनच जिल्ह्यावर फिरू लागल्याकारणाने अशुभसा काळ

आलेला पाहून तालुका सभांनी "आपले हात आवरले" आणि कार्यकर्त्यांनी जिल्हा सभेच्या दृढीकरणावरच आपले चित्त दिले.

त्याचे असे झाले की, १९०७ च्या जूनअखेर जिल्हा सभास्थापन होताना विशेष अडचण नव्हती; ती सुरतेच्या राष्ट्रीय सभेतील जहाल–मवाळ बखेड्याने उत्पन्न केली. टिळक आणि गोखले हे दोन्ही अग्रणी सातारा जिल्ह्याला पूज्य होते. त्यांचे तात्विक, सात्विक, राजस, तामस कसलेही मतभेद असले तरी दुफळीने राष्ट्रीय प्रगतीचा गाडा अडू नये अशी तीव्र इच्छा सातारा जिल्ह्याची होती. म्हणून १९०६ साली जिल्हासभा स्थापन होताना स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य आणि राष्ट्रीय शिक्षण या धोरणावर ती स्थापन झाली होती. ते धोरण सोडण्याचा कदापि विचारही जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मनात आला नाही, तरी १९०८ मध्ये मार्चात झालेली जिल्हासभा फिरून आक्टोबरात भरवून कन्व्हेन्शन कमेटीतर्फे पुण्याचे गोपाळराव देवधर आले होते, त्यांच्या समक्ष जिल्ह्याने राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना एकी करण्याची विनंती आपल्या ठरावाने केली. पुढे ता. २६ नोव्हेंबर रोजी कन्व्हेन्शनला अनुसरून जिल्हा काँग्रेस कमेटी स्थापन करण्यासाठी लक्ष्मण कृष्ण जोशी यांच्या खटपटीने आर्थरहॉलमध्ये रा. ब. पाठकांचे अध्यक्षतेखाली सभा झाली असता फणसळकर, आगाशे यांनी प्रेक्षक म्हणून भाषण करून जिल्ह्यातील ऐक्याचे वातावरण बिघडवून दिले नाही. १९०८ च्या आक्टोबरमध्ये भरलेल्या तिसऱ्या जिल्हा सभेने रा. ब. पाठक, आगाशे, फणसळकर यांचा कमेटी नेमून 'मद्रासला सर्व पक्षांची काँग्रेस व्हावी' म्हणून खटपट करावी अशा अर्थाचा ठराव केला होता. त्याचा निर्देश करून काँग्रेसमधील नेत्या पक्षाचे ऐक्य आज शक्य नसले तर निदान सातारा जिल्ह्यातील परस्पर सहकार्याचा, सहानुभूतीचा आणि एकीकरणाचा लोकीक सातारा जिल्हा गमावू इच्छित नाही, असे सातारा जिल्ह्याने त्या ऐनवेळी जाहीर केले आणि ते व्रत अखंडपणे पुढे पाळले.

१४ : ‘ स्वराज्य आणि सहकार ’

दहशतशाहीसारख्या संकटांची क्षिती नाही. पण एका विशिष्ट अंशाखाली मनोवृत्तीचे तेज उतरताच कामा नये, एवढी तरी काळजी प्रत्येक पतित राष्ट्राला घ्यावी लागते. “ संघे शक्तिः कलौ युगे ” हा सातारा जिल्ह्याचा नुसता विश्वासच आहे असे नव्हे तर एकीशिवाय तरणोपाय नाही असा सातारा जिल्ह्याचा जवळ जवळ हट्ट आहे. राष्ट्रीय सभेत सुरतेस दुफळी झाली तरी जिल्ह्यात ती होऊ द्यावयाची नाही, किंबहुना विनवणी आणि प्रयत्न यांच्या जोरावर प्रांतात व पर्यायाने राष्ट्रात ती साधण्याचा शक्यतो प्रयत्न करावयाचा असा मनसुबा असल्याकारणाने राष्ट्रीय सभेतील मवाळ–जहाल पक्षानी एकी करून संयुक्त राष्ट्रीय सभा करावी म्हणून जिल्हा सभेने वेळोवेळी ठराव तर केलेच; पण १९१४ची प्रांतिक परिषद भरवून राष्ट्रीय सभेतील मवाळ–जहाल ऐक्याचा ‘ श्रीकार ’ सातारा जिल्ह्याने काढला. तथापि काळाचा ओघ कोणत्याही गोष्टीच्या परिपक्वतेला अनुकूल लागतो. तो तसा साधेपर्यंत देवघरातील नंदादीपाप्रमाणे तेजस्वी मनोवृत्तीची वात अखंड तेवत ठेवावी लागते. मग तिचा प्रकाश जगाचे डोळे दिपविण्याची गोष्टच सोडा, तो कोणाच्या नजरेत भरतो न भरतो हे सुद्धा कार्येच्छूने पाहून चालत नाही. १९१३ पर्यंत जिल्हा सभेची अधिवेशने तेवढी बिनचूक भरत गेली, त्याच्या पलीकडे काही झाले नाही. १९०८ सालीच (१) “ कार्यकारी मंडळाची सभा तालुक्या तालुक्यानिहाय सोईस्कर ठिकाणी दर दोन महिन्यांनी तरी भरवावी. (२) एकदोन विशिष्ट कामे क्रमाक्रमाने करावी. (३) प्रत्येक तालुक्याची औद्योगिक पहाणी करावी. ” अशा तासगावकरांकडून आलेल्या सूचनापैकी एकही अमलात आली नाही. याबद्दल १९१३ च्या तासगाव येथील जिल्हासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष नानासाहेब आगाशे यांनी विषाद प्रदर्शित केला आहे. पण तो केवळ नंदादीपाची काजळी झाडण्यासाठी दिलेला झटकारा आहे.

तात्पर्य दहशतशाहीच्या काळात कलकत्याचे राष्ट्रीय सभेने दिलेल्या चतुःसूत्रींवरील विश्वास चळू न देता नंदादीपाप्रमाणे शांत प्रकाशित राहण्याचे काम सातारा जिल्ह्यात चालले असता १९१४ मध्ये महायुद्ध सुरू झाल्यावर मद्रासला जी राष्ट्रीय सभा झाली, तीत गांव तालुका जिल्हासभांच्या अखंड साखळीने राष्ट्रीय सभेची चळवळ वर्षभर व देशभर चालती–बोलती करावी या उद्देशाने आप्पासाहेब आळतेकर, भाऊसाहेब सोमण मुद्दाम मद्रासला गेले.

पण बड्याबड्यांच्या मतभेद प्रदर्शनात आप्पासाहेबांच्या प्रयत्नांचा काही उपयोग झाला नाही. त्यापूर्वीच प्रागतिक राष्ट्रीयांची एकी कशी सन्मान्य तऱ्हेने होऊ शकेल याचे सोपपत्तिक विवेचन करून बेझंट बाईंच्या 'न्यू इंडिया मधून आप्पासाहेबांनी सुरतेपासूनच्या इतिहासाचे विहंगमावलोकन केले होते. त्याचा उपयोग अमृतबझार पत्रिकेच्या संपादकांनी केला आणि अधिकारवाणीने राष्ट्रीय सभेत ऐक्याचे वातावरण निर्माण केले. ते काही असले तरी १९१४ च्या १६ जूनला मंडालेहून लोकमान्य सुटून आल्याबरोबर सर्व देशाप्रमाणेच सातारा जिल्ह्यातही नवचैतन्याचा संचार झाला; आणि फिरून तो कामास लागला; तो दिवसेदिवस वाढत्या उत्साहानेच काम करीत राहिला आहे.

१९११ साली राज्यारोहण समारंभाच्या निमित्ताने वंगभंग रद्द करून बादशहांनी हिंदुस्थानला 'स्वराज्य' देण्याचे जाहीर अभिवचन दिले. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय पक्षाने तत्त्वनिष्ठेने जी प्राणपणाची संकटे सोसली त्यांचा हा एक विजय होता. १९१४ साली जे जागतिक युद्ध सुरू झाले, त्याचे सूचक असे वादळी वारे एडवर्ड बादशहांच्या शेवटच्या वर्षातच वाहू लागल्या कारणाने, पंचम जार्ज बादशहांनी फार दूरदर्शीपणाने राज्यारोहणाच्यावेळी धोरण आखले असेही कित्येक इतिहास दर्शकांचे म्हणणे आहे.

काळाच्या अशा रंगपालटीस अनुसरूनच लोकमान्यांनी आपली पावले धीरे धीरे टाकावयास सुरुवात केली. १९१५ च्या सप्टेंबर २० तारखेस त्याचा प्रसाद प्रथम सातारा जिल्ह्यास मिळाला. त्या दिवशी वाईस श्रीद्वारकागणपत्युत्सवात शंकरराव लवाटे यांचे "वसाहतीचे स्वराज्य" या विषयावर व्याख्यान झाले. पुढे १९१६ त बेळगांवास लोकमान्यांनी "होमरूल लीगची" स्थापना केली. लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगचे व राष्ट्रीय सभेचे कार्य निश्चित झाले. सातारची सोमण, फणसळकर ही जुनी कार्यकर्ती माणसे होती; पण नव्या उत्साहाचे नाथ घाणेकर त्या कार्यास मिळाले. डॉ. आठल्ये यांनी सातारा जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे सेक्रेटरी म्हणून कित्येक वर्षे काम केले. काही काळ ते प्रांतिक कमेटीचे सभासदही होते.

१९१६ साली लोकमान्यांची षष्ठ्यब्दि मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात येऊन त्यांना अर्पावयाच्या पर्सला जशी टिळक वर्गणी जमा करण्यात आली तशी होमरूलसंबंधी लोक–जागृतीहि करण्यात आली. तथापि "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवीनच." हे लोकमान्यांचे निश्चय–वाक्य घेऊनच १९१७ साली आप्पासाहेब आळतेकर, दिगंबरपंत गोखले यांनी तासगाव, इसलामपूर, कऱ्हाड, विटे भागात दौरा काढला; आणि होमरूल लीगच्या शाखा स्थापन केल्या. त्या वर्षाच्या १५ फेब्रुवारीलाच तात्यासाहेब केळकरांनी साताऱ्यास 'होमरूल लीग'वर व्याख्यान दिले होते.

आणि मार्चमध्ये अच्युतराव कोल्हटकर तर ऑगस्टमध्ये आळतेकर, अष्टपुत्रे आणि भाऊसाहेब सोमण यांनी रहिमतपूर, माहुली, पाटखळ, बोरखळ, इसलामपूर, पाटण या भागात होमरूलसंबंधी जागृती उत्पन्न केली. ता. १७ सप्टेंबर रोजी दादासाहेब करंदीकरांच्या षष्ठ्यब्दीच्या निमित्ताने खुद्द लोकमान्यांचा सातान्यात मुक्काम झाला; आणि त्या निमित्ताने जिल्ह्यातील मंडळी स्वराज्य स्फूर्तीचे शब्द लोकमान्यांच्या तोंडून ऐकण्यासाठी दिवाळी-दसऱ्याच्या आनंदाने जमली; आणि नवजीवन घेऊन गेली. लोकमान्यांनी लिंब येथे दादासाहेब करंदीकरांचे अध्यक्षतेखाली " स्वराज्या " वर व्याख्यान दिले. आणि वाईस तसाच लाभ देऊन नंतर ते पुण्यास गेले. यावेळेस म्हणजे २० सप्टेंबरला खाडीलकरानी वाईस आणि नोव्हेंबराचे मध्यास चाफळ व कऱ्हाड येथे स्वराज्याच्या तपश्चर्येत कितीही रंभा–मेनका आल्या तरी डळमळू नका किंवा तिलोत्तमानी भरीला घातले म्हणून सुंदोपसुंदी करू नका " अशी जागृतीची ज्योत पाजळली. सांगलीचे छापखाने वकीलही १६ डिसेंबर रोजी इसलामपूर येथे " राष्ट्रीय सभेच्या स्वराज्य योजनेला " पाठिंबा देण्याबद्दल व्याख्यान देऊन गेले. त्याच्या पूर्वीच तालुका – सभांनी राष्ट्रीय सभेच्या स्वराज्य योजनेला पाठिंबा देणेस सुरुवात केली होती. व या तालुका सभात थेट आरोग्य मंडळापासून सर्व कामे हाती घेणारी, तात्यासाहेब भाटे यांच्या चिटणीशीखाली चालणारी कऱ्हाड तालुका सभा विशेष गाजली. अशा तऱ्हेने होमरूलच्या चळवळीने १९१७ साल दुमदुमले, तेव्हा जून महिन्यात बेझंट व अरुंडेल यांच्या अटकेबद्दल तीव्र निषेध प्रदर्शित करण्यात आला, आणि नोव्हेंबरचे पहिले आठवड्यात ना. श्रीनिवास शास्त्री कॉंग्रेसस्कीमवर व्याख्यान देणेस आले तेव्हा सातारकरांनी आस्था दाखविली, हे निराळे सांगणेची काय आवश्यकता ? आणि लोकमान्य दादासाहेबांच्या षष्ठ्यब्दिसाठी सातान्याला आले असताच बेझंट व अरुंडेल या होमरूलर्सना सरकारने सोडले हा लोकमताच्या प्रभावाचा शुभशकून वाटला असला तर काय नवल ? उभयतांच्या बिनशर्त सुटकेबद्दल आणि लोकमताच्या विजयाविषयी जिल्ह्यात जो उल्हास दिसला त्यात वाई येथील नानासाहेब वैद्यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेचा विशेष उल्लेख केला पाहिजे.

१९१७ सालातील या चैतन्योब्दोधनाचा परिणाम पुढील सालच्या आरंभापासूनच आढळू लागला. १९१२ पासून पांडु तात्या भाटे, वामन गणेश फडके, बळवंतराव जाधव हे चिटणीस आणि आप्पासाहेब आळतेकर व नानासाहेब देशपांडे हे अध्यक्षोपाध्यक्ष अशा कार्यकारी मंडळाच्या नेतृत्वाखाली नेटाने काम करणारी कऱ्हाड तालुका सभा ता. २ जानेवारी १९१८ लाच आपले अधिवेशन नानासाहेब मुतालिक यांचे अध्यक्षतेखाली करती झाली. तीत " भाकरी

का करपते, पाने का कुजतात, घोडा का बुजतो ? तर फिरवला नाही म्हणून. तसेच हिंदुस्थानवरील निरनिराळ्या आपत्ती या का उद्भवल्या ? तर स्वराज्य नाही म्हणून. " अशा तऱ्हेच्या लोकमान्यांच्या अनुवादानेच शेतकऱ्यांच्या आणि एकंदर तालुक्याच्या गरजांचा विचार करण्यात आला. तशाच तऱ्हेची विचारसरणी मे महिन्यात रामचंद्र मोरेश्वर साने यानी आपल्या स्वराज्यावरील व्याख्यानातून जनतेच्या मनावर ठसविली. डॉ. कुर्तकोटी शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली कासेगावास प्रांतिक सहकारी परिषद झाल्यावर, श्रींच्याच अध्यक्षतेखाली ता. २२ मे रोजी सान्यांचे झालेले स्वराज्यावरील व्याख्यान अजूनही लोकांच्या कानात दुमदुमत असते.

जून महिन्यात स्वराज्य संघाच्या कामाचा उठाव आदरणीय झाला. ता. २५ रोजी वाई येथे कृ. ग. अभ्यंकर वकिलांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन (१) ता. १० जून रोजी मुंबईच्या प्रांतिक युद्ध परिषदेत अध्यक्ष ना. विलिंग्डन यांनी स्वराज्यवाद्यांच्या विरुद्ध जे निराधार आरोप केले होते त्यांचा धिक्कार करण्यांत आला. (२) लोकमान्यांवर पूर्ण विश्वास प्रगट करण्यात येऊन लोकमान्य, जम्नादास द्वारकादास, एम्. आर्. बम्मनजी, हॉर्निमन, तात्यासाहेब केळकर यांच्या " न गणसी मज जातो तुच्छ मानूनी तूते " या वृत्तीचे युद्ध परिषदेतून बहिर्गमन करण्यात दाखविलेल्या धैर्याबद्दल अभिनंदन करण्यांत आले. (३) बॅ. जिनानी स्वराज्यवाद्यांचा निष्कलंकपणा उत्तम रीतीने सप्रमाण सिद्ध केला याबद्दल आभार मानण्यात येऊन (४) लष्कर भरतीच्या जुलमी व सदोष पद्धतीबद्दल असमाधान व्यक्त झाले. कारण हत्यारांचा कायदा दुरुस्त करण्यासंबंधी दीर्घसूत्रीपणा, लष्करी जागा हिंदी लोकांना न मिळणे, दिल्ली परिषदेतील लष्करी कॉलेजचा ठराव दप्तरीच धूळ-खात ठेवणे असे प्रकार चालले होते. वाईचेच पाणी खाली जिल्ह्यात सर्वत्र वाहिले होते हे सांगितले म्हणजे वरील ठरावावरून स्पष्ट होणारा सरकारी आचार व जिल्ह्याच्या अंतःकरणाने त्याचा घेतलेला समाचार दोनही प्रतीत होतील. होमरूलसंबंधी १९१६ ते १९२० पर्यंत सतत तनमनधनाने वाळवे तालुक्यात खटपट करणारी डॉ. भाऊराव वैद्य प्रभृती मंडळी लक्षात ठेवली म्हणजे जिल्ह्याची नाडी कळेल.

या सालच्या घडामोडीवर जिल्ह्याचे संकलित मत सालाबादप्रमाणे एकदा एप्रिलमध्ये व एकदा ऑगस्टमध्ये जिल्हासभेने आपले नेहमीचे व जादा अधिवेशन भरवून प्रगट केलेच. पण नोव्हेंबरमध्ये महायुद्धात दोस्त राष्ट्रांना जय मिळाल्यामुळे आनंद प्रदर्शनाचा उमाळा जो जिकडेतिकडे आला होता त्यात स्वराज्य संघानेही आपल्यापरी भाग घेतला. महायुद्धात मराठा सैनिक व अम्मलदार शौर्याने लढले आहेत व मराठ्यांचे पाणी नाहीसे झाले नाही. महा-

युद्धात (१९१४–१८) हिंदुस्थानपेक्षा इतर कोणत्याही देशाला अधिक आर्थिक झळ लागलेली नाही. हिंदुस्थानच्या लोकांचे दारिद्र्य बारमाही आहे. बहुधा सर्व जगात त्याला तोड नाही. लोकसंख्येपैकी बहुतेक शेतकरी, महायुद्धाच्या पहिल्या अर्धात लॉर्ड हार्डिंज यांच्या मते हिंदुस्थान पांढरा फट्ट होण्याइतके त्याचे रक्त शोषण झाले.

५–७ हजार मैलावरून येऊन मूठभर इंग्रज लोकांनी जो सारा भारत-खंड आपल्या मुठीत वळला तो काही सर्व लष्कर विलायतेहून आणून वळला नाही. मराठ्यांनी शेवटचा मिळविलेला विजय म्हणजे खडर्याची लढाई. तेव्हा-पर्यंत मराठ्यांशी एकनिष्ठ राहिलेले महार कोरेगावच्या लढाईचे वेळी सन १८१८ साली म्हणजे अवघ्या २३ वर्षात उपऱ्या इंग्रजांना वश कसे झाले, हा मोठा चिंतनीय विषय आहे. कोरेगावची लढाई इंग्रज बहादरांनी मोठ्या ईर्षेने मारली. तेथे आता एक जुना रणस्तंभ भीमेच्या काठी उभा आहे. या लढाईत कामास आलेल्या शेकडो शिपायांची नांवे या खांबावर कोरलेली आढळ-तात. त्यात एकंदर २३ महार शिपायांपैकी पहिले २० शिपाई ठार झाले व शेवटचे तीन जखमी झालेले आहेत. ही निष्ठेची पालट होण्याला केवळ दुसऱ्या बाजीचा दिवटेपणाच कारण नव्हे. इंग्रजांचो समयज्ञता, शिस्त आणि वेळेवर रोख पगार देण्याची प्रसिद्धी. या गुणांची भुरळ पडून इंग्रजांना अस्पृश्य मान-लेलेच नव्हत, तर चांगले नरपति, व्रजपति, क्षत्रिय आणि भूदेव, सोवळे ब्राह्मण आपल्या तलवारी आणि लेखण्यासह वश झाले.

जसजसे इंग्रजांचे बस्तान बसत चालले तसतसे लष्करात एतद्देशीय लोकांची भरती करण्याचे बाबतही धोरण बदलत चालले आणि लष्करातून हळूहळू अस्पृश्यांना बेमालूम बंदी होऊ लागली. १८५७ सालच्या बंडापर्यंत बंगाली पलटणीत एकजात लखनौकडील रजपूत आणि पुरभय्ये ब्राह्मण शिपायां-चीच भरती होत असे. बंडात पुढाकार घेतला म्हणून पुढे त्यांची भरती बंद झाली.

मराठे म्हणजे दख्खनच्या तरवारीचा हात. त्यांचा उपयोग इंग्रजांनी आपल्या साम्राज्यसेवेस कल्पनातीत करून घेतला. महाबळेश्वराजवळील पारगावचे कॅप्टन महादेवराव सोंडकर हे प्रथम २८ मुंबई पायोनियरमध्ये १८८४ च्या एप्रिलमध्ये नोकरीस लागले. १८८९–९० च्या सिकीमच्या व चिन्-तुल्हाच्या मोहिमामधून त्यांनी मोठी बहादुरी गाजविली. सन १८९७–९८ मध्ये त्यांना स्टार्स मिळाले होते. आणि १८९८ त त्यांना सुभेदार करण्यात आले. कैसरी–कंदनाच्या वेळेच्या कामगिरीबद्दल त्यांना पदके मिळाली.

तळबीडचे केदारजी बाजी मोहिते कालाडगी घोडदळात काम केलेले होते. त्यांचे चिरंजीव दफेदार आबाजी व जमादार आनंदराव पुण्याच्या घोडदळात असत. १८७९ मध्ये ते कंदहारमध्ये होते. आणि १८८०-८१ च्या अफगाण

युद्धात ते लढत देतच होते. दफेदार आबाजीचे चिरंजीव यशवंतराव आणि साहेबराव यांनी पुणे घोडदळात प्रवेश मिळवला. यशवंतरावाचा मुलगा हवालदार जयसिंगराव मेसापोटोमियाच्या वड्या धुमश्चक्रीत एकशे अठ्ठावीसाव्या पायोनियर्समध्ये होता. दुसरा मुलगा हवालदार भीमराव १९४२ त सागरपार कामास आला. पराक्रमाचा वाव आणि ब्रिटिश साम्राज्याच्या छत्राखाली का होईना देशाची पराक्रमी सेवा करण्याची संधी मिळते म्हणून काही तरुण लष्करभरती झालेच होते. महात्मा गांधी जेथे बिनशर्त युद्ध सहकार करावा असा आग्रह धरीत होते, तेथे साधली तर देशसेवा करू पाहणारे काही व नमते घेऊन स्वराज्याचे हक्क मिळवू पाहणारे काही भारत-रक्षण सैन्यात जिवाभावाने आणि प्रसंगी जिवावर उदार व्हावयाच्या तयारीने सामील झाले असले तर नवल नाही. अशाच लोकांनी कैसरी-कंदनच्या (१९१४-१८) काळात बगदाद, टेसिफोन, कुत्-अल-अमराच्या लढायात जनरल टौनशेंडच्या फौजेत फार शौर्याने कामगिरी केली. सर्व ब्रिटिश लष्करात रणांगणाच्या धुमश्चक्रीत चपळ, सहनशील, शिस्तीचा काटेकोर आणि इमानी व धैर्यशील असा त्यापैकी प्रत्येकाने नांवलौकिक मिळवला. मेसापोटेमियाचे स्वारीचे नेतृत्व करणाऱ्या लेफ्टनंट जनरल एन्. आर्. मार्शल के. सी. बी. याने स्वतःच तशी नोंद करून ठेवली आहे. कुत्-अल-अमराच्या वेढ्यात मेजर अमृतराव रामचंद्रराव मोहिते (तळबीड) यांनी पराक्रमाची पराकाष्ठा केली. व डावा डोळा गेला तरी छत्रपतीच्या नांवाने चांगभला करून युद्धात शिरलो आहो तर कमीपणा घेता कामा नये अशी ईर्षा बाळगली. १९१९–२० वझिरीस्थानमध्ये त्यांनी त्याच ईर्षेने पराक्रम गाजविला. तांदुळवाडीचे सुभेदार मुरारराव शिंदे यांनी जून १९१५ मध्ये बन्नूजवळील अलग तुकडीत ते खाजुरिला असताना त्यांनी पठाणावर निकराचा हल्ला केला. त्यांची पन्नास रायफले व शस्त्रास्त्रे पळवून आणली आणि लष्करी-बिनलष्करी जाती असा भेदाभेद इंग्रज सरकार करीत असे, तो केवढा निराधार आहे हे त्यांनी जगाला पटवून दिले. ता. २४ नोव्हेंबर १९१५ रोजी पांचशे दख्खनी घेऊन आठशे दुसऱ्या सैनिकानिशी व दोनशे बंदुकधाऱ्या समवेत मुरारराव दलदलीच्या प्रदेशातसुद्धा वीस मैल दर दिवस कूच करून आक्रीगार्वीवर चाल करून गेले. ६ जानेवारी १९१६ रोजी लढत सुरू झाली. धुके इतके माजले होते की, पुढे काही दिसत नव्हते, लढाई निकराची व मातबर झाली. श्रीपतराव चव्हाण या शिपायाच्या उजव्या हातास गोळी लागून तो गळून पडला; पण डाव्या हातानेच लढत देत राहिला. रात्रौ दहा वाजेपर्यंत हातघाई झाल्यावर मुरारराव शिंद्यानी मोर्चा बदलण्याचा सल्ला दिला. ता. ७ जानेवारी १९१६ रोजी दुपारी एक वाजता मोर्चे बदलले असता कमांडंट मेजर स्टॅक यास वर्मी गोळी

लागली. तीन दिवसाच्या अवधीत दारूगोळा किंवा अन्नपाणी काहीच मिळाले नसताही ता. ८ जानेवारी रोजी मुरारराव शिंदे अन्नाच्या गोण्या घेऊन येणाऱ्या खेचरांना आणावयाच्या कामगिरीवर असलेल्या राजाराम बर्गे व दादू घोरपडे यांच्या मदतीला जाऊ शकले. ता. ९ रोजी मुरारराव शिंद्यानी शत्रूचा पाठलाग केला व शेख सय्यद येथे चांगलीच लढत झडल्यावर शिंद्यानी दोनशेबारा तुर्कांचा कबजा केला. शत्रूचे पांच हजार लोक कामास आले.

कैसरी कंदनाच्या वेळी भारतीयांनी केलेल्या पराक्रमाला तोड नाही असे मत आर्थर व्हिन्सेट यांनी " डिफेन्स आफ इंडिया " या पुस्तकाच्या प्रस्तावनेत व्यक्त केले आहे. फ्रान्सच्या रणभूमीवरचा मराठ्यांचा पराक्रम अद्वितीयच ठरला आहे. दुसऱ्या कोणत्याही वसाहतीपेक्षा हिंदुस्थानने रणांगणावर अद्वितीय पराक्रम गाजविला ! आणि अशा पराक्रमाचा यत्किंचितही विचार न करता मराठा मराठेतर असा भेद विधिमंडळातील प्रतिनिधित्वाचे बाबत निर्माण करून ज्या माँटफोर्ड सुधारणा आल्या त्या इंग्लंडने देऊ करणे व हिंदुस्थानने स्वीकारणे कमीपणाचेच होते, असे बेझंटबाई म्हणत असत. असा कबुली जबाब जिल्हा दरबारातून कलेक्टरसाहेब १९१६ पासून देत आलेच होते आणि रिक्रुटिंग ऑफिसरच्या अडदांड वर्तनाखेरीज सैन्य भरतीला सातारा जिल्ह्यात कशानेही अडथळा उत्पन्न केला नव्हता. उलट " इंग्लंडची अडचण तेच आपले संधीसाधन " या लोकमान्यांच्या वचनाप्रमाणे युद्धकाळात इंग्रजांना विजय मिळण्याबद्दलच्या प्रार्थनेपासून यावच्छक्य जिल्हा मदत करीतच होता. अर्थात नोव्हेंबरमधील आनंदोत्सवात भाग घेताना आपल्या मागण्या पुढे रेटण्याची संधी स्वराज्यसंघवाद्यानी बिनचूक साधली. त्याकरिता स्वराज्यसंघाच्या ज्या तालुकानिहाय सभा झाल्या त्यात भाऊसाहेब सोमणांच्या अध्यक्षतेखाली ता. २७ नोव्हेंबर रोजी इसलामपूरच्या विठ्ठल मंदिरात झालेला वाळवे तालुका होमरूलर्स आनंदोत्सव सर्व जिल्ह्याचा प्रातिनिधिक समजावयास हरकत नाही. तांबवेकर वकिलानी दिग्दर्शित केल्याप्रमाणे त्या उत्सवात, तह-परिषदेत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून लोकमान्यांना घ्यावे आणि राजकीय कैद्यांची बिनशर्त सुटका करावी अशा मुख्य मागण्या करण्यात आल्या.

देशातील अशा मागण्यांची परिपूर्तता तर राहोच, मायबाप म्हणविणाऱ्या सरकारनी " गरज सरो वैद्य मरो " अशी वर्तणूक हिंदुस्थानशी केली. हिंदुस्थानात राजद्रोहाने तोंड काढू नये म्हणून राजनिष्ठपणाने महायुद्धात तनमनधनाने इंग्लंडला मदत करणाऱ्या हिंदुस्थानला रौलँट ॲक्टसारख्या काळ्या कायद्याचे शेलापागोठे आहेर म्हणून दिले होते. " धिक्कार मन साहिना " असेच धैर्यधरी तडाखे अखिल हिंदुस्थानने त्या काळच्या कायद्याला सर्वत्र दिले. असाच तडाख्याचा प्रयोग अमृतसर येथे चालला असता जनरल डायरने जालियनवाला

बागेत गोळीबाराचा आसुरी अत्याचार केला. त्यासरसे राष्ट्रातील इतर स्वराज्य वाद्याप्रमाणेच सातारा जिल्ह्यातीलही स्वराज्यवादी इतके चिडले की अन्यायाच्या जखमेत जणो अपमानाचे मीठ भरले !! उघडच सातारा जिल्ह्याने १५ एप्रिल हा सत्याग्रह दिन पाळलाच पण वाई येथील ता. २१ एप्रिल १९१९ च्या घाणेकर वकिलांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या स्वराज्यसंघ परिषदेत स्वराज्यासाठी त्याग करण्याची तयारी अहमहमिकेने जिल्ह्यातील मंडळींनी केल्याचे जाहीर झाले. त्यासाली स्वराज्यसंघाचे १६१९ सभासद जिल्ह्यात होते आणि त्यात १२५ शेतकरी स्वयंस्फूर्तीने यंदा अधिक सभासद झाले होते. सातारा, बोरखळ, वाई, कऱ्हाड, इसलामपूर, विटे, तासगाव इत्यादी शाखांमार्फत स्वराज्यावर ऐंशी व्याख्याने झाली. श्रीधर विठ्ठल सुपनेकर यांनी दोनशे रुपये देणगी स्वराज्यसंघाला दिली होती तर बाळाजी दामोदर हसबनीस यांनी आपली एक (दहा हजाराची) मिळकतच्या मिळकत स्वराज्यसंघाला अर्पण केली होती.

स्वराज्यासाठी अशी मनोवृत्ती जिल्ह्यात उत्पन्न होत असताच, त्या अखिल भारतीय प्रश्नाबरोबर, लोकमान्यांनी सर व्हॅलेंटाईन चिरोलवर केलेल्या अब्रु-नुकसानीच्या दाव्यात लोकमान्यांना जब्बर आर्थिक नुकसान आले, ते आपल्या मगदुराप्रमाणे भरून काढावे आणि लोकमान्यांच्या राष्ट्रसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून ता. ३ एप्रिल १९१५ रोजी काशिनाथ रामचंद्र माजगांवकर वासुदेव विष्णु आठल्ये, गोविंद महादेव कुबेर, यांच्या सहीने विनंतीपत्र निघाले आणि त्याप्रमाणे सातारा जिल्ह्याने बरीच रक्कम जमवून चिरोल केस फंडास दिली.

याच बरोबर जिल्ह्यात १९१९ साली जे इन्फ्ल्यूएंझा व दुष्काळ यांचे संकट उद्भवले होते, त्याला तोंड देण्याकरता फणसळकर वकिलादि जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या मंडळींनी स्वयंसेवक जमवून आणि पैसे गोळा करून आपद्-ग्रस्तांना मेहनतीने मदत केली. त्यात वाळवे तालुक्यात डॉ. भाऊराव वैद्य प्रभृतींचे काम शिस्तशीर आणि नांव घेण्यासारखे झाले. दुष्काळग्रस्ताला मदत म्हणून रु. ३०५९०१४ खर्च केले. वाळव्याच्या खालोखाल दुष्काळाबाबत वाईस काम झाले. सार्वजनिक सभेचे अध्यक्ष म्हणून नानासाहेब वैद्यांनी "कंट्रोल" ची दुकाने लोकांच्या सोईची होतील अशी खटपट केली, आणि त्या खटपटीचा उपयोग नुसत्या वाईसच न होता सबंध सातारा जिल्ह्यास झाला.

हिंदी स्वराज्यसंघाच्या जन्मसाली म्हणजे १९१६ सालीच शेतकऱ्यांना उपयुक्त अशी सहकारी चळवळही सातारा जिल्ह्यात विशेषत: दक्षिण भागात मूळ धरू लागली. सातारा येथे ऑनररी ऑर्गनायझर म्हणून आण्णासाहेब चिरमुले यांनी कामास सुरवात केली. २५ मार्चला सहकारी परिषद पार पडली. ता. २० ऑगस्टपासून गोपाळ कृष्ण देवधरांनी सोसायट्यांचा क्लास चाल-

विला; यशवंत बाळा पाटील यांचे प्रयत्नाने वाळवे तालुक्यात व कऱ्हाड तालुक्यात बऱ्याच सहकारी संस्था स्थापन झाल्या; आणि पेठ येथे तर जनावरांची पैदास सुधारण्यासाठी एक सहकारी मंडळी स्थापन झाली. अशा प्रकारे महायुद्धाच्या सुरवातीपासून जालियनवाला बागेपर्यंत जिल्ह्यातील लोक सहकाराने साध्या गोष्टीपासून स्वराज्याच्या गोष्टीपर्यंत संघटित प्रयत्न करीत होते. या सहकार संघटनेचा उपयोग पुढे झाल्याशिवाय राहिला नाही.

१५ : मित्र-प्रवृत्ती

"तेल्या तांबोळ्यांचे पुढारी" म्हणवून घेण्यात लोकमान्य आणि लोकमान्यांचे अनुयायी भूषण मानून सहकार संघटनेच्या जोरावर बहुजन समाजाला स्वराज्य मार्गावरून नेत असता, जनरल – डायर– ओडवायर यांनी जालियनवाला बागेत निष्पाप प्रजाजनांचे रक्तरंगण केले आणि त्याचे प्रायःश्चित्त म्हणून सरकारने त्याला अपुऱ्या नोकरीचेसुद्धा भरपूर पेन्शन देऊन स्वदेशी सुखरूप पाठविले. मॉन्टेग्यू चेल्म्सफर्ड सुधारणांची साखर हिंदुस्थानचे तोंडावर पेरली जात असता, वरील अपमानाची सुरी हिंदुस्थानच्या अंतःकरणात खोल बसली आणि आत्तापर्यंत चालत आलेल्या जनतेच्या विश्वासाने हिंदुस्थानावरील इंग्रजांचे राज्ययंत्र हे "देवाचे राज्य नसून सैतानाचे राज्ययंत्र आहे" असे महात्मा गांधींच्या मुखावाटे जाहीर केले. सहजच, अपुऱ्या, असमाधानकारक अशा असल्या तरी मॉंटफोर्ड सुधारणा राबवून घ्याव्यात आणि त्यातून काही सैतानी राज्ययंत्रणेच्या प्रतिकाराचा मार्ग काढावा की काही अपूर्व उपायांनीच राष्ट्रीय प्रगतीरथ स्वराज्याच्या ध्येयाकडे दामटावा अशा विचारात राष्ट्र असता, 'गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता' या न्यायाने लोकमान्यांच्यासारखा राष्ट्रसूत्रधार हरपला ! ! त्यायोगे भांबावलेल्या राष्ट्राने विचारविनिमय कर–कर–केला आणि १९२० च्या सप्टेंबरमध्ये लाला लजपतरॉय यांचे अध्यक्षतेखाली कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचे जादा अधिवेशन होऊन महात्मा गांधींनी सुचविलेला नवा आणि तेजस्वी असा असहकाराचा मार्ग राष्ट्राने चोखळण्यास सुरुवात केली.

या असहकाराच्या युगात सातारा जिल्ह्याने आपला वाटा कितपत आणि कसा उचलला, हे पाहण्यापूर्वी सहकार युगातील दोन सोबतीच्या मित्रप्रवृत्तींना मानाचा मुजरा करणे जरूर आहे. पैकी पहिली म्हणजे प्रागतिकांची, प्रकर्ष-

करून आगतिक ते प्रागतिक अशी त्यांची कुचेष्टा भावनेच्या भरात लब्ध अगर प्रतिष्ठितपणाखाली कोणी करो आणि सातारा जिल्ह्याबाहेर कोणाला लागू असो नसो, अभिमानाने असे सांगता येईल की, सातारा जिल्ह्यात जो प्रागतिक पंथ आहे तो प्रगती करणाराच आहे. १८९२-९३ पासून सातारा जिल्ह्यात हा पंथ बीजरूपाने आहे, आणि जरूर तेथे व तेव्हा त्याने आपले स्वतंत्र अस्तित्व प्रगटही केले आहे. पण त्याचे पहिल्यापासून अभिनंदनीय धोरण असे आहे की, आपलीच शेखी मिरवण्याकरता उगाच जिल्ह्याच्या चाललेल्या सरळ अथवा तेजस्वी कार्यक्रमात विघ्न व्हावयाचे नाही. १९०७ साली सुरतेला राष्ट्रीय सभेस मवाळ-जहालांचे तट पडल्यानंतर सातारा जिल्ह्यात ती झोंडगिरी उठवण्यास वेळ लागताना. पण एकीच्या अभावी स्वराज्य पारखे झाले हे प्रागतिक झाले तरी कसे विसरतील? म्हणून १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाप्रमाणे १९०७ साली अस्तित्वात आलेल्या जिल्हासभेत आणि इतर चळवळीत राष्ट्रीयांच्या बरोबर त्यांनी शक्य तेवढा भाग घेतला, इतकेच नव्हे तर ऐन असहकाराच्या युगातही साताऱ्यास निघालेल्या राष्ट्रीय शाळेत वाग्भट नारायण देशपांडे हे काही काळ शिक्षक होते. असहकाराचे कार्यक्रम तत्त्वतः अमान्य असूनही ते राष्ट्रीय सभेचे शिस्तखोर सभासद काही काळ राहिले आणि काँग्रेस कमेटीत राहणे आपल्या मर्यादेपली-कडचे झाल्यावरही मद्यपान निरोधनासारख्या कार्यक्रमात किंबहुना ऐन कायदे-भंगाच्या चळवळीत १९३० व १९३२ साली लागेल तो कायदेशीर सल्ला व आपल्या ऐक्य पत्रातून प्रसिद्धी त्यांनी कायदेभंगाच्या तेजस्वी कार्यक्रमाला आणि त्यात भाग घेणाऱ्या राष्ट्रीयांना दिली. आणि हे सर्व करीत असताना गोखले-रानडे-प्रणीत प्रागतिक सिद्धांतसूत्रावरील आपला विश्वास यत्-किंचित डळमळू न देता त्यांनी एक बाजूने सरकारच्या अरेरावीचा निषेध केला तर दुसऱ्या बाजूने प्रागतिक पुढारी जनतेत मिसळत नाहीत म्हणून दोष लावला. वाग्भट नारायणांचे हे उदाहरण सातारा जिल्ह्यातील प्रागतिकांचे प्रातिनिधिक आहे. पुढे वाग्भट औंध संस्थानची दिवाणगिरी पत्करून राज्य-कारभाराचा आदर्श उभा करू लागले; पण एका अपघातात सापडून पुढे दिवंगत झाले! प्रागतिकांपैकी दुसरे पुढारी म्हणजे नरहर गंगाधर जोशी यांनी औंध संस्थानचे हायकोर्ट जज्ज म्हणून न्यायशासनाचा काटेतोल कारभार कुशलतेच्या कार्यक्षमतेसाठी कसा राखावा याचे उदाहरण घालून दिले. आणि औंध स्टेट बँकेचे पुढे चेअरमन म्हणून काम करून अर्थसामर्थ्य समाजाच्या व्यवहारात नैतिक प्रतिष्ठेने कसे वापरावयाचे याचा कित्ता घालून दिला. रा. ब. काळयांनी तरी आपल्या बहुतेक संपत्तीचा विनियोग कर्वे स्त्रीशिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, आणि गोखले एकॉनॉमिक इन्स्टिटयूटची जोड देऊन

पुण्याच्या भारत सेवक समाज, या संस्थांच्या द्वारा राष्ट्रास समर्पण करून मातृदेवता, बहुजन समाज आणि अभ्यासूवृत्तीचे विधायक अर्थकारण यांच्या जोपासनेचा अखंड नंदादीप तेवत ठेवला आहे.

तरीपण प्रागतिकांची स्वतंत्र म्हणुन थोडी कामगिरी सातारा जिल्ह्यात महत्त्वाची झाली आहे. असहकाराचा कार्यक्रम जिल्ह्यातील बहुजन समाजाने आणि राष्ट्रीयांनी उचलल्यामुळे कायदेमंडळावरील बहिष्कारादि कार्यक्रमाचे वैयर्थ्य पटवावे आणि माँटफर्ड सुधारणा राबवून दाखवून जास्तीतजास्त होईल ती सेवा करावी या हेतूने सातारा जिल्हा प्रागतिक संघ १९२० साली रावबहाद्दूर काळे यांच्या अध्यक्षतेखाली निघाला, आणि काळे मुंबई कौन्सिलात निवडून आले. निवडून आल्यावर मुंबई सरकारचे लोकप्रतिनिधीतून नियुक्त झालेले डॉ. परांजपे, हिदायतुल्ला, सर चुनीलाल मेथा या दिवाणांना त्यांनी जिल्ह्यात आणले. लोकात मिसळविले आणि सरकारी कारभाराची यंत्रे लोकमुखी करण्याचा प्रयत्न केला. १९२३ साली कऱ्हाडास प्रागतिक प्रान्तिक परिषदही भरविली आणि देशात कायदे भंगाचा मोहोर आला असता भारत सेवक समाजाला सव्वा लाख रुपयाची देणगी देऊन गोखले एकॉनॉमिक इन्स्टिटयूट पुण्यास काढून अर्थशास्त्राच्या सखोल अभ्यासाची सोय उद्याच्या राजकारण धुरंधरासाठी करून ठेवली. पुढे सर सॅम्युअल होअरच्या कर्तबगारीचा ‘ पांढरा खलिता ’ प्रसिद्ध झाल्यानंतर हृदयाथ कुंझरूंच्या अध्यक्षतेखाली १९३४ मध्ये जे अखिल भारतीय प्रागतिक अधिवेशन पुण्यास भरले त्याचे स्वागताध्यक्ष होऊन काळचांनी सहकारसत्त्वाभिमान्यांनी आपल्या कर्तबगारीचा गौरीशंकर चढून कसा प्रकाश पाडावा याचे मार्गदर्शन केले.

या प्रासंगिक कार्यापेक्षाही **सातारा जिल्ह्यातील प्रागतिकांनी अखंडपणे एक कार्य केले आहे आणि ते म्हणजे न्यायमूर्ती रानड्यांच्या पुण्यतिथी पालनाचे होय.** अखिल भारतवर्ष ज्यावेळी बर्फाचा थंड गोळा होऊन पडला होता त्यावेळी त्यात नवचैतन्याची उब घालून राजकीय मोक्षाचा आणि संस्कृति संदर्शनाचा ध्रुव ज्या महात्म्याने दाखविला आणि त्याच्या दिशेने राष्ट्राला प्रगतीपथावर नेले, **त्या न्यायमूर्तीबद्दल कोणालाही नितांत आदरच वाटतो.** म्हणूनच १९०१ साली न्यायमूर्तींचा कैलासवास झाल्यावर त्यांच्याबद्दल दुःख प्रदर्शनच्या सभा सातारा, वाई, कऱ्हाड, फलटण वगैरे ठिकाणी झाल्याच पण न्यायमूर्तींच्या बंधूकडे जिल्ह्यातून पत्रेही गेली. प्रागतिकांच्या न्यायमूर्तींची पुण्यतिथी होत असली तरी त्यानिमित्त अभ्यासू आणि अधिकारी वक्त्यांची जी भाषणे होतात त्यापासून आपले मार्ग व मते कसाला लावून पाहण्याची संधी राष्ट्रीयांनी कधीच दवडली नाही. फारकाय सांगावे! **१९३१ साली दादासाहेब करंदीकरांच्या**

अध्यक्षतेखाली कायदेभंगाच्या चळवळीत असलेल्या बाबूराव गोखल्यांनी साताऱ्यास न्यायमूर्तींच्या पुण्यतिथी दिवशी त्यांच्या समाधीवर वाक्यसुमनांजली वाहिलीच; पण १९३२ साली ठिकठिकाणचे पुढारी बिगर चौकशी अडकवून ठेवल्यानंतर समाजात "वरवंटयाच्या कायद्यामुळे" जी भयमूलक शिथिलता आली ती श्री. कृष्णाबाईच्या घाटावर कऱ्हाडास तीन हजार समुदायापुढे वामनराव फडके यांचे अध्यक्षतेखाली न्यायमूर्तींचे गुणगान तीन तास करून गोखल्यांनी घालविली. न्यायमूर्तींच्याप्रमाणेच नामदार गोखल्यांची पुण्यतिथी सातारा जिल्ह्यातील प्रागतिक पाळीत असतात, ती संबंधीही न्यायमूर्तींच्याप्रमाणेच राष्ट्रीयांची वृत्ती आहे. १९१५ साली नामदार वारल्यावर साताऱ्यास काळयांच्या बरोबर करंदीकर–पाठकांनी स्मारकाकरता वर्गणी दिली, भारतसेवक समाजाचे कार्य सातारा जिल्ह्यात सुरू झाल्यास दरसाल ६० रुपये देण्याचे आण्णासाहेब चिरमुल्यांनी जाहीर केले. व कऱ्हाडास आप्पासाहेब आळतेकरांनी सार्वजनिक वाचनालयात राजकीय ग्रंथाभ्यासाची सोय केली. रानडे, गोखल्यांच्या पुण्यतिथ्या १९३६ साला अखेर व्रतासारख्या पाळल्या गेल्या. त्यानंतर रा. ब. काळयांच्या १७ जानेवारी रोजी होण्याऱ्या पुण्यतिथी निमित्ताने प्रागतिक तत्त्वप्रणालीचे संस्मरण कन्याशाळेत चालू शकते.

जिल्ह्यातील प्रागतिक प्रवृत्तीला असा आदराचा मुजरा करून आता "ब्राह्मणेतर" चळवळीकडे वळण्यास हरकत नाही. सातारा जिल्ह्यात ही चळवळ 'सत्यसमाज' या नावाखाली गाजली. सत्यसमाजाचे मूळ उत्पादक जोतिराव फुले "यांचे मूळगाव आमचे जिल्ह्यातील कटगुण (खटाव तालुका) हे आहे." तथापि फुल्यांची हयात आणि कर्तबगारी पुण्यास झाल्यामुळे कोल्हापुरच्या वेदोक्त प्रकरणानंतर छत्रपती शाहूमहाराजांनी १९१०–११ त सामाजिक समानतेचा जो प्रश्न हाताशी धरला त्याचे वारे सातारा जिल्ह्यात वहात होते. पण १९११ साली पुण्यास सत्यशोधक परिषद झाल्यावर सातारा जिल्ह्यात शाहू छत्रपती व भास्करराव जाधव यांनी सत्य समाजाचे बी रुजविले. कामेरी पेठ, काले, सोनी, भिलवडी, येडेमच्छिंद्र, शिवथर, चितळी, वाई, वाळुंजे वगैरे गावी १९२५ अखेर सत्यसमाजाचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. खेडूत विद्यार्थ्यांची व शाळांची विलक्षण वाढ झाली. हुंडा देज घेणारांना जाहीर नाचक्की मिळू लागली (शेतकऱ्यांचे स्वराज्य के. वि. ठाकरेकृत पहा) यातून भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेचे काम फैलावून डोंगर माथ्यावर शाळाच शाळा निघाल्या. माणूसकीचे बहुजनसमाजाला हक्क मिळवून देण्यासाठी निघालेल्या या समाजाने १९१७ साली माँटेग्यूसाहेबांचा जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत राजकारणात लक्षही घातले नव्हते. १९१८ ची जादा राष्ट्रीय सभा होऊन इंग्लंडात डेप्युटेशनावर डेप्युटेशने जाऊ लागली त्यात १९१८ साली ब्राह्मणेतरांचे

शिष्टमंडळ घेऊन भास्करराव जाधव गेले, मराठ्याकरिता राखीव जागा त्यांनी अनेक खाजगी भेटी घेऊन मुत्सद्याजवळ खटपट केली. आणि सिडनहॅमसाहेबांनी ती कल्पना अर्थातच उचलून धरली. अशा रीतीने भास्करराव यश घेऊन परत आले. यानंतर राजकीय काम म्हणून जर काही या समाजाने जिल्ह्यात केले असेल तर राष्ट्रीय सभेने बहिष्कार घातलेल्या कायदेमंडळापासून आता-पर्यंतच्या सर्व कायदेमंडळाच्या निवडणूकीत भाग घेण्याचे होय. सामाजिक 'जलसे' करून सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी "ब्राह्मणी वर्चस्व फेकून द्यावयाच्या" नादात काही अद्वातद्वा अत्याचार सत्य समाजातील काही अचरटांनी केले. यासंबंधात कोर्ट कचेऱ्यातून, गाजलेली 'विटयाचे दत्तमंदीर प्रकरण', 'भिलवडीचे राममंदिर प्रकरण', 'बोरखळचे लोकमान्य पादुका स्थापना प्रकरण' ही प्रमुख होत. गारवडे वगैरे पाटण तालुक्यात, गोवे वगैरे सातारा तालुक्यात, पेठ, कामेरी वगैरे वाळवे तालुक्यात आणि खटाव तालुक्यातही विहिरी पाडणे, मारामाऱ्या करणे, घरे जाळणे वगैरे पुष्कळ अत्याचार झाले. ते लोकांना लवकर विसरता आले नाहीत. त्याकरिता जिल्हा सभेला एकदा चौकशी कमेटी नेमावी लागली. तथापि या गोष्टी आता कानामागे पडल्या व तेच योग्य होय. कारण जवळकरांनी राष्ट्रीय सभेपासून सगळ्या या चळवळी ब्राह्मणांसाठी चालल्या आहेत असली बेछूट विधाने करताच १९२५ साली साताऱ्यास बाबूराव भिडे व कऱ्हाडास बाबूराव गोखले यांनी त्यांचे डोळ्यात झणझणीत अंजन घातले. हेतू इतकाच की, गांधींपासून लिमयांच्या छोट्या काँग्रेसपर्यंत तारीख तागायत शेतकऱ्यांच्या आणि बहुजन समाजांचे हिताकडे डोळ्यात तेल घालून सातारा जिल्ह्याने जपले असता उगाच विपर्यास न व्हावा. सातारा जिल्ह्याचा तो इतिहास अच्युतराव कोल्हट-करानी परिचित करून दिला, हे एक राष्ट्रीय सभेचा डिक्टेटर होऊन कायदे-भंगाच्या चळवळीत भाग घेण्याची आपणास स्फूर्ती येण्यास कारण घडले, असे १९३१ चे कराची येथील काँग्रेसचे वेळी महाराष्ट्र कँपात जवळकर बोलून दाखवीत, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

तात्पर्य घटकाभर उधळलेले चहाच्या पेल्यातील वादळ जर सोडले, तर बहुजनसमाज हा सुशिक्षितांच्या हातात हात घालून एकोप्यानेच राष्ट्रीय चळवळीच्या पीठावर उभा राहिला आहे. रघुनाथराव राणे, नलवड प्रभृतीनी आपल्या संवगड्यानिशी भाऊसाहेब सोमणांच्या १९३४ च्या निवडणूकीस सर्व-थैव साहाय्य केले हे त्याचे प्रत्यंतर होय. प्रागतिक असोत, राष्ट्रीय असोत, किंवा सत्यसमाजी असोत, समंजसपणाने राष्ट्रीय, तेजोवर्धनात आपल्या जिल्ह्याच्या वाटणीचा भाग जिल्ह्याला पार पाडता यावा म्हणून एकोप्याचे वातावरण कोणी बिघडवू इच्छित नाहीत याच सार्वत्रिक मनोवृत्तीमुळे सातारा जिल्ह्याला

आपले कर्तव्य वाढत्या उत्साहाने असहकार युगात देखील पार पाडता आले. महात्मा गांधींच्या असहकाराच्या कार्यक्रमाविषयी मतभेद असलेले दादासाहेब करंदीकरच ता. २६ जून १९२० रोजी राष्ट्राराष्ट्रांचा कायदा या विषयावर वाईस व्याख्यान देताना म्हणाले की (१) सार्वजनिक हितसंबंधाला बाध न येईल इतक्या बेताने खाजगत मिळकत चालू देणे (२) आंतरराष्ट्रीय असे आधुनिक दंडविधानाप्रमाणे चालचलणूक व्हावी अशी अम्मलबजावणी करणारे आंतरराष्ट्रीय लवाद मंडळ असावे, असे करंदीकरांचे मुद्दे होते. ते स्वतंत्र हिंदुस्थान लक्षात घेऊन मांडले होते. नुसता असंतोषी असहकारच का ?

१६ *‘ असहकाराचा ऐन भर ’*

हिंदुस्थानवर कारभार करणारी राज्ययंत्रे सैतानी म्हटल्या बरोबर त्यांच्यापासून जेवढे दूर राहता येईल तेवढे राहावयाचे, स्वावलंबनाच्या जोरावर जितके आपले जीवन स्वतंत्र करता येईल तितके करावयाचे, आणि ज्या लोकांच्यासाठी लोकशाहीचे राज्य हिंदुस्थानात उभारावयाचे त्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा प्रश्न त्यांना सुखावह होईल अशा रीतीने सोडवून त्यांच्या मताने लोकशाही उभारावयाची, हे असहकारयोगाचे रहस्य होते.

असहकाराला उदंड आशीर्वाद देणारी जादा राष्ट्रीय सभा १९२० च्या सप्टेंबरात झाली. त्यानंतर सातारा जिल्ह्यात असहकाराच्या प्रचारासाठी पहिली सभा ता. ११ आक्टोबर रोजी पाठक हॉलमध्ये बाबा कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली. पण पुढे असहकरितेचा प्रसार करणेसाठी व त्या कार्याला फंड जमविण्याकरिता असहकाराचे जनक म. गांधीच नोव्हेंबरच्या ६ व ७ तारखांना सातारा जिल्ह्यात संचार करून गेले. आणि त्या संचाराने जनतेमध्ये एकतऱ्हेची गरमाई उत्पन्न केली. वाई, सातारा, कऱ्हाड, सांगली येथे हजारो हजारांच्या सभा झाल्या, आणि छोटचा काँग्रेसचा अगर लोकमान्यांच्या दौऱ्याचा उत्साह पुनरुद्दिपित झालासे वाटले. साहजिकच कल्पना पटल्याबरोबर आमलात आणणारी माणसे निघाली. घाणेकर बंधू सातारा न्यू इंग्लिशमध्ये शिक्षक होते ते तेथून बाहेर पडले, आणि नोव्हेंबरच्या अखेरीस तर नाथ घाणेकरांनी असहकाराचा प्रचार स्वतःच जिल्ह्यातील गावोगाव करण्याचे ठरवून डिसेंबरमध्ये ते त्या कामास लागलेही.

१९२१ साली असहकाराच्या आचरणाचे फवारे जिकडे तिकडे जिल्ह्यात इंद्रधनुष्ये उभारताना आढळले. कायमची नसली तरी एक वर्षभर अगर तुटमुदतीने काही विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजे सोडली. विनायकराव फणसळकरांनी कऱ्हाडास राष्ट्रीय उत्थापनाची प्रभातफेरी सुरू केली व मग तोच उठाव गावोगावी झाला. आप्पासाहेब आळतेकर, अष्टपुत्रे, टिळक, यशवंतराव देशपांडे, श्रोत्री, मारुलकर वगैरे वकिलांनी कोणी आज, कोणी उद्या अशी वकिली काही मुदत तहकूब केली. यामुदतीत सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रहास प्रारंभ झाला. सातारा सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी डॉ. आठल्ये यांनी द्रव्याची व स्वयंसेवकांची जुळवाजुळव समाधानकारक करून दिली. मारुलकर वकील कऱ्हाड मुळशी सत्याग्रहात शिक्षा भोगून परत आल्यावर त्यांच्या हस्ते तांबव्यास विदेशी कापडाची होळी करण्यात आली. अष्टपुत्रे, आळतेकर, गोविंदराव श्रोत्री यांनी वकिली अजिबात सोडली. जुलईअखेर जिल्ह्यात राष्ट्रीय सभेचे ४३२५ सभासद झाले. टिळक स्वराज्य फंड १३००० रुपयांचेवर जमला. सातारा, वाई, भुईंज, लोणंद, कऱ्हाड, खंडाळे, औंध येथे मद्यपान प्रतिबंधक निरोधन हिंदुमुसलमान सर्वांनी मोठ्या उत्साहाने केले. रहिमतपूर, कऱ्हाड, मसूर येथे प्राथमिक राष्ट्रीय शाळा निघाल्या. साताऱ्यात घाणेकर बंधूचे नेतृत्वाखाली ता. १ मार्च रोजी टिळक राष्ट्रीय विद्यालय निघून नरसिंहाचार्य गजेंद्रगडकर, वाग्भट देशपांडे, टिळक, गोखले, जोशी, राजोपाध्ये ही मंडळी तेथे शिक्षकांची कामे करू लागली. सत्याग्रह व असहकारिता यांच्या प्रचारासाठी मे महिन्यात अष्टपुत्रे वकीलानी दौरा काढला आणि उंब्रजचे नारायण शिराळकर, कऱ्हाडचे मारुलकर वकील, खटावचे वा. वा. इनामदार पालीचे र. म. वैद्य वगैरे मंडळी मावळ्यांच्या जमिनी जाऊ नयेत म्हणून सत्याग्रहास गेली. व एकदीड महिना शिक्षाही भोगून आली. मुळशी सत्याग्रह २३ नोव्हेंबरपासून जोरात चालू होता. त्याचे सातारचे चिटणीस डॉ. वा. वि. आठल्ये होते. ते स्वयंसेवक पुरविण्याचे काम करीत राहिले. मुळशीचे धरण म्हणजे जसा महाराष्ट्राचे हृदयावरील आघात, तसाच जालियनवाला बागेचा अत्याचार हिंदी राष्ट्राच्या अंतःकरणात बोचणारे शल्य होते. तो १९२१ साली तर ताजा होता. म्हणून " राष्ट्रीय सप्ताह " जिल्ह्यात सगळीकडे पाळला गेला. त्यात इसलामपूरचे वासुदेवराव मुंडले, आणि डॉ. भाऊराव वैद्य यांनी बहारीने साजरा केला. कऱ्हाडास जाधव, बटाणे, शिराळकर, मौलवी, कोल्हापुरे प्रभृती मंडळीवर १४४ खाली नोटीसा असल्याकारणाने कऱ्हाडची मंडळी कृष्णेच्या वाळवंटात सैदापूरचे सरहद्दीवर जमली व राष्ट्रीय सप्ताह गणपतराव आळतेकर व बाबूराव गोखले यांच्या नेतृत्व वक्तृत्वाने साजरा करती झाली.

वरील कऱ्हाडकर पुढाऱ्यावर भाषण बंदी वगैरेची नोटीस असावयाचे कारण म्हणजे त्यांनी कराड-पाटण तालुक्यातील असहकारितेच्या प्रचाराने वातावरण तापवून ठेवले होते, हे होय. ऑगस्टमध्ये चिंतामणराव वैद्य व प्रो. फडके हे स्वदेशी बहिष्कारावर व्याख्याने देऊन गेले. तेव्हा असहकाराचा पारा फारच वर चढला.

श्री. बाबूराव वैद्य यांचे आजोबा श्री. नानासाहेब वैद्य (वाई) यांचे दफ्तरात न्यायमूर्ती रानडे यांनी १८८० च्या डिसेंबरमध्ये गरीब माणसाला चालविता येणारा सुती चरखा तयार करण्यास ५०० रु. बक्षीस जाहीर करणारे पत्र सापडले, तेव्हा खादीच्या वापराबरोबर चरख्याचा प्रसार एवढ्या मोठ्या प्रमाणावर करण्यात आला की, जवळ जवळ घरटी एकेक चरखा जाणत्या माणसाच्या वस्तीत फिरत होता म्हटले तरी चालेल. विट्याच्या पेंडसे वकीलांनी खादीची कफनी व त्यांच्या पत्नीनी खादीचा 'लहंगा' पेहरण्यास व फुरसतीचा क्षण--न्--क्षण सूत काढण्यात खर्च करण्यास आरंभ केला. आपल्या विद्यार्थ्यांना आपण सूत कातण्याचे शिक्षण देत असतो हे सांगावयास टिळक हायस्कूलसारख्या शाळेला अभिमान वाटत असे. भरीला सातारा जिल्हा काँ. कमेटीचे चिटणीस गोविंदराव कुबेर वकील यांनी सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरावड्यात स्वदेशी, खादी प्रसारासाठी फिरती काढली. दसऱ्याच्या सुमारास खादीचा प्रसार एवढ्या मोठ्या प्रमाणात आढळला की, कऱ्हाडच्या हिंदु-मुसलमानांची चार हजार लोकांची मिरवणूक खादी पोषाखात दसऱ्या दिवशी प्रेमाने सीमोल्लंघन करून आली. हिंदु-मुसलमानांचे ऐक्य व असहकाराची चळवळ कऱ्हाडास यावेळी शिगेला पोचली होती.

ता. १६ फेब्रुवारी सातारा येथे शंकरराव देवांचे "नागपूर काँग्रेस" वरील व्याख्यान यशस्वी झाले होते. तसाच आता नोव्हेंबरमध्ये वाई, विटे, तासगांव, रहिमतपूर येथील दौरा यशस्वी झाला.

अज्ञान देशबांधवातील दारूच्या प्रसारास आळा घालण्याचाही प्रयत्न जोरात झाला. जुलई १० तारखेस गोविंदराव श्रोत्री वकीलांचे अध्यक्षतेखाली दारूबंदीची सभा मामा गोळवलकरांनी बोलावली. त्या साताऱ्च्या सभेत जिल्ह्यातील सर्व मद्य-पान निरोधनाचा अहवाल सांगण्यात आला. त्याचा विशेष म्हणजे वाई-भुईंज येथील गुत्ते १५ जून पूर्वीच ओस पडल्याचे आणि साताऱ्च्या गुत्त्याना ८ जून पूर्वीच रोज १०० ते २०० रुपये नुकसान येऊ लागल्याचे जाहीर झाले.

शांतरीतीने पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांना बास्करव्हिले यांनी कडक शिक्षा दिल्या व त्यास अत्याचारी ठरवले. म्हणून ता. १६ जून रोजी निषेधपर भाषणे केल्यावरून हुजूरडेप्युटी मि. डोमिंगो यांनी सोमण, अष्टपुत्रे, नाथ घाणेकर,

हकीम, नजमुद्दीन यास दोन महिने भाषणबंदी केली. तरी पिकेटिंगचे कार्यक्रम चालूच होते, आणि खटल्यांना कोणी विचकत नव्हता. तेव्हा नोकरशाही गोंधळली. तथापि एवढ्यात प्रिन्स ऑफ वेल्स १७ नोव्हेंबरास हिंदुस्थानात यावयाचे जाहीर झाले. पण युवराजाच्या आगमनावर बहिष्कार घातला. तो साताऱ्यात यशस्वी होऊ द्यावयाचा नाही, या ईर्षेने सोमण, अष्टपुत्रे प्रभृती नऊ इसमांवर १६ नोव्हेंबर रोजी भाषणबंदीची नोटीस लागली. तरीपण आव्हानपूर्वक कायद्याच्या मर्यादेत सोमण, अष्टेकर प्रभृतींनी भाषणे करून १६ ची सभा पार पाडली. तिचा परिणाम होऊन १७ नोव्हेंबरचा हरताळ कल्पनातीत यसस्वी झाला.

असहकाराचा प्रताप अन्य तऱ्हेनेही या साली जिल्ह्यात दिसून आला. पोलीस सुपरिंटेन्डेन्टच्या ऑफिसातील कारकून त्र्यंबक बापूराव कंटक यांनी आपली नोकरी सोडली व गोरक्षणादी विषयास वाहून घेतले.

असहकारिता हाणून पाडण्याकरिता सरकारने खटले करून बघितले, भाषण बंदी केली. मॉयसीसाहेब कलेक्टर होते. त्यांनी बोटचेप्या सरदार इनामदारांना आर्जवून गुलामसभेचे सभासद वाढविण्याची विनंती केली, पण काही उपयोग झाला नाही. सप्टेंबर १९२१ मध्ये कोकणामधील शामकवीना कऱ्हाडमध्ये भाषणबंदी केली, तरी ते पेठे पेठेतून व्याख्यान देत चालले ! तर मामलेदार-पोलिसांनी ते व्याख्यान ऐकू नये असा व्यवहार–विसंगत हुकूम सोडला. परिणाम असा झाला की, कऱ्हाडच्या वाळवंटातील मारुतीचे देवळाजवळील शामकवीची सभा मोडता मोडता पोलीस टेकीला आले.

सातारा जिल्ह्यात अष्टपुत्रे जसे काँग्रेस कमेटच्या स्थापत गेले, तशा एकट्या तासगांव तालुक्यांत २४ काँग्रेस कमेटचा स्थापन झाल्या. १२ लवाद-कोर्टे ऊर्फ ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. ग्रामसंघटनेच्या उद्योगाला चिंतोपंत काळे व दातार डॉक्टर लागले. कुलकर्णी व शंकरराव करंदीकर खेड्यापाड्यातून खादीप्रसार करू लागले. आणि तात्या शिंद्यासारखा म्युनिसिपल शिपाई तरूण पोरे हाती धरून दारू दुकानावर निरोधन करू लागला. लोकांच्या संघटित व स्वावलंबी सामर्थ्याची चुणूक अशी सरकारी यंत्रांना झणझणल्यामुळेच १९२२ च्या मार्चमध्ये जि. काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष अष्टपुत्रे कऱ्हाड तालुक्यात फिरकू नयेत म्हणून त्यांची तीनवार मुस्कटदाबी करण्यात आली, आणि तोच प्रसाद रायबागचे मौ. अबदुल महंमद युसफ यास साताऱ्यास मिळाला. कारण १९२२ च्या १९ जानेवारीला " अंगारा " दिन पाळण्यात आला. त्यात श्रोत्री वकीलांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यास साजरा झालेला विशेष परिणामकारक होता, आणि फेब्रुवारी महिन्यात खादी प्रसारार्थ जो दौरा सौ. इंदिराबाई देवधर व श्री. आनंदीबाई जोगळेकर यांनी जिल्ह्यात केला त्याने खात्री पटविली होती

की, लोकांच्या उत्साहाचा कढ अजून चढता होता. ता. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खटाव येथे सबरजिस्टर उस्मानशा आणि माजगावकर यांच्यामध्ये सरकारी मनोवृत्ती व राष्ट्रीय सभावाल्यांची प्रवृत्ती या व्यास भिन्नतेमुळे कटकट झाली. दुसरे दिवशी भाऊसाहेब सोमण खटावला गेले आणि आव्हान-पूर्वक सायंकाळच्या सभेत सबरजिस्टरवर आदले दिवशी रजिस्टरनी केलेल्या अतिप्रसंगाबद्दल भाऊसाहेबांनी टीका केली. पुढे रजिस्टरला नोटीस देऊन वृत्तपत्रातून अनावृत्त पत्र कलेक्टरास लिहिले त्याचा परिणाम सरकारी प्रकोपात भर घालण्यातच झाला. नोकरशाहीने असहकारी मंडळीवर आता उडाणटप्पूपणाचे खटले भरण्याचे ठरविले आणि पहिला बळी गणेश हरी साठे पेहेलवान यांचा घेऊन त्यास विसापुरास पाठविले. पण तेवढ्याने नोकरशाहीचे समाधान नव्हते; जालीयनवाला बागेचा राष्ट्रीय सप्ताह सुरू होता. तेव्हा नाथ घाणेकर, हाकीम, आपटे यांची तोंडे चालू होती. ती बंद केल्याशिवाय राष्ट्रीय सप्ताहाची चेतना बंद पडावयाची नाही, अशा समजुतीने सातारा मामलेदारनी १४४ कलम त्यास लावले. पण दादासाहेब करंदीकर, सोमण, आगाशे, वा. वि. आठल्ये, श्रोत्री, निळुभाऊ घाणेकर, वा. वा. अतीतकर, फाटक, बाबासाहेब शालगार हे इसलामपूर, मसूर, शिराळे, कऱ्हाड वगैरे भागातून जागृती करून आलेच.

एव्हाना राष्ट्रात एक प्रश्न जोरात उसळी मारीत होता, सरकारी का सरकारमान्य शाळा, कोर्टे व कायदे मंडळे यावरील बहिष्कार हा असहकाराचा जो कार्यक्रम तो खणखणीत यशस्वी करावयाचा तर कणखरपणाने लोकांनी आपल्या शाळा व पंचायती काढून अशा चालविल्या पाहिजेत की, जुलूमशाहीने एक संस्था नेस्तनाबूद केल्याबरोबर तिच्या मातीतून दुसरी मूर्तीमंत उठली पाहिजे. समर्थ विद्यालयाच्या विनाशातून तसे विधायक विद्यालय उद्भवले नाही की, सार्वजनिक काकापासून लवाद कोर्टे चालवूनसुद्धा सरकारी कोर्टी-वरची रीघ कमी झाली नाही. हा जुना अनुभव असल्यामुळे लोकमान्यांची चतु:सूत्रीची तत्त्वे असहकारात पाळून सुद्धा शाळा कोर्टांवरील बहिष्कारादि-तपशील करंदीकर-सोमण प्रभृतींना मान्य नव्हता, तथापि पाणी तोडू पाहण्याऱ्या उमेदीला अटकावणे हे सातारा जिल्ह्याला वावडे असल्याकारणाने तेजस्वी पाऊलटाकीला पुढाऱ्यांनी हातभारच लावला. तरीदेखील शाळा कोर्टांवरील बहिष्कार यशस्वी झाला नाही. त्याप्रमाणेच कायदे मंडळाच्या बहिष्काराची कथा. हा बहिष्कार तेव्हाच म्हणता येईल की, जेव्हा कायदे मंडळे एक खरो-खर ओस पडतील अगर भरलीच तर निदान स्वाभिमानी सभासदांनी तरी भरतील. विलिंग्डनसाहेबांच्या युद्ध परिषदेतून टिळक प्रभृती होमरूलर्स उठून आल्यावर जिनानी जो नमुना उठवला तो तरी उठावा. पण तेही शक्य झाले

नाही. १९२० मध्ये ज्या कायदे मंडळावर राष्ट्रीयांनी बहिष्कार घातला होता ती नादानपणाने काम करीत होती, तेव्हा जेथून लोकमताच्या नांवावर कायदे होतात ती कायदे मंडळेच बहिष्कृत म्हणून आपण सोडता कामा नयेत. कायदे मंडळावरचा बहिष्कार नुसता तोंडी राखण्यात व गबाळ्यांच्या हुकमी बहुमताने सरकारी लहरीचे कायदे निमूट लादून घेण्यात असहकाराच्या शब्द-निष्ठेशिवाय काय साधते ? तेव्हा असहकार जसा बाहेरच्या चळवळीने करावयाचा तसा कायदे मंडळात मूळ कायद्याची भट्टी तापवूनही करता येईल. म्हणून कायदे मंडळे काबीज करावी असे आंदोलन आता सुरू झाले. १९२० साली लोकमान्यांनी डेमोक्रॅटिक स्वराज्य पार्टी-लोकशाही स्वराज्यपक्ष - काढला त्याच्यातर्फे सातारा जिल्ह्याला भाऊसाहेब सोमण, कडूसकर आणि नरसिंह-पूरचे बाळा पाटील मुंबई कौन्सिलकरता उभें राहण्याचे ठरले होते. निवडणूकीच्या खटपटीलाही सुरवात झाली होती. इतक्यात लोकमान्यांच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय सभेने असहकाराचा जो पुरस्कार केला त्यात कायदे मंडळाचा बहिष्कार असल्याने राष्ट्रीय सभेच्या इज्जतीसाठी वरील मंडळींनी आपली उमेदवारी परत घेतली होती. पण आता कायदेमंडळाच्या, बहिष्काराचा कटू अनुभव आल्यावर त्यांनी स्वाभाविकपणेच कौन्सिल प्रवेशाला तोंड फोडले. तथापि एकदा सरकारी यंत्राशी असहकार करावयाचे ठरल्यावर स्वावलंबनाने आपले सामर्थ्य, आणि आपल्या शब्दापाठीमागील जनतेचा दुजोरा खडाखंब केल्यावर सुलतानांचे सुलतान लटपटतील, मग पांगळ्या आमदार खासदारांचा मळवट भरून नौकरशाहीचे अखंड सौभाग्य कितीसे तग धरील ? म्हणून असहकाराला धर लागतो न लागतो तोच सरकारी यंत्रात आपला हात अडकवून घेण्याच्या फंदात पडू नये अशी दुसरी विचारसरणी पाहिली इतकीच तीव्र होती. जून महिन्याचे शेवटी गंगाधरराव देशपांडे व शंकरराव देव हे या दुसऱ्या विचार-सरणीलाच खत पाणी घालून वाई भागातून गेले आणि पहिल्या विचार सरणीचा पुरस्कार करीत सप्टेंबर महिन्यात दा. वि. गोखले आणि रावबहादुर काळे वाई भागातच मोहिम करून आले. आण्णासाहेब आळतेकर व इसलापूरचे कौजलगी वकील राष्ट्रीय सभेचा प्रचार जिल्हाभर करीत होते. पण वाईचे गणेश हरी खरे, नानासाहेब शिंदे हे जुलई व ऑगस्ट महिन्यात जावली व पाटण तालुक्यात राष्ट्रीय सभेच्या प्रचाराबरोबर कोयनाव्हॅलीत होणार होणार म्हणून गाजत असेलेल्या व मुळशीप्रमाणेच शेतकऱ्यांच्या मुळावर येणाऱ्या धरणाची माहिती शेतकऱ्यांना देत फिरत होते. इतके की अधिकाऱ्यांनी त्यांच्यामागे जमानतीचे लकडे लावले !! ऑगस्ट महिन्यातच तात्यासाहेब करंदीकर मुळशी सत्याग्रहाच्या व दत्तोपंत धारपुरे राष्ट्रीय शिक्षणाचाही " सांगावा " सांगून गेले, अतीतकरांनी मुळशीफंड गोळा


केला, बाबा सावरकरादी सुटले म्हणून सप्टेंबराच्या पहिल्या आठवड्यात आनंद प्रदर्शित करण्यात आला; सर्व काही झाले; पण कांयदेमंडळाच्या प्रवेशाचे जे भिजत घोंगडे पडले होते त्याबद्दल सातारा जिल्ह्यात सर सालातही बहुजन समाजाने प्रश्न काढला नाही. कारण बहुजन समाजाला कायदेमंडळात शिरणारांना मते देता आली, एखाद्या लायक उमेदवाराबद्दल खटपट करता आली, तरी निवडणूकीच्या घटकेपुरतीच उमेदवार लोकमताची आराधना करतो. तेव्हा, सैतानी सरकारच्या कसल्याही मोहिनी अस्त्राला बळी पडणार नाही अशी आपल्याबद्दल जनतेची खात्री पटवील इतकी तपश्चर्या संभवनीय उमेदवाराच्या हातून घडावी या रोखाव्यतिरिक्त कायदेमंडळाचा प्रश्न कानामागे टाकण्यात बहुजन समाजाचा हेतू नव्हता. हा जनतेचा रोख हेरूनच माधवराव साठे, गंगाधरशास्त्री सोहनी, काशिनाथपंत कोल्हटकर, गोविंदराव परांजपे, मुंशित हिदायतअल्ली, गणेश नरसिंह जोशी, केशवराव गोडबोले, विष्णुपंत कान्हेरे, वगैरे वाईकर सुबुद्ध मंडळींनी जुलई पासून वाई तालुका खादीमय करून सोडला होता. शेवटी ‘ आळी मिळी ’ घालून ठेवलेल्या कौन्सिल प्रवेशाच्या प्रश्नाने इसलामपूर येथे १९२२ जिल्हासभेत तोंड वर काढताच, त्याला पाय म्हणून टेकता आला नाही. तसे जगास व सरकारी अधिकाऱ्यास कळून चुकले की, जिल्ह्यात विचाराचे ओघ दोन असले तरी राष्ट्रीय सभेच्या ठरावास आपण हरताळ फासण्यास कारणीभूत होऊ नये याबद्दल सातारा जिल्हा अत्यंत दक्षता घेतो. राष्ट्रीय सभेच्या इज्जतीची दक्षता म्हणजे मॉयसीसाहेबासारख्या कलेक्टरला तो आपल्या कारभारावरील अकारण कलंक वाटे; आणि म्हणूनच की काय अनेक खटले खोखले करूनही दमचक्कीला न येणाऱ्या जनतेला दबावण्यासाठी वाईच्या काकाराव पंडितांचे व कऱ्हाड तालुक्यांतील अनंत हरी बेळगांवकराचे इनाम जप्तीत काढले. आणि कारण काय दाखविले ? तर म्हणे १९२१ साली युवराजाच्या आगमनानंतर बहिष्कार घातल्याच्या निमित्ताने जी सभा भरली होती, तिचे काकाराव पंडीत अध्यक्ष होते; आणि खादी वगैरे वापरणारे अनंत हरी लोकांना ‘ साराबंदीचा ’ उपदेश करीत असल्याची दख्खल सरकारलाच होती ! !

१७ : उतरण


राष्ट्रीय सभेचे ठराव हे आज्ञापक की अनुज्ञापक शिस्तीने रणांगणावरील सैनिकाप्रमाणे अमलात आणावयाचे की आपल्या विवेचक बुद्धीला पटेल, शाळेच्या नांवलौकीकाला कमीपणा आणणार नाही आणि तत्त्वाचे आटोकाट आचरण होईल (मग बाह्य देखाव्यात जरा इकडेतिकडे झाले तरी चालेल) अशा निकराने शिक्षकाच्या "सांगीस" अनुसरावयाचे ? विचारवंतांचे उत्तर एकच की, पहिला क्रम लढयाच्या वेळचा प्रासंगिक, तर दुसरा निरंतचा. यावर आक्षेप असा की, हिंदुस्थानचा लढा काही घटका दोन घटकांचा नाही, की वर्ष सहामहिन्यांचा नाही, तेव्हा स्वराज्य मिळेपर्यंत कडक लष्करी शिस्त लोकांनी पाळली पाहिजे. पण हे मत आत्यंतिक नाही का ? स्वराज्याचा लढा ब्रिटिश राजवटीशी १८१८ तच सुरू झाला असे सातारा जिल्हा मानतो. पण अंगठीवरील खड्यासारखे चौदा लक्षांचे राज्य प्रतापसिंह महाराजांना ठेवणारा आणि तेही दत्तकाच्या फुसक्या निमित्ताने पुढे गिळणारा महोदर जर आपली वर्तणूक हिंदुस्थानच्या कल्याणाची भासविण्यासाठी सामदंड भेदादी उपाय अमलात आणणार तर हिंदुस्थाननेही तेच आणावयास नकोत काय ? राजकारणात बाहत्तर रोगावर एकच औषध सापडल्याचा दाखला जगाच्या इतिहासात तरी नाही. तरीपण या सर्व बाबतीत राष्ट्रीय सभेचे ठराव आज्ञा म्हणून लष्करी कडकपणाने पाळावयास नकोत काय ? राष्ट्रीय सभा म्हणजे एकचएक शिवाजी असती तर तसे करणे एक वेळ बुद्धिवादाला धरून चालले असते. पण शिवाजी झाला तरी संग्रामानंतरचे शांतीच्या काळात अगर खलबतखान्यात आपल्या मातोश्रींचा आणि सख्या सवंगड्याचा सल्ला घेत नव्हता आणि त्यांच्या विचारांना मान देत नव्हता असे थोडेच आहे ! राष्ट्रीय सभा तर बोलून चालून कोटीमुखी हिंदी राष्ट्राचे तोंड. तेव्हा स्वराज्य विकासक्षम विचार स्वातंत्र्याचा दृढभाजक तेथे निघावयास हवा. म्हणून सातारा जिल्ह्याने आतापर्यंत तरी आपल्या वर्तनाने दिलेला निर्णय असा की, एरवीच्या काळी राष्ट्रीय सभेचे ठराव अनुज्ञापक स्वरूपाचे मानावेत आणि लढयाला तोंड लागते त्यावेळी कसलाही विचार न करता ते लष्करी शिस्तीने अज्ञापक स्वरूपाचेच मानावेत. कायदे मंडळाच्या प्रश्नावर १९२२ साली अनुज्ञापकतेचे सदर टाकावयास सातारा जिल्हा तयार झाला नाही याचे कारण "कायदेमंडळात शिरावे" असे म्हणणारे लोक असहकाराचे तत्त्व चिरडीत होते म्हणून नव्हे तर असह-



लोकमान्य बाल गंगाधर टिळक




महात्मा गांधी



डॉ. राजेंद्रप्रसाद



दे. गौ. सुभाषचंद्र बोस



पं. जवाहरलाल नेहरू

काराने लढ्याला लागलेले तोंड इतक्यातच फिरविण्याची जरूरी नाही असा सातारा जिल्ह्याचा कयास होता म्हणून.

पण पुढे राष्ट्रीय सभेतच निर्माण झालेल्या स्वराज्य पक्षाने कायदे मंडळात शिरण्याची राष्ट्रीयसभेची अनुज्ञा मिळविली. एप्रिल १९२३ च्या पहिल्या आठवड्यापासून स्वराज्य पक्षाकडे काँग्रेस कमेट्याही कारभारासाठी गेल्या. तेव्हा आपलीच "एकांडे शिलेदारी" गाजवून सातारा जिल्ह्याला अर्थ तरी काय होता ? व दुफाळीपासून दोन हात दूर असणे हे तर सामान्यतः सातारा जिल्ह्याचे धोरण. तेव्हा स्वराज्य पक्षाने सातारा जिल्ह्याकरता भाऊसाहेब सोमणांना मुंबई कौन्सिलसाठी आपले उमेदवार म्हणून पसंत करताच, केवळ पहिल्या नंबरानेच व प्रचंड बहुमताने जिल्ह्याने त्यांना निवडून दिले.

इकडे असे आंदोलन चालू होते तर अधिकारी गोटातही दुसरीच खळबळ होती. हिंदुस्थानातील सर्व पक्षीय सभामंडळ निर्माण करून काही कार्यक्रम आखण्याचा उपक्रम सुरू होता. २२ फेब्रुवारी १९२४ रोजी दादासाहेब करंदीकर त्याला हजर राहिले व त्यांनी लान्सबरी सर्व राजकीय कैद्यांना बिनशर्त सोडावे म्हणत होता, त्या सुताच्या आधाराने २५ फेब्रुवारी १९२४ रोजी मजूर पक्षास तार देऊन भारतीय राजकीय सुधारणांच्या नव्या हप्त्यासाठी गोलमेज परिषद घेण्यास सुचविले. २ मार्च रोजी तर लार्ड ऑलिव्हर वेजवुडला त्यांनी तारेने कळविले की भारताच्या बाबत रॉयल कमिशन व गोलमेज परिषद यांची अळंटळं चालणार नाही ! !

असहकारतेच्या ऐन भरात खिलापतीच्या प्रश्नामुळे एकदिल झालेला मुसलमान समाज चंचल झाला, असहकाराचा कार्यक्रम तत्त्वतः कबूल असला तरी "तपशील नाकबूल" करणारा एक विभाग राष्ट्रीयातच पडला, राष्ट्रीय सभेचा सभासद होण्याबद्दलची वर्गणी सूत रूपानेच दिली पाहिजे असा निर्बंध असलेमुळे त्या सांप्रदायसमाधानाकरता अनेक पर्याय प्रकार पडद्यामागे झाले; ही राष्ट्रीय मनमोकळ्या जीवनाची एक तऱ्हेने कुचंबणा होती, म्हणून बहुजन समाजात आंदोलन करण्याने आणि करून बहुजन समाजाच्या पाठिंब्याने जो स्वराज्याचा लढा चालवावयाचा त्याला मंदी आली आणि जो काय लढा दिला गेला तो कायदे–मंडळाच्या आवारातच होय. त्यामुळे सरकाररोखे वळलेली सातारा जिल्ह्यातील बहुजन समाजाची चळवळ म्हणजे प्रथम कायदे मंडळात राष्ट्रीयदृष्ट्या कोणाला निवडून द्यावयाचे इकडे लक्ष ठेवून योग्य तोच प्रतिनिधी निवडून द्यावयाचा आणि त्याच्याकडून काम करवून घ्यावयाचे, किंवा तो करतो की नाही हे डोळ्यांत तेल घालून पहावयाचे. या दृष्टीने १९२४ च्या जून २२ तारखेला एम्. एल्. सी. सोमणांच्या अध्यक्षतेखाली कृष्णाकॅनाल बागाईतदारांची सभा झाली अगर १९२५ च्या नोव्हेंबर २३ तारखेला वाढ-

लेल्या शेतसाऱ्यासंबंधी तारळ्याच्या शेतकऱ्यांनी सरकारप्रमाणेच सोमणांच्याकडे अर्ज पाठविला, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. "१९२२ सालचे कॅनाल संबंधीचे नियम कॅनालखालच्या बागाईतदारास लागू करणे अन्यायाचे आहे, वीस गुंठ्यावर दशकडी पाठीमागे आकारणी करणे, अर्जात लिहिलेल्या क्षेत्राचा भरपूर आकार घेणे, जास्ती जमिनीस चुकून पाणी दिले गेल्यास तिप्पट दंड करणे वगैरे बाबीबद्दल असमाधान व्यक्त करणारे" ठराव बागाईतदारांच्या सभासदांनी केले. अगर १९२६ च्या निवडणूकीत प्रतिसरकारवादी म्हणून निवडून आलेले नानासाहेब देशपांडे "तुकडेपट्टी बिलाबद्दल" सर्व जिल्हाभर १९२७ साली हिंडून लोकमत पडताळून आले, त्याचा उपयोग कायदे मंडळाच्या आतील लढ्यांकरताच होता. इतके कशाला? तरमवाढीसंबंधात सप्टेंबर १९२३ मध्ये भाऊसाहेब सोमण यांचे अध्यक्षतेखाली भरलेली खटाव तालुका सभा, नानासाहेब देशपांडे यांचे खटपटीने तरमवाढी संबंधातच पांडुरंगराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली कऱ्हाड तालुका शेतकरी परिषद आणि त्यांची भावंडे ही कायदे मंडळातील चकमकी करताच होती.

प्राप्त परिस्थितीचे पाणी सातारा जिल्हा अशा तऱ्हेने तोंडीत असता राष्ट्रीयांमधील दुभागणी सातारा जिल्ह्याला बोचत होती, व म्हणूनच १९०० व १९१४ सालाप्रमाणेच १९२५ सालीही प्रांतिक परिषद भरविण्याचे धाडस करून सांप्रदायिक म्हणूनच जाचक वाटणारी सुताच्या वर्गणीची अट कमी करावी असा ठराव करून साताऱ्याने एकीचे वातावरण उत्पन्न केले. ही एकीची मनोवृत्ती जिल्ह्यात जागृत रहावी, सामुदायिक अशा राष्ट्रीय संचालनेचा पारा उतरला तरी एका विशिष्ट अंशाखाली येऊच नये, म्हणून सातारा जिल्ह्याने या कायदेमंडळ-प्रवेश-वादाच्या काळातही काळजी घेतली.

तासगांवचे शंकर दिनकर करंदीकर हे १९२१ सालाप्रमाणेच १९२३ सालीही खादी प्रचारार्थ दौरा करीतच होते; सूत कातणारासाठी बक्षीसे लावून खादीचा प्रचार करणारे श्रोत्री एप्रिल १९२५ च्या दुसऱ्या पंधरावड्यात भाऊसाहेब सोमणासमवेत जिल्ह्याच्या पूर्व भागातून राष्ट्रीय सभेवरील निष्ठा आणि प्रांतिक परिषदेत होणे जरूर असलेली एकी यासंबंधी दौरा काढून आले. १९२६ साली युनिव्हर्सिटीतर्फे डॉ. देशमुखाना निवडण्याविषयी गोसावी वकीलांनी पदवीधर मतदारास विनंती केली. ता. २१ जून रोजी प्रतियोगी सहकारतेवर साताऱ्यास तात्यासाहेब केळकरांचे व्याख्यान आण्णासाहेब मुतालिकांचे अध्यक्षतेखाली झाले; परचुरेशास्त्री, पांडुआण्णा शिराळकरांच्या प्रेरणेने कऱ्हाड तालुक्यात दीड एक वर्ष हिंडले; ता. ८ ऑगस्ट १९२५ रोजी रा. ब. काळ्यांचे सुरेंद्रनाथ बानर्जींच्या दुःख प्रदर्शनार्थ व्याख्यान साताऱ्यास हृदयस्पर्शी झाले. हे व असले प्रसंग म्हणजे समाजाची राष्ट्रीय वृत्ती विशिष्ट धारणेखाली न येऊ देण्याचेच प्रयत्न होते.

१८ : बहुरंगी तीन वर्षे

महाराष्ट्रातील एक नामवंत सातारकर कार्यकर्ते श्री. कृ. मा. साखवळकर याजकडून १९२७ मध्ये हुबळीचे डॉ. हर्डीकर यांना आठल्यांची महिती मिळाल्या-बरोबर आपली १९०८-९ सालातील कलकत्त्यामधील ओळख देऊन हर्डीकरांनी आठल्याना सेवादल कार्यात सामील होण्याची विनंती केली. भारतीयांना पुढे कराव्या लागणाऱ्या लढयाची तयारी करण्याचे ध्येय सेवादला पुढे होते. तेव्हा आठल्ये आनंदाने सामील झाले व १९२७ ते १९३१ या कालात दलाच्या महाराष्ट्र प्रांतिक शाखेचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी श्री. चौधरी, साखवळकर, सास-वनेचे काणे वगैरेंच्या सहाय्याने पंधरा शाखा आणि ३५० स्वयंसेवक संघटित केले.

लांब उडी घेणाराला किंचित मागून पळत यावे लागते (पण पुढे नजर ठेवून) त्याप्रमाणे असहकारावरून दोन वर्षे किंचित मागे उडी घेऊन मोठ्या उडीच्या तयारीसाठी हिंदुस्थान हातोपे सावरू लागला आणि अर्थातच सातारा जिल्ह्याने तेच केले. तत्त्वज्ञान, मग ते धार्मिक मोक्षाचे असो नाहीतर आधिभौतिक मोक्षाचे ऊर्फ राष्ट्रीय स्वातंत्र्याचे असो, ते जनतेच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवून "सुखाचे संसार" थाटण्यास मदत करीत नसेल तर त्याचा काही एक उपयोग नाही. म्हणून राष्ट्रीय सभेतील मतभेद टाळून निर्भेळ राजकारणच करावयासाठी राष्ट्रीय सभेला मोकळी केली तरी असहकाराच्या बुडाशी असलेले स्वावलंबनपूर्वक बहुजन समाजाच्या जीवनाला रूप आणणारे खादीचे तत्त्व रुजवि-ण्याकरिता खादीसंघ महात्माजीनी स्वतंत्र काढला, आणि आपले प्रचार कार्य करीत करीत ते फेब्रुवारी १९२७च्या अखेरीस सातारा जिल्ह्यात आले. देशसेवा आणि "खादी हेच स्वदेशीचे शुद्ध स्वरूप" या महात्माजींच्या वचनातील तत्त्व बहुजन समाजास कसे पटले होते याचे प्रत्यंतर २५ फेब्रुवारीपासून सातारा जिल्ह्याने खालीलप्रमाणे दिले; —

गाव	सभासद	थैली	हार वगैरेचा लिलाव
सांगली	४०००	९५०	४५१
दुधगाव	२०००	२००	२५
अष्टे	३०००	३५०	४२
इसलामपूर	५०००	५०१	१००
कऱ्हाड	६०००	५०१	४१
सातारा	१००००	५००	

दुधगांव येथे २५ रु. ढवळीचे, इसलामपूर येथे ३२॥ रु. रेठरे हरणाक्ष येथील, सांगलीला खादीचा लिलाव ३००रु, अष्टचाला करंडकाचा लिलाव ३०रुपये आणि रेठरें हरणाक्षाच्या हारांचे लिलाव १९ रुपये हे लक्षात घ्यावयास पाहिजेत. यावेळी अष्टे, इसलामपूर, कऱ्हाड, सातारा येथे म्युनिसिपालिटयांची मानपत्रे झालीच; पण इसलामपूर आणि सातारा येथे लोकल बोर्डाचीही मानपत्रे झाली. अष्टचाला एका ५-६ वर्षाचे मुलाने स्वागत केले, तर कऱ्हाडास खादीभांडार उघडले व पांडुअण्णा शिराळकरांनी नवीन बांधलेल्या मातंग समाज विठ्ठल मंदिराचा महात्माजींच्या हस्ते पाया घातला. साताऱ्यात छत्रपती विद्यार्थी-वसतीगृह महात्माजींच्या हस्ते सुरू केले व हरिजनांनी महात्माजीना मानपत्र दिले. या गोष्टी महात्माजींच्या या दौऱ्यातील ठळक म्हणून सांगता येतील.

महात्माजींनी दिग्दर्शित केलेल्या या मुख्य खादी प्रचाराचा विकास ज्यात व्हावयाचा ते ग्रामसंघटन करता यावे म्हणून सातारा तालुक्याच्या " खेडयातील यात्रा " करावयास परचुरे शास्त्रीनी ता. ११ सप्टेंबर १९२७ रोजी सुरवात केली आणि त्या यात्रेतील पहिली फेरी केवळ रु.२३ मध्ये २१ जानेवारी १९२८ ला संपली. या अवधीत, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, जातवारीने हिंदूंची लोकसंख्या, बागायत व जिराईत असलेले लागणीचे क्षेत्र, पड, गावठाण आकार, लोकलफंड, बंदिस्त अगर खुले जंगल, अबकारी अगर बिन अबकारी, गायरान, शिक्षणाची सोय, शाळकरी व बिन शाळकरी जातवार मुले; गावातील अगर आसपासच्या कारखान्यांची माहिती ; बैतेदार, बलुतेदार व गावकरी यांचे संबंध, मुंबईस मजुरीसाठी जाणारे लोक, गावातील कुशल कारागिर वगैरे लोकांची माहिती, धर्मव्यवस्था; भिक्षेकरी व भिक्षा, तेल घाणे, कोष्टी, सनगर होते व आहेत किती, सरकारी यंत्राचे मतदार वगैरे माहिती परचुरे शास्त्रीनी १९०७ सालच्या शेतकरी सभेपेक्षा अधिक अशी प्रत्येक गावातून मिळविली आणि ती प्रसिद्ध करून "परत खेडयात" जाऊन खेडी जिवंत करण्यासाठी कुदळ-काम करून ठेवले. १९२५ पासून कऱ्हाड तालुक्यात विनायकराव फणसळकर व बाबूराव गोखले वरचेवर सामाजिक व राजकीय जागृतीसाठी हिंडत. हेतू इतकाच की, कोणी बाहेरच्या उपद्व्याप्यांनी हिंदू-मुसलमानात तेढ उत्पन्न करताच काही अप्रबुद्धानी मूर्ती फोडाव्या आणि हिंदूंच्या भावनेबद्दल बेफिकीर असावे, असा जो पायंडा मुनशी मामलेदारासारख्या अधिकाऱ्यांच्या कारकीर्दित अकारण पडत होता त्याला आळा बसावा. १९२८ साली हीच तालुक्यातील तराळकी पांडूआण्णा शिराळकर व कऱ्हाड तालुका काँग्रेस कमेटी यांच्या आज्ञेने थोडीफार परचुरे शास्त्र्यांच्या धर्तीवर बाबूराव गोखले यांनी केली. शिवाय गावगरजांच्या बरोबर नेहरू रिपोर्टाचा प्रचारही गोखले त्यासाली करीत होते.

पंधरा पंधरा वीस वीस खेड्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी मधून मधून मुख्यसभा भरवून, तेथे शिराळकर, गणपतराव अळतेकर, मारूलकर, आबासाहेब धोपाटे, ही मंडळी ग्रामसंघटनेचे महत्त्व, नेहरूरिपोर्ट, राष्ट्रीय सभेचे धोरण यांची समजावणी देत. पाल (खंडोबाची), सुपने, सुर्ली (१९२२ पासून गोविंद विनायक कुलकर्ण्यांनी सेवा करून हेवा करण्यासारखी बनवलेली), कोळे, शेणोली येथील सभा वरील दृष्टीने संस्मरणीय झाल्या. लाटणे, बोरगांव, अतीत, अपशिंगे, भरतगांव, नागठाणे, धावडशी, कण्हेर, अकले, अंबेवाडी वगैरे ठिकाणी बेडेकर (कोरेगाव), डॉ. आठल्ये, सोमण, राजाभाऊ पालकर, बाबूराव सातारकर भिडे, रामभाऊ मोडक, गोपाळराव जोशी, बुवा गोसावी वकील प्रभृती मंडळीही खेडेगावातून १९२८ साली हिंडली. परचुरे शास्त्र्यांनातर खंड नव्हताच. सातारा तालुक्यातील परचुरे शास्त्र्यांच्या अखंड यात्रेमुळेच १९२९ साली २ मार्च रोजी सातारा तालुका खेडकरी परिषद भरली, त्यावेळी पांचशेपेक्षा अधिक शेतकरी हजर होते. सातारा न्यू इं. स्कूलमधील त्या सभेस पुण्याचे शंकरराव भागवत, ठेंगडी, फुले, आचार्य रबडे, श्रीमती काशीबाई देवधर, श्रीमती डॉ. साठे वगैरे मंडळी मुद्दाम आली होती. विट्याचे पुढारी जोगळेकर, बापट हे हजर होते. शिवाय रा. ब. काळे, कुदळे यांची भाषणे त्या सभेत झाली. आणि सातारा ग्रामसेवासंघाचे सततोद्योगी चिटणीस गोपाळराव जोशी यांनी अहवाल वाचला या गोष्टीपेक्षा सातारा तालुक्यातील ऐंशी शेतकऱ्यांनी आपली गाऱ्हाणी जाहीर तऱ्हेने सांगितली, हेच त्या सभेचे कौतुकास्पद वैशिष्ट्य. कारण असाच धीटपणा अंगी मुरला, बाणला म्हणजे राष्ट्रीयतेने पुलकित झालेला कोणी धीर पुरूष शेतकऱ्यांचे व खेडकऱ्यांचे पुढारीपण नेटाने करीत राहील. अशी तेजस्वी परंपरा त्या बहुजन समाजात उत्पन्न होण्यातच राष्ट्राचा उध्दार आणि लोकशाहीच्या तळमळीने देशसेवेसाठी धडपडणाऱ्या आजकालच्या पुढाऱ्यांच्या श्रमाचे चीज आहे हे सोमणानी १९२५ साली प्रांतिक परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून काढलेले उद्गार सार्थ नाहीत असे कोण म्हणेल? म्हणूनच झाले तरी सातारा ग्रामसेवा संघाचे अभिनंदन विलेपार्ले येथील प्रांतिक परिषदेत केले.

असो. ग्रामसंघटनेला ज्याप्रमाणे १९२७ साली सुरवात झाली, त्याप्रमाणे त्यावेळी मुंबई कायदे मंडळाच्यापुढे सर चुनीलाल मेथानी मांडलेल्या "तुकडे पट्टीच्या" बिलाने शेतकऱ्यांच्या मिळकतीलाच हात घालवयाला काढल्याने जाणत्याला प्रथम तिकडे लक्ष देणेच भाग पडले. मागे सांगितल्याप्रमाणे कडेगांव, विटे, मायणी, चितळी, खटाव, कऱ्हाड, शेणोली, तासगाव, कोळे, सातारा, चरेगांव, उंब्रज, चाफळ वगैरे जिल्ह्याच्या बहुतेक सर्व भागातून नानासाहेब देशपांडे हिंडले आणि त्यांच्या बरोबर बाबूराव गोखले हेही हिंडले. मधून मधून

पांडुआण्णा शिराळकर, गणपतराव अळतेकर वगैरेही येत असत. या सर्व मंडळींना शेतीचे बारीक बारीक तुकडे झाल्याकारणाने " जान देईन पण जमीन देणार नाही. " या शेतकऱ्यांच्या म्हणण्यात जीव उरला नाही. हे बिलच्या जनकाप्रमाणे अगर पुरस्कर्त्याप्रमाणे दिसत नव्हते, असे नाही. पण गाव नमुनेदार करण्याकरिता बारिक सारिक तुकडयांच्या जमिनी उडवून मोठ मोठे जमीनदार उत्पन्न करण्यात, हजारो हजार शेतकऱ्यांच्या तोंडचा अर्धामुर्दा घांसही काढून घेऊन राष्ट्रात बेकारांची भलती भर होईल आणि फायदा झालाच तर फक्त सरकारला आपला सारा बिनधोक वसूल करण्यात होईल. तेव्हा " हिंदी शेती ही राष्ट्रीय संपत्ती आहे हे जाणून त्या शेतीची आणि शेतकऱ्यांची सुधारणा करण्याकरिता, ठराविक प्रमाणाखाली जमिनीचे तुकडे होऊन देता कामा नयेत हे अंतःकरणपूर्वक मान्य असेल तर पहिल्या प्रथम या गोष्टी करा. कमीत कमी दोन पिढयापर्यंत तरी हल्लीच्यापेक्षा शेतसारा एक कपर्दिकेनेही वाढणार नाही, याबद्दल खात्री करा. त्यायोगे शेत कसण्यास उत्तेजन येऊन शेतकऱ्यास जरा तरी हातपाय हालविण्यास सवड सापडेल. त्याचबरोबर तुमचे जे काही जमिनीनिहाय व गांवनिहाय ठराविक प्रमाण ठरेल ते कमीतकमी पण भरपूर मुदतीनंतर अमलात येईल असे जाहीर अगाऊ करून ठेवा. म्हणजे ठराविक प्रमाणाइतकी जमीन पैदा करावयाची अगर आहे ती जमीन सोडून दुसराच उद्योग करावाचा याची निश्चिती शेतकऱ्यास करता येईल. सदरच्या कमीतकमी पण भरपूर मुदतीत शेतकऱ्यांच्या मुलांना तरी साक्षर करून पुस्तकी पोपटपंचीपेक्षा काही उत्पादक व विधायक अशा धंद्याचे वळण लावा आणि शेतीची सुधारलेली कला हिंदी परंपरेशी मिळती घेऊन शिकवा. " सरकारला करावयाच्या खडया सवालाची हीच विचारसरणी नाथ घाणेकर, भाऊसाहेब सोमण आदिकरून जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयांची तर होतीच, पण २ मे १९२८ रोजी पुणे सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात भरलेल्या सातारा जिल्हा सभेच्या कार्यकारी मंडळानेही त्यावर आपल्या पसंतीचे शिक्कामोर्तब केले होते.

एवढयानेच काय झाले ! नोव्हेंबर, डिसेंबर १९२७ पासून शेतकऱ्याला आपल्या डोक्यावर टांगलेल्या तुकडेपट्टी बिलाच्या तलवारीचे पाणी कळून चूकू लागल्यामुळे १९२८ साली गावागावातून निषेधाच्या सभा भरू लागल्या. त्यात भोवतालचे २०-२२ गावचे लोक जमून गोगवे येथे ता. १ जानेवारी १९२८ रोजी झालेली बाबासाहेब जगदेवराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील, मौजे विरमाडे येथे वामनराव कुलकर्णी, माधवराव साठे, गणपतराव सोनवणे विष्णुपंत दुदुस्कर यानी साजरी केलेली, गोविंद रामजी गायकवाड व माणिचंद शेटजी यांची कळंबे येथील, बळवंत तुकाराम जगताप यांच्या अध्यक्षतेखालील

विनायकराव भुसकुटे व मानसिंगराव जगताप यांनी ता. २६ रोजी बोलाविलेली केंजळची व सुरली (कोरेगाव) मधील केशवराव जेधे यांचे अध्यक्षतेखाली केशवराव विचारे, जवळकर, नारायणराव गुंजाळ हे एकत्र मिळालेली अशा सभा महत्त्वाच्या होत्या.

देव भले करो, या गावगन्ना सभापेक्षा तालुका सभा अधिक परिणाम कारक होतील अशी कल्पना १९२८ च्या एप्रिलमध्ये उद्भवली आणि अगदी प्रथम वाळवे तालुका शेतकरी परिषद भरली. बाबासाहेब देशमुखांच्या अध्यक्षते खालील या सभेचे अनुकरण अन्यत्र झाले. बाकी झालेल्या तालुका परिषदा :- १४ मे रोजी कोळचाचे नारायणराव देशपांड्यानी बोलावलेली नारायणराव गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखालील व पुढे रामभाऊ घाटग्यांनी काले येथे केलेली जवळकरांच्या अध्यक्षतेखालील, अशा दोन्ही कऱ्हाड तालुक्याच्या शेतकरी परिषदा व ता. १० जून रोजी तात्यासाहेब नित्सुरे यांच्या अध्यक्षते खालील वाई तालुका परिषद या विशेष परिणामकारक आणि खळबळ उड- विणाऱ्या झाल्या. अशा तालुका सभांचा नैसर्गिक विकास सर्व जिल्हयाची एक परिषद होण्यात व्हावा हे साहजिक होय. आणि त्याप्रमाणे ती ता. ८ जुलै रोजी इसलामपूर येथे झालीही.

सदर सातारा जिल्हा शेतकरी परिषद इसलामपूर येथे अहमदनगरचे नामदेवराव एकनाथराव नवले यांच्या अध्यक्षतेखाली भरली. धोंडजी पांडुरंग पाटील हे स्वागताध्यक्ष होते. शंकर अबाजी बोगर आणि संभाजी मल्हारजी पाटील हे चिटणीस होते. सभेस ५००० शेतकरी हजर होते. भाऊ पायगोंडा पाटील, आखाडचाचे बाबासाहेब शिंदे, नलवडे, ही मंडळी सोमण, शिराळकर, अळतेकर, देशपांडे, बटाणे, यांच्या शेजारीच हजर होती. ती सभा पाहून तुकडेपट्टी बिलाच्या दुष्परिणामावर पुस्तक लिहिणारे तिखे उद्गारले की शेतकरी असा जागा झाल्यावर सरकार नमल्याशिवाय कसे राहील ?

आणि झालेही तसेच. जिल्हा-शेतकरी परिषदेनंतर लिंब येथील मंडळींनी तुकडे पट्टी बिलाविरुद्ध आठवडाभर सह्या घेऊन अर्ज पाठविले आणि २२ जुलईला कोरेगाव तालुका शेतकरी परिषदही झाली. अशा सर्व सोसाटचाचा शेवट ता. २५ जुलई रोजी पुणे येथे भरलेल्या मुंबई इलाखा शेतकरी परिषदेच्या झंजावाताने झाला, आणि २५ जुलै रोजी सदर बिल माघारी घेण्यात आल्याचे कायदेमंडळात जाहीर झाले. वरील इलाखा परिषदेला सातारा जिल्हयाचे १५० प्रतिनिधी गेले होते.

या तुकडेपट्टीच्या सभा सत्रातून आणखीही एक मागणी सातारा जिल्हयाने अंत:करणापासून केली होती. ती म्हणजे सातारा जिल्हा दारूबाबत कोरडा ठणठणीत करण्याची. फॉरेल साहेबानेच म्हटल्याप्रमाणे दारूच्या

व्यापाराने दगलबाजी, व्यभिचार, चोऱ्या, खून, रोगप्रसार, अकाली मरण, दारिद्रय आणि नपुंसकत्व या हिडीस वातावरणाचा हिंदुस्थानात जारीने प्रचार होत असल्याकारणाने १९२७ च्या डिसेंबर महिन्यात ८००० सह्यांचा अर्ज दारूचे उच्चाटन जिल्ह्यातून करण्याबद्दल झाला. पण दरसाल शेकडा ५ टक्के दारू कमी करण्याचे जे धोरण चुनीलाल मेथांनी सुरू केले होते तेही मुंबई सरकारने पुढे बंद केले, मग सातारा जिल्हा "सुका" करण्याची गोष्ट कोठल्या झाडाचा पाला ?

शेतकरी जीवनाशी निगडीत असा दुसराही एक प्रश्न १९२७ साली धसाला लावण्यात आला. तो म्हणजे कोयना धरणासंबंधाचा, मुळशीच्या धरणासारखाच हा प्रश्न होता व आहे. महाबळेश्वरच्या पश्चिम अंगापासून जावली तालुक्यातून पाटण तालुक्यातील हेळवाकपर्यंत ५० मैल लांब ८ मैलरुंद अशा व्यापाचे हे कोयनेचे धरण व्हावयाचे आणि १६०० फूट उंचीवरून पाणी पडून ३ लक्ष अश्वशक्ति वीज तयार व्हावयाची अशी टाटांची योजना होती. १९२६ पासूनच ही वीज सातारा जिल्ह्यापुढे काजवे चमकवीत होती. त्या सालच्या जूनअखेर टाटा कंपनीने आपली योजना सरकारपुढे मांडली. त्या अगोदरच भाऊसाहेब सोमणांनी प्रश्न विचारून सर्व काही लोकपसंतीनेच होईल असे सरकारकडून आश्वासन घेतले होते. तथापि लोकमताची तयारी करण्याकरिता १९२७ मध्ये मुख्यतः परचुरेशास्त्री व बाबा बहुलेकर आणि शाहीर एकबोटे यांनी कोकणात दौरा काढला, आणि १९२२ सालीच वाईच्या गणेश हरी खऱ्यांनी ज्या कोयना धरणसंबंधातील जागृतीबद्दल सरकारी रोष पत्करला होता, तेच कार्य पुरे केले. याकामी धरणाखाली सापडणाऱ्या गावच्या लोकांच्या दोन सभाही झाल्या. त्यात १३ मे १९२८ रोजी तळोशीच्या पायथ्याशी देवघर नांवाच्या खेड्यात १२०० लोकांची झोळाईच्या वनात सभा झाली ती महत्त्वाची ठरली. कारण तिला पेहेलवान गणेश हरी साठे, बटाणे, पाटण-उंब्रजचे बापूसाहेब आगाशे, पांडुआण्णा शिराळकर, नानासाहेब देशपांडे, गणपत-राव आळतेकर, परचुरे, तात्या गोडसे, आबा धोपाटे, सोमण, शंकरराव गोडसे, बाबूराव वैद्य, गोसावी, बाबूराव गोखले, चाफळचे विष्णुपंत देशपांडे, पुण्याचे नारायणराव गुंजाळ वगैरे मंडळी हजर होऊन सहानुभूती दाखवीत होती. त्यामुळे त्या कोकण्या शेतकऱ्यांना मोठा धीर होता. उठणाऱ्या गावकऱ्यांना जामीनकीने धरणाच्या कामावर प्रथम नोकर घ्यावे, त्यांच्या मुलांना धंदे शिक्षण द्यावे, ज्यांच्या जमिनी जाणार त्यांनाही त्याच सोयी ठेवाव्यात, उठणाऱ्या गावांच्या नव्या सोईस्कर वसाहती व्हाव्यात आणि जमिनीच्या नुकसानीबद्दल मिळणारा मोबदला भरपूर देऊन त्यांच्या ठेवी बँकेत घ्याव्यात व नियमित व्याजे ज्याची त्यास द्यावीत अशा सूचना होत्या. १९२९ च्या

फेब्रुवारीचे कौन्सिल बैठकीत देशपांडे यांनी फिरून प्रश्न टाकून लोकमताला मान देऊनच टाटा कंपनीच्या धरणाची योजना सरकार मुक्रर करील असे आश्वासन घेतले. फिरून ता. ३ जून रोजी देशपांड्यांनी पत्र लिहिल्यावर सरकारने उत्तर दिले; कालव्याच्या कामासाठी अगर वीज निर्माण करण्यासाठी कोयनेचे धरण तूर्त लवकर होणेचा संभव नाही. तथापि जेव्हा होईल तेव्हा लोकांना तक्रारी मांडण्यास पूर्ण संधी देण्यात येईल. (२४०७।२७ एम्. मुंबई कँसल ता. ११-७-२९) अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या प्रश्नासंबधी सारखी चळवळ चालली असता त्यांच्या आर्थिक जीवनाशी आणि विशेषतः शेतकऱ्यांना पोट धंदा देणाऱ्या खादीविषयी जिल्हा गप्प बसला नव्हता. इसलामपूरचे कौजलगींचा दौरा महात्मा गांधीच्या अनुवादाने होतच होता. आप्पासाहेब आळतेकर आणि परचुरे राष्ट्रीय सभेचे सभासद नोंदता नोंदता आपल्या खांद्यावरून विक्रीसाठी खादी नेतच होते. १९२७ तील या प्रयत्नानंतर १९२८ जानेवारीत सोलापूरच्या सुमंतानी खादी प्रचाराकरताच म्हसवड भागात दौरा केला. पुणे सार्वजनिक सभेचे चिटणीस सदाशिवराव बापट हे "स्वदेशी व स्वराज्य" यावर व्याख्याने देत १९२९ साली जिल्ह्यातून हिंडले. आप्पासाहेब आळतेकरांनी तर खादी–विक्रीचा धूमधडाका असा उडविला की १५–१६ दिवसात ५०० रुपयांची खादी विक्री झाली. स्वावलंबनाचा पीळ जनतेत उत्पन्न करणाऱ्या चळवळीही १९२७ ते १९२९ या अवधीत आणखी झाल्या. १९२७ च्या एप्रिल २८ तारखेस प्राज्ञपाठशाळेतर्फे वाईस चवथी राष्ट्रीय शिक्षण परिषद तात्यासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षते खाली झाली. तेव्हा स्वागताध्यक्ष नारायणशास्त्री मराठे म्हणाले :–

"नैसर्गिक गुणांना प्रदीप्त करणारे जे शिक्षण त्यालाच राष्ट्रीय शिक्षण म्हणतात. अशा राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करताना सरकारी शाळातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणदोषांचेही आविष्करण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष कार्यात येणाऱ्या संकटालाही तोंड कसे दिले पाहिजे याचाही विचार होणे इष्ट आहे." यानंतर अध्यक्ष बोलले– "राष्ट्रीय शिक्षण दाबून टाकणे सरकारास शक्य नाही. राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व मुलांच्या संख्येवर अवलंबून नसून त्यांच्या कार्यकर्तृत्वावर अवलंबून आहे. विविध प्रकारच्या उद्योगधंद्यात ज्याच्या योगाने मुलगा स्वावलंबी बनेल अशाच प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. स्वराज्य हे सर्वांचे ध्येय आहे; त्याला राष्ट्रीय शिक्षण हे मोठे साधन आहे." कारण बोलला शब्द चाटणार नाही. लिहिला शब्द खुडणार नाही. टाकले पाऊल माघारी घेणार नाही. आणि कोणत्याही क्षणी राष्ट्राला विसरणार नाही, असे बाणेदार विद्यार्थी राष्ट्रीय शिक्षणातून तयार होतात.

त्यानंतर येवले, तळेगाव, अकोला, सातारा, खामगाव, नगर, वाई येथील अनुभव सांगण्यात आल्यावर प्राथमिक शिक्षण आवश्यक आहे, धंदेशिक्षण उदरनिर्वाहास समर्थ करणारे असावे, शारीरिक व धार्मिक शिक्षणाकडे लक्ष द्यावे, शिक्षक विद्याव्यासंगी असावा, स्वदेशी व्रताचे आचरण, शिक्षक संघटन वगैरे ठराव पसार झाल्यावर क्रमिक पुस्तक मंडळ व ग्रामसंघटन मंडळ नेमून राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे काम संपले.

प्रत्यक्ष राष्ट्रीयसभेचे दृष्टीने पहाता, १९२७ च्या मे ९ तारखेला राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार यांचाच दौरा झाला. राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष जनतेत सातारा, कऱ्हाड, वाई, महाबळेश्वर, पांचगणी इतक्या आडवळणी येण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे उत्साह वाढून राष्ट्रीय सभेच्या शिस्तीचे सेवकदल सातारा राष्ट्रीय शाळेच्या पटांगणावर ता. २६ डिसेंबर १९२७ रोजी रामभाऊ मोडक यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. मार्च १९२८ पर्यंत सेवादलात ६०।६५ स्वयंसेवक नोंदलेले होते. ता. २२ मार्च रोजी साखवळकर व गोसावी यांनी तासगांव सेवादलाची शाखा स्थापन केली तिला शंकरराव कुलकर्णी वकील यांनी आशीर्वाद दिला. वाईस कुशाभाऊ अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली ता. १० जुलई रोजी सेवादलाची शाखा स्थापन होऊन नारायणशास्त्री मराठे सहाय्यक झाले. ता. ११ सप्टेंबर १९२९ रोजी सेवादलाचे काम पहाण्यासाठी डॉ. हर्डीकर हे सातारा, वाई, तासगाव येथे चक्कर मारून आले आणि चिरमुले, सोमण, श्रोत्री, जोगळेकर, दिगंबरपंत गोखले, भिडे यांच्या तोलाची मंडळी युनिफॉर्ममध्ये साहाय्यक म्हणून वावरताना पाहून डॉक्टर साहेबास समाधान वाटले. याची परिणती ७ नोव्हेंबर १९२९ रोजी सहाजिकच अशी झाली की महाराष्ट्र प्रांतिक सेवादलाचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण यांच्या सल्याने डॉ. आठल्ये, मोडक, साखवळकर यांनी साताऱ्यास स्वयंसेवकाना शिक्षण देण्याकरिता एक शिबीर उघडले. उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष आण्णासाहेब भोपटकर म्हणाले: —

" शरीर हा राजा आहे, तर कसब हा प्रधान आहे. दुसऱ्याशी लगट करण्याचे धैर्य प्रत्येकात निर्माण व्हावयास पाहिजे— आपल्या देशाबद्दल जर कोणी कमी अधीक बोलला तर ते ऐकून आपल्या अंगाची लाही झाली पाहिजे. राष्ट्रीय सभेने निशाण तयार केले आहे. त्या निशाणाची इज्जत आपण राखली पाहिजे. सर्व देशात निशाणाला अत्यंत महत्त्व आहे. " साखवळकर यांच्या अधिपत्याखाली चाललेल्या या शिबिरात शिक्षण घेणाऱ्या स्वयंसेवकांना मुंडले, देवगिरीकर, नानासाहेब देशपांडे, वासुदेवराव भावे, दिगंबरपंत गोखले, गोसावी, बाबूराव भिडे, मोडक, लेले, नाथ घाणेकर, दिनकरशास्त्री कानडे, डॉ. आठल्ये वगैरे अधिकारी अभ्यासूंनी आपल्या ज्ञानाचा फायदा दिला आणि

शेवटी शिक्षण मुदतीनंतर पुण्याच्या शंकरराव देवांनी समारोप केला. तो असा :— " हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून देण्याचे व स्वातंत्र्य स्थापन करण्याचे कार्य महाराष्ट्रातील या सातारा शहरीच झाले आहे. तीनशे वर्षांपूर्वी प्रमाणेच आजही आपण पारतंत्र्यात असताना स्वातंत्र्य मिळविण्याच्या चळवळीची आघाडी महाराष्ट्रात सातारनेच मारली आहे. " सदर शिबिरास परचुरेशास्त्री नारायणशास्त्री मराठे, पांडुआण्णा शिराळकर प्रभृतींची सक्रीय मदत होती. शिवराम चिंतामण लेले, व वैद्य गोपाळराव फाटक यांनी ड्रिलचे शिक्षण देऊन स्वरूप आणले.

राष्ट्रीय सभेच्या शिस्तीचे स्वयंसेवक वरील प्रकारे तयार होऊ घातले होते तोच १९२८ च्या आरंभी ' हिंदुस्थानला नव्या सुधारणा देण्याचे मिषाने ' सायमन सप्तक आले. या केवळ गोऱ्या लोकांच्या सप्तकावर सर्व राजकीय पक्षांनी एकजात बहिष्कार घातला. ता. ३ फेब्रुवारी हा या सप्ताहाच्या बहिष्काराचा सार्वजनिक दिवस जिल्ह्यात दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत कडकरीतीने पाळण्यात आला. इसलामपूर, कोरेगाव, पाटण, वाई येथे हरताळादि कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पडले. तर तासगावास कुलकर्णी वकील, कऱ्हाडास नानासाहेब देशपांडे आणि साताऱ्यास रा. ब. काळे, करंदीकर, चिरमुले, सोमण, हकीम, रामभाऊ ढोर यांची व्याख्याने सरकारी प्रयत्नांचा पोकळपणा सिद्ध करणारी झाली. मिरजेस रानडे वकिलांनी तोच बार भरला. सांगलीस चेंबर ऑफ कामर्सतर्फे बाजार बंद होता, व विद्यार्थ्यांनी कॉलेजवर बहिष्कार घातला होता. याच सप्तग्रहीचे काळ्या निशाणांनी शांतपणे स्वागत करीत असता लाला लजपतराय यांना लाठीचा मार बसला व त्यानेच पुढे दुखणाईत होऊन १७ नोव्हेंबर १९२८ रोजी लालाजी कैलासवासी झाले. तेव्हा अर्थात लालाजींच्या बद्दल कृतज्ञ अश्रु गाळता गाळताच पारतंत्र्याबद्दल असंतोष फुंकता आला तेवढा फुंकण्यात आला. साताऱ्यास हे कार्य सोमणांचे अध्वर्युत्वाखाली हकीम, नाथ घाणेकर, बाबूराव भिडे, मुतालीक, नलवडे, गोसावी यांनी केले तर तासगावास राष्ट्रीय सभेचे प्रचारक लेले, अध्यक्ष शंकरराव कुलकर्णी, मुरारराव पाटील, मने राजुरीकर यांनी केले; कोरेगाव, कऱ्हाड येथे तोच कित्ता गिरविण्यात आला. लालाजीवरील लाठी हल्याचा निषेध रा. ब. काळे व वाग्भट देशपांडे यांनी निकराने केला. दादासाहेब करंदीकरांनी लालाजीस समरशौर्याबद्दल तार १ नोव्हेंबरला केली होती.

१९२८ साली बार्डोलीच्या शेतकऱ्यांवरील शेतसाऱ्याची फेर तपासणी होण्याचे ठरले. हा विजय सरकारवर मिळविण्यास वल्लभभाई पटेल यांनी संघटनात्मक तपश्चर्या केली व करवली होती. तेव्हा वल्लभाईंना तात्त्विक विजय मिळताच ऑगस्ट १९२८ भर सातारा जिल्ह्यात बारडोली दुमदुमली.

कऱ्हाडास नानासाहेब देशपांडे, गणपतराव आळतेकर, व बाबूराव गोखले, पण त्यापेक्षाही तासगाव व सातारा येथे अनुक्रमे आप्पासाहेब आळतेकर, व बाबा बहुलेकर प्रभृती-वल्लभभाईंचे काम प्रत्यक्ष पाहून आलेली मंडळी-यांनी शेतकरी कसा स्वावलंबी झाला पाहिजे हे ठसविले. काले येथे जिल्ह्यातील मंडळी जमा होऊन बारडोलीच्या शेतकऱ्यांची स्तुती करताकरता स्वतःच्या जिल्ह्याची हलाखी अशी उमटली की वेळ पडल्यास व सरकारने तशी पाळी आणल्यास साराबंदीची तयारी करावी की काय येथवर चर्चा झाली; पण तो विषय तितकाच राहिला, व १९२९ साली ११ जानेवारीलाच भावे वकीलांचे अध्यक्षतेखाली कलकत्ता काँग्रेसचा संदेश सांगून बाबूराव वैद्य व भाऊसाहेब सोमण यांनी नेहरू रिपोर्टात मागितलेले स्वराज्य आम्हास पाहिजे असे शिंग फुंकले ता. २ फेब्रुवारी रोजी तीच टिपरी आण्णासाहेब परांजप्यांनी साताऱ्यास खेळली. मार्च ता. १० रोजी कऱ्हाडास गणपतराव अळतेकर तोच निनाद घुमवून राहिले. ता. २८ मे ते १ जून सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात नेहरू रिपोर्ट, खादी व बहिष्कार यांच्या प्रचारार्थ सोमण, शिराळकर, बाबूराव वैद्य हिंडून आले. जुलईच्या ४ तारखेस बाळूकाका कानिटकर यांनी साताऱ्यास " राष्ट्रीयस्वातंत्र्य व १९३० साल ' याच विषयाचे वेड लावले.

यावेळी आणखी दोन गोष्टी उत्तेजक घडल्या. पैकी एक अशी की पाटण व तासगाव तालुक्यात राष्ट्रीय सभेच्या प्रचारासाठी हिंडणाऱ्या वाळिंब्यांनी मुसलमानास एवढ्या प्रमाणात राष्ट्रीय सभेचे सभासद केले की १९२१ ची आठवण आली. पण आता प्रगती अशी की चिंचणीसारख्या गावी मुसलमान स्त्रियाही सभासद झाल्या होत्या.

सभासदांची आपल्या वाटचास आलेली संख्या उपनगरप्रमाणे सातारा जिल्ह्यानेच पुरी केल्याचे महाराष्ट्र प्रां. काँ. कमेटीनी जाहीर केले होते. कमीत कमी २५०० सभासद हवे होते. ते ४२४३ लोक सभासद झाले होते.

दुसरी उत्तेजक गोष्ट म्हणजे ता. ५ सप्टेंबर रोजी साताऱ्यास " काँग्रेसचा कार्यक्रम " या विषयावर बोलतांना स्वातंत्र्याची तुतारी काकासाहेब गाडगीळांनी वाजविली. त्याचे अगोदर ' दडे बसलेल्या नोकरशाहीला ' शुद्धीवर आणण्याकरिता म्हणून असेंब्लीत बॉम्ब टाकण्याऱ्या भगत्सिंगाचा दिन २१ ऑगस्ट रोजीच वाईला साजरा झाला होता. वरील सर्व आवाज जनतेच्या कानात घुसत-घुसत असताच लोकोत्तर प्रायोपवेशनाने देशासाठी देह ठेवणारा जतींद्र, तरुण अंतःकरणाला उत्थापन द्यावयास कारणीभूत झाला. प्रचंड मिरणूक काढून साताऱ्यास सोमणांचे अध्यक्षतेखाली डॉ. आठल्ये, गोसावी, गोडसे, बाबुराव भिडे, यांनी; अगर वाईस गोविंदराव वैद्यांच्या अध्यक्षतेखाली भय्याशास्त्री वाटवे व राजाभाऊ भावे यांनी व कऱ्हाडास बाबूराव गोखले यांनी जी भाषणे

केली ती स्वातंत्र्याची तळमळ उत्पन्न करणारी होती. इतक्यात 'काळा' च्या काळचा कभिन्न चेहेऱ्यावर " स्वातंत्र्य " ही अक्षरे महाराष्ट्रीय तरुणास वाचावयास शिकविणारे "काळ" कर्ते परांजपे कालवश झाले ! २९ सप्टेंबर रोजी त्यांच्या दुःख प्रदर्शनार्थ भरलेल्या सातारा जिल्ह्यातील सभातून " हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य प्राप्तीनेच आण्णासाहेबांच्या आत्म्याला मोक्ष मिळो " अशी प्रार्थना करण्यात आली. योगायोग असा की १९२९च्या राष्ट्रीय सभेनेच 'स्वातंत्र्य' हेच ध्येय जाहीर केले. त्यापूर्वीच इंग्लंडमध्ये नव्या सुधारणासंबंधी चाललेल्या वाटाघाटीत संस्थानी- भारत व ब्रिटिश भारत अशी फोड करून पूर्वीच्या बंगालफाळणीचा नवा नमुना उठविण्याचा डाव चालला होता. तो हाणून पाडण्यासाठी १७ मे १९२९ रोजी लंडनहून करंदीकरांनी संस्थानी प्रजापरिषदेला इषारा दिला होता की संस्थानिकांनी ब्रिटिश डावाला बळी पडू नये असा ठराव करावा. घटनात्मक-रीत्या इंग्लंडचा राजासुद्धा प्रजेचा ताबेदार असतो.

११ : जिल्ह्यातील शान्तिसंग्राम

(केसरी, ज्ञानप्रकाश, समर्थ, ऐक्य, भारतमाता, टाइम्सवरून)

१९२९ साली राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्याचा ठराव संमत केला. १९३० च्या २६ जानेवारीला **पहिला स्वातंत्र्यदिन** पाळावयाचे वेळी प्रतिज्ञावाचन करण्याची तयारी फक्त सातारा शहरात श्री. नाथ घाणेकर व डॉ. आठल्ये यांनी, कऱ्हाडास बाबूराव गोखले यांनी आणि इतरत्र जनसामान्य नेत्यांनीच दाखविली. पण स्वातंत्र्याकरता लोकांची लोकांनी खटपट नको का करावयाला ? जनतेला तो मोका महात्मा गांधीनी १९३० सालीच दिला. लांबच्या लांब समुद्र किनारा, खाऱ्या पाण्याच्या विहिरी, ओढे व खाऱ्या मातीच्या खाणी असलेल्या हिंदुस्थानात अत्यंत जरूरीची वस्तू जी मीठ तिला देखील सामान्य जनता सरकारी कराने महाग झाली आणि म्हणून " खाण्याच्या मिठाकरिता " (Salt on the table) महात्माजींनी 'दांडीस' जाऊन कायदेभंग करण्याचे ठरविले आणि अहिंसा व्रत घेणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या अनुयायांस तसे करण्याची परवानगी दिली. महात्मा गांधी दांडी मोर्चावर असताना बाबा लेले, श्री. वैशंपायन वकील, श्री. शाहीर खाडील-कर, श्री. अनंतराव जोग, श्री. नारायणराव तुळपुळे इत्यादी अकरा मंडळी महात्मा गांधींच्या मोर्चाचे दर्शनास गेली होती. " कृष्णा तापीस मिळाली "

असे स्फुट केसरीने त्या प्रसंगास उद्देशून लिहिले होते. त्यासरसा एक तऱ्हेचा विद्युत् संचार होऊन जबाबदार लोकांच्या हालचाली सुरू होऊ लागल्या. प्रांतिक हिंदुस्थानी सेवादलाचे चिटणीस डॉ. आठल्ये यांना ता. २१ फेब्रुवारी रोजी पुण्यास पाचारण होऊन त्यांस महाराष्ट्र कायदेभंग मंडळावर नेमण्यात आले. तेथून पुढे शांतिसंग्रामार्थ सातारा जिल्ह्याचा हात हालू लागला म्हणावयास हरकत नाही. महाराष्ट्रात कायदेभंगाला पहिली सुरुवात (१९३०), डॉ. आठल्ये यांनी स्वयंसेवकांच्या सह्या प्रतिज्ञा-पत्रकावर मिळवून केली. तसेच हिंद सेवादलातर्फे श्री. साखवळकर यांना महाराष्ट्रात ठिकठिकाणी प्रचाराकरता त्यांनी पाठविले. ता. १८ मार्च १९३० रोजी पुण्यास शंकरराव देवांनी सत्याग्रहाच्या विचार सभेस बोलावलेल्या मंडळीत साताऱ्चे डॉ. आठल्ये, बुवासाहेब गोसावी, गोविंदराव श्रोत्री, पं. सातवळेकर, रत्नागिरीचे श्री. आप्पासाहेब पटवर्धन अशी मंडळी गेली होती. या सभेत शंकरराव देव, ग. वि. केतकर, सी. पु. पटवर्धन, दास्ताने व डॉ. आठल्ये यांचे कायदेभंग मंडळ निवडण्यात आले. जिल्हाधिकारी म्हणून साताऱ्यास श्री. गोसावी व रत्नागिरीस श्री. विष्णु गणेश आपटे यांची निवड झाली. १९०६ सालापासून राष्ट्रीय शिक्षण हे एक स्वराज्याचे साधन आहे, अशी लोकमान्यांची शिकवण होती, ती यावेळी पटली. वाईची प्राज्ञपाठशाळा आणि साताऱचे टिळक राष्ट्रीय विद्यालय यातील शिक्षक व जाणते विद्यार्थी मार्चअखेरीस आपली दप्तरे गुंडाळून स्वयंसेवकांच्या विजारी आणि पिशव्या घेऊ लागले. सातारा जिल्हा सभा ४ व ५ एप्रिल रोजी होताच टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या आवारात स्वयंसेवकांकरता गोसावी वकिलांचे नेतृत्वाखाली शिबीर उभारले. पुढे गोसावी कुलाब्यास २१ एप्रिलला गेल्यावर परचुरे शास्त्री व नंतर बाबा लेले व त्यांचे हाताखाली म. कृ. आठल्ये काम करू लागले. हणमंतशास्त्री महाजनी कायदेभंगाच्या प्रचारासाठी जिल्ह्यात निघाले ते ३१ मार्चपर्यंत तासगाव तालुक्यात धडकलेसुद्धा. साताऱच्या शिबिरात दोघांनी, पांचानी स्वयंवेवकांची नोंद सुरू झाली, ती १४ एप्रिलपर्यंत २०० पर्यंत गेली. एप्रिलच्या आरंभालाच कायदेभंग कमेटीने ठाण्याचे पुढारी दामले यास सातारा जिल्ह्यात प्रचारासाठी पाठवले होते. इसलामपूर, अष्टे, रेठरेहरणाक्ष, येलूर, शिराळे, कासेगाव, कऱ्हाड, सुपने, कोळे, उंब्रज, चरेगाव, पाल, मेढे, कुडाळ अशी गावे दामल्यांनी घेतली आणि ७ एप्रिल रोजी त्यांना पहिला रुपया एका मुसलमानाने दिला तर अष्टयास बाबूराव लिमयांनी ३५ रुपये दिले. याच एप्रिल महिन्यात प्रो. मोहनलाल व खाडीलकर महाबळेश्वर टापूत हिंडले आणि १०० रुपये घेऊन आले. म्हसवड भागात कान्हेरे – हिंगमिरे यांनी

प्रचार केला. म. कृ. आठल्ये, रायरीकर कऱ्हाड तालुक्यात, पं. सातवळेकर खटाव तालुक्यात, महाजनीशास्त्री चाफळ, पाटण भागात, कायदेभंगाचे रंगरूट व त्यांचा दाणागोटा जमविण्यासाठी चक्कर मारीत होते. मसूर भागात बळवंतराव आफळे; पण विशेष म्हणजे बी. जी. जगदाळे, पाशूसाहेब पीरजादे; उंब्रजकडे नारायणराव शिराळकर, केशवराव फडके, बाबूराव जोशी; चरेगावी बाळाराम शेठ गुजर, शंकरराव तेली; सातारा जिल्ह्याचे पूर्व भागात व शिराळचाचे बाजूस अंत्रोळीकर, बाबूराव गोखले, दक्षिण आणि पूर्व व पश्चिम भागात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पांडुआण्णा शिराळकर, बटाणे, गणपतराव आळतेकर, राघुआण्णा धोपटे, बळवंतराव जाधव, वडूजकडे सातवळेकर, कान्हेरे वगैरे मंडळी एप्रिल महिन्याच्या उत्तरार्धात "सत्याग्रहाची आवश्यकता" प्रतिपादन करीत होती. या सर्वांत तर्कतीर्थांनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने जिल्हा असा हालविला की चरणबिळाशीकडे बापूसाहेब देशमूख, बाबूराव चरणकर, प्रभृती मंडळींच्या देखरेखीखाली, तांबव्यास काशिनाथराव देशमूख यांच्या नेतृत्वाखाली, आबा फाटक, राघुआण्णा लिमये, सीतारामपंत गरुड व विसंजी भाटे यांच्या पुढाकाराने मसुरास, खटाव भागात कचरे – सिंहासने यांच्या खटपटीने, थोडक्यात म्हणजे गावागावाना असे संघ झाले की, कायदेभंगाचे प्रचारक गावोगाव निर्माण झाले. तासगांवचे माळी, अल्लाबक्ष, लतीफ, काळे, अभ्यंकर, पोंक्षे, आबासाहेब जोग, चरेगांवचे मारुतराव डुबल इनामदार, उंब्रजचे बाबूराव कुलकर्णी, भार्गव, तांबोळी, यशवंतराव जोशी, बाळूबुवा जोशी, लक्ष्मणराव निलाखे, विटचाचे पांडुरंग कृष्णाप्पा कोरे, फार काय परशुराम थोराता सारखा मजूरदेखील कायदेभंगाचा प्रचारक बनला आणि एप्रिलअखेरीस जिल्ह्याच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत एकप्रकाचे वारे असे संचरून राहिले की, "गांव करील ते राव काय करील?" याचा प्रत्यय घडोघडी येऊ लागला.

परचुरेशास्त्री, रामभाऊ मोडक, कोल्हापूर विद्यापीठाचे भुर्के, शिवराम बाळकृष्ण ऊर्फ बाबूराव जोशी, रमाबाई जोशी, हकीमसाहेब, शाहीर खाडीलकर भय्याशास्त्री वाटवे, जाखलेकर, कॅ. कान्हेरे, रंगराव मारुती माने, रा. वा. पाटणकर, कौजलगी, शंकर कृष्ण जोशी, वासुदेव गोपाळ देव, महादेव यशवंत ब्रम्हनाळकर, महादेव गणेश सत्तीकर, शिवराम कोल्हटकर, कत्ते, मेथे मास्तर, धर्माधिकारी, किसनवीर, सातपुते, गाडेकर, गुलाब बागवान, आबासाहेब फाटक, भास्कर तुकाराम कुलकर्णी, नानासाहेब नागपूरकर, जोग, करंदीकर, विठ्ठलराव पागे, वासुदेवराव मुंडले, गौतम शहा, भाईचंद, बापू नेने, धोंडजीराव पाटील, मुरारराव पाली, क्षीरसागर, अझीजसाहेब, शंकरराव तेली, वामन गोविंद

कुलकर्णी, बाबूराव पेडकर, आत्माराम पाटील, कृष्णा गोविंदा बोगर, निवृत्ती आकाराम पाटील, बाळाभाऊ कोरे, नाना रामचंद्र पाटील, नोकरीचे राजिनामे दिलेले बर्डे मास्तर, दत्तात्रय वासुदेव कुलकर्णी, लक्ष्मणराव हसबनीस, ही सातारा जिल्ह्यातील अशी नावे आहेत की ज्यांनी कमीत कमी एकतरी स्वयंसेवक आपल्या शब्दाने शांतिसंग्रामात सामील केला. याशिवायही अशी कित्येक माणसे आहेत की, ज्यांनी पुष्कळ मदत सत्याग्रहाला केली पण त्यांची नावे केवळ स्मरणाने देणे शक्य नाही. या सर्वांत बालवीर बापू नेने याची कामगिरी प्रबोधक व वेचक झाली.

अशा तऱ्हेने आणि स्वयंस्फूर्तीने जे स्वयंसेवक शांतिसंग्रामासाठी साताररच्या शिबिरात दाखल झाले, त्यांची संख्या २ जूनपर्यंत ३५० वर गेली. त्यावेळी १६० स्वयंसेवक सत्याग्रहाकरिता पाठविले होते आणि १०० प्रचारा करिता निरनिराळ्या तुकड्यांनी हिंडत होते. अशाच वाढत्या क्रमाने साताररच्या शिबिरात स्वयंसेवक शेवटपर्यंत नोंदले गेले. दरम्यान सातारा शिबिराचे काम हलके करण्याकरिता उंब्रज येथे २२ जून रोजी बाबूराव गोखले यांचे हस्ते एक शिबीर उघडले होते. त्याच सुमारास मुळशी सत्याग्रहातले र. म. वैद्य यांनी पाल येथे दहा सत्याग्रहींचे शिबीर सुरू केले. मसूरासही कायदेभंग मंडळाचे एक दल स्थापण्यात आले. तासगावास सातारा शिबिराचे भावंड निर्माण झाले. कऱ्हाडास लाड, बटाणे, यांनी तसलाच उठाव करून ४५० स्वयंसेवक नोंदले व ११० सत्याग्रहाकरता रवाना केले. रेठरेहरणाक्ष, पेठ येथील शिबिरात डॉ. हिंगमिरे मुख्य असत. सर्व शिबिरात एकसूत्रीपणा आणण्यासाठी नाना पाटील, आत्माराम पाटील व विष्णु एकनाथ (आण्णा) कान्हेरे यांची नेमणूक झाली होती. याच्याही उप्पर जिल्ह्यात सर्वसाधारण अशी व्यवस्था होती की, शांतिसंग्रामाचे स्वयंसेवक ऊर्फ "गांधींचे लोक" दिसले की, लोक त्यांच्या गरजा तर भागवीतच, पण ते सांगतील ते निदान कमीत कमी करीत. "कोकण भागात मीठ सत्याग्रहात जाण्यासाठी जाताना कऱ्हाड ही तर स्वयंसेवकांची उतारपेठच झाली होती. तेव्हा बटाणे व जाधव यांच्या मोटारी स्वयंसेवकांच्या मालकीच्याच झाल्या होत्या." त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व मोटारवाल्यांनी स्वयंसेवकांसाठी सदा सर्वदा मोटारीची मुक्त हस्ताने सोय ठेवली होती. कित्येक "बुवा बैराग्यांनी" भिक्षा मागून स्वयंसेवकांना अन्नपाणी पुरविले आणि सदर भिक्षा एवढ्या प्रमाणात केवळ शांतिसंग्रामाच्या स्वयंसेवकाकरिता मागण्यात येते अशी मनोमन साक्ष असूनही सत्ताधाऱ्यांच्या बायकांनी अभिवादनपूर्वक ती भिक्षा घातली अशी वस्तुस्थिती असल्याकारणाने ऑगस्ट २१ तारखेपासून शांति-संग्रामाशी निगडीत असलेल्या संस्था बेकायदेशीर ठरविल्यावर वरील तऱ्हेच्या कोरान्नावरच स्वयंसेवकांची पुष्कळशी गुजराण झाली.

शांति-संग्रामाशी संघटित असलेले हे घटक एकच प्रतिपादन करीत- माणुसकीचे कायदे पाळणे हे जसे कोणाहि प्रामाणिक माणसाचे कर्तव्य, तसेच अन्याय्य कायदा अवमानणे हेही त्याचे कर्तव्य. लोकातील अशा वृत्तीशिवाय लोकशाही म्हणजे केवळ थट्टा होईल. हीच शिकवण पद्यांच्या रूपाने प्रभात फेऱ्यातील मुलेमुली आणि व्याख्यानाने व कृतीने " गांधीचे लोक " देत.

या शिकवणींचा परिणाम सामान्य झाला नाही. सातारा जिल्ह्यात ठोकळ हिशेबाने २००० स्वयंसेवकांनी तुरुंगात जाण्याची तयारी दाखविली. त्यातील काहीनी तर आपल्या घरादाराची कसलीच फिकीर केली नाही. प्रत्यक्ष बंदिवास भोगणारे सुमारे ५०० लोक होते व त्यात वारकऱ्याच्या निष्ठेने दोनदोन, तीनतीन वाऱ्या करणारेही होते. एवढ्यासाठी साताऱ्च्या शिबिरामार्फत मंजुरीने १०००० इतका खर्च झाला. शिवाय खंडोगणती धान्य व कपडे वगैरे लागले ते पैशाप्रमाणेच लोकांनी स्वयंस्फूर्तीने दिले. शिवाय सत्याग्रहीना न विचारता त्यांच्यापैकी ज्यांची कुटुंबे असहाय्य स्थितीत होती त्यांना अयाचित मदत देण्यात आली.

अशाप्रकारे शांतिसंग्रामाच्या जादूने जनता भारून गेल्याकारणाने मे महिन्याच्या आरंभी खेड्यापाड्यातूनसुद्धा मोकळया हाताच्या अगर कऱ्हाडसारख्या लाठीबंद अशा प्रभातफेऱ्या सुरू झाल्या. यामध्ये मुलेमुली भाग घेत राहून लोकांना सूर्योदयाच्या आत स्वराज्याची हाक देत. अशा प्रभातफेऱ्यामध्ये तासगांवच्या चिंतोपंत काळयांची व सातारा येथील विठ्ठलराव सोमणांची आणि श्रीमती गोदूबाईंची ' स्त्रियांची प्रभातफेरी ' शिस्तीच्या व ठोक्याच्या दृष्टीने विशेष असून रूबाबाच्या दृष्टीने सांगलीची सायकल प्रभात फेरी, उडतरे, भुईंज, पाचवड, खरशी सपाट्यात मारणारी ती खेडक्यांची प्रभातफेरी या मुख्य गणल्या पाहिजेत. राष्ट्रीयशाळा ह्या त्यावेळच्या देशव्यापी चळवळीची केंद्रे होत्या. व त्यामार्फत देशात चळवळी चालल्या होत्या. प्रमातफेऱ्या, सभा, मिरवणूकी, हरताळ, यांनी देश दुमदुमून गेला होता. या साधनांच्या जोडीला प्रचारास पोवाडे हेही एक साधन होते. सातारा राष्ट्रीय शाळेचे शाहीरमंडळ होते. त्यांत मारुतीराव हळबे, दामूआण्णा एकबोटे, सी. ग. गणपुले असे होते. दर शनिवारी, रविवारी साताऱ्च्या आजूबाजूच्या खेड्यात जाऊन सभा, पोवाडे गाऊन जनता जागृतीचे ते काम करीत. श्रीछत्रपती राजाराम महाराजांचा पोवाडा राष्ट्रीय शाळेतील सर्व शिक्षकांना फार आवडला. पुण्यास कै. शिवराम महादेव परांजपे, शंकरराव देव, हरीभाऊ फाटक यांनाही तो आवडला. केसरीतूनही त्याबद्दल चांगला अभिप्राय आला. त्यामुळे मुंबईस गणेशोत्सवात दोनतीन वर्षे शाहीर मंडळाने पोवाड्यांचे कार्यक्रम करून पैसे मिळविले व त्यातून पोवाडे छापविले. १९३० च्या कायदेभंगाचे प्रचाराचे

वेळी पोवाडयांच्या साधनाचा फार उपयोग झाला. 'झाशीची राणी ' व महात्मा गांधी यांचे पोवाडे, वडगांवची लढाई, बाबू गेनू व काँग्रेसचा पोवाडा असे मारुतीराव हळब्यांचे पोवाडे जागृतीस कारण झाले. कृ. मा. साखवळकर यांचा भगतसिंगाचा पोवाडा चांगला झाला आहे. इतका की, तो ऐकून इंग्रजाचे बद्दल मनात त्वेश उत्पन्न होतो व चित्तवृत्ती प्रक्षुब्ध होतात. त्यांचे आणखीही काही पोवाडे प्रतापसिंहाचा वगैरे आहेत. शाहीर दळवी यांचा शिवाजी अवतारी कसे हे ऐकून शिवछत्रपतीबद्दलचा आदर द्विगुणीत होतो. शाहीर पां. द. खाडीलकर यांच्या काही पोवाडयांच्या 'ध्वनी मुद्रिकाही ' प्रसिद्ध आहेत. (१९४०–४२) सालात शाहीर निकम यांचे पोवाडे ग्रामीण विभागात फारच लोकप्रिय ठरले आहेत. १९४६ व १९५२ इलेक्शनचे वेळी पोवाडयामार्फत त्यांनी बराच प्रचार केला. शाहीर दामुअण्णा एकवोटे व साखवळकर यांनी सरकार मार्फतच्या दारुबंदी प्रचाराच्या कामात पोवाडे म्हणून प्रचार केला. त्याबद्दल नामदार कै. बा. गं. खेर यांनी त्यांची पाठ थोपटली होती. दारुबंदीचा हळबे यांचा पोवाडा १९५० त सरकारने छापून त्याबद्दल रु. २५ बक्षीस दिले आहेत.

राष्ट्रीय सभेच्या झेंडयाचे वंदन करणे हा तर या प्रभातफेऱ्यांचा नित्य-कार्यक्रम होताच पण नैमित्तक होता. शांतिसंग्रामाचा कोणताही कार्यक्रम असो, त्याला झेंडावंदनानेच सुरवात व्हावयाची. सर्वात १२ मार्च रोजी महात्माजी दांडीस निघाले त्यावेळी साताऱ्यास झालेले झेंडावंदन अनुपमेय झाले. अष्टे येथील प्रचंड जनसमुदायाने केलेले झेंडावंदन संस्मरणीय झाले. फार काय, कोणत्याही निमित्ताने मिरवणूक निघो, नाहीतर 'हरताळ' पाळण्याबद्दल विनंती करणारी ' चमू ' निघो, राष्ट्रीय झेंडा अग्रभागी मिरवावयाचाच.

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयात राष्ट्रीय झेंडा सगळीकडे विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्था आणि शाळावर फडकू लागला. जिल्ह्यात सहसा एकही प्रमुख गाव नव्हते की जेथे राष्ट्रीय सभेचे झेंडे प्रमुख चौकात फडकत नव्हते. माँटफर्ड सुधारणांनी स्थानिक स्वराज्याचे हक्क जर लोकांच्या स्वाधीन केले म्हणावयाचे, तर लोकांचा झेंडा त्या स्थानिक स्वराज्याच्या संस्थांनी आपल्या शिरावर का मिरवू नये ? असा प्रश्न त्यावेळी निघाला आणि ठिकठिकाणी तसा नेटाचा प्रयत्न झाला. या सर्व प्रयत्नात वाईचा, साताऱ्चा व त्याहीपेक्षा तासगावचा प्रयत्न संस्मरणीय होय. " निशाण " लावण्यात आम्ही राष्ट्रीय शिक्षण देतो आणि शिक्षण म्युनिसिपालिटीचे कर्तव्य आहे. तेव्हा झेंडा लावलाच पाहिजे " असा नेट अबदुल कादर यांनी धरला म्हणून मनोळकरांच्या अध्यक्षतेखाली ही अभिमानास्पद गोष्ट घडली व इत-रांच्या मानाने बरीच टिकाव धरूनही राहिली.

शिक्षण संस्थांपैकी विलिंग्डन कॉलेजवर (सांगली) विद्यार्थ्यांनी झेंडा लावण्याचे ठरविल्यावर जो झगडा झाला तो अपूर्व होता. द्रवीड हायस्कूल (वाई), न्यू इंग्लिश स्कूल (सातारा), टिळक हायस्कूल (कऱ्हाड) व सिटी स्कूल (सांगली) या संस्थांवर काही काळ विद्यार्थ्यांच्या चिकाटीने शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांच्या खळखळीला न जुमानताच झेंडा टिकला. तांबवे येथे लोकलबोर्डाच्या मराठी शाळेवर झेंडा लावल्यामुळे शाळा सहा महिने बंद पडली होती. तशी चिकाटी अन्यत्र क्वचितच दिसली.

सातारा जिल्ह्यात हे झेंडे प्रकरण आणखी एका तऱ्हेने गाजले. तांबवे किंवा चरणबिळाशी येथील झेंडे हे भोवतालच्या पांच दहा गावचे संरक्षित राष्ट्रीय निशाण होते. मसूरच्या बाजार पेठेत लावलेला एक झेंडा हा तेथील राष्ट्रीय भावनेच्या तरुणांच्या एकदिल चळवळीमुळे जर भोवतालच्या दहापांच गावाना अभिमानास्पद वाटे तर बिळाशीच्या दहा गावचा तो एक झेंडा किती अभिमानास्पद वाटत असेल बरे ? बिळाशीच्या रामेश्वराचे देवालयातील झेंड्याभोवती राष्ट्रीय प्रार्थना करावयास जमणाऱ्या मंडळींचे एक शिबीरच होते. जेथे तेथे आणि वेळेस पांच पांच दहा दहा गावचे असे राष्ट्रीय झेंडे फडकलेले पाहून, नोकरशाहीने झेंडे काढून टाकण्यासाठी सशस्त्र पोलीस आणि किचनेर पलटण यांचा उपयोग सप्टेंबरच्या ता. ४ ते १४ पर्यंत ठिकठिकाणी केला असला तर त्यात अनपेक्षित काय ? कारण लढा सुरू झाल्यावर सामनेवाला हल्ला करणारच हे गृहीतच असते. पण अशाही प्रसंगी मसूरास दत्तू महाजन यास लाथा मारून २७ माणसे शाळेत कैद करीपर्यंत अगर तांबव्यास बारा वर्षांचा शंकर देशमुख, महंमदभाई, शंकरराव माळी, काशिनाथ देशमुख यांनी अटक होईतो झेंड्यास हात लावू दिला नाही. बिळाशीलातर राजू कदम या स्त्रीनेच झेंडा कवटाळला होता. तिला संगिनीचे ठोसे देऊन फरफटत ओढल्यावरच झेंडा सुटला. तासगावात सिद्धेश्वराचे देवळावरच सरकारी लोकादेखत उभारलेला झेंडा पोलिसांनी रात्री उतरला.

खरोखर जनतेत ही जी दुर्दमनीय वृत्ती संचारली तीच खरोखर नोकरशाहीला 'नष्टपणा'ची वाटली. मीठ आणि जंगल यांच्याबाबत अन्याय्य कायदे तोडण्याइतका कायदेभंग करण्याची राष्ट्रीय सभेची परवानगी असल्यामुळे, जुलईच्या पहिल्या पंधरावड्यात जंगल सत्याग्रहाची खळबळ जिल्ह्यात जास्त उडाली. खेडी आपआपल्या जबाबदारीवरच कामे करू लागली. जेथे जेथ म्हणून जंगल आहे, तेथे तेथे जंगल सत्याग्रह करण्यात आला. काल्याचा प्रयत्न यावेळी मोठ्या प्रमाणात बहुसंख्यांक पण विस्कळित झाला. तेवढा अपवाद सोडला तर "जंगलका कायदा तोड दिया" हाच ध्वनी त्यावेळी सगळीकडे निघाला. तांबव्याच्या सत्याग्रहाचे दुसरे दिवशी फॉरेस्ट आफिसर

व ३५ पोलीस शिपाई तांबव्यास येऊन खाजगी शेतात चरत असलेली जनावरे फॉरेस्टात धरून नेऊ लागले पण आपली जमीन फॉरेस्टापासून वेगळी असल्यामुळे त्या रानांचा मालक व पांच स्त्रियांनी त्या गोष्टीस धैर्याने मज्जाव केला. ऑफिसर निघून गेले. पण भुमका उठली की, पोलीस सैन्यानिशी ते परतणार तेव्हा भोवतालच्या १५ गावचे १५०० लोक त्या गरीब शेतकऱ्यांशी सहकार करण्यासाठी रात्रभर खिंडीत बसून राहिले.

सत्याग्रहींच्या या कामगिरीपेक्षा अफाट जनतेचा सत्याग्रह "वनचराईची फीही द्यावयाची नाही आणि राखीव जंगलातील गवताचा लिलावही घ्यावयास पुढे यावयाचे नाही" या गोष्टीत दिसून आला.

पण यापेक्षाही यावेळी जोरात मद्यपान निरोधन. दारू दुकानावर एवढ्या शांतपणे जूनच्या मध्यापासून एक महिनाभर निरोधन चालले की, दिवसा गिऱ्हाईकाचा सगळा शुकशुकाट असावयाचा. मग "मागील दाराने" काय खप झाला असेल तो होवो!! तारळ्याचा आणि मसूरचा गुत्ता त्यावेळी विशेष ठरला. नवाकाळचाच बातमीदार ता. २३ जूनला लिहितो की, "दारूची विक्री शून्यापर्यंत येऊन पोचली असता, उंब्रज ठाण्यावरील कोणा उपद्व्यापी माणसाने तारळ्याच्या गुत्तेवाल्याकडून दारू मुद्दाम विकत घेऊन सहा स्वयंसेवकांवर निष्कारण खटला भरला." मसूरच्या निरोधकांपैकी दत्तोबा काटकर व विष्णुपंत निगडीकर प्रभृतीवर एकदा एक नंदीबैलही घालण्यात आला, पण शांतिसहनशीलतेचे आपले व्रत निरोधकांनी सोडले नाही.

वरील गोष्टीवरून जनतेची एकंदर मनोवृत्ती लक्षात घेतली, तर जुलुमशाहीबद्दल लोकांची मने कशी विटली असतील याची कल्पना येते. फलाणा अधिकारी सत्याग्रहाकडे येत आहे अशी नुसती समजूत झाली तरी तांबव्यासारख्या ठिकाणी कोयना ओलांडावयास नाव सहासहा महिने मिळत नसे. बारिकसारिकांची ही अवस्था असेल यात नवल नाही. खुद्द गव्हर्नरसाहेबांचे आगमन सातारा जिल्ह्यात ता. १२ व १३ जुलईला अनुक्रमे सातारा व कऱ्हाड या ठिकाणी ज्या थाटाने झाले, तो काळ्या निशाणांचा थाट सर फ्रेड्रीक साईक्स व जनता यांच्या लक्षातून जाण्यासारखा नव्हता व नाही. या सुमारास साताऱ्यातून पलटणीची परेड काढण्याची प्रथा पाडण्यात आली. पण त्यांच्याकडे जनता काणाडोळा करी तर प्रभातफेऱ्यांकडे सादर कौतुकाने पाही. गव्हर्नर साहेब जिकडे फिरकावयाचे होते तिकडे तीनतीन तास पोलीस बंदोबस्त ठेवूनही आयत्यावेळी काळ्या निशाणांच्या माळाच्या माळा गव्हर्नर साहेबांच्या स्वागतास सज्ज दिसल्या.

साताऱ्यात गव्हर्नरसाहेबांना प्रथम गुरुवारच्या बाजारात परजावर एका ठिकाणी पानसुपारी होती. म्हणून तेथेच २०० स्वयंसेवकांनी रांगेत उभे

राहून काळ्या निशाणांनी साहेबांचे स्वागत केले. पुढे साहेब म्युनिसिपालिटीत मानपत्रासाठी यावयाचे होते. नोकरशाहीने तर पोस्टाच्या कोपऱ्यापासून व्हिक्टोरिया लायब्ररीच्या कोपऱ्यापर्यंत लाठीबंद पोलिसांची साखळी करून रस्ते रोखले होते. पण त्या साखळीच्या बाहेर कमीतकमी दहा हजार लोकांचा समुदाय काही काळी निशाणे घेऊन गव्हर्नरसाहेबांच्या स्वागतासाठी सज्ज होता. मध्यंतरी राजवाड्यापुढील बागेजवळील राष्ट्रीय झेंड्याचे रक्षण करीत सहा स्वयंसेवक हजर होते. त्यांना पकडून नेण्यात आले. जनसंमर्दात तीस तीस यार्डावर त्यांची जागा दोघादोघांच्या जोड्यांनी घेण्यास सत्याग्रही शिबिराधिपती शं. वि. ऊर्फ बाबा लेले यांनी व्यवस्था केली होती. पण लहानांनी रणी जावे व थोरांनी नुसते बघावे हे बरे नव्हे या विचाराने तेव्हा समोरच उभे असलेले भाऊसाहेब सोमण झेंड्याच्या रक्षणार्थ जाऊन उभे राहिले तशी त्या झेंड्याबाबत नोकरशाहीची सर्व हालचाल स्तब्ध झाली. पुढे गव्हर्नरसाहेब म्युनिसिपालिटीकडे आले. आणि तेथून परत गेले तेव्हा "गांधीमहाराजकी जय" असा गगनभेदी आवाज झाला.

शनिवार ता. १२ जुलईस जिल्ह्याच्या राजधानीत असे स्वागत स्वीकारून दुसरे दिवशी साहेब कऱ्हाडास गेले.

ता. १३ जुलई रोजी कऱ्हाडास काळ्या निशाणांच्या स्वागताची कोणी एक फिल्म घेतल्याची बोलवा असून १५ जुलई रोजी "नवाकाळचा" बातमीदार लिहितो "मानपत्र देण्याचा टेंभा मिरवणाऱ्या म्यु. सभासदांपैकीच श्री. बळवंतराव जाधव हे मानपत्र समारंभास हजर नव्हते; अधिकारी कक्षेतील काही भोळे बापडे असे वेचक २२५ लोक तालुक्यातून बोलावले असून, निमंत्रितांपैकी अवघे एक पंचमाश लोक हजर राहिले. म्यु. ऑफिस शेजारी गव्हर्नर साहेबांचे आगमन होताच काळ्या निशाणांनी त्यांचे स्वागत गोपाळराव बदामी प्रभृती गुप्त स्वयंसेवकांनी करून महात्माजींच्या नांवाचा लोकांनी एवढा जयजयकार केला की, म्यु. त मानपत्र वाचन चालू असता तो मानाचा देखावा सोडून खुद्द डी. एस. पी. ना बाहेर यावे लागले ! कऱ्हाडच्या सरहद्दीवरील कोयनेच्या पुलापासून गव्हर्नरांची स्वारी कृष्णेच्या फरशीपर्यंत ज्या ज्या मार्गे गेली त्या त्या मार्गे सर्व ठिकाणी दुतर्फा लोक 'शेम ! शेम !' "महात्मा गांधीकी जय" वगैरे आरोळ्यांनी आणि काळ्या निशाणांच्या गर्दी प्रदर्शनानेच गव्हर्नरसाहेबांचे स्वागत करीत होते. राघुअण्णा धोपाटचांच्या सेनापत्याखाली आणि काले व मसूरकर मंडळीच्या प्रोत्साहनाने हे सर्व घडून आले. सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागातून पसतीस हजार लोक काळी निशाणे दाखवण्यास आले होते. त्यांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था घरोघर भाकरी भाजी मागून कृष्णाघाटावर भाऊकाका गरुड, नारायणराव पोतनीस, बाबूराव गोखले प्रभृतींनी केली होती.

महाबळेश्वराला जाता येता केव्हातरी गव्हर्नरसाहेबांना गाठून मानपत्र देणाऱ्या सातारा म्युनिसिपालिटीच्या एकही मानपत्राचे वेळी १९३० सारखे स्वागत नव्हते; किंवा चाळीस वर्षांनी गव्हर्नरसाहेबांनी कऱ्हाडास भेट दिली म्हणून लोक आपले हृद्‌गत दाखवावयाला बिचकले नाहीत. गव्हर्नरांचे आगमनाचे दिवशी व्यापाऱ्यांनी पाळलेला हरताळही इतका कडक होता की, बंदोबस्ताकरिता आलेल्या पोलिसांना सत्याग्रह्याच्यांकडे येऊन जेवावे लागले. असे कडक हरताळ जवाहरलाल नेहरू, आब्बास तय्यबजी यांच्यासारखे लहान-थोर पुढारी शिक्षा पावले म्हणजे जसे पडत तसेच स्थानिक सत्याग्रहांच्या वेळीही पडत. पण गव्हर्नरसाहेबाच्या वेळी जो कडक हरताळ होता त्यावरून ब्रिटिश दडपशाही किती असंतोष निर्माण करू शकली हे एक प्रकारे स्पष्टपणे जगाच्या निदर्शनास आले. इतके की साईक्ससाहेबही अस्वस्थ झाल्याचे टाईम्सने नमूद केले होते.

सत्याग्रही सत्याग्रहासाठी निघो, सत्याग्रहाहून परत येवो, त्याला तुरुंगात पोहोचता करावयाचा असो अगर तो तुरुंगातून परत येवो सत्याग्रह्यांचे अभिनंदन आणि सरकारी दडपशाहीचा धिक्कार हे कार्यक्रम नित्यवळणाचे इतके होऊन बसले होते की त्या साली नुसत्या 'सभा' म्हटल्या तर हजारो झाल्याचा दाखला सापडतो. त्यापैकी कित्येक प्रसंगी दहादहा हजारांच्या असत. गव्हर्नरवरील बहिष्कारासंबंधी कऱ्हाड येथे भरलेली ता. १२ जुलईची सभा २५००० स्त्री-पुरषांची होती; व इसलामपुरास राजबंदी दिनाची सभा १५००० श्रोत्यांची झाली. वाईस तर राजाभाऊ भाव्यांनी बेकायदेशीर संस्थांचा प्रतिनिधी म्हणूनही सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत कित्येक सभा बेदरकारपणे केल्या. भुयाचीवाडी, खोखलेवाडी असल्या कानाकोपऱ्यात-सुद्धा शांतिसंग्रामाने आपला प्रताप दाखविला. मग वाईच्या रंगुताई निमकर, सबुताई पुरोहित, काशिताई पर्वते यांनी कीर्तने करून, साताराच्या यशोदाबाई गोखले, गोदुबाई दामले यांनी बहिष्कारव्रताने चातुर्मास्य साजरा करावयाचे व करवावयाचे ठरवून किंवा तासगावच्या विद्यार्थ्यांनी 'बजरंगव्रत' आचरून शांतिसंग्रामाला आशीर्वाद दिले असले तर काय नवल ? अक्कलखोपने चहाबंदी केली, औदुंबर, नरसोबाचीवाडी वगैरे क्षेत्रीच्या भिक्षुकांनी अभिषेक धरले. तात्पर्य युद्धमान राष्ट्रात जे प्रकार दृष्टीस पडतात ते सर्व सत्याग्रही सातारा जिल्ह्यात दिसत होते.

अर्थात पराक्रमाच्याही गोष्टी जिल्ह्यात घडल्या. रत्नागिरी, शिरोड्याहून मिठाचा सत्याग्रह करून आलेले स्वयंसेवक, कोल्हापूरचे माने, हविरे व कुळकर्णी, साताराचे एकबोटे, वगैरे अंगावरील लाठी माराच्या जखमा दाखवीत. त्याने दबून जाण्यापेक्षा येथे चळवळीला उसळीच आली. घरची परिस्थिती

सर्वथैव प्रतिकूल असता ता. २२ एप्रिल रोजी बाबूराव भिडे, महाजनी, पंडित कुलकर्णी, शिवानंद यांनी " बेकायदेशीर " मीठ विकून कायदेभंगाला सुरुवात केली, आणि रत्नागिरीस बटाणे, व पुण्यास पांडुआण्णा शिराळकर अनुक्रमे मिठाचा कायदा तोडून व बेकायदेशीर मीठ विकत घेऊन कऱ्हाडास दाखल झाले त्यासरसा मिठाचा कायदेभंग जिल्ह्यात उसळला.

विटे येथे बेहरे यांचे " १८५७ " चे पुस्तक तीन तीन वेळा भर सभेत जप्तही झाले ! अशा उसळलेल्या कायदेभंगाच्या काही विशिष्ट लाटा लक्षात भरण्यासारख्या आहेत. मसूर येथे ता. २७ एप्रिल रोजी तर्कतीर्थ जोशांनी विदेशी कापडाची होळी पेटविली. तासगावास ता. ६ मे रोजी विदेशी कापडाची लादी एका गाढवावर करून मिरवणूक ओढ्यात नेली व तेथे परांजपे वकिलानी होळी पेटविली. गणपतराव क्षत्रियांनी व पांडोबा जाधवानी एकदम १५० स्वयंसेवकांनिशी बेकायदा मीठ विकले व विकत घेतले आणि ता. १९ रोजी तांबोळी, नेमाने, भस्मे यांनी तारळे गुत्त्यावर पिकेटिंग करून कायदेभंगाचा मामला फारच पुढे रेटला. त्याचे उदाहरणच द्यावयाचे तर जवाहरलालांच्या शिक्षेमुळे तासगावास भरलेल्या सभेचे देता येईल. पोलीस सभेच्या अध्यक्षांना पकडते असे म्हटल्यावर १०५ माणसे आपण होऊन त्या सभेची अध्यक्ष झाली. फार काय ऑगस्टमध्ये जोग जोगळेकरांना बेकायदेशीर संस्थांचे चालक म्हणून पकडल्यावर लाठी–चरखा–ज्ञानेश्वरी–खादी प्रदर्शनाचा सप्ताह झाला, आणि कु. शांता कासारसारखी एक मुलगी कायदेभंगाची प्रचारक बनली.

ऑगस्टमध्ये २२ तारखेला काँग्रेस कमेटचा व टिळक राष्ट्रीय विद्यालयातील शिबीर बेकायदेशीर ठरविले. त्यावेळी काँग्रेस संस्थांशी संबंधित असलेले लोक जसे पकडले तसे शिबिरातील झेंड्याच्या रक्षणार्थ उभे राहिलेले तेरा सत्याग्रही पकडले. शिबीर उध्वस्त झाले. पण काँग्रेस कमेटचांच्या संस्था बेकायदेशीर ठरवल्यावर सप्टेंबरपासून " सर्वाधिकारी " म्हणून सर्वत्र कायदेभंग होऊ लागले. एकाला उचलून तुरुंगात बसवावा तो दुसरा त्याच्या पायधुळीतून तयार ! पण सातारा जिल्ह्याने सामुदायिक, सार्वत्रिक सर्वसंमत, आणि एकाच वेळी जर कोणता परिणामकारक सत्याग्रह केला असेल तर एकदा जवळजवळ ५० हजार लोकांनी ता. २८ ऑगस्ट रोजी ऋषिपंचमीच्या मुहूर्तावर केलेला १ पाडळी (कराड) २ उरूल ३ इटकरे, ४ करंजखोप, ५ अंतवडी, ६ विटे, ७ कणेगाव, ८ कोरेगाव, ९ मसूर, १० बिळाशी, ११ मांगले, १२ कांदे, १३ ढेबेवाडी, १४ कडेगाव, १५ किवळ, १६ पेठ, १७ येलूर, १८ रेठरे-हरणाक्ष, १९ बोरगाव, २० वाळवे, २१ घागेवाडी, २२ ऐतवडे बु॥ २३ कुरळप, २४ कापूसखेड, २५ चिकुर्डे, २६ करंजवाडी. २७ कार्वे, २८

देवर्डे, २९ रेठरे धरण, ३० निगडी तर्फ कऱ्हाड, ३१ वशी, ३२ तारळे अशा ठिकाणचा जंगल-सत्याग्रह होय. सदर सत्याग्रहाला बाबा लेल्यांची मार्गदर्शक स्फूर्ती होती. त्यातही तांबवे, रेठरे हरणाक्ष, व विशेषतः चरणबिळाशी येथील जंगल सत्याग्रह एवढ्या मोठ्या प्रमाणात झाले की टाईम्सच्या बातमीदारास बिळाशीला ' दक्षिण शेतकऱ्यांचे बंड ' दिसले. तांबव्याच्या सत्याग्रहात कासाबाई परटीणीनी सरकारी अधिकाऱ्यास थक्क केले ते याच वेळी.

मीठ सत्याग्रहाच्या आवृत्त्या, सर्वाधिकाऱ्यांची मालिका आणि ' बंड ' वाटण्याइतका जंगल सत्याग्रह या विशिष्ट गोष्टीशिवाय ता. २२ मे हा सोलापूर दिन, ता. २७ जून हा मुंबई दिन, ता. १० ऑगस्ट हा राजबंदी दिन, ता. १६ नोव्हेंबर हा जवाहरलाल दिन, आणि १३ जानेवारी १९३१ हा सोलापूर फाशी दिन म्हणून जंगल सत्याग्रहासारखेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर साजरे करण्यात आले. सोलापूर फाशी दिनादिवशी कऱ्हाड व सातारा येथे लाठीबंद पोलिसांच्या गराड्यात एक सोडून पांच पांच सभा झाल्या. आणि तासगाव येथे थोडक्यात लाठीमाराचा प्रसंग टळला. नेहरू दिनादिवशी तासगावास विकत फुकट कसेही मिळवून प्रत्येक घरावर राष्ट्रीय निशाण फडकविण्यात आले. त्याच दिवशी कऱ्हाडास पोलीस पार्टीची पळता भुई थोडी झाली. कारण एकेठिकाणी सभा आहे म्हणून ती मोडावयास जावे तो तेथील सभा आटोपून दुसरीकडे सभा सुरूही असावयाची. याशिवाय राजबंदी दिनापासून स्वदेशी, बहिष्कार, सप्ताह हा जिल्ह्यात साजरा झाला. त्यात केसरी म्हणतो, " प्रत्येक दिवसाचे व सभेचे वैशिष्टय राखण्यात आले होते. राजबंदीदिन, धर्मदिन, स्वदेशीदिन, बहिष्कारदिन, शेतकरीराजकारणादिदिन, म्हणून आठवडाभर एकसारखी जागृती करण्यात आली. " हा सप्ताह आणि राजबंदीदिन कऱ्हाडात विशेष ठसा उमटविणारा झाला.

ता. ३० ऑक्टोबरपासून नेहरू सप्ताहही पाळण्यात आला होता. तो बेकायदा ठरविलेल्या कऱ्हाड तालुका काँग्रेस कमेटीमार्फत लक्ष्मणराव अटकेकर व जगन्नाथ तेली यांनी केल्यामुळे पुण्याचे काकासाहेब गाडगीळ व राघुआण्णा धोपाटे यांनी घेतलेल्या भागाबद्दल त्यास शिक्षा देणेत आल्या. त्यावेळी धोपाट्यासह काकासाहेब गाडगीळ बिळाशीकडे सांत्वनार्थ जाणार होते.

जिल्ह्यातील या घटनाबरोबर सातारकरांनी जिल्ह्याबाहेरील केलेले कार्य पाहणे जरूर आहे. शिरोड्याचा सत्याग्रह १२ मे ते १५ मे दिवशी झाला. पहिल्याच दिवशी डॉ. आठल्ये पकडले गेले. ता. १२, १३, १४ रोजी पोलिसांकडून झालेल्या अत्याचारामुळे शिरोड्याची जनता व स्वयंसेवक प्रक्षुब्ध

होते. सत्याग्रह शास्त्राच्या दृष्टीने महाराष्ट्राची अब्रू जाण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. डॉ. आठल्ये व जावडेकर यांच्या उपदेशामुळे ते महान संकट टळले.

१९३० मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत सेवादल ही निश्चित शक्ती आहे, असा डॉ. आठल्यांचा विश्वास होता. महाराष्ट्रातील कायदेभंगाच्या प्रत्येक क्षेत्रात सेवादलाचे घटक काम करताना आढळले, आणि कायदेभंग मंडळाच्या पहिल्या समितीतील पांच सभासदांमध्ये डॉ. आठल्याना समाविष्ठ करून घेतल्याचे एक कारण म्हणजे त्यांचे महाराष्ट्रीय सेवादलातील प्रमुख स्थान होय. १९२९ मध्ये सातार्‍यात दलाचे शिबीर घेण्यात आले होते. आठल्यांची योजना व साखवळकर यांची कडक शिस्त यामुळे हे शिबीर एखाद्या लष्करी शिबिराप्रमाणे यशस्वी झाले होते.

मिठाचा सत्याग्रहः– १९३० च्या कायदेभंग समितीचा सभासद या दृष्टीने डॉ. आठल्यांच्यावर फार मोठी जबाबदारी होती. सातारा जिल्ह्यातून आपणास एकटयास सज्ज रहावे लागले तरी आपण तयार राहू अशी अनुमती डॉ. आठल्यांनी दिली होती. प्रसंग राष्ट्रीय लढ्याचा आणि महाराष्ट्राची अब्रू रक्षण्याचा होता.

सत्याग्रह सुरू होण्यापूर्वी ठाणे जिल्ह्यात डॉ. आठल्ये प्रचारासाठी हिंडून आले. त्यानंतर विलेपार्ले, रत्नागिरी, शिरोडे या तीन केंद्रामध्ये आठल्यांनी कामे केली. स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या मनाचा तोल नाहीसा होऊ न देणे हे काम महाराष्ट्राच्या ऐतिहासिक सशस्त्र लढाऊ वृत्तीचा विचार करता कठीण होते. डॉ. आठल्ये, नाथ घाणेकर व आचार्य जावडेकर यांनी स्वयंसेवकांची बुद्धी तर स्थिर राखलीच पण श्री सावरकरांच्या चहात्यापैकी अनेकांना रत्नागिरी येथील सत्याग्रहाचे सहाय्यक म्हणून डॉ. आठल्यांनी गुरफटून घेतले. शुद्ध बुद्धीच्या व कळकळीच्या जोरावर ते साधले.

ता. ३ एप्रिल रोजीच इनामदार, नर्दे, हकीम, हे विलेपार्ले येथील मीठ सत्याग्रहासाठी रवाना झाले होते. २१ एप्रिलला गोसाव्यांना महाराष्ट्र सत्याग्रह मंडळाचे पाचारण झाले. त्याच महिन्याचे तिसर्‍या आठवड्याचे आरंभी रत्नागिरीस प्राज्ञपाठशाळेचे दहा विद्यार्थी, आणि मालवणास वीस व विलेपार्ले येथे एकवीस स्वयंसेवक निघून गेले. मालवणच्या सत्याग्रहाचे दिवशीच रत्नागिरीस सातार्‍याहून आलेल्या तुकडीतील मंडळीशी पोलिसांची झटापट झाली. प्रथम पोलिसांनी कुलकर्ण्यांना खाली पाडून तीनचार पोलिसांनी त्यांचेकडील थोडेसे मीठ काढून घेतले व त्यास सोडून दिले. पण कुलकर्ण्यांच्या झटापटीत उमजलेल्या शिपायांना साठ्यांच्या पुढे होण्याचे धैर्यच होईना. गणपतराव साठे आपल्या दोन्ही हाताच्या पकडीत मिठाची मोटली घट्ट धरून नुसते उभे होते.

त्यांना पकडल्याचे सांगण्यात आले. सत्याग्रही या नात्याने ते कुलकर्ण्यासमवेत कैदखान्याकडे रवाना झाले. दोघांना ६।६ महिन्यांची सक्तमजुरी झाली. (रत्नागिरी सत्याग्रह इतिहास पृ. १९–२०). ता. १५ एप्रिलला रत्नागिरी कँपचे आधिपत्य डॉ. आठल्ये यांचेकडे आले. पुरते दोन दिवस गेले नाहीत तोच साखवळकर, गणपतराव साठे व येलूरचे कुलकर्णी यांना सत्याग्रहात शिक्षाही झाल्या. गोसावी " राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमावर " व्याख्याने देता देताच पेण येथे ता. २७ एप्रिल रोजी पकडले गेले. तीन दिवसांनी रत्नागिरीस नाथ घाणेकरांना तोच मान मिळाला. उघडच उत्साहाने परचुरे शास्त्री ता. ३ मे रोजी शिरोड्याला गेले देखील ! अशा एकट्या दुकट्याचे कशाला बोलावयास हवे ! ता. ५ मेपर्यंत मिठाच्या कायदेभंगास १२० स्वयंसेवक सातारा शिबिरातून धाडले. त्यानंतरच्या एका पत्रात डॉ. आठल्ये कळवितात की " रत्नागिरी, मालवण, शिरोडे, वेंगुल, प्रत्येक केंद्रावर सातारा जिल्ह्यातील लोक आहेत. त्यांचे चोख काम होते. पोलिसांनी पाय फासटले तरी स्वयंसेवकांनी हात टाकला नाही; पण मीठ मात्र सोडले नाही. " ता. १९ मे रोजी शिरोडे मिठागरातील १५०० माणसावर यशस्वी हल्ला झाला. त्यात डॉ. आठल्ये, परचुरे, बा. वा. इनामदार, ना. रा. नर्दे, त. जि. कोडचीवाड, ना. र. बावडेकर, ल. ना. हसबनीस, अ. बा. आडके, ना. अ. सोहनी, आ. प. मोरे, वामनराव कुलकर्णी, रत्नगौंडा पाटील, विष्णु भाऊ पाटील, दिवेकर, भिडे अशी सातारा जिल्ह्यातील मंडळी प्रामुख्याने होती. संख्येने बोलावयाचे तर शिरोड्याच्या शेवटच्या सत्याग्रहात सातारा जिल्ह्याचे १५० लोक होते व त्यातले ६५ पकडले गेले. त्यात खरी कर्तबगारी नागठाण्याचे श्रीपाद हरी कुलकर्णी यांचीच होती. ती अशी:-शेवटच्या दिवशी पोलिसांच्या आठ रांगातून ते एकटेच तीरासारखे गेले व मीठ घेऊन आले. चिपळूण येथे दामुअण्णा एकबोटे शिबीर चालवीत. १९ मेचे सुमारास धारासनाला ७० महाराष्ट्रीयांनी हल्ला केला त्यातही साताराची दोन माणसे होती. जून महिन्यात सोलापूरला जो झेंडा सत्याग्रह झाला त्यात मृत्यू सामोरा येऊन ठाकला असताही त्यास आलिंगन देऊन दामुआण्णा एकबोटे, अ. ग. देशपांडे, श्री. ह. जोशी, शुक्ल, भोसले, बर्डे मास्तर प्रभृती आठरा जणांनी भाग घेतला होता.

परजिल्ह्यात सत्याग्रह करून तुरुंगात गेलेल्या सत्याग्रहींनी स्वयंसेवकही मिळविले होते व सत्याग्रहाकरिता पैसेही गोळा केले होते. " रत्नागिरीत तर सगळा सातारा भरला होता, " असे तिकडील माणसे व पत्रे म्हणत.

अशाप्रकारे सातारा जिल्ह्यातील मंडळींनी जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर शांतिसंग्रामात भाग घेतला असला तरी ता. २८ एप्रिल पूर्वीच अकारण हातझोंबीने नोकरशाही लोकास चीड आणित होती. सोमणांनी जिल्हाधिकाऱ्यांना

पोलिसांचे त्या लीलेबद्दल ता. २८ एप्रिलच्या समर्थातून अनावृत्त पत्र लिहिले आणि त्यापासून बोध घेऊन लोकांची सहानुभूती उत्पन्न करण्या इतका आपल्या वर्तनात बदल करण्या ऐवजी ता. ६ मे रोजी सातान्यास कोणा माथेफिरूने दगडफेक केल्यामुळे कलेक्टरसाहेब व डी. एस्. पी. साहेब यांनी अनत्याचाराची व शांततेची जबाबदारी समजावून सांगण्याबद्दल सोमणानाच उलट सांगितले. ते सोमणांनी अर्थातच केले. पण निर्वाळा दिला की कोणीही सत्याग्रही अत्याचारी नाही.

२० : *बिळाशी बंड*

(केसरी, ज्ञानप्रकाश, समर्थ, ऐक्य, भारतमाता, टाईम्स, नवाकाळ, इसलामपूर कोर्टातील बिळाशी केसमधील जबान्यावरून)

टाईम्सच्या बातमीदाराला दक्षिण शेतकऱ्यांचे बंड वाटण्याइतका जंगल सत्याग्रह तरी बिळाशीकडे कसला झाला होता ? आणि तिकडील लोकांच्या सांत्वनार्थ काकासाहेब गाडगीळ तरी का जाणार होते ? या प्रश्नांच्या खोलात थोडेसे तरी शिरू.

जुलई १९३० च्या दुसऱ्या पंधरवड्यात खेडेगावे आपआपल्या जबाबदारीवर जंगल सत्याग्रह करू लागली. त्यात बिळाशीकडील खेडी होती. ता. १५ जुलई रोजी बिळाशीस शिबीर सुरू होणार असल्याचे घाटत होते. " सत्याग्रही होणारांनी शांततेने वागावयाचे व सत्य बोलावयाचे अशा अटी त्यावर लागू होत्या. " सातारा जिल्हयातील बिळाशी या भागात जंगल सत्याग्रहाची तयारी महाराष्ट्र-कायदेभंग मंडळाचे निदर्शनाप्रमाणे करण्यात आली होती. बिळाशी भागातील स्थानिक कार्यकर्त्यांनी व स्वयंसेवकांनीच मुख्यतः ही तयारी केली होती. बिळाशी, चरण, पणुंब्रे, काळंद्रे, आरळे, येळापूर, खिकडे, करंद्रे, किकिरे, पुनवत, कणदूर, सागा, हेत्त्वेगाव, ताटवडे, साजगाव, चिंचूल, कोथरूड, मांगरूड, रिळे, आवळेवाडी, वीडर अशा गावी सत्याग्रहींची संख्या मोठ्या प्रमाणात पुरविण्यात आली. वनचराईची बंदी, गवताचे लिलाव न घेणे आणि सरकारी अधिकाऱ्यांवर व पोलिसांवर वाळीत असे तीन कार्यक्रम यशस्वीरीतीने या सर्व गांवच्या शेतकरी मंडळीनी अमलात आणले होते. ता. १८ जुलई १९३० रोजी जंगलच्या बंद भागातील एक सागवानी सोट चौतीस फूट लांबीचा कापून तो बिळाशीच्या रामेश्वर महादेवाच्या देवळाचे आवारात रोव-

ण्यात आला व त्यावर राष्ट्रीय निशाण फडकविण्यात आले. बिळाशी भागात यानंतर जे जे कार्यक्रम व्हावयाचे होते ते ते सामुदायिक व बिळाशी महादेवाच्या देवळातील निशाणाचे दर्शन घेऊन व्हावयाचे असा शिरस्ता. याबाबत पोलीसपाटील जो लक्ष्मण पाटील, त्याने वरिष्ठांकडे तक्रारी केल्या. साहजिकच जुलईच्या शेवटच्या आठवड्यात बिळाशीकडे पोलीस नेण्यात आले. त्यांनी झेंडा काढण्याचा प्रयत्न केला. पण "पोलीस जमा झाल्यावर हजारो माणसेही (स्त्री,पुरूष) झेंड्याचे संरक्षणासाठी जमली. एकंदर समाज ८-१० हजार असावा. परंतु इतका जरी समाज होता तरी त्यांच्यावर महात्माजींच्या अनत्याचारी तत्त्वाचा प्रभाव झालेला दिसत होता." तेव्हा त्या समुदायापुढे पोलिसास परतावे लागले.

यासंबंधी शिराळचाचे सब-इन्स्पेक्टर बंकटसिंग यांनी तपशील सांगितला तो असा. "२१ जुलई रोजी बिळाशीस गेलो. त्यावेळी माझे बरोबर ५।६ निःशस्त्र शिपाई होते. ता. २२ जुलई रोजी तेथून परत आलो. ता. २१ रोजी गावकऱ्याकडून आम्हाला तकलीफ पडली. आम्हाला जेवणखाण मिळाले नाही. आम्हाला धक्काबुक्की झाली नाही. किंवा आमचे सामानही कोणी हलविले नाही. बाजाराचे सामानसुमान आम्हाला मिळू दिले नाही. गावकामगारांकडूनही आम्हाला काही मिळू दिले नाही. आम्ही पोलीस गेलो म्हणजे सामान नेहमी फुकट मिळते. पण यावेळेस घोड्यास गवतही मिळाले नाही.

"ता. २४ रोजी इन्स्पेक्टर, डी. एस्. पी. व इतर शेपन्नास माणसे/असे आम्ही सायंकाळी पोचलो. सोबतचे पोलीसांपैकी लाठीवाले पोलीस १९ होते. उरलेल्या ३५ शिपायांजवळ बंदुका होत्या. त्या एकेका गोळीच्या होत्या. वांझ बाराची काडतुसे मुळीच नेली नव्हती. माझी मनाची तयारी गोळीबार करावा अशीच होती. ता. २१ पासून बिळाशीचे लोक बंडखोर आहेत असे माझे मत झाले. बिळाशीचे प्रकारास बंड हे नांव मीच २२।८ चे रिपोर्टात सुचविले होते." आपण लावलेले राष्ट्रीय निशाण जप्त होणार ही बातमी गावोगाव पसरल्यामुळें निशाणाच्या संरक्षणासाठी खेड्यापाड्यातून हजारो शेतकरी जमत होते. एकवेळ हा शेतकरी समाज दहा हजारावर गेला, आणि त्यात कित्येक स्त्रिया होत्या. त्यांनी निशाणाभोवती कडे करून पोलिसांचे प्रयत्न निष्फळ केले. पोलिसांच्या अशा अपयशाने नोकरशाही अधिकच चिडली. तेव्हा सत्याग्रहींनी आपले राष्ट्रीय निशाण फडकत ठेवावे आणि बेकायदेशीरपणे कापून आणलेला सागवानी सोट तेवढा सरकारच्या ताब्यात द्यावा अशी तडजोडीची बोलणी एका बाजूनी सुरू केली. ही तडजोड स्वीकारावयास हरकत नाही असे काही वेळा सत्याग्रहीपैकी काही मंडळीना वाटले. पण पुढे नोकरशाहीने इभ्रतीचा प्रश्न धसाला लावला आणि निशाणासह सोट जप्त करणार असा आग्रह धरला. सत्ताधारी या दृष्टीने नोकरशाहीचे म्हणणे असे की कॉंग्रेसचे निशाण येथे फडकवू

देणे म्हणजे ब्रिटिशांची सत्ता संपली अशी शरण चिठ्ठीच देण्यापैकीच होय. उलट कांग्रेसचे निशाण हेच खरे राष्ट्रीय निशाण असल्याकारणाने ते आम्ही उतरवू देणार नाही असा इभ्रतीचा प्रश्न सत्याग्रहींनीही उभारला. दोन्ही बाजूनी इभ्रतीवर भर दिल्याकारणाने तडजोड अशक्य झाली."

या पुढची हकीगत अशीः– ता. २८ ऑगस्ट रोजी जो ठिकठिकाणच्या शिबिरांमार्फत व कायदेभंग मंडळामार्फत सातारा जिल्ह्यातील सुमारे ५० हजार लोकांनी शांतपणे सार्वत्रिक जंगल सत्याग्रह केला, त्यात इसलामपूर तालुक्यातील धरणाचे रेठरे, चरण-बिळाशी वगैरे गावेही अर्थातच होती. दोन्ही ठिकाणी भोवतालच्या ५।२५ खेड्यातील दहा दहा हजार समुदाय होता. बाबा लेले यांच्या पुढाराखाली तो सत्याग्रह शांतपणे पार पडला. "ती हकीकत समजताच साताऱ्याहून कलेक्टर मि. अमिनुद्दीन हे बरोबर दोन तीनशे पोलिसांची तुकडी घेऊन इसलामपुरास आले." इसलामपुराहून रेठरे धरणाचे येथे जाऊन तेथे ज्याने गांधी टोपी घातली असेल त्यास धरणे व मारहाण करणे हा प्रकार सुरू झाला. पेठ येथेही दुसरे दिवशी असाच हल्ला करण्यात आला. शिबिराची नासधूस करण्यात आली व झेंडा काढून तोडून तो फेकून देणेत आला. नेर्ल्यात पोलिसांनी लाठी चालवून बऱ्याच लोकांना अटक केली. बोरगाव येथेही मारपीट झाली. जंगल सत्याग्रहात जंगलचे नुकसान झाले त्याची भरपाई म्हणून गावकऱ्यापासून १०-५-१५ याप्रमाणे रुपये वसूल केले. ता. १ सप्टेंबर रोजी इसलामपुरास पोलिसांनी नाके बंदी केली व झेंडा काढून टाकून त्याचा सोट कलेक्टरच्या तंबूपुढे उभा केला व त्यावर युनियन जॅक उभारले. पुढे अष्टयाची पाळी आली. अष्टयाहून दुसरे दिवशी हे सैन्य शिराळ्याकडे जाण्यास निघाले. ता. ५ सप्टेंबर रोजी शिराळ्याहून पोलिस फौज सकाळीच बिळाशीच निघाली. शिराळ्याहून बिळाशीचा रस्ता लोकल बोर्डाचा असून तो पूर्वीपासूनच नादुरुस्त होता, व तो दुरुस्त व्हावा याबद्दल लोकांनी पूर्वी अर्जही केले होते. अशाच रस्त्याने मोटारीस १२ मैलांचा प्रवास करण्यास एक तास लागला, यात काहीच आश्चर्य नाही. बिळशीस डी. एस.पी.-च्या नेतृत्वाखाली २५० हत्यारी पोलीस होते. त्यात पुण्याहून आलेली १०० लोकांची किचनेर पलटण होती. कोल्हापुराहून सुमारे १५० पायदळ बिळाशी, रेळे, व मंगरूळ यांचा कोंडमारा करण्यास ठेवले होते. बिळाशी येथे बंड झाले असून इंग्रजी सत्ता तेथील लोकांनी झुगारून दिल्याच्या बातम्या बाहेर आल्या होत्याच. तेव्हा बाहेरचे सर्व रस्ते रोखून कोणीही "गांधींचा माणूस" आत जाऊ न देण्याची अगर आतील बाहेर येऊ न देण्याची खबरदारी घेण्यात आली होती हे निराळे सांगण्याचे कारणच नाही.

शुक्रवारी ७ वाजता सकाळी पोलीस आले त्यावेळी गावचे कित्येक लोक

बाहेरही पडले नव्हते. रामेश्वराचे देवळात मात्र नाम सप्ताह चालू होता. आणि गावचे व परगावचे शेकडो पुरुष, दोनशे बायका व मुले मिळून ७०० ८०० मंडळी देवळात व बाहेर बसून होती. पोलीस आले व इन्पेक्टर नाईक यांच्या हुकमाने त्यांनी लोकांना झोडपावयास सुरवात केली. ५० पोलिसांची एक टोळी झेंडा काटण्यासाठी गेली. झेंडयाच्या संरक्षणार्थ लाठीमार व मृत्यू यांची पर्वा न करता ६० स्वयंसेवक व २० स्त्रिया धावल्या. राजू कदम नावाच्या एका धीट स्त्रीने झेंडयाला हातांनी विळखा घातला होता. तिच्या नाकाडावर लाठीचा तडाखा बसून तोंड रक्त बंबाळ झाले तरी तिने झेंडा सोडला नाही. अखेर पोलिसांनी हिसका हिसकी करून तिला फरपटत ओढून काढले. नंतर झेंडयाचा चौथरा पाडून काठी तोडून पाडण्यात आली !! देवालयातही घुसलेल्या पोलिसांनी सापडेल त्यास धोपटण्यास कमी केले नाही. मृदंग, तंबोरा फोडून व मखर मोडून तोडून टाकले ! गुरवासही मारले. लोकांना गझनीच्या महंमदाची आठवण झाली. नादीरशाही डोळयासमोर चमकू लागली.

दोन तासात हे कृत्य आटोपून पोलीस शिपाई तेथून निघून गेले. परत जाताना कोणी दगड मारले अशा सबबीवर चारपांच पोलिसांनी कलेक्टरच्या हुकमावरून एक एकच गोळी झाडली. त्यातील दोन गोळयानी मेलेल्या सीताराम भाऊ चांभार व धोंडी संतू कुंभार या दहा-बारा वर्षांच्या दोन पोरांना कुत्र्याप्रमाणे फरपटत मोटारीपर्यंत नेले असे ती स्थिती प्रत्यक्ष पाहिलेल्या स्त्रिया सांगतात." १८९६-९७ मधील पुण्याच्या रॅन्डचे जुलुम-शाहीची ही नवी आवृत्ती होती.

बंकटसिंग सबइन्स्पेक्टरनी संबोधलेले ते बिळाशीचे बंड वरील तऱ्हेने मोडून ३९ लोकांना अटक करून कलेक्टरसाहेब व डी. एस्. पी. शिराळयास आल्याच्या वार्ता सातारा कऱ्हाडकडे गेल्यावर सातारहून डॉ. कोल्हटकर आपल्या आयर्गिल वैद्यक शाळेतील तेरा विद्यार्थ्यांसह व कऱ्हाडहून डॉ. कोल्हापुरे–गुणे–गोगटे–दिवेकर वैद्य प्रभृती मंडळी जखमी लोकांच्या शुश्रुषे-साठी रवाना झाली. आपल्या हेतूची खातरजमा करून दिल्यावरच शिराळया-हून त्यांना अधिकाऱ्यांनी पुढे जाऊ दिले. शुश्रुषापथकातील डॉ. कोल्हटकर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की:—

" मांगरूळ या गावी बंदुकीची जखम झालेला १०–१२ वर्षांचा मुलगा होता. जखम मांडीस झाली आहे. त्याचप्रमाणे लाठीच्या माराचे ७।८ लोक सापडले. रेळे या गावी ५-६ लोक लाठीच्या माराचे होते. मार मुख्यत: पाठीवर होता. २-३ जणांच्या पाठीवर १०-१५ तरी लाठयाचे मार होते. कित्येकांची मनगटेही सुजली होती. बिळाशी येथे सर्व गावातील लोक रडत होते. त्या गावातील बायका व म्हातारी माणसे यांनाच जास्त मार लागला

होता. ७० वर्षांचा एक म्हातारा होता. त्याच्या डोक्यावर लाठीचा मार बराच बसला होता. शिवाय पाठ व दंडही सुजले होते. २-३ जणांच्या डोळ्यावर मार होता. दोन बायकांच्या हातास ओपन वुंडस दिसल्या. एका बाईचे नाक फुटले होते. बिळाशी पलीकडचे वाडीत पायाचे हाड मोडलेला एक गृहस्थ दिसला. सर्व गावचे लोक भ्यालेले दिसले. आम्हाला रडत रडत त्यांनी सर्व गोष्टी सांगितल्या. ”

दोन तासात पोलिसांचे हातून दुखावलेल्या लोकांची आकडेवारी नवाकाळच्या रिपोर्टप्रमाणे अशी आहे:–“ ४२ जखमी आहेत. ते सर्व अंथरुणाला खिळले आहेत. ४ लोक बेपत्ता झाले आहेत. पोलिसांच्या बुटांचा मार लागल्याची तक्रार सुमारे ५० बायकांकडून करण्यात येत आहे. मंगरूळ येथे ७ अत्यवस्थ असून लाठ्यांच्या माराने जखमी झालेले २५–३० जण आहेत. रेळे येथे २५ पुरुष व ६ बायका यांना जखमा झाल्या आहेत. या व किरकोळ मार बसलेली या दंगलीतील एकंदर माणसे १००० असावीत. ”

बिळाशीच्या या दुःखित बांधवांच्या समाचारासाठी डॉक्टर, वैद्य मंडळी जशी शनिवारी सातारा कऱ्हाडहून गेली होती, त्याचप्रमाणे राघुआण्णा लिमये आणि कऱ्हाडचे चार स्वयंसेवक आडवळणानी जाऊन आले, इतकेच नव्हे तर सातारा जिल्हयाचे पुढारी दादासाहेब करंदीकर हे सरदार मुतालिक व बॅरिस्टर करंदीकर यांच्यासह रविवार ता. २७ सप्टेंबर रोजी बिळाशी भागाकडे समाचारार्थ जाऊन आले. त्याच दिवशी मलकापूरच्या बाजूने कापशी भेडसगावाहून वारणानदी ओलांडून कोल्हापुरचे माने, धर्माधिकारी, व मेथे मास्तर हेही बिळाशीच्या लोकांना औषधपाणी करणेसाठी धावले होते. याशिवाय कऱ्हाड येथे आप्पासाहेब आळतेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन “ बिळाशी येथे पोलिसांनी केलेल्या अत्याचारांची चौकशी करण्यासाठी न. चिं. केळकर, रा. ब. काळे, सरदार मुतालिक, गुंजाळ, रामराव शिंदे यांची कमेटी नेमावी. ” असा ठरावही झाला.

कारण बिळाशी संबंधाने टाईम्सने विपरित बातम्या पसरविण्याचा सपाटा चालविला होता. उगाच एक नमुना :– “ शिराळे ता. ६ ‘ आपल्या देवतांच्या रक्षणासाठी ’ सरकारविरुद्ध उठलेल्या शेतकऱ्यांच्या उपयोगातील रानटी शस्त्रे व त्यांचे डावपेच याच योगाने सातारा जिल्हयातील बिळाशी खेड्यावर सशस्त्र पोलिसांकडून करण्यात आलेल्या हल्ल्याची हकीकत मध्ययुगीन काळाच्या इतिहासातील वाटते. बऱ्याच नेटाच्या लढाईनंतर व लोकांवर सहा गोळ्या झाडल्यावरच पोलिसांना यश मिळाले. दोन गावकरी ठार झाले व शिपायांनाही उंचावरून लोटण्यात आलेले मोठाले दगड अथवा सुऱ्यापासून कमी अधिक गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या आहेत. गावकऱ्यांची संख्या

सुमारे पांच ते आठ हजार इतकी होती व त्यांची शिस्तही चांगली होती. भोवतालच्या डोंगरावर चांगल्या मान्याच्या जागा धरून ते दगड खाली लोटून देण्याच्या तयारीने बसले होते. ”

२१ : स्वाभिमान संरक्षणार्थ

अन्याय्य कायदेभंगाची चळवळ इकडे अशी चालू असता, तिच्यात भाग घेता यावा म्हणून जसे काही देशभक्तांनी आपल्या वरिष्ठ विधिमंडळाचे राजीनामे दिले, तसे त्याठिकाणी सरदार मुतालिकासारख्या देशभक्तानी जाऊन बसण्याचेही ठरविले. (करंदीकर दैनंदिनी १२ एप्रिल १९३०) सरकारच्या बाजूनेही सायमन सप्तकाच्या अहवालाचे निमित्त करून लंडनमध्ये भारतासाठी गोलमेज परिषद घेतली गेली पण तिला भारतीय काँग्रेसचा प्रतिनिधी नसल्यामुळे ती डेन्मार्कच्या प्रिन्सवाचून होणारे हम्लेट नाटक ठरले. तेव्हा लॉर्ड आयर्विन व म. गांधी यांच्यात समझोत्याची बोलणी घडवून आणून ता. ५ मार्च १९३१ रोजी गांधी-आयर्विन करार झाला, आणि काँग्रेसला जवळ जवळ उद्याच्या स्वतंत्र भारत सरकारच्या उदयाचलाची प्रतिष्ठा मिळाली. त्यामुळे तिकडे महात्मा गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले व हिंदुस्थानातील लोक गांधी–आयर्विन-करार कसोशीने पाळू लागले.

गांधी-आयर्विन-करार आपण निष्ठेने पाळावा म्हणून जनता दक्षता घेत होती, तरी राष्ट्राने ज्या राजकीय विचारापर्यंत प्रगती केली होती, तो दृढमूल करावा अशी काळजी घेण्यात येई. बाबुराव भिडे यांनी १९३१ च्या वाई वसंत व्याख्यान मालेत “महाराष्ट्राच्या राजकीय संघटनेची आवश्यकता” या विषयावर दिलेले व्याख्यान म्हणजे “ आजन्म सेवक संस्थेची ” कल्पना गृहीत धरून शांति-प्रगती कशी साधावी या विषयीच होते.तेवढयाच दृष्टीने ता. १ जून रोजी जिल्हा काँग्रेस कमेटीचे चिटणीस बाबूराव भिडे, बटाणे, तर्कतीर्थ, गणपतराव आळतेकर, वाटवे शास्त्री, वामन गणेश फडके, वैशंपायन, चरणकर, हाकीम, आत्माराम पाटील, नाथ घाणेकर, विष्णुपंत आठल्ये, डॉ. आठल्ये, बा. वा. इनामदार यांच्या सह्यांचे एक पत्रक निघून सेनापती बापटांना महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष करावे, अशी विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे पुढे बापट प्रांतिकचे अध्यक्ष झालेही. लोकमान्य वारल्यानंतर त्यांच्या धडाडीचा, कर्तृत्वाचा आणि चैतन्योत्पादक कार्यक्रमाचा प्रणेता

सेनापती बापटांशिवाय कोणी दिसेना. तेव्हा एकपरी त्यांच्याबद्दल आदर दाखविणारी ही योजना असली, तरी दुसरेपरीही ती योजना सहेतूक होती. महात्मा गांधींच्या चळवळीत महाराष्ट्र पडला तो १९२१ पासून. अगदी महात्माजींचे तत्त्वज्ञान महाराष्ट्राला पुरे पटले होते म्हणून नव्हे, तर महात्माजींच्या इतका तेजस्वी दुसरा कार्यक्रम राष्ट्रापुढे नव्हताच, तेव्हा " निर्वाहः पतिपन्न वस्तुषु " म्हणूनच. आणि आता बापट म. प्रां. काँ. कमेटीचे नेते झाल्यावर महाराष्ट्राचा कुर्रेबाज कार्यक्रम काही निघेल आणि टिळक-गोखल्यांच्या काळचे महाराष्ट्राचे अग्रेसरत्व पुन्हा महाराष्ट्राला प्राप्त होईल, अशीही आशा पुष्कळांनी बाळगली होती. सेनापती बापट महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष म्हणून जुलईच्या शेवटच्या दिवसात सातारा जिल्ह्यात आले असता, ते आपली "भारतीय प्राणयज्ञदलाची" कल्पना घेऊन एक लक्ष माणसांची मागणी करीत आले. तव्हा-पुष्कळांना हुरूप चढला. पंधरा मंडळींनी " प्राणयज्ञदलासाठी " आपली नांवे दिली. सातारा जिल्हयातील दौऱ्यात सेनापतींचा सूर असा होता की, लोकात जागृती पुष्कळच झाली आहे, लोकांना स्वातंत्र्याचे वेड बरेच लागले आहे, असे मला वर्तमानपत्रांवरून कळत होते. स्वातंत्र्याकरिता एक लक्ष प्राणयज्ञदलाची कल्पना सुचली व त्यादृष्टीने प्रयत्न करावयाचा असे मी ठरविले. भरपूर किंमत दिल्याशिवाय कोणताही चांगला माल मिळत नाही, तसेच स्वातंत्र्य मागून मिळणार नाही, तर, त्याकरिता बऱ्याच प्राणांचे मोल दिले पाहिजे. "

महर्षी बापटांचा प्राणयज्ञदलाचा मनसुबा निघताच स्वयंपूर्ण स्वराज्याच्या दृष्टीने आपण महर्षींच्या कार्यक्रमात बराच टप्पा चाल करू शकू अशी आशा काहीना वाटत होती. पण रत्नागिरीस महर्षींना बंदीत पडावे लागल्या कारणाने, ती सर्व आशा जेथल्या तेथेच राहिली. उज्ज्वलतर मार्गदर्शन नाही म्हणून हात जोडून बसावयाचे हे मात्र सातारा जिल्ह्यास माहीत नाही. चिरनेर खटला चालविण्यास करंदीकर वकील गुंतले, धान्याचे भाव उतरले होते व नाण्याचे दुर्भिक्ष माजले होते तेव्हा एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यातच साताऱ्यास परदेशी कापडावर साष्टांग नमस्काराचे अनुष्ठान मामा गोळवेलकर, अंबादास कुलकर्णी, वाळिंबे, जयकुमार यांनी बसविले होते. त्याचा सुपरिणाम होऊन सातारचे व्यापारी परदेशी कापड सीलबंद करून ठेवू लागले. तासगावीही दारूबंदी, परदेशी कापड व साखर यावर निरोधन सुरू झाले. ता. २१ जूनपासून इसलामपुरास वाळवे तालुका काँग्रेस कमेटीने बहिष्कार सप्ताह सुरू करून तेच कार्य केले. परदेशी कापड सीलबंद न झाल्यास प्राणपणाला लावून अन्नसत्याग्रह करण्याचे आत्माराम पाटलांनी जाहीर केले व शेट पोपटलाल शहांच्या हस्ते निरोधनाला सुरवात झाली. बापूसाहेब देशमुख, बाबूराव चरणकर, बर्डेमास्तर, ताराचंद शेट, हिरवे, आण्णा ढवू, प्रेमजी

रणछोडदास, यांचे निरोधनमंडळ तयार झाले. माधवराव बागल, फलटणे, धोंडजी पांडुरंग पाटील, गुलाबभाई बागवान, बाबूराव गोखले, नाना वाळवेकर, द. वा. कुलकर्णी, ज्ञानु नारायण पाटील, भाऊराव पाटील, हकीम, अहंमदभाई मुजावर, यांची भाषणे झाली, आणि इसलामपूरचे परदेशी कापड सीलबंद झाले. त्याचप्रमाणे कऱ्हाड तालुका काँग्रेस कमेटीनेही परदेशी कापड निरोधन त्याच सुमारास यशस्वी केले.

इसलामपूरचा उपरीनिर्दिष्ट बहिष्कार- सप्ताह चालू असता, वाईच्या गोवर्धन संस्थेच्या निमित्ताने पं. मदन मोहन मालवीय यांचे सातारा जिल्ह्यात आगमन झाले. तेव्हा सातारा, वाई, कऱ्हाड येथे त्यांची (ता. २२ ते २४ जून) राजकीय व्याख्यानेही झाली. " म. गांधींनी सरकारला वठणीवर आणण्याकरिता जी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली, ते शस्त्र अमोघ आहे. तथापि बिजली बत्तीसारखा लखलखाट गांधीजीसारखे पुढारी उठवून दाखवीत असले तरी, त्या बिजली बत्तीचे पॉवरहाऊस—शक्तिसंचय अफाट जनता होय. " पंडीतजींच्या अशा व्याख्यानाने " हृदयाहृतसंदेश मिळाला. "

अफाट जनतेला शक्तिसंचय करण्याचे दृष्टीने मे महिन्यात कऱ्हाड, सातारा, वाई, वाठार येथे तासगावच्या गजानन व्यायाम शाळेने लाठी प्रचार केला. यागोष्टीला विशेष राजकीय महत्त्व नसले तरी म्हसवड भागात " काँग्रेसचा संदेश " सांगत जूनच्या पहिल्या पंधरवड्यात व्हावळ हिंडले किंवा पुढे आक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात कऱ्हाड तालुक्यात देशमुख, आत्माराम पाटील, गोखले, लिमये, गरूड, आबा फाटक, निगडीकर, बाळाराम शेठ गुजर, अटकेकर, लाड, यांनी काँग्रेसचा प्रसार करून " कराची काँग्रेसचा मूलभूत हक्काचा ठराव समजाविला. " या गोष्टी जरूर लक्षात घेतल्या पाहिजेत. आणि यापेक्षाही १४ जुलई रोजी बोरगावास वाळवे तालुका परिषद विठ्ठल रामजी शिंदे ऊर्फ आण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. अध्यक्ष १९३० च्या शांतिसंग्रामात सरकारी पाहुणचार घेऊन आलेले आणि हयातीची चाळीस वर्षे हरिजन सेवेत घालविलेले व स्वागताध्यक्ष माधवराव बागल यांनी खादी प्रसाराचे निमित्ताने वाळवे तालुक्यातील खेडेन्खेडे टिपलेले. तेव्हा बहुजन समाजाला आणि विशेषतः शेतकऱ्याला " राजशक्तीचे अधिष्ठान " होण्याचे व्यवहार्य शिक्षण मिळाले, हे ओघानेच आले.

राष्ट्रीय सभेशी केलेला समेट मोडण्याचा नोकरशाहीचा बेत असल्याबद्दल इतर ठिकाणची ओरड वर्तमानपत्रातून आढळत होतीच. पण जून जुलईमध्ये सातारा जिल्ह्याला तो चटका चांगलाच बसला. बिळाशी प्रकरणातील दत्तोपंत कुलकर्ण्यांना गांधी—आर्यावन कराराप्रमाणे जून उगवला तरी सोडले नव्हते;

आणि त्यापेक्षाही नोकरशाहीने पांचगणीचे " झेंडा प्रकरण " गर्जविले. त्याचा थोडासा तपशील असा:– १९३० च्या मार्च १२ ला ॲडव्होकेट मुनशींनी म्युनिसिपल दीपस्तंभावर राष्ट्रीय झेंडा लावला. ६ एप्रिलास तो कायमपणे फडकला. ता. १४ मे रोजी गव्हर्नरसाहेब तेथे आले असता गाडेकर, उमंग देसाई, अजित कपोल जोशी आणि मिसेस समर्थलाल ऊर्फ सौ. गुणवंताबाई ही त्या राष्ट्रीय झेंड्याचे रक्षण करीत होती. गव्हर्नरसाहेबानी हॅट काढून त्या निशाणाचा मानही राखला. पण पुढे ऑगस्टचे शेवटी ३० साली फर्मानी कायद्याचे राज्य सुरू झाल्यावर जो झेंडा निघाला तो १९३१ च्या पाडव्याला पुन्हा लावण्यात आला. पण महालकऱ्यानी तो ७ जुलई १९३१ रोजी काढला !! नोकरशाहीच्या या अशा वृत्तीमुळेच " बहुजन समाजाला शक्तिसंचय करण्याचा आपण चालविलेला क्रम " यथायोग्य असल्याची सातारा जिल्ह्याला खात्री पटली. आणि पुढे डिसेंबर महिन्याच्या १६ तारखेस हुबळीच्या वाटेवर म्हणून जवारलाल नेहरूंचा जो स्टेशन–दौरा अपरात्री झाला अगर ता. २५ डिसेंबर रोजी सुभाषचंद्र बोस यांनी जो दौरा केला, त्याने सातारा जिल्ह्याला थोडी बळकटी आली. लोणंद, वाठार, सातारा, कोरेगांव, पुसेसावळी, रहिमतपुर, कऱ्हाड, ताकारी, मिरज, सांगली, तासगांव, कोल्हापूर, बुधगाव, जयसिंगपुर आणि त्या भोवतालच्या गावांनी रेल्वे लाईनवर जवाहरलालकडून संदेश मिळविला की " स्वराज्याची लढाई आता सर्वत्र सुरू होईल. तेव्हा त्यासाठी करावयाच्या त्यागाला तयार व्हा." सातारा, कऱ्हाड, लिंब, वाई येथे सुभाषचंद्र खणखणले " या वेळचा शांतिसंग्राम अत्यंत घनघोर असा होणार आहे. तरी त्यामध्ये तरुण स्त्री-पुरुषांनी भाग घेऊन वटहुकूम म्हणजे नोकरशाहीने आपल्या हातांनी आपल्याला गाडून घेण्याचा खड्डा तयार करण्याचे साधन होय, असे सरकारला दाखवून दिले पाहिजे. योग्य किंमत दिल्याशिवाय स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही." जिल्ह्यातील ताकारी स्टेशनवरील आपल्या स्वागतांतील उत्साहाचे जवाहरलालना जसे कौतुक वाटले, तसेच आपल्या सातारा जिल्ह्यातील दौऱ्याचे स्मरण पुढे तुरुंगांतही सुभाषबाबूंना वरचेवर होई.

जुलई ता. २३ सन १९३१ रोजी साताराचे प्रिं. रँगलर गणपतराव महाजनी यांनी राज्यपाल हॉटसन याना फर्ग्युसनमध्ये बोलावले असता १९३० साली सोलापुर येथे झालेल्या लष्करी जुलुमशाहीचा निषेध म्हणून राज्यपालवर वासुदेव बळवंत गोगटे या विद्यार्थ्याने प्राणघातक बार उडविला; आणि तेवढ्यानेच काय झाले, आणखी सहाजण गोगट्यांचे उदाहरण गिरविण्यास तयार आहेत त्यात तासगांवचे करंदीकर हे आहेत. असे एक हिंदी निनांवी पत्र साताराच्या डी. एस. पी. साहेबापर्यंत येऊन पोहोचले (करंदीकर दैनंदिनी ५–८–३१) अशा सर्व गोष्टींची नोंद राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यांतील द्वोघेही

सामनेवाले घेतच होते. पण महात्माजी ऑगस्टच्या शेवटी दुसऱ्या गोलमेज परिषदेला जाऊन येईपर्यंत प्रत्यक्षत: तरी गांधी–आर्यावन कराराला बाध येत नाही असा इतमाम राखण्याचा प्रयत्न चालू होता. दुसऱ्या गोलमेज परिषदेहून परत येणाऱ्या महात्माजींना मुंबईस भेटण्यास येत असता जवाहरलालना अटक झाली. तेव्हा बंगाल, संयुक्त प्रांत आणि वायव्य सरहद्द प्रांत येथील घडामोडीबद्दल महात्माजींनी राजप्रनिधीना मुलाखती मागितल्या पण त्यांना सफा नकार मिळाला. सदर गोष्टीबद्दल एक शब्द बोलावयास राजप्रतिनिधी तयार नाहीत, असे पहिल्यावर तो राष्ट्रसभा भक्तांच्या स्वाभिमानाला डंख होता आणि म्हणून ते आव्हान स्वीकारून कायदेभंगाची चळवळ जाहीर झाली.

नोकरशाही १९३० च्या चळवळीमुळे झालेल्या गांधी–आर्यावन करारानें चिडली होती, कारण दिल्लीच्या त्या करारात राष्ट्रीय सभेला हिंदुस्थान सरकार इतके महत्त्व आहे, ही अप्रत्यक्ष कबुली होती. तेव्हा ती कबुली हाणून पाडण्याकरता १९३२ साली कायदेभंगाची चळवळ राष्ट्रीय सभेवर नोकरशाहीने लादली, यावेळी नोकरशाही आपल्या फर्मानशाहीच्या काळ्याकायद्यानिशी आगावूच सज्ज होती. लोकांनीही पण तितकीच तत्परता दाखविली. १९३१ डिसेंबरात विलेपार्ले येथे हिंद–सेवादलाचे जे शिक्षण शिबीर होते, त्यात शिक्षण घेऊन आलेल्या सातारा जिल्ह्यातील तरुणांना कर्तव्याची जाणीव स्वस्थ बसू देईना. जानेवारी १९३२ चे आरंभी कॉंग्रेस कमेटचा संपुष्टात आणण्यात आल्या. सर्वाधिकाऱ्याव्यतिरिक्त त्यांचे अस्तित्व आवरण्यात आले. ता. ४–१–१९३२ रोजी महात्माजींचे अटकेचे निषेधार्थ सातारा, कऱ्हाड, वाई, सांगली, मिरज, कोल्हापूर येथे कडक हरताळ पडले आणि सायंकाळचे सभातून" बोलायच्या नोहें स्वातंत्र्याच्या गोष्टी । वीर प्राणज्योती मालविती " असे सांगण्यात आले.

ता. ७ जानेवारी १९३२ रोजी सातारचे सोमण, परचुरे, नाथ घाणेकर, डॉ. आठल्ये, कऱ्हाडचे गणपतराव व आप्पासाहेब आळतेकर, पांडुअण्णा शिराळकर, तासगावचे आबासाहेब जोग, वाईचे भय्याशास्त्री वाटवे, फार काय मसूरचे विनायक महाराज यांना स्थानबद्ध म्हणून येरवड्यास लांबविण्यात आले; आणि सगळ्या तालुका कॉंग्रेस कमेटया, जिल्हा कॉंग्रेस कमेटी, हिंदुस्थानी सेवादल, यांच्या बरोबर सातारचे टिळक राष्ट्रीय विद्यालय, इसलामपुरचे पिकेटिंग मंडळ, सातारचा ग्रामसेवा संघ, लाठी शिक्षण वर्ग, एकासळचा शेतकरी संघ, तासगावची गजानन व्यायाम शाळा, भरीला मसूरचा ब्रह्मचर्याश्रमसुद्धा बेकायदेशीर संस्था ठरविण्यात आल्या. त्या सरशी या धोरणाला विरोध करण्याला सुरुवात झाली. सोमण वगैरेना पकडल्याबरोबर सरकारच्या निषेधाची सभा वाड्यापुढे सातारा जिल्ह्याचे पहिले सर्वाधिकारी म्हणून करून नाथ घाणेकर घरी परत गेले तोंच सकाळी ८ वाजताच म्हणजे सोमणांच्या मागून तासाभरानेच नाथ घाणेकर

स्थानबद्ध म्हणून पकडले होते. पुढे सातारा जि. काँ. कमेटीचे सर्वाधिकारी म्हणून साखवळकर आणि महाराष्ट्र युवक संघाच्या सर्वाधिकारी म्हणून यमूताई केतकर यांनी दौरे काढले. पहिले व्याख्याने देत सांगलीपर्यंत गेले, तर दुसऱ्या सोलापूर करून कऱ्हाडपर्यंत आल्या. तेव्हा सभा, राष्ट्रीय निशाण, " वंदे मातरम् " ही आरोळी, यांनी काही झाले तरी राष्ट्रीय सभेचे प्रदर्शन होऊ द्यावयाचे नाही, अशा पोलादी निश्चयाने नोकरशाही वागू लागली आणि तसेच जनतेचे उत्तर येऊ लागले.

वाई, कऱ्हाड, सातारा, तासगाव, वाळवे येथील काँग्रेस कमेटयांचे डिक्टेटर सारखे चळवळ करीत होते. या संबंधात सरसाल अखेर जिल्हा काँग्रेस कमेटीचे ४८ सर्वाधिकारी झाले, आणि तालुकानिहाय निरनिराळे झालेच. पैकी एप्रिल १९३२ नंतर एकंदर चळवळ ओसरल्यावरही कऱ्हाडने व विशेषत: वाईने २४ सर्वाधिकारी देऊन ती परंपरा जिल्हा काँग्रेस कमेटीच्या इतकीच शेवटपर्यंत निष्ठेने चालू ठेवली. जिल्हा सर्वाधिकाऱ्यांमध्ये सांगलीच्या कृष्णाताई कुलकर्णी, तांबव्याच्या कासाबाई परटीण व मसूरच्या पार्वतीबाई काटकर यांच्यासारख्या स्त्रियाही होत्या. त्यातही विशेष म्हणजे पार्वतीबाई काटकर सर्वाधिकारी झाल्या त्यावेळी अवघडलेल्या होत्या आणि अर्थातच तुरुंगात बाळंत झाल्या.

१९३२ चे दुसऱ्या वटहुकमाच्या ४ थ्या कलमाप्रमाणे सोमवार ता. १८ जानेवारीपासून " काँग्रेसच्या कसल्याही चळवळीशी संबंध न ठेवण्याच्या आणि पोलीस ठाण्यावर आठवडयातून अगर दिवसातून एकदा हजेरी देण्याच्या नोटिसा " लागण्यास सुरवात झाली. नोटिसांचे सत्र, पुढे दोन महिन्यांनी स्थानबद्ध सुटून आल्यावर त्यांना, अगर सर्वाधिकारी या नात्याने किंवा काँग्रेसच्या सभेचे श्रोते म्हणून शिक्षा झालेले लोक पहिल्या शिक्षा भोगून आल्यावर त्यांना सतावून सोडीतच होते. अशा तऱ्हेने जिल्ह्यात सुमारे ८५ नोटिसा लागल्या. राष्ट्रीय सभेच्या इज्जतीसाठी हजेरीच्या, स्थलबद्धतेच्या वा मुस्कटदाबीच्या त्या नोटिसांना चिठोऱ्याची किंमत देऊन कित्येकांनी एकदम बंदिवास पत्करला, तर त्या नोटिसांचे वैयर्थ्य अधिकाऱ्यांचे नजरेस आणूनही उपयोग होत नाही असे पाहून दुसऱ्या काहींनी बंदीवास स्वीकारला.

या शिवायही, झेंडावंदन, स्वातंत्र्यदिनादी नेहमीचे कार्यक्रमही या काळात सातारा जिल्ह्याने केले. मसूर येथे १९३२ ता. ४ फेब्रुवारीस जंगल सत्याग्रहाची पकडापकड झाल्यावर सरकारनी झेंडा काढला, पण सतत दोन महिने पोलीस झेंडा उपटून टाकीत तर नवा झेंडा तेथे येऊन फडके. झेंडयाप्रमाणेच सातारा जिल्ह्याने काँग्रेस बुलेटिने काढली, जिल्हाभर वाटली; पण त्याच्या उत्पादकाचा पत्ताही नोकरशाहीस लागला नाही. मसूरात गुलामसभा पोलिसांच्या

बंदोबस्तात चालू असता गोटखिंडीचे नारायण जोशी यांनी गांधीचा जयजयकार करून कांग्रेस बुलेटिन्स सभेत उधळलीच. पण मसूरास त्या दिवशी काळी निशाणे जिकडे तिकडे फडकत होती. ३१ जुलई रोजी सातारच्या गांधी मैदानात मराठ्याचे संपादक शंकरराव आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली महाजनी-शास्त्रींनी स्वागताध्यक्ष होऊन जिल्हासभा केली. आणि बंडोपंत कुलकर्णी, बेंद्रे, श्रोत्री, पवार, सांगलीचे सावंत अशी जिल्ह्यातील प्रतिनिधी मंडळी हजर होती. नेहमीच्या मानाने ही जिल्हासभा अत्यंत तोटकी वाटेल. पण उघड्या मैदानात नोकरशाहीच्या डोळ्यादेखत जिल्हासभा पार पडली हेच तिचे महत्त्व व कौतुक. याच साली दिल्लीत भरलेल्या अशाच स्वरूपाच्या कॉंग्रेसमध्येही थेट काशिनाथराव देशमुख, लक्ष्मणराव गाडगीळ, गणपतराव बेंद्रे वगैरे सातारचे प्रतिनिधी प्रत्यक्ष कार्यक्रमाला हजर होतेच.

दरम्यान रा. ब. काळे यांनी मुंबईच्या राज्यपालाकडे मार्चमध्ये ठराव धाडला होता की, अगामी राजकीय सुधारणांच्या सुखरूप वाटचालीसाठी एक सर्वपक्षीय सभा घ्यावी. पण नोकरशाही भानावर होती कुठे ? उलट ऑगस्ट ३१ तारखेस सातारला गव्हर्नरसाहेबाचे आगमन झाले त्यावेळी त्यांना १९३० प्रमाणे काळी निशाणे स्वागतार्थ दिसली नाहीत खरी; पण गव्हर्नर साहेबांच्या मोटारीपुढें मोहिते छत्रीला काळे निशाण व अंगावर काळी घोंगडी फडकावून गर्दीतून आडवे पडले आणि त्यांच्या पाठीमागील स्फूर्ती म्हणून आत्माराम पाटील, नाना पाटील, हिंगमिरे यांना येरवड्याच्या यात्रा घडल्याच.

मद्यपान निरोधन, परदेशी कापड बहिष्कार याबाबत अटका होण्याचे काम वर्षअखेर चाललेच होते. " पण जंगल सत्याग्रहाबाबत नोकरशाहीची तारांबळ झाली. " निगडी, अंतवडी, चरेगाव, किवळ, तांबवे, उरूल, पाडळी, येथे जंगल सत्याग्रह ता. ४ फेब्रुवारी रोजी करण्याबद्दल नोटिसा दिल्या होत्या; पण त्यापूर्वी ता. २४ जानेवारीपासूनच पोलीस व सत्याग्रही व्याख्याते यांची गावोगाव सारखी पाठशिवणी चालू होती. ता. ४ फेब्रुवारी रोजी काशिनाथ देशमुखांच्या तांबव्यावरच प्रथम पोलीस–पलटणीने मोर्चा वळविला, आणि अशी जंगले तपाशीत व निराश होत मसूरला आले, तो निगडीला जंगल सत्याग्रह केलेले महाराष्ट्र युवक संघाचे सर्वाधिकारी कोळसे पाटील व सातारा जिल्हा कांग्रेसचे सर्वाधिकारी सीताराम गरुड वगैरे स्वयंसेवकांची मिरवणूक चालली होती.

सातारा जिल्हा आस्तेकदम आपला कर्तव्याचा वाटा शक्य त्या नेटाने उचलत असतानाच कऱ्हाडचा २० वा सर्वाधिकारी लक्ष्मण गणेश जोशी हा येरवड्याच्या तुरुंगात १९३२ च्या सप्टेंबर २९ ला स्वर्गवासी झाला. १९३० साली भेडसगावचे शंकर नारायण देवरुखकर व सांगलीचे शंकर नारायण

जोशी हे जसे तुरुंगाच्या हालअपेष्टानी वारले, तसेच १९३२ च्या तुरुंगालाच कऱ्हाडचे बाबूराव गोपाळ कुष्टे बळी पडले. अशात ऐन चळवळीच्या भरात पुण्याची काही माणसे साताऱ्यात व साताऱची काही माणसे पुण्यात कायदेभंगाचा कार्यक्रम करून शिक्षा पावलीच.

शिवाय कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून काशिनाथराव देशमुख व चिरनेर स्मारक पुनर्रचना सत्याग्रही म्हणून पांडुरंग तात्या पाटील व गोविंदराव पाटील या तांबव्याच्या मंडळींनी कामगिरी केली.

असा क्रम चालला असता १९३३ च्या जुलईमध्ये पुण्यास कॉंग्रेसचे सर्वाधिकारी माधवरावजी अणे यांनी पुढारी–परिषद भरवली, तिला डॉ. आठल्ये, दादासाहेब करंदीकर, आप्पासाहेब आळतेकर, गोसावी, शिराळकर अशी जिल्ह्यातील मंडळी हजर होती. त्या पुढारी परिषदेने सामुदायिक कायदे-भंग बंद केला. तरी "व्हाईट पेपरवर" कऱ्हाडास व्याख्यान द्यावयास ता. १३ जानेवारी १९३४ रोजी आलेले देवगिरीकर व तळेगावकर कायदेभंगाला उत्तेजन देतात म्हणून नोकरशाहीने तुरुंगात खेचलेच. त्याच्याही पुढे १९३४ च्या एप्रिलमध्ये कायदेभंगाची चळवळ बेमुदत थांबविल्याचे महात्माजींनी जाहीर करूनसुद्धा कीर्तनकार डॉ. पटवर्धनाना चाफळहून पकडून आणून नोकरशाहीने वाई येथे स्थानबद्ध करून ठेवले. जून १९३४ पर्यंत नोकरशाहीचा हा खेळ चालला असला तरी १९३३ ऑगस्टमध्येच कॉंग्रेससंस्थांचा बेकायदेशीरपणा उठून पुनर्घटनेला सुरुवात झाली होती. एवढेच नव्हे, सारे जगच आता समाजवादाच्या जमान्याकडे झुकते आहे, अशा वृत्ती-प्रवृत्ती एव्हांना सुरू झाल्या होत्या. राजकारण आणि अर्थकारण यांची गुंफण कोणत्याही देशात आता अपरिहार्य आहे. हे विचारवंताना स्पष्ट झाले होते. दोघांच्या सहकार समन्वयानेच संसदीय राज्य व्यवस्था टिकतील असे वारे वाहूं लागले. (करंदीकर दैनंदिनी २२ सप्टेंबर १९३३). हिंदुस्थानपुरतेच बोलावयाचे तर १९३० च्या लढ्यामुळे परकीय सत्ता व राष्ट्रीय सभा यांच्यामधील वाटाघाटीतून सत्ताक्रांतीचे किरण चमकू लागले व धूर्त माणसे राष्ट्रीय सभेत मोठ्या प्रमाणात घुसू लागली. परिणामतः राष्ट्रीय राजकीय जीवनात शुद्धबुद्धीने पडलेली मंडळी राजकारणापासून हळूहळू अलिप्त होऊ लागून राष्ट्राच्या नव्या उभारणीस पोषक अशी नैतिक व सामाजिक सेवा करू लागली. (डॉ. वा. वि. आठल्ये आत्मवृत्त.)

२२ ; पाठीमागील जपणूक

१९३०–३४ चा शांतिसंग्राम ज्याकरिता झाला ती लोकशाही आणि स्वातंत्र्य यांच्यासंबंधी राष्ट्रीय सभेच्या म्हणून विशिष्ट कल्पना आहेत आणि त्या म्हणजे सर्वधर्मांचे, सर्वपंथांचे व सर्वजातींचे लोक बंधूभावाने वागून त्यांच्या प्रतिनिधींनी लोकसंमतीने व लोकांच्या हिताकरता कारभार करावयाचा आणि करवून घ्यावयाचा. आणि हे सर्व बाहेरील कोणत्याही देशाच्या दडपणा व्यतिरिक्त चालावयाचे. हा भाव व्यक्त करण्याकरिता राष्ट्रीय सभेने एक निशाण तयार केले आहे. कारण काळाच्या धावेबरोबर स्वराज्याची व्यक्तिनिष्ठ कल्पना जाऊन लोकनिष्ठ कल्पना झाली तरी ते राज्य "देवाचे व धर्माचे" पाहिजे, ही कल्पना जशी कायम तशीच निशाणाच्या बाबतीत तत्त्वनिष्ठाही कायमच. अर्थात हा निशाणाचा अभिमान जागृत ठेवावा म्हणून १९२९ साली दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी झेंडावंदनाचा कार्यक्रम करण्याबद्दल राष्ट्रीय सभेने फर्माविले. याप्रमाणे ता. ३० जून रोजी म्हसवड येथे आणि आप्पासाहेब आळतेकर यांचे अध्यक्षतेखाली खटाव येथे बाबूराव इनामदार व दत्तोपंत मळेकर यांनी केलेले झेंडावंदन स्फूर्तीदायक झाले.

ज्या १९२९ च्या राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्याचा ठराव संमत केला, त्या राष्ट्रीयसभेच्या तारखांस म्हणजे २७।२८।२९ डिसेंबर रोजी राष्ट्रीय सभेचा उत्सव सातारा जिल्ह्यात सातारा, इसलामपूर, वाई, तासगांव, कऱ्हाड, मसूर, कुंभारगांव, कोळेवाडी, कोळे येथे उल्हासाचा झाला. कऱ्हाड तालुक्यात तेवढ्यासाठी शिराळकर, आबा धोपाटे, गणपतराव आळतेकर, बाबुराव गोखले, लक्ष्मणराव डोईफोडे, कोल्हापुरे असे फिरले.

यावेळी म्हसवड भागात कान्हेरे आणि तारळे भागात साताऱ्च्या खादीभांडाराचे गोवेकर राष्ट्रीय सभेचा प्रचार करीत होते. इतक्यात राष्ट्रीय सभेचा हुकूम आला की, "पूर्ण स्वराज्य दिन" म्हणून ता. २६ जानेवारी हा दिवस पाळावा. तसा तो कोरेगाव, खटाव, कुरोली, खातगूण, बूध, कोल्हापूर, सांगली, (कूपवाडमाळ) आंबवडे, वडगाव, दुधगाव, अष्टे, इसलामपूर, बागणी, पेठ, शिराळे, आणि विशेष म्हणजे म्हसवड येथे नारायणशास्त्री मराठे, सातारा येथे नाथ घाणेकर यांचे अध्यक्षतेखाली डॉ. आठल्ये, औंधास पं. सातवळेकर, कासेगावास लक्ष्मणराव कुलकर्णी, तासगावी पोंक्षे व मोघे, कोळ्यास डोईफोडे व कऱ्हाड येथे आप्पासाहेब आळतेकर, आबा धोपाटे व मारूलकर, वकील यांनी मोठ्या दमदारीने साजरा केला.

महत्त्वाकांक्षेची झेप घेणाऱ्या तरुणांच्या कर्तबगारीने राष्ट्राची प्रगती होत असते. या तरुणांचे पाय समाजातील दुबळ्या, अज्ञान, बहकलेल्या अगर करून करून भागलेल्यांच्या बुद्धीवादाने ओढू नयेत म्हणून फार जपावे लागते. वरील प्रसंगी दिसलेल्या दमदारीनेच १९३० ते ३४ च्या चळवळीत हे जपणुकीचे काम सातारा जिल्ह्यात झाले.

लोकमान्यांची पुण्यतिथी निष्ठेने साजरी होई; गांधीजयंती निमित्त सातारा येथे स्वदेशी प्रदर्शन १९३० पासून सुरू करण्यात येऊन त्या निमित्ताने लोकमान्य पुण्यतिथी प्रमाणेच अधिकारी स्त्रीपुरुषांची स्वदेशी स्वराज्यावरील स्फूर्तिदायक व्याख्याने होत; सरकारी अवकृपेचा काळ वजा केला, तर मासिक झेंडावंदनेसुद्धा कायम राहिली. सर्व काही झाले, चालले.

"लाहोर काँग्रेस व महाराष्ट्र" या विषयावर ता. ४ फेब्रुवारी व १ मार्च १९३० रोजी गजाननराव केतकर, यांनी तासगांव, कोरेगाव, म्हसवड, येथे दिलेली व्याख्याने; अहमदाबादेच्या तुरुंगातून सुटून आलेल्या खाडील-करानी सांगली, लिंब, सातारा, कऱ्हाड येथे सांगितलेली स्वराज्याची दर्शने; दांडीकडे मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी गेलेल्या महात्माजींना अटक झाल्यावर कासेगावास लक्ष्मणराव कुलकर्णी व गोपाळ विश्वनाथ देशपांडे, कोळ्यास लक्ष्मण डोईफोडे, खटावास स. वा. इनामदार, अष्ट्यास बाबूराव लिमये, वाळव्यास देशिकर वैद्य यांनी सरकारच्या निषेधार्थ भरविलेल्या सभा; ता. २७ जून १९३१ रोजी सातारा येथे अच्युतराव कोल्हटकर यांच्या निधनाच्या निमित्त बाबूराव वैद्य, हकीम, बाबूराव भिडे, सोमण यांची झालेली भाषणे; ता. २२ ऑगस्ट १९३२ रोजी तात्यासाहेब केळकरांचा ६१ वा वाढदिवस साजरा झाला तो; ता. १७ सप्टेंबर शनिवार रोजी आचरेकर वकिलांचे अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा हरिजन संघाने बाबूराव भिडे, भाऊराव पाटील, पी. के. शिवदास यांच्या भाषणानंतर "संयुक्त मतदार संघ व राखीव जागांची" मागणी केली ती; या सर्व गोष्टींनी ओक झाडाच्या मुळाप्रमाणेच स्वराज्याची कल्पनाच जनतेच्या मनात खोल रुजविली.

स्वराज्याच्या तपश्चर्येचा महामंत्र म्हणून स्वदेशी आणि स्वदेशीचे शुद्ध स्वरूप प्रतीक 'खादी' असल्याकारणाने त्या प्रीत्यर्थ बराच प्रयत्न झाला. तारीख १६ फेब्रुवारी १९३० रोजी सोमणांचे येथे जिल्ह्यातील कार्यकर्ते मिळाले आणि काँग्रेसचे पांच हजार सभासद करण्याचे जसे ठरले तसेच ५।५ रुपयांचे शेअर काढून खादीच्या पैशासाठी २५०० रुपयांचे भांडवल उभारावयाचे ठरले. ता. १७ रोजी पाचवड (वाई) येथे गोसावी व सोमण, तर मे च्या तोंडाशी सांगली व कऱ्हाड येथे एकटेच सोमण, जूनच्या पहिल्या आठवड्यात साताऱ्यात

रा. ग. हर्षे व सत्यभामाबाई कुवळेकर आणि विटचास बापूराव बापट-रायरीकर-रानडे यांच्या सहाय्याने आप्पासाहेब आळतेकर, ता. १२ रोजी कवठे (वाई) व ता. १९ जुलई १९३२ रोजी वाई येथे आनंदीबाई जोगळेकर यांनी "परदेशी कापड आणि बहिष्कार" यावर व्याख्याने दिली व खादी विक्रीही केली.

स्वदेशीतून निर्माण होणारे अर्थातच संपूर्ण-स्वयंपूर्ण स्वावलंबी स्वराज्य जनतेचे जनतेने संस्थापावयाचे आणि चालवावयाचे असल्याकारणाने तसे वळण लावण्याकरता "आजन्म सेवकांच्या संस्थे" विषयी सोमणांचे येथे भरलेल्या ता. १६ फेब्रुवारी १९३० च्या सभेत चर्चा झाली होती. पण पुढे चळवळीचा ओघ लोटला तशी ती विरली आणि विखुरली यात अकल्पित काही नाही. तथापी पोहणाराने भरतीच्या लाटेबरोबर आपण वाहवणार अशी खात्री असताही जसा मोहरा साधून इष्ट किनारा गाठण्याची दृष्टी ठेवावी लागते, त्याचप्रमाणे चळवळीचे आणि सरकारी अंमलदारीचे धक्के चपाटे बसत असताही आपल्या ध्येयावरील दृष्टी चळू न देण्याची समाजाच्या कप्तानांनी काळजी घ्यावी लागते. वृद्धांचा अनुभव यावेळी विशेष जोखमीचा असतो. सगळेच शेलारमामा कोंडाणा सर करण्याइतके तकव्याचे नसतात. म्हणून बकवा अगर भपका न करता त्यांनी "भले भले" करीत मिळालेल्या तारेवर आणि आलेल्या लाटेवर ताज्या दमाच्या तरुणाकडून योग्य तीच कसरत करवून घ्यावयाची असते. सातारा जिल्ह्याने हे कर्तव्य पार पाडले आहे.

मुंबई कायदेमंडळात "तुकडे पट्टीचे" बिल १९२९ त आल्यापासून सातारा जिल्ह्यात "लँडलीग्ज" स्थापन झाल्या. ७ सप्टेंबर १९२९ रोजी खटावास वासुदेवराव इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली सोमणांनी स्थापन केलेला शेतकी-संघ किंवा ऑगस्ट १९२९ मध्ये वाईचे माधवराव साठे, गोविंदराव वैद्य, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, यांनी तात्यासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शेतकीसंघ भुईंज येथे स्थापला तो, हेच काय ते नेटाने चालले. १९३० च्या एप्रिल महिन्यात वाईकरांनी आपल्या कार्याला व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. माधवराव साठे, वैशंपायन वकील ग्रामसंघटनेसाठी बाहेर पडले; मारुतीशेठ कढणे, मामा आगाशे, केळकर, शंकरराव कान्हेरे यांनी मद्यपान-निरोधन हाती धरले; गोगटे, रानडे, डॉक्टर महाबळेश्वरकर, डॉ. देशपांडे यांनी खादीप्रचार पत्करला; गणपतराव वैद्य यांनी प्रभातफेरी शिरावर घेतली. १९३१ मध्ये गांधी-आर्यविन तडजोड झाल्यावर साखवळकरांनी एकसळ येथे जो शेतकरी सेवासंघ काढला त्याचा दवाखाना उघडण्याचा समारंभ ता. १७ जून रोजी सोमणांच्या हस्ते झाला. पुढे त्याच सेवाश्रमातर्फे केशवराव पेठकर व रंगनाथ मारुती भोसले हे खेडचाखेडचातून खादी फेरी करू लागले. ता. २ नोव्हेंबर रोजी सुपने येथे आतमाराम पाटलांचे हस्ते बंडोपंत कुलकर्ण्यांनी खादी भांडार

उघडले. ता. २० डिसेंबर रोजी वाई-तालुका-शेतकरी-परिषद केशवराव जेधे यांचे अध्यक्षतेखाली झाली. त्याचप्रमाणे धोम येथे ९ जानेवारी १९३५ रोजी आण्णासाहेब लठ्ठे यांचे अध्यक्षतेखाली त्याच परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. सारा व सेस ही ५० टक्के तरी कमी झाली पाहिजेत असे सरकारास बजावणारी ता. १३ जानेवारी १९३४ रोजी रा. ब. काळे यांचे अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय-सातारा-जिल्हा-रयतसभा इसलामपुरास भरली. मार्चमध्ये बाबूराव भिडे यांनी साताऱ्यातर्फे १५० रु. बिहार भूकंपग्रस्तासाठी राजेंद्रप्रसादांकडे पाठक हॉलमधील सभेनंतर धाडले. जिल्ह्याच्या इतर भागातूनही अशीच मदत राजेंद्रबाबूंकडे गेली. या सर्व प्रसंगी स्वयंनिर्णयाचे स्वदेशीतून निर्माण होणारे स्वराज्य बहुजनसमाजात जीवनाशी एकरूप करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

१९३२ साली ज्यावेळी मॅक्डोनाल्ड साहेबांनी आपले कम्यूनल अवॉर्ड ऊर्फ जाती-निर्णय प्रसिद्ध केला, त्यावेळी अस्पृश्यांकरिता निराळे मतदार संघ निर्माण करून हिंदुस्थानच्या राजकीय छकलात भर टाकण्याचा डाव टाकला. आपल्या प्राणांतिक उपवासाच्या जोरावर ती अनिष्टापत्ती येरवड्याच्या तुरुंगामधून महात्माजींनी सर्व समाजाच्या मनावर ठसविताच १९२१ सालपासून ज्या समाजाला सार्वजनिक अशा राजकीय व सामाजिक प्रसंगीच माणुसकीचे हक्क द्यावयास सुरवात झाली होती, त्याला इतर कोणाही इतकेच खाजगी व सार्वजनिक हक्क देऊन त्याला जो आपल्या राजकीय अस्तित्वाचा विश्वास वाटू लागला आहे त्याचा हिंदी स्वराज्याच्या सेवेला उपयोग झाला पाहिजे, ही जाणीव सर्वत्र पसरली. १९३० च्या चळवळीत तासगाव येथील 'चहाचे दुकान' महारांनी परदेशी बहिष्कारासाठी बंद केले, ते फिरून सुरू केले नाही. अशी त्या समाजाची निष्ठा लोकांना पटली आणि अशा गोष्टींचा परिणाम म्हणून ता. २० सप्टेंबर १९३२ रोजी पुष्कळच ठिकाणी व ओगलेवाडी येथे हरिजनाला मंदीर प्रवेश मिळाला; ता. १ जानेवारी १९३३ रोजी कऱ्हाड येथे श्रीकृष्णा घाटावर बटाण्यांच्या अध्यक्षतेखाली "कवी व वीर राजे बापुसाहेब पाटील" (मुसलमान) यांचे "अस्पृश्यता निवारण" यावर व्याख्यान झाले. ता. १८ जानेवारीस आण्णासाहेब शिंदे यांचे अध्यक्षतेखाली वाई तालुका अस्पृश्यता निवारक परिषद झाली. भावे यांचे श्री शंकराचे देवालय 'हरिजन' करिता खुले झाले. कोळे येथे कऱ्हाड तालुका हरिजन परिषद के. आर. इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली बापूराव तुकाराम हिवाळे यांनी ता. ३० जानेवारी रोजी भरविली; पांडुरंगराव देशपांडे, गोविंदराव जोशी व कांबळे मास्तर हे १९३४ च्या एप्रिल महिन्याचे शेवटच्या आठवड्यात धोम, अरफळ, ओझर्डे, बावधन एकसळ, बोपर्डी येथील हकरिजन वस्तीची पहाणी करीत हिंडले आणि ता. १४ जून रोजी साताऱ्यास रा. ब. काळे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून ठरल्या

प्रमाणे जिल्ह्यात हिंडून तर्कतीर्थांनी हरिजन-फंडही गोळा केला. या शिवायही असहकाराच्या काळापूर्वीपासूनच नाथ घाणेकर, परचुरेशास्त्री, बाबूराव गोखले, पांडुआण्णा शिराळकर, नारायणराव कुलकर्णी, व माधवराव साठे हरिजनांची सेवा करीत राहिले आहेत.

अशा प्रकारे लोकशाही स्वराज्याची जी कल्पना सुशिक्षितातच पन्नास वर्षापूर्वी वावरत होती, तिला आडाण्यातल्या आडाण्यात रुजवून त्यांना त्या कल्पनेशी एकजीवनाने समरस करण्याचा हा पिछाडीचा प्रयत्न चालू असता, १९३० ते ३४ पर्यंत आघाडीवर स्वदेशी स्वराज्याशी समरूप झालेला समाज शांतिसंग्राम करीत होता. तो त्याने तसाच पुढे चालू ठेवला.

त्यावरून दिसून येईल की अनत्याचार व्रताच्या सांगतेकरिता प्रत्येक प्रसंगी म्हणजे शांतिसंग्रामातील चढावाच्या व बचावाच्या प्रसंगी प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून जपले आहे. १८९३ च्या वाळवे येथील छोटया काँग्रेस-मध्ये ह्यूमसाहेबांनी काँग्रेसवर निष्ठा ठेवून वागल्यास शेतकऱ्यांचे कल्याण होईल असे सांगितले होते. १९३०–३४ च्या संग्रामात सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यासुद्धा सर्वांनी काँग्रेसच्या नांवाकरिता सतीचे व्रत घेतले होते. तेव्हा त्यांच्या सुखी संसाराकरिता प्रश्न सोडविण्याची जबाबदारी राष्ट्रीय सभेने घेऊन आपला कार्यक्रम करावयास पाहिजे. ज्या राजकीय तत्त्वज्ञानाने किंवा स्वराज्याने सुखी संसाराचा प्रश्न सुटून राजकीय हक्क गाजविता येतील तेच तत्त्वज्ञान वा स्वराज्य उपयोगाचे, ही जाणीव पुरेपुर पटली असल्याकारणाने राष्ट्रीय सभेने जो ग्रामोद्धाराचा कार्यक्रम हाती घेतला तो सातारा जिल्ह्यातही सुरू झाला. नेमिनाथ आण्णा कत्ते यांनी नाठवड्यास १९३५ च्या ९ जानेवारी पासून ग्रामोन्नती कार्यालय काढले. ते त्याला वाहिलेले होते. सातारा जिल्ह्यातील कर्त्या तरुणांचा जो समाजसत्तावादाकडे कल झुकलेला आढळतो तो, स्वावलंबी स्वदेशी, स्वयंपूर्ण आणि सामान्यासुद्धा सर्वांच्या पुष्टीतुष्टीचे स्वराज्य हिंदुस्था-नला मिळावे, ही अंतरी आच असल्याचाच परिणाम आहे.

स्वावलंबी स्वयंपूर्णतेकडे लक्ष लागणे ही १९३०–३४ च्या शांतिसंग्रामाने दिलेली बोधसंजीवनी असेल ! पण फर्मानी कायद्यानी चेचलेल्या जनतेचा तो मानसिक पीळ आजच्या जाहिरातीच्या जगात काय होय ? तेव्हा काळ्या कायद्यांनी नोकरशाहीने काही आभास उत्पन्न केला असला तरी जनता राष्ट्रीय सभेची हे सातारा जिल्ह्याने रोखठोक सरकारी मापाने दाखवून दिले आहे. मुंबई सरकारात कूपर समाविष्ट झाल्यावर, त्यांच्या जागेकरिता पोट निवडणूक ४ ऑगस्ट १९३४ रोजी मुंबई कौन्सिलकरिता झाली. कूपर पक्षीय चोरेकर साळुंखे या उमेदवाराने निवडणुकीत ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचा कालवा करून सातारा जिल्हा स्कूलबोर्डाचे आपण अध्यक्ष असल्याचा

फायदा असा घेतला की बावीसशे प्राथमिक शिक्षक त्यांच्यासाठी खटपटीला लागले. बेळगांवच्या राजू वीराने सोमण बामणास मते देऊ नका म्हणून प्रचार केला. तरी काँग्रेसचे उमेदवार भाऊसाहेब सोमण विरोधी उमेदवारापेक्षा ३००० मते जादा मिळवून निवडून आले. आणि १४ नोव्हेंबर १९३४ ला असेंब्लीची निवडणूक झाली, तीत काँग्रेसचे उमेदवार जेधे, गाडगीळ यशस्वी झाले. त्यांना सातारा जिल्ह्याने प्रचंड बहुमत देऊन आपले कर्तव्य केले.

अशा तऱ्हेने राष्ट्रीय सभेवर निरतिशय प्रेम करणाऱ्या सातारा जिल्ह्याने ३ फेब्रुवारी ते १० मार्च १९३५ पर्यंत लॉर्ड रे म्युझियम (पुणे) येथे भरणाऱ्या प्रदर्शनात व १६-१७ फेब्रुवारीस भरणाऱ्या कारखानदार परिषदेत भाग घेऊन साताऱ्यास रेल्वेची मागणी केली. (श्रीशाहू) प्रगतीची अशी पावले सातारा जिल्हा टाकीत असता वेदमूर्ती नरसिंहाचार्य गजेंद्रगडकर हे राष्ट्रीय वृत्तीचे आचार्य– ज्यांनी स्वदेशीच्या काळी आणि १९२१ सालीही राष्ट्रीय शाळा चालविण्यास मदत केली ते– ता. २७ जानेवारी १९३५ रोजी वैकुंठास गेले. त्यामुळे आपल्या जिल्ह्याचा एक लौकिकवान वैदिक व राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कर्ता गेला. त्याच प्रमाणे वैद्य वासुदेवशास्त्री कडेगावकर हे पूर्वायुष्यात समर्थ विद्यालयाचे असलेलें विद्यार्थी व पुढे येथे आर्यआंग्लवैद्यक विद्यालयाचे परोपकारी शिक्षक होते. ते १३ मार्च १९३५ रोजी कैलासवासी झाले. त्यांच्याहि मृत्यूने बाणेदार मंडळीतील एक दुवा निखळला आहे. (श्री शाहू १९३५ मार्च) त्यानंतर अगदीच अनपेक्षितपणे **जिल्ह्याचा जनक गेला.** नागपूर येथे २४ एप्रिल रोजी एका वकिलीच्या कामासाठी गेलेले दादासाहेब करंदीकर कैलासवासी झाले (श्री शाहू मे १९३५). ते सारे दुःख गिळून राष्ट्राध्यक्षांचे स्वागत करण्यास कर्तव्य बुद्धीने सातारा हुश्शार झाला!!

सातारा जिल्ह्यात राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष येण्याचा योग खेड्यानिहाय तरी १९३५ पूर्वी आलाच नव्हता. तो योग सौजन्यमूर्ती राजेंद्रप्रसाद राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होताच आला. ता. १४ मेपासून दोन दिवस सातारा जिल्ह्यात राजेंद्रबाबू हिंडले, तेव्हा "संत येती घरा तोचि दिवाळी दसरा" असा निरुपम सोहाळा सातारा जिल्ह्यात झाला. १९३०-३४ चे शांतिसंग्रामात भाग घेतलेल्या सत्याग्रह्यांना खेड्यापाड्यातून राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष राष्ट्रीय संदेश सांगत हिंडताना पाहून जो आनंद झाला व जिल्ह्यानेही आपण राष्ट्रीय सभेविषयी कसे निष्ठ आहोत हे जे दाखविले त्याची आणखी थोडीशी कल्पना अशी:–

आर्थिक हलाखीच्या परिस्थितीत काँग्रेसच्या कार्याकरिता १७६७०१२ ची थैली जिल्ह्याने रजेंद्राना अर्पण केली. ४२३ मैलाच्या प्रवासात पांच मिनिटांचीही खोटी न करता जिल्ह्याने इतक्या आपुलकीने स्वागत केले की "राजा प्रजानुरंजनात्" हे वचन सार्थ वाटले. कोल्हापूर, उंब्रज, सातारा येथे नागरिकांतर्फे

इसलामपूर, वाई येथे म्युनिसिपालिटीचातर्फे, वडूजेस तालुका लोकलबोर्डातर्फे, रेठरे हरणाक्ष येथे को. ऑ. क्रेडिट सोसायटीतर्फे आणि साताऱ्यास नामदेव व हरिजन समाजातर्फे राजेंद्राना मानपत्रे अर्पण करण्यात आली; संस्थानच्या राजधानीस शोभेल असे कोल्हापूरचे स्वागत, बोरगांवच्या चार हजार शेतकऱ्यांची शिस्त, वाळव्याच्या छोट्या काँग्रेसची आठवण देणारा तांबव्याचा थाट, खातगुण येथील खादी भांडाराचे उद्घाटन, कऱ्हाड व कातरखटाव येथील नैसर्गिक साधेपणा आणि साताऱ्याची खानदानी गंभीरता, हे राजेंद्राच्या आदर प्रदर्शनातील विशेष म्हणून नमूद करण्यासारखे होते. तेव्हा कोल्हापूर, बोरगांव, इसलामपूर, रेठरे हरणाक्ष, कऱ्हाड, तांबवे, मसूर, उंब्रज, वाई, सातारा, कोरेगांव, पुसेगाव, बूध, खातगूण, खटाव, वडूज, कातरखटाव, म्हसवड, येथे सभामध्ये व कामेरी, विहे, इंदोली, माहुली येथे नुसतेच संदेश देतांना हजारो हजार लोकांना राजेंद्रांनी हृद्गत सांगितले ते हे की " महाराष्ट्रातील भारत भूमीच्या कणाकणातून ऐतिहासिक तत्त्वे व संघटना भरली आहे, लोकमान्य व देशपूज्य गोखले यांच्या महाराष्ट्रात स्वराज्य प्राप्तीच्या मार्गासंबंधीचा उपदेश करण्याची जरूर आहे असे मला मुळीच वाटत नाही. मी या दौऱ्यानिमित्त खेड्यापाड्यातून व जंगलातून हिंडलो तेव्हा स्वराज्यप्रेमी बंधू भगिनींनी माझा सन्मान केला. यावरून हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतील गावातून स्वराज्य मिळविण्याबद्दलची भावना उत्पन्न झाली आहे हे दिसून येत आहे. काँग्रेसने स्वराज्याचे स्वरूपही निश्चित केले आहे. प्रत्येकास अन्नवस्त्र व घर मिळणे असे त्याचे स्वरूप आहे. हे स्वराज्य समतेचे आहे, व त्यासाठी एकतेची अत्यंत आवश्यकता आहे. त्याखेरीज स्वराज्य मिळणार नाही व मिळाले तरीही टिकणार नाही. स्वार्थ व स्वदेशार्थ एकच समजून भारतात आलेल्या इंग्रजांनी इंग्लंडला स्वराज्य मिळवून दिले आणि आपणही स्वार्थ व स्वदेशार्थ एकच समजू, त्यात भेदभाव करणार नाही तर स्वराज्य खास दूर नाही. या देशातील लोकांचे बुद्धिबलही भरपूर आहे. आमच्या तरुणानी परभाषातून विद्या संपादन करून विदेशी विद्यार्थ्यांवरही मात केली आहे, महायुद्धाचे वेळी हिंदी सैन्याने अपूर्व युद्धनैपुण्य दाखवून जगाकडून वाहवा मिळविली आहे. बुद्धिचातुर्यही विपुल आहे. निरनिराळ्या खेळात क्रीडाप्राविण्य दाखवून जगात उच्च तऱ्हेची खेळाडू वृत्तीही दर्शविली आहे. आमच्या देशातील मजूर बरोबरीने यशस्वी व चढावू वृत्तीने काम करतात म्हणून इतर देशातील लोक त्यांना हाकलून देतात. व्यापाऱ्यातसुद्धा आमचे देशबांधव सरस असून व्यवहार चातुर्यावर ते यशस्वी झाले आहेत. एकंदर हा देश ईश्वराने सुसंपन्न व सुंदर बनवला आहे. परंतु परिस्थितीमुळे, जगाच्या दृष्टीने हा देश पतित ठरून जग त्याकडे बेपर्वाईने व तिरस्कारबुद्धीने बघत आहे. याचे कारण काय ? या देशाला स्वातंत्र्य नाही, स्वराज्य नाही ! "

२३ : स्वदेशी सत्तेला सुरुवात

राजेंद्र प्रसादांच्या दौऱ्यात सातारा जिल्ह्याला एक साक्षात्कार झाला. महात्मा गांधींच्या १९२७ चे दौऱ्याचे वेळी ज्याप्रमाणे नाथ घाणेकर प्रभृती कार्यकर्त्यांनी समर्पण निधी जमविला होता " तैसाच प्रसादांच्या दौऱ्याचे वेळीही आत्मविश्वासाने जमविला. " तोच प्रत्यय जून १९३५ मध्ये भूकंपाने ग्रस्त झालेल्या क्वेटचातील लोकासाठी क्वेट्टादिन पाळून जिल्हाभर मदत गोळा करताना आला. जून १९३५ मध्येच वाई तालुका सहकारी परिषद (५ वी) श्री. वैकुंठलाल मेहता यांचे अध्यक्षतेखाली झाली आणि सतरा हजार बारके बारके जमिनीचे तुकडे शेतकरी वाई तालुक्यात कसत असतात, त्यांनी सहकारी शेतीचा अवलंब कसा करावा असे सहकार महर्षींनी सांगितले. जुलई महिन्याचे अखेरीस दिसून आले की, दीड वर्षात तेराशे खेड्यासाठी हजार दाया सातारा जिल्ह्याने तयार केल्या. या ग्रामोद्धाराच्या वाटचालीची प्रशंसा लंडन टाईम्सने केली. त्यापेक्षाही कऱ्हाडचे विनायक बाळकृष्ण हर्डीकर यांनी एक रेडिओ – सेट तयार करून मुंबई, कलकत्ता, सीलोन, लंडन, मास्को स्टेशने त्यावर ऐकू येऊ लागल्याचा अनुभव ऑगस्टमध्ये जिल्ह्याने घेतला. अशा बहुजिनसी प्रगतीने चाललेल्या कार्यतत्परतेची जोड सहकार समन्वयाने तेजाला चढवावी असे कोणाही विचारवंतास सहजिकच वाटणार. पुण्याच्या गोखले एकॉनमिक इन्स्टिटयूटतर्फे वाई तालुक्यातील शेतकरी–शेती पहाणी जी सप्टेंबर १९३५ अखेर वर्षभर झाली, तिचे उद्‌बोधन घेण्याचे दृष्टीने, जिल्ह्यात सहाजिकच स्वागत झाले आणि कोकरूड (पेटा शिराळे) येथे जूनचे मध्यास तशाच प्रयत्नासाठी व होतकरू शेतकरी मंडळीना तारीख तागायत शेतीचे शास्त्रीयज्ञान देण्याचे आणि जागतिक परिस्थितीबद्दल जागरूक राखण्यासाठी अभ्यासवर्ग चालविण्याचे दृष्टीने जे काँग्रेस मंत्रीमंडळ स्थापन झाले होते, त्याचे सर्वत्र कौतुक व अनुकरण होऊ घातले. शेतकऱ्यांच्या दुःख-विमोचनाचा एक उपाय म्हणून जमीन तारण बँकही रा. ब. काळे, भाऊसाहेब सोमण, आण्णासाहेब कल्याणी प्रभृतींच्या पुढाकाराने स्थापन झाली.

अशा तऱ्हेने जीवन स्वास्थ्याची पाऊलटाक जिल्हा करीत असताच, " अइ मर्दानो, हिंद जवानो, जल्दीलो हतियार। गोरा तुमपर जुल्म करत है, गोलिका बोभार॥ " हे मुसलीम क्रांतीकारक कवीराचे गीत आपल्या चाफेकरी सांप्रदायात मुरविण्याचे कार्य आपल्या ऐन उमेदीत केलेले

व पुढे सातारा न्यू इंग्लीशस्कूलमध्ये आपल्या उस्तादीने दत्तोपंत परांजपे मास्तरांसारखी शिष्यपरंपरा निर्माण करीत राहिलेले दामुआण्णा भिडे गुरुजी यांच्या शष्ठयब्दीचा समारंभ १९३५ चे जुलईमध्ये त्यांच्या चहात्यानी कृतज्ञपणे केला. तो उत्साह कायमचा धर धरु पहात असताच, मग २८ डिसेंबर १९३५ रोजी काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव करण्याची कल्पना राष्ट्रभर दुमदुमू लागली होती. ती सातारा जिल्ह्यानेही शिरसावंद्य मानली. कैसरीकंदनापासून सार्वजनिक कार्यक्षेत्रात नवीनच आलेल्या उमेदीच्या तरुणांना आपल्या जिल्ह्याच्या परंपरेची ओळख व्हावी यादृष्टीने आपल्या जिल्ह्याचा मुख्यत: राजकीय इतिहास काँग्रेसच्या सुवर्ण महोत्सवाचे वेळी तरुणांचे हाती द्यावा, ही कल्पना दृढ होऊन " जागृत सातारा " प्रसिद्ध झाला व महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटीने कांग्रेसच्या कामगिरीबद्दल शाहीराना आवाहन केल्याप्रमाणे इसलामपूरचे दळवी, एकसळचे दादा साखवळकर, सातारचे मारुतराव हळबे यांचे पोवाडे पहिल्या प्रतीचे ठरून त्यांचा सर्वत्र गौरव पूर्वक प्रसार झाला. अशा आनंदात सातारा जिल्ह्याने काँग्रेसचा सुवर्ण महोत्सव दसरा–दिवाळीचे आनंदाने मग सहाजिकच साजरा केला. प्रभातफेऱ्या निघाल्या, मुलांना खाऊ वाटले, पोवाडे झाले, स्त्रियांना हळदीकुंकू व गरिबांना अन्नदान झाले. दीपोत्सव आणि लोकजागृतीसाठी व्याख्यानसत्रेही झाली. त्या सर्वांचे प्रबोधन भाऊसाहेब सोमणांच्या शब्दात असे होते की " कांग्रेसचे कार्य नेटाने व सतत चालावे असे वाटत असल्यास सर्वस्वी यासाठीच वाहिलेली काही माणसे तरी जिल्हानिहाय हवीत. "

या १९३५ सालात पेठ येथे सुशिक्षित चर्मकार परिषद होऊन आपला धंदा चढाओढीच्या बाजारात टिकविण्याच्या उपाय योजनेचा विचार त्या मंडळींनी केला आणि वर्धा हरिजन सेवक संघाकडून सातारा छत्रपती बोर्डिंगला पांचशेचा तनखा आला. या गोष्टीप्रमाणेच हिंदुस्थान सरकारच्या ग्रामोद्धाराचे एककोटी रुपयांपैकी जिल्ह्याला आकरा हजार दोनशे रुपये मिळाले, त्यामुळे " केल्याचे चीज " होऊ लागल्याचा आनंद जिल्ह्यास झाला, पण तो फारकाळ टिकावयाचा नव्हता. नव्या १९३६ सालचा प्रारंभच प्रागतिकाग्रणी रा. ब. काळे व व औंधचे दिवाण वाग्भट देशपांडे यांच्या मृत्यूने धक्का देऊन झाला. एवढेच नव्हे तर, चाफळ जवळील जाळगेवाडी आग लागून भस्मसात झाली !! त्यासाठी जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष नाथ घाणेकरापासून चाफळच्या आण्णासाहेब देशपांड्यांच्या पर्यंत सगळचा समाज हितचिंतकांनी खटपट करून व सरकार दरबारचीही सहानुभूती मिळवून जाळगेवाडीची नवी वसाहत उभारली. " केल्याने होत आहेरे " याचा असा प्रत्यय येऊ लागल्यावर सातारा जिल्हा मर्दुमकीचे सामने पुन: १९३६ च्या मार्चपासून सुरू झाले. येलूरला (वाळवे तो.




रा. ब. विठ्ठल नारायण पाठक




रा. ब. रावजी रामचंद्र काळे



श्री. रघुनाथ पांडुरंग तथा
दादासाहेब करंदीकर



कर्मवीर भाऊराव पाटील



श्री. रा. ग. तथा भाऊसाहेब सोमण



ना. यशवंतराव चव्हाण



रा. ब. कूपरसाहेब

ग्रामोद्धाराची ढाल जूनमध्ये मिळाली. जुलई ३० रोजी प्रा. वा. गो. काळे यांच्या अध्यक्षतेखाली सातारा अर्बन बँक सहकारी परिषद पार पडली, आणि गांधीसप्ताहात सातारा येथे भरलेल्या स्वदेशी बाजाराचा समारोप गंगाधर-रावजी देशपांड्यांनी केला. एवढेच नव्हे तर शंकरराव देव व रावसाहेब पटवर्धन यांचे कांग्रेस निवडणुकीचे प्रचारासाठी सप्टेंबर अखेर दौरे झाले. या योगे वाळवे तालुका शेतकरी परिषदेने अपेक्षा केल्याप्रमाणे अथवा पांडुआण्णा शिराळकरांची षष्ठ्यब्दिपूर्ती झाली (१९३६ मे) त्यावेळी लोकमानस प्रगट झाला. त्याप्रमाणे खेड्यापाड्यांचे आदर्श ठिकठिकाणी निर्माण करण्याची आवश्यकता सर्वांना वाटली. विधायक कार्यक्रमांनी खेड्यांची दैनंदिन सेवा करणारी व खेडूत जीवनाला नुसते राष्ट्रीय व सहकारी नव्हे तर एकजिनसी वळण लावणारी शीलसंपन्न व निरपेक्ष मंडळी असतील तर बहुजन समाजातील मंडळी आघाडीला राहून जी जी आंदोलने उठवतील त्यांना त्यांना सामुहिक असा भरभक्कम पाठिंबा मिळत राहील. गांधी–आर्यविन करारापासून आपली प्रकाश किरणे टाकू लागलेल्या स्वराज्यसूर्याच्या उपासनेसाठी मतमतांतरांच्या प्रामाणिक देशभक्तांचा जास्त जास्त सहकार कसा होत जाईल हे पाहण्यांत राष्ट्रीय बळ-कटीचा कस आहे. हे भाऊसाहेब सोमणांच्या साठीसमारंभाचे निमित्ताने २२ नोव्हेंबर १९३६ रोजी सर्व विचारवन्तानी स्पष्ट केले.

तेव्हा सर्वच मतप्रणाल्या लोकमताचे आनुकूल्य आपल्याकडे अधिक झुकावे म्हणून खटपट करू लागल्या. डॉ. हेडगेवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची दरोबस्ती ठाकठीक १९३७ चे प्रारंभीच सातारा जिल्ह्यात करून राहिले. कायदेमंडळाच्या निवडणूकीच्या निमित्ताने काँग्रेस मत प्रणालींचे श्रेष्ठत्व पं. जवाहरलाल नेहरू कऱ्हाड व सातारा येथे पस्तीसपस्तीस हजारांच्या सभा घेऊन जनमनावर ठसवून राहिले. व तरीही काँग्रेस उमेदवारापैकी पन्नास टक्केचे वर निवडून आले. दे. भ. नरीमन व मानवेंद्र नाथ रॉय यांचे दौरे होऊन काँग्रे-सच्या विधिमंडळातील बहुमतामुळे अधिकार स्वीकाराचा प्रश्न कसा हाताळला व पडताळला पाहिजे, याचे दिग्दर्शन जनतेला झाले. पण लोकमत त्याच्याही पुढे उचल घेऊन १९३७ च्या जानेवारीपासूनच अशी मागणी करू लागले होते की लष्करी भरतीत व लष्करी शिक्षणात महाराष्ट्रीय तरुण कमी, निदानतरी संस्थानिकांनी आपल्या प्रजेतील मंडळी शिकवून आणली पाहिजेत. अगदी लष्क-रातच प्रवेश मिळाल्यासारखी शिस्त, संयम व शील राखून, प्रसंग पडल्यास शूराच्या अहिंसेने देशासाठी सर्वस्व समर्पणाच्या तयारीने शेतकऱ्यासुद्धा आम-जनतेने राहिले पाहिजे, असाच आदेश इंदोली येथील कऱ्हाड तालुका शेतकरी परिषदेचे अध्यक्षपदावरून १४ मे १९३७ रोजी लक्ष्मणराव कोळसे पाटील (नगर) यांनी दिला. त्या सत्याग्रही लढ्याचे आदेशाचे प्रात्यक्षिक पुण्यास

सोन्या-मारुती प्रकरणी स्वाभिमान संरक्षणार्थ चालले असता साताऱ्च्या (शिव-) रामभाऊ मोडकांनी त्यात धीटपणाने भागही घेतला. यासर्व लोकवृत्ती प्रवृत्तींचा सहकार समन्वय करावा अशी एक आकांक्षा अल्प प्रमाणात कऱ्हाडास भरलेल्या शैव-लिंगायत परिषदेत, पण व्यापकपणे वुध येथे झालेल्या रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील सातारा जिल्हा परिषदेत प्रभाविपणे प्रगट झाली. तिला साकार करण्याचा प्रयत्न करणेसाठी शिवराज्याभिषेकाचे शुभ मुहूर्तावर बाबूराव गोखले यांनी सातारा जिल्हा लोक सेवा संघाचे कार्य सुरु केले. शेणोली येथे भरलेल्या शेतकरी परिषदेत आणि वारणाखोऱ्यात झालेल्या आण्णासाहेब दास्ताने व शंकरराव देव यांच्या दौऱ्यात "शेतकरी सुखी तर जग सुखी" याचा जसा उद्घोष झाला; तसाच म. गांधींच्या ग्रामोद्धार कार्यासारखाच लोक सेवा संघाच्या कार्याचाही उहापोह होऊन आदर झाला. वाईच्या स्वदेशी प्रदर्शनात लोकमान्यांचा राष्ट्रीय पीळ व्यवहार सुलभ कसा करावा याचे ठाम व ठास मार्गदर्शनही झाले व जगात शांतियुग निर्माण व्हावे म्हणून शूरांच्या अहिंसेच्या सार्थकतेकरता "जग सार्वजनिक शस्त्र संन्यास कसा करू शकेल ?" या डॉ. आठल्ये यांच्या प्रबंधाचे अमेरिकेत कौतुक झाले.

दरम्यान राजकीय वातावरणात काही कमी बदल झाला नव्हता. २ ऑगस्ट १९३५ रोजी हिंदुस्थानला "राज्यकारभारात अधिक हक्क देणारा" कायदा ब्रिटिश पार्लमेंटात पास झाला. सायमन कमिशन व तीनहि गोलमेज परिषदा यांच्या आढळावरून त्या कायद्यान्वये मतदानाचा हक्क लोकसंख्येच्या १४% व युवक प्रौढांच्या २७% लोकांना मिळाला. संस्थानिक घेऊन मध्यवर्ती सत्ता संघ राज्याची असली तरी ज्या द्विदल पद्धतीचा बोजवारा प्रांतिक कारभारात झाला होता तोच मध्यवर्ती कारभारात पुन्हा स्वीकारल्याने संघराज्याची मध्यवर्ती सत्ता लेचीपेचीच ठरणार होती, म्हणून सदर सुधारणा काँग्रेसला पसंत पडल्या नाहीत. सन १९३६ च्या ऑगस्टमध्ये काँग्रेसने आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध करून राष्ट्रीय पुनर्घटना करण्यासाठी ब्रिटिश नियंत्रण जाऊन संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे; ब्रिटिश साम्राज्यवाद्यानी सुरू केलेल्या कोणत्याही लढाईत भाग घ्यावयाचा नाही; नवीन घटनेशी लढून लोकांची शक्ति वाढवून स्वातंत्र्याला पोषक असे वातावरण निर्माण करण्यासाठी कायदेमंडळात व कायदेमंडळाबाहेर झटावयाचे, असा राष्ट्रास आदेश दिला होता. कायदेमंडळाच्या नव्या निवडणूकी १९३७ च्या फेब्रुवारीत होऊन एप्रिलपासून सुधारणांचा प्रत्यक्ष अंमल प्रांतिक राज्य कारभारात सुरू झाला. तथापि राज्यपालांनी आपला हुकमती अधिकार वापरण्याच्या मुद्यावर एवढे मतभेद झाले की, तो अधिकार सुलतानी वृत्तीने वापरण्यात आला, तर प्रांतिक स्वायत्तता हे एक टोपण नांव ठरते, असे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे तीन एक महिने काही प्रांतात हंगामी मंत्रिमंडळ

(अल्प संख्यांकांची) कामे करू लागली. मुंबईतही तसे होऊन सातारचे सर कूपर मुख्यमंत्री झाले व त्यांनी सावरकरावरील बंधने काढून घेण्यासारखी आणि कऱ्हाड येथील कृष्णा पुलासारखी चिरपरिणामी अशी थोडी फार कामगिरीही केली. पण लोकमतांचा पाठिंबा घेऊन निवडून आलेल्या बहुमतधारी काँग्रेस पक्षाला कारभारावेगळे ठेवणे हे लोकशाहीच्या मूळ तत्त्वप्रणालीलाच बाधक असल्यामुळे अगदी अपरिहार्यच होईल तेवढा राज्यपालानी हुकमती अधिकार वापरावयाचे आश्वासन मिळून ७ जुलई १९३७ रोजी काँग्रेसची मंत्रीमंडळे आठ प्रांतात स्थापन झाली व १९३७ चे लोकमान्य पुण्यतिथीस त्यांनी अधिकार स्वीकार केला.

अशा तऱ्हेने राजवट लोकपक्षीय झाली तरी तिच्याशी समरस होण्याचे जमणे हे शेवाळलेल्या परकीय सत्तेखालील मनोवृत्तींचे 'झेपणे' नव्हे असा प्रत्यय यावयास चुकला नाही. मुंबई राज्याचे मुख्य मंत्री व शिक्षणमंत्री म्हणून नामदार बाळासाहेब खेर हे सातारा जिल्ह्यात टिळक हायस्कूलच्या संमेलनास अध्यक्ष म्हणून आले असता, त्या बाळ गंगाधर खेरांचे स्वागत जनतेने बाळ गंगाधर टिळकांच्या प्रतिष्ठेने केले. तेव्हा भारावून जाऊन नामदार खेर "जनता जनार्दनाला" "नामसादृष्येन वंचितोऽसि ॥" असे विनयोचित सांगून लोकमान्यांच्या अगाध विद्वत्तेचे, कर्तृत्वाचे गुणगान करून देशसेवेचे चैतन्य निर्माण करून राहिले. त्याच दिवशी सायंकाळी सातारच्या कन्याशाळेत मायभगिनींशी राष्ट्रीय वृत्तीच्या गृहशिक्षण संगोपनाची गुपिते ना. खेर बोलले. शेवटी सातारा हायस्कूलमध्ये शिरताना जेव्हा का त्यानी "गॉड सेव्ह दि किंग" असे प्रवेश-द्वारी गीत ऐकले आणि भाऊसाहेब सोमण आणि रँ. महाजनी यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या मागे बाकावर बसवलेले त्यांनी पाहिले, तेव्हा संमेलनाचे अध्यक्ष म्हणून भाषण करतांना त्यांनी विद्यार्थ्यांच्या कला कुशलतेचे कौतुक केले, पण पारतंत्र्याने पिचलेल्या अधिकारधुंद मनोवृत्तीवर सणसणीत कोरडे ओढण्यास कमी केले नाही. गृहमंत्री ना. मुनशी यांनी या गोष्टीची दखल घेऊन पारतंत्र्य परायण मनोवृत्तीच्या लोकास चांगला धडा दिला.

२४ : लोकसेवासंघ

कित्येक वर्षांपासून लोकांचे लक्ष खेड्यांच्या उद्धाराकडे होते. त्या कार्याला पद्धतशीर आरंभ केल्याशिवाय ना. बाळासाहेब खेरांनी प्रांतिक ग्राम-सुधारणा मंडळापुढे म्हटल्याप्रमाणे " स्वराज्य याचा अर्थ स्वतःच्या संसाराची व आपल्या देशाच्या कारभाराची जबाबदारी आपल्या वाट्याप्रमाणे स्वतःवर घेऊन तो सुरळीत करणे होय. " असा असल्याकारणाने, भारतात नांदावयाची लोकशाही यशस्वी करण्यासाठी जबाबदारी शिरावर घेऊन ती पार पाडण्यास ग्रामीण जनतेस समर्थ केले पाहिजे. ही तळमळ भाऊसाहेब सोमणांना प्रथम-पासूनच असल्याकारणाने १९२७ साली ग्रामसेवासंघ या लहानशा संस्थेची स्थापना त्यांनी केली. त्या कार्याची मुख्य धुरा दत्तात्रय वासुदेव परचुरे शास्त्री यांनी आपल्या शिरावर घेतली. या संस्थेच्या कार्यवाहीचे काम गोपाळ वासुदेव जोशी व दत्तात्रय कृष्ण गोसावी या उभयतांनी पत्करले. सातारा तालुक्यातील डोंगराळ मुलुखासुद्धा असणाऱ्या दीडशेच्यावर असलेल्या प्रत्येक खेड्यात शास्त्रीबुवांनी पदयात्रा केली. प्रत्यक्ष पहाणीने व जाणकारांशी केलेल्या विचार-विनिमयाने मिळेल तितकी सर्व माहिती शास्त्रीबुवांनी मिळविली. वेळ प्रसंगी उपासतापास काढून व कष्ट, गैरसोयीची पर्वा न करता मिळवलेल्या माहितीच्या अधारे " खेड्यातील यात्रा " हे पुस्तक १९२९ साली शास्त्रीबुवांनी लिहिले. त्यातून ज्या सार्वत्रिक तक्रारी आढळून आल्या त्यापैकी काहींचा परिहार सरकारी मार्गाने सोमण व त्यांचे सहकारी कार्यवाह यांनी केला. पुढे १९३० साली पहिला सत्याग्रह–संग्राम आल्याने ग्रामसेवा संघाचे काम स्थगित झाले.

सत्याग्रह संग्रामाची समाप्ती गांधी–आर्यविन कराराने ५ मार्च १९३१ ला झाल्यावर मे १९३१ मध्ये मसूरास सातारा जिल्हा राजकीय परिषदेच्या अधि-वेशनात लोकसेवा–संघाची कल्पना चाफळचे विष्णु आण्णा देशपांडे आणि कऱ्हाडचे पांडुआण्णा शिराळकर या उभयतांनी सोमणांचे सल्ल्याने एका ठरावाचे रूपाने मान्य करून घेतली. तथापि वर्षाभरातच १९३२ चे आरंभी पुन्हा सत्याग्रहाचा लढा देशात सुरू झाल्यामुळे तो सर्व शांत शांत झाल्यावर १९३६ साली पांडुआण्णा शिराळकरांनी एकट्याची तीस हजार रुपयांची देणगी दिली व पूर्वीच दादासाहेब करंदीकरांनी हजार रुपये दिले होते, त्यामुळे उत्तेजना येऊन १९३६ च्या नोव्हेंबरमध्ये सोमणांच्या साठीसमारंभाचे वेळी लोकांनी त्यांना पाच हजार रुपयांची थैली लोक सेवा संघाचे कार्यास अर्पण केली. त्यात

सोमणानी आपले पांच हजार घातले. मग मात्र श्रीशिवराज्याभिषेकाच्या शुभ मुहूर्तापासून (२१ जून १९३७) लोकसेवा संघाचा प्रत्यक्ष उपक्रम कऱ्हाडचे सुप्रसिद्ध लोकसेवक पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबूराव गोखले यांनी स्वतः कार्याची जबाबदारी अंगावर घेतल्याने एक तऱ्हेच्या उठावाने व उंचीने झाला. त्याच सालच्या टिळक पुण्यतिथीपासून वाईचे भय्याशास्त्री वाटवे हेही गोखल्यांचे जोडीने काम करण्यास आले. १५ ऑगस्ट १९३७ पासून दहिवडीचे धोंडिराम नारायण काशीद हे कार्यकर्ते वरील उभयतांना मिळाले. लोकसेवा संघाच्या सेक्रेटरीपदाची जबाबदारी द. कृ. गोसावी यांनी टिळक पुण्यतिथी-पासून हौसेने पत्करली होतीच. कऱ्हाड, कोरेगाव, खटाव, खानापूर, जावली, तासगांव, पाटण, माण, वाळवे आणि सातारा अशा जिल्ह्याच्या बहुतेक सर्व तालुक्यातून तीनशे गांवाना कार्यकर्त्यांनी फिरून समक्ष भेटी दिल्या आणि आवश्यक तितकाच वेळ प्रत्येक खेड्यामध्ये राहून गावातील सर्व पक्षीय व सर्व छटांच्या मंडळीना भेटून-बोलून गावाच्या नानाविध अडचणी जंगल, पाट-बंधारे, शिक्षण, हरीजनांच्या गैरसोयी, पिण्याचे पाणी, रस्ते, कर्जबाजारीपणा, टपालाची व वाहतुकीची गैरव्यवस्था, नदीवरील नावा, अधिकाऱ्यांची बेफिकिरी, गुंडांचा उपद्रव इत्यादी तक्रारी सर्व कार्यकर्त्यांनी तपशिलवार समजाऊन घेतल्या; आणि त्यापैकी सर्वांचा परिहार, सरकारदरबारी प्रयत्न करून केला.

वरील तीन कार्यकर्त्यांचे कामास पूरक म्हणून गोटखिंडीचे नारायणराव जोशी, शिराळयाचे नेमिनाथ आण्णा कत्ते व रामचंद्र महादेव जोशी, तासगावचे चिंतोपंत काळे आणि नागठाण्याचे श्रीपाद हरी जोशी या कार्यकर्त्यांनी आपले इतर व्यवसाय सांभाळून आपापल्या परिसरातील खेड्यात लोकसेवा संघाचे वतीने विधायक कार्य सुरू केले. अशा तऱ्हेने संघाने एक ऑगस्ट १९३८ पर्यंत काम केल्यावर दुसऱ्या वर्षी अधिक भरीव कार्य व्हावे म्हणून कोरेगाव तालुक्या-तील चिमणगांवी गोखले व काशिद जाऊन राहिले. मधून मधून सोमण, शिराळकर, गोसावी, गणपतराव आळतेकर चिमणगावास भेटी देत. गोखले-काशीद यांचे चार महिन्याचे कार्य सातत्याने चालून चिमणगावची सर्व बाजूने सेवा व निरीक्षण झाले. गावची स्वच्छता गावाच्या सहकार्याने घडवून आणली. मल-विसर्जनाची व गात्र स्वच्छतेची अमंगळ पद्धत अडाणी लोकांमध्ये होती ती स्वतः गोखल्यांच्या चिकाटीने बदलून टाकण्यात यश मिळविले. ओढ्यातील पिण्याचे पाण्याची स्वच्छताही गोखल्यांची दक्षता राखू शकली. अशा प्राथमिक कामापासून गावातील रस्ते सुधारण्यापर्यंत लोकसेवा-संघाने चिमणगांवचे पुढारी शंकरराव व रामराव पाटील यांचे बहुमोल. सहाय्य-सहानुभूती मिळवली. गावाचे लोक-शिक्षणासाठी ज्ञानप्रकाश, केसरी, समर्थ, ऐक्य, त्रिकाळ इत्यादी वृत्तपत्रे कार्यकर्ते गावकऱ्यांना वाचून दाखवीत. दासबोधावर गोखले प्रवचन

करीत, तर काशीद कीर्तने करीत. नैतिक उंची लोकांची वाढावी म्हणून, तरुण पिढीला व्यवसायाची आवड लागावी म्हणून, ब्राह्मणापासून हरिजनापर्यंत खेळांचे व नमस्कारांचे सामने घडवून आणण्यात व विद्यार्थ्यांना अभ्यासात मार्गदर्शन करण्यातही गोखले, काशीद लक्ष घालीत. रामोशी व हरिजन यांच्यावर अन्यायाने बसलेल्या हजेरी संपूर्ण पूर्व चौकशी करून रद्द करून घेण्याचे कामातही गोखले-काशीद यांनी यश मिळविले. चिमणगावातील शेतीच्या जमाखर्चाचा पद्धतशीर तक्ता बारीक सारीक माहितीसह गोखल्यांनी प्रसिद्ध केला. वरील स्वरूपाचे काम पुरे करून तासगाव, पाटण, वाळवे, शिराळे या भागात मग कार्यकर्ते गेले. तासगाव तालुक्यातील ४९ पैकी ४० गावात प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी व आणेवारी सरकारी नियमाप्रमाणे प्रत्यक्ष करून गावकऱ्यांना संघाचे मंडळीनी शिकविली. पाटण, वाळवे, शिराळे भागात लोकांचे जीवित, वित्त आणि अब्रू धोक्यात असल्याचे कार्यकर्त्यास आढळून आले. वाटमाऱ्या, जळिते, चोऱ्या, स्त्रियांच्या अब्रूवर घाला, असा प्रकार म्हणजे दुसऱ्या वर्षाचे इतिवृत्तात संघाने दाखल केल्याप्रमाणे "राज्य इंग्रजांचे, कारभार काँग्रेसचा पण अंमल गुंडांचा" असा बहुत प्रकार दिसून आला. त्या नंतर परळी खोऱ्यातील वेणेगाव अकस्मात सर्व जळून गेल्याने, त्या गावच्या स्थिरस्थावरतेसाठी संघाने प्रयत्न केले. मुंबई राज्यात पहिल्या काँग्रेस मंत्रिमंडळाचा कारभार चालू असल्याने दारुबंदीची हवा चालू झाली होती. सातारा जिल्ह्यात दारूबंदी व्हावी म्हणून आवश्यक ती आकडेवार माहिती संघाचे कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध केली. यासाठी गोविंदराव श्रोत्री तथा ब्रह्मानंद स्वामी यांनी देऊन ठेवलेल्या हजार रुपयांच्या देणगीचा उपयोग झाला. कृष्णा कॅनाल बागाईतदार संघाचे सल्लागार पूर्वी भाऊसाहेब सोमण होते, त्यांच्या जागी १९३७ पासूनच बाबूराव गोखले काम पाहू लागले ते थेट १९५३ पर्यंत. या शिवाय जिल्ह्यातील साठ गांवातील कर्जबाजारीचा अभ्यास गोखले प्रभृती कार्यकर्त्यांनी करून तो सरकारचे आणि लोकांचे निदर्शनास आणला. ३१ जुलै १९३९ अखेर अशाप्रकारे झालेल्या संघाच्या कामाची प्रशंसा पुण्याच्या "सर्व्हंट ऑफ इंडिया" (१७–८–३९), 'सकाळ' (९–८–३९) इत्यादि पत्रांनी करून संघाला "संशोधक संस्थे" चा दर्जा सेवासंस्थेच्या दर्जासह असल्याचे नमूद केले.

संघकार्याच्या तिसऱ्या वर्षात जिल्ह्याचे पूर्व भागात दुष्काळाची चिन्हे दिसू लागल्याने, कार्यकर्ते तिकडे गेले. माण तालुक्यात काशीद व त्यांचे सहकारी पिसाळ यांनी पहाणी केली. कोरेगाव, लोणंद टापूत नवे कार्यकर्ते ए. एस. काझी हे हिंडले, खानापूर तालुका गोखले यांनी निरीक्षिला. सगळ्यांची निरीक्षणे सरकारकडे पाठवून दुष्काळग्रस्तांना मदत मिळविण्यात व देण्यात आली.

त्यानंतर पावसाळ्यात इसलामपूर येथे आचार्य जावडेकर यांच्याजवळ कार्यकर्ते समाजशास्त्र, अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान यांचे धडे घेण्यासाठी राहिले. तेथील नानासाहेब रानडे व एस. आर. कुलकर्णी हे वकीलही व्यवहार उपयोगी कायद्यांची माहिती कार्यकर्त्यांना देत. पुढे संघाचे कार्यकर्ते परळी खोऱ्यात जाऊन वहात्तर गावांचे खोल निरीक्षण करून बसले. या भागात जनतेचे भेसूर दारिद्रय पाहून कार्यकर्त्यांनी स्वच्छता, व्यायामाची आवड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नव्या शाळांची ठिकठिकाणी उभारणी, सावकारी वादात तडजोड, आडाना राहटांची तरतूद, नारूंच्या उपद्रवाचा नायनाट इत्यादि बाबतीत कमालीचे साहाय्य केले. तेथील अक्षर-शत्रुत्त्वाचा फायदा घेऊन साधी समाचार पत्रे लिहिण्यापासून जनतेची अर्थलूट करणाऱ्यांना संघाच्या कार्यकर्त्यांनी आठवडयाच्या बाजारात लेखन-सेवा देऊन चांगलाच धडा दिला. या काळात साताऱ्चे डॉ आठल्ये, आयुर्वेदाचार्य वेणी माधवशास्त्री जोशी, डॉ. कोल्हटकर, डॉ. पटवर्धन यांनी कार्यकर्त्यांना उपयुक्त वैद्यकाची सेवासुफल माहिती दिली. जून १९४० पासून एक वर्षाहून अधिक काळ तांबव्याचे काशिनाथ राजाराम देशमुख यांनी परळी भागात काम केले. त्यानंतर तांबवे (ता. कराड) येथे व परिसरात स्वावलंबन कार्यालय सुरू करून महामारीने गांजलेल्या लोकापैकी ९५ टक्के लोकांचे जीव त्यांनी वाचवले, आणि सूत कातण्याची कला लोकास शिकवली. वैयक्तिक सत्याग्रहाचे वेळी त्या कलेचा फार उपयोग कार्यकर्त्यांना सत्याग्रहात भाग घेण्यास झाला. अतिवृष्टीमुळे संघाचे निदर्शनास जेव्हा जिल्ह्यातील ओला दुष्काळ आला तेव्हा दुष्काळपीडिताना जीवनासाठी संघाने बहुमोल साहाय्य केले. अशा तऱ्हेने चाललेल्या व चालत आलेल्या लोकसेवेबद्दल ६ ऑगस्ट १९३९ च्या वार्षिक सभेत प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांनी लोकसेवा संघास धन्यवादच धन्यवाद दिले. त्या वार्षिक सभेचे अध्यक्ष मुंबई कांग्रेस मंत्रिमंडळाचे अर्थमंत्री आण्णासाहेब लठ्ठे होते. ते तर म्हणाले की " आज देशात उथळ राजकारणाला महापूर आला आहे, अजाण शेतकऱ्याचे आगोदरच कष्टमय झालेले जीवन; त्या वर्गाच्या खऱ्या अडचणी दूर करून त्याला स्वाभिमानाने जगवण्याचा प्रयत्न पराकाष्ठेने होणे जरूर आहे. अशावेळी हा संघ निघाला आहे. त्याला सर्व पक्षीय सहानुभूती आहे. रयतेला सुधारणेबद्दल व हक्काबद्दल जागरूक करण्याचे कार्य सातारा जिल्हा लोकसेवक संघ करीत आहे. म्हणून मी त्यास धन्यवाद देतो. "

यानंतर वैयक्तिक सत्याग्रहाचा छोटा लढा आणि "छोडो हिंदुस्थान"ची प्रचंड चळवळ यात संघाचे पुढारी सोमण, शिराळकर आणि सर्व कार्यकर्ते गुंतल्यामुळे सर्व लढे संपवून जुलै १९४६ रोजी तासगाव तालुक्यातील नागठाणे येथील कायेकर्ते श्रीपाद हरी आपले कार्य जून १९४९ अखेर करीत राहिले.

नंतर वाईचे सुप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ वामन रामचंद्र गाडगीळ ओझर्डे येथे संघाचे वतीने आपला सहकार शेतीचा प्रयोग एप्रिल १९५० पासून मार्च १९५१ अखेर करीत राहिले, तरी त्यात अपेक्षित यश येऊ शकले नाही. त्यानंतर सातारा तालुक्यात महागाव येथे नारायण बाळकृष्ण घुटे यांनी दीड वर्ष संघाचे वतीने सर्वांगीण लोकसेवा केली. (आक्टोबर १९५० ते १५ मे १९५२).

याननंतर लोकसेवा संघाचे कामाची दिशा बदलण्यात आली. लोकसेवासंघ करीत आलेले व असलेले कार्य भारत सरकारच्या आणि मुंबई सरकारच्या विकास योजनांनी हाती घेतल्यामुळे संघाची चिमुकली शक्ती समाजातील बौद्धिक व नैतिक उंची वाढविण्याचे कामी लावणे हेच संघास योग्य वाटले. सुप्रसिद्ध शाहीर व ग्रामिणसेवानिपुण कृष्णाजी माधव ऊर्फ दादा साखवळकर यांनी नोहेंबर १९५२ पासून जून १९५५ अखेर कोरेगाव येथे प्रौढ विद्यार्थ्यात मिळून मिसळून राहून उच्चतर संस्कृती देण्याचा प्रयत्न केला. तसाच प्रयत्न कऱ्हाड, पाटण तालुक्यात बाबूराव गोखलेही करत होते. तसे करताना भोवतालच्या ठळक शाळांसही भेटी देत. देशातील तरुणांना योग्य मार्गदर्शन करून निष्ठावंत, त्यागी, निरलस वृत्तीचे, आजीव देशहितार्थ झटणारे कार्यकर्ते भारतात कसे निर्माण होतील हा अत्यंत जिव्हाळ्याचा व निकडीचा प्रश्न लोकसेवा संघाने आणि त्याच्या निवृत्त सभासदांनीही हाती घेतला. सरकारने विकास योजना सुरू केल्यामुळे पांडुआण्णा शिराळकरांनी लोकसेवा संघाकडील आपला तीस हजारांचा दाननिधी पुणे विद्यापीठाला समर्पण केला. तसा लोकसेवा संघाने दादासाहेब करंदीकरांचे स्मरणार्थ जमविलेला बहुमोल ग्रंथसंग्रह त्याच विद्यापीठाचे स्वाधीन केला. त्यानंतर निष्ठेने व झीज सोसून लोकसेवा व लोक नेतृत्त्व करू शकणारे तरुण उमेदीच्या विद्यार्थ्यातून कसे निर्माण होतील याकडे संघाने लक्ष पुरविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दत्तोपंत परांजपे यांच्यासारख्या सिद्धहस्त शिक्षकाचे देखरेखी खाली, दैनंदिन जीवनिका विद्यार्थ्यांची चालावी असा एक आराखडाही भाऊसाहेब सोमणांचे मार्गदर्शनाखाली संघाने तयार केला व नामवंत शिक्षण संस्थाकडे अभिप्रायार्थ पाठविला. त्यातील हेतू व धोरण सर्वांना मान्य झाले तरी, शिक्षण क्षेत्रातील सरकारी शिस्त, अभ्यासक्रमांच्या तऱ्हा आणि सामाजिकातील व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना यामुळे गुरुकुलासारखी असलेली संघाची कल्पना व्यवहारशुद्ध होईल असा रंग दिसेना. तेव्हा विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाचे स्वातंत्र्य शिक्षणसंस्था व पालक यांजकडे सोपवावे आणि समाज सन्मुख होऊन नेतृत्त्व करणारे, शिक्षण संस्थातील अभ्यासक्रमात तरबेज असणारे, शिस्त आणि शील यांच्या कसास उतरणारे, शारीरिक बळकटी सांभाळणारे व जगाच्या सर्वसामान्य ज्ञानासंबंधी तारीखतागायत राहणारे विद्यार्थ्यांना संघाजवळील पुंजीचा उपयोग पारितोषके देऊन प्रयोग करीत

रहावे असा मार्ग संघाने आखला, तो जिल्ह्यातील अनुभवसिद्ध पाच शिक्षण संस्थांनी पसंत केला. तो प्रयोग १९६० पासून चालू असून त्याच्या परिपक्व फलश्रुतीतून पुढील विकास होत जाणार आहे.

२५ : विवेकी कर्तव्याचे मतस्वातंत्र्य

लोकसेवा संघामार्फत जी सेवा चालू होती ती गांधी आर्यविन करारापासून राष्ट्राच्या सर्वांगीण आणि समन्वयी विकास-वाढीची जबाबदारी विचारवन्त समाजसेवकांनी उचलावयास हवी होती, त्या दृष्टीने चालली होती. त्याचबरोबर पूर्वी पासून चालत आलेल्या प्रमाणे लोक आपआपल्या परी सार्वजनिक कार्ये करीतच होते. १९२७ सालापासून सातारा जिल्हा स्वदेशी प्रदर्शने भरत आली होती, त्याप्रमाणे ती पसतीसच्या सुधारणा कायद्यानंतर वाई (१९३७) मसूर (१९३८), रहिमतपूर (१९४०) येथे भरण्यास चुकली नाहीत. तसेच १९३८ साली मसूरला मातंग परिषद भरली ती नामदार मुरारजी देसाई यांचा जिल्हाभर दौरा होऊन गेल्यावर भरली. हरिजन बंधूंच्या शिक्षण सुधारणेसंबंधी जी जी मदत हवी असेल ती ती शक्य तो पूर्णत्वाने देण्याचा दिलासा मातबर पुढारी त्या परिषदेत द्यावयास चुकले नाहीत. कऱ्हाडला वैद्य-हकीम परिषद मुंबईचे आयुर्वेदाचार्य साठे यांचे अध्यक्षतेखाली फेब्रुवारीत भरली असता. स्वदेशी सरकारनेसुद्धा धंद्याला शिस्त व पात्रता सिद्धि लावण्याचा प्रयत्न केला तरी खलबत्यापासून नाडापुडीपर्यंत उगाच हात घालू नये, असाच सूर आयौषधींच्या जाणकारांनी व अभिमान्यांनी तेथे काढला. कारण तो संशोधक बुद्धीच्या स्वतंत्र अक्कल हुशारीने करण्याचा धंदा आहे. गाताडवाडी येथे शेतकरी परिषद भरून मीठ तयार करण्याचे वाफे तयार करण्यात आले, ते देखील लोकांचे लोकांना स्वतःच्या पायावर शक्यतो बारिक सारिक गोष्टीपासून उभे राहता यावे म्हणून ! त्याच धोरणाने आरळे येथील मे (१९३८) शिराळापेटा राजकीय परिषद भरली. विट्याची राजकीय परिषद तरी दुसरे तिसरे कोठील धोरण धरणार ? आणि मे १९३८ मध्ये सातारा येथे वीर नरिमन यांचे अध्यक्षतेखाली भरलेली सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद, तासगाव येथील तालुका राजकीय परिषदेप्रमाणेच लढाऊ वृत्तीने व स्वावलंबाने स्वराज्य संपन्न होण्याचा व कर्तृत्वाने जगाबरोबर राहण्याचा निश्चय करून चुकली. मग सप्टेंबरमध्ये चाफळ येथे बाबूराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली

पाटण तालुका शेतकरी परिषद तरी समर्थांच्या रामासमोर दुसरा कसला निश्चय करणार ?

अशा आशामय वातावरणात जिल्हा प्रगतीची पावले टाकीत असताच, १९३८ च्या नोव्हेंबरमध्ये शेणोली येथील चौकातील राष्ट्रीय झेंडा ब्रिटिश सरकारच्या बगलबच्यांनी उडवून लावला, त्यामुळे कांग्रेस मंत्रिमंडळाकडे एकाबाजूने धाव घेतली, तरी दुसऱ्या बाजूने संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय सत्‌गत् नाही हे लोकांच्या मनाने ठाम घेतले. काँग्रेस मंत्रिमंडळाने शेतकरी स्वकष्टार्जित उत्पादनाने स्वावलंबी व्हावा म्हणून "कूळ कायदा" करू घातला तेव्हा जमीनदारांचा मोर्चा आमदार शिराळकरावर (कराड) व नामदार सोमणावर (सातारा) जाण्यास चुकला नाही; इसलामपूरास आमदार शिवरामपंत करंदीकर (त्रिकाळ-कार) यांच्या अध्यक्षतेखाली जमीनदार संघाने कुळ कायदा विरोधी परिषद घेतली आणि तरीही तितक्याच जोराने कऱ्हाडच्या कृष्णा घाटावर आमदार आत्माराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा शेतकरी परिषदेने कुळकायद्यास शंभरटक्के पाठिंबा असल्याचा ठराव संमत केला. शेतकऱ्यातील अशा जागृती मुळेच या वर्षापासून सातारा जिल्हा लोकलबोर्ड पूर्णपणे काँग्रेसचे निवडून आले. त्यांना मसूरच्या स्वदेशी प्रदर्शनाचे निमित्ताने झालेले नामदार नूरी, नामदार मावळंकर यांचे दौरे प्रोत्साहक ठरले होते.

त्या सर्वांवर मात करून कनिष्ठ-वरिष्ठ समाजातील तरुणांचा "वन्ही तो चेतवावा रे"। असा योग म्हणजे २७ जून १९३८ रोजी सेनापति बापट यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झालेला नाथ घाणेकरांचा एकावन्नावा वाढदिवस. स्वार्थत्यागपूर्वक समाजाची सेवा करणारांचा गौरव समाजात होत राहणे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे लक्षण आहे, हे सातारा जिल्हा जाणून असल्याचेच हे लक्षण नसून गरिबीने वाढलेल्या व किंचित एककल्ली मते धारण करणाऱ्या पण निःस्वार्थ समाज सेवकाला जिल्हा एकमुखी कृतज्ञतेनेच मानतो, हे यावेळी सिद्ध झाले. भाऊसाहेब सोमणांच्या साठीसमारंभाप्रमाणेच नाथांच्या साठीसमारंभानिमित्त बाबूराव वैद्यांच्या 'समर्थ' ने गुणगौरवपर खास अंक प्रसिद्ध केला. तो जसा शिवराम गोविंद तथा राजाभाऊ भावे यांनीच मुख्यतः संपादिला होता तसा नाथांच्या काव्यसंग्रहाचा ग्रंथही त्यांनी संपादून प्रसिद्ध केला. त्यांचा खर्च दिवाणबहादूर मुथा शेटनी दिला होता, हे लक्षात भरण्यासारखे आहे.

सन १९३९ चे प्रारंभापासून अगदीच निराळे वारे वाहण्यास सुरवात झाली. साताराचे वैभव जे पारसनीस म्युझियम ते डेक्कन कॉलेजात हलवून आपण चालवावयास सरकारने घेतले. एप्रिल १९३९ मध्ये भागानगर सत्याग्रहात भोपटकरांचे बरोबर गेलेल्या सत्याग्रहचांना इतरा समवेत लहानमोठ्या शिक्षा

झाल्या. त्यामुळेच वसई किल्याचा द्विशत सांवत्सरिक उत्सव मे महिन्यात महाराष्ट्रातील इतर भागापेक्षा सातारा जिल्ह्यांत विशेष उत्साहाने साजरा झाला. कारण रेठरे बुद्रूक येथील इनामदार मंडळींनी चिमाजी अप्पा या पेशव्याचे सेनापती बरोबरीने त्या मोहिमेत जिवाच्या करारावर भाग घेतला होता. ऐतिहासिक महत्त्वाच्या गोष्टींबरोबरच लोकांनी दैनंदिन जीवनाकडे लक्ष पुरविले होतेच. शिराळे पेट्यातील "बुडक्या" वरील पाणीपट्टी लोकांनी रद्द करून घेतली होती; दारू दुकाने उठवा म्हणून मागणी केली होती; व कूपर मंत्रीमंडळाने कऱ्हाड येथे बांधू घातलेल्या कृष्णानदीवरील पुलाची उंची पांच फूट वाढवून घेतली होती.

या सुमारास भारताच्याच काय, पण जगाच्या राजकारणात खळबळच खळबळ उत्पन्न होत होती. हिंदुस्थानात काँग्रेस मंत्रिमंडळाच्या दोन वर्षातील कारभाराने अगर स्वतः कांग्रेसच्या साचेबंद चळवळींनी मॅझिनीचा "निश्चित मताने कृतिशूर होण्याचा मार्ग" पत्करणारा सुभाषचंद्र बोसचा प्रयत्न प्रभावी होऊ लागला होता. फॉरवर्ड ब्लॉक म्हणून त्यांनी १९३८ साली काँग्रेसच्या अंतर्गत दुसरा गट स्थापन केला होता. परकीय सत्तेशी कसलीही तडजोड वा सहकार वृत्ती या गटाला मान्य नसून त्याला प्रत्यक्ष प्रतिकाराचा मार्ग हवा होता. ब्रिटिश कॉमनवेल्थशी कसलाही संबंध सुतराम न राखता समाजवादी राज्य प्रणाली भारतात सुरू करणे हे त्या गटाचे ध्येय होते. १९३८ चे त्रिपुरा कांग्रेसचे आधिपासून सुभाषचंद्रांच्या विचारसरणीचा तरुणांच्या मनावर परिणाम झाला होता. आत्माराम पाटील, भैय्याशास्त्री वाटवे, लक्ष्मणशास्त्री जोशी प्रभृती मंडळी कॉ. रॉयकडे झुकत असता, फॉरवर्ड ब्लॉकच्या मताप्रमाणे चालणाऱ्या मंडळींना सरळ वाटत होते की युद्ध काली भारताने जे तेज दाखवावे ते काँग्रेसच्या अधिकृत यंत्रणेकडून दाखवणे घडणार नाही. अशा वैचारिक लाटा राष्ट्रात उसळत असताच युरोपमध्येही उलथापालथी व्हावयास घातल्या होत्या. आणि !

सप्टेंबर १९३९ च्या १ तारखेस जर्मनीने पोलंडवर स्वारी केली, आणि जागतिक शांततेचा भंग झाला, व हिटलरी होरपळ (दुसरे महायुद्ध) सुरू झाली. साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक हिंदुस्थानला मानून चालले तरी, त्याला न विचारताच इंग्लंडने हिंदुस्थानासही युद्धमान राष्ट्र म्हणून जाहीर केले. दिल्लीच्या मध्यवर्ती मंडळास तुच्छतेची वागणूक आहे, असे काँग्रेसने मानले व १९३९ च्या नोव्हेंबर पासून अधिकार संन्यास केला आजि युद्ध प्रयत्नापासून अलिप्त राहण्याचे ठरविले. तेव्हा फक्त चार प्रांती मुसलीम मंत्रिमंडळाची राजवट चालू राहिली, तरी १९३५ च्या सुधारणा कायद्यातील ब्याण्णव कलमी राज्यकारभारच देशभर चालू झाला. कायदे मंडळे बरखास्त

झाली तेव्हा भाऊसाहेब सोमण प्रभृती पुढाऱ्यांनी आता व्यायाम परिषदेकडे लक्ष दिले.

राष्ट्राच्या बांधणीस खेडेगावची पुनर्घटना जशी आवश्यक तशीच राष्ट्राचे प्रत्येक तरुणाची मानसिक, बौद्धिक व शारीरिक तरवेजीही आवश्यक. "राष्ट्राची रग शाळातील क्रीडांगणावरच रंगते." वॉटर्लूच्या विजेत्याच्या या उक्तीची सत्यता कोण अमान्य करील ? १९२१ सालापासून साताऱ्यात जिल्हा सामना मंडळा-तर्फे दरसाल सामने होऊ लागले. स्वराज्याचा कारभार सुरू झाल्यापासून कऱ्हाडासही तसे अखिल महाराष्ट्रीय सामने भरत आले आहेत. पांडुआण्णा शिराळकरादी उदारमनस्कांनी बक्षिसासाठी ढालीही ठेवल्या. साताऱ्यातील साम-न्यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे तरुणांच्या अनेक संघटना व परस्पर सहकार्य वाढू लागले. वाई, तासगांव येथेही सामने होऊ लागले. सामन्यात भाग घेणारे तरुण चळवळीचे व जिल्ह्याचे नवे तेज वाढवू शकले. १९२० साली गणपतराव साठ्यांची गजानन व्यायाम शाळा स्थापन झाली ती विठ्ठलराव सोमणांच्या संचालनेखाली १९२७ साली व्यायाममंडळाचे व्यापक स्वरूप घेऊन बसली. अखिल महाराष्ट्र शारीरिक–शिक्षण मंडळाची संघटना नांवारूपाला आल्यावर सातारा जिल्हा सामना मंडळाचे रूपांतर त्या मंडळाचे शाखेत झाले. स्थानिक संस्थांनी आपले अस्तित्व अलग–अलग न ठेवता व्यापक संघटनेत विलीन होऊन वाढत्या जोमाने कार्याचा उठाव करावा असे धोरण व वळण करंदीकर, सोमण प्रभृतींनी जिल्ह्याला लावून दिलेमुळे १९३८च्या मुंबईस भरलेल्या शारीरिक शिक्षण परिषदेत पुढील (१९३९) परिषदेचे सातारचे निमंत्रण दत्तात्रय रामचंद्र परांजपे प्रभृती कार्यकर्त्यांनी दिले. भाऊसाहेब सोमणांनी स्वागतसभाध्यक्षपद स्वीकारले. कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेची, एकीची व कुशलतेची कसोटी ठरून अधिवेशन पार पडले. तेव्हा कोटेश्वर मैदानावरील पांच हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शिस्तशीर कवाइतीचे दृष्य पाहून आपल्या समाजाचे भवितव्य उज्ज्वल व आशादायी आहे अशी प्रेक्षकांची खात्री झाली. अधिवेशनापूर्वी शारीरिक शिक्षण सप्ताह भरवून सत्तर हजार मुलामुलींच्या कवाइती ठिकठिकाणी घडवून आणून सबंध जिल्हाभर मोठी जागृती करण्यात आली होती. स्वागताध्यक्ष श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन (सांगली) आणि अध्यक्ष हिज हायनेस फरजंद-इ-खास दौलत-इ-इंग्लोशिया महाराज प्रतापसिंह गायकवाड सेना खासखेल समशेर बहादूर (बडोदे), आंतर्विभागीय सामन्याचे उद्‌घाटक छत्रपती शाहू (सातारा), व्यायाम संस्थाप्रतिनिधी चर्चेचे अध्यक्ष बाळासाहेब पंतप्रतिनिधि (औंध), खुल्या अधिवेशनाचे वेळी अध्यक्षीय सूचना करणारे श्री. मालोजीराव नाईक निंबाळकर (फलटण) यांची बोधप्रद व्याख्याने परिषदेच्या दरबारी थाटाला साजेशी होऊन सातारा परिषदेने शारीरिक-शिक्षण-क्षेत्रात एका नवीन

युगास सुरवात केली. असाच प्रत्येकाचा अभिप्राय पडला. अधिवेशन ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर १९३९ असे पांच दिवस चालले. ठिकठिकाणच्या व्यायाम-संस्थाचालकांची सहकारी विचारविनिमय-सभा हे परिषदेचे आणखी एक वैशिष्टच होते. सांघिक कवायतीचे एक पुस्तक छापून घेऊन त्यातील अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यास परिषदेने गांवोगावी वर्ग काढले होते. लाठी, काठी, लकडी यांची चर्चा यांच्या त्या व्यायाम प्रकारात एकसूत्रीपणा आणण्यास प्रोत्साहक ठरली. व्यायाम, शेतकी, सृष्टी निरीक्षण, कला यांची प्रदर्शने उभारून त्यांची शैक्षणिक उपयुक्तता लोकांचे नजरेत भरवली. व्यायाम प्रसाराबरोबर खुराक म्हणून गोदुग्धाचा प्रसार व्हावा, लष्करी शिक्षणाची तरतूद व्हावी, व्यायाम शिक्षकाकरता एक अभ्यासक्रम ठरवून त्यात उत्तीर्ण होणारास सरकारने प्रशस्तिपत्रके द्यावीत इत्यादि महत्त्वाचे ठराव परिषदेत पास झाले.

दत्तोपंत परांजपे मास्तर व त्यांचे सहकारी मित्र यांच्या आणि त्यांच्या स्फूर्तीदायक नेतृत्वाखाली आस्थेने काम करण्यास शिकलेल्या खऱ्या स्वयंसेवकांच्या सेवेचे फळ म्हणजेच अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे अधिवेशन असे संबोधून सोमणांनी समाधान व्यक्त केले की " लोकांनी शारीरिक शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात आपपर – भाव सोडला, मतान्तरे बाजूला ठेवली, पक्षोपपक्ष मनात आणले नाहीत व एक दिलाने खांद्यास खांदा लावून कामे केली. " १९२२ साली साताऱ्यात बालवीर संस्था स्थापन झाल्यापासून दामोदरपंत भिडे गुरूजी यांच्या साठीसमारंभाचे निमित्ताने सोमणांनी अणे-भोपटकरांच्या बरोबरीने गुरूजींच्या राजकीय राष्ट्रीय कार्याचा आढावा घेण्यापर्यंत आणि बालवीरांचे मेळावे नि बालवीर - शिक्षक -- परिषद या संघटनात्मक कार्यास प्रोत्साहन देऊन, सोमणांच्या ज्या आपेक्षा जिल्ह्याकडून होत्या त्यांची परिपूर्ती सदर परिषदेने केली.

अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेत लक्ष घालून देखील जिल्ह्याच्या पूर्व भागातील दुष्काळाकडे लक्ष देणेचे कोणी टाळले नाही. अशातच डिसेंबर मध्ये सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद शेवटच्या आठवडयात कऱ्हाड येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अध्यक्षतेखाली पार पडून तरुणांच्या स्वतंत्र संघटना काँग्रेसच्या धोरणाला पुढे रेटण्यासाठी तयार करण्याचा ठराव तेथे एकमताने पास झाला. तरी हिटलरने जागतिक होरपळ सुरू केल्यावर इंग्रज सरकार आपले युद्ध प्रयत्न कसे सोडणार ! त्या सरकारलाही " इंग्लंडची अडचण तीच आमचे संधीसाधन " म्हणून मदत करणारी आणि शस्त्र पेलण्या – वापरण्याची संधी साधणारी मंडळी भेटली.

१९३७ तच हिटलरी होरपळीचे (१९३९ ते १९४५) ढग हेरणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यशाहीने काँग्रेसला चुचकारून मंत्रीमंडळे बनवावयास लावली

होती. त्या मंत्रीमंडळांनी आणि त्यांच्या मातृस्थानी असलेल्या कांग्रेसने प्रति-सरकार स्थापण्यापर्यंत असहकार केला. पण पोटार्थी, राजनिष्ठ म्हणवणारे आणि लष्करी पराक्रमाची संधी आली आहे तर तिचा राष्ट्रोद्धारार्थ उपयोग केला पाहिजे अशी प्रेरणा हिंदुमहासभा प्रभृत्ती संस्थाकडून घेणारे हिंदी तरुण प्रत्यक्ष रणांगणावर पराक्रमांची शर्थ करू लागले

नुसत्या महाराष्ट्रीयांच्या एकोणतीस पलटणीतून एक लक्ष लोक रणांगणावर लढत होते. इटालीमध्यें लढत असताना, तिसऱ्या पलटणीचा नाईक यशवंतराव घाटगे व पहिल्या पलटणीतील शिपाई नामदेवराव जाधव यांनी आपल्या अप्रतीम शौर्याने ३० ऑगस्ट १९४५ रोजी व्हिक्टोरिया क्रॉसचा मान मिळविला. सुभेदार मेजर श्रीरंगराव लवंदे याने लिबियात असा विजय मिळविला की जो युरोपियन सेनापतीचे हाताखालील निवडक सैन्याला मिळविता आला नाही. खरे पहिले तर हिटलरी होरपळीतील इंग्रजी साम्राज्याच्या विजयश्रीचा शीलान्यासच लिबियाच्या श्रीरंगाच्या पराक्रमाने केला. मांटस-नदीवरील चकमकीत जमादार बाळकृष्ण याने सात जर्मनाशी सामना केला. लाझोड्स हे गांव घेताना ती झटापट झाली. गनिमी काव्याच्या सगळ्या हिकमती लढवून हातातील पिस्तुलाच्या जोरावर पहिले पांच जर्मन त्याने हा हा-म्हणता गारद केले, जवळचे फोर्ड–रेटा अल्बारेटो हे गांव घेतानाही चाळीस जर्म-नाशी तीस मिनिटे सामना झाला व सर्व जर्मन नेस्तनाबूत झाले. (१९४४) तळबीडचा हवालदार सुबराव मोहिते हा १९३९ मध्ये वझिरी स्थानात लढत असता, जायबंदी झाला व हवालदार भीमराव मोहिते १९४२ मधील सागर युद्धात कामास आला. कैसरी कंदनाचे वेळचा मेजर अमृतराव रामचंद्रराव मोहिते हा १९३८-३९ सालच्या वझिरीस्तानच्या लढाईत होताच. सातारा जिल्ह्याने चवदा हजार रंगरूट पुरविले होते. त्यात एकट्या अपशिंग्याचे एकशे पांच होते. यांचे व्यतिरिक्त आणखी हिटलरी होरपळीच्या वेळी जर्मनीच्याविरुद्ध सातारा तालुक्यातील चिंचणेर वंदनचे ११३, कोडोलीचे १५०, निगडीचे १३८, नागठाण्याचे ६६, गोडोलीचे ६० लोक लढले; कोरेगाव तालुक्यातील १४०, खटावचे १४१, पुसेगावचे ११२, बुधचे ८५, निढळचे ७४, चिंचणी (तासगाव) ७९, शिराळचाचे ५१, विटचाचे ७७, खानापूरचे ६०, उचाट (जावळी) चे ५० महिमानगडचे ७६, तांबवे (कऱ्हाड) चे १०२, इसलामपूरचे ९० नेरल्याचे ८२, पेठचे ९०, कामेरीचे ६७, बागणीचे ९३, इतक्या लोकानी रणांगणावर पराक्रम गाजविला.

हिटलरी होरपळीचा शेवट एकपरी १९४५ मध्ये झाला आणि जगातील प्रत्येक राष्ट्राच्या फेररचनेचा प्रश्न त्या त्या राष्ट्रातील नेते हाती घेऊ लागले. हिंदुस्थानातही तसे घडत असता, आपल्या जागतिक पतीचा विचार करून इंग्लंडने हिंदुस्थानवरील अधिसत्ता सोडण्याचे ठरविले.

एप्रिल १९४७ पासून मराठ्यांची चवथी बटॅलियन तिबेटमध्ये होती. टूना, खाग्मा, ग्यौती वगैरे ठाण्यावर मराठा लाइट इन्फंट्रीच्याच तुकड्या होत्या. त्यांनी तिबेटात आपले नांव आपल्या ऐतिहासिक कीर्तीला साजेसेच केले. आपल्या १९११ व १९३१ मधील पराक्रमाला त्यांनी यावेळी नवा तजेला दिला. राजकारणी अधिकाऱ्यांनी, तिबेटी सरदारांनी आणि लोक समुदायाने मल्लखांब टिपरी, लेझीम, गोमोह आणि कुस्ती पाहून तोंडात बोटेच घातली. मग १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचा तिरंगी झेंडा प्रथम फडकविण्याचे भाग्य मराठा–तुकडीलाच लाभले.

२६ : 'चलो दिल्ली' व 'छोडो हिंद' सुरुवात

जर्मनीने जागतिक युद्ध पेटविलेनंतर १९४० च्या एप्रिलमध्ये रामगड येथे भरलेल्या काँग्रेसने एकच एक ठराव केला. तो असा की "संपूर्ण स्वातंत्र्यापेक्षा कोणत्याही तऱ्हेने कमी असलेली राजकीय सुधारणा हिंदुस्थानच्या लोकांना परवडणार नाही. साम्राज्यशाहीच्या चक्रात अगर वासाहतिक स्वराज्याच्या कक्षेत हिंदुस्थानचे स्वातंत्र्य समाविष्ट होऊ शकत नाही. हिंदुस्थानातील जातीय तंट्याचा निर्णय फक्त हिंदी लोकांच्या घटना परिषदेतच होऊ शकेल. तेव्हा ती भरवावी." सदर ठरावास अनुसरून मग काँग्रेस जनांची पावले पडू लागली. सरकारचेही युद्ध प्रयत्न यशाची वाटचाल करण्याच्या दृष्टीने जोरदार पणे साहजिकच चालू होते. लोणंद भोवतालची कोरेगाव तालुक्यातील काही गावे लष्कराच्या उपयोगासाठी सरकारने उठविण्याचा बेत केला असता, तेथील रहिवाशांच्या मिळकतीचा मोबदला त्यांना बिनचूक बाजार भावाने मिळावा आणि त्यांच्यापुढील व्यवसाय व्यवहाराला सुगमता यावी म्हणून, कोरेगाव-वाई तालुक्यातील रॉयवादी मंडळींच्या खटपटीने यश मिळविले. त्याच बरोबर "युद्धफंड" सक्तीचा नाही म्हणून जनतेस समजावून सांगणाऱ्या गट-परिषदाहि सातारा जिल्ह्यात धूमधडाक्याने झाल्या. हिटलरी होरपळीचे गांभीर्य १९४० च्या मध्यापासून उग्र स्वरूप धारण करीत असताच, सातारा जिल्ह्यात, भारताचा पोलादी पुरुष वल्लभभाई पटेल यांचे हस्ते जूनच्या पहिल्या आठवड्यात लोकलबोर्डावर राष्ट्रीय झेंडा फडकला, एवढेच नव्हे तर इंदोलीस सत्याग्रही शिक्षण-शिबीर जुलईच्या पहिल्या आठवड्यात झाले, त्याचा समारोप करताना केलेल्या भाषणाबद्दल रावसाहेब पटवर्धन यांना १४ ऑगस्ट

रोजी भारत संरक्षण कायद्याखाली एक वर्षाची शिक्षा झाली !! मग ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून अच्युतराव पटवर्धनांचा नुसता दौरा घडवून सातारा जिल्हा स्वस्थ बसला नाही, तर २६ ऑगस्टपासून पुढे पाच दिवस तालुकीय सत्याग्रहींची शिबीरे उसळीने भरविण्यात आली. राष्ट्रातील अशाच काही हालचालीमुळे ८ ऑगस्ट १९४० रोजी व्हाईसरायनी युद्धानंतर लवकरच हिंदुस्तानला वसाहतीचे स्वराज्य मिळेल अशी घोषणा केली होती, तिचा सातारा जिल्ह्यात १ सप्टेंबर रोजी सर्वत्र निषेध करण्यात आला.

राजकीय क्षेत्रात असे उठाव होत असता, नित्याची आवश्यक अशी समाज प्रगतीची कर्तव्ये सातारा जिल्हा करीतच होता. उंब्रज व येराडे येथील शेतकी प्रदर्शन, रहिमतपूर येथील ग्रामोद्योग प्रदर्शन व सातारा जिल्हा खादी-संघाची स्थापना व नोव्हेंबरात तांबवे येथे झालेले यशस्वी सातारा खादी संमेलन या गोष्टी त्या कर्तव्यात विशेष संस्मरणीय ठरतील. या कार्यक्रमातूनही असा एक विचार प्रवाह वाहताना दिसत होता की जगात शांतियुग निर्माण होण्यासाठी मानव संहार विरोध वा युद्धविरोध व्हावा. त्याच दृष्टीने काँग्रेसने इंग्रजी राजवटीच्या युद्ध प्रयत्नाशी अलिप्ततावाद स्वीकारला होता आणि "शांतिसाठी शांतिसेनेची तयारी" म्हणून वैयक्तिक युद्ध विरोधी घोषणेचा सत्याग्रह सुरू केला. तेव्हा त्या राष्ट्रीय लढ्यात भाग घेता यावा म्हणून लोकसेवा संघाचे गोसावी, गोखले, काशीद यांनी संघास घटनात्मक रामराम केला. समाजसत्तावाद्यातर्फे युद्धविरोधी नि परिणामतः तुरुंग भरती होऊ लागली; जिल्हाभर नोकरशाहीच्या दडपशाहीस उत्तर म्हणून आठवडाभर काँग्रेस धोरणाचा पुरस्कार-प्रचार केला आणि सभांच्या विपर्यस्त रिपोर्टाबद्दल जिल्हाधिकाऱ्यास गोखल्यांनी खरमरीत पत्र लिहिले. उलट युद्ध साहाय्यासाठी ना. राज्यपालानी सातारा जिल्ह्यात धाव घेऊन कुस्त्यांचे फड उभारले तर गांधीप्रणीत भाषणस्वातंत्र्याचा व वैयक्तिक सत्याग्रहासाठी मातबर मंडळी अहमहमिकेने पुढे येऊ लागली.

सातारा जिल्ह्यात १९४१ साल ओल्या दुष्काळाने सुरू झाले. भाऊसाहेब सोमण, तात्यासाहेब (शंकर हरी) साठे प्रभृती स्थानबद्ध होऊन अनेक युद्ध निरोधी घोषणा करणारे काँग्रेसचे मातबर सत्याग्रही तुरुंगवासात गेले. सातारा जिल्हा रॉयीस्टांची कऱ्हाड येथे परिषद होऊन इंग्रजांना युद्धसहाय्य द्यावे असा प्रचार झाला आणि युद्धोत्तर हिंदुस्तानला स्वराज्य मिळाल्या-शिवाय राहात नाही अशी ग्वाही देण्यात आली. उलट पुसेगांव येथे सातारा जिल्हा काँग्रेसप्रेमी युवक परिषद होऊन युद्धजन्य अवघड परिस्थितीतही वैयक्तिक सत्याग्रह जोरात चालूच राहिला. तिकडे १९४१ च्या जूनमध्ये (२२ तारखेस) हिटलरी होरपळीला अकल्पितपणे निराळेच वळण लागले.

जर्मनीने रशियावर चढाई केली, त्यानंतर सहा महिन्यात जपानने पर्ल हारबर घेतले. १८ डिसेंबर रोजी जर्मनीची बाजू धरली. त्यामुळे त्याबरोबर अमेरिकाही प्रत्यक्ष युद्धात पडली व १९४१ अखेर इंग्लंडच्या जोडीस रशिया, चीन व अमेरिका ही राष्ट्रे आली. ब्रह्मदेशातही अंदमान प्रमाणेच जपान हातपाय पसरू लागल्यामुळे युद्ध हिंदुस्थानच्या अगदी दाराशी येऊन ठेपल्या सारखे झाले. ते इतके की, अखेर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर विजगापट्टण व कोकोनाडा येथे बाँबफेक झाल्यामुळे हिंदुस्थानातच युद्ध सुरू होण्याचा सुमार दिसू लागला! शत्रूला परिणामकारक विरोध करण्यास तारीख तागायत साधन सामुग्री प्रमाणेच जनतेच्या हार्दिक पाठिंब्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन, ब्रिटिश सरकारने डिसेंबर १९४१ मध्ये वैयक्तिक सत्याग्रही बंदीमुक्त केले. काँग्रेसच्या पं. नेहरू प्रभृती पुढाऱ्यांनी मुक्त होताच जी पत्रके काढली त्यावरून हे स्पष्ट होते की, हिंदुस्तानच्या सशस्त्र संरक्षणाच्या कामी प्रत्यक्ष हातभार लावण्याची त्यांच्या मनाची तयारी होती; मात्र सर्व घडामोडी हिंदुस्तानच्या प्रातिनिधिक कारभाराच्या काबूत राखून व सोपवून भारतीय स्वातंत्र्याचा पाया घालणारी कार्यप्रणाली सुरू व्हावयास हवी. नंतर बार्डोली येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीने वैयक्तिक सत्याग्रह तहकूब करून १४ सप्टेंबर १९३९ रोजी काँग्रेसने काढलेल्या जाहीर पत्र-कातील नाझी -- फॅसिस्टांच्या आक्रमक वृत्तीच्या निषेधाचा पुनरुच्चार केला. मध्यंतरी हिंदुस्थानातून सुभाषचंद्र बोस बाहेर पडून "चलो दिल्ली" असा उद्घोष करू लागले होते. तेव्हा १९४२ च्या मार्च -- एप्रिल महिन्यात इंग्लंडहून क्रिप्ससाहेब हिंदुस्तानात आले ते हिंदी लोकमत शांत करण्यासाठी. त्यांनी आणलेल्या (क्रिप्स) योजनेचा रोख हिंदुस्थानचे जरूर तर एक वा अनेक राज्यसंघात रूपांतर करणेचा होता. ती योजना दुहीची बीजे कायमची पेरणारी असल्याने व्यक्तिमात्रापासून पक्ष मात्रापर्यंत सर्वांनाच नापसंत होती. तो खारट तुरट बोलीचा प्रसंग होत असताही भारतीय पुढाऱ्यांनी निक्षून सांगितले की कसल्याही आक्रमणाविरुद्ध हिंदुस्थानचे संरक्षण करण्यास आम्ही बद्धपरिकर आहो!

राजकीय वातावरणात अशा अटीतटी चालू होत्या त्या एका बाजूने निरनिराळी रूपे घेऊनही थैमानें उठवीत असता सातारा जिल्ह्यात विहे येथे सोलापूरचे भाई बेके यांच्या अध्यक्षतेखाली जहाल - लोक परिषद झाली. आणि अष्टे येथे शिरगावकर बापू जाधवाचे शक्तीचे अचाट प्रयोगही झाले. पण त्या अगोदरच गोटखिंडी येथे चौगुली वतने खालसा करणेच्या नोटीसा लागल्या, मोटारगाड्यांची गॅसप्लँट वहातूक चालू झाली आणि लोणंद भोवतालची तेवीस गांवे लष्करी उपभोगासाठी साक्षात् उठविली, तेव्हा

हिटलरी होरपळीच्या ज्वाळा जग व्यापून बसल्या होत्या. त्याचा दाह चांगलाच जाचक होत असल्याची जाणीव जनसामान्याला झाली. .

हिंदुस्थान बर्फासारखा थंड गोळा होऊन पडला असता, त्यात चैतन्य भरणाऱ्या " सर्वज्ञः स हि माधवः " असणाऱ्या न्यायमूर्ती रानड्यांच्या जन्म शताब्दीचे हे संवत्सर होते. न्यायमूर्तींची जन्मशताब्दि १८ जानेवारी रोजी इतर ठिकाणाप्रमाणेच सातारा जिल्ह्यातही साजरी होताना संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्तीने रानडे जन्मशताब्दि संवत्सराचा शेवट व्हावा अशी ठिकठिकाणच्या सभातून प्रार्थनाही करण्यात आली होती. जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हे स्पष्टच सर्वांस कळून चुकले होते की हिंदुस्थानात हिंदी लोकांचे पार्लमेंट वसून त्यानें सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवावा, ही स्थिती येईपर्यंत हिंदी लोक आयरिश लोकांप्रमाणेच ब्रिटिश सरकाराशी झगडत राहणारच; उजव्या हाती देशाभिमानाचा भाला व डाव्या हाती कलावन्त सहनशीलतेची ढाल घेऊन हा लढा चालविताना, पारतंत्र्याची अस्पष्ट कल्पना, राष्ट्रहानीची स्पष्ट कल्पना, अर्ज-शिष्टमंडळे, विधिमंडळातील सनदशीर चळवळ, स्वदेशी व बहिष्कारासारखा अप्रत्यक्ष प्रतिकार, गुप्त मंडळ्या आणि सक्रिय प्रतिकार, अशी स्वराज्याची सप्तपदी चढत चढतच हिंदुस्थानात स्वातंत्र्याची चळवळ प्रभावी झाली होती. तेव्हा १९४२ साली क्रिप्स योजनेला वाटाण्याच्या अक्षता दिल्यानंतर महात्मा गांधी जे इंग्रजसरकारकडून अपेक्षा भंग होत असल्याकारणाने अस्वस्थ होत गेले, त्या त्यांच्या अवस्थेतूनच हिंदुस्तानने शेवटची पायरी चढावी असा उमट झाला. शान्ति युगाची आणि मानव्याच्या प्रस्थापनेची धडपड करणाऱ्या गांधीना, वेळ वखत पाहून जपान इंग्लंडवर मात करणार असा रंग दिसू लागताच, महात्माजींच्या प्रेरणेने " छोडो हिंद " ची चळवळ १९४२ च्या नऊ ऑगस्टपासून कॉंग्रेसने आरंभली, त्यासरशी सातारा जिल्ह्याने आपल्या कुवतीप्रमाणे आपला वाटा त्या चळवळीत उत्साहभरानेच उचलला.

२७ : स्वराज्यासाठी शेवटचा शांतिसंग्राम

(केसरी, ऐक्य, टाईम्स, फ्री प्रेस जर्नल वगैरे सर्वमान्य पत्रांवरून आणि नाना पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्या चरित्रावरून)

हिटलरी होरपळीच्या अडचणी अडथळचामुळे पोटभर अन्न किंवा अंगभर वस्त्र तर राहोच पण ती दोन्ही कशी दिसतील याची चिंता सर्वत्र १९४२ मध्ये होती. ब्रिटिश राजवटीच्या वटहुकुमांनी लोकांचे मुलकी हक्क संकुचित होत होते, अशा स्थितीत (गवालिया टँक मैदानावर) मुंबईस पहिली काँग्रेस १८८५ साली भरली होती, तेथूनच ऑल इंडिया काँग्रेस कमेटीने ८ ऑगस्ट १९४२ रोजी "चले जाव"ची घोषणा केली. इंग्रजशाहीला दिलेला हा इशारा देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोसांनी भारतीयांना दिलेल्या "चलो दिल्ली" या उत्थापनाचा प्रतिध्वनी होता. त्या दोहोंची चमक युद्धजन्य परिस्थितीतून होती. "आता होणारा लढा निकराचा व शेवटचा आहे; आपल्या सर्व संस्थांनी व कार्यकर्त्यांनी आपल्या जवळचे आहे-नाही ते सर्व पणास लावले पाहिजे" असे सरदार पटेल यांनी १९४२ च्या एका चरखासंघाच्या सभेत सांगितले होते. ते लक्षात ठेवून १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य समराची याद लोक घेऊ लागले होते. त्यामुळेच, १९३८ मधील सेनापती बापटांच्या प्राणयज्ञ दलात बोरगावच्या आत्माराम पाटील प्रभृती खेडूत पुढाऱ्यांनी सामिली केली होती, तशीच "चले जावच्या" आंदोलनात जनता करू लागली.

सरकारने ९ ऑगस्ट रोजी पहिल्या रांगेचे पुढारी उचलले. निश्चितार्थाचे नेतृत्व नाही, तेव्हा मुंबई शिवाजी पार्कवरील सभेत जनताच नेतृत्व घेऊ लागली. सातारकडील रामानंदस्वामी प्रभृतींनी तीत मार्गदर्शन केले. अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीस जिल्ह्यातून यशवंतराव चव्हाण, काशिनाथ देशमुख विठ्ठलराव पागे, वसंतराव पाटील, वगैरे पंचवीस मंडळी गेली होती. त्यातील सुमारे पंधराजण मुंबई पान बाजारात यशवंतराव चव्हाणांच्याकडे जमली व जिल्ह्यात करावयाच्या आंदोलनाचा विचार झाला. गांधीजी जर "करेंगे या मरेंगे" सांगून राहिले आहेत तर आपण चढाईचे धोरण स्वीकारावे, असे कारभारी चंद्रोजी पाटील म्हणत. काँग्रेस वरिष्ठांकडून येणाऱ्या आदेशाप्रमाणे आपण वागावे, असा अभिप्राय चव्हाणांनी व्यक्त केला. तो सर्वांनी देशभरच्या एकसूत्र चळवळीसाठी मान्य केला. आणि सर्वांनी जिल्हा प्रवेशाकडे तोंडे वळवली.

इकडे सातारा जिल्ह्यात ९ ऑगस्ट १९४२ ला जिल्ह्यातील भाऊसाहेब सोमण, शंकरराव साठे, गणपतराव तपासे, गणपतराव आळतेकर, आचार्य जावडेकर, राघुआण्णा लिमये प्रभृती चौदा जणांना स्थानबद्ध करून येरवड्यास नेले होते.

जनता अस्वस्थ झाली. सर्वत्र हरताळ झाला. कऱ्हाडास संध्याकाळी लोकसेवक बाबूराव गोखले विद्यार्थ्यांच्या सभेत बोलल्यावर त्यांना अटक झाली. पुढे दोन दिवसात मुंबईकडून परतलेल्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कऱ्हाड येथे होऊन भूमिगत होऊन (गुप्ते) काम करणारांची, व उघड सत्याग्रह करणारांची, अशा दोन सहकारी संघटना बांधण्याचे ठरले. त्या दोघांच्याही चळवळीना सहाय्य करीत राहणारांचीही एक तिसरी फळी निर्माण करण्यात आली. मग वाई ८, सातारा ७, कोरेगाव ६, खटाव ११, खानापूर २०, तासगाव २२, कऱ्हाड २०, पाटण १०, वाळवे २४ व शिराळा २२ अशा तालुका निहाय सार्वजनिक सभा होऊन वाई तालुक्यात तीन निरोधने, कऱ्हाड तालुक्यात चार सत्याग्रह, आणि जिल्हाभर हरताळ व प्रभातफेऱ्या होऊन "चलेजावची" बुद्धी पिकवण्यात आली. धी, श्री व स्त्री हीच क्रांतीची शक्ति दैवते नाहीत काय? तासगाव तालुक्यात सोळा चावड्यावर राष्ट्रीय झेंडे लागले; शिराळे पेट्यातील बत्तीस पाटलांनी राजिनामे दिले. मुंबईहून परतलेल्यांच्या तोंडून अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, शिरूभाऊ लिमये, श्री. म. जोशी, अरुणा असफअल्ली वगैरेंच्या सल्ला मसलतीचा ऐकावयास मिळालेला ध्वनी व "हरिजन" मध्यें मश्रुवाला व काका कालेलकर यांचे प्रसिद्ध झालेले लेख ऐकून, पाहून चळवळीचे आडाखे लोकांचे लोकांनी बसवले.

ऑगस्ट २४ रोजी २० गावाहून हजार लोक व कऱ्हाडातील तीन हजार त्यांना मिळाले, कऱ्हाड मामलेदार कचेरीवर बाळकोबा पाटील उंडाळकर यांनी तो मोर्चा नेला. कचेरीच्या फाटकात पोलिसांची रांग होती. तेथेच सभा झाली. अध्यक्ष उंडाळकर यांना अटक होताच लोक खवळले. पोलिसांची संगीन एका मुलाला लागली. तेव्हा पन्नास फुटावर दूर असलेल्या दुसऱ्या एका मुलाने त्या पोलिसास दगड फेकीने जखमी केले. त्याच दिवशी पाटण कचेरीवरही बुवा म्हावशीकर यांच्या नेतृत्वाने दोन हजार लोकांचा तालुका मोर्चा गेला होता. सभा घेऊन कचेरीवर झेण्डा लावताना ब्रिटिशांची नोकरी सोडून चळवळीस सामील होण्यास अधिकाऱ्यांना म्हावशीकरांनी सांगितले. शिराळे पेटा कचेरीवर बाबूराव चरणकर, राजाराम म्हासूलीकर, कालिदास प्रभृती पन्नास मंडळींनी सभा घेतली. तेथे "आरोग्य वर्धन" सभेसाठी सरकारने बोलावलेले साठ गावचे पाटील आयतेच सापडले. त्यांना पाटीलकी सोडण्या-

बद्दल विनविण्यात आले; अधिकाऱ्यांच्या राजिनाम्याची मागणी झाली. तेव्हा राजाराम म्हासुलीकर व कालिदास या "कऱ्हाडच्या विद्यार्थ्यांना" कऱ्हाडास धाडण्यास सरकार चुकले नाही. या तीन वारात किर्लोस्करवाडी हरताळ, दोन हजार कामगारांची फेरी, सरकारी यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी साठ लोकांची संघटना गोविंदराव खोत प्रभृतींनी केलीच होती. तासगावच्या पंचवीस सभा झाल्या, त्यात फक्त बुर्लीचे शिवदेच पकडले गेले, व १६ गावी चावड्यावर राष्ट्रीय झेण्डे लागले. मग डॉ. सोहनी, पागे, चिंतोपंत काळे, आदम पैलवान, नाना पाटील यांच्या प्रचाराने ३ सप्टेंबरला कृष्णराव कुऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली वीस गावच्या पांचहजार कामगार-शेतकरी व तासगावचे तीन हजार लोकांचा मोर्चा प्रथम मुनसफ कोर्टावर आला. मुनसफांनी बाहेर येऊन कुऱ्हाडे यास हार घातला व लोकांच्या मागणीप्रमाणे कोर्टास एक दिवसाची सुट्टी केली. मोर्चा मग मामलेदार कचेरीवर गेला. शंभर सज्ज पोलिसांनी तो आडविला. कचेरीवर झेंडा लावून सभा घेण्यापलिकडे लोक काही करणार नाहीत, अशी मामलेदारांची समजूत घातल्यावर, सोळा लोकांनी "महात्मा गांधीकी जय" म्हणून मामलेदारांना गांधी टोपी घातली व कचेरीवर तिरंगा चढविला.

खटाव तालुक्यात गौरिहर सिंहासने, बंडोपंत लोमटे, रामभाऊ नलवडे माणिकचंद दोशी, बापूराव कचरे, परशुराम घाटगे इत्यादींनी प्रचाराने मोर्चाची तयारी केली होती. तीप्रमाणे ९ सप्टेंबर रोजी परशुराम घाटगे यांच्या नेतृत्वाखाली वडगाव, पुसेसावळी, लाडेगांव, औंध येथून आलेल्या सुमारे सातशे लोकांचा मोर्चा झाला. वडूज कचेरीपासून पन्नास यार्ड अंतरावर घाटगे, अशोक व अरविंद लोमटे, राम सुतार, किसन भोसले (वडगाव) व पुसेसावळीचे खटावकर यांना व परिणामतः सर्व सत्याग्रहीना पोलिस सब्इन्स्पेक्टर बिडीगिरी व मामलेदार अंकली यांनी एक रेघ ओढून आडविले. आज्ञा मोडल्यास गोळीबाराची धमकीही दिली. मोर्चाचे पुढारी घाटगे यांनी आपला फक्त सभा घेऊन झेंडावंदन करणेचाच कार्यक्रम असल्याचे सांगून पुढचे पाऊल पुढे टाकले. तोच, मामलेदारांनी गोळीबार फर्माविला. सूं सूं करीत पावणे दोनशे गोळी झडली. आणि वडूजची मामलेदार कचेरी सातारा जिल्ह्यातील जालियनवाला बाग झाली!!! परशुराम पैलवानास ६, लोमटे अशोकास २ व अरविंदास ३ गोळ्या बसल्या! पहिलवानाच्या छातीत गोळी लागून ते मरण मुखी पडले तरी हाती राष्ट्रीय निशाण ताठ धरून होते. मामलेदार कचेरीत रक्ताचे थारोळे झाले असताही पडून राहिलेल्या लोकासही गोळ्यांचा वर्षाव सहन करावा लागत होता. जागचे जागी ५, पुढे ७५ जखमी पैकी हॉस्पिटलमध्ये २, जखमा बरेच दिवस बऱ्या न झालेमुळे १

असे एकूण ८ मयत झाले. परशुराम घाटगे, किसन भोसले, कुशाबा भोसले, शिदोबा पवार, राम सुतार, सर्व राहणार वडगाव, बलभीम खटावकर व बाळकृष्ण खटावकर रा. पुसेसावळी आणि श्रीरंग शिंदे रा. उंचीठाणे हे हुतात्मे झाले. हवालदिल होऊन लोक पांगले. जखमीना पोलिसानी कचऱ्यासारखे लॉरीत भरून व पाण्याचा थेंबही न दाखवता सातारा हॉस्पिटलमध्ये गुदरले. तेथील नरक यातनातून तीस मंडळी दोन महिन्यांनी बाहेर पडली. सर्व निसटावयास सहा महिने लागले !!!

तासगाव मोर्चाचे यशानंतर पांडु मास्तर, निवृत्ती काका कुरुळूपकर, वसंतराव पाटील, केशवराव डी. पाटील, चंद्रोजी पाटील, दत्तु पाटील, रंगराव पाटील, व ईश्वरा गुरव वाळवे तालुक्यात प्रचार करीत चाळीस गावी सभा घेऊन श्रावणाचे शेवटचे सोमवारी येडें निपाणीच्या मल्लिकार्जुन डोंगरावर जमले. आसपासचे हजार हत्यारी व यशवंतराव चव्हाण सभेस आले. इसलामपूर मामलेदार कचेरीवरील मोर्चाची ता. १० सप्टेंबर ठरली. त्याप्रमाणे त्या दिवशी कुरळप, येडे, कामेरी भागातून दोन हजारांचा आणि वाळवे किर्लोस्करवाडी भागातून तीन हजारांचा मोर्चा इसलामपुरास आला. पहिल्याचे व दुसऱ्याचे येण्यात तासाचे अंतर पडले ! पहिल्याने गांधी चौकात सभा घेतली. पोलिसांनी लाठी माराने पन्नास जखमी केले व पांडु मास्तरना पकडले. दुसऱ्या मोर्चास हे कळताच, तो सरळ कचेरीवर आला. त्याचे पुढारी विनायकराव थोरात व पांडुरंग गोटखिंडीकर यांना कचेरीपासून दोनशे यार्डावर आडविण्यात आले. तासगांव मोर्चातील किर्लोस्करवाडीचा उमाशंकर पंड्या पाहिल्याबरोबर डी. एस्. पी. येट्स् म्हणाला " तुम क्या मंगता है ?" उत्तर आले 'स्वराज्य'. येट्स्ने पिस्तूल झाडले अन् पंड्याला परलोक दाखविला. लगेच झालेल्या गोळीबारात कळंत्रे व तुकाराम सुतार जखमी झाले व विष्णु बारवटे ठार झाला ! सतरा जखमी झालेले आढळले. इसलामपुरास असे छोटेसे वडूज झाले !! मोर्चाचे अगोदरच डॉ. भगवंतराव कुलकर्णी, एस. आर. कुलकर्णी वकील व श्रीराम राठी यांनी सभा सत्याग्रह केला होता व बंदी झाले होते. उघडपणे चाललेल्या चळवळीला पिसाट दडपशाहीने मग जिंजि प्रसंगीच्या " खंडोबल्लाळी " " गुप्तीचे " वळण लागू लागले. एव्हाना जिल्ह्यातील हजार मंडळी विना चौकशी स्थानबद्ध झाली होती. त्यांच्या हळव्या नातलगाकडून आपल्या तुंबड्या काही नरपशू कर्मचारी भरू लागले होते. तेव्हा कार्यकर्ते " गुप्ते " होताच सत्तावीस लोकावर पकड वारंटे निघून यशवंतराव चव्हाण, नाना पाटील, गौरिहर सिंहासने, काशिनाथ देशमुख, पांडु मास्तर, बाबूराव चरणकर व गणपणराव बिळासकर पाटील यांना पकडून देण्याबद्दल हजार हजारांचे बक्षीस लागले. चाळीस प्रमुख कार्यकर्त्यांच्या स्थावर जंगम मिळकती

जप्त झाल्या. गुप्तें दाद देईनात ! प्रांतिकच्या विध्वंसक चळवळीचे प्रमुख आण्णासाहेब सहस्रबुद्धे होते. कऱ्हाडचे सदुभाऊ पेंढारकर त्याशी गुफ्तगू करीत. पुणे मुंबईच्या सप्टेंबर सभांना ते गेले होते. जुलईमध्येच त्या संबंधात निघालेल्या पत्रकात विध्वंसक चळवळही बेखून व बेजखम चालविण्याने समाजाचे धैर्य अभंग राहते, असा दिलासा होता. त्यास अनुसरून कार्याच्या सोईसाठी जिल्ह्यात निरनिराळे समूह करण्यात आले (१) यशवंतराव चव्हाण समूह ७५ लोकांचा (२) काशिनाथ देशमुख समूह ३० जणांचा (३) नाना पाटील समूह ७५ मंडळींचा (४) वसंतराव पाटील समूह ४० तरुणांचा (५) गोविंदराव खोत समूह २५ कर्मचाऱ्यांचा (६) स्वामी रामानंद समूह २५ कार्यकर्त्यांचा (७) बाबूराव चरणकर, बर्डे मास्तर समूह ३१ युवकांचा (८) पांडुरंग बोराटे समूह ५० साथींचा व (९) भूपाल कत्ते समूह १५ सहकाऱ्यांचा.

परकीय सत्तेच्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या या नवग्रहीने १९४२ अखेर जिल्ह्यात ५७ ठिकाणी तारा तोडून खांब उपटून टाकले; कऱ्हाड चावडी, येरफळचा पूल, बांबवडे बंगला, शेणोली–विश्रामबाग – नांद्रे – जयसिंगपूर–स्टेशने, पानमळ्याचा वाडीचा बंगला, विटयाची दस्तुरी, कासेगाव–भोसेगाव–बंगले, दीड लक्ष रुपयांचे सरकारी मुनसफ कोर्ट वाई, उडतरे–उंब्रज–मल्हारपेठ बंगले, सातारा हायस्कूल व कोरेगाव शाळा, कऱ्हाडचे टिळक हायस्कूल व महाराष्ट्र हायस्कूल इत्यादीस अग्निदिव्य झाले; मानेवाडी–काळगाव, कडोली, नांद्रे येथील टपाल पेट्या व टपाल पिशव्या, डिग्रज–रत्नागिरी वाई वाठार–मेल मोटारी लुटण्यात आल्या; शिरवडे स्टेशन जाळून पाच बंदुका व दीडशे काडतुसे लांबविण्यास आली; ओगलेवाडी विटे रस्त्यावरील पूल, येरफळचा पूल, कर्नाळच्या ओढ्यावरील रेल्वेपूल (बाँबने), उडतरे पूल (डायनामेट लावून) उडवून लावण्यात आले; ता. १० सप्टेंबर रोजी साताररोड व पळशीचे दरम्यान पॅसेंजर पाडली; (१६ ऑगस्ट) किर्लोस्करवाडी–भिलवडीचे दरम्यान मालगाडी उलथवून सत्तावीस डबे कोलांट्या उड्या घेऊन पाडले व महिनाभर वाहतूक बंद पाडली; वांगीचा बंगला जाळला, शिवणीचा पूल पाडला; नांद्रेजवळ पेट्रोलिंग ट्रेन गडगडली; ताकारी स्टेशनात बाँब पडला; किर्लोस्करवाडीस बाँबने रेल्वे इंजिन उडविण्याचा प्रयत्न झाला; अंकलीच्या पुलावरील रेल्वे वॉटर हाऊस फोडण्याचा खटाटोप होऊन, पेटलोणचा डेपो उध्वस्त झाला !! सुरली घाटात टपाल मोटार लुटली, दुधोंडीचा रनर लुटला, आणि ?

अशा तऱ्हेने सरकार–सतावण्या चालू असता कुंडल–आमणापुर–पलूस भागात रामानंद महाराज हजारो लोकांच्या सभा घेऊन चळवळीचा प्रसार करीत होते; खटाव तालुक्यात माणिकचंद दोशी, बापूराव कचरे, गौरिहर

सिंहासने यांचा प्रचार उत्थापक होता; बाबूराव चरणकर–बर्डे मास्तर यांच्या प्रचाराने शिराळचा पेट्यातील साठ पाटलांचे राजिनामे झाले, लोकांनी जंगले खुली करून घेतली; नोव्हेंबर डिसेंबरचे सुमारास अनैतिक वर्तणुकीबद्दल एका टग्याचे नाक (कार्वे येथे) कापण्यात आले; डिफेन्स अॅक्टची भीती दाखवून लोकाकडून पैसे उकळण्याबद्दल एका "फुकट फौजदाराला" तशीच शिक्षा झाली; नाना पाटील समुहाने कुंडल बँक लुटली; नागठाणे येथील रानात चळवळे व पोलीस यांच्यात गोळीबार होऊन पोलीस पळून गेले; नागराळेहून किर्लोस्करवाडीस जाणाऱ्या लष्करी पोलिसांच्या बंदुकी लांबविल्या – असे अस्वस्थता निर्माण करण्यातील अराजकतेचे प्रकार चालु असताच, किसनवीर व पांडुमास्तर येरवडा जेल फोडून नोव्हेंबरमध्ये बाहेर आले होते. त्यांचे आश्रयदाते म्हणून साताऱ्यास साठ लोकांना अटक झाली!! त्यामूळे सातारा, वाई, कोरेगाव येथील हायस्कूलांनी हरताळ केले. आयर्विन-वैद्यक-विद्यालयातील तीन विद्यार्थी अटक पावले. वाईस युद्धविरोधी घोषणांनी तीन सत्याग्रह झाले. आणि किसनवीर व पांडू मास्तर यांना पकडण्यासाठी जिल्ह्यात धरपकडी, झडत्या यांची सरबत्तीच उडाली! पिसाळलेल्या सरकारने अट्टल गुन्हेगारांनाही कॉंग्रेसमेन म्हणून पकडून चळवळीला नैतिक अधःपतन देण्याचा प्रयत्न केला! तो पुढे कॉंग्रेसला चांगलाच भोवला, बाधला!! तरीही जनता दबली नाही. आमणापूरचे तेरा गुप्ते गावातच असून पोलिसांचे मारहाणीने व तीन गोळीबारांनीही पोलिसाकडे गुप्त्यांची वर्दी मिळाली नाही!!! डिसेंबरात त्यामुळे गावाला हजार रुपये दंड बसला. उलट २६ डिसेंबर १९४२ रोजी मरळी ता. पाटण येथे मुल्ला मास्तरसह सहा लोक व रामानंद भारतींना पकडण्यात आले, ते हजार रुपयांच्या बक्षीसीचे लालुचीचे जोरावर! पण सर्व अस्वस्थतेतही बॉंब प्रकरणातील आक्षेप जाऊन किर्लोस्करवाडीचा बंद पडलेला कारखाना आक्टोबरपासून सुरळीत काम करू लागला होता.

बेचाळीस (१९४२) च्या अखेरीस खटल्यातून शिक्षा पावलेले व स्थानबद्ध म्हणून साताराचे दोन हजार लोक बंदीखान्यात होते. १९४३ च्या प्रारंभी दडपशाहीमुळे चळवळे जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर पांगले. आणि? बाबूराव चरणकर, व बिळासकर पाटील वगैरेंनी २९ जानेवारीस चरण येथे वसूल संरक्षणासाठी आलेली पोलिस-पार्टी बंदुका पोशाखासह नागवी केल्याकारणाने, पेटलोंडपर्यंत लष्कर दहशतीने बिळाशीस ४५००, चरणास २०००, आरळे १५००, रुपये दंड वसुली केली! तरीही चळवळ्यांनी उंडाळे, मनू, शिताफवाडी, कुठरे, मिरुचीवाडी, चांदोली, नांदोली, मेंढवडे येथून खचणीच्या सात धरून अठरा बंदुका, उखळचाचीं एक, व साधी एक अशा. दोन तलवारी आणि चौदाबारी रायफल चळवळ्यांनी हस्तगत केल्या. ११ एप्रिलपर्यंत हा खटाटोप होत असताच,

टाकवे–पाचुंब्री येथील सरकारी रेकार्ड भस्मसात झाले; शिराळे पेटचातील दारुगुत्ते बंद पाडण्यात आले; तेरा दरोडयांचा शोध लावण्यात आला व ज्याचा माल त्याला देण्यात आला; पंचवीस दिवाणी स्वरूपाचे कज्जे मिटविण्यात आले; २७ नोव्हेंबर रोजी येळगाव येथे गोळीबाराचे जोरावर पसतीस धान्य पोती सरकार कोठयातील लुटून उपाशी गोरगरिबांना वाटण्यात आली; तात्पर्य लोकांचे जीवित, वित्त व अब्रू यांचे संरक्षण काँग्रेसच्या गुप्ते मंडळीकडून होऊ लागल्यामुळे जनतेचा त्यांना पाठिंबा होता. १९४३ फेब्रुवारीपासून न्यायदानादी कार्यक्रम सुरू झाले, ते शिराळे पेटा, मलकापूर जहागीर, शाहुवाडी महाल, अशा चारशे गावांचा टापू व्यापून बसले.

वाळवे तालुका व वारणाकाठ अशा निसर्गाकुल डोंगरी भागात ब्रिटिश व संस्थानी हद्दी भिडल्यामुळे चाळीस वर्षांची फरारी दरोडेखोरांची तेथे मिरास होती. तिच्या उलथावणीचा विचार चळवळे करू लागले. मिरजेहून रेल्वे नोकरांचा पगार घेऊन जाणारी पे ट्रेन बिचूद -- शेणोली यांच्या दरम्यान ७ जून १९४३ रोजी नाना पाटील समूहाच्या १४ लोकांनी लुटून वीस हजार रुपये लांबवले; वर्धनगड टपाल मोटार लुटून कोल्हापूर पोलिसांच्या तीन रायफली काढून आणल्या; असे विक्रम करणाराना दरवडेखोरी का आवरता येऊ नये ? तांदुळवाडीचा सावळया धनगराची टोळी कामेरी वगैरे गावाना छळत असे. तेव्हा ज्ञानु कुंभार, सखाराम बारबट्टे, व कांद्या मांगल्याचे लोक यांनी त्याचा नायनाट केला. तेव्हा दरोडेखोरानी, काँग्रेसच्या "गुप्ते" चळवळीत घुसण्याचे ठरवून शिवपुरीच्या डोंगरावरून कामेरीच्या तारा तोडल्या. आणि काँग्रेसच्या गुप्त्यांच्या सहानुभूतीचा दुरुपयोग स्वार्थ साधण्यात करून वारणेपासून काले (ता. कराड) पर्यंत धुमाकूळ घातला ! वाटेगावी गोपाळ पाटलाचा खून, कोडोलीच्या कोरे यांचेकडून पांच हजार रुपयांची मागणी अशी त्या धुमाकुळातील नमुन्याची उदाहरणे देता येतील. के. डी. पाटलांनी सखाराम बारबटयामार्फत कोरे यांना संरक्षण दिले. पण कोऱ्यांनी दिलेल्या बक्षीसातील वाटपावरून कान्दे – कामेरी टोळयात वितुष्ट आलेच, पण सखाराम बारबटे व ज्ञानु कुंभार यांचेही बिनसले !! वाटेगावचे जे लोक दरोडेखोरास सहाय्यक अशी समजूत होती, त्यांना बर्डे मास्तरनी चावडीतून ओढून ठोकले व पांच हजारांचा दंड केला. त्यामुळे दरोडेखोरांचा बंदोबस्त काँग्रेसचे " गुप्ते " करतात असा जनतेत विश्वास आला. पण सरकारला आपली इभ्रत पणाला लागल्याचे भासून दडपशाहीतील पोलीसशाही वाढली आणि सामुदायिक दण्ड व ठोकमार यांना ऊत आला. त्याने कित्येक लोक आयुष्यातून उठले ! तरीही गुप्ते सापडेनात की चळवळ थांबेना !

मग नाथाजी लाड, नाना पाटील, बर्डे मास्तर, बाबूराव चरणकर,

यांना प्रत्येकी पांचहजार, ध्वनंतरी ऊर्फ लक्ष्मण गणेश कासेगावकर, धोंडिराम माळी, अंतुकाका बर्डे, गणपती पाटील बिळासकर, प्रत्येकी ३ हजार; किसन-वीर, पांडु मास्तर, रामचंद्र परशुराम, जी. डी. लाड, आप्पा लाड, प्रत्येकी एक हजार; नागनाथ व सखाराम बारवटे प्रत्येकी दोन हजार; अशी बक्षीसे सरकारने त्यांना त्यांना पकडून देणारासाठी लावली !!! तरी सरकारचे यडताक जमेना. तेव्हा त्याचा विवेक सुटला. पाटण भागातील दरोडेखोर मंडळी-कडून आपण घातलेले दीडशे दरोडे कॉंग्रेसच्या गुप्त्यांच्या प्रेरणेने घातल्याचे जबाब मिळविण्याचा सरकारी मोहरा पालथा झाला !! तरीही सरकारी काण्याडोळ्यामुळे दरवडेखोरांचे फावलेच ! सरकारवरील जनतेचा विश्वास उडण्यास ते उपयोगी झाले. तेव्हा बर्डे, चरणकर, के. डी., धनवन्तरी, कारभारी, प्रभृती मंडळीनी मालेगावी विचार केला की दरोडेखोरांचा निःपात करण्यात आपण यश मिळवले तरच आपण निर्माण करू इच्छितो त्या प्रति-सरकारला कोणी विचारील. त्याप्रमाणे लगेच सुरवातही झाली. वाटेगांवचे दत्तु पाटलाचे येथून महादू रामोशी पेटकर व मारुती शेणेकर, दत्तूचे वडील शंकरराव यास मारीत असता दत्तूच्या आईसही त्यांनी भोसकले, ही बातमी कळताच कासेगांवचे बाबूजी पाटणकर यानी त्या दरोडेखोरावर तुळशीवृन्दावनामागून स्वतःची बंदूक झाडली. दरोडेखोरानी तोच प्रयोग बाबूजीवर केला. त्यात वरील दरोडेखोराचा एक साथी ठार झाला ! त्याने दरोडेखोर त्यावेळी पळाले. पण रान पेटलेलेच राहिले !!

बाबूजी पाटणकर व बर्डे मास्तर यांच्यावर दरोडेखोरांचा दात बसला. पणुंब्रे येथील गुप्त्यांच्या सभेस मंडळी जात असता बर्डे मास्तर व मारुती शेणेकर यांची तोंडातोंडी होऊन झडली; पण बर्डे यांच्याजवळ शिर-वड्याची बंदुक पाहिल्यावर अति प्रसंग टळला. दरोडेखोर गुप्त्यांना बिचकूच लागले.

डिसेंबर १९४२ अखेर यशवंतराव चव्हाण जिल्ह्याचे सर्व काम पहात होते. जानेवारी १९४३ मध्ये पुण्यास सदुभाऊ पेंढारकर, रंगनाथ पाटील, काशिनाथ देशमुख प्रभृती पसतीस प्रमुख असे सातारकर पकडले गेले. फेब्रुवारीचे शेवटी किवळ ता. कऱ्हाडला गुप्ते जमले. धन्वन्तरी यांचेकडे तेथे संचालन सुपूर्त करण्यात आले. याच सुमारास कऱ्हाड येथे माधवराव जाधव यानी कऱ्हाड शहरपोस्टाची थैली लुटली व पोलीस पाठलागाला दाद न देता भुईकोट तटावरून ३५ फुटांची उडी घेऊन ते पसार झाले. त्याच उत्साहाने धनवंतरी, राजाभाऊ वळवडे, तानाजी पेंढारकर, तुकाराम कोडूगळे यांना बरोबर घेऊन एकसळ येथे दादा साखवळकराकडे गेले. तेथून पांडुरंग बोराटे यासह मंडळी शिवथरचे रानात गेली. त्यांना डी. जी. देशपांडे,

किसनवीर वगैरे ६० मंडळी भेटली. अन्नान्न झालेल्या जनतेला दिलासा देण्यासारखे काम सर्व जिल्हाभर व्हावयास हवे, असे तेथे ठरले.

नंतर धन्वन्तरीनी बुवा म्हावशीकराकडे जाऊन त्या भागातील गुप्त्यांशी बोलणे केले. आणि अर्ध्या जिल्ह्याच्या संघटनेची व्यवस्था लावून ते शिराळा पेटचात शिरले. लष्कराचा धुमाकूळ तेथे छळत असता, धन्वंतरी मरळोबाच्या वाडीस आले. याच वेळी आनंदराव चिखलीकरानी दरोडेखोर रामू कांदेकर यास गोळी घालून ठार केले होते. मरळोबा वाडीहून धन्वंतरी कामेरीस कारभारी, के. डी. वगैरेना भेटून आपल्या कामास लागले. एवढ्यात शेण्याचा दरोडेखोर मारुती रामोशी कासेगावी माळचाच्या कडब्याच्या बुचाडात साथीदारासह लपून बसला होता. आपले साथीदार शेख काका, अहमदभाई, श्रीपती बुवा, किसन भोसले यांच्यासह त्याला घेरून बर्डे मास्तरानी हाक दिली. पण दहा मिनिटे वाट पाहूनही तो ऐकत नाही, असे दिसताच, बुचाड पेटवले. लगेच मारुती शेणेकर बाहेर आला. त्याच्याजवळ बार भरलेल्या बंदूकी असल्यामुळे त्यास ताबडतोब गोळी घालण्यात आली, व त्याच्या साथीदारास ठोकून फौजदारकडे पोचविण्यात आले ! ३१ डिसेंबर १९४३ पर्यंत दरोडेखोरांचा मग पूर्णपणे हताश होण्याइतका नि:पात करण्यात आला.

लोकांची कांग्रेसनिष्ठा वाढली. ही गोष्ट स्पेशल डी. एस. पी, गिल्बर्ट याच्या लक्षात आली. त्यानेही मग दरवडेखोरावर हत्यार उगारले. कामेरीस महादू रामोशीस त्याने गोळी घातली व अनेक दरवडेखोर पकडले; तसे अनेक हजरही झाले. मात्र सखाराम बारबटे, आत्माराम वशीकर, वाझरकर, असे काही कांग्रेसी गुप्त्यांच्या पाठिंब्याची मिजास मारून व रामानंद भारतीपुढे लोटांगणे घालून कातडी बचावू लागले. खटाव तालुक्यातील बुधचे आसपासचे दरोडेखोर बापूराव कचरे व कोरेगाव व सातारा तालुक्यातील पांडुरंग बोराटे यांनी पार छिनवले होते. त्यामुळे "गुंडांचे आश्रयदाते पुंड व सरकारला चहाडखोरी करून आपली पोटे जाळणारे त्रिपुंड " त्याचप्रमाणे इंग्रजी राज्य म्हणजे परमेश्वराचा अवतार मानणारे " मुखंड " पार गार पडले व प्रतिसरकारचा रस्ता साफ मोकळा झाला.

एकसळला साखवळकराकडे आणि शिवथर रानातील बैठक झाल्यावर सुरलीचे विठ्ठलराव भोसले प्रभृतीनी कुमठे येथील डाक्या (सरकारचा चहाडखोर) स शिक्षा दिली. कुलुप बंदीतील स्त्रियांना छळणाऱ्या व गुंडांच्या सहाय्याने साखरेचा काळाबाजार करणाऱ्या खटावच्या शंकर इनामदार या पोलिसाला शिक्षा केली; आर्वी, सुरली, भाडळे, ता. कोरेगाव, पुसेगाव व कुडाळ (ता. जावली) येथील टपाल थैल्या लुटल्या; आर्वी, नागझरी अशा बारा गावात पंधरा वर्षे दरसाल बेकायदा गाळण्यात येणारी साडेतीन लाखांची दारू

बंद करण्यात आली; त्याबद्दल सरकारी अधिकारी देखील प्रशंसोद्‌गार काढू लागल्याचे कानावर येऊ लागल्यावर, नांदूळनांदवळ या गावी सप्टेंबरच्या (१९४३) सुमारास सभा घेऊन ग्रामराज्य स्थापनेचा विचार झाला. देऊरचे पैसे खाण्यास सोकावलेले पाटील-तलाठी लिंब येथील दारु गाळणारे रामोशी याना ते कळताच, ते गडबड करू लागले. म्हणून त्यांचा समाचार घेऊन कोरेगाव तालुक्यात कुमठे, आर्वी, खेड, तडवळे, एकसळ, जिहे, कठापूर, इत्यादी इत्यादी पंधरा गावी पंचायती स्थापन होऊन त्यांची कामे सुरू झाली, मग वाई ता. कवठे, चांदग, गुळुम, आजगांव, आसोली, देगाव इत्यादी १२ गावी पंचायती स्थापन झाल्या आणि सातारा तालुक्यात गोवे, मालगाव, शिवथर, पाटखळ, बोरखळ, इत्यादी दहागावी तो प्रयोग करण्यात आला.

कामाचे स्वरूपः– गावातील सार्वजनिक कामाचा पैसा कोणी बळकावला असल्यास तो परत घेऊन पंचायतीत ठेवणे. कायदेशीर गावगुंडांची जाहीर चौकशी करून कायदेबाजीपासून त्याना परावृत्त करणे. मारामारी, चोरी व फौजदारी गुन्ह्याची चौकशी करून न्याय निवाडा देणे, व ते प्रकरण कोणत्याही सबबीवर कोर्टात जाऊ न देणे. दत्तक प्रकरणे व अनाथ स्त्रियांचे पोटापाण्याचा प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविणे, क्रिमिनल गुन्हेगार (विशेषतः गुलबा पाटील आंबोडे) यांना पकडून त्यांचे कबुली जबाब घेणे. मारहाणीचे काम पुढे ढकलण्यात येई. चोऱ्या व बेनवाड यासारखी फसवाफसवीची प्रकरणे उघडकीस आणणे. सामाजिक रूढी प्रचार कार्याने अयोग्य गोष्टी बंद करणे. काही ठिकाणी सामुदायिक बहिष्काराचे तंत्र याबाबतीत अवलंबिणे. विशेषतः याबाबतीत लग्नातील वाजंत्री बंद करणे. सामुदायिक लग्ने करणे. (२८ ठिकाणी सामुदायिक लग्ने केली.)

वसंतराव पाटील समूहाचा जानेवारी १९४३ हा महिना हत्यारे जमविण्यात गेला. कुपवाडला बॉम्ब स्फोट करून पांचशे रुपये सारा गुप्त्यांनी लुटला व पाटलाची बंदूक काढली. कूपवाड ते मिरज रेल्वेचे इंजिन व तेरा डबे बरबाद केले. यावेळी वसंतरावाना पकडण्यासाठी एक हजार रुपयांचे बक्षीस लागले होते. त्या आमिषाने २२ जूनला वसंतराव, हिंदुराव, जयराम, केशव बेलवदकर, आगलावे, वसंत सावंत, या सहा लोकांना सांगलीस पकडले. शनिवार २४ जुलईला सांगली जेलमधून वसंतराव पाटील, हिंदुराव पाटील, दत्ताजीराव पाटील, जयराम बेलवलकर, वसंतराव सावंत, मारुती आगलावे, जिनपाल खोत, विठ्ठल शिंदे, गणपती कोळे, आण्णा पत्रावळे, बाबू जाधव, महादेव बुटाले, बाबा शेटे, बाबूराव पाचुरे, अशा चौदा लोकांनी दुपारी तीन वाजता जेलमध्ये पहाऱ्यावर असलेल्या २२ पोलिसांच्या १९ बंदुका व २४० काडतुसे घेऊन तटावरून उड्या मारून जेल फोडून निघाले. उडी मारत

असता हिंदुराव पाटील यांचा पाय मोडला. ते तिथेच पोलिसाना मिळाले, बाकीचे लोक गावातून वार काढीत जात असता घोडेस्वारानी पाठलाग केला. एक मैल हे लोक गांवाच्या बाहेर पळून गेले होते. पोलिसांच्या लॉऱ्या सांगलवाडीस आल्यावर दोन फर्लांगावर असलेल्या या लोकावर गोळीबार सुरू केला. हे लोक नदीच्या बाजूने चिखलात पळाले. मोटारी चालेनात म्हणून पोलिसानी ज्याठिकाणी हे लोक पुढे जाणार तेथे मोटारी उभ्या केल्या, व गोळीबार सुरू केला. या लोकांनी परत गोळीबार सुरु करून त्यांना मागे सारून पुढे नदीकाठाने निघाले. पोलिसांनी पायी पाठलाग दीड मैल केला. कृष्णा वारणेच्या संगमाजवळ दत्ताजीराव पाटील, बाबूराव पाचोरे हे नदीतून पोहून पुढे निघून गेले. वसंतराव यांनी पाठलाग करणाऱ्या पोलिसा-वर गोळीबार सुरू केला. या अवधीत सात लोक वारणेचा एक प्रवाह ओलांडून गेले होते. आणखी दोघे वारणेचा प्रवाह ओलांडून जात असता त्यापैकी बाबूराव जाधव यांना वारणेंकडील पोलिसांची गोळी लागून ठार झाले. जयराम पलीकडे गेला. सांगलवाडीपासून नदीकडील पांच फर्लांग अंतरावर थकून गेलेले कुमार आण्णा पत्रावळे (वय १७) हात वर करून हत्यार नसल्याबद्दल पोलिसाना सांगत असता पोलिसानी त्यास गोळी घालून ठार केले. नदीपलीकडील १५-१६ वयाची त्या मुलापैकी २ मुले वसंतराव सावंत व जिनपाल खोत ही वारणेच्या दुसऱ्या प्रवाहातून पोहून पलीकडे गेली. काही मुले पाण्याचा अफाट प्रवाह पाहून परत वारणेच्या दोन प्रवाहा-मधील बेटात आली. वसंतराव पोलिसानी केलेल्या कड्याशी झुंज देत होते. यावेळीच कृष्णा नदीचे दुसऱ्या बाजूने डी. एस्. पी. हरीपूर या कृष्णा-वारणा यांच्या संगमावर असलेल्या गावाजवळ आला व नावेतून वसंतराव यांच्या-वर गोळ्यांचा वर्षाव करू लागला. दोन तासाच्या संग्रामा नंतर वसंत-रावांची बंदूक चालेनाशी झाली हे पाहून १५-२० मिनिटानी पोलीस पुढे सरकून जवळ येऊन वसंतराव यांच्या छातीमध्ये व खांदा यामध्ये गोळी घातल्याने ते घायाळ होऊन खाली पडले. मग पोलिसांनी जवळ येऊन त्याला पकडले. नंतर बेटात असलेल्या सहा लोकांना पकडून आणले. चार लोक सही सलामत निसटून गेले. वसंतराव व हिंदुराव यांचा एक वर्ष खटला चालवून निरनिराळ्या आरोपाखाली १३-१३ वर्षांच्या शिक्षा झाल्या. बाहेर पडल्यापैकी दत्ताजीराव पाटील ३ महिन्यांनी एरंडोलीला बॉम्बस्फोट मध्ये जखमी झालेने पकडले गेले व त्यांना कऱ्हाड जेलमध्ये आणून ठेवण्यात आले. यावेळी गुप्त्यांचे पकडून घ्यावयाचे नाही अगर भिऊन गप्पही बसा-वयाचे नाही, नांव अगर वेष बदलावयाचा नाही, आणि खेडोपाडी सावध-पणान राहून प्रचार करावयाचा असे धोरण होते.

ता. ३ जूनला कामेरीस सभा घेण्यात आली. (१९४३) जिल्ह्याचे प्रमुख सर्व भागातून मंडळी आली होती. या वेळी सरकारी दडपशाही अतिशय वाढलेने अच्युतराव पटवर्धनांचे म्हणण्याप्रमाणे चळवळ बंद करण्याचा निर्णय घ्यावा असा निरोप यशवंतराव चव्हाण यांनी दिला आहे असे शान्ताराम इनामदार सांगत होते. पण बाकी सर्व मंडळींचे म्हणणे चळवळ पुढे चालवावी. पकडले जाईपर्यंत, गोळी लागून मरेपर्यंत, स्वातंत्र्य मिळेपर्यंत अगर ज्या काँग्रेस वर्किंग कमेटीने "करेंगे या मरेंगे" आदेश दिला आहे त्यांनी ही चळवळ थांबवा म्हणेपर्यंत ! शेवटी असे ठरले अच्युतराव आदि मंडळींची समक्ष गांठ घेऊन सर्व परिस्थिती निवेदन करावी व पैशाची काही तरतूद होती का ते पहावे म्हणून जोशी काका व बर्डे मास्तर यांनी जास्तीतजास्त लवकर मुंबईस जाऊन हे काम पूर्ण करावे. के. डी. याना डिक्टेटर म्हणून नेमले; कारण अच्युतरावचे निरोपात खोच अशी होती की जनता जर तुमचेपासून दूर होत असेल तर काम ताबडतोब बंद करावे. अनुभव तर जनता दिवसेंदिवस चळवळयांच्या अतिशय जवळ येऊन राहती आहे. पण संघटना तयार झालेमुळे वरच्या लोकांची अवज्ञा करून चळवळ चालवायची नव्हती. कामे सुरूच होती. काशीळच्या रानात कसायापासून गायी सोडविल्या. शेतकऱ्याचे धन गाय इची विक्री सर्व भागात बंद केली. मसूर पोस्ट लुटले, तासवडयाच्या भागात तारा तोडल्या व चरेगावचे डाक्यास (याकूब) शिक्षा केली. नेहमी वस्तीचे ठाणे किवळ असे. बुवा म्हावशीकर यास पाटण भागावरील सरकारी दडपण कमी व्हावे म्हणून शिराळे पेट्यात पोचविण्यात आले.

मुंबईस अच्युतरावास परिस्थिती समजावून सांगून त्यांनी जिल्ह्यात काम सुरू ठेवावे असे पत्र दिले ते पत्र घेऊन वाटेगावास बर्डे, जोशी ही मंडळी परत आली. पुन्हा सर्व जिल्ह्याची पणुंब्रे (शिराळेपेटा) येथे सभा घेण्यात आली. (३ ऑगस्ट) सर्व भागातील ७५ मंडळी जमली होती. सर्व जिल्ह्याचे संघटन संपूर्ण झाले आहे याची प्रचीति म्हणून ता. २० ऑगस्ट १९४३ स रात्री १२ वाजता कोल्हापूर टोप पासून नीरेपर्यंत सार्वत्रिक कार्यक्रम सुमारे ४० ठिकाणी २००० तारा तोडून व डांब मोडून आमलात आले. सर्व जिल्हाभर सर्व अधिकाऱ्याना अचंबा वाटला ! मोटारी सोडून मशीनने जिल्हाभर केले असावे अशी समजूत त्यांनी करून घेतली.

याच वेळी यशवंतराव चव्हाण यांचे सांगण्यावरून कारभारी के. डी. पाटील, शांताराम इनामदार, भिकू पाटील, व्यंकटराव चरेगावकर, बापूसाहेब कोणेगावकर, गौरिहर सिंहासने, बाबूराव नलवडे ही मंडळी हजर झाली, व बी. बी. काळे पकडले गेले.

के. डी. हे हजर झाल्यानंतर सप्टेंबरमध्ये शिवथरला मीटींग घेऊन

त्यात धन्वंतरी यांना डिक्टेटर म्हणून नेमण्यात आले. ते सप्टेंबर १९४४ पर्यंत होते. त्यांच्या कारकीर्दीत सातारा जिल्ह्यातील कामाची प्रत्यक्ष पहाणी करण्यासाठी मुंबईहून अच्युतराव पटवर्धन यांनी खास माणूस भाऊसाहेब नेवाळकर यांना मुद्दाम पाठवून दिले. ऑक्टोबर १९४३ मध्ये भाऊसाहेब नेवाळकर प्रथम नडशी येथे येऊन धन्वंतरीना भेटले. त्यांनी मला प्रत्यक्ष सामान्य जनतेतून या कामाची पहाणी व या भूमीगत जीवनाचा अनुभव घ्यावयाचा आहे म्हणून सांगितले. सुपने, तांबवे येथे व कुंभारगांवला सर्व लोकांचे प्रेम पाहून त्यांना आनंद वाटला. नंतर पांचगणीच्या (शिराळे पेटा) डोंगरात भर दुपारी भाऊसाहेब पार थकून गेले होते. इतक्यात समोरून एक बातमीदार आला. पोलिस पार्टी फौजदार समोरून येत आहेत पळा म्हणून त्याने सांगितले. सर्व नाहीसे झाले, भाऊसाहेब यांना तसेच आडोशा आडोशाने घेऊन धन्वंतरी निघाले. समोर पोलीस दिसत होते. तरी नाव सोडून वारणा नदी ओलांडली. पलीकडील गावात मंडळी गेली. भाऊसाहेब यांचे पाय सुजून त्यांना हालता येईना. एक दिवस विश्रांती घेऊन नंतर बाबूराव चरणकर यांचेकडे डोंगरात मलकापूर संस्थानचे हद्दीत सह्याद्रीचे अत्यंत उंच शिखरावर मंडळी गेली. नेवाळकरांनी सर्व समूह हत्यारासहीत पाहिला व त्या जीवनासंबंधी सर्व माहिती, जनतेचा पाठिंबा, प्रेम, काम करण्याची पद्धती, तिचे परिणाम व प्रतीसरकारची स्वातंत्र्याची भूमी व तेथील जनता यांचा सर्व परिचय करून घेऊन कोल्हापूर मार्गे मुंबईस ते रवाना झाले.

सन १९४३ च्या जानेवारीपासून १९४४ च्या सप्टेंबरपर्यंतचे काळात वारणा नदीचे खोऱ्यातील सुमारे ६० गावात सरकारी सत्ता नाममात्र होती. नेवाळकर गेल्यानंतर जोशीकाका, धन्वंतरी, नाथाजी, यांनी मुंबईस जाऊन अच्युतरावांची भेट घेतली व प्रांतिकशी नेहमी संबंध यावा या हेतूने मुंबईस या जिल्हाच्या संघटनेचे ऑफिस उघडण्यात आले व जोशीकाका त्या ऑफिसमध्ये प्रमुख म्हणून राहिले. १९४४ चे आरंभी सुरक्षिततेसाठी सातारकर, बाबूराव चरणकर प्रभृती गुप्ते मंडळी मुंबईस गेली. या सुमारास मुंबईस गोदीत एक मोठा बॉंब स्फोट होऊन पुष्कळ लोक निराश्रित झाले होते. त्यांना सातारकरांनी मदत केली. श्रीमंत लोकांनी चळवळीला मदत म्हणून १०–१२ हजार रुपये त्यांना दिले ते भूमिगताच्या कुटुंब पोषणासाठी मुख्यतः उपयोगात आणले.

पुढे मार्च १९४४ मध्ये जिल्ह्यातील सर्व गट प्रमुख व प्रमुख कार्यकर्ते सुमारे ३०-४० लोक मुंबईस गेले. व तेथे अच्युतराव पटवर्धन, नेवाळकर, तेंडुलकर, कोल्हापूरचे प्रमुख रत्नाप्पा कुंभार यांची सभा झाली. रत्नाप्पा कुंभार यांनी दख्खनसंस्थान व सातारा जिल्हा यांचे डिक्टेटर म्हणून काम करावे अशी अच्युतराव कडून आलेली सूचना अमान्य झाली. जिल्ह्यातील एकंदर परिस्थिती पाहून या

सर्व कार्यकर्त्यांचे पांच भाग पाडून प्रत्येक भागाने जिल्ह्यालगतच्या निरनिराळ्या जिल्ह्यामध्ये काम करावे व ज्या त्या गटाचे ज्या त्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी संबंध अच्युतराव यांनी जोडून द्यावेत असे ठरले. त्या प्रमाणे पूर्व भागातील गट दोन्ही खानदेशमध्ये कार्य करणेस जाणेचे ठरले. धन्वंतरीचा गट पुणे जिल्हा, वर्डे मास्तर सोलापूर जिल्हा, बाबूराव चरणकर रत्नागिरी जिल्हा आणि किसन वीर व जोशी काका यांनी मुंबईचे ऑफिस सांभाळावे असे ठरले.

मुंबईच्या ऑफिसकडे प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील कामगारांची संघटना करणे आणि प्रांतिकशी संबंध ठेवून जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील गुप्त्यांच्या अडचणी दूर करणे हीच कामे होती. इकडे सातारा जिल्ह्यात १९४४ पासून जे काम झाले, ते १९४२ पासून चालत आलेल्या चळवळीच्या सातत्याचे होते. जानेवारीत खोडशी मुंढेच्या तारा तुटल्या, रामचंद्र हरी पवाराची बंदुक लांबविली आणि स्वातंत्र्य दिनाची (२६ जानेवारी) बुलेटीन चिकटवीत असताच माधवराव जाधव पकडले गेले! या बुलेटिनमध्ये भूमीगताचे (गुप्ते) धोरण स्पष्ट करून सरकारी हिंदी लोकांना इशारा दिला होता. त्या दिवशी ताकारी, भोसगाव, हेळवाक, खातगूण, नेर, साप येथील रहदारी बंगल्याना अग्निप्रसाद मिळाला. लगेच सरकारकडून दक्षिण कऱ्हाड तासगाव, वाळवे, शिराळे, दक्षिण पाटण या भागात पांच मैलास एकेक पोलिस पार्टी बसविण्यात आली. कऱ्हाडला लष्कर आणले गेले. सामुदायिक दण्ड जवळ जवळ साठ हजार रुपये निरनिराळ्या उध्वस्थामुळे जिल्ह्याला बसला; हजारो लोकांना ठोक मार मिळाला. दडपशाहीच्या या नारसिंहावताराचा विचार होऊनच सातारकर गुप्ते निरनिराळ्या जिल्ह्यात मुरवण्यात आले होते.

किरपे गांवी १६ फेब्रुवारीस गुप्त्यांची बैठक व्हावयाची होती त्यासाठी १५ लाच वाटचाल होत असता, दोन हजार पोलिसानी म्हावशी वेढली. स्पेशल डी. एस्. पी. गिलबर्ट वेढ्याचा नेता होता. गुजरवाडीच्या एका साठीतील वृद्धाने पोलीस कमी होते तिकडे डोंगरावर चढून सूचना खुणानी देत देत गुप्त्याना डोंगराच्या पठारावर नेण्याचे काम केले. गुप्त्यांनी तेथे विजयाचे बार काढले. त्यापुढे २३ फेब्रुवारीस गुप्ते चाफळच्या व डेरवणच्या डाक्यांचा समाचार घेऊन पुढे आपल्या कामास लागले. स्वातंत्र्य दिनाचे बुलेटिन राळे येथील खाशाबा बाबूराव पाटील, भुसावळहून सातारा जिल्ह्यात आलेले वासुदेव विठ्ठल दास्ताने, काले येथील शामु रामा साळुंखे (लुगडे नेसून उघड वावरत असणारा) यांच्याजवळ सापडल्यामुळे फेब्रुवारीत ते पकडले गेले. २५ फेब्रुवारीला साकुर्डीच्या तारा तुटल्या आणि काले येथे हरीभाऊ नरेवाडीकर याजकडे रिव्हॉल्व्हर व पांच काडतुसे सापडली म्हणून त्यांना अटक झाली.

अशा चळवळी संतत धारेप्रमाणे चालू ठेवून मुंबईस मार्चमध्ये अच्युतराव पटवर्धनांकडे नवीन आखणी झाली. तेव्हा सरकारला गुप्त्यांनी भलताच धक्का दिला. १९४३ सालात सातारा जिल्ह्यात चळवळीस भलताच जोर होता. तेथील भूमीगतांशी आटपाडी येथे कापडण्याचे धुडकूभाऊ ठाकरे खादी संघाचे व्यवस्थापक होते. त्यांच्यामार्फत अगर सखाराम सुपडू शिंपी प्रभृती सूतकताईचे वर्गात असलेल्या खानदेशी जवानांच्या मार्फत संबंध जोडून पिस्तुले वगैरे हत्यारे पैदा करावीत आणि खानदेशातील उध्वस्त. संसार झालेल्या कार्यकर्त्यांच्या योगक्षेमासाठी एखादा "कल्याण खजिना" लुटून व्यवस्था करावी असा विचार १९४३ अखेर तुरुंगातून सुटून आलेल्या काही खानदेशी तरुणांच्या मनात बळावला. त्याप्रमाणे त्यांनी आटपाडी गाठल्यावर इचलकरंजीचे डॉ. यशवंतराव कुलकर्णी यांनी त्या खानदेशी युवकांची गाठ पंढरपुरी गणपती लाड याशी घालून दिली. मग नागनाथ नायकवडी, गणपतराव लाड व खानदेशी युवक यांनी निरीक्षण करून साक्री शिरपूर या खानदेशी तालुक्यात 'कल्याण खजिना' लुटावा असा मनसुबा आखला. खानदेशचे युवक नेते विष्णु पाटील यांना सर्व कळवून सातारकर परतले.

सांगली, कोल्हापूर, निपाणी, लोंढा, कॅसलरॉक, पणजी असा प्रवास करीत लाड व खानदेशी युवक गेले. आणि रिव्हॉल्व्हर, काडतुसे, स्फोटक द्रव्ये त्यांनी सावंतवाडी मार्गे आटपाडीस गुपचूप आणली. मग होल्डॉलमध्ये हा सर्व माल आपआपल्या मगदुराप्रमाणे भरून पांगून पांगून निरनिराळ्या मार्गांनी धुळ्यास व तेथून पुढे वडजाईस जमली. तेथून १२ मैलावरील बोरकुंड येथे डॉ. उत्तमराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली खानदेशी व सातारी "गुप्ते" जमले. धुळे पोलिस हेडक्वार्टर्सचे हजेरीमास्तर यांच्याशी संधाने बांधून मसलती झाल्या. तालुक्याचा खजिना लुटण्यापेक्षा जिल्ह्याच्या इंपिरियल बँकेतून नेहमी सर्विस मोटारीने खजिना जातो, तेव्हा तीच मोटार जंगलात आडवून लुटावी असे १९४४ मार्चमध्ये हजेरी मास्तरांनी सुचविले. ती व्यवस्था वडजाईहून व्हावी असे विष्णु पाटील व (जी. डी.) गणपतराव लाड यांनाही पटले.

"खजिना नंदुरबारला जाणार आहे; त्यात पांच लक्ष पन्नास हजार आठशे पंचेचाळीस रुपये आहेत." असा संदेश १३ एप्रिल १९४४ रोजी सकाळी ११ वाजता वडजाईस आला. त्याच दिवशी हजेरी मास्तरानी एखादे कैदी पोहोच करण्यात गुंतावे अशी व्यवस्था झाली. फकिरा पाटील प्रभृतींनी चिमठाण्यास बार उडवावयाचे ठरविले. तो गांव, तेथील पोलीस ठाणें हे सर्व नागनाथ नायकवडी, गणपती लाड, उत्तमराव पाटील वगैरे मंडळींनी पाहून पारखून घेतले. ता. १३ एप्रिल रोजी रात्री व्यंकटराव धोबी प्रभृती सात मंडळी पायीच डांगुर्णे गावी धुळ्याहून पोहोचली. चौघे टॅक्सीने चिमठाण्यास

पोचून त्यांनी ती टॅक्सी परतवली. बैलगाडीतून चौघे चिमठाण्यास आले. डांगुर्ण्यास पोचलेल्या पद–यात्रिकांनी ता. १४ रोजी खजिना मोटार अडविण्याचा प्रयत्न केला पण जमले नाही. तेव्हा ते सप्तक क्विकमार्च करून धुळचास परतले. दुपारी बारा वाजता चिमठाणा–मोटार–स्टँडवर खजिन्याची मोटार आली. शिरस्त्याप्रमाणे काही उतारू खाली उतरले. मोटारीत अंदाजे २५ उतारू होते. ते सर्व मागल्या बाजूस बसले होते. पुढे कंपार्टमेंटला खजिन्यांच्या आठ पेटचा ठेवल्या होत्या त्याच ठिकाणी हत्यारी ड्रेसमधील दोन पोलिस, साध्या ड्रेसमधील हवालदार व दोन ट्रेझरी कारकून असे बसले होते. बंदुका पेटचावर आडव्या ठेवल्या होत्या.

चिमठाणे येथे मोटार येताच चौधांनी तीत विगर तिकीट प्रवेश केला. नंदुरबारला लग्नाला जाण्याची निकड असल्याची सबब त्यांनी एकेरीवर येणाऱ्या एजंटाला सांगून किसन पाटील, कळके व आण्णा मास्तर यांची बैठक बसवली. डॉ. उत्तमराव पाटील उतरले आणि मागाहून येणाऱ्या माल मोटारीने पांचच मिनिटात रवाना झाले. खजिना मोटारीत ड्रायव्हर मागे मास्तर आणि पोलिसांच्या समोरील बाकावर कळके पाटील बसले होते. ठरल्याप्रमाणे डांगुर्ण्याच्या थोडे पुढे दोडाईचे रोडवर वडजाईचा इसम चिमठाण्यापासून एक मैलावर गाडी उभी करून उतरला. तेव्हा संकेत स्थळ जवळ आल्याचा इशारा झालाच! मोटार येत आहे असे पाहून चौघांची मारामारी सडकेवर सुरू झालीच होती. ड्रायव्हरने भोंगा दिला, पण नागनाथ नायकवडी, धोंडीराम माळी हे सातारकर खानदेशच्या शंकर माळचाशी सावधानतेने भांडत रस्ता आडवून बसले. ड्रायव्हरने मोटार बाजूने काढण्याचा प्रयत्न करताना गाडीचा वेग कमी होताच नागनाथ नायकवडीने बिलगून ड्रायव्हरला मोटार थांबविण्यास सांगितले. तो ऐकेना तेव्हा नागनाथने त्याच्या हातावर दोन गोळ्या झाडल्या. मोटारीतील पोलिसांनी बंदुका वर हात घातला. धोंडीराम माळीने मोटारीतच रिव्हाल्व्हर झाडले. ड्रायव्हरचे डोक्यास गोळी लागून मोटार थांबली. पोलीस हवालदार जखमी झाला. पोलीस गडबड करू लागले. त्यांनी धोंडीराम माळीच्या रिव्हॉल्व्हर घेतलेल्या हाताचे मनगट पकडले. म्हणून धोंडीरामनी पोलीसास एक गोळी घातली ती त्याच्या छातीत आरपार जाऊन धोंडीरामचे सहकारी श्री. कळके यांचे मनगटात घुसली. कळके यांचे जखमेवर एक रुपाया ठेवून धोंडीराम यांनी त्यावर पट्टी बांधून रक्तस्राव बंद केला. पण बंदुका, काडतुसे व पोलिसांचे ड्रेस "गुप्त्यांनी" ताब्यात घेतले. मोटारीची दोन चाके पंक्चर केली. प्रवाशांना झाडाचे सावलीत बसविले. सदर घटना बारा ते एक वाजता दिवसा पांच मिनिटात घडली. वडजाईचा संकेतदाता भिक्सन पाटील याने डॉ. उत्तमराव पाटलाना सर्व घटना सांगितली. मालमोटारीने

गेलेल्या उत्तमरावानी प्रथम घटनेच्या जागेवर पोहोचून ती माल मोटार निकामी केली. खजिना मोटारीतील जखमी पोलिसांच्या व ड्रायव्हरच्या जखमा बांधल्या. मग ८२५ रुपयांची चिल्लर तेथेच टाकून आणि सर्व नोटा गोणा-धोतरात बांधून 'गुप्ते' डोंगराचे रस्त्याने लांभकानी गांवचे दिशेने निघाले. दमल्याभागल्या मंडळीनी चार मैलावरील एका विहिरीवर पाणी पिण्याचा कार्यक्रम आरंभिला असता, साळवे गावच्या ठाकूर गुराख्याने एक दहा हजारांचे गाठोडे नजर चुकवून लांबवले !

एवढ्यात माल मोटारचे ड्रायव्हरने दोन चाके काढून प्रवासी मोटार दुरुस्त केली. व जखमी लोकाना घेऊन त्याने सिंदखेड हे पोलीस ठाणे गाठले. तेथून बातमी धुळे पोलिस स्टेशनला गेली. शिंदखेड व धुळे येथून पोलीस सुटले. घटना स्थळापासून बारा मैलावरील लांभकानी गावचे आसपास पोलीस व "गुप्ते" यांची अर्धातास गोळीबाराची लढाई झाली. गोळीबाराची ती लढाई अंधार पडल्यामुळे थांबली. एक गोळी गणपती लाड यास लागली. त्याचे डावे पायाचे पिंढरीतून आरपार गेली. लगेच धोंडीराम माळी यांनी आपली विजार फाडून त्याचा पाय बांधला. दुसरी गोळी आली ती धोंडीरामचे डावे ढुंगणा-जवळून चाटून गेली. त्याला लागले नाही. पण चामडे भाजले. तिसरी गोळी आली तिने दगडावर पडून उडी घेतली व नागनाथचे कोटाचे कॉलरवर आदळली. गोळी घुसली नाही. पण मार मोठा मिळाला. व त्याचा डावा खांदा सुजून दुखू लागला. धोंडिराम रिव्हॉल्व्हर गोळच्या झाडून संरक्षण करीत होता. गणपती लाड व नागनाथ बंदुकी चालवीत होते. डॉ. उत्तमराव गाठोडी ओढ्यात पुरण्याच्या धांदलीत होते. १५ एप्रिल रोजी नाथाजी लाड यांनी बोरकुंड गावी जाऊन सरकारी अधिकारी असलेचे दमात गुप्त्यांना बैलगाड्या मिळवून दिल्या व सातान्याकडे रवाना होण्याची व्यवस्था घडविली !

ती घडविताना नवलाणे गांवच्या जंगलात नोटा पुरून ठेवल्या होत्या त्या तीन दिवसात काढल्या पण जंगलात बारा हजारांच्या राहिल्याच ! शेत ओखणी करताना दोघा साळदाराना त्या मिळून आल्या म्हणून त्यांनी साळ-दारी सोडून दिली. त्यांच्या चैनबाजीने सरकारला पुढे गुप्त्यावर खटला भरता आला ! मिळालेल्या नोटापैकी खानदेशचा हिस्सा १८ एप्रिल रोजी काढून बाकीचे पैसे गाठोड्या गाठोड्यांनी लपवून अनेक हालअपेष्टा आणि कष्ट घेऊन दीड महिन्याने आटपाडीस सातारी व खानदेशी गुप्त्यांची बैठक झाली. हिंदुस्तानची चळवळ चालविणेसाठी २५ टक्के म्हणून शिरस्त्याप्रमाणे सव्वालाख रुपये अच्युतराव पटवर्धनांचे स्वाधीन करण्याचा निर्णय होऊन तशी व्यवस्था लावण्यात आली.

चिमठाणा (प. खानदेश) खजीना लूट प्रकरणी खानदेशातील शंकर

माळी, व्यंकट तानाजी धोबी, डॉ. उत्तमराव पाटील व विष्णु सिताराम पाटील ही प्रमुख मंडळी होती. प्रत्यक्ष लुटीत शंकर माळी व डॉ. उत्तमरावच होते. सातारा जिल्ह्यातील धोंडीराम माळी (कूपवाड), नागनाथ नायकवडी (वाळवे), आप्पा पाटील (साखराळे), किसन मास्तर (गोंदी), गणपतराव लाड (कुंडल), निवृत्ती कळके (कवठे एकंद), एवढी सहाच मंडळी प्रत्यक्ष लुटीत होती. सरकारने फक्त सात जणांवर खटला भरला. हा खटला खानदेशचे दे. भ. वॅ. मोरे, मुंबईचे वॅ. जपे आणि दे. भ. बॅं. नरीमन यांनी आरोपीतर्फे चालविला. व्यंकटराव धोबी (बोराडी), शंकर पांडु माळी (शिरपूर), व धोंडीराम तुकाराम माळी (कुपवाड जि. सातारा) यांना फक्त जन्मठेपेच्या शिक्षा झाल्या. १९४६ तील कॉंग्रेस मंत्रीमंडळाने त्या पुढे माफही केल्या. चिमठाण्यास लुटलेल्या कल्याण खजिन्यातील ८२५ रु. चिल्लर लुटीच्या ठिकाणीच फेकून दिली होती. बारा हजार सारदाळाना जमिनीत सापडले आणि तेवढेच ठाकूराने लांबवले होते. सव्वालक्ष रुपये हिंदुस्तान चळवळीसाठी गेले. एक लक्ष रुपये खानदेशचा वाटा खानदेशला देण्यात आला होता. रस्ते दाखवणाऱ्या, गाड्या देणाऱ्या मंडळीस बक्षिशी आणि प्रत्यक्ष भाडेखर्च व जेवणखर्च झाला तो वाजवी झाला असला तरी विश्वासाने प्रवासात ज्यांच्याकडे मुक्काम ज्या गुप्त्यांचा झाला, त्यांनी लॉंजिंग – भाडे म्हणून आपल्याच हाताने पाऊण लाख रुपये लंपास केल्याचा बोभाटा होता ! तो खरा घेऊन चालल्यावर सातारा जिल्ह्यात सव्वा दोन लाखाचेवर रक्कम आली. व ती खानदेश प्रमाणेच सातारा जिल्ह्यातील गुप्त्यांच्या कुटुंबियांच्या " दुरिताचे तिमिर जावो ! " म्हणून खर्च झाल्याचा गुप्त्यांचा निर्वाळा आहे.

चिमठाण्यास कल्याण खजिन्याची मोहिम झाली त्या काळातही सातारा जिल्ह्यात गारीगार नव्हते. मालखेडचे न्यायदान आणि बंदुकांची पळवणी, कऱ्हाड मामलेदार कचेरीसमोरील रेनगेजची उचलबांगडी, आणि यापेक्षाही १४ जून १९४४ रोजी दत्तू बाळा पाटील, शामगौंडा भीमगौंडा पाटील, माधवराव जाधव, भिकाजी रंगो कुलकर्णी, या मंडळींनी कऱ्हाड जेलमधून शिवाजीमहाराजांच्या " आग्र्याहून सुटकेची " हुबेहुब नक्कल उठविली. अरेबापरे ! त्यातच भर म्हणून २७ जूनला कार्वे ता. कऱ्हाड येथे रामचंद्र बाळाजी थोरात विरुद्ध आत्माराम नारायण जाधव, दाजी तात्या थोरात, ज्ञानू मळेकरी, आप्पा नारायण जाधव, खाशाबा जाधव, राजाराम जाधव, रंगू जाधव. विष्णु थोरात, राजाराम पिसाळ, बादशहा लाला मुलाणी, व येरवळचाचे पांच गुप्ते यांची जी मारामारी झाली तिने ब्रिटिश रियासतीच्या सातारा जिल्ह्यातील बरकंदाजांना काही निराळीच स्वप्ने पडू लागली. कारण ?

त्यांनी साताराचे डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेन्ट ऑफ पोलीस वी. जे. हॉब्सन

यांच्यामार्फत २१ जून १९४४ रोजी ४२५०० रुपयांची बक्षिसे जाहीर करून गुप्ते पकडून मिळावेत म्हणून जनतेस आवाहन केले होते. नाना पाटील (येडेमचींद्र) व बाबूराव चरणकर, नाथा लाड (कुंडल) प्रत्येकी पांच हजार, बिळासकर गणपतराव पाटील, लक्ष्मणराव कासेगांवकर (धन्वंतरी), अनंतराव बर्डे (वाटेगाव) धोंडीराम माळी (कुपवाड) प्रत्येकी तीन हजार, पांडुरंग हरी रामोशी (खानापूर) दोन हजार, सखाराम बारवटे (कामेरी) दीड हजार, गुंडबसर (मंगसुळी), गणपतराव लाड (कुंडल) रामू सखाराम पवार (कुंडल), शंकर शिंदे (दुधोंडी), पांडु मास्तर (येडे निपाणी), ज्ञानू संतू जाधव चौकीवाले (ताकारी), निवृत्ती काका पाटील (कुरळप), आणि किसन वीर (वाई) प्रत्येकी एक हजार, त्याच-प्रमाणे नागनाथ नायकवडी, शेख काका (येळगाव) रंगराव पाटील (शिरगाव), विठ्ठल बुवा घाटगे (म्हावशी), चांदबुवाशा पटवेगार (कुंडलवाडी), बापू सोना शेडगे, मारुती ज्ञानु हवालदार (बिळाशी) गंगाराम गंगाधर पानसे (पसरणी) प्रत्येकी पांचशे, अशी होती ती गुप्ते धरणीची रुपेरी मोहिनी !! तिच्या छुम छुम कडे कोणी कान टवकारून बघू लागला, तर दुसरेही आवाज त्याच्या कानावर कमी येत नव्हते.

जुलई २३ ला सवादे येथील न्यायदान गाजले. ऑगस्टच्या आरंभी मेंढरे व कपडे यांची तुळसण येथील चोरी हुडकून गुप्त्यांनी ज्याच्या वस्तु त्यास दिल्या; विंग, टाळगाव (दत्तात्रय पांडुरंग तलाठी) येथे चहाडखोरांना अद्दली घडल्या; सप्टेंबरमध्ये वडगाव हवेलीच्या विष्णु जगतापाची बंदुक व पन्नास काडतुसे गुप्त्याकडे आली. टाळगावच्या गोविंद पांडुरंग कुलकर्ण्यास ऑक्टोबरमध्ये चहाडखोरीबद्दल प्रायश्चित मिळाले; नोव्हेंबरमध्ये कऱ्हाड ढेबेवाडी रस्त्यावर तांबवेकर गुप्त्यांनी बैल पळवणारांचा समाचार घेतला; डिसेंबरमध्ये शेख अजीज अल्लाबक्ष याची ४१० बोअरची रायफल गुप्त्यानी आपलीशी केली. अशा सारख्या वार्ता वृत्तपत्रात डोळयांना दिसत होत्या आणि त्याच्याही अगोदर उघडया कानाला ऐकू येत होत्या !! २० डिसेंबर रोजी कुमठे ता. कोरेगाव येथे हरीभाऊ गोविंदराव जगदाळे यांचे मोसंबीचे बागेत कट ठरून सदर जगदाळे, संपतराव जगदाळे, महादेव तुकाराम माळवदे, मणिलाल नानचंद मेहता, सदाशिव जगदाळे, तुकाराम पवार, सर्जेराव पवार, शंकर (क्लीनर), सुंदरसिंग, बाबुराव जंगम, ज्ञानू गुरव, या मंडळींनी २४ डिसेंबर रोजी सातारा पोलीस हेडक्वार्टर्समधून, तीन बंदुका मोटार मधून लांबविल्या त्या मग किसन वीर, पांडुरंग बोराटे, बापूराव कचरे यांच्या स्वाधीन झाल्या. असे असूनही ऑगस्ट १९४४ चे सुमारास मुंबईस भूमीगतानी आता गुप्त राहू नये उघड व्हावे, असे गांधीजींचे धोरण असल्याचे बुवा गोसावी यांच्या कडून मुंबईस असणाऱ्या

सातारकर गुप्त्यांना कळले. त्यामुळे मग मंडळींनी अच्युतराव पटवर्धनांच्या अध्यक्षतेखाली एक गुप्त बैठक घेतली. त्या बैठकीत गांधीजींचे सल्ल्याप्रमाणे, ज्यांना उघड व्हावयाचे असेल त्यांनी उघड होण्यास हरकत नाही, असे ठरले. मुंबईच्या या गुप्त बैठकीला सुमारे ३-४ शे कार्यकर्ते हजर होते. ठरलेल्या धोरणाप्रमाणे सातारा कलेक्टरला चरणकर, गणपतराव पाटील बिळाशी अशा एकूण सात लोकांनी पत्रे लिहून आपला ठावठिकाणा कळविला. त्याप्रमाणे सातही जणांना पोलिसांनी अटक करून नेले. पोलिसांच्या बंदुका चोरल्याबद्दल खटला भरला पण पुराव्याचे अभावी सर्वजण निर्दोष सुटले. पुढे सातही जणांना डेटेन्यू करून सुमारे १८ महिने तुरुंगात ठेवले. साती जणांची घरची बायका-मुलेसुद्धा सुमारे एक वर्ष तुरुंगात होती. सर्व स्थावर जंगम इस्टेट सरकारने जप्त केली होती.

श्रावणात जिन्ति, कासारशिरंबे, मनु, वाटेगाव, पाचुंब्री या गावचे लोक शिकारीस गेले असता दरोडेखोर लोकांनी त्यास मार दिला व त्यांच्याजवळचे भाले, कुऱ्हाडी, कपडे, चांदीचे करदोडे व चीज वस्तू लुटल्या. या दरोडेखोरांना पकडून आणून त्यांना मार देऊन त्यांच्याकडून नुकसान भरपाई करून घेऊन ज्यांच्या त्यांना गुप्त्यांनी सर्व वस्तू दिल्या. वाटेगावच्या जनतेला छळणारे क्रिमिनल गुन्हेगार यांना पकडून संस्थानी पोलिसांच्या ताब्यात दिले. टाळगाव येथे सभा घेण्यासाठी गुप्ते गेले असता ६० पोलीसांचा छापा आला होता. त्यातून सर्वजण निसटून गेले. रात्री परत येऊन पोलीसांच्यावर हल्ला केला. बाबूराव चरणकर यांचा ५००० चा झालेला दरोडा गुप्त्यांनी काढला. ऑक्टोबर ४ ला नाना पाटलाची सभा पाणुंद्रीत घेतली. २००० कार्यकर्ते हजर होते. तेथून बर्डे मास्तर पकडले गेले. नंतर ३०२ खाली मारुती शेणेकर याच्या खुनाची केस त्यांचेवर भरली. पूर्वीच २ जूनला बाबूजी पाटणकर वाटेगावला आले होते. त्यांनी कुंभारगावचा डाक्या नानासाहेब कुमठेकर याना पत्र्या लावल्या. ४-५ दरोडे काढण्यात येऊन मालमत्ता ज्यांची त्यांना दिली. मुंबईहून पांडू मास्तर, शेख काका, नागनाथ पाणुंद्रीस आले. (नोव्हेंबर) कोल्हापुरापासून पालीपर्यंत पांडूमास्तर यांच्या नेतृत्वाखाली २५० सभा घेण्यात आल्या. ग्रामराज्य स्थापणे, ब्रिटिशाविरुद्ध लढा करावा, छापा आला असता गावचे संरक्षण करणे वगैरे कार्याचा प्रचार केला. सोनावडे येथे दारुबंदी हितोपदेश देऊन ५०० घागरी रसायन ओतून शिंदेवाडीच्याही दारूच्या घागरी ओतल्या; चाफळ खोऱ्यात दारूबंदी केली. नाणेगाव येथील २-३ दरोडे काढून दिले. कुट्रे, कारळे, उंबरकांचन, साईगडे, या भागात व इतर आसपासचे भागात दारुबंदी केली. मानेवाडी येथील १००० रुपये वसूल केले ते तेथील मुलांना दिले. वीर, टीके वगैरे १० लोकांनी दुपारी ३ वाजता लोणंद येथील

दोन बँका लुटल्या. त्यात ९ लोक मुद्देमालासह पकडले गेले. व एक दत्ताजीराव पाटील हे सर्वांच्या हातावर तुरी देऊन पळून आले मार्च १९४५. त्याचप्रमाणे बोरगाव येथील टपाल लुटले. त्यात सदू नलवडे यास ३॥ वर्षे सक्तमजुरी शिक्षा झाली. व त्यांचे बंधू पळून गेले. पेठेजवळ जांभूळवाडीच्या तीन लोकांना चोऱ्या केल्याबद्दल पत्र्या मारल्या. १९४४ डिसेंबर २ ला वाळव्याला मीटिंग झाली. २६ डिसेंबरला कऱ्हाड हेडक्वार्टर्स हत्यारखान्यातील एक बंदूक काढली. ही बंदुक पोलिसांचे सहाय्याने काढली. ४ दिवसात रंगू कुंभार यांच्या घराजवळ जप्त केली. ३ पोलीस व महींद मास्तर वगैरे ६-७ लोकावर केस चालून सर्व निर्दोषी ठरले. जानेवारी ४५ मध्ये दुसाडची चोरी काढली. व ज्याची त्यास दिली. मार्च मध्ये मेरुगडाच्या वाडीला मीटिंग घेतली.

जानेवारी १९४५ मध्ये मुंबईस पुन्हा सर्वांची बैठक अच्युतरावनी घेतली होती. ४० लोक हजर होते. त्यावेळी जिल्ह्यात परत जाण्याचे व जिल्ह्याची घटना ठरविण्याचे निश्चित झाले. किर्लोस्कर बँक लूट प्रकरणाची चौकशी होऊन ते सर्व पैसे परत करण्याबद्दल ठरले व त्याबद्दल अच्युतराव यांचेकडून परस्पर इसम शंकरबुवा शिंदे यांचेकडे पाठविण्यात आला. परंतु पैसे दिले न गेल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंग करून त्यांना संघटनेतून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर ८-३-४५ ला सूरगुंड्याच्या वाडीला सभा होऊन घटना ठरविण्यात आली. पुढे प्रत्येक कार्यकारिणीच्या बैठकीचा अहवाल प्रांतिककडे पाठविण्यात येत असे. १४-७-४५ ला अच्युतराव, नेवाळकर कुंडलच्या बैठकीला पहिल्यांदा सातारा जिल्ह्यात आले. बहुतेक कार्यकर्ते जमले होते. तुफान सैनिकांनी त्यांना सलामी दिली. कुंडल येथे त्यावेळी त्यांनी सेवादल व तुफान संघटना कशी एक झाली पाहिजे हे विषद करून सांगितले. त्यानंतर जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते (अदमासे ७८) यांची भाई अच्युतराव, शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन यांचेशी चर्चा होऊन शंकरराव देवांनी रावसाहेब पटवर्धन व खुर्शीद बेन यांना एक महिना जिल्ह्यामध्ये राहण्याची व प्रत्यक्ष पहाणी करून वर्तमानपत्रामध्ये जर लष्कराकडून अत्याचार झाले तर त्यासंबंधी खरी माहिती प्रसिद्ध करून प्रसंग आलाच तर सर्व काँग्रेसची शक्ती पणाला लावण्याचे अभिवचन दिले. त्यानुसार जिल्हा काँग्रेस कमेटीची सभा सातारा येथे झाली. त्यावेळी शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन उपस्थित होते. जिल्ह्यातील सुटून आलेल्या कार्यकर्त्यांना धोक्याचे वातावरण दिसून न आल्यामुळे तूर्त वरील दोघापैकी कोणी राहू नये असे ठरले. त्यानुसार शंकरराव देवांनी दोनतीन निवेदने वर्तमान पत्रातून दिली.

सातारा हेडक्वार्टरमधून बंदुका पळविण्याच्या गुन्ह्यासाठी तारीख १-१-१९४५ रोजी हरिभाऊ जगदाळे यास अटक होऊन त्यांना कऱ्हाड, बोरगाव,

अतीत, सातारा, उंब्रज पोलीस-स्टेशनवर मारहाण झाली. त्यानंतर ता.९–१–४५ रोजी राहिलेले सर्व अटक होऊन हरीभाऊ जगदाळे, महादेव तुकाराम माळवदे मणिलाल नानचंद, सुंदरसिंग, ज्ञानू गुरव यांचेवर केस झाली. ती एक वर्षभर चालून डिसेंबर १९४५ मध्ये सर्व निर्दोषी सुटले. परंतु लगेच त्यास स्थानबद्ध करून ठेवले. सदर खटल्यात मारहाणी मणिलाल नानचंद यांना सहन न होऊन सन १९४५ फेब्रुवारीत त्यांचा अंत झाला होता. आणि कुमठे ग्रामस्थानी एक वर्ष पोलिसी जाचात काढले. त्या अवधीत पोलिसांचे धाकदपटशामध्ये गीता तेलीण ही स्त्री हबकून मरण पावली.

गुप्त्यांनी जानेवारी १९४५ मध्ये दारुबंदीचा कार्यक्रम हाती घेतला होता. म्हसकरवाडी, येळगाव, काळगाव, कोकरूड, कुंभारगांवच्या १२ वाड्या, मांगले, धामणी, दिगी, शिराळे, रेठरेधरण, मनू, नांदगांव, कोळे या गावचे दारुगुत्ते बंद केले. खाजगी दारू बंद केली. गांजाची दुकाने बंद केली. डिसेंबर १९४४ मध्ये वाटेगावाला दहा दिवसांचे सेवादल शिबीर घेतले होते. त्याचे वाटेगावी ३१–१–१९४५ ला स्वामी रामानंदांच्या हस्ते उद्घाटन झाले. याच दिवशी गिल्बर्टने शिबिरावर छापा घालून खूप नासधूस केली. खिरीत माती घातली. मुलांना मारहाण झेंडे रंगवल्याबद्दल केली. व त्यांचे जवळील पैसे घेतले. शिबिराच्या शिक्षकांना पकडून नेले. मारहाण पोलिसांनी केली म्हणून जनतेने मोठमोठाली दगडे रस्त्यात ठेवून अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संध्याकाळी ६ ला सभा व्यवस्थित पार पडली. मार्चमध्ये प्रौढ शाळा व लायब्ऱ्या उघडण्यात आल्या. २०० गावी शाळा व लायब्ऱ्या उघडल्या. आजारी अवस्थेत ६ जानेवारी १९४५ रोजी स्वामी रामानंदभारतींची तुरुंगातून मुक्तता झाली. आपल्या प्रकृतीची पर्वा न करता जिल्ह्यात आल्याबरोबर नाना पाटील आदी सर्व भूमीगत कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून ग्रामराज्याच्या प्रचारासाठी स्वामीजीनी तुफानी दौरा खेडोपाडी सुरू केला. भूमीगत कार्यकर्तेही त्यांच्या सभांना हजर रहात. त्यांनी सभाबंदी, भाषणबंदी असताना एकूण १०८ सभा घेऊन जनतेमध्ये फार मोठी चेतना निर्माण केली.

२६ जानेवारी १९४५ च्या स्वातंत्र्य दिनी ऐतवडे बुद्रुक येथे सेवादल बौद्धिकासाठी स्वामीजी गेले होते. मंडळी जेवत असताना गिलबर्ट याने मोठा छापा घातला. त्यावेळी वीर, नागनाथ वगैरे प्रमुख गुप्ते पोलीसांचे हातावर तुरी देऊन निसटून गेले, मग येरवळे ता. कराड येथे २९–१–१९४५ रोजी सेवादल बौद्धिकासाठी स्वामी गेले होते. ७–८ हजार जन-समुदायापुढे स्वामीजींचे भाषण सुरू होते. जनतेने आपल्या ठिकाणी कणखरपणा आणून शत्रूला नेटाने तोंड दिले पाहिजे अशाप्रकारे भाषण चालू असता १०० पोलिसासह गिलबर्टने सभा वेढली परंतु स्वामीजी आपल्या भाषणातलोकाना अभय देत असल्याने

एकही मनुष्य भीतीने पळून गेला नाही. सभेनंतर गिलवर्टने १४–१५ लोकांना पकडून नेले, व आठ हजार लोकांना तयार करून ठेवलेल्या अन्नात पोलीसानी माती कालवली. अशा संकटातून सभा यशस्वीपणे पार पडल्यामुळे लोकामध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

जिल्ह्यात आरंभापासून चालू असलेल्या चळवळीत प्रामुख्याने सांगावयाचे तर १९३० मध्ये कुंभारगावी झालेल्या जंगलसत्याग्रहापासून निष्ठेने देशसेवा करणारे, १९३२ मधील सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचा पस्तीसावा सर्वाधिकारी म्हणून सहा महिने शिक्षा भोगून आलेले आणि १९४१ मध्ये महात्माजींच्या खास परवानगीने वैयक्तिक सत्याग्रहात तीन महिने बंदीखाना बघून आलेले कुंभारगावचे विठ्ठल नारायण कुलकर्णी यांनी १९४२ मधील नऊ महिन्याची स्थानबद्धता भोगून आल्याबर १९४३–४४ सालअखेर काले, येळगाव या टापूत सेवादले उभारली आणि १ फेब्रुवारी १९४५ पासून येळगाव येथे सेवादल-शिबीर घेतले. सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष रामानंद भारतीनी उद्घाटनाचे भाषण शिबिराधिपती विठ्ठलरावांच्या विनंतीवरून केले. त्या दिवशी सकाळी ८ वाजल्यापासूनच गिलबर्टने साडेतीनशे पोलिसांचा गराडा देऊनच येळगांव वेढले होते. व शिबिराचा कोठारी बंडोबा पाटलाला ठोकून तेथील भाकऱ्या गिलबर्टने पळविल्या होत्या ! सभेस येणारे लोकांचे मार्ग रोखून काहीना मारहाण व सायकलवाल्यांच्या व्हॉलटचूब्ज गिलबर्टने काढून घेतल्या. त्यामुळे चिडलेल्या लोकांनी रस्त्यावर दगड रचले. पण शिबीर सैनिकांनी ते काढून टाकून मार्ग साफ केल्यामुळे त्यांचे आभार मानल्याशिवाय गिलबर्टला राहवले नाही ! मग शिबीर महिनाभर व्यवस्थित चालून नाशिकचे गोविंदराव देशपांडे यांचे हस्ते त्याचा समारोप झाला. त्याने स्थानिक पोलिस अधिकच बिथरले, सब-इन्स्पेक्टर नाडकर्णी यांनी घोगाव ता. कराड येथील शाळा मास्तर खाशाबा पांडुरंग पाटील व कामगार पाटील यांना त्या गांवी गुप्ते आश्रय घेतात म्हणून मार्चमध्ये सुंदरी–भरमाप्पाचा प्रसाद दिला. तेव्हा नाडकर्णी यांच्यावर त्या दोघांची फिर्याद झाली. व नाडकर्णींची ग्रेड तुटली ! पण त्या फिर्यादीचे उत्तेजक म्हणून विठ्ठलरावाना नाडकर्णींनी स्थानबद्ध करून आठ महिने नाशीक जेल दाखवलाच ! !

सातारा जिल्ह्याचे नित्य नैमित्तिक चालूच होते. ३ फेब्रुवारी १९४५ रोजी मारुती बहिरू पाटलाजवळची ३०३ बोअरची रायफलची काडतुसे गुप्त्यांनी पळवली व १६ मे रोजी कार्वे तलाठी सखाराम बळवंत दमामे याचे शंभर रुपये व पुढे एका आठवड्यातच कऱ्हाडच्या रिसालदाराची बंदूक गुप्त्यांनी हस्तगत केली.

ता. ४–२–१९४५ ला चाफळ येथे लग्नाचा समारंभ होणार होता. दहा

बारा हजार जनसमुदाय जमला होता. रामानंद स्वामींच्या हस्ते हा समारंभ पार पाडावयाचा होता. गिल्बर्ट पोलिसाना घेऊन आला होता. स्वामीजी सभेत बोलत असता गिलबर्टने स्वामीजीना पोलीसामार्फत बोलावणे पाठविले होते. स्वामीनी गिलबर्टची भेट घेतली नाही. जिल्ह्यात ठिकठिकाणी अनेक भूमीगत कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी झाल्या. सभाबंदी, मिरवणूकबंदी होती तरी खेड्यापाड्यात स्वामीजी सभा घेत होते. यांपैकी काही सभांना १०।१०, १५।१५ हजार स्त्री-पुरुष येत. स्वामीजी सेवादलाचे लोकांना उपदेश करीत होते. हिंसात्मक चळवळ करू नये असाही उपदेश करीत होते. अशा सभा घेत असताना ऐतवडे केळाचे (ता. वाळवे) येथे जेवण करीत असताना गिलबर्ट यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी छापा घातला. सभा निर्विघ्न पार पडल्या आणि लोकात अमाप उत्साह दिसून आला. भूमिगतांनी काही विधायक लोकोपयोगी कामे केली असल्याने त्यांचा समाजावर चांगला परिणाम झाला होता. अशा रीतीने तीन महिन्यात १०८ सभा झाल्या. स्वामीमागे तीन वारंटे होती. असे कानावर होते. अखेर अति श्रमाने संधिवाताने अजारी पडल्याने गोंदी (संस्थान औंध) येथे सुमारे दीड महिना मुक्काम करावा लागला. एका वर्तमान पत्रात स्वामी भूमीगत आहेत अशीबातमी आल्याने स्वतः त्यांनी सातारा कलेक्टरला पत्र लिहून आपण भूमीगत नसलेबद्दल पत्ता देऊन कळविले. त्याप्रमाणे आजारी परिस्थितीतच अटक करून त्यांना कऱ्हाडला व पुढे औंधला पाठविण्यात आले. तेथे श्री. आप्पासाहेब पंतानी त्यांची चांगली व्यवस्था ठेवली. पुढे पुन्हा कऱ्हाडास आणून खटल्याचे काम एक वर्ष चालले. त्यामुदतीत कऱ्हाडास भडकमकर धर्मार्थ दवाखान्यात डॉ. श्री. म. कुलकर्णी यांचेकडे आजारी स्थितीत होते. १९४६ मध्यें काँग्रेस सरकार मुंबई प्रांतात आलेनंतर त्यांचेवरील तीनही खटले काढून घेण्यात आले. या काळात पोलिसांचा खडा विरोध असूनही लोकांचा फार दांडगा उत्साह टिकून राहिला आणि काही ठिकाणी काही लोकांकडून अनुचित प्रकार घडले असले तरी, प्रतीसरकारकडून लोकसुधारणेची विधायक कामेही पुष्कळ झाल्यामुळे या भूमिगत कार्यकर्त्यांवर लोकांचे प्रेम कायम होते. सुमारे पांच हजार रुपयांच्या थैल्या वेळोवेळी स्वामींना मिळाल्या त्या सर्व लोकोपयोगी कामातच खर्ची घातल्या. दरम्यान सातारा जिल्ह्यातील अन्य गुप्त्यांचे इंग्रजी राज्याविरुद्ध व इंग्रजी राज्याच्या साथ्याविरुद्ध कार्यक्रम चालूच होते.

जून १२ तारखेच्या सुमारास किसन न्हावी कऱ्हाडकर प्रत्येक राजकीय केसमध्ये साक्षीदार, राजकीय कार्यकर्त्यांना पकडून देण्याचे प्रयत्न करणारा व अनैतिक म्हणून त्यास पत्री मारली. चौथ्या दिवशी त्याचा भाऊ त्याच्या मरणसमयी दवाखान्याजवळ येऊन प्रत्यक्ष बोंबलून सांगत होता की हे किसन न्हाव्याच्या पातकाचे प्रायश्चित्त त्याला मिळाले. डोरोशी शेजारच्या वाडीचा

सावळाराम याचा जमिनीचा योग्य हिस्सा गुप्त्यांनी त्याचे भावापासून व बापापासून घेऊन दिला. शिरगावची संपूर्ण दारुबंदी केली. पालीची ५–७ डबे दारू शोधून काढून ओतून दिली. कालगावचे सोन्या पाटील, बाबू गुरव, इस्माईल आणि राजाराम पाटील हे गावातील गरीब शेतकऱ्यांच्या बायका, मुली मुंबईस नेऊन विकीत असत, त्यांना ताकीद देऊन ऐकले नाही म्हणून पत्र्या मारल्या. कोणेगांवच्या रामा रावजी या गुंडास व घोणशीच्या मांगानी गांवच्या जनतेला अनैतिक फार छळले म्हणून ७-८ पुढाऱ्यांना बेदम मारले. मसूरचे गांवकामगार शंकर पाटील यांना रिक्रूटिंगचे चांगले काम केल्याबद्दल ब्रिटिश सरकारने बक्षीस दिलेल्या दोन तलवारी व एक रिस्टवॉच काढून घेतले. त्या अगोदर मे १२ स शंकर सिताराम पाटील यांनी पोलीस छापा तांबव्यास नेऊन तेथील लोकाना बेदम मारवले होते. यात दोन जायबंदी झाले होते. बरडे मास्तरनी याला ५०० रु. दंड केला होता, तो दिला नव्हता म्हणून त्यास १००० रु. दण्ड केला व रोख घेतला. १४ जुलईस छापा घालून कोळे येथील बाबासाहेब गरवारे यांची ५ बारी रायफल काढली. कऱ्हाडास १६ जुलईस मालदनचा आबा देसाई, मारुती काळे, राजाराम देसाई यांचेकडे १०० घागरी दारु २० रांजण, २५ बरण्या, दारुच्या बाटल्या ४०, दारूचे डबे १० इतकी दारू ओतून टाकली व बरण्या रांजण फोडून टाकले. १० जुलईस ढेबेवाडीच्या बाजार तळावर ७ लोकांच्या घरांची झडती घेऊन त्यांच्या ५-६ घागरी, ५०-६० बादल्या दारुच्या सापडल्या. १८ जुलईस ढेबेवाडी दारुगुत्ता जाळला. २४ जुलई कऱ्हाड कचेरी समोरचा सदू गंत्रे हॉटेलवाल्याला छापा घालून पकडले. शिरवडे रायफल जळीत खटला व साक्षीदार याला सहा दिवस दडवून ठेवून थोडा मार देऊन सोडून दिले. २७ जुलईस खोडशीच्या १५ रामोशास अगदी बेदम ठोकण्यात येऊन १०–१२ चोऱ्या कबूल करावयास लावल्या. २९ जुलईस शिरवडे संस्थानी पोलिसांचा गोळीबार भूमीगतावर झाला पण २० जुलईस गुजरांची खाजगी बंदुक शिरवडचाहून गुप्त्यानी छापा घालून काढून आणली. ९ ऑगस्टला स्वतंत्र भारताचे अंक वाटले व सभा घेतल्या. त्यानंतर ११ ऑगस्टला नडशीला ३०० पर्यंत सेवादलातील मुले हुतूतूचे सामन्यात भाग घेण्यास हजर झाली होती, परंतु १०००–१२०० पोलिसांनी सकाळी १० वाजता गावाला वेढा घातला. सेवादल सैनिक सुरक्षित सर्व घालवल्यानंतर भूमिगत कार्यकर्ते माधवराव जाधव, धन्वंतरी वगैरे मंडळी सुरक्षितपणे वेढ्यातून निघून गेली. लगेच त्या मंडळीनी १२ ऑगस्टला तळबीड या सरकार पार्टीचे गावी सभा घेतली. वाचनालय व सेवादल काढले आणि १३ ऑगस्टपासून चरेगाव, साबळवाडी दुसोळ, बांदवाटडी, पिट्टेवाडी, मणदुरे या ठिकाणी जाहीर सभा घेतल्या. पण पुढे २६ ऑगस्टला माधवराव जाधव यांना

घोणशीचे रानात पकडले आणि दोन सप्टेंबरला हिंगनोळे येथे धन्वंतरीना पकडले.

नंतर सुमारे १। महिन्यानी तुरुंगात चरखे मिळण्यासंबंधी कऱ्हाड जेल मधील ६० लोकांनी उपोषण सुरू केले. सात दिवसानंतर सरकारने हार खाऊन चरखे सर्वांना वापरण्यास परवानगी देऊन अन्नात सुधारणा केली. तिकडे सातारा सबजेलमध्ये ठाकूर फौजदार यास त्याने पाऱ्याचे देशभक्तांना रक्त ओकेपर्यंत मारहाण केली म्हणून गुप्त्यांनी ठोकले.

स्वामींच्या सभा व गिलबर्ट साहेब यांच्या पाठशिवणी चालू असता एप्रिलच्या मध्यास शेणोली स्टेशन पोलिसांच्या दोन बंदुका व काडतुसे गुप्त्यांनी हस्तगत केली. त्याचप्रमाणे जुलई (१९४५) मध्ये कोळे येथील कल्याणी शेठजींच्या घरातूनही पंधरा काडतुसे त्यांनी आणली. सुपन्यास सिद्धेश्वर सीताराम कुलकर्णी यांच्याकडील रायफल व काडतुसे काढून नेण्यासाठी बाळू देवधर पोलिस आला असता ८ जुलईस त्यांचेजवळ गुप्ती असल्याचे आढळून आले. १६ नोव्हेंबर १९४५ ला कृष्णा कॅनाल वरील इंजिनियर गोखले यांनाही त्यांच्या बेगुमान वागणुकीबद्दल गुप्त्यानी पत्री समर्पण केली.

मध्यंतरी ऑगस्टमध्ये एका लहान गांवी काय घडले पहा. सुधारकाचार्य आगरकरांचा टेंभू गांव एवढासा ! तेथे मारुतराव तांबवेकर काँग्रेसचे कार्य नेटाने करीत. त्यांना १९४२ साली एक साथी मिळाला. तो तासगाव कचेरीवरील मोर्चात आणि नांद्रे स्टेशनला अग्निमुख दाखविण्यात भाग घेतलेला तासगावचा महारुद्र स्वामी. १९४३ व १९४४ साली बिरवडे (ओगलेवाडी) येथे झालेल्या काँग्रेस सेवादलात तांबवेकर व स्वामी यांनी तरबेजी मिळवल्यावर टेंभूत त्यांनी सेवादल सुरू केले. स्वामींचे नेतृत्वाखाली तीनशे लहान मोठे सेवादल सैनिक श्रमदानाने विधायक कार्ये करू लागले होते. दत्ता कुंभार. किसन भुसारी, आत्माराम दादू, नबीलाल मुलाणी, कृष्णराव चरेगांवकर, पांडोबा शिंदे व वासुदेव सुतार यांच्या सहाय्याने थोडेफार न्यायदानाचेही काम टेंभूस चालू झाले होते. मग सहाजिकच दोन पोलिसांचा मुक्काम टेंभूस पडू लागला ! गावातील रस्ता श्रमदानाने झालेला पाहून ते काय रडणार की हसणार ! शेवटी १९४५ च्या ९ ऑगस्टला आगरकरांचे माळावर झेंडावंदनार्थ मंडळी जमून जी. डी. लाड यांचे व्याख्यान व्हावयाचे होते. इतक्यात पोलिस आले म्हणून कार्यकर्ते डोंगरमाथा चढले. पोलिसांनी गोळीबार केला. किसन भुसारीस गोळी लागली. त्याच्या शुश्रुषेसाठी सर्व साथी धावले. तेव्हा सर्वांना अटक करून पोलिसांनी झोडपले. त्यातून काही जन्माचे अधू झाले आहेत. ९ ऑगस्ट १९४५ रोजीच महादू बोराटे, पांडुरंग जोती, चुनिलाल रेवचंद, शिवराम कृष्णा, विठ्ठल मुरारी, गणपती

चव्हाण यांना कोरेगाव कुमठ्यास अटक झाली. वर्धनगड पोस्ट – मोटार–लुटीमध्ये संशयावरून हरीभाऊ जगदाळे, कृष्णराव काशीराम, विठ्ठल आकोबा व विठ्ठल मुरारी यांना अटक करून पुष्कळ मारहाण झाली. १९४६ मध्ये पूज्य साने गुरुजींचा दौरा सातारा जिल्ह्यात झाला. शेतकरी परिषद येळगाव २२ जानेवारीमध्ये साने गुरुजींच्या अध्यक्षतेखाली भरली. दुष्काळ निवारण, पाण्याची व्यवस्था, रस्त्यांची दुरुस्ती, सारा तहकुबी मिळवणे हा या परिषदेचा हेतू होता. मलकापूर स्टेटमध्ये लोकाकडून सात रुपये साऱ्याऐवजी एकमण साडेसात पायली नाचणी दुष्काळ परिस्थितीत जबरीने व अन्यायाने वसूल केला जात होता. त्यांच्याशी तडजोड करून तो बारा पायली देणेचे ठरले. हा सत्याग्रह यशस्वी झाला. भूमीगत असता इलेक्शनच्या जोरदार प्रचारासाठी ५० सभा गुप्त्याकडून फेब्रुवारीत (१९४६) घेण्यात आल्या होत्या. त्यापूर्वी १७ जानेवारी १९४६ आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे अध्यक्षतेखाली कुंभारगांवला भूमिगतानी मोठी सभा घेतली. त्यावेळी बारा मुलांनी आपली बोटे कापून स्वातंत्र्यासाठी रक्त देण्याची प्रतिज्ञापूर्वक तयारी दाखविली. हजारो माणसानी डोक्यावरील फेटे फेकून देऊन गांधीजीवरील निष्ठा गांधी टोपी घालून दाखविली.

२८ : अखेरीतील विवेकवर्धिनी

ब्रिटिश रियासतीतील स्वातंत्र्यासाठी झालेल्या शेवटच्या शान्तिसंग्रामातील सातारा जिल्ह्याने आपला म्हणून आपल्या शक्ति, युक्ति, संस्कृतीप्रमाणे जो जबाबदारीचा वाटा उचलला, त्याचे " सर्वेषामविरोधेन " असलेले विवेचन मागील प्रकरणी केले. अतिशयोक्ति वा अल्पोक्ती कोठेही डोकावू नये अशी दक्षता घेऊन केलेल्या घडणींच्या कथनामागे काही विवेकवर्धिनी होती, हे त्या सीध्या कथनातूनही अंतरंग शोधकांच्या लक्षात आल्यावांचून राहणार नाही.

" विचारोनि बोले, विवंचोनि चाले । तयाचेनि संतप्त । तेही निवाले ॥ "

अशा दक्षतेने सर्वत्र सर्व पावले सर्वकाळी ऐतिहासिक महापुरुषांचीही पडलेली असतात, अशी खातरजमा जेथे नाही तेथे अखिल भारतीय उत्थानातील एक ओघ वा ओढीचा प्रवाह असलेल्या सातारा जिल्ह्यातील लहान थोर सर्व आंदोलनाला तो कस लावण्याचा कोणी आग्रहही धरणार नाही. तथापी पं. नेहरूनी शेवटी " जय

सातारा !" म्हणण्या इतका सातारा जिल्ह्यातील आंदोलनाचा प्रभाव ठरला, त्यात असलेली "शुद्धबुद्ध" आपला ठसा उमटल्याशिवाय कशी राहील ?

ता. १ नोव्हेंबर १९४२ रोजी किसनवीर, पांडुमास्तर प्रभृती मंडळी येरवड्यातून निसटली. नाना पाटील प्रभृती अगोदरच सागरेश्वर डोंगरदऱ्याच्या आश्रयाने आझादीचा विचार चालवीत होते. जाहीरनामे आणि बक्षिसे परकीय सत्तेने त्या स्वातंत्र्यप्रेमी वेड्यांना पकडून देण्याबद्दल लावली तरी सुद्धा नुसते 'गुप्ते' होऊन आपण स्वतंत्र नागरिक होऊ शकत नाही. त्यासाठी एका बाजूने लोकसहाय्य मिळवावयाचे आणि दुसऱ्या बाजूने परकीय सत्तेचा मोड करावयाचा, असा विचार स्थिर होऊ लागला. क्रान्तिवीर नाना पाटील यांना मूर्धाभिषिक्त महत्त्व देऊन पण लोकशाहीतील पंतप्रधानाप्रमाणे गुप्त्यांनी निवडलेल्या सर्वाधिकाऱ्याच्या धोरणाने व अखिल भारतीय संघटनेच्या तंत्राने सातारा जिल्ह्यात हालचाली झाल्या.

शत्रूची रसद तोडावयाची आणि वाहतुकीची साधने नाहीशी करावयाची, त्याचप्रमाणे आपल्या उभाराच्या वस्तु शत्रू जवळ आलाच तर उपयोगी पडू नयेत अशा गोष्टी सातारा जिल्ह्याच्या गुप्त्यांचेपुढे उभ्या होत्या. हिंदुस्थानात परकीय सत्ता चहाडखोरावर जगते हेही त्यांच्या लक्षात होते. म्हणून रेल्वेतारांची साखळीच खिळखिळी करण्याचा विकारात्मक विचार जोरावला. एकशेपंधरा 'गुप्त्या'कडून शिराळा, खानापूर, खटाव, तासगाव, सातारा, कोरेगाव, वाळवे, पाटण, वाई व कऱ्हाड तालुक्यात ताराच तारा तुटल्या. उडतरे, साप, खातगुण, नेर, रायगाव, वांगी, नांद्रे, निमणी, पानमळ्याचीवाडी, पलूस, शेणोली, उंब्रज, हेळवाक, मल्हारपेठ, कासेगाव, नेर्ले, ताकारी या ठिकाणचे रहदारी बंगले अग्निनारायणाच्या स्वाधीन झाले; लिंब जवळील पुलास सुरुंग, सातारारोड जवळ गव्हर्नरसाहेबांच्या मोटारीखाली बाँब, पाटणजवळील एका पुलाची उखड असे विध्वंसनाचे प्रकार घडले. नांद्रे, शिरवडे, शेणोली ही स्टेशने पेट घेऊन बसली. नांद्रे – किर्लोस्करवाडीच्या दरम्यान दोन मालगाड्या पडल्या; कऱ्हाडच्या आसपास तीन वेळा मालगाड्यांच्या मार्गांत धोंडी उभ्या राहिल्या; बिचूद (भवानीनगर) स्टेशनजवळ पे ट्रेन लुटली गेली. दीड लाखाचे नुकसानीस वाई कोर्टाची जाळपोळ कारण झाली. अर्वी–तुर्ची येथील गांवदप्तरे वाऱ्यावर गेली; वाई, वाठार, तारगाव–किन्हई, कऱ्हाड–विटे, डिग्रज–सांगली, कोरेगाव–म्हसवड, अशा टपाल मोटारी, आणि बुध, मायाणी, विसापूर, मलवडी, कुडाळ, किर्लोस्करवाडी, भिलवडी, कऱ्हाड, मसूर, कोपर्डे, शिरवडे, मानेवाडी, बोरगाव वाळवे, कुंडल, देवराष्ट्रे, कामेरी, वडगाव कडील पोस्टाच्या थैल्या आडवल्या होत्या; वगैरे वगैरे परकीय सत्ता मोडून काढण्याचे ज्याला जे उपाय डोक्यात आले ते त्यांनी केले. राजकारणाचा पल्लेदार राहो पण परिणामी विचारही त्यात

फारसा नव्हता. परकीय सत्तेला आपण सळो का पळो करून सोडतो आहोत, एवढा एकच विचार असावा. हे मात्र परकीय सत्ताधाऱ्यांच्या थरापासून तिऱ्हाईत निरीक्षकांच्या थरापर्यंत एकमत होऊन राहिले होते.

हे सर्व प्रकार होत असता त्यात अगर त्या व्यतिरिक्त तत्कालीन अन्य वावटळीत धंदेवाईक वावदुकानी आपले हात धुवून घेतलेच नाहीत, असे कोणीच म्हणणार नाही ! ! चिडलेल्या नोकरशाहीने सर्व अनाचार-अत्याचाराची जबाबदारी ' गुप्त्यां 'च्यावर लादून खटाव तालुक्यातील ४, तासगाव तालुक्यातील ५, कऱ्हाड तालुक्यातील ६, पाटण तालुक्यातील ३, वाळवे तालुक्यातील ९, आणि शिराळे पेट्यातील ५, अशा एकंदर ३२ गावावर ५२१०० रु. सामुदायिक दण्डाची आकारणी तर केलीच पण गावोगावी गुप्त्यांच्या शोधार्थ लहान मोठ्या बाळ, वृद्धा स्त्री-पुरुषांवर कितीतरी भरमाप्पा-सुंदरीचे प्रयोग झाले. दुसऱ्या बाजूने लोकांनी ' बक्षिसांना ' मन दाखविले नाही; सामुदायिक दण्डाबद्दल कुरकूर केली नाही. चहाडखोरी करून गुप्त्यांना दगा दिला नाही. पण उलट त्यांना आसरा, रुका, औषधे, भाकरी दिली. ' जलेजाव 'च्या चळवळीला जनतेचा असलेला पाठिंबा त्याने स्पष्ट होतो. गुप्त्यांची बुलेटीन छापण्याची, ती ठिकठिकाणी पाठविण्याची आणि पोलिसांनी पिस्तुल छातीवर धरले तरी गुप्त्यांना संपूर्ण सांभाळून घेण्याची कोशीस करणाऱ्या जनतेची धन्य होय.

परकीय सरकार जावयाचे तर त्याची जागा प्रतिसरकारने घ्यावयास हवी. शेतकरी, कामकरी लोकशाही खेड्यापाड्यांच्या हिंदुस्थानात नांदवावयाची तर ग्रामपंचायतीच्या रूपानेच नांदणार. १९४२ ते १९४४ च्या गोंधळाच्या काळानंतर ग्रामराज्याचा श्रीगणेशा झाला. दारुबंदी, न्यायदान मंडळे, अत्याचारापासून स्त्रियांचे रक्षण, गुंडांचा व दरोडेखोरांचा बंदोबस्त, समारंभातील काटकसर, सहा टक्यानी सावकारी कर्जांची फेड, काळाबाजार व नफेबाजी यांचा बीमोड, सहकारी चळवळ, अस्पृश्यता निवारण, सेवादले, साक्षरता प्रचार, जाती जातीतील ऐक्य, असा ग्रामराज्यांचा कार्यक्रम होता. (समर्थ सातारा क्रान्ति, अंक ९ ऑगस्ट १९४६ पहा)

तो काही एकाएकी निर्माण झाला नाही. त्यासाठी परकीय सत्तेच्या खिळखिळी बरोबरच ग्रामपंचायतीच्या प्रचारासाठी शाहिरी वाणी गर्जत होती. एकट्या सातारा जिल्ह्यात ग्रामराज्याचे शरसंधान परकीय सत्तेला पुरून उरलेला चाळीस महिने सातारा जिल्हा ' गुप्त्यां 'च्या व्यापात होता. म्हणूनच ग्रामराज्याच्या चळवळीच्याविरुद्ध दडपशाहीचा हॉविट्झार उभारण्यात आला होता. परसत्तेच्या पोलिसांच्यासुद्धा रिव्हाल्व्हर्स बंदुका हस्तगत करून ग्रामराज्य कारभारास आवश्यक सामर्थ्य पैदा केले. जुन्या सहानुभूतीच्या कॉंग्रेस कार्य-

कर्त्यांची सल्लामसलत घेतली जाई, व राष्ट्र सेवादलाच्या संघटनेचीही सहानुभूती होती. परिणामतः सातारा जिल्ह्यात एकही खेडे व एकही घर असे राहिले नाही की जेथे देशपरिस्थितीची योग्य जाणीव झाली नाही. भूमीगत अवस्थेतील काही तरुणानी आपल्या कार्याला सहाय्यभूत होण्यासाठी शेतकरी तरुणांची संघटना काहीशा लष्करी पद्धतीवर 'तुफानसेना', 'आझाद-सेना' या नांवाने केली. या संघटनेची कवायत व इतर शिक्षण बहुधा रात्री चालत असे. भूमीगतांचे संरक्षण, पोलिसांच्या हालचालीची माहिती मिळविणे, न्यायदान प्रसंगी उपस्थित राहणे, भूमीगतांची परस्पर पत्रे-निरोप पोचविणे वगैरे कामे ही सेना करी. १६ जुलई १९४६ ला जयप्रकाश म्हणाले की "प्रति सरकार टिकवले ते सातान्यानेच!"

१९४६ चे शेवटी चळवळीचा भर ओसरला. कॅपचर ऑफ पॉवरचे राजकारण संपले. आता आपण आपली सत्ताप्रस्थापित करावयास हवी. प्रतिसरकार स्थापणेचे विचार डोक्यात घोळत होते. त्याकरता काही यंत्रणा उभी करावयास हवी. म्हणून काही विचार करणे जरूर होते. याकरिता (१) कार्यकर्ते (२) त्यांचे अंतर्गत संरक्षण, (३) हेरखाते, (४) रचनात्मक आणि पुरवठा खात्याकरिता लोक निर्माण करण्याची जरूरी होती.

म्हणून कुंडल येथे व्यायाम शाळेची स्थापना करण्यात आली. सेवादल सैनिकांची सेवानिवृत्ती व विधायक कार्य प्रवृत्ती यांचा परिपोष करून त्यांना जोड म्हणून सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सैनिकांच्या गुणाची जोडही देणे जरूर होते. विशेषतः स्वतःचे रक्त सांडून आझादी मिळवणे व टिकवणे जरूर तर शस्त्रास्त्रांचाही उपयोग करून या गोष्टी करणे क्रमप्राप्त होते. कुंडल येथील व्यायामशाळेतून उत्तमपैकी २५० कॅप्टन तयार झाले. त्यांना प्रत्यक्ष व्यवहारातील सहा महिन्यांचे शिक्षण दिल्यानंतर तुफान सैनिकांच्या कॅप्टनच्या शिक्षणाकरिता बोलावण्यात येत असे. मुख्यतः गुप्त बातम्या काढणे, ग्रामराज्यातील निकालांची बहिष्कारापासून सुरवात करून तो दहशतवाद कोणत्या थरापर्यंत वापरावयाचा याचे शिक्षण दिले जात असे. या तुफान कॅप्टनजवळ एक डायरी असे. त्या डायरीत त्यांनी पंचायतीच्या न्यायअन्याय, गावातील टगे व गावातील सज्जन लोकांच्या हालचाली, गावातील सैनिकांची देखरेख, मिलटरीचा सैनिक परत आल्यावर त्याला राजकीय माहिती देऊन देशप्रेम निर्माण करणे, वगैरे नोंद करावी, अशी डायरी आठवड्यातून एकदा एक दिवस वरिष्ठ अंमलदाराकडे पाठविण्याची जबाबदारी त्याच्यावर असे. ज्या गावात ग्रामराज्य सुरू करावयाचे तत्पूर्वी त्या गावात २५ तरी तुफान सैनिक त्या कॅप्टनने तयार करण्याची जबाबदारी त्या कॅप्टनवर असे. कॅप्टनच्या सोईसाठी १२-१२ गावांचा एक गट केला असे. या नवशिक्या तुफान सैनिकांचे शिक्षणा-

करिता प्रत्येक गटावर बौद्धिकाची व्यवस्था केलेली असे व त्याशिवाय एक फिरती लायब्ररी ५००० रु. खर्च करून सुरू केलेली होती. प्रात्यक्षिक शिक्षणाकरता जी. डी. लाड हे त्यांना नेत असत व शिक्षण देऊन तयार करीत असत. ठरलेल्या वेळी व ठरलेल्या ठिकाणी १० मिनिटांचे आत या असे सांगितले तर २५०० पर्यंत तुफान सैनिक एकत्र जमत. गावातील प्रत्यक्ष शांततेची जबाबदारी त्या त्या गावच्या तुफान सैनिकावर असे. मात्र शारीरिक शिक्षेचा कोणताही प्रकार त्या त्या गांवच्या तुफानाने करू नये असा सक्त दंडक त्यांचा होता. या तुफानामधून योग्य अशा माणसांची निवड करून त्यांनाच गोळीबाराचे शिक्षण दिले जात असे. अशा हेतूने प्रेरित होऊन ही व्यायाम शाळा काढली व शाळेतून प्रत्यक्ष २५० कॅप्टन तयार केले व त्या कॅप्टननी प्रत्येकी २५ ते ५० पर्यंत नवीन तुफान सैनिक निर्माण केले. या सैनिकांचा आकडा एकूण ५००० पर्यंत गेला होता. सातारा दक्षिण भाग, फलटण स्टेट, बारामती, तालुका चिकोडी, दोन्ही खानदेश अशा क्षेत्रामध्ये हे सैनिक काम करत होते. या सैनिकांच्या निर्मितीची कल्पना आप्पासाहेब लाड (मास्तर) यांची असून सर्व सैनिकांची व्यवस्था आप्पासाहेब लाड व जी. डी. लाड हे पाहात होते.

ग्रामराज्याच्या स्वरूपाने प्रतिसरकार स्थापावयास विध्वंसक कार्यक्रम करून नुसता चालत नाही. विधायक कार्यक्रमही अंगवळणी पडलेला असावा लागतो. राष्ट्राच्या विधायक सेवेची प्रवृत्ती व निगा या राष्ट्रात स्वराज्याच्या जोपासनेसाठी व्हावी म्हणूनच भारत सेवक नामदार गोखल्यांच्या भारत सेवक (आता हिंद सेवक) समाजाचा अवतार होता व आहे. नामदारांना आपले राजकीय गुरू मानणाऱ्या महात्माजींनीही आपल्या आंदोलनाचे उभारणीत विधायक कार्यक्रम त्याच धोरणाने आखले होते. महात्माजींच्या ग्रामोद्धार चळवळीच्या तालमीत वाढलेले अनेक कार्यकर्ते सातारा जिल्ह्यात आहेत. त्यातील कुंभार गावचे विठ्ठलराव कुलकर्णी सन १९३७ साली मौजे येणपे (ता. कराड) येथे फाळणी–पार्टीच्या खर्चाचा वसूल करणेचे काम गैरहंगामी होते. तेव्हा तेथील शेतकऱ्यांचे वतीने कऱ्हाड तालुक्याचे मामलेदाराना भेटले पण त्यात यश आले नाही. म्हणून त्यावेळचे रेव्हेन्यू–मिनिस्टर नामदार मुरारजी देसाई यांना ते भेटले व मार्च १९३८ पर्यंत वसुलाची तहकुबी मिळवली व शेतकऱ्यांची गांवकामगारानी जप्त केलेली जनावरे सोडवून आणिली. यामुळे जनतेत काँग्रेसबद्दल प्रेम उत्पन्न होऊन त्याचे पर्यवसान शेतकरी गट परिषदेत झाले. येणपे ता. कराड येथील गट परिषद महाराष्ट्राचे लोकप्रिय पुढारी दे. भ. शंकरराव देव यांचे अध्यक्षतेखाली झाली. या परिषदेमुळे ज्या ठिकाणी साधी बैलगाडी जाणेचा रस्ता नव्हता तेथे त्या लोकांनी मोटार जाणेचा दोन मैल लांबीचा रस्ता तयार करून देवांची मोटार त्यावरून नेली. परिषदेचे

कार्य मोठ्या समुदायानें व उत्साहानें पार पडले. सातारा जिल्ह्यातील अशा विधायक सेवा बुद्धीतूनच ग्रामराज्याचे प्रतिसरकार कसे निर्माण झाले ते पाहण्यासारखे आहे. मार्च २० ला (१९४४) शिराळे पेट्यातील मिरुरव्याची वाडी येथें ९० भूमीगत कार्यकर्ते जमून त्यांची सभा झाली. त्यात किसनवीर यांना डिक्टेटर नेमण्यात आले होते. पहिल्यांदा निवडण्यात आलेले कार्यकारी मंडळ धन्वंतरी, किसनवीर, बाबूजी पाटणकर, अंतूकाका वर्डे, बुवा म्हावशीकर, शेख काका, एम्. एन्. जाधव, एस्. पी. जाधव, नागनाथ, नाथाजी, किसन मास्तर, गोंदिकर असे अकरा जणांचे होते. याच वेळी तीन सुपरवायझर्स नेमण्यात आले. (१) पश्चिम भाग पांडु मास्तर, (२) जी. डी. लाड पूर्वभाग (३) उत्तरभाग पांडुरंग बोराटे. जिल्ह्यातील कामाचे सोयीकरता २० विभाग पाडण्यात आले. त्यावेळी एकूण गुप्ते ११० पर्यंत होते. त्यातील मुख्य एक विभाग-नायक व दुसरा मदतनीस म्हणून व २-३ त्याचे हाताखाली म्हणून असे चाळीस गट पाडण्यात आले. कार्यकारी मंडळाच्या धोरणाप्रमाणे प्रत्येक गांवीं सेवादलें, लायब्ऱ्या, नायदान मंडळें स्थापन केलीं.

सेवादल, न्यायदान मंडळे व लायब्ऱ्या निघालेली गांवे अशी :—कासेगाव, वाटेगाव, पाचुंब्री, काळमवाडी, नेर्ले, पेठ, रेठरे धरणाचे, जिंती, पणुंब्रे, सुरुल, ओझर्डे, उंडाळे, ओंड, सवादे, तुळसण, म्हासोली, येवती, टाळगांव, येणपे, येळगाव, कुंभारगाव, काळगाव, धामणी, आरळे, शितूर, सोनवडे, चरण, बिळाशी, कोकरूड, वाठार, मालखेड, नांदगाव, बेलवडे, काले, मनू, कालवडे रेठरेखुर्द, तांबवे, शिरंबे, कुट्रे, टाकवे, बांबवडे, माणकवाडी, महादेववाडी, भाटवाडी, शेणें, पेटलोण, मणदूर, गोटेवाडी.

सेवादले व न्यायदान मंडळे असलेली गावे:— पणुंब्रे (वारणेचे), काळुंद्रे, खराळे, पांचगणी (शिराळे), करंगुली, खुंदलापूर, चांदोली, नांदोली, रेठरे (वारणेतील), मालेवाडी, मालगाव, जांबूर, विरळे, पळसवडे, धावडे, डिगे, शिराळे, ओखूळ, आंबोळे, करडे, निवळे, ढाकाळे, चांदेल, सोनारली, भेंडवडे (भोवतालची १० खेडी), भुरभुशी, घोगाव, येवलेवाडी, शिरसी, अंत्री, गिरजवडे, धामवाड. यासर्व गावातून वाजंत्री, दारूबंदी, सामुदायिक लग्ने, रस्ते भरणे, स्पृश्यास्पृश्य मिळून गांधी पद्धतीने सर्व ठिकाणी लग्ने करण्यात आली. न्यायदानाची कामे करण्यासाठी पत्री मारण्यात आली नाही. एकूण गावगुंडाना शंभर-दीडशे सौम्य शिक्षा करण्यात आल्या. गावगुंडांचा पूर्ण बंदोबस्त करण्यात आला. मे महिन्यात कासेगावी चरखा वर्ग व सेवादलाचे शिबीर, एक महिन्याचे घेण्यात आले. या शिबिरात ४०–४५ स्त्रिया, २५–३० मुले होती. राष्ट्रसेवादले, वाटेगाव, कासेगावला काढण्यात आली. कासेगाव, वाटेगाव, येळगाव, येवलेवाडी, नेर्ले, आरळे, काले, या ठिकाणी स्त्रियांची

सेवादले काढण्यात आली. गोरगरिबांना मोफत औषधे देण्यात आली. ही औषधे जनता सहाय्यक मंडळी मुंबई येथून मिळवत होती.

१ सप्टेंबर १९४४ ते १९४५ अखेर शंभर जनता सहाय्यक मंडळे काढण्यात आली. ग्रामराज्याला बळकटी आणण्यासाठी या मंडळाचा उपयोग होत असे. मुंबईस सातारा जिल्ह्यातील भूमिगतांचे ऑफिस उघडण्यात आले होते. त्यामार्फत सातारा जिल्ह्यातील लोकांचे संघटनेचे काम सुरू केले. सातारा जिल्ह्यातील सव्वालाख लोक मुंबईस कामगार म्हणून असतात. भूमिगतांच्या खर्चाचा प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक सहाय्यही तेथे गोळा होई. त्या ऑफिसवर जोशी काका आरळे व किसनवीर यांची नेमणूक होती. लायब्ररी, सेवादले काढण्यात आलेली गावे:— कोपर्डे, सैदापूर, शहापूर, रिसवड, किवळ, अंतवडी, मसूर, निगडी, चिखली, वाण्याचीवाडी, बिरवडे, हेळगाव, पाडळी, कालगाव, खराडे, पेरले, काशीळ, कोपर्डे, चरेगाव, उंब्रज, वऱ्हाडे, धनगरवाडी, तळबीड, भवानवाडी, तासवडे, वेलवडे, शिवडे कोर्टी, कोणेगाव, नडशी, वहागाव, घोणशी, खोडशी, मुंढे, वनवासवाडी, हिंगनोळे, इंदोली, कोरूळे वडगाव, शिरगाव, पाल, सासपडे, नुल, राहुडे, वज्रोशी, ढोरोशी, आंबळे, घोर, आवार्डे, पावळवाडी, बांधवाडवाडी, दुसाळे, चव्हाणवाडी, मस्करवाडी, चोरज, चोरे, धावरवाडी, मरळी.

न्यायदान मंडळे असलेली गावे:–कोपर्डे, नडशी, घोणशी, चरेगाव, दिवशी, किवळ, खराडे, वहागाव, हिंगनोळे, इंदोली, वडगाव, वज्रोशी, दुसाळे, मारूल, पापर्डे, सांगवड, मणदुरे, नावडी, मोरगिरी, भोर. सुमारे एक हजारावर निवाडे करण्यात आले. फौजदारी, दिवाणी, खटले, गावगुंडापासून संरक्षण व दारुबंदी इत्यादी कामे झाली. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपलेच एक न्यायदान मंडळ तयार केले. त्याने लोकांचे तंटे ८० टक्के तरी तडजोडीवरच तोडले. प्रथम चारपाच महिने हे सर्व तोंडीच चाले. पुढे व्याप वाढू लागला, त्याकरता नियम करावे लागले. १०० रु. ऐवजाच्या दिवाणी स्वरूपाचे दाव्यात सर्व पंचांचे एकमताने गावाचा कौल घेऊन निकाल कायम समजण्यात येईल. १०० रु. वरील दाव्यात तीन अपिले ठेवली होती, फौजदारी स्वरूपाच्या दाव्यातही तीन अपिले होती. वरिष्ठ न्यायसभेत अनुभवी कायदेतज्ञ असत. सामान्यत: नेमलेल्या दिवशी गावात सर्व मंडळींना जमवून एकमताने ५, ७ व ९ पंच निवडले जात. एक मताने निवडून आले नाहीत तर ३।४ पंच बहुमताने घ्यावयाचे; असेही न झाले तर ते गाव पंचायतीचे काम करण्यास योग्य नाही असे समजावयाचे. पंचात सेवादलाचा कॅप्टन बहुधा असावयाचाच. कुंडल येथे असे तीस तरबेज कॅप्टन तयार केले होते. बांधरेटी, जमीन, सावकारी स्वरूपाची खरेदीपत्रे, वाटप, चोऱ्या, मारामारी, वहिवाटी हक्क, दत्तक, व्यभिचार इत्यादी स्वरूपाच्या

तक्रारी असत, शेकडा ९० टक्के दारुबंदी यशस्वी झाली होती. शेणोली, पलूस, घोगाव, कुंडल व विटे येथील दारूचे मक्ते १०००० वरून १००० पर्यंत खाली आले. सरकारने दारूचे काही मक्ते मुद्दाम मक्तेदार उभे करून त्यांच्याकडून घेवविले. खाजगी रीत्या बेकायदा दारू गाळण्याचा प्रकार अजिबात बंद करण्यात आला. चोऱ्या व दरोडे ८० टक्के बंद झाले. व्यभिचार प्रकरणे ९० टक्के कमी झाली. न्यायदानात प्रत्यक्ष भूमिगत लोकांकडे अंमलबजावणीचे खाते रहावयाचे, गावकऱ्यांची झालेली चर्चा, भूमीगतांची गावकऱ्याशी वागणूक वगैरे या बातम्या काढणाऱ्या पथकास बहिर्जी पथक म्हणत. आठ दहा महिन्यानंतर निकालांची अंमल बजावणी होत नसेल तर गावात सार्वजनिक बहिष्काराची तयारी करणे हे त्या खात्याकडे प्रमुख काम होते. आझाद सैनिक म्हणून एक खाते होते. स्वतंत्र देशात देशद्रोही लोकांना शिक्षा होतात त्याच्या $\frac{1}{100}$ ही कांग्रेसबद्दल चहाडया करणाऱ्या देशद्रोह्यांना आझाद सैनिकांनी शिक्षा दिल्या नाहीत. पण तेवढयाशा दाबाने टगे दचकले. देवराष्ट्राच्या पाटलास पहिली पत्री मारली. पत्री म्हणजे गुन्हेगाराला उताणे पाडून त्याचे पाय घोटयाजवळ बांधावयाचे व त्याच्या तळ पायावर लाठयांचा मार कमीत कमी वीस व जास्तीत जास्त पन्नास तडाख्यानी द्यावयाचा! आझाद सैनिक जवळ डोंगर असेल तेथे आश्रय घेत.

खटल्यांचा अहवाल पाहिला तर असे आढळते की --

तालुके	खानापूर	अर्ज आले	१८५०	त्यातून	निर्णित	११६०
,,	कऱ्हाड	,,	२४००	,,	,,	२०५०
,,	वाळवे	,,	११००	,,	,,	४००
,,	तासगाव	,,	५५०	,,	,,	२२५

एकंदर सामाजिक कुवतीसाठी अक्षरमित्रता वाढविण्याच्या प्रयत्नात शाळेतून मुलांची संख्या २५ टक्के वाढली आणि आरोग्याच्या दृष्टीने गावातील रस्ते साफसूफ करून त्यावर मुरूम घालून पक्के करण्यात आले. बेलवडी, चिखलगोठण इत्यादी संपूर्ण रस्ते भरले. वस्त्रस्वावलंबनाचे दृष्टीने सूतकताई आश्रमीय व्रताने दुशेरे, कुंडल, पलूस येथे सुरू करण्यात आली. पण प्रतिसरकार म्हणून ग्रामराज्याची तयारी पक्की करणेचे दृष्टीने लोकराज्याची घटना (सातारा ग्रामराज्याची) औंध राज्यघटनेच्या धर्तीवर केली होती. ती अशी :-

(१) उभय पक्षाच्या संमतीने खेडयापाडयातील जनतेचे आपसातील तंटे मिटविणे व त्वरित आणि सत्य न्याय परिस्थितीला धरून, सत्य व अहिंसेच्या मार्गाने मिळवून देणे. पैशाचा आणि वेळेचा अपव्यय थांबविणे.

(२) चालू कायदा व शांतता यांना बाध न येता नित्य व्यवहारातील कटकटी मिटविणे व गावात शांतता नांदेल असे करणे.

(३) इंग्रज सरकारकडून नेहमी सांगण्यात येते की, हिंदी लोकांमध्ये एकोपा नाही. निरनिराळे गट आहेत, तेव्हा खेड्यापाड्यात एकोपा साधणे, सामाजिक संघटनेवर ब्रिटिशांच्या अंतरंगात आपण आपले ऐक्य साधणे आणि कणखर संघटना निर्माण करणे.

(४) गावचे संरक्षण, शिक्षणप्रसार, ग्रामोद्योग, आरोग्य, रस्ते दुरुस्ती, पाणी पुरवठा इत्यादी कामे करणे.

(५) प्रत्येक गाव आपल्या प्रौढ रहिवासी नागरिकांपैकी ५ अगर ७ सभासदांची एक तडजोड कमेटी एका वर्षापुरती नेमील. एक हजार वस्तीपर्यंत ५ व पुढे ७ सभासद निवडले जातील.

(६) तडजोड कमेटीच्या सभासदांची निवडणूक प्रौढ लोकांच्या मताधिक्यानें होईल.

(७) तडजोड कमेटीच्या सभासदांची लायकी:– सभासद व्यसनी व देशद्रोही नसावा. तसा तो आहे असे दिसून आल्यास त्यास कमी करण्याचा अधिकार सुपरवायझरच्या शिफारसीने वरिष्ठ कमेटी बजावील.

(८) तडजोड कमेटीचा सेक्रेटरी सभासदाकडून एकमताने निवडला जाईल. तसे न झाल्यास सुपरवायझर नेमील.

(९) कब्जे गहाण व तारण गहाण दस्त सावकाराकडून फेडण्याकरिता एखाद्याचा अर्ज येईल त्यावेळी थकलेल्या वर्षाचे व्याजाचा हिशेब शे. ६ टक्केप्रमाणे करावा. मात्र सर्व मिळून व्याजाची रक्कम दामदुप्पटीपेक्षा जास्त होऊ नये. कब्जे गहाणाच्या व्यवहारावर शक्य तोवर मुदलात सूट घालू नये. पण रक्कम थोडी व जास्त खर्चाची बाव असेल तर मुदलात सूट घालतेवेळी सुपरवायझरच्या अभिप्रायानंतर त्याची अम्मलबजावणी व्हावी. अपिलाची मुदत सामान्यतः १५ दिवसांची ठेवली व ती मुदत टळल्याशिवाय अपिल होण्याच्या गोष्टीवर अम्मलबजावणी होऊ नये. अपील गुदरणाऱ्या अर्जदाराने गावकमेटीकडे व अपिल कमेटीकडे किंमतीच्या शेकडा २॥ रुपये फी म्हणून भरावेत.

(१०) अपिलाचा निकाल लागेतोपर्यंत पूर्वीच्या वहिवाटी प्रमाणेच विल्हेवाट असावी.

(११) एखाद्या पंचांच्याविरुद्ध अर्ज असल्यास त्यास न्यायदान कमेटीत बसता यावयाचे नाही. त्या अर्जाचा निकाल राहिलेल्या पंचांच्या बहुमताने होईल. खालील निकाल एकमताने न लागल्यास त्यावर मात्र अपील चालेल. म्हणून अपील अर्ज पंचायत कमेटीमार्फत आल्यास स्वीकारला जाईल. परस्पर अर्ज आल्यास योग्य ते अधिकारी पंचायत कमेटीतील मत नोंदणी पाहूनच त्याचा स्वीकार करतील.

– गट कमेटी –

(१) प्रत्येक गावचा सेक्रेटरी व सुपरवायझर मिळून गट कमेटी होईल.

(२) ही कमेटी सामान्यतः ज्या गावचे अपील असेल त्या गावी जातीने हजर राहून योग्य ते सर्व पुरावे पाहून या कमेटीचे अध्यक्ष सुपरवायझरचा अभिप्राय पाहून निकाल लावतील. या नियमाप्रमाणे ७ ते १३ गावांचे गट निर्माण करावे लागतील.

(३) प्रत्येक गावचा सेक्रेटरी मिळून गट कमेटी होईल व ती कमेटी आपल्यापैकी माताधिक्याने आपला सेक्रेटरी निवडील.

(४) प्रत्येक गावच्या उत्पन्नाचा १।२ हिस्सा गावकमेटीकडे राहील. राहिलेला अर्धा हिस्सा आणि एकाच वेळी ५० किंवा ५० पेक्षा जास्त वसूल केलेली रक्कम गट कमेटीकडे राहील व गट कमेटीने आपल्या जमेपैकी निम्मा हिस्सा आपल्या खर्चाकरिता ठेवून, राहिलेला निम्मा हिस्सा मध्यवर्ती कमेटीकडे पाठविणेचा आहे.

(५) गाव कमेट्यांचा खर्च सुपरवायझरच्या मंजुरीने केला जाईल. व गट कमेटीचा खर्च इन्स्पेटरच्या मंजूरीने केला जाईल.

(६) कमेटीचा पैसा ज्या त्या कमेटीच्या सेक्रेटरीकडे राहील आणि पैशाचे खर्चाची जबाबदारी सेक्रेटरीकडे राहील.

(७) सर्व कमेटीवर मध्यवर्ती कमेटीचा अधिकार चालेल व मध्यवर्ती कमेटी आपल्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी आपले नियम प्रसिद्ध करील.

(८) ज्या त्या कमेटीने आपले अंदाजपत्रक तयार करून त्यावर आपआपल्या वरिष्ठांची संमती घेणेची आहे.

(९) वरिष्ठ कमेटी ही दोन इन्स्पेक्टर्स व एक कायदे तज्ज्ञ यांची बनेल व ज्या गावची केस असेल त्या गावचे पंच असेसर्स म्हणून मदतीस घेईल.

— कमेटीच्या कामाचे नियम —

(१) गाव कमेटीः-कलम २ प्रमाणे सर्व कामे करणेची आहेत. न्यायाच्या संबंधी कायम स्वरूपाची कामे, स्थावराची खरेदीपत्रे, मृत्युपत्रे, बक्षीसपत्रे, वारसा हक्कासंबंधी कामे खेरीज करून सर्व कामांचा निर्णय करणेचा आहे.

(२) कायम स्वरूपाची स्थावर कामासंबंधी चौकशी करून ती शिफारशीसह निर्णयाकरिता गट कमेटीकडे पाठविणेची आहेत.

(३) दिवाणी दाव्यामध्ये १०० चे किंमतीचे आतील दाव्यात एकमताने निर्णय झाल्यावर त्यावर पक्षकारास अपील करता येणार नाही.

(४) क्रि. प्रो. प्रमाणे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकारातील फौजदारी कामे गाव कमेटी चालवील. त्या सर्वांवर गट कमेटीकडे अपील राहील.

(५) कमेटीने १९२६ पूर्वीचे कोणतेही दावे घेऊ नयेत.

(६) अपिलाची मुदत १५ दिवसांची राहील.

(७) अपील त्या त्या कमेटीचे सेक्रेटरीकडे दाखल करणेत यावे.

(८) गाव कमेटीच्या निकालाची अम्मलबजावणी सुपरवायझरमार्फत होईल.

(९) लक्रिमिन अर्जाकरिता अर्जास ८ आण्यापेक्षा केव्हाही फी कमी घेणेची नाही.

(१०) अपील अर्जाच्या निकालाच्या किंमतीवर शे. १ रु. फी घ्यावी. व फौजदारी केसकरिता अपील अर्जास १ रु. फी घ्यावी.

(११) ज्या दाव्यात वादीसारखा निकाल होईल त्या दाव्यात देवविलेल्या विषयाच्या किंमतीवर शे. ५ रु. कमिशन घेणेत येईल.

(१२) दाव्यातील ऐन दस्तावरील व्याज कराराप्रमाणे न आकारता शे. कमीत कमी ३ व जास्ती जास्ती ६ अशी आकारणी करणेत येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत दामदुप्पटीपेक्षा जास्त रक्कम देवविली जाऊ नये.

(१३) प्रत्येक कमेटीने मासिकरिपोर्ट आपआपल्या वरिष्ठाकडे १ तारखेस पाठविणेचा आहे.

(१४) सुपरवायझरनी १० तारखेच्या आत इन्स्पेक्टरकडे आपआपले रिपोर्ट पाठविणेचे आहेत.

(१५) गाव कमेटी आठवडयातून एक वेळ भरेल. गाव कमेटीचा कोरम दोन तृतीयांश सभासदांचा राहील.

— गट कमेटीची कामे —

(१) ही कमेटी गाव कमेटीचे निकालावर अपील कोर्ट म्हणून राहील.

(२) गाव कमेटी कलम ३ प्रमाणे गाव कमेटीच्या अधिकाराबाहेरचे दावे गाव कमिटीने शिफारस केलेले या कमेटीने चालविणेचे आहेत.

(३) गट कमेटीचा कोरम सभासदांच्या दोन तृतियांशाने होईल. व त्या कमेटीचे सुपरवायझर हे अध्यक्ष म्हणून काम करतील.

(४) ही गट कमेटी महिन्यातून कमीत कमी दोन वेळा भरेल.

(५) ही गट कमेटी जरूर त्यावेळी नियमापेक्षा जादाही सुपरवायझर्स बोलावू शकेल.

(६) एक तृतियांश सभासदांच्या सह्यानी सभा बोलावणे संबंधी सूचना आल्याबरोबर तीन दिवसांचे नोटिशीने सुपरवायझर सभा बोलावील.

(७) क्रिमिनल केसच्या निकालावर अपिल मनाई नाही.

(८) गट कमेटीकडे अव्वल कोर्ट म्हणून जी कामे चालतील त्यावर अपील करणेस मुभा राहील.

(९) गाव कमेटीच्या निर्णयावर गट कमेटी अपील कोर्ट म्हणून जो निर्णय देईल त्यापैकी ५०० रु. किमतीपर्यंतचे निर्णयावर अपील करता येणार नाही.

(१०) गट कमेटीने दिलेल्या निकालावर अपिलाची मुदत १५ दिवसांची राहील व ते अपील सुपरवायझरकडे दाखल करणेचे आहे.

— मध्यवर्ति कमेटी —

(१) गट कमेटीच्या निर्णयावरील या कमेटीचा निर्णय अखेरचा समजला जाईल. मात्र एखाद्या मुद्याचे विवेचन करणेचे राहिलेचे निदर्शनास आलेस याच कोर्टापुढे तपासणी अर्ज म्हणून पक्षकारास करता येईल.

(२) या कमेटीकडे येणाऱ्या अपील अर्जावर विषयाचे किमतीवर शेकडा दोन रुपये फी आकारली जाईल.

(३) या कमेटीपुढे पक्षकारांना आपल्यावतीने आपली बाजू मुखत्यारामार्फत मांडता येईल.

अशा एका विशिष्ट पद्धतीने व धोरणाने चाललेले ग्रामराज्याचे प्रतिसरकार, हे एक वेड असल्याचेही राजकारणातल्या अनुभविकांचे मत होते. पण वेड असले तरी ते शिस्तीचे होते. त्याच्या पाठीमागे राष्ट्रबांधणीची काही विचार-धारा होती; लोकांना लोकशाहीचे वळण लावण्याची आकांक्षा होती; विद्याविकसित पात्रता सिद्धि नसेल कदाचित; पण अनुभवात्मक आणि प्रयोग निर्मित पात्रता सिद्धीची आकांक्षा होती. लोकांना बरोबर घेऊन शक्य तेवढ्या लोकांचे सामूहिक हित परकीय सत्तेच्या सहाय्यावांचून आणि स्वावलंबी एकजुटीने साधण्याची ती जीवावरची कसरत होती. म्हणून विचारवंतानी त्या सर्व प्रतिसरकार प्रयोगाकडे सहानुभूतीने पाहिले आणि बौद्धिकापासून तन-मन-धनापर्यंत करता आले तेवढे सहाय्य देऊन तो प्रयोग उत्तेजिला.

असंख्यात विखुरलेल्या प्रतिसरकारच्या विकेंद्रित उठावांनी राजसत्ता अर्धांग लुळी करण्याचे 'चलेजाव'चे प्रतिकार तंत्र होते. दळणवळणाची साधने सतत नाहीशी करून राजसत्तेच्या नाड्या ढिल्या करणे हा त्या लढ्याचा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. या तंत्राने बलिया, गाझीपूर, भागलपूर, मिदनापूर, महाड, रामनाद, सातारा, बैतूल अशा अनेक भागात ब्रिटिश सत्तेचे थोडेफार काल उच्चाटन झाले होते. देशातील सर्व प्रतिकाराचे तंत्र एका मध्यवर्ती नियंत्रण मंडळाकडून पूर्ण विचारान्ती निर्धारित झालेले होते. या तंत्राने मनुष्यहिंसेला विध्वंसक कार्यक्रमात मान्यता दिलेली नव्हती. कोठे कोठे स्थानिक कार्यकर्त्यांच्या चुकीमुळे उत्पात होऊन मनुष्य हत्या घडली असली तरी ते या लढ्याचे नियोजित व सर्वमान्य तंत्र नव्हते. याच न्यायाने साताऱ्यातील हातपाय तोडण्याच्या प्रकारानाही कधीच मान्यता मिळाली नव्हती.

व्यापक विकेंद्रित प्रतिसरकारचे हे तंत्र ठरविण्यात युसफ मेहेरअल्ली व छोटूभाई पुराणिक यांनी फार दूर दृष्टीची व धडाडीची कामगिरी बजावली. श्री. आण्णासाहेब सहस्रबुद्धे, श्री. शंकर बारुआ (आसाम), श्री. सुरज नारायण सिंह (बिहार) इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी या प्रतिकार तंत्राचे मार्गदर्शन फार धैर्याने केले. हे तंत्र व दहशतवादी तंत्र यातील जमीन अस्मानाचा फरक कार्यकर्त्यांना समजावून, पटवून देण्याचे कार्य बेकायदेशीर नियंत्रण मंडळ करीत होते. व प्रतिकाराला सावधानतेची जोड सतत रहावी यासाठी दक्षता बाळगीत होते.

चलेजावचा लढा ही हिंदी लोकमताची प्राकृतिक निकडही होती. या लढ्याला लक्षावधी अज्ञात लोकांनी अनेक धोके सहन करून अतिशय पाठिंबा दिला. कोटयाधीशापासून "टिनपॉट" म्हणून हिणवलेल्या मजुरापर्यंत सर्व लोक आपआपल्या परी धोका पत्करून लढ्याला सहाय्य देण्यास सज्ज असत. वट हुकमांच्या भीतीला बळी न पडता वैमानिक, रेल्वेमधील अधिकारी, लष्करी अधिकारी, वरिष्ठ सरकारी नोकर, शिक्षण संस्थांचे चालक, अध्यापक, डॉक्टर, शेतकरी असे प्रत्येक वर्गातून शेकडो स्त्री-पुरुष पडेल ते सर्व सहकार्य करण्यास अर्ध्या रात्री तयार असत. या व्यापक जनसहाय्यामुळेच सरकार-समांतर प्रतिकाराचा दडपशाहीविरुद्ध टिकाव राहू शकला. चलेजावच्या लढ्यात लोकक्रांतीचा ज्वालामुखी खेडोपाडी पसरून ग्रामराज्यांचा उदय झाला व १९० वर्षांच्या ब्रिटिश अमदानीत प्रथमच शेकडो खेड्यापाड्यातून इंग्रजी सत्तेचे अस्तित्वच जणू उखडून टाकले गेले. याच प्रवाहात साताऱ्यातील ग्रामराज्याचा व महाराष्ट्रातील क्षत्रिय परंपरेचा नैष्ठिक व नैतिक विजयध्वज इतर क्रांतीसेनांच्या जोडीला पोहोचला.

२१ ; याचसाठी केला होता अट्टाहास

समर्थ विद्यालयात स्वदेशीने स्वराज्य सेवा करण्याची दीक्षा घेऊन आपला स्वतंत्र ग्लासवर्क्सचा कारखाना बिरवड्याच्या माळावर (ओगलेवाडी) घालणाऱ्या ओगले बंधूंच्या कारखान्याचा रौप्य महोत्सव हा सन १९४१ चा सातारा जिल्ह्यातील समारोप होता. त्यानंतर नवीन सालची जी सुरवात झाली ती राष्ट्रीय जीवनास उत्थापकच होती. बिहार सरकारच्या जुलूमशाहीचा निषेध म्हणून हिंदुमहासभेच्या अधिवेशनासाठी सातारा जिल्ह्यातून अनेक सत्याग्रही (१९४१ चे डिसेंबरमध्ये) गेले होते. त्यांचा जाहीर सत्कार जानेवारी (१९४२) चे तिसऱ्या आठवड्यात झाला. पण त्यापेक्षाही बर्फाचा गोळा होऊन पडलेल्या हिंदुस्थानला ब्रिटिश रियासतीत नवचैतन्य देणाऱ्या " महादेवा " चा जन्मशताब्दि बहोत उत्साहाने सातारा जिल्ह्याने साजरा केला. न्यायमूर्ती रानडे यांचा वाईचे नानासाहेब वैद्य यांच्याशी निकट संबंध व साताराचे रा. ब. पाठक तर न्यायमूर्तींचे वर्गबंधू. त्यामुळे साताराच्या सार्वजनिक जीवनाला न्यायमूर्तींचे मार्गदर्शन विशेष आस्थेने लाभलेले. म्हणून १८ जानेवारी १९४२ रोजी, कृतज्ञतेने आदरांजली रानड्यांच्या स्मृतीमूर्तीला सातारा जिल्ह्याने आवर्जूनच वाहिली. त्याचसुमारास सातारा समर्थचे बाबूराव वैद्य, (शिव) रामभाऊ मोडक (वकील), डॉ. भडकमकर प्रभृतींनी आण्णासाहेब चिरमुले यांचे प्रोत्साहनाने मुंढवा कागद कारखाना आपल्या व्यवस्थेखाली घेण्याची उडी मारली होती.

या आनंदोर्मी एका " भयकृत " कालखंडात उमटत होत्या. हिटलरी होरपळीच्या ज्वाळा जग व्यापून बसल्या होत्या. शान्ति युगाची व मानव्याच्या प्रस्थापनेची धडपड करणाऱ्या महात्मा गांधींना सगळ्या आशियाटिक राष्ट्राबरोबर " छोडो आशिया " असे इंग्रजास म्हणावयाचे होते. पण आशियातील जपानसारखी राष्ट्रेच युद्धात गुंतलेली; वेळ वखत पाहून जपान इंग्लंडवर मात करणार असा रंग दिसू लागला होता. आक्रमक जपानी फॅसिझमपासून हिंदुस्थानचा बचाव करण्याचा मगदूर ब्रिटिश राजवटीत उरला नव्हता. मलाया – ब्रह्मदेश आदिकातील -- प्रदेश आधीच जपानने साधला होता. लष्करी दृष्टीने हिंदुस्थानही इंग्रजांच्या हातून जाण्याचा धोका तीव्रपणे निर्माण झाला होता. हिंदुस्थान स्वतंत्र झाला तरच जपानचा नैतिक व भौतिक प्रतिकार सर्वशक्ति एकवटून तो करील हे महात्माजींनी व

देशगौरवानी ओळखले होते. म्हणूनच " चलो दिल्ली " साठी जपानचे अगर जर्मनीचे सहाय्य घेतले तरी हिंदुस्थानची सरहद्द लागताच, आपली एकट्याची हुकमत सुरू होईल, असा निर्धार देशगौरवानी जाहीर केला होता. त्याचबरोबर " चले जावचे " आंदोलन हुकुमशाहीला नेस्तनाबूद करण्यासाठीच आणि आव्हान म्हणून महात्माजींनी केले होते. १९४०–४१ साली त्यांनी चालविलेल्या वैयक्तिक सत्याग्रहासाठी सातारा जिल्ह्यात ६२ जणांना परवानगी मिळाली होती. त्यापैकी तिघांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. एकूणसाठ मंडळीनी अधिकृत सत्याग्रह केला. शिवाय एकोणतीस मंडळीनी अनधिकृतपणे सत्याग्रह केल्याची वार्ता आहे. इंग्रजी राजवटी विरुद्ध जनता इतकी असंतुष्ट होती की, युवक परिषदेत (सातारा) वैयक्तिक सत्याग्रहाला पाठिंबा देणारे व रशियाला यश चिंतणारे ठराव पास झाले होते. हे सर्व होत असता १९२१ सालची चळवळ व महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार जनतेच्या पुढे होता. आणि १९३० च्या सामुदायिक सत्याग्रहामध्ये महात्माजींनी जंगले, कुरणे, मिठागरे जनतेने आपली करावी असा आदेश दिला होता, तेही आठवत होते.

हिंदुस्थानातील ब्रिटिश 'सत्तेचे' अन्तिम अधिष्ठान त्यांचे खडे सैन्यबल (Army of occupation) हेच होते. दुसऱ्या महायुद्धात १९४२ च्या सुमाराला अशी परिस्थिती लष्करी दृष्टया निर्माण झाली होती की युरोपात आफ्रिकेत, मध्यपूर्वेकडे, व सुदूर पूर्वेकडे वेगवेगळया युद्धक्षेत्रात ब्रिटिशांचे सैन्यबल अनेक आघाडयावर मोहिमेत विखुरले होते. हिंदुस्थानात फारच थोडे खडे सैन्य या काळात इंग्रजाजवळ होते. हा क्षण लष्करी दृष्टीने हिंदी जनतेच्या व्यापक प्रतिकारात्मक उठावाला अतिशय अनुकूल होता. ही अशी अनुकूल संधी १८५७ नंतर ऐतिहासिक जागतिक घटनेमुळे प्रथमच निर्माण झाली होती. या संबंधीचा लाभ घेतला नसता तर भावी इतिहासाच्या दृष्टीने दोष ठरला असता. म्हणून मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या ८ ऑगस्ट १९४२ च्या बैठकीत इंग्रजांना 'चले जावचा' आदेश एका ठरावाने देण्यात आला.

असहकाराच्या विधायक कार्यक्रमाचे एक अंग म्हणून १९२१ साली दारूच्या दुकानावरील शांततापूर्वक विरोधनाचा कार्यक्रम रा. ब. काळयांच्या अध्यक्षतेखाली निरोधन मंडळ स्थापून चालू झाला. दादासाहेब करंदीकर, भास्करराव जाधव व भाऊसाहेब सोमण त्या मंडळाचे उपाध्यक्ष होते, वाग्भट देशपांडे व नारायणराव जोशी त्याचे चिटणीस होते. शांततापूर्ण निरोधने दुकानावर चालू असता जिल्हाधिकारी ई. एल्. मॉयसी यांच्या

धोरणाचा ताल धरणाऱ्या पोलिसानी विरोधकास बेताल त्रास दिला. रा. ब. काळ्यानी अबकारी मंत्री चुनीलाल मेहताकडे दाद मागितली असता, काळ्यांच्या तक्रारीत तथ्य नाही, असा निर्णय आल्यामुळे ९ डिसेंबर १९२१ रोजी कायदेभंग करूनही निरोधन करावे व सोमणानी आव्हानपूर्वक निरोधन करून, जरूर तर, कारावास पत्करावा असे उत्तेजन रा. ब. पाठकानी दिले. तेव्हा सरकारी धोरणात फरक झाल्याशिवाय राहिला नाही. तितका सोपेपणा आता नव्हता हे सर्व देशाप्रमाणे साताराही ओळखून होता.

जिल्हयाने अनेक खडतर प्रसंगास तोंड दिले. कार्यकर्ते मोडले पण वाकले नाहीत. काही तर मृत्यूला कवटाळून अमर झाले. अगदी अल्पकाळ का होईना, पण ज्या कित्येक खेड्याना सरकार वेळेवर अन्नवस्त्र पोचवू शकत नव्हते, त्याना जिवाची तमा करून काँग्रेसपैकी " गुप्ते " झालेल्या मंडळीनी अन्न व वस्त्र पोचविले; आपसात तडजोडीने गावातील भांडणे मिटविली; चोराचिलटापासून अभय दिले; यालाच खरे म्हटले तर साताराचे प्रतिसरकार म्हणतात. " गुप्त्यां "नी अशी कामे चालविली असताच, परकीय सत्तेचा कारभार बंद पाडणाऱ्या कारवायाही अनेक ठिकाणी झाल्या. त्यामुळे इंग्रजी राजवटही खवळली, आणि तिच्या हस्तकानी दुर्वृत्त लोकांनाही " काँग्रेसचे कार्यकर्ते " म्हणून स्थानबद्ध केले. परकीय सत्तेच्या हस्तकांनी काँग्रेसच्या गोटात केलेली ही रंगरूट भरती जिल्हयाला जाचक झाली ! आपण खरोखरच परकीय सत्तेला अस्वस्थ करू शकतो व लोकांच्या कल्याणाची सेवा करू शकतो या आत्मविश्वासाच्या मंडळीपैकी ज्यांचा आत्मविश्वास आत्मश्लाघेत परिणत झाला, त्यांच्या हातून कळत–न कळत झालेल्या अत्याचार अनाचारामुळे, प्रतिसरकार असलेल्या मूळच्या संस्थेला लवकरच " पत्री " सरकारचे स्वरूप यावयास मदत झाली !! आणि विरोध करील अगर नीतीच्या गोष्टी सांगेल त्याच्याबद्दल तसल्या तोल सुटलेल्या कार्यकर्त्यात असहिष्णुतता वाढली व जनसामान्यात एक प्रकारचे भयप्रद वातावरण निर्माण झाले. गुप्त्यांच्या गुप्ततेचा फायदा जातिवंत गुन्हेगारानीही घेण्यास कमी केले नाही. परकीय सत्तेला काँग्रेस तत्त्वभ्रष्ट व नीतीभ्रष्ट ठरविण्यास, ते सर्व होईल तर हवेच होते. म्हणून राज्यकारभाराची " आलबेल " सांगण्यापुरतीच बंदोबस्ताची यंत्रणा ठेवून परकीय सत्ता वेळ मारून नेऊ लागली. मूळ चांगल्या गोष्टीचा असा विचका होत असता परिस्थिती काबूत ठेवून तिला राष्ट्रीय अशा सात्विक वळणावर नेणारा नियंत्रक नेता नाही, हे अनेक सात्विक अंतःकरणाचे दुःख सातारा जिल्ह्याला होते. तरीही खरोखरच देशभक्तीने प्रेरित होऊन ज्यांनी भारताच्या केवळ स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिरे घेतली अगर हालअपेष्टांचे दिव्य सोसले, अथवा जन्मभर बऱ्या न होणाऱ्या दुखण्याचा ससेमिरा लावून घेतला, त्या अव्वल देशभक्तांचा परामर्ष

बिनचुक व्यावयास खेड्यापाड्यातील बायाबापड्याही चुकत नसत. देश-भक्तीच्या बकुळीची फुले अशी सर्वत्र पसरलेली होती म्हणूनच "जय सातारा" असा उद्घोष भारतभर झाला.

जलेजावच्या आंदोलनाने उसळी घेताच जिकडे तिकडे धरपकड, उत्पात, सत्याग्रह नि गुप्त हालचाली व प्रतिकारी दडपशाही व सामुदायिक दंड याना नुसता ऊत आला होता, आणि हिटलरी होरपळीमुळे रॉकेल, साखर वगैरे नित्योपयोगी जिनसांची चणचण होऊन सरकारी भाव-नियंत्रणाच्या विपरीत परिणामाची दखल जिल्हयातील सगळीच वृत्तपत्रे घेऊ लागली व साठेबाजी-विरुद्ध लोकमताची मोहीम १९४२ ऑक्टोबरमध्ये जोराने सुरू झाली. मुंबई इलाखा व हिंदुस्थानभरही प्राथमिक शिक्षकांची उपासमारीची ओरड, महा-गाईची मागणी, अन्नसत्याग्रह पेट घेऊ लागला. त्यातच १९४३–४४ च्या अर्थ-संकल्पांतील करवाढीने लोकांच्या असंतोषात राकेल ओतल्यासारखे झाले. विशिष्ट गटातील व्यापाऱ्यास लाडिकपणाने वागवून ठेवण्याने काळ्या बाजाराची चलती आणि गरिबांना मोड मिळण्याची सुद्धा पंचाईत होऊन गेली होती. सरकारचे धान्यसाठे कळविण्याचा साप्ताहिक कचाटा आणि त्यातून शेत-कऱ्यावर उद्भवलेल्या कटकटी इतक्या वाढल्या की १९४२ साली अटकेत पडलेले बाबुराव गोखले १९४३ साली बाहेर सुटून येताच त्यांनी सांगलीच्या "लोकसखा" मधून महाराष्ट्राची आणि सातारच्या "श्रीशाहू" मधून सातारा जिल्हयाची अन्नधान्य समस्या उहापोहून विधायक उपाययोजना सुचविल्या. त्यांचा अल्पांशाने सरकारने स्वीकार केला.

आपल्या ओढग्रस्त स्थितीतही सातारा जिल्हा कर्तव्य जागृत होता. म्हणून दुष्काळग्रस्त बंगालला १९४३ साली आपलेपणाने भरीव मदत करणारा सातारा जिल्हा आपल्याच जीवनाबद्दल बेफिकीर कसा राहील? अन्नधान्याबाबतच्या सरकारी हुकुमातील सातारा, कुलाबा व रत्नागिरी जिल्हयांच्या कलेक्टरांनी केलेल्या हुकमातील सत्तर टक्के लोकांच्या जीवनाबद्दलची बेफिकीरी कऱ्हाडचे बाबूराव गोखले यांनी उघडकीस आणली होतीच. मग सातारा येथे सर्व पक्षीय बैठक होऊन रयतेच्या दुःख निवारणार्थ (शंकरराव) "साठे समिती" तयार झाली. व भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजातील वज़नामुळे सरकारी धोरणात लोकहितबुद्धीचे इष्ट फरकही थोडेफार झाले. तरी रासनची व वाटपाची दुकाने निघाल्यावरही रयतेच्या पोटाचे हाल चाललेच होते. त्यातच थंडीच्या कडाक्याने कोरेगांवतालुक्यातील पिके गेल्याने लोकांचे हाल चालले होते. या सर्वास भाऊसाहेब सोमण यांच्या पुढाकाराने बाबूराव गोखले प्रभृतींनी कष्ट मुक्तीचा सढळ हात दिला. याच काळात सातारारोड, ओगलेवाडी व किर्लोस्करवाडी येथे मजूर संघटनेचे काम भाई विष्णुपंत चितळे करीत होते. त्यांच्या विधायक

कार्याला सातारा जिल्हा उचलून धरीत होता. वरील सर्व गोष्टीबरोबर जनतेने स्वयंसंरक्षण वर्गही सुरू केले होते. ठिकठिकाणच्या कुलुपबंदीखान्यासंबंधी नि सातारा जिल्ह्याच्या मुख्य कारागृहासंबंधी राजबंद्यापासून सर्वांमध्ये असंतोष पसरल्यामुळे बाबूराव गोखले यांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझनना तक्रार पत्र लिहिले व काही किरकोळ सुधारणा घडविल्या. मे (१९४३) च्या शेवटी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या एकसष्टीनिमित्त ना. शास्त्री प्रभृतींनी देशभर गौरव केला त्यात सातारा जिल्ह्यानेही आपला वाटा उचलल्यामुळे, नवीनच वारे भरू लागले. जुलईपासून राजबंदींची मुक्तता भरीव संख्येने होऊ लागली आणि कृष्णा कॅनाल बागायतदारांना आटोकाट तक्रारीनंतर उसाला पाणी मिळून लाखो रुपयांचे नुकसान वाचले. किर्लोस्कर कारखान्याचीही "बाँब" प्रकरणातून न्यायमंदिरशुद्ध मुक्तता होऊन तो पूर्ववत् सुरू झाला.

हिटलरी होरपळीचा रंगपालटहि स्वास्थ्याकडे झुकणार असा किंचित अंदाज लागताच कऱ्हाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा रौप्य महोत्सव आणि सांगलीस महाराष्ट्र नाटच शताद्वि महोत्सव साजरा होऊन त्याच्या छोटचा मोठचा आवृत्त्या सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर येथेही निघाल्या. त्यातून मोकळे होताच कऱ्हाडहून बाबूराव गोखले व विनायकराव फणसळकर यांनी प्रगट विनंती केली की "युद्धोत्तर घटनेच्या योजना सर्वत्र चालू असता व त्यात हिंदुस्थानचे पारतंत्र्य कायम कसे राहील यावरच भर दिसत असता आगामी तह परिषदेत हिंदुस्थानच्या लोकांचेच निवडलेले प्रतिनिधी हिंदुस्थानचे भाग्य ठरविण्यास बसावेत म्हणून खेडचाखेडचातून त्या हक्काची मागणी व्हावी."

अशा स्थितीत १९४४ साली विद्वद्वर्य रंगाचार्य रड्डी व मूळ रत्नागिरी जिल्ह्यातील पण सेवादल संघटनेसाठी विटे येथे राहून सेवा करणारे खरे सत्याग्रही डॉक्टर विष्णु गणेश ऊर्फ आण्णा आपटे यांच्या निधनाने सातारा जिल्ह्यास धक्का बसल्याशिवाय राहिला नाही. त्याचप्रमाणे चिमठाणा खजिना लुटीतील सातारकरांना आणि जेजुरी (खंडोबाची) लुटीतील रत्नाप्पा कुंभार प्रभृती गुप्त्यांना नागपूरला अटक झाल्यामुळे आणखी धक्का बसून धाक वाटल्याशिवाय राहिला नाही. २२ आक्टोबर १९४४ रोजी तर कवलापूर येथे दत्ता गुरव यांचे येथे खडकी डेपोतील बॉम्ब, एक पिस्तूल, एक रिव्हालव्हर काही काडतुसे यांच्यासह धोंडीराम माळी यास पकडल्याने चिमठाण्यासह नीरा बँक लूट (१९४४) प्रकरण कितपत शेकते हीच चिन्ता सर्वत्र लागून राहिली !!

त्यातच लेव्हीस्कीमची धास्ती आणि युद्धोत्तर पुनर्घटना संचालनातून काय निघणार ही भीति जनमताने घेतली असताच जिल्ह्याच्या पूर्व भागात प्लेग व त्याचा सार्वत्रिक प्रसार आणि त्याच्या प्रतिबंधनार्थ धडपडी कर्तव्यबुद्धीने चालू करणेच आले होते. त्या धडपडीतच 'गंडस्योपरि पीटिका संवृत्ता'

होऊन रासन व वाटप दुकाने सरकारने अस्तित्वात आणली तरी रयतेच्या पोटाचे हाल व कागद नियंत्रणामुळे वृत्तपत्रांचे वामन अवतार अनुभवावे लागत होतेच !

तशा अवस्थेतही विमा महर्षी वासुदेव गणेश चिरमुले यांचा ८१ वा वाढदिवस जिल्ह्याने कृतज्ञतापूर्वक साजरा केला आणि सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचाही रौप्य महोत्सव साधला. हे होत असताच, लोकशाही स्वराज्याचा विकास तळापासून झाला पाहिजे म्हणून गुप्त्यांनी साधेल तेथे ग्रामराज्ये स्थापण्याचा सपाटा चालविला. १९४४ च्या मध्यापर्यंत या ग्रामराज्यामार्फत दारूबंदी, व्यायाम मंडळे, अत्याचारापासून स्त्रियांचे संरक्षण, गुंड व दरोडेखोरांचा बंदोबस्त, आटोपशीर खर्चात विवाहादि संस्कार, सहा टक्केवर सावकारी व्याज-दरावर नियंत्रण, काळचा बाजारासह नफेबाजीचा बीमोड, सहकारी चळवळ, अस्पृश्यता निवारण, स्त्री समाज जागृती, सेवादले, सैनिक संघटन, राष्ट्रभाषा प्रचार, वस्त्र स्वावलंबन, अक्षर मैत्रीप्रचार, राष्ट्रीय बौद्धिके, बलोपासना, आरोग्य संवर्धन, अन्न पुरवठा आणि जाती जातीतील ऐक्य अशा वीस गोष्टीपैकी जितक्या साधता येतील तितक्या विधायकपणे साधण्याचा तर गुप्ते प्रयत्न करीत होतेच; पण त्याशिवायही कोठे खासगत वा सार्वजनिक संघर्ष आला तर निर्णय लवादामार्फत घेण्यात येई. सरकारविरुद्धच्या उठावाची ही विधायकपणे आक्रमक चळवळ सातारा जिल्ह्याच्या पांच तालुक्यात सुरू झाली, आणि ग्रामराज्याचा प्रसार कसाबसा सर्व जिल्हाभरीच्या पांचशे गावापर्यंत रेटला गेला. पैकी सुमारे पाऊणशे गावातच तो यशस्वी झाला. १९४२ च्या डिसेंबर पासून सुरू झालेल्या आस्तेकदम मोहिमेने जवळ जवळ १९४५ अखेर हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीला स्वास्थ्य नव्हते.

खानदेशचे डॉ. उत्तमराव पाटील हे खानदेशच्या सर्व गुप्त्यांना घेऊन सातारा जिल्ह्यात १९४५ च्या प्रारंभापासूनच जी. डी. लाड, आप्पा लाड व नाना पाटील यांच्या संगनमताने प्रतिसरकारच्या कार्याची रूपरेखा आखून होते. गावोगाव सभा घेऊन त्यांनी प्रतिसरकारचा प्रचार केला, तुफान सैनिकांची दले स्थापली आणि ग्रामन्यायालये स्थापन केली. या कामी त्यांच्या शूर पत्नी सौ. लीलाताई (सरोडा जेलमधून निसटून आलेल्या) यांचा डॉक्टरना अत्युत्तम सहकार होता. अशा प्रयत्नशील प्रतिसरकारची त्यावेळी जिल्ह्यात आवश्यकताही होती. कारण कापील येथे सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद बभ्रूवाहन जाधव प्रभृतींनी भरवून महात्मा गांधींच्या चलेजाव चळवळीला पाठिंबा दिल्यामुळे सातारा जिल्ह्याची नोकरशाही भडकलीच होती. आंदोलकांवर खटले आणि बाबूराव गोखले, पांडूतात्या डोईफोडे, गंगाधर पागे प्रभृतीवर फिरून स्थानबद्धतेची पाळी पोलिसशाहीने आणली, एवढेच नव्हे तर

साताऱ्यात जणू ब्रिटिश राज्यच नाही, अशा समजूतीने स्त्रियांवरही अत्याचार करणारे पोलीसराज्य चालू झाले होते. त्यामुळे शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ आणि महाराष्ट्रीय वृत्तपत्रे समिती यांनी समक्ष चौकशी करून आंदोलकांची नैतिक मूल्ये जगजाहीर केली.

या दिव्यातून सातारा जिल्हा जात असताच ग्रामसेवक म्हणून आपल्या जीवनाची सार्थकता मानणारे गोविंद बापू सुरलीकर कुलकर्णी व परचुरेशास्त्री यांचा स्वर्गवास व इसलामपूरचे डॉ. भाऊराव वैद्य यांच्यासारख्या परोपकारी देशसेवकाचा कैलासवास जिल्ह्याला मुकाट सोसावा लागला. पण कापीलच्या विद्यार्थी परिषदेप्रमाणेच पुसेगांवच्या काँग्रेस युवक परिषदेत व इसलामपूर येथील जिल्हा शेतकरी परिषदेत झालेल्या ठरावातून जिल्ह्याचे जीवन-तेज दिसून तर आलेच; पण वर, मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणूकीत काँग्रेस उमेदवार भाऊसाहेब हिरे व काकासाहेब गाडगीळ यांना जिल्ह्याने प्रचंड बहुमत दिले. आणि तेही सेवादले सरकारी बंदी खाली असताना! हिरे गाडगीळांच्या निवडणूकी बरोबरच आत्मारामपंत ओगले पॅरिसला हिंदी कार-खानदारांचे सल्लागार म्हणून गेल्याने सातारा जिल्हा आनंदला होता. तसाच आनंद वाई येथील राष्ट्रीय क्रांतिकारक तात्यासाहेब नित्सुरे यांच्या षष्ठ्यब्दितही सातारा जिल्ह्याने मानला.

सुधारकाचार्य गोपाळराव आगरकर यांची पन्नासावी पुण्यतिथी प्रा. गोविंदराव भाटे यांच्या अध्यक्षतेखाली जूनमध्ये कऱ्हाडास झाली. त्या सुमारा-सच १९४५ च्या मध्यावर अप्रातिनिधिक राज्यकारभाराची घडी बदलण्याचे सरकारने ठरविले. मुंबई प्रांतात विधानसभेच्या निवडणूकीची चक्रे फिरू लागली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीच्या पार्लमेंटरी बोर्डावर विधान परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब सोमण यांचे नांव आले. सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष व "गुप्त्यांचे प्रतिनिधी" स्वामी रामानंद यांच्या सल्याने जिल्ह्याचे काँग्रेस तर्फेचे नऊ उमेदवार मुक्रर झाले. आणि १९४५ हे वर्ष काँग्रेसच्या हीरक महोत्सवाचे असल्यामुळे सहाजिकच त्या उत्सवाचे समारंभ जिल्हाभर जिव्हाळ्याने झाले.

उगवले १९४६! तरीही कऱ्हाड रेल्वेस्टेशन, जवळ कोपर्डे गावचे हद्दीत रुळाच्या वाटच्या काढून घेतल्या गेल्या, हे अनेकांनी नापसंती दाखवण्यासारखे कार्य घडले! पण त्यामागील वृत्ती ब्रिटिश राजवटीच्या तिटकाऱ्याची होती. त्यापेक्षा सातारा न्यू इंग्लीशस्कूलमधील सहावीचे विद्यार्थी हजेरी देत ती "जयहिंद" म्हणून देत, त्यातील देशाभिमानाचे कौतुक होत होते. तशात जानेवारीचे तिसऱ्या आठवड्यात साने गुरुजींचा दौरा होऊन "गुप्त्यांचा" ऊर्फ "वनवासी रामांचा" जाहीर गौरव होऊ लागला; लोणंद–पारे पायतोड खटले; चिमण-गाव–सासपडे जाळपोळ खटला, नांद्रे पे ट्रेन लूट यांचे उल्लेख अभिमानाने

गुरुजींनी केले; म्हणून फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात कोळे-कऱ्हाड रस्त्यावर टेलिफोनच्या तारा तुटल्या, एप्रिलमध्ये कालवड्याच्या निवृत्ती पाटलास बांधून त्याचे तीन हजार रुपये गुप्त्यांनी काढले अगर मे चे प्रारंभी कऱ्हाड ढेबेवाडी रस्त्यावर चचेगाव हद्दीत लूटमार झाली याबद्दल कोणी ब्र उच्चारीना एरवी वर्षाच्या प्रारंभी झालेल्या क्षत्रिय रामोशी परिषदेने वरिष्ठ वर्गीयांच्या! बरोबरीने सामाजिक स्वातंत्र्य उपभोगण्याची दाखविलेली ईर्षा आणि विधिमंडळाचे निवडणुकीत दिसून आलेली लोकमताची नवराष्ट्रनिर्मितीची जिद्द नवीन आशा पालवीतच होती.

तेव्हा निवडणुकानंतर काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन झाले, आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरता ज्यांनी तळहातावर शिरे घेऊन अघोरी शिक्षा भोगावयास तयारी दाखविली, किंवा जे गुप्त राहून प्रतिसरकार स्थापण्याचा प्रयत्न करीत होते, ते सर्व अहिंसेचा सात्त्विक मार्ग शंभर टक्के आचरीत राहिले नसले तरी तेही देशाकरताच धडपडले, हे जाणून त्यांच्यासुद्धा शिक्षा भोगत असलेले अगर वारंटाचा समेमिरा असलेले सर्व देशभक्त शांततामय आणि संथ जीवनासाठी बंधमुक्त करणे हे काँग्रेस मंत्रिमंडळाचे कर्तव्यच होते. त्याप्रमाणे शिक्षा झालेले सत्तावीस कैदी सुटले, ऐंशी खटले काढून घेण्यात आले. एकूणपन्नास चौकशी रद्द झाल्या आणि ५ मे १९४६ रोजी कोणेगांव (ता. कऱ्हाड) येथे शांतीचे व क्रांतीचे सर्व उपासक प्रगट झाले. त्यांचा सत्कार व त्यांच्या कार्याचा गौरव हजारो मुखांनी जनतेने केला. आपण वनवासी राम म्हणून नांदत असता जनतेने आपल्याला वात्सल्याने सांभाळले याबद्दल सर्व देशभक्तांनी कृतज्ञता व्यक्त केली. नंतर त्यांचे कऱ्हाड, सातारा वगैरे ठिकाणी जाहीर सत्कार झाले. ९ मे १९४९ रोजी भाऊसाहेब सोमणांचे अध्यक्षतेखाली सत्कार चालू असता शिरवडे स्टेशन कामगिरीचे नायक सदाशिवराव पेंढारकर हे १२ एप्रिल रोजी दिवंगत झाल्याने चुकल्या चुकल्यासारखे होऊन सर्वांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. मग "चलेजावच्या" चळवळीत ज्यांची खाजगी मिळकत जप्त झाली होती अगर जे सामुदायिक दंड बसविले होते त्यांच्या खाजगी मिळकती भाऊसाहेब सोमणांच्या खटपटीने परत मिळाल्या व सामुदायिक दंड परत झाले ते गावातील सार्वजनिक कार्याला उपयोग करण्याच्या शर्तीवर.

दरम्यान द्रविड हायस्कूलचा वाई येथे हीरक महोत्सव साजरा झाला आणि ७ नोव्हेंबर १९४६ रोजी पुणे नगरपालिकेचे मानपत्र क्रांतीवीर नाना पाटलांना झाले. त्यावेळी धुळे खजिन्याचे लुटीत साडे पांच लाख रुपये व पे ट्रेन लुटीत एकोणतीस हजार दोनशे चौसष्ट रुपये मिळाले व त्यांचा उपयोग चळवळीसाठीच केला. तो पैन् पैचा हिशेब मजजवळ आहे, असे नाना पाट-

लांनी सांगितले. त्याचा हवाला देऊन कोल्हापूरचे " समाज ' ने जेजुरी लूट करणारांनी आपला हिशेब द्यावा " अशी मागणी केली ! पण एवढ्यात आमदार चंद्रोजीराव पाटील (कारभारी) यांचा खून झाल्याची वार्ता पसरली आणि जिल्ह्यावर चिंतेचे ढग पसरू लागले !!

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीचा फायदा घेऊन जी गुंडगिरी मूळ धरून बसली होती, तिचे निर्मूलन करण्यासाठी मुंबईचे गृहमंत्री मुरारजी देसाई आणि मुख्यप्रधान बाळासाहेब खेर यांचे दौरे १३ व १७ जानेवारी १९४७ पूर्वी सातारा जिल्ह्यात झाले. तरी गुंडगिरी बीमोड झाली नाही. म्हणून सातारा येथे प्रांतिक सेवादलाच्या १२००० चा अपूर्व मेळावा १९४७ फेब्रुवारीचे प्रारंभी मेजर शहानवाज यांच्या अध्यक्षतेखाली झाला असता, रावसाहेब पटवर्धन आणि भाऊसाहेब सोमण यांनी तरुणांना स्वयंसंरक्षक व समाज संरक्षक होण्याचा उपदेश केला. तरुणांनी समाज संरक्षणाची जबाबदारी घेतल्याशिवाय गुंडगिरी मुळापासून निपटून निघावयाची नाही, शीलवंत तरुणांनी समाज संघटनेची जबाबदारी घ्यावी असाच उपदेश साने गुरुजींनी आपल्या दौऱ्यात सातारा जिल्ह्यातील तरुणांना त्या साली केला.

त्याच मोक्यात हिंदुस्थान सरकारतर्फे मलाया-ब्रह्मदेश वगैरे पौर्वात्य देशात पाहाणीसाठी जाणाऱ्या कारखानदार शिष्टमंडळात शंकरभाऊ किर्लोस्कर यांचा समावेश झाला होता. अशा प्रसन्नतेत अखिल भारतीय राजकारणाची दिशा भारताचे स्वातंत्र्य दृष्टीपथात दाखवीत होती. फेब्रुवारीपासून तसा ध्वनी उमटत होता, तो ऐकता ऐकताच, " देशद्रोही तितुके कुत्ते। मारूनी घालावे पालथे। " या ब्रीदाने प्रतोद व पुढे ब्राह्मण पत्रिका चालविणारे वासुदेवराव मुंडले ता. ७ फेब्रुवारी रोजी देवाघरी गेले. मार्चपासून हरिजनांचे मंदिर प्रवेशास सार्वत्रिक पाठिंबा मिळू लागला. पण त्याच घायटच्यात बातमी मिळाली की आकोला राष्ट्रीय शाळेचे एक संस्थापक, बोरगावचे लोकसेवा मंडळाचे प्रवर्तक का. वि. ऊर्फ बापूसाहेब सहस्रबुद्धे हे प्रसिद्ध क्रांतिकारक २० फेब्रुवारी रोजी देवलोकी गेले ! एप्रिलात साने गुरुजींचा दौरा पंढरपूर विठ्ठल मंदिरात हरिजन प्रवेश होण्यास अनुकूलता मिळविण्यास प्रारंभ म्हणून झाला. पण २६ एप्रिल रोजी तासगाव येथील बादशहाचा पुतळा कोणीतरी फोडल्याने जिल्ह्याच्या भावना प्रफुल्लतेत विषण्णतेचा ओघ मिळून वाहू लागल्या. तरीही स्वतंत्र राष्ट्राचा पहिला कार्यक्रम सर्वत्र लष्करी शिक्षण हा असावा अशी मागणी होत राहिली आणि सातारा जिल्ह्यात लष्करी शाळा उघडण्याबद्दल आग्रहच होऊ लागला (समर्थ ७ जुलई १९४७ पहा). मनाची अशी दोलायमान स्थिती व्हावयास जिल्ह्याची स्थानिक परिस्थिती जशी कारण होती, तशीच भारतीय राजकारणाची उद्वेगकारक भट्टीही कारण होती. अखंड भारताचा ध्यास वर्षानुवर्षे

घेऊन बसलेल्या देशभक्तांना, फुटल्या छातीने पाकिस्तान निर्मितीस संमती भारताचे वज्रपुरुष केवळ नाईलाजाने म्हणून देत आहेत, असे कळल्यावर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा सर्व दैवी व ऐहिक आपत्तीवर मात करणारा आवाज कोठून येतो का ते कान टवकारून अनेकजण पहात होते. पण शेवटी " कालाय तस्मै नमः " म्हणून अखंड हिंदुस्थान दुराष्ट्र होऊन पण इंग्रजांच्या कचाट्या-तून स्वतंत्र होत आहे एवढ्यावर कामास लागणे आल्यावर ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे तिरंगी निशाण सातारच्या अजिंक्यताऱ्यावर फडकविण्याचा मान सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष स्वामी रामानंद भारती यांना मिळाला. त्यांनी आणि वाई येथे बाबूराव गोखल्यांच्यापासून वाळवे येथे थोरातांच्यापर्यंत राष्ट्रीय झेंडा फडकविणाऱ्या नेत्यांनी जिल्हाभर स्वातंत्र्याचे स्वागत करून आवाज उठविला की —

" भारत स्वतंत्र झाला याचा अर्थ आशियात केवळ एक नवीन स्वायत्त राष्ट्र निर्माण झाले, एवढाच नाही, तर नव्या एका सुधारणा युगाला सुरवात झाली. भारताच्या नवजीवनाचे मुख्य त्रिगुण म्हणजे राजकारणाला आध्या-त्माची जोड, सामाजिक मूल्याधाराचे नूतनीकरण व उदार आणि विश्वव्यापक माणूसकीचा बुद्धिवादी आधार नि आविष्कार. भारतातील सत्तान्तराचे स्वरूप शान्तिमय असल्याकारणाने क्रांतिमय उलथापालथींना तेथे फारसा वावच नव्हता. भारतात लोकशाही संस्थांचा विकास रुजू झाला असल्याकारणाने, लोकांनी काँग्रेसकडे आलेली सत्ता आपली स्वतःचीच मानली. कायदेशीर शिस्त ही भारताची परंपरा असून ब्रिटिश शासनाने तीच अंगवळणी पडली होती. निष्ठावंत आणि राजकीय पक्षातीत असे खडे सैन्य स्वतंत्र भारताला सहजच राष्ट्रीय सैन्य म्हणून लाभले. आता लक्षात ठेवले पाहिजे की बहुमताचा निर्णय शिरोधार्थ मानण्याची दीक्षा घेणारे राष्ट्रच लोकशाही शासन यशस्वी करू शकते. तसे व्हावयाचे तर मध्यम वर्गीयांचाच विश्वास संपादन करावा लागतो. तसे करताना स्वतंत्र भारताला जे नवजीवन निर्माण करावयाचे आहे ते पूर्व-पश्चिम संस्कृतीच्या प्रीतीसंगमाने करावयाचे आहे. मात्र आपले व्यक्तिमत्त्व संपूर्ण सांभाळून ! भारताचा हा नवा प्रयोग यशस्वी झाला — आणि यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही — तर भारत जगात अग्रेसर राहील. जर का अपेशी झाला ? तर अंतरंग–बहिरंगांसुद्धा भारताला साम्यवाद स्वीकारावा लागेल. भारतात लोकशाही समाजवाद हाच साम्यवादावर सोपा आणि जलदीचा उपाय आहे. "

" सर विल्यम जॉयसन हिक्स स्वच्छ स्वच्छच म्हणत असे की हिंदी लोकांच्या हितार्थ काही आम्ही हिंदुस्तान जिंकला नाही. हिंदी लोकांचा दर्जा वाढविण्यासाठीच आम्ही हिंदुस्थान जिंकला असा प्रचार पाद्री मंडळी करीत

असतात हे मला (व्हिक्सला) ठाऊक आहे. पण ती सरळ सरळ थाप आहे. ग्रेट ब्रिटनच्या मालाला बाजार पेठ म्हणूनच आम्ही हिंदुस्थान जिंकला. आम्ही हिंदुस्थान तलवारीच्या जोरावर जिंकला आणि तलवारी खालीच आम्ही तो सांभाळू. हिंदी लोकासाठीच आम्ही हिंदुस्थान संभाळतो, असे म्हणण्याची ढोंगबाजी करणारा मी नव्हे." (लंडन टाईम्स) १९२८ साली ब्रिटिश कॅबिनेटमध्ये होम सेक्रेटरीसारख्या जबाबदारीच्या पदावर असताना हिक्सने सदर उद्गार काढले होते. सर मायकेल ओडवायर, लाईड जॉर्ज, चर्चिल यांचीही विचारसरणी यापेक्षा निराळी नव्हती व नाही. पण 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'। हा अनुभव त्यांना व भारतीयानांही इतिहासाने आणून दिला आहे. ब्रिटिश रियासतीचे मर्म साम्राज्यवाद्यांनी जे सांगितले, ते त्यांनी सांगितले नव्हते तेव्हापासूनच भारतीयांनी ओळखले होते. "सातारा जिल्ह्यात वाई, बावधन, कवठे, मेणवली वगैरे ठिकाणी ४८० माग चालत होते. तेथे लुगडी, पितांबर, धोतरजोडे, चोळखण, पातळे वगैरे अनेक प्रकारचे पदार्थ फार उत्तम प्रकारचे साळी लोक बनवून भरभराटीचा व्यापार करीत. परंतु सरकारने मँचेस्टर वगैरे विलायतेहून येणारे कापडावरची जकात कमी करून आमचे मालावर जकात वाढविल्यामुळे आता वरील ठिकाणी दहा माग राहिले नाहीत. अशी तक्रार १६ सप्टेंबर १८८६ च्या महाराष्ट्र मित्रानेच केली आहे.

लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशी तेवढ्या साठीच निघाली होती. लोकमान्यांच्या चतुःसूत्रीचा आणि महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचा अवलंब काँग्रेसने साचार करून स्वातंत्र्य संग्राम केला म्हणून आजच्या स्वराज्य प्राप्तीत काँग्रेसकडे श्रेयाचा वाटा फार मोठा आहे. 'जो स्वदेश भक्त १८८५ सालचा हिंदुस्थानचा इतिहास लिहील त्यास या सालातील राजकीय घडामोडीत महत्त्वाच्या जितक्या आढळतील त्या सर्वांत आनंदमय, हिंदुस्थानचे एकस्वरूप दाखविणारी व हरएक प्रकारची भावी सुखस्वप्ने सुचविणारी काँग्रेसची स्थापना हीच गोष्ट होय असे म्हटल्यावांचून राहवणार नाही' असे भाकीत साताऱ्च्या महाराष्ट्र मित्राने (१४ जानेवारी १८८६) केले होते. एकसष्ट वर्षांनी ते भारतीय स्वातंत्र्याने खरे ठरत आहे. हिंदुस्थानातील चळवळी बरोबरच जगातील राजकारणाचे वारेही त्यास सहाय्यक आहेत "ता. ६ जून १९४४ रोजी इंग्लिश खाडी तरून जाऊन दोस्तांचे सैन्य फ्रान्सच्या नार्मंडीत उतरले. दक्षिण फ्रान्समध्येही दोस्तांचे सैन्य घुसले. या दोन्ही सैन्याच्या कचाटीत जर्मन सैन्य सापडल्याने जर्मनीला माघार घ्यावी लागली. त्याचवेळी पूर्वेकडून रशियन जर्मनावर तुटून पडले. तेथून युद्धास नवेच वळण लागले व ३ मे १९४५ ला युरोपात युद्धाचा शेवट होऊन दोस्तांचा विजय झाला. सहाजिकच आशियात जपानचा पराभव होऊन १० ऑगस्ट रोजी हिटलरी होरपळीचा

संपूर्ण शेवट झाला. तरी पण " मिशन वुइथ मॉऊंट बॅटन " या ग्रंथात एलन कँवेल जॉन्सन् याने वर्णन केल्याप्रमाणे " लोक बंड करून उठलेले, संस्थानिकातील एकमेकावर कित्येक तुटून पडणारे, एकंदर मुलकी नोकरशाही आणि रक्षक दल घसरगुंडीला लागलेले व ब्रिटिश अधिकारी आत्मविश्वासशून्य नि भीषण भवितव्य वादी बनलेले, " त्यामुळे हिंदुस्थानाबाहेरील (सुभाष बाबूंच्या आझाद सैन्यासारख्या) हिंदी लोकांच्या उठावाने " भयचकीत झालेल्या इंग्रजांना राज्यकर्ते म्हणून हिंदुस्थानात नांदावयास आणि लोकेच्छेविरुद्ध भारतात साम्राज्य टिकवून जगात स्वतःची प्रतिष्ठा राखण्यास युद्धातील विजय प्राप्तीनेही अवसान उरले नाही. त्यातून १९४५ साली मुंबईला आरमारी संप सुरू झाला. तोही बदललेल्या वातावरणाचा गमक होता. त्याने एकदम १८५७ सालची आठवण करून दिली. म्हणून मजूर मंत्रीमंडळ इंग्लंडात स्थापन होताच हिंदुस्थानात नव्या निवडणुका घेऊन हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्याचे जाहीर झाले.

" अखंड हिंदुस्थान राहण्यास बॅ. जिनांचा हट्ट आडवा आला. आणि हिंदुस्थानची भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे झाली !! एका दृष्टीने आमच्याच देश बांधवांना आम्ही सहमत करू शकलो नाही. व बंगाल-पंजाब फोडण्याची नी हिंदु मुसलमान फोडण्याची ब्रिटिश राजनीतिच प्रभावी ठरली आहे ! तथापि गड आला पण सिंह गेला, अशा हळहळण्याच्या या प्रसंगी ' त्याहुनि बरी निरयगति । ' म्हणविणारे राजकीय, पारतंत्र्य आज मावळले आहे. आता या वर्षाच्या आरंभी सातारा जिल्ह्याने सहकारी शेतीची कल्पना आत्मसात करण्याचा जो मनसुबा केला आहे, तशा उपक्रमानें शेतकरी-कामकरी जनसामान्यांची लोकशाही सधन, सबळ, सतेज व शहाणी करण्यास झटण्याची आपण प्रतिज्ञा करू या. " **जयहिंद.**

३० : स्वातंत्र्य आले पण कर्तव्याने निभावले !

भारत स्वतंत्र झाला त्यापूर्वी टिळक हायस्कूलचा (कऱ्हाड) रौप्य महोत्सव झाला होता. तर सातारा कन्या शाळेचा तसा उत्सव स्वातंत्र्यात झाला. साने गुरुजी आणि साथी जयप्रकाश नारायण यांचे दौरेही सातारा जिल्ह्यात त्याच क्रमाने व वेताने झाले. गोरगरिबांचे राज्य आता भारताच्या पुनर्रचनेत निर्माण व्हावयाची आशा आल्याने सातारा जिल्हा विणकर परिषदही उत्साहाने पार पडली. एवढेच नव्हे तर, कस्तुरबा स्मारक निधीही तशाच उत्साहाने जमा झाला. १९४७ ला गालबोट लागले ते आमदार के. डी. पाटील यांचा खून झाल्याने ! ती वार्ता आली त्यावेळी मुंबई विधिमंडळाची बैठक चालू होती. तेथे केवढा धक्का बसला असेल, त्याची कल्पना केलेली बरी !!

सार्वजनिक जीवनातील अशा प्रसंगीचे अश्रु एका हाताने पुसत पुसतच, आपले नियोजित आणि परिस्थितिप्राप्तकर्तव्य लोकसेवकांना रणांगणीच्या जवानमर्दाप्रमाणे करावेच लागते. गृहखात्याच्या दक्षतेने पुढे चंद्रोजी (कारभारी) व के. डी. पाटलांचे खुनी शिक्षा पावलेही. १९४७ च्या अखेरीस पाकिस्तान आणि भारत यांच्यामध्ये पंचावन्न कोटी रुपयांच्या देवाणाचा प्रश्न उपस्थित झाला. महात्मा गांधींनी त्याबाबत निश्चयात्मक मत देताच त्यांच्याबद्दल काही तरुण मेंदू पिसाट झाले. मतभेद प्रगट होतच होते. तरीही भारत सरकारने महात्माजींच्या शब्दाला मान देऊन पाकिस्तानला पचावन्न कोटी रुपये दिले. या घटनेने बहकलेल्या गोडसे नावाचे तरुणाने दिल्ली येथे ३० जानेवारी १९४८ च्या प्रार्थना सभेत महात्माजींवर गोळी झाडली !!!

जग हादरले ! भारताचा राष्ट्रपिताच गेला ! साताऱ्यासही सर्व जनता शोकसागरात बुडून गेली. सर्वांस मेल्यापेक्षा मेले झाले ! ता. ३० जानेवारी १९४८ च्या रात्रीच्या सभेत महात्माजींना श्री. बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली भाऊसाहेब सोमण प्रभृती साताऱ्च्या व जिल्ह्यातील मंडळींनी श्रद्धांजली वाहिली. तशीच पत्रकार परिषदेकरता आलेल्या मातबरांनीही वाहिली. पत्रकार परिषदेचे अध्यक्ष म्हणूनच बामणगांवकर आले होते. ती परिषद राष्ट्रीय आपत्तीमुळे ३१ जानेवारी रोजी महात्माजी बद्दलचा दुःखवटयाचा ठराव करून बेमुदत स्थगित झाली. महात्माजींच्या रक्षा विसर्जनादिवशी

सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड, माहुली वगैरे सर्व तीर्थक्षेत्रात महात्माजींची अंशमात्र रक्षा विसर्जित करण्यात आली. विधान परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब सोमण नाशिकास रामकुंडावर तेच कर्तव्य (श्रद्धांजली वाहणेचे) करण्यास गेले होते. सातारा जिल्ह्यात दहा दिवस गावोगांव श्रद्धांजलीच्या सभा होत आल्याच होत्या.

महात्माजींचा खून झाला म्हणून अंगाचा तिळपापड झालेल्या महाभागांना खुनाचा बदला घेतलाच पाहिजे या भावनेने घेरले होते. पुण्यामुंबईच्या तसल्या माणसांनी कायदा हातात घेतला हे वृत्तपत्रातून वाचल्यावर सातारा जिल्ह्यात त्याचे अनुकरण व्हावयास चुकले नाही. ता. १ फेब्रुवारी पासून त्या प्रक्षोभाच्या आविष्काराला सुरवात झाली. जातीय प्रवृत्ती मुळेच ब्राह्मण समजून (गांधीजींचा खुनी ब्राह्मण असलेमुळे) ती खुडून टाकण्याची महात्त्वाकांक्षा पेट घेऊन बसली. जातीय संस्थांचा अभिमान बाळगणारे मुसलमानही त्यात सामील झाले. हिंदूतील तशा लोकांना मात्र बाहेर तोंड काढण्याची सोय नव्हती. कऱ्हाड आणि त्याच्या भोवतालच्या दहा मैलाच्या त्रिज्येतील टापूत अत्याचार घडले नाहीत तरी सर्व जिल्हाभर आगी धगधगल्या. महात्माजींचा खुनी आडनांवाने गोडसे ! तेव्हा त्या आडनांवाच्या एका ब्राह्मण कुटुंबातल्या तीन पिढ्यांचे तीन पुरुष उभे जाळण्यात आले. वडूज येथील डॉ. अंबिक्यांचे प्रसूतीगृह, सांगली येथील धनी वेलणकरांची कापड गिरणी व लिंब येथील हातसुती गिरणी भस्मसात झाली. लाखो रुपयांचे वाडे खेडोपाडी जळाले! ! त्यातील ऐतिहासिक महत्त्वाचे कागदपत्र खाक झाले! आपल्याच मायभूमीत व कर्मभूमीत अनेकानेक विधवा व अनाथ अर्भके अनेकानेक कुटंबवत्सलाप्रमाणेच निर्वासित झाली. महात्माजींवरील प्रेमामुळे उडविलेल्या हळकल्लोळात काही स्वार्थ्यांनी आपले खाजगी सूडही उगवून घेतले. अनत्याचाराचा तपोनिधी उभारणाऱ्या महात्मागांधींच्या भक्तिप्रेमाचे नांवाखाली हा सर्व प्रकार होत असल्यामुळे तो थांबविण्यासाठी काँग्रेसच्या, म. गांधींच्या आणि शांतिब्रह्माच्या उपासकांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यात विष्णुमास्तर निगडीकर (मसूर), गणपतराव आळतेकर, बाबूराव गोखले (कऱ्हाड), स्वामी केवलानंद (वाई), शंकररावजी साठे (सातारा), इत्यादिकांच्या प्रयत्नास थोडेफार यश आले. काँग्रेसचे मंत्रीमंडळ त्यांना साथ द्यावयास धावले. गुंड प्रवृत्तीच्या आणि अत्याचाराच्या उत्तेजकांना व दंगेखोरांना बंदिवास घडू लागला आणि हद्दपारीची पाळी येऊ लागली.

यावेळी भाऊसाहेब सोमणानी मंत्री मंडळास आपला पोक्त सल्ला दिला की महात्माजींच्या प्रेमाने वेडे होऊन त्यांच्या खुनाचा बदला घेण्याच्या मोहात

ज्यांचे हातून अत्याचार, – अनाचार घडले, त्यांना आपल्या हातून महात्माजींच्या तत्त्वप्रणालीला व शिकवणीला बट्टा लागला, अशा जाणिवेने खरोखरच पश्चात्ताप होत असेल तर, त्यांना एकवार माफी मिळावी. सरकारने पश्चात्तापाला माफी जाहीर केली. त्याप्रमाणे अनेकांनी माफी मागून आपल्या संथ जीवनाला सुरवात केली. जे निष्पाप आपद्ग्रस्त, विधवा वा अज्ञान होते, त्यांना जीवन सुसह्य व्हावे म्हणून सरकारने आर्थिक मदत व घरबांधणीस जंगलातील लाकूडही दिले. सरकारची ही उदार मदतही तोकडी पडत असल्याचे दिसून आल्यावर सोमणांनी आपला डेक्कन – रिलीफ – फंड सुरू केला. त्याला मुंबईचे राज्यपाल महाराजसिंग, कूपर इंजिनिअरिंग वर्क्स अशा मातबरांनी हातभार लावल्यामुळे तो पंचवीस हजारापर्यंत जमून बेळगांव–विजापूर पासून कुलाबा रत्नागिरी जिल्ह्यातील ब्राह्मण, मुसलमान व हरिजन मंडळीनाही सातारा–सांगली जिल्ह्यातील मंडळीप्रमाणेच उपयोगास आला. एम्. डी. कुलकर्णी व बुवा गोसावी यांनी त्या निधीचा विनियोग समक्ष निरीक्षणाने केला.

दरम्यान राष्ट्राध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांचा सातारा जिल्ह्यात दौरा देशाची नाडी चाचपण्याच्या दृष्टीने झाला. भारत सरकारचे बांधकाम मंत्री नामदार काकासाहेब गाडगीळ यांची कोयनाधरण योजनेसाठी हेळवाकला भेट होऊन कऱ्हाड आणि सातारा येथे त्यांची मार्गदर्शक व्याख्यानेही झाली. तितक्याच महत्त्वाने मुंबईचे गृहमंत्री नामदार मुरारजीभाई देसाई यांचा दौरा होऊन गुंड प्रवृत्तीला आणि महात्माजींच्या वरील अत्याचारांचे भांडवल करून आपले जातीय वा खाजगत सूड उगवीत बसणारांना त्यांनी चांगल्याच श्रीमुखात दिल्या !! त्याचा योग्य परिणाम पुढे जिल्ह्याच्या जीवनात प्रत्ययास येऊ लागला. ठिकठिकाणी ज्या शेतकरी–परिषदा भरल्या त्यात "रामखण्ड (परळी खोरे) शेतकरी–परिषद" ही विधायक व रचनात्मक जीवनाच्या निश्चयाने विशेष महत्त्वाची ठरली.

विधायक व रचनात्मक जीवनाकडे प्रवृत्ती वळल्यावर राष्ट्रपित्याचे चिरस्मरणीय स्मारक व्हावे म्हणून साहजिकच विचार प्रवाह वाहू लागले आणि निधीही गोळा होऊ लागले. मुंबई राज्याचे सहकार मंत्री वैकुंठलाल मेहता यांनी सहकारी बँकांनी व संस्थांनी आपल्या वार्षिक अव्वल नफ्याचा एक पंचमांश गांधी–स्मारक निधीला द्यावा अशी परिपत्रके काढून अपेक्षा केली. ती आपल्या जिल्ह्यातील कऱ्हाडच्या अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेने पांचहजार रुपये निधीस देऊन अपेक्षेबाहेर पुरी केली. काँग्रेसचे चिटणीस शंकररावजी देव यांचा दौराही राष्ट्राच्या फेर रचनेतील विधायक कार्यक्रमासाठी प्रभावीपणे झाला. तथापि अशा साऱ्या निर्मितीकार्यात पुरुषार्थ असला तरी लढतीची

रंगत नसल्याने क्रांतीवीर नाना पाटील काँग्रेसमधून बाहेर पडले. तरीही स्थानिक स्वराज्य मंत्री गोविंदराव वर्तक यांचा दौरा आणि विशेषत: भाऊसाहेब हिरे यांच्या दौऱ्यानंतर भरलेली "कोयना व्हॅली कॉन्फरन्स" की जीत दक्षिण महाराष्ट्रातील उद्योगपतींनी रस घेतला होता ती यशस्वी रीतीने पार पडली आणि डोंगरकपारीतही बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी शाळा घालणाऱ्या भाऊराव पाटलांच्या शिक्षण कार्याचा गौरव झाला. या सर्वात आत्मीयतेने अभिमान बाळगणे सारखी एक १९४८ सालची सातारा जिल्ह्यातील घटना म्हणजे गोळेश्वर (ता. कऱ्हाड) येथील रहिवासी व टिळक हायस्कूलचा विद्यार्थी खाशाबा जाधव याची कुस्तीसाठी जगाच्या ऑलिम्पिक सामन्याकरिता निवड झाली ही होय. पुढे माहुलीचे श्रीरंग जाधव प्रभृती पेहेलवान जिल्ह्याचे नांव गाजवून बसले त्याचा हा श्रीगणेशा होता.

नव्या म्हणजे १९४९ सालचा शुभारंभ सातारा जिल्ह्याने डॉ. मोरेश्वर नारायण आगाशे यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभाने केला. आयुर्वेद आणि ॲलोपाथी यांच्या समन्वयाने पण मूळ देशी वैद्यकाला प्रमाण धरून संशोधन-पूर्वक निदान–चिकित्सा–उपचार–शास्त्र बनविण्यात डॉक्टरांनी घेतलेल्या परिश्रमाचा आणि वडिलार्जित देशभक्तीचा ओघ नेटाने वहात ठेवणाऱ्या निष्ठेचा तो गौरव "मो. ना. आगाशे रुग्णालय" बांधून होता. यासाठी दुसरा गौरव झाला तो आचार्य जावडेकर हे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले म्हणून! १९०५ साली दादासाहेब करंदीकरांनी साताऱ्यास साहित्य संमेलन भरविले, १९४१ साली कऱ्हाडास दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन यशस्वी झाले, तरी सातारा जिल्ह्याचा राजकारण–तत्त्वज्ञानी व संपादक साहित्यिक साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होण्याचा तो पहिलाच मंगल प्रसंग होता.

असाच आणखी एक मंगल प्रसंग जिल्ह्याच्या जीवनावर चिरपरिणाम करणारा या साली सातारा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या स्थापनेने आला. शेतकरी जीवनाला व शेतीच्या धंद्याला पैशावांचून काही अडू नये आणि शेती सुधारत जावी ती शेतकऱ्याला असलेली पूर्वार्जित कर्जे फेडून सुधारत जावी म्हणून १९३५ साली रा. ब. काळे आणि विशेषत: कोळ्याचे व्यापारी आण्णासाहेब कल्याणी यांनी पुढाकार घेऊन लँडमॉर्टगेज बँक काढली होती. आणि शेतकऱ्यांना लांब मुदतीची कर्जे मिळण्याची व्यवस्था झाली होती. त्यानंतर जिल्ह्यात बँकिंगचा विस्तार अनेक दिशांनी झालाही. सातारा स्वदेशी बँकेच्या जोडीला व्यवसाय वाढल्याने विमा महर्षी चिरमुले यांनी १९३६ साली युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा या शेड्यूल्ड बँकेची स्थापना केली. महाराष्ट्राच्या सर्व ठिकाणच्या व्यापारी लोकांचा संबंध मुंबईशीच बराच येत असल्याने अशा लोकांस व्यापारात सहाय्य द्यावे या विचाराने १९५२ पासून ती

स्वतंत्रपणे बँकिंग कंपनी म्हणूनच काम करू लागली. दि बँक ऑफ् औंध ही २५ ऑगस्ट १९३८ रोजी औंध येथे संस्थानी बँक म्हणून प्रथम स्थापन झाली. व व्याप वाढविण्याचे दृष्टीने १९४६ साली तिने सातारा येथे आपले ऑफिस सुरू केले. संस्थानाचे विलिनीकरणानंतरही ती मध्यम वर्गीयांची सेवा उत्तम करी. जिल्ह्यात सांगली बँकेच्या आणि कॅनरा बँकेच्या शाखा निघून व्यवसाय करू लागल्या. तेव्हा जाईंट स्टॉक बँक कऱ्हाड येथे असावी या कल्पनेला १९४६ मार्च मध्ये " दि बँक ऑफ कऱ्हाड लि. " स्थापन होऊन मूर्त स्वरूप मिळाले. पण तेवढयाने काय ? ग्रामिणांची विसकटलेली घडी सुरळीत बसविण्याचे कार्य जिल्ह्यातून सुमारे पांचशे पतपेढयातून चालू होते. त्यांना अपुरे पडणारे भांडवल पुरविण्याचे काम महाराष्ट्र (बाँबे) स्टेट (प्रॉव्हिन्शियल) को-ऑपरेटिव्ह बँक लि. ही आपल्या सातारा, कऱ्हाड, कोरेगाव, वाई व इसलामपूर इत्यादी शाखा मार्फत करी. पण जिल्ह्यासाठी मध्यवर्ती सहकारी बँक असणेची जरूरी जिल्ह्यातील पुढाऱ्यांना अनेक वर्षे वाटत होती. तीस अनुसरून १५ ऑगस्ट १९४९ रोजी सुमारे पावणे दोन लाखांचे भांडवलावर मध्यवर्ती बँकेची नोंदणी होऊन ११ नोव्हेंबर १९५० रोजी ना. मोरारजी देसाई यांचे हस्ते तिचे उद्घाटन झाले. व जानेवारी १९५१ पासून प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली, ती जिल्हयातील अनुभविकांचे नियामक मंडळ होऊन.

स्थानिक स्वराज्य मंत्री वर्तक यांचा दौरा यंदाही झाला आणि धान्य व बाजार नियंत्रण यांचे परिणाम स्थानिक स्वराज्ये व जिल्ह्याचे जीवन यांच्यावर झालेला त्यांनी पाहिला तो सरकारात दाखलही झाला. त्यापेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे १९४९ साली दक्षिण व उत्तर सातारा अशा जिल्ह्यांची निर्मिती संस्थानांच्या १९४८ मधील विलीनीकरणामुळे मुंबई सरकारने कारभाराच्या सोयीसाठी केली. तरी लोकांचा मूळचा जिव्हाळा कायमच आहे. महाबळेश्वर येथे महाराष्ट्र कार्यकर्त्यांचे शिबीर झाल्यावर २० नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे सरसेनापती जनरल करिअप्पा यांनी साताऱ्च्या मुक्त सैनिकांना भेट दिली. त्यावेळी १५ हजारांचा समुदाय उत्साहाने जमला होता. सर सेनापतींना स्थानिक स्वराज्य संस्थांची मानपत्रे झाली. लोकलबोर्डाच्या मानपत्रात अध्यक्ष बाळासाहेब देसाई यांनी जिल्ह्यातील घरटी एक सैनिक स्वातंत्र्य रक्षणासाठी खास मिळेल असे आश्वासन दिले व साताऱ्यास लष्करी शाळा मागितली. १९२९ पासून सातारा जिल्ह्याची ही मागणी होती. १९३१ सालच्या आपल्या दौऱ्यात पं. मालवीय यांनी करंदीकरांच्या प्रेरणेने साताऱ्यास " सँढर्स्ट " मागितले होते. तेव्हा मानपत्रास उत्तर देताना जनरल करिआप्पाही उत्तरले की " सैन्य हे लष्करी वा बिनलष्करी जमातीवर अवलंबून नसून देशातील प्रत्येक तरुणाच्या मनात जी राष्ट्रियत्वाची जाणीव असते, तिनेच

सैन्य राष्ट्रासाठी तळहतावर शीर घेऊन लढते. लोकसेनेला शिस्त व संघटनेचे शिक्षण मिळत असल्यामुळे सैनिक आदर्श नागरिक बनले पाहिजेत. "

जसे सैनिक आदर्श नागरिक पाहिजेत, तसेच जरूर पडलीतर आदर्श नागरिकातूनही सैनिक उभे राहिले पाहिजेत, तशा दृष्टीने राष्ट्राची रचना शाळाशाळांच्या वर्गावर्गातून होत असते, या सिद्धांताने सातान्यात शिक्षण कार्य करणान्या न्यू इंग्लिश स्कूलचा सुवर्ण महोत्सव ६ डिसेंबर १९४९ रोजी मुख्य प्रधान ना. बाळासाहेब खेर यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. आणि संस्थापक सीतारामपंत देवधरांची परंपरा सांभाळणान्या नानासाहेब भाटे, शंभुराव आठल्ये, गोविंदराव दीक्षित, भिडे गुरुजी, दत्तोपंत परांजपे, काकासाहेब मेहेंदळे प्रभृत्ती शिक्षकांच्या सेवाकार्याचे मूल्यमापन लोकादरास पात्रही ठरले. याच शिक्षण संस्थेचा हीरक महोत्सवपुढे १९५९ साली, त्यावेळचे मुंबई राज्याचे मुख्य प्रधान नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या इतमानाने झाला हे ओघाओघानेच आले.

मध्यंतर मंत्रिमंडळ म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाने १९४६ साली अधिकार स्वीकार झाल्यावर, स्वतंत्र भारताची घटना निश्चित करण्याकरिता ९ डिसेंबर १९४६ पासून दोन वर्षे आकरा महिने सतरा दिवसांच्या अवधीत जनतेच्या विचारवन्त पुढारी मुत्सद्यांची जी समिती डॉ. राजेंद्र प्रसादांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ. आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाने सेवारत होती, तिचा अंतीम निर्णय झालेली घटना २६ जानेवारी १९५० पासून अमलात येऊन त्या दिवसापासून भारत स्वयंतंत्र, स्वतंत्र झाला. भारतात सार्वभौम प्रजासत्ताक राज्यकारभार सुरू झाला. सार्वभौम गणराज्यातील नागरिकास समता, व्यक्ति स्वातंत्र्य, सांस्कृतिक राजकीय हक्क मिळाल्यामुळे ते पेलण्यास लागणारी आमजनतेच्या मनाची तयारी करण्याचे काम तरुण सुशिक्षितांनी अहर्निश केले पाहिजे, अशी जबाबदारी आल्याची जाणीव (चाणक्य कृत इंडियन रेव्होल्यूशन-पहा) प्रत्येक देशभक्त–अंत:करणाने घेतली.

त्याच बरोबर भारतीय तेवढा एक ही जाणीव जागरूक राखण्याची जबाबदारी आलीच. म्हणूनच यावर्षी बंगालच्या वास्तुहाराला मदत करून आणि आसाम रिलीफ फंड जमा करून बाबूराव भिडे यांचे मार्फत सातारा जिल्ह्याने ती जाणीव कृतीने सिद्ध केली. जिल्ह्याच्या आणि महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक जीवनाला हिशोबी व सात्त्विक वळण लावणान्या विमा महर्षी आण्णासाहेब चिरमुल्यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार मग ना. वैकुंठलाल मेहेतांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्याने केला. हे त्यांच्या जिव्हाळ्याला साजेसेच झाले. स्वतंत्र प्रजासत्ताकच्या समर्थतेसाठी लोकजागृतीच्या दृष्टीने समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव (धुळे) यांची प्रबोधक व्याख्याने आणि टिळक पुण्यतिथी-

निमित्त झालेले गंगाधररावजी देशपांडे यांचे उत्थापक व्याख्यान यांचा विसर जिल्ह्याला होणार नाहीच ! त्यातच काँग्रेसचे कार्यकर्ते व क्रांतिकारक डॉ. आठल्ये यांची एकसष्ठी योगायोगाने यावर्षीच आल्याने २२ ऑगस्ट रोजीच तो समारंभ राष्ट्रीय जीवनाला उत्तेजकच ठरला. राष्ट्रीय दृष्टया खेडूत विचार करू लागावा आणि दिल्ली मुंबईनी खेडूतांचा विचार प्रथम करावा म्हणून १९५१ साली साताऱ्यास झालेल्या ग्रामपंचायतीच्या सेक्रेटरी वर्गाचे उद्घाटन सोमणांनी ग्रामोद्धाराच्या कळकळीने केले. तथापि परकीय आक्रमकांनी भारताच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रतिष्ठेचे प्रतीक जे हजार वर्षे घणाखाली धरले होते, त्या सोमनाथाच्या प्रतिष्ठापनेसाठी स्वामी केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रौताचार्य धुंडीराज बापट प्रभृत्ती सातारा जिल्ह्यातील विद्वानांना पुढाकार मिळाला, ही सातारा जिल्ह्याची १९५१ मधील अखिल भारतीय मान्यता पावलेली जशी विद्वत्ता प्रतिष्ठा आहे तशीच सेवा तपस्याहि आहे. अशा विद्वत्तेच्या गाढतेचा प्रत्यय बाबा कोल्हटकर यांच्या पातंजलयोग दर्शनानेही सरकारी पातळीपासून लोक चिकित्सेपर्यंत सर्वांना या साली आल्याशिवाय राहिला नाही.

एवढ्यात विधिमंडळाच्या नव्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आणि सातारा जिल्ह्याच्या उत्तर विभागातून दिल्लीच्या असेम्ब्लीसाठी कऱ्हाडचे विद्वान गणपतरावजी आळतेकर वकील, यांनी आपली उमेदवारी द्यावी असा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा आदेश आला. तेव्हा ती आज्ञा प्रमाण मानून आळतेकर उभे राहिले. त्यांनी व त्यांच्या सहाय्यकांनी जिल्ह्यातील आमदारीसाठी उमेदवारी देणाऱ्या काँग्रेसजनांचाही पुरस्कार काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यास धरून एवढ्या उच्च पातळीवरून केला की, वैयक्तिक जातीय नात्याचे धागेदोरे विणणाऱ्या प्रतिपक्षीयांनी सुद्धा तोंडात बोटे घातली. आळतेकर व काँग्रेसचे आठ आमदारी उमेदवार निवडून आले. या निवडणूकीत असा एक चमत्कार घडून आला होता की, एकवेळचे क्रांतिकारक देशभक्त व १९२१ पासून काँग्रेसचे निष्ठावन्त म्हणून प्रसिद्ध, १९४६ च्या निवडणुकीत काँग्रेस तिकीटावर उभे राहिलेले पण निवडून न आलेले इस्माईल नूरमहंमद हकीम स्वतंत्र उभे राहिले, ते काँग्रेस श्रेष्ठींचे निर्णयाविरुद्ध ! म्हणून त्यांच्याबद्दल सर्वांना सहानुभूती वाटली तरी ते निवडून आले नाहीत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आता या सालचा दुसरा चमत्कार :—

ता. २३ जुलई १९५२ ची रात्र काळोखाची होती. पाऊस पडत होता. साताऱ्च्या छत्रपतींच्या जलमंदीरातील सोन्याच्या ४३५ भाराच्या तीन मूर्तींची त्या रात्री चोरी झाली. ११ व १२ वाजणेचे दरम्यान गस्तीच्या पोलीसाव्यतिरिक्त फारसे कोणी हिंडत नसताना ५७६६९ रुपयांचा ऐवज गेला. भाई

श्री. म. जोशी, रामभाऊ मंडलीक, गणपतराव आळतेकर, काळकर्ते मामा दाते, केसरी कर्ते जयंतराव टिळक, भारत सेवक समाजाचे श्री. ग. वझे, पाटणा हायकोर्टाचे न्यायमूर्ती ढवळे यांच्याप्रमाणेच भाऊसाहेब सोमणांनीही या प्रकरणी लक्ष घातले होते. ११ ऑगस्ट १९५३ रोजी सर्व आरोपी निर्दोषी सुटले. जलमंदिरात भवानीचे देऊळ १८७४ पासून चालले होते. मंदिराचे पश्चिम बाजूचे सुमारे दहा फूट उंचीचे कुसुवावरून चोरटयांनी देवालयाचे पाठिमागे आत उतरून देवालयाच्या खिडकीचे गज उपसले व तावदानाची दारे फोडून देवालयात प्रवेश केला. देवालयाच्या गाभाऱ्यातील महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती अशा सोन्याच्या मूर्ती, इतर सोन्याचे टाक, छत्र-चामरे व चांदीची उपकरणी चोरटयांनी लांबविली होती. छत्रपतींच्या देवांची चोरी सापडून चोरटयास शिक्षा झालीच पाहिजे ही सर्वांचीच मनीषा होती. २८ जुलै १९५२ रोजी रंगमहालाजवळील माचीचे ७।८ महार व ३० जुलईस शनिवारातील बापूसाहेब आपटे, नीलकंठराव भावे, पुरुषोत्तम कुलकर्णी व काशिनाथ जोशी यांना पकडण्यात आले. ता. ३१ जुलई रोजी रात्रौ दहा वाजता कागदोपत्री अटक दाखवण्यात आली. आरोपींचा आतोनात व अमानुष छळ डी. एस्. पी. लुईस व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट पांडुरंगराव पाटील यांनी मांडला होता. शेवटी ३० ऑगस्ट १९५२ रोजी सेशन जज्ज घासकडबी यांनी सिटी मॅजिस्ट्रेट सुद्धा सर्व अधिकाऱ्यांवर त्यांच्या बेगुमान "माणुसकीच्या अभावा" बद्दल कडक टीका करून आरोपीना जामीनावर सोडले. ३ जानेवारी १९५३ रोजी फायनल चार्जशीट आला. दरम्यान् मुंबई सरकारने अधिकाऱ्यांनी आरोपींचा छळ केल्याची तक्रार खोटी असल्याचे सर्क्युलर सप्टेंबर १९५२ मध्ये काढून छळवादी अधिकाऱ्यांचा पाठीराखेपणा केलाच होता! सरकारची प्रेसनोट प्रसिद्ध झाल्यावर खरी परिस्थिती प्रकाशात आणणे हे आपले सार्वजनिक कर्तव्य आहे असे न. गं. तथा नानासाहेब जोशी यांना वाटून त्यांनी सर्व बेबंदशाही प्रकारावर ३ ऑक्टोबर १९५३ पासून केसरीतून एक लेखमाला लिहून खरमरीत टीका केली. तिचे समर्थनच हायकोर्टाने २९ जून १९५३ ला दिलेल्या निर्णयात होते. हायकोर्टाने रेसिडेंट मॅजिस्ट्रेट आठल्ये यांचेकडे मूळ खटल्याचे काम सोपविले. चोरी झाल्यापासून बरोबर एक वर्षाने २३ जुलई १९५३ रोजी खटला चालू झाला. फिर्यादीतर्फे वीस साक्षीदार तपासण्यात आले. शेवटी ११ ऑगस्ट १९५३ च्या निकाल पत्रात मॅजिस्ट्रेटनी स्पष्टच म्हटले की, "फिर्यादी भा. द. कारखानीस कारभारी यांनी १९२६ चे ट्रस्टडीडची नक्कल दाखल केली, पण त्यात मूर्तीचे वजनांचा उल्लेख नाही. पुजारी दीक्षितांची साक्ष घेण्यात आली नाही. ज्या खिडकीचे गज वाकविले होते ती खिडकी पुराव्याचे दृष्टीने महत्त्वाची होती ती कोर्टापुढे आली नाही. गुन्ह्याचे जागी

मिळालेले पायांचे व हातांचे ठसे रेकार्डवर आले नाहीत. माफीच्या साक्षीदारांची माहिती तपासून पाहिल्याचा उल्लेख नाही. फौजदार साळवीच्या साक्षीतील पुरावा संशयातीत नाही. कोर्टापुढील पुरावा आरोपींचा गुन्ह्याशी मुळीच संबंध जोडू शकत नाही. म्हणून या खटल्यातील सर्व आरोपींना मुक्त केल्याशिवाय कोर्टाला दुसरा मार्ग नाही," **हे सर्व झाले तरी छत्रपतींच्या देवतांची झालेली चोरी करणारे खरे गुन्हेगार त्या निकालानंतर एका तपातही गवसून काढण्यात सरकारला यश मिळाले नाही किंवा सरकारने तो विषयच सोडून दिला याबद्दल जनतेचा सात्विक संताप कायम राहिला तो राहिलाच आहे.**

असे अनपेक्षित चमत्कार आणि त्यांच्या परिणती यांचा विचार घटकाभर बाजूस ठेवला तर "जनाचा प्रवाहो" चालला होता त्यात साताऱ्यास डॉ. आगाशे रुग्णालय १९५२ त सुरू झाले आणि ना. भाऊसाहेब हिरे यांच्या अध्यक्षतेखाली हेळवाकास कोयना परिषद होऊन चीफ इंजिनियर गोविंदराव मनोळीकर यांनी कोयना प्रकल्पाची सांगोपांग आणि शास्त्रशुद्ध माहिती जनतेला व उद्यम प्रवर्तकांना अशी खुलासेवार दिली की, कोयना प्रकल्प महाराष्ट्राची कामधेनू होणार असेच जनतेने मानले! **कोयनेच्या प्रकल्पातून आणि वीज शक्तीतून निर्माण व्हावयाची औद्योगिक प्रगती १९६५ सालीही आपली अस्तित्व किरणे फेकू लागली नाही हाही एक तपानंतरचा चमत्कार समजला तरी चालेल!**

या शिवाय सांस्कृतिक क्षेत्रात अमळनेरच्या मराठी साहित्य संमेलनाच्या (१९५२) अध्यक्षपदाचा मान "कृष्णाकाठच्या मातीत" वाढलेल्या व्युत्पत्ती व इतिहास यांचे तज्ज्ञ प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी या सातारचे सुपुत्रास मिळाला. आचार्य जावडेकरानंतर मुंबईस असा मान १९५० साली राजकवी यशवंत पेंढारकर या चाफळच्या कुशीत आणि रामदासांच्या मुशीत वाढलेल्या रविकिरण मंडळाच्या सदस्याला मिळाला होता. तेव्हा प्रा. कुलकर्णी हे सातारचे सुपुत्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यावर सातारा जिल्ह्याने अभिमान वाहिला तर तो खास विनयभंग नव्हे! यापेक्षाही सांस्कृतिक दृष्टया सातारा जिल्ह्याने १९५२ यावर्षी अभिमानास्पद जो सत्कार २१ नोव्हेंबर रोजी स्वामी केवलानंद यांचा केला त्याची महती विशेष आहे. वाईच्या प्राज्ञमठाची प्राज्ञपाठशाळा करून नारायणशास्त्री मराठ्यांनी राष्ट्रीय व सांस्कृतिक सेवा, स्वतः नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून आणि वैदिक कालातील आश्रमीय जीवनाप्रमाणे पण तारीखतागायत विद्याभ्यास करवून दिनकरशास्त्री कानडे, भय्याशास्त्री वाटवे, महादेवशास्त्री दिवेकर, कोकजेशास्त्री, आचार्य विनोबाजी भावे, विष्णुशास्त्री परांजपे, बाबा लेले, तर्कतीर्थ जोशी वगैरे नामवंत कार्यकर्ते आपल्या संस्थेतून निर्माण केले.

त्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या उत्थापनात महत्त्वाचा भागही घेतला आणि धर्म-कोशासारखी कामे पार पाडली. तेव्हा या कर्तबगारांचे आचार्य नारायणशास्त्री मराठेच 'केवलानंद' होऊन आपला आदर्श जगापुढे ठेवून बसले होते. म्हणूनच सोमनाथाच्या प्रतिष्ठापनेचे अध्वर्युत्व भारत सरकारने त्यांच्याकडे दिले होते. त्यांचा सत्कार कृतज्ञतेने करण्यात सातारा जिल्ह्याला धन्यताच वाटली.

याच संदर्भात १९५३ साली साताऱ्यास भरलेल्या महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेच्या चवथ्या अधिवेशनाचा उल्लेख करणे जरूर आहे. ग्रंथालये म्हणजे ज्ञानाची सदावर्ते हे १८५७ च्या उठावापासून आपल्या मगदुराप्रमाणे सार्थ असलेचे जनतेला आपल्या अस्तित्वाने पटवून देणाऱ्या साताराजिल्हानगर वाचनालयातर्फे ते संमेलन "अभ्यासेची प्रगट व्हावे" असे ब्रीद बाळगणाऱ्या आणि १९४३ साली सांगली येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गौरविलेल्या बापूसाहेब माटे या सातारच्याच सुपुत्राचे अध्यक्षतेखाली भरले आणि बापूसाहेबांच्या नामवंत शिक्षकी सौजन्याने पार पडले. ग्रंथालय चळवळीला तेव्हा-पासूनच बाळसे यावयास सुरवात झाली आणि याचीच जणू परिणती म्हणून १९५७ साली कऱ्हाड नगर वाचनालयाच्या शतसांवत्सरिक समारंभाचे अध्यक्ष व जळगावास भरलेल्या ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष कऱ्हाडचे बाबूराव गोखले निवडून यऊन त्या अधिवेशनात ग्रंथालय कायद्याची जोरदार मागणी तर झालीच पण ज्या त्या स्थानिक ग्रंथकारांचे ग्रंथ व त्या वरील अनुकूल प्रतिकूल टीकाग्रंथ यांचा संग्रह स्वतंत्रपणे स्थानिक ग्रंथालयात, निदान जिल्हा ग्रंथा-लयात तरी स्वतंत्रपणे असावा, अशी विचारधारा सांस्कृतिकदृष्टया व अभ्यास सुलभतेच्या दृष्टीने प्रभावीपणे प्रगट झाली व तिचा शुभारंभ जळगाव जिल्ह्याने केलाही आहे. यापुढे नागपूर ग्रंथालय परिषदेचे (१९६०) उद्घाटक शिक्षणमंत्री ना. बाळासाहेब देसाई व अध्यक्ष न्या. गजेंद्रगडकर यांनी ग्रंथालय चळवळीचा महाराष्ट्रभरीचा एकजिनसी बांधेसूदपणा आणण्यासाठी कायदेशीर व्यवस्था करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. ग्रंथालय परिषदेइतका महत्त्वाचा नसला तरी सांक्रतिक दृष्टचा ज्याला महत्त्व आहे असा जिल्ह्यातच मसूर येथे (१९५३) झालेला शिक्षणतज्ज्ञ फर्फे यांच्या अध्यक्षतेखालील क्रांतिकारक समर्थ पंचकातील एक शिक्षक व कवी बाळकृष्ण सावळाराम बुधकर यांचा सत्कार होय. बुधकरातील राष्ट्रीय वृत्ती आता स्वराज्यात सरकारी यंत्रणेत मुरली पाहिजे, या जाणिवेच्या जागृतीसाठीच ऑक्टोबर (१९५३) च्या शेवटी लोणंद येथे भरलेल्या सातारा जिल्हा ग्रामपंचायत सेक्रेटरी परिषदेचे अध्यक्ष-स्थान बाबूराव गोखले यांनी स्वीकारून मार्गदर्शन केले. सेक्रेटरींचे अधिकार, वेतनश्रेणी आणि सामाजिक प्रतिष्ठा यांना भारताच्या पुनर्रचनेत महत्त्व येणारे असल्याने आणि खेड्यापाड्यातील जनतेचा भारतीय राज्य यंत्रणेशी दुवा सांधून

राष्ट्रीयत्वाच्या एकजिनसीपणाचे लोण शेवटपर्यंत पोचविण्याचे 'पोस्टऑफिस' ग्रामपंचायत सेक्रेटरी असल्याकारणाने त्यांच्या संघटनेशी दाट संपर्क ठेवण्याची प्रथा विचारवंतांनी ठेवली-पाडली पाहिजे, हे या अधिवेशनाने देशभक्त मनावर निखालसपणे ठसविले.

बहुजन संपर्काच्या दृष्टीनेच डिसेंबर १९५३ मध्ये झालेला नामदार यशवंतराव चव्हाणांचा दौरा व हमीद अल्लींची रयत शिक्षण संस्थेला भेट याना महत्त्व आहे. वाढत्या क्रमाने तेच महत्त्व महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ठरणाऱ्या कोयना धरणाचे भूमीपूजन जे मुंबईचे मुख्यमंत्री नामदार मुरारजी देसाई यांनी केले, त्या घटनेला आहे.

बहुजन समाजाचे कल्याणाच्या दृष्टीने असणाऱ्या या घटनांच्या मागील सेवावृत्तीचा विचार मनात आला म्हणजे "समाज सेवक" म्हणून लोकांनीच गौरविलेल्या बाबूराव गोखल्यांचा सत्कार महर्षी आण्णासाहेब कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली कऱ्हाड अर्बन बँकेत झाला, त्यातून इतिहासाचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडविण्याची स्फूर्ती तरुणपिढीला होत असते, याचे प्रबोधन होते. म्हणून गोखले सत्कारापेक्षाही शेकडो पटीने महत्त्वाची १९५४ मधील घटना म्हणजे सातारा नगरपालिकेचा शताब्दि महोत्सव होय. नगरपालिकेने पूर्वसूरींचे कृतज्ञतापूर्वक स्मरण तर केलेच पण आपल्या कक्षेतील विविधक्षेत्रात आढळणाऱ्या कर्तबगारांचा जाहीर सत्कार कृतज्ञतेने केला. देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या पवित्र जन्म दिवसाचे (२३ जानेवारी) मुहूर्तावर हे सर्व घडल्याने त्याला आगळे स्वरूप आले होते.

पण भूतकाळाचा हात पाठीवर घेतला तरी वर्तमानाकडे वास्तववादाने लक्ष दिल्याशिवाय भविष्य बांधता येत नाही. या संदर्भात रत्नागिरीचे आप्पासाहेब पटवर्धन यांचा सातारा जिल्ह्यात झालेला भूदान दौरा आणि गावोगाव श्रमदानाने झालेली लोकसोईची कामे यांची आठवण सातत्याने राहण्यासारखी आहे. त्याच बरोबर शेतकरी समाजाच्या उन्नतीसाठी व 'पापाचा बाप' ठरणाऱ्या पैशाच्या व्यवहारातच हरिश्चंद्राची सत्यनिष्ठा मूर्तीमंत अवतरली पाहिजे!! म्हणून १९०४ साली झालेल्या सहकारी कायद्याचा सुवर्णमहोत्सव झाला त्याची स्मृतीही कमी नाही. या महोत्सवात बाबूराव गोखल्यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर व कुलाबा अशा जिल्ह्यातही व्यापकपणे सेवा दिली.

संस्कृती व्यवहार शुद्ध राखण्यासाठी संस्कृती-शिक्षण व संस्कृती-संगोपन करणाऱ्या मंडळींची बूज समाजात राहिली पाहिजे. या दृष्टीने सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थीगृह व भिडेगुरुजी व्यायाममंदिराची स्थापना आणि सर्व राष्ट्रीय चळवळीस परोपरीने मदत करणाऱ्या व्यायाम पटु शिक्षण तज्ज्ञ दत्तोपंत परांजपे यांचा ५ डिसेंबर १९५४ रोजी झालेला साठीशान्तिचा सत्कार

यांना महत्त्व आहे. आशियाई सामन्यास एप्रिलमध्ये काशीद रवाना झाले. ऑगस्टमध्ये औंधचे आप्पासाहेब पंत पद्मभूषण झाले. आणि दिल्ली येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी निवडून येऊन त्यांचा जाहीर सत्कार वाई येथे गोखले यांचे अध्यक्षतेखाली झाला, एवढेच नव्हे तर सप्टेंबरच्या शेवटी कऱ्हाड तालुका पेहेलवान परिषद भरून पेहेलवान हे ठिकठिकाणचे स्वास्थ्याचे स्वयंसंरक्षक आहेत अशी मान्यता समाजाने दिली. या गोष्टीलाही आगळे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे डिसेंबरमध्ये सौ. इरावती कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली महिला परिषद आणि त्या पेक्षाही पांचगणी येथे संजीवनी विद्यालयात भरलेली प्रा. वीरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेली मुंबई राज्य मुख्याध्यापक परिषद, तीमधील स्वागताध्यक्ष बाबूराव वळवडे, उद्घाटक बाबूराव गोखले आणि अध्यक्ष वीरकर यांनी प्रगट केलेल्या विचारधारा, त्याचप्रमाणे शैक्षणिक धोरणाबद्दल स्पष्ट झालेले दृष्टिकोन यांना वास्तव व संस्कृतीशुद्ध इतिहास यांचा मेळ घालण्याचे दृष्टीने आगळेच महत्त्व आहे हे निर्विवाद आहे.

३१ *केल्याने होत आहेरे । आधी केलेची पाहिजे ।।*

अर्थव्यवहाराची दिशा

सहकारी कायद्याचा सुवर्ण-महोत्सव १९५४ साली झाला. त्याचा समारोप समारंभच जणू, वाई येथे वैकुंठभाई मेहतांच्या नेतृत्वाने सहकारी आणि बँकिंग प्रदर्शन १९५५ चे प्रारंभी भरवून सातारा जिल्ह्यात झाला. ३० ऑक्टोबर १९६५ अखेर सातारा जिल्हा – सहकारी परिषदा अनेकानेक झाल्या. तरी १९१८ च्या कासेगाव परिषदेनंतर सहकार – महर्षींच्या हस्ते वाईस झालेला तो समारोहच चळवळीच्या दृष्टीने सरस व संस्मरणीय ठरला. सातारा जिल्ह्यात बूध येथे २० जुलई १९०७ रोजी पहिली पतपेढी कॅम्बेल यांनी स्थापल्यापासून सहकारी चळवळीला सुरवात झाली होती. १९१० मध्ये एक–विचार–नागरी–सहकारी–पतपेढी मग स्थापन झाली. आणि १९१६ मध्ये मालखेड (ता. कऱ्हाड) येथून शेतकी खत पुरवठा समूहास करविण्यासाठी गॅरंटीड युनियन्स अस्तित्वास आल्या. एवढ्याच जुन्या इतिहासाची उजळणी वाईस १९५५ चे प्रारंभी झाली नाही; तर लोकमान्यांचे एक वर्गबंधू आणि वाईचेच मूळ रहिवासी विठ्ठल लक्ष्मण

कवठेकर यांनीच भारतात पहिल्याने बडोदे संस्थानात ५ फेब्रुवारी १८८९ रोजी " अन्योन्य – सहकारी – मंडळी " स्थापून सहकार प्रवर्तन केले, आणि सहकारी कुटुंबव्यवस्था व सहकारी संस्कार-मंडळेही काढून जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगात सहकार संचरला पाहिजे, असे दाखवून दिले. (सयाजीराव गायकवाड यांच्या आठवणी पहा) हा अभिमानही सातारा जिल्ह्याच्या सहकारी चळवळीतील आत्मविश्वासाकरिता प्रगट करण्यात आला. त्यामुळे सहकार महर्षींचे मार्गदर्शन ग्रामोद्धारापासून सर्वोदयी सहकारी–समाजवादी समाजरचनेपर्यंत कार्यक्षमता वाढविण्यास प्रोत्साहक ठरले.

बँकिंग प्रदर्शनातून पेढी-व्यवहारी-मनोवृत्ती सर्वत्र रुजविली पाहिजे हा धडा जसा विचारवन्तानी घेतला तसाच कऱ्हाड येथे जानेवारीत झालेल्या याळगी यांच्या अध्यक्षतेखालील सराफ परिषदेने जुन्या पेढी व्यवहारातील प्रसंग -- पूर्तीसेवा आणि संचय – संयमी शिरस्ता नवी अर्थशास्त्रीय घडी बसवितानाही विसरला जाऊ नये, असा धडा दिला. सहकारी चळवळ महाराष्ट्रात सर्वप्रभावी असताना अशा सूचना आल्या याचे कारण महाराष्ट्रातही सहकारी चळवळ अपेक्षेप्रमाणे समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत कल्याणकारी पाऊलटाक करू शकली नाही आणि तिने विकास केलाच असला तर तो ठराविकांचा ठराविक मर्यादेपर्यंतच केल्याचा व शीलसंपन्न कार्यकर्त्यांच्या अभावी पुष्कळसा दुरुपयोगच झाल्याचा अनुभव आहे म्हणून !!

गोवामुक्तिसंग्राम

एवढ्यात सातारा जिल्ह्याचा समन्वय योगी भाऊसाहेब सोमण ११ फेब्रुवारीस देवाचरणी गेल्याने जिल्हा उघडा पडल्यासारखा झाला आणि त्यानंतर एका महिन्याच्या आतच स्वामी केवलानंद ॐकारोच्चाराने समाधिस्थ झाल्याने विद्वत्ता अनाथ ठरली ! तरीही कर्तव्यच्युती सहसा होऊ द्यावयाची नाही, या जाणिवेने जून १९५५ मध्ये गोवामुक्ति संग्रामातील सत्याग्रहासाठी राजाराम पाटील (काले) प्रभृती मंडळी हालचाल करू लागली. जूनमध्येच भाई आत्माराम पाटील व राजाराम पाटील सातारा जिल्ह्यातील अनुक्रमे चाळीस व सव्वाशे जवान आपआपल्या तुकड्यांत सामील करून घेऊन गोव्यात शिरले. ऑगस्टमध्ये भाई चितळ्यांच्या गोवा मोहिमेंत सातारा जिल्ह्याचे दीडशे तरुण होते. गोवामुक्ति संग्रामास जुलई मध्येच भरती आली होती. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे झेंडावंदन पुणे काँग्रेस भुवनात त्या समारंभाचे मुख्य पाहुणे कऱ्हाडकर बाबूराव गोखले करीत असता, त्यांनी गोवामुक्ति संग्रामाच्या यशासाठी धीरवीर उत्तेजना दिली व बहादुरी करण्याबद्दल आवाहन केले. त्या सकाळच्या रामपाऱ्यातच पोर्तुगाल सरकारने भारतीय

सत्याग्रह्यांशी सशस्त्र संग्राम मांडला व अनेक बळी घेतले! त्या लढ्यात सातारा जिल्ह्यातील नाथ घाणेकरासारखे वृद्ध सत्याग्रही प्राणपणाने पुढे जाण्यास निघाले होते आणि चार युवक जखमी व जायबंदी होऊन परतले!

जन्मशताब्दि

सत्याग्रही समाजवादाचे भाष्यकार आचार्य शंकरराव जावडेकर ता. १० डिसेंबर रोजी परलोकवासी झाल्याने जिल्ह्याला त्या पराक्रमपर्वातिही धक्का बसल्याशिवाय राहिला नाही. तरीही सेवावृत्ती कर्तव्य दक्षतेने समतानंद (अनंत हरी) गद्रे यांच्या दौऱ्याचे स्वागत १९५६ चे जानेवारीत जिल्ह्याने केले. तेल्यातांबोळ्याचे पुढारी लोकमान्य टिळकांच्या त्या अनुयायाची सामाजिक सुधारणा (झुणकाभाकर, सत्यनारायण, सहभोजन) जिल्ह्याने कार्यान्वित केली. हे १९५६ वर्ष सुधारकाचार्य आगरकर व लोकमान्य टिळक यांच्या जन्म-शताब्दीचे असल्याने जुलई १४ व २३ रोजी ते उत्सव जिल्ह्यात अनुक्रमे साजरे झाले. आणि स्वराज्यात तरी सामाजिक सुधारणा व राजकीय प्रगती हातात हात घालून चालल्या पाहिजेत हे प्रबोधन जनतेस झाले. आगरकर जन्मशताब्दीचे मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातील मुख्य पाहुणे कऱ्हाडचे बाबूराव गोखले होते, तर मुंबईतील सार्वजनिक उत्सवाचे अध्यक्ष साताराचे न्या. भय्यासाहेब गजेंद्रगडकर होते. पुढे ता. २३ रोजी लोकमान्य टिळकांचे जन्मशताब्दि महोत्सवानिमित्त गोखल्यांना कलकत्यास निमंत्रणावरून स्मृतीसेवा करण्याचा योग आला. त्याच ओघात हेही सांगून टाकण्यास हरकत नाही की लोकमान्यांचे निःसीम भक्त भाऊसाहेब सोमण यांचे चरित्र सर्वपक्षीय सोमण सत्कार समितीने जसे फेब्रु-वारीत प्रसिद्ध केले होते, तसेच सातारच्या नव्या राजवाड्या शेजारी सार्व-जनिक सभांची सोय करून लोकजागृतीसाठी सोमणांचा एक अर्ध पुतळा २०ऑक्टोबर १९५६ रोजी ना. दादासाहेब पाटसकर यांचे हस्ते उद्‌घाटित करून सोमण स्मारक पुरे केले.

सुधारकाचार्य आगरकर व लोकमान्य यांच्या जन्म शताब्दिप्रमाणेच पुढे पांच वर्षांनी ऑगस्ट १९६१ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म शताब्दि जिल्ह्याच्या आत्माराम विद्यालय (ओगलेवाडी) आदिकरून विद्या-मंदिरातून साजरा झालाच. पण सातारा येथे त्यानिमित्त प्राचार्य दाभोळकरांचे "नैसर्गिक प्रवृत्तींची जागृती हवी" या विषयावर उद्‌बोधन झाले, हे विशेष होय. १९६३ साली स्वामी विवेकानंदांची जन्मशताब्दि जिल्ह्याने आस्थापूर्वक साजरी केली. भारताची स्वतंत्रता किती तेजस्वी असावयास हवी याचा आरा-खडा देऊन स्वतंत्र हिंदुस्थानला पहिला धोका चीनचा होईल ही (१९६२ साली खरी झालेली) भविष्यवाणी वर्तवून ठेवणारे व भारताच्या औपनैषदिक संस्कृ-

तीची ध्वजा जगात फडकवीत ठेवणारे एकोणीसाव्या शतकातील भारताच्या " समर्था " ची जन्मशताब्दि ता. १७ जानेवारी १९६३ स आली होती. तेव्हा कोल्हापूरच्या विवेकानंद-शिक्षण संस्थेच्या सातारा जिल्ह्यातील सर्व विद्यामंदिरांनी स्वामीजीस कृतज्ञतांजली वाहिली. उंब्रजचे शेठ भार्गवराम यांच्या विवेकानंद संस्कार केंद्राने नेहमीप्रमाणे स्वामीजींची जन्मतिथी व निर्वाण-दिन (४ जुलई) साजरा केला, आणि भिकोबा साळुंखे (किवळ), नानासाहेब डुबल (चरेगाव), गणपतराव आळतेकर व पागनीस गुरुजी कऱ्हाड, आमदार नाईक निंबाळकर फलटण यांच्या व्याख्यानांनी लोकजागृती केली. कऱ्हाडच्या हिंदु-मिशनतर्फे स्वामीजींचा जन्मदिन, निर्वाणदिन व शिकागो परिषददिन साजरे झाले. आणि बाबूराव गोखले, राघुअण्णा धोपाटे, उद्धवराव विहेकर, पागनीस, मु. शं. देशपांडे गुरुजी, केशवराव जोशी प्रभृतींची उद्‌बोधक व्याख्याने होऊन " थोडक्यांत विवेकानंद " ही पुस्तिकाही प्रसिद्ध झाली. कऱ्हाड हटकेश्वर मंदीरात गीता प्रवचनकार भिडेशास्त्री यांची चार प्रवचने झाली व कऱ्हाड नगरवाचनालयाच्या नवरात्रोत्सवात फलटणचे प्राचार्य भोसले यांचे व्याख्यान झाले. सातारच्या स्वामी विवेकानंद महोत्सव समितीच्या अध्यक्ष छत्रपती सुमित्राराजे आणि कार्यवाह वि. पां. नाईक, त्याचप्रमाणे गोळे गुरुजी, लंबोदर आण्णा काशीकर, डॉ. जोग प्रभृतींनी वर्षभर सातत्याने भजनादिकापासून विवेचक, प्रबोधक व्याख्यानापर्यंत कार्यक्रम आणि सप्ताह आखून स्वामीजींच्या विशाल दृष्टीची राष्ट्रभक्तीची आणि वेदान्त धर्माच्या महनीयतेची जनतेस एवढी ओळख करून दिली की त्या कार्यक्रमाचा कित्ता इतरांनी गिरवावा. जिल्ह्यातील वृत्तपत्रांपैकी समर्थने पांच, सज्जनगड पत्रिकेने चार, ध्रुवाने दोन व ऐक्याने एक लेख स्वामी सेवेसी प्रसिद्ध केले.

मग १९६४ साली उषःकाल कर्ते हरिभाऊ आपटे या महाराष्ट्राच्या स्कॉट म्हणून प्रसिद्ध असलेल्या आद्यकादंबरीकारांची जन्मशताब्दि मार्चमध्ये साजरी झाली. लगेच विमामहर्षि आण्णासाहेब चिरमुले आणि क्रांतीकारकांचे उत्पादक काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांचेही जन्मशताब्दि समारोह जूनमध्ये साजरे झाले. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची व देशसेवेची वैशिष्ठ्ये तरुण मनावर हेतुपुरःसर बिंबवण्यात आली. नोव्हेंबर १९६४ मध्ये सातारचे वेदान्त वागीश महामहोपाध्याय अभ्यंकर शास्त्री यांची जन्म शताब्दि सातारा जिल्ह्याने पुण्याच्या जोडीने विनम्रपणे साजरी केली. १९६५ जानेवारी २८ तारखेस मग पंजाब केसरी लाला लजपतराय यांची जन्मशताब्दि साजरी होऊन त्यांचा जीवन संदेश कर्तव्यपूत लोकसेवा आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढत असल्याचे प्रबोधन सर्वत्र करण्यात आले.

निर्वाण शताब्दि

वेळोवेळीच्या आणि ठिकठिकाणच्या अशा उपक्रमाना सातारा जिल्ह्यात सन्तसमागमाची जोड मिळाली. कोळे तो. कऱ्हाड येथील सन्त घाडगे महाराजांच्या समाधीचा शताब्दीचा उत्सव २६ आक्टोबर १९६४ रोजी त्यापूर्वी एक आठवडाभर वारकरी सांप्रदायाच्या सर्व प्रथा-प्रणालींच्या उपक्रमानी, हृदय हेलावण्यासारखा झाला. ता. २७ मे रोजी झालेल्या पं. जवाहरलालजींच्या निर्वाणामुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी झालेल्या त्यांच्या मासिक स्मृती दिनानिमित्ताने आणि नोव्हेंबरमध्ये सातारा कन्याशाळेत झालेल्या राजाभाऊ भावे यांच्या व्याख्यान द्वादशीमुळे राष्ट्रीय जीवनात भारतीय मानवाचे मनच नवे होत असल्याचा जो प्रत्यय–प्रबोध झाला, त्याची मख्खी विशेषच होती. साधुमनाचा आविष्कार उदात्तकृतीने व्यवहारशुद्ध झाला पाहिजे, हा जवाहरलाल स्मृती सेवा पुष्पातील सन्त समागम सुगंध होता. ता. १० डिसेंबर १९६४ रोजी गोंदवलेकर महाराजांसारख्या " स्वराज्यात अभ्युदयनिःश्रेयसाची जोड भारताला मिळावी " म्हणून परमेश्वरी अधिष्ठान प्राप्त करून घेण्याकरिता तपस्येचे रामदास्य पत्करलेल्या संतांच्या निर्वाण पन्नाशीचा उत्सव जिल्ह्याने भक्तिभावाने केला. तोच अनुभव जुलई १९६५ मध्ये ज्याची निर्वाण शताब्दि आदराने साजरी झाली त्या जगन्नाथ नाना शंकर शेठसारख्या आद्य देशभक्तांच्या ऐतिहासिक सेवेची जी वाङ्मयपूजा सर्वत्र झाली, तीमधून दरवळल्याशिवाय राहिला नाही.

स्वातंत्र्यसमर शताब्दि

महापुरुषांच्या जन्मशताब्दि व निर्वाण शताब्दि जशा सातारा जिल्ह्यान कृतज्ञतापूर्वक साजऱ्या केल्या, तशीच पहिल्या सशस्त्र स्वातंत्र्य समराचीही शताब्दि साजरी करण्यास सातारा जिल्हा चुकला नाही. १९५७ च्या फेब्रुवारीस विधिमंडळाच्या निवडणुका झाल्यावर त्या बाबत जिल्हा वाटचाल करू लागला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचे तीव्रतेमुळे, सदर निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांची पुष्कळच पडझड झाली तरी नामदार यशवंतराव चव्हाण हे निवडणुकीत नुसते यशस्वी झाले नाहीत तर त्यावेळच्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री निवडून येऊन अनेक सुहृदांच्या टीकेचा विषय होऊन राहिले. तरीही ब्रिटिशाविरुद्धच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचा शतसांवत्सरिक उत्सव अखिल भारतीय पातळीवर करण्याचे ठरताच, त्यांनी जातीने त्यात लक्ष घातले व ऑगस्ट १९५७ मध्ये त्या उत्सवाच्या परिपूर्ततेसाठी साताऱ्यास येण्याचे मान्य केले. त्या उत्सवासाठी इतरत्र प्रमाणे सातारा जिल्ह्यातही सर्वपक्षीय समिती सरकारी यंत्रणेच्या निरनिराळ्या विभाग प्रमुखासह स्थापन

झाली, आणि तिचे अध्यक्ष कलेक्टर साहेब व तिचे सेक्रेटरी शिक्षणाधिकारी भ. रा. पाटील, दत्तोपंत परांजपे मास्तर व बाबूराव गोखले अशी मंडळी निवडली गेली. रणरागिणीकर्ते शान्ताराम बापू गुप्ते, सरदार बाबासाहेब पंडित-राव, कर्मवीर भाऊराव पाटील, नानासाहेब जोशी, मिणीयार प्रभृती सभासदांच्या सल्लामसलतीने ठरले की सत्तावन्नच्या उठावाची स्फूर्तीमूर्ती प्रतापसिंह महाराज यांचा पुतळा राजवाड्यासमोरील जवाहर बागेत बसवावा; सातारा हायस्कूलला प्रतापसिंह - हायस्कूल असे संबोधावे, चार भिंतीवर एक दीपस्तंभ उभारून त्यावर कडेलोट झालेल्या व फाशी गेलेल्या सातारा-वीरांची नांवे कोरावीत; ज्या वडावर काही उठाव-वाल्यांना फाशी दिले त्याच्याभोवती पार बांधावा; व कृष्णेश्वराच्या मंदिरापुढील बन्सापुरीच्या मठापासून रंगोबापूजीनी उठावाची कारस्थाने रचली तेथेही स्मृतीफलक लावावेत. सातारा नगर पालिकेच्या सहकाराने हे सर्व अमलात आणले गेले. साताऱ्या बाहेर जिल्ह्यातील ज्याज्या गावांनी वा गावातून " आता फिरून घरी येणे नाही ! " अशा इषिमीने क्रांतीवीर बाहेर पडले, तेथे तेथे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पुढाकाराने लोकांनी त्या त्या क्रांतीवीरांच्या उंबरठ्यास पुजावे आणि घरातील बालगोपाळास त्या हुतात्म्याचे वंशदीपक म्हणून 'खाऊ' देऊन कुरवाळावे, असाही एक लोकसंग्रही कार्यक्रम होता. त्या-प्रमाणे सर्व सातारा जिल्हाभर अभिमान पूर्ण उल्हासाने तो कार्यक्रम झाला. याशिवाय समारंभ समितीचे एक चिटणीस बाबूराव गोखले यांनी लिहिलेला " अठराशे सत्तावन्नाचा महाराष्ट्र " हा ग्रंथ ना. चव्हाणांच्या प्रस्तावनेसह त्यांच्याच हस्ते प्रसिद्ध झाला. त्या ऐतिहासिक ग्रंथाचे वाचन प्रत्येक अक्षर-मित्र गावात होण्याची प्रचारचिंतनिकाही स्मारक समितीने केली. त्यापूर्वीच स्वातंत्र्य समराविषयी ग्रंथ प्रसिद्ध केलेले कादंबरीकार विठ्ठल वामन हडप यांचाही गौरव ना. चव्हाणांच्या हस्ते साधण्याचे औचित्य समितीने साधले. या उत्सवामुळे जिल्ह्यात नवजीवनासंबंधी एक नवचैतन्यच निर्माण झाले. कारण नव्या राजवाड्यातील भवानीचे मंडपातच तो उत्सव साजरा झाला होता.

प्रतापगडावर शिवस्मारक

याच १९५७ चे नोव्हेंबर मध्ये प्रतापगडावर श्री शिवछत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते शिवस्मारक समितीचे अध्यक्ष मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्या विनंती-वरून जेव्हा दिमाखाने उभारण्यात आला, तेव्हा राघुआण्णा लिमये प्रभृतींनी टापटिपीने व शिस्तीने व्यवस्था केलेल्या त्या ऐतिहासिक कुंभ मेळ्यात महा-राष्ट्रातील सर्व पक्षोपक्षांच्या आणि मतमतांतराच्या जनसंमर्दाने भक्तिपूर्ण

सहकार केला व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची घोषयात्रा साजरी केली. तशात " शिवरायाचा आठवावा प्रताप " म्हणून जेव्हा केशरी रंगाचा मराठमोळा फेटा बांधून पंडितजींनी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह शिवभूपतीला मानवंदना दिली, तेव्हा महाराष्ट्रीय अस्मिता भारताच्या सेवेला लावण्याची स्फूर्ती जागृती बळकट होऊन बसली हे सहाजिकच होय. हीच भव्य भावना १९६३ साली नोव्हेंबरात बाबा पुरंदऱ्यानी शिवचरित्र व्याख्यान-मालेने आणि १९६४ मधील शाहीर भावे यांच्या " गीत शिवायनाने " दृढतर व दृढतम केली.

वैद्य – लिमये

अशा सर्व उत्सवांचा आणि उत्सव मूर्तींचा किंबहुना त्या उत्सवातील वाचीवीरांचाही जनतेस एकच संदेश असतो की " केल्याने होत आहेरे । " आधी केलेचि पाहिजे ॥ " तो संदेश देणाऱ्या त्या उत्सव मूर्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हाही उत्सवकर्त्यांचा मानस खास असतो. १९५४ नंतर अकरा वर्षात झालेल्या उत्सवांचा तरी परिपाक दुसरा काय असणार ? फार काय, स्वातंत्र्यसमरशताब्दीचे एक उत्साही सभासद समर्थकार बाबूराव वैद्य हे त्या उत्सवाचे ऐन अगोदर एक आठवडाच सज्जनगडावर समर्थ चरणी लोटांगण घेताघेताच कायमचे लीन (८ ऑगस्ट १९५७) झाले, अगर १९६२ च्या निवडणूकी संपताच, निरपेक्ष बुद्धीने बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कर्म-योगाची संतत धार तीन तपे धरणारे राघुआण्णा लिमये एका मोटार अपघाता-पोटी अनंतात विलीन झाले, त्यांच्या कृतिवीरतेचा तरी दुसरा संदेश काय होता ? म्हणूनच वैद्यांच्या कल्पक औद्योगीकरणाच्या साहसास जिल्हा मुकल्या-मुळे हळहळला, आणि सेवाकार्याची प्रेरणा घेऊन बसला. लिमयांचे चरित्र त्यांची सुकन्या आशाताई हिने गांधीजयंती (१९६५) दिवशी प्रा. गिरीश कानेटकर यांच्या हस्ते " मसूरची संज्योत " म्हणून प्रसिद्ध केले, त्याचाही हेतू कृतज्ञतेबरोबर सेवाकार्याची प्रेरणा हाच नाही काय ? यांचे पेक्षाही, जुलै १९६५ मध्ये दिवंगत झालेले क्रांतिवीर बटुकेश्वर दत्त कृतीशून्यतेने चालणाऱ्या पण तोंडभर बोलणाऱ्या देशभक्तीने कधीतरी संतुष्ट होतील काय ? म्हणूनच ना सातारा जिल्ह्यातील तरुणांनी त्यांच्याबद्दल शोक सभेत देशसेवा आपल्या हातून अखंड घडो, म्हणून प्रार्थना केल्या !

अभिवादनपूर्वक अभिनंदने

गतिमान जीवनात महाप्राण घालणाऱ्या कृतींना इतिहासात स्थान मिळते.

तसा इतिहास घडविणाऱ्यापैकी दिवंगताबद्दल कृतज्ञता व्यक्त करून जशी कृति, स्फूर्ती घेता येते, तशीच विद्यमानापैकी इतिहास घडविणारांचा गुणगौरव करून कृति स्फूर्ती घेता येते. सातारा जिल्ह्याने तसे केलेही आहे. चाफळचे विष्णू रामचंद्र तथा आण्णासाहेब देशपांडे यांनी लो. टिळक व म. गांधी यांच्या राष्ट्रीय उत्थानांची पाइकी जन्मभर निष्ठेने केली. त्यांची अशीति (ऐंशिवा वाढदिवस) चाफळास १९५७ च्या सप्टेंबरमध्ये झाली असता, जिल्ह्यातील जाणकारांनी त्यांच्याबद्दल अभिवादनपूर्वक पूज्यभाव प्रगट केला. नोव्हेंबर १९६४ चे शेवटी कोरेगावास व सातारा येथे, सात्त्विक विचारांचे व समर्थसमाज स्वास्थ्याच्या जीवनचित्रांचे पसायदान आपल्या वास्तववादी कादंबऱ्यातून करणाऱ्या नारायण हरी आपटे या अभिजात लेखकाचा अमृतमहोत्सव साजरा झाला; त्याचप्रमाणे ऑगस्ट १९६५ मध्ये डॉ. वा. वि. तथा मामासाहेब आठल्ये या क्रांतिकारक सत्प्रवृत्तांचाही अमृतोत्सव प्रा. दामले यांच्या अध्यक्षतेखाली लौकिकाने झाला. तेव्हा त्यांनी तर समाजाची नैतिक उंची वाढविण्यापासून सर्व सेवाभावी होण्याबद्दलच विवेकवाद्यांना संदेश दिलाच. सातारा जिल्ह्यातील प्रागतिकाग्रणी व कसल्याही अन्यायावर तुटून पडणारे नानासाहेब जोशी (फेब्रुवारी), विधायक लोकसंग्रहाने सेवारत राहणारे कऱ्हाडचे विद्वान देशभक्त गणपतरावजी आळतेकर (एप्रिल), सरंजामशाहीत वाढूनही वडूज–गोळीबारा–(१९४२) तील दुःखितांचा निर्भयपणे परामर्ष घेणारे सरदार बाबासाहेब पंडितराव (जुलई), लोकसंग्रही राजाभाऊ पालकर (आक्टोबर) आणि शान्तचित्त सेवाव्रती बुवासाहेब गोसावी (नोव्हेंबर) यांच्या सत्तरीबद्दल १९६५ साली त्यांची अभिवादनपूर्वक अभिनंदने झाली ती समाज " रिकामा जाऊ ना दे क्षण। " अशा वृत्तीचा बनल्यानेच त्यांना रुचतील ना ? मग उद्योगपति शंकररावजी ओगले यांची सत्तरी ३१ जुलई १९६४ रोजी वास्तविक झाली असता, त्यांचा लौकिक सत्कार २६ मे १९६५ रोजी शंतनुराव किर्लोस्कर (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कामर्सचे अध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली त्यावेळी त्या दोघा उद्यमधीरांनी स्वदेशीच्या प्रेमाने कृतिशूरतेच्या अपेक्षा केल्या, हे संहाजिकच नव्हते काय ? फार कशाला समर्थ–सेवा–मंडळाचे हिरळीकर यांचा १९६२ साली आणि प्रसिद्धि विन्मुखतेने रुग्णसेवा व समाज–सेवा निरलस गुणप्रकर्षाने करणारे डॉ. भाऊराव आगाशांच्या साठी समारंभाने १९६४ चा प्रारंभ झाला, त्याचे प्रबोधन सेवाकृतिवृत्तीच नव्हे काय ? सत्प्रवृत्तिवर्धक मंडळाचे सभासद शाहीर मारुतराव हळबे (१९६४) आणि सोलापूर मार्शल लॉच्या वेळचे झेंडासत्याग्रही दामुआण्णा एकबोटे (१९६५) यांचे साठी समारंभ अगदीच चहात्यापुरते मर्यादित झाले असले तरी त्यातील प्रेरणा कर्मयोगाची नव्हती काय ? आणि ? १९६४ चे ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात काकासाहेब

गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामोद्योग–खादी–चळवळीत तनमनधनाने झटणाऱ्या बाबूराव जाजूंच्या साठीनिमित्ताने झालेले अभीष्टचिंतन समाजसेवा कृतिप्रेरणेच्या दृष्टीने कमी महत्त्वाचे नव्हते. अशा अशा विख्यात देशभक्तां-बद्दल वाटणाऱ्या आस्थेइतक्याच आस्थेने सप्टेंबर १९६५ मध्ये बाबूराव भिडे यांचे अध्यक्षतेखाली प्रसिद्धीपराङ्मुख काँग्रेसनिष्ठ आजन्म स्वयंसेवक कृष्णा आनंदराव ऊर्फ बुवा भांडवलकर यांचा साठी-समारंभ स्नेही सोबती व चहाते यांनी जाहीरपणे केला तेव्हा सामाजिक गुणगौरवाची नैतिक पातळी जशी उंचावली तशीच "आम्हाला एक ते ठावे। स्वदेशा प्राण अर्पावे ।।" हीच प्रेरणा घेऊन लोक गेले नाहीत काय ?

नवे उभार

असे आहे सामाजिक मन सातारा जिल्ह्यात, म्हणूनच १९५६ च्या ऑक्टोबरमध्ये, सामाजिक, राजकीय व लोकजागृती करणाऱ्या सुधारणा बरो-बरच औद्योगिक सुधारणा हव्यात म्हणून, रेठरे बुद्रुक येथे कृष्णासहकारी–साखर–कारखाना निघाला आणि शेतीला औद्योगिक करामतीची जोड मिळून समृद्धीची वाटचाल सुरू झाली. ऑगस्ट १९६२ मध्ये या कारखान्याची वाढ भरभराटीकडे असल्याचे प्रत्ययाला आले. ऑक्टोबर १९६४ मध्ये या साखर कारखान्याला जोडून आरंभलेल्या कुक्कुट पालनाच्या उद्योगाचे उद्घाटन बॅ. रामराव देशमुख यांनी केले. त्यावेळी त्यांनी केलेले मार्गदर्शन त्याच सुमारास अनपेक्षितपणे पांचगणीस शिवराम कोंडिबा बिरामणे यांच्या शेतात सापडलेल्या रामराज्यातील मुद्रेच्या नाण्याइतकेच मूल्यवान होते. सदर पंचधातूचे नाण्यात सिंहासनी रामपंचायतन, मागे धनुर्धारी रामलक्ष्मण व मध्येच चौकटीत ४० हा अंक आहे.

"शक्ति युक्ति जये ठायी तेथे श्रीमंत धावती ।।"

कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र कृष्णेच्या दोन्ही तीरावर आहे. अटक्या पासून बहे (रामलिंगा) पर्यंत चौदा मैल नदीचा डोह आहे. डोहाची खोली सरासरीने नऊ फूट व रुंदी ५५० फूट आहे. उन्हाळ्यातसुद्धा या डोहाला कोठेच उतार नसतो. नदीच्या उजव्या तीरावरील सभासदांचा ऊस कारखान्यात आणण्यासाठी चार ते सहा मैलाऐवजी कऱ्हाडवरून पंचवीस मैल खुष्कीने आणावयाचा तर पन्नास हजार रुपयापेक्षा वाहतूक खर्च ज़ास्त होई. तोड झाल्यापासून उशीरा ऊस कारखान्यात आल्यामुळे त्याच्या 'उतारा-'वरही परिणाम होई. म्हणून नदीचा डोह ओलांडून कारखान्यात ऊस नेण्याचा जवळचा मार्ग काढणे हाच मार्ग होता. डोहावर कृष्णापूल बांधण्याच्या खर्चाचा

अवाढव्यपणा व दगदग यामुळे सरकार त्याला हात घालीत नव्हते. मग लोकांचे त्राण काय? कमीत कमी पैशात व सहजासहजी उपलब्ध असणारे साहित्य वापरून पूल तयार करण्याची कल्पना क्रांतिकारक कळंत्रे मास्तरांचे सहकारी विष्णु पाटील (रेठरे बुद्रुक) यांचे चिरंजीव सदुभाऊ यांच्या डोक्यात घोळू लागली. नदीच्या पात्रातील वाळू भुळभुळीत वाटली तरी चारफूट खोलीवर तिच्या अंगात वजन सहन करण्याची शक्ति असल्याचे सदुभाऊंच्या निरीक्षणात होते. तेव्हा प्रयोग करून दहाइंच जाडीचा खांब तीन टनापर्यंत वजन सहज घेऊ शकतो असा आढळ झाला. मग आत्मविश्वासाने, रेठरे बुद्रुक येथे नदीची रुंदी तीनशे वीस फूट व खोली आठ पासून बारा फूट उन्हाळ्यातसुद्धा असते हे लक्षात घेऊन, एवढ्या पाण्यातील वाळूत लाकडात खिळा ठोकतो त्या प्रमाणे, खांब ठोकून बसवले तर त्या खालची वाळू अधिक घट्ट होईल असे सदुभाऊस वाटले. आठ ते दहा इंच जाडीचे व आठरा ते वीस फूट उंचीचे खांब वाळूत ठोकावयास 'स्टीमहॅमर' सारखी यंत्रेच हवीत! आणि तो खर्च उपाय करू जाता अपायच ठरणारा!! तेव्हा तोफेच्या धक्याने गाडा सरतो, या ऐतिहासिक सत्याची परीक्षा व्यवहारात उतरवावी, असे सदुभाऊनी ठरविले. बऱ्याच प्रयोगानंतर चार फूट लांबीच्या सहाइंची पाईपपासून बनविलेली तोफ हे काम करू शकते असे आढळून आले. मग एका ओळीत पांच पांच फूट अंतर ठेवून तीन खांब रोवले आणि पाण्याच्यावर तीन फुटावर काप घेऊन त्यावर एक जाड आडवे लाकूड बसविले. आणि साधारणपणे नऊ फूट अंतरावर अशा ओळी तयार करून त्यावर लाकडी सांगाडा तयार करून फळ्या टाकल्या. ऊसाने भरलेल्या गाड्या सहज जाऊ शकतील आणि एकूण वहातूक खर्च पंचवीस हजारा पलीकडे जाणार नाही असे १९६५ च्या महागाईतही म्हणता येते. सदुभाऊनी ही लाकडी पुलाची कल्पना कारखान्याचे संचालक मंडळापुढे मांडताच कारखान्याने खर्चाची प्रायोगिकासुद्धा जबाबदारी अंगावर घेतली म्हणूनच २८ नोव्हेंबर १९६२ ला कामाला सुरवात होऊन १९ जानेवारी १९६३ ला तयार पुलावरून पहिले वहान गेले. पहिल्यावर्षी खर्च तेवीस हजार पर्यंत आला. वहातूक खर्चात सवीस हजारांची बचत झाली. पुढे दरवर्षी या पुलामुळे पन्नास हजारापर्यंत वहातूक खर्चात बचत होते. तीन सीझनांचा हा अनुभव आहे. वाळूत रोवलेले खांब कायम ठेवून वरचा–पूल–भाग पावसाळ्यात काढून ठेवण्यात येतो. ता. १७ नोव्हेंबरपासून १९६५–६६ ची वहातूक सुरू झाली आहे. स्वराज्यात धार्मिक स्वातंत्र्याची इच्छा जशी तृप्त व्हावी तशीच नवीन साहसाची आकर्षणें लाभावीत, अशी अपेक्षा असणे काय चूक आहे?

साखर कारखान्या प्रमाणेच स्वातंत्र्य समर शताब्दीच्या मंगल प्रसंगी साताऱ्च्या गजानन व्यायाम शाळेच्या वतीने विठ्ठलराव सोमण यांनी क्रांतिस्मृती

विद्यालय संस्थापिले. शारीरिक शिक्षण व शिस्त संघटना यांची आपल्या छात्रात वाढ करून त्यांची मने, मनगटे व मेंदू बळकट करणारे दीक्षित शिक्षक तयार करणे हे या विद्यालयाचे चैतन्य आहे. सदर विद्यालय १९६० साली चांगलेच बाळसे धरू लागले. प्रगती करता करता ते जिल्ह्याचे भूषण होईल असा विश्वास जनतेला वाटत असतो. "पूर्वदिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काल।" म्हणून आगरकर जन्म-शताब्दी पासून आगरकरांचे स्मारक त्यांच्या टेंभू गांवी असावे आणि ते ज्ञानदायक व्हावे म्हणून तेथे ग्रामवाचनालय तरी चालवावे म्हणून टेंभूतील लहान थोर प्रत्येक घरंदाजाने यथाशक्ति वर्गणी देऊन आगरकरांच्याच मूळ वास्तूवर त्यांचे एक स्मारक बांधले. त्या कामी काव्यांचे आमदार संभाजीराव थोरात यांनी पुढाकार घेतला आणि बेळगांवचे खाण मालक मधुकरराव गोगटे यांनी पांच हजार रुपयांची एकमुखी देणगी दिली म्हणून १९६२ ते पुरे होऊन लोकसेवेस रूजू झाले आहे.

त्याच १९६२ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथे मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन पंजाबचे माजी राज्यपाल काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्याचे स्वागताध्यक्ष कोरेगावचे प्रसिद्ध कादंबरीकार नारायण हरी आपटे, उद्‌घाटक ना. यशवंतराव चव्हाण आणि अध्यक्ष काकासाहेब गाडगीळ यांच्या तीन भाषणांनी संमेलन तर गाजलेच; पण अहमदाबादच्या सौ. शेवडे प्रभृतींच्या काव्यगायनाने आणि शाहीर अमर-शेखांच्या "पेटला हिमालय" सारख्या उत्थापक रण-गीतानीही ते संमेलन संस्मरणीय ठरले. संम्मेलन प्रसंगी समर्थ पत्राने काढलेला संमेलन विशेषांक व बाबूराव गोखल्यांनी लिहिलेली आणि लोकसेवा संघाने पुरस्कारलेली, प्रकाश-लेली "सातारा जिल्हा-मराठी ग्रंथ वाङ्मयाचे धांवते दर्शन" ही पुस्तिका अनेकानेक रसिक अभ्यासकांच्या आदरास पात्र झाली. अश्लील-वाङ्मय लेखकांना समाजसत्त्व-सन्मानाचे धडे शिकवण्याबद्दल आचार्य अत्रे व मिरज-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर (पालकर) प्रभृतींचा साहित्य संमेलनात झालेला उहापोह आणि तदनुषंगिक ठराव हा सातारा साहित्य संमेलनाचा विशेष म्हणून लोक-मानसावर कायम ठसा राहिला आहे. समाज जीवनातील पावित्र्य केंद्र पूजास्थाने म्हणूनच सामाजिक मनात सदैव नांदली पाहिजेत.

ज्ञात्यापासून शिकावे

साहित्य संमेलनाचे निमित्ताने जमलेल्या मातबर विद्वानांच्या ज्ञानाचा फायदा सातारा जिल्ह्याने घेतला नसता तर ते खासच चुकले असते. कारण सातारा जिल्ह्याच्या विनम्रतेला तो ठपकाच ठरला असता. म्हणून संमेलनाचे

आदले दिवशी काकासाहेब गाडगीळांचे परिस्थती सापेक्ष राजकारणाची व्यावहारिक मीमांसा करणारे व्याख्यान राजवाड्यापुढे झाले व ते आपली पकड व छाप लोक-मानसावर ठेवून राहिले. संमेलनाचे दिवशीही राजवाड्यापुढेच प्रामुख्याने ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंत महाराष्ट्रीय संतांनी दिलेल्या शिकवणी. विषयी व केलेल्या राष्ट्र सेवेविषयी जे प्रा. सरदार, बेडेकर, शंकरराव तुळपुळे प्रभृती साहित्य सज्जनांनी व्याख्यान सत्र केले, त्याचाही ठसा लोक स्मृतीत कृति प्रबोधन म्हणून चिरस्थायी झाला आहे.

असे ठसे जनमनावर उठविणारी या पूर्वीची १९५५ पासूनची व्याख्याने सांगावयाचीच झाली तर १९५९ च्या आक्टोबर मधील दौऱ्यात "बहुजन सुखाय बहुजन हिताय" दैनंदीन सेवा करणारा हाच खरा देशभक्त होय; "करी थोडे बोले फार" अशाचा काही उपयोग नाही हे ठासून प्रतिपादणारी इंदिरा गांधींची व्याख्याने होत. त्या लगतच १९६० च्या एप्रिलमध्ये झालेल्या पंडित जवाहरलालजींच्या व नोव्हेंबरमध्ये झालेल्या राष्ट्रपती राजेंद्र प्रसादांच्या दौऱ्यातील त्यांच्या नव जीवनोत्थापक उक्ति पंक्ति याही स्मृती होऊन बसल्या आहेत. १९६२ साली आक्टोबरमध्ये सातारा येथे ज्ञान-विकास-मंडळातर्फे सेतु माधव पगडींचे "मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध" या विषयावरील संशोधनात्मक व जीवन चैतन्यपूर्ण व्याख्यानही आपले लोकशिक्षणाचे कार्य भरघोस करून बसले आहे. अशा ज्ञानदानापुढे सातारा जिल्हा जिज्ञासेने हात जोडून उभा असतो आणि ज्ञानवन्तापासून आपण शिकलो ते कसे पचविले आहे हेही प्रसंगवशात दाखवतो. त्याचेच द्योतक म्हणजे साहित्य संमेलनानंतर फलटणचे कवि मायूर (कोळेकर गुरुजी) यांनी आपला काव्य संग्रह 'रांगतो मी अंगणी' म्हणून प्रसिद्ध केला की काय असे काव्यमय कुतुहल त्यावेळी प्रगट झाले होते. या विनम्र भावनेचे १९६४ चे फेब्रुवारीत प्रा. तुंगारांची व्याख्यानमाला श्रोत्यांनी आत्मसात केली.

महत्त्वाच्या घडामोडी

शिकावे आणि वागावे या प्रथेने सातारा जिल्ह्याच्या एकादश वार्षीय कर्मयोगात मग पुढील गोष्टींचा आठव होतो. डिसेंबर १९५८ मध्ये कऱ्हाडचे पांडुरंग शिंदे अमेरिकेस इंजिनिअरिंगसाठी गेले. आणि इकडे सातारा जिल्ह्यात बहुजन समाजाला अन्न स्वावलंबी करण्यासाठी म्हणून सहकारी शेतीच्या विचारांचे मंथन वृत्तपत्रातून चर्चा सत्रातून परिसंवादातून होत होते. ऑगस्टमध्ये त्याला गंभीर स्वरूप आले होते. ते कोठच्या कोठे जाऊन लोणी असे काहीच निघाले नाही. त्यावर १९५८ आक्टोबरमध्ये महाबळेश्वरच्या वनस्पति संग्रहाकडे दृष्टी वळली होती. तेथून पावसासाठी ठिकठिकाणी वृक्षारोपणा-

साठी तरतूद करावी आणि महाबळेश्वर व जरंडा येथून सुलभ आयुर्वेदीय औषधोत्पत्तीसाठी ही व्यवस्था व्हावी, असा त्या दृष्टीचा रोख होता. पण त्या पैकी कोणत्याच कल्पनेला आकार आला नाही. आंधळी धरण आणि वीर-धरण होण्याची निश्चिती १९६१ च्या जुलैत झाली, तरी त्या सालचे खरे वैशिष्टच म्हणजे सातारा येथे सैनिकि शाळेची स्थापना होय. "बोले थोडे करी फार" या व्रताची अखंड तपस्या कशी असते हे जानेवारी १९६० मध्ये झालेला यशस्वी बालवीर मेळावा दाखवून चुकला होता. त्यातच त्या सालच्या मार्च महिन्याच्या शेवटच्या तारखेस सातारा येथील पाठक-भवनात भरलेले जिल्हा कवी संमेलन अध्यक्ष बाबुराव गोखले यांच्या काव्यमय भाषणाने आणि उद्घाटक महाराष्ट्र कवि यशवंत पेंढारकर यांच्या वास्तवोत्स्फूर्त काव्य-प्रयोजन–मीमांसेने, त्याच प्रमाणे अभंग–मंगसूळीकर प्रभृती कवींच्या काव्य गायनाने नवजीवनाचा संचार करणारे ठरले. नवजीवनाचा व्यवहारशुद्ध असा एक प्रत्यय सातारा जिल्ह्याला सप्टेंबर १९६० मध्ये असा आला की करंजे गाव संपूर्ण अक्षरमित्र झाल्याचे आढळले आणि "केल्यानें होत आहे रे। आधी केलेंच पाहिजे ।। यत्न तो देव जाणावा" हे समर्थ वचन त्रिकालाबाधितपणे पटले.

जनगणनेच्या अनेकविध निरीक्षण नोंदीत समाजात झालेल्या घटनांचा आणि समाजाला दिलेल्या सेवेचा कितपत स्थायी परिणाम झाला, याचा वास्तविक दशवार्षिक आढावा मिळावयास हवा, ते भाग्य अभ्यासू गणकांच्या आणि सरकारी यंत्रणेतील दूरदृष्टीच्या अभावामुळे भारताला नाही "म्हणण्यापैकीच आहे" मग सातारा जिल्हा अपवाद कोठून? १९६१ च्या जनगणनेचा निश्चित व निरपवाद आढळ इतकाच की सातारा जिल्ह्याचा आकार साधारणतः चौकोनी असून क्षेत्रफळ ४०२३ चौरस मैल आहे. लांबी सुमारे पंचाहत्तर मैल असून रुंदीही साधारणतः तेवढीच आहे. जिल्ह्यात सातारा, कऱ्हाड, पाटण, जावली, कोरेगाव, खटाव, माण, फलटण व वाई नऊ तालुके आणि खंडाळा व महाबळेश्वर हे दोन महाल असून ११५२ खेडी व १५ शहरे आहेत. १९६१ चे प्रारंभी सातारा जिल्ह्याची लोकसंख्या १४,२७,०२० असून तीत ६,९६,०६४ पुरुष व ७,३०,९५६ स्त्रिया आहेत.

जनगणनेच्या या वर्षात फलटणमध्ये भरलेल्या कोळी–परिषदेत आपल्या धंद्याबाबत सवलती मागितल्या, शिवाय समाजातील नवतरुणाना पात्रता प्रतिष्ठा मिळावी अशीही मागणी केली. जनसामान्यात होणाऱ्या या प्रतिष्ठेच्या भूक वाढीचे जसे कौतुक इकडे झाले तसेच लोणंदच्या सरस कांद्याचे परदेशातही झाले. त्या १९६१ च्या आक्टोबरात मग एक हजार शस्त्रक्रिया कुटुंब नियोज-नाच्या यशासाठी करून घेणारानी "यःक्रियावन् स पंडितः।" हे वचन सार्थ करून दाखविल्यामुळे, जिल्ह्याच्या पुढाऱ्यांना उत्साहपूर्वक आनंद वाटलाच

वाटला!! त्यापेक्षाही खरा आनंद प्रतापगड भवानी देवी स्थापनेच्या तीनशे चाळीसावा वाढदिवस साजरा झाल्याने जनतेस झाला, हे काय सांगावयास हवे?

राष्ट्रीय सेवेची एक आवश्यकता म्हणून जून १९६३ मध्ये आगरकर पुण्यतिथीस सातारा येथे रक्तदान शिबीर झाले तेव्हा विवेकी लोकानी आपले रक्त देऊन ते यशस्वीच केले. तशीच २४ आक्टोबर रोजी ना. बाळासाहेब देसाई यांचे अध्यक्षतेखाली भरलेली कुस्तीगीर परिषद. ही महाराष्ट्राची होती आणि राष्ट्रीय समर्थतेच्या दृष्टीनें ती यशस्वी करण्यात महाराष्ट्राची अस्मिताही प्रगट झाली.

मानवाच्या नवोदित मानसाचे सातारा जिल्ह्यात प्रात्यक्षिक १९६४ साली दिसले ते असे की कऱ्हाडचे डॉ. गोपाळ नारायण दातार यांनी एक लक्ष रुपये देणगी देऊन उत्तर रत्नागिरी जिल्ह्यासाठी चिपळूण येथे आपले नांवे १९६५ पासून कॉलेज सुरू करवले व बुद्धिवंतांच्या मागसल्या विभागाची एक निकड भागवून पांडुअण्णा शिराळकरांची दानशूरता प्रवाही ठेवली.

विवेक शुद्ध कर्तव्य करण्याच्या सातारा जिल्ह्याच्या सात्त्विक वृत्तीतूनच मग काही संस्था व्यक्ती उच्चस्थानें शोभवू लागतात.

चढती वाढती पदवी

हेच पहा की:—

सातारा औद्योगिक शाळेचा सुवर्ण महोत्सव जानेवारी १९५८ मध्ये साजरा झाला; सालच्या ऑगस्टमध्ये कऱ्हाडास ऋषीतुल्य भय्याशास्त्री वाटवे यांचा म. म. पोतदार यांचे अध्यक्षतेखाली सत्कार झाला; आणि ऑक्टोबरमध्ये किवळ गांव (ता. कराड) आदर्श ठरले. १९५९ साली इंजिनिअर दिगंबरपंत जोगळेकर (कराड) पद्मश्री झाले; तसेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटीलही पद्मभूषण या पदवीने गौरविले गेले. ना. यशवंतराव चव्हाण आणि ना. बाळासाहेब देसाई यांचें वाढदिवस मार्च १९६० मध्ये सार्वजनिकरीत्या साजरे होऊन त्यांच्या कर्तबगारीच्या स्मरण भाषणांनी ते जनतेस प्रोत्साहक ठरले. १९६२ साली कोयना प्रकल्पातील पहिल्या जनरेटरची उभारणी १६ मे रोजी झाल्यावर, ११ नोव्हेंबरपासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे भारताच्या संरक्षण मंत्र्याचे पदावर पंडित नेहरूंनी बोलावल्यावरून आरूढ झाले. त्या अगोदरच १९६१ साली शंकरराव जोशी वाईकर या इतिहास संशोधकाच्या "मराठेकालीन समाजस्थिती" या ग्रंथाचा गौरव मुंबई राज्य सरकारने केला, त्यावरून पूर्वी तसाच गौरव चिंतामणराव कोल्हटकरांच्या "बहुरूपी" चा झाला होता.

अगर सातारा न्यू इंग्लीश स्कूलचे सुपरिटेन्डेंट द. न. गोखले यांच्या ज्ञानकोशकार केतकर चरित्राचा झाला होता, त्याची आठवण होऊन लोकांना आनंद झाला. १९६३ मध्ये सातारचा आण्णा मारुती बाबर हा पोलीस राष्ट्रपति पदकाचा मानकरी ठरला. त्या आगोदरच्या वर्षीचे १९६२ चे जानेवारीत बावडे व मेणवली ही खंडाळा वाईकडील खेडी ग्राम गौरवास पात्र ठरली होती, व कोरेगावचे रा. द. कदम यास दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्याचे निमंत्रण मिळाले होते. त्यापेक्षाही विमाक्षेत्रातील फील्ड ऑफिसर नारायणराव घाडगे यांचा कामगिरीबद्दल विशेषच गौरव झाला. त्यापूर्वीच १९६१ मध्ये महाराष्ट्र नाटय समितीवर सातारचे डॉ. पांडुरंग कोल्हटकर निवडून नव्हते का गेले ? आणि सप्टेंबर (१९६१) महिन्यात मूळ नांदगावचे (कऱ्हाड) असलेले डॉ. एन्. व्ही. तथा नानासाहेब गोखले कानडात टोरांडो येथे क्षयरोग चिकित्सा परिषदेसाठी गेले होते, (मूळ माहुलीचे) पुणे मॉडर्न हायस्कूलचे मुख्याध्यापक विष्णु त्र्यंबक ताटके राष्ट्रपतींच्याकडून सन्मानपात्र ठरले आणि रहिमतपूरचे गिरीश तथा शंकरराव कानेटकर यांच्यापासून सातारा जिल्हा–माध्यमिक शिक्षक गौरवाचा सुरू झालेला " प्रवाहो चालला म्हणणे बरो " ठरला! ! कारण त्यानंतर १९६४ च्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपती गौरवास पात्र ठरले ते शिक्षणतज्ज्ञ (रयत शिक्षण संस्थेचे) शंकरराव सुखटणकर. १९६५ साली तर काय सातारचे सुपुत्र आणि ' मध्यप्रान्त वऱ्हाड एज्युकेशन सोसायटी'चे संस्थापक गंगाधर सदाशिव गोखले महाराष्ट्र सरकारने शिक्षण तज्ज्ञ म्हणून सन्मानिले. प्राथमिक शिक्षकांपैकी कोरेगाव तालुक्यातील माधवराव घाडगे यांच्या नंतर कऱ्हाडच्या (शाळा नं. ४ च्या) हेड् मिस्ट्रेस श्रीमती बागवान (१९६४) राष्ट्रपती पदकाचे मानास चढल्या याबद्दलही जिल्ह्यास धन्यता वाटली.

सातारा जिल्ह्यातील घरटी एकतरी जवान लष्करात असल्याची कीर्ति मिळविणारे अपशिंगे (ता. सातारा) १९६३ साली आदर्श खेडे म्हणून प्रशंसेस पात्र झाले आणि त्याच सालच्या जानेवारीत सातारा एज्युकेशन सोसायटीचा रौप्यमहोत्सव शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांचे अध्यक्षतेखाली साजरा होऊन कालौघ कसा संक्रान्त होत आहे याचा प्रकाश पडला.

छत्रपति शिवाजी कॉलेज (सातारा) चे प्राचार्य बॅ. पांडुरंगराव पाटील यांची निवड " शार्टटर्म स्टडी प्रॉजेक्टसच्या " अमेरिकेतील निरीक्षणासाठी फेब्रुवारी १९६४ मध्ये झाली होती, हा सातारा जिल्ह्याला अभिमान वाटला. मग सप्टेंबर १९६४ च्या ५ तारखेस फलटण नगर पालिकेने स्थानिक वैय्याकरणी दाणी, पुण्याचे घनपाठी घैसास, काशीचे ख्यातनाम वैदिक रामशास्त्री वझे यांचा जाहीर सत्कार केला. ही जिल्ह्यात अपूर्वाई झाली. तशीच अपूर्वाई

महाराष्ट्रराज्य मार्केटिंग कमेटीचे चेअरमन रघुनाथराव पाटील (चोरेकर) ऑक्टोबरमध्ये निवडून आल्याने सातारा जिल्ह्यास खास वाटली.

या सर्व आनंदात भर घालणारा आनंद म्हणजे हा की साताराचे प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर १९६४ च्या फेब्रुवारीपासून भारताच्या सुप्रीमकोर्टाचे सरन्यायाधीश झाले. मार्च १९४५ मध्ये ते मुंबई हायकोर्टाचे ॲडिशनल जज्ज झाले तेव्हा सातारा जिल्ह्याने त्यांचे अगत्याने अभिनंदन केले होते; मग यावेळी त्यांचा सत्कार करण्यास जिल्हा मोहरून आला असला तर नवल काय ? पुढे ते हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीशही झाले आणि १९५७ च्या प्रारंभापासून सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीशपदी चढले होते "चढत्या वाढत्या पदवीने" प्रतिष्ठेचे शिखर गाठणाऱ्या या सुपुत्राबद्दल सर्वांनाच सहाजिकपणे धन्यता वाटली. त्यांचा आणि संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांचा ३० डिसेंबरला जाहीर सत्कार सातारा जिल्ह्याच्या न्यायालयीन वकील वर्गाने तर केलाच पण जनतेनेही केला. त्या वेळी "लोकशाहीवर निष्ठा" कशी हवी ते न्यायमूर्तींनी सांगितले. आणि "लोकशाहीच्या यशासाठी बुद्धिमंतानी पुढे यावे" असे आवाहन संरक्षण मंत्र्यांनी केले. त्याच दिशेने मग १९६५ चे वारे वाहू लागले, असे वाटते.

केंद्र सरकारने दिल्ली येथे स्थापन केलेल्या स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर या पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या संस्थेतून हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले, या वार्तेने सातारा जिल्हा प्रफुल्ल होणे सहाजिकच होते. आपल्या लोकशिक्षणाची कार्ये सातत्याने चालविणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना अशा यशामुळे आत्मविश्वासाने कार्यक्षमता वाढविता येते. तोच परिणाम उदय कुमार गोविंदशेठ गुजर (सातारा) हे ऑगस्टमध्ये कॅनडास इलेक्ट्रिक इंजिनियरमधील पी. एच्. डी. पदवी मिळविण्यास गेल्यामुळे अगर रहिमतपूर प्रौढ विद्यालयाचे मुख्याध्यापक राऊत फुलब्राईट शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेत गेल्यामुळे सातारा जिल्ह्यास खास आनंद झाला आहे.

याच्याच जोडीला आणखी एक शिक्षणानंद सातारा जिल्ह्याला १९६५ साली लाभला आहे. १९६१ साली माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची परिषद कऱ्हाड येथे यशस्वी करणारे तिचे स्वागताध्यक्ष व कऱ्हाडचे सार्वजनिक काका म्हणून ख्यातनाम झालेले शिवाजी शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी (प्र. ल.) शंकरराव करंबेळकर ऑक्टोबरचे शेवटी नाशिक येथे भरलेल्या महाराष्ट्र राज्य (माध्यमिक) मुख्याध्यापक परिषदेत अध्यक्ष निवडून आले आणि त्या परिषदेत त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण व शिक्षण क्षेत्रात अपेक्षिलेले रसरसते जीवन आणि त्यासाठी अपेक्षिलेले शिक्षणाचे उद्दिष्ट व सर्वांगीण विकास यामुळे सातारा जिल्ह्याच्या वैचारिक जीवनाची उंची लोकप्रत्ययास आली आहे. शिक्षण संस्थांच्या इमारती, प्रयोग शाळा आणि ग्रंथालये यासाठी करंबेळकरांनी एक योजना मांडून

नऊ कोटी रुपयांचा "स्टेट एज्युकेशन फंड" उभारावा अशी सूचना केली हे एक वैशिष्टय आहे.

कर्तव्य कठोरता

सातारा जिल्ह्याचे कर्तृत्ववन्त चढत्यावाढत्या पदवीने चमकू लागले हा १९६४ पर्यंतचा अभिमानानंद १९६५ सालीही तसाच चमकत राहिला. खंडाळा पेटचातील शेतकऱ्यांनी वीर धरणाखालील पंचवीशेत्रेचाळीस एकरात मार्च १९६५ मध्ये गव्हाचे भरघोस पीक काढले; भोळी व पिसाळवाडी येथे त्रेसष्ट एकर जमिनीची शेती सामुदायीकपणे करण्यात आली होती. आणि तरी सुद्धा अन्नधान्याची टंचाई सर्व बाजूनी अशी भासू लागली की खंडाळा पेटचातील शेतकऱ्यांच्या विक्रमाने जनतेला दिलासा म्हणून मिळेना ! कृष्णा सहकारी कारखान्यात सतराशे मेट्रिक टन ऊस गाळण्यात आला म्हणून दैनंदिन अन्न प्रश्न कसा सुटावयाचा याची चिंता नाहीशी झाली नाही ! अशा स्थितीत अंधळी धरण झाले नाही याबद्दल लोकांचा संताप जुलईमध्ये तीव्रतेने प्रगट होऊ लागला तर नवल नको ! त्यातून पावसाने एवढी जबरदस्त ओढ दिली की, काँग्रेस कार्यकर्त्यांच्या फलटण येथील १७ ते १९ रोजी (जुलै) भरलेल्या शिबिरात संरक्षण मंत्र्यानी पदाधिकारी व पुढारी म्हणून मिरवण्यापेक्षा लोकांच्या दैनंदिन सेवेला अधिकाधिक महत्त्व देण्याबद्दल सर्वांचे लक्ष वेधले !

३२ : पाक-भारताची झुंज व साताराची सेवा !

संरक्षण मंत्री १९ मे १९६४ रोजी अमेरिकेत गेले होते ते भारताच्या संरक्षण–क्षमतेची शाश्वती करण्याच्या दृष्टीनेच होय. स्वनातीत विमाने भारताला देण्याची वॉशिंग्टनची घोषणा हे त्या भेटीचे तत्कालिक फलित होय. १९६२ साली संरक्षणमंत्रीपदाची सूत्रे यशवंतरावांनी हाती घेतल्यापासून मार्च १९६५ पर्यंत भारतीय संरक्षण दलाचा विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले असल्याचे संरक्षण खात्याने आपल्या १९६४—६५ च्या वार्षिक अहवालान्वये घोषित केले. अधिकारीवर्ग व इतर श्रेणीसाठी एकूण आठ लक्ष पंचवीस हजार लोकांची भरती करण्यात आली.

गिरीप्रदेशातील अत्युच्च ठिकाणी रात्रीच्या वेळी हिमवर्षावांत व कमालीच्या थंडीत शत्रूशी सामना देण्याचे शिक्षण देण्यासाठी लष्कराच्या

प्रशिक्षण विषयक कार्यक्रमाचीही पुनर्रचना करण्यात आली. सैनिकांना दणकट बनविण्याचे प्रसंगी निःशस्त्रपणेहि लढा देण्याच्या व नव्या युद्ध तंत्रावर या प्रशिक्षणात प्रामुख्याने भर देण्यात आला. युद्धातील प्रचंड आवाज व धक्क्यांचा सैनिकांचे मनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी त्यांची युद्धप्रविणता वाढविण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात आले.

दुर्गम प्रदेशातील लष्करी कारवायांसाठी व गस्त घालण्यासाठी प्रशिक्षण देऊन खास अधिकारी वर्ग तयार करण्यासाठी सैनिक शाळातून खास अभ्यासक्रम सुरू करण्यात आले.

पांचहजार कोटींची तरतूद

संरक्षण विषयक पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम १९६४–६५ मध्ये सुरु करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पांचहजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

चीन व पाकिस्तानने भारताविषयी शत्रुत्वाची भूमिका घेतल्यामुळे आणि १९६२ त चीनने भारतीय प्रदेशाचा बराच मोठा भाग व्यापल्यामुळे आपले संरक्षण दल सतत दक्ष ठेवण्याची आवश्यकता निर्माण झाली. सेनादलाचे आधुनिकीकरण व विस्तार करण्यात आला. हवाईदलाची वाढ करून एकूण ४५ दले उभारण्याची योजना, नौदलातील नादुरुस्त जहाजांची व सीमा भागातील रस्त्यांची दुरुस्ती व बांधणी पूर्ण झाली. लष्करी कारखान्यांची व संघटनात्मक यंत्रणेची सुधारणा करण्यात आली. आणि मग ? २४ एप्रिल १९६५ ला शनिवारी सकाळी छाड बेटाचे पश्चिमेला २४ मैलावर केंद्र ८४ वर पाकिस्तानी सैन्याने रणगाड्यासह हल्ला चढविला. भारताची पायदळाची एक पलटण तेथे होती. तिने जोरदार प्रतिकार केला. काही हानी झाल्यावर भारताच्या पथकाने मागे सरकून अधिक सुरक्षित मोर्चे घेतले. पाकिस्तानी हल्ला करणारे सैन्यही आपल्या हद्दीत परतले. रणगाड्यासमवेत भारताच्या सैन्यावरचा हा पहिलाच हल्ला होय. भारताच्या हेर खात्याने अशीही माहिती दिली की – पाकिस्तानने सार्वत्रिक भरतीची आज्ञा दिली असून विविध कायम ठाण्यापासून त्यांच्या सैन्याची हालचाल सुरू झाली. रजा बंद करणे, रजेवरील लोकांना परत बोलावणे वगैरे कारवाईही पाकिस्तानने केली आहे. त्याचप्रमाणे रझाकार आणि मुझाहीद यांचेही शिक्षण आणि संघटन मोठ्या प्रमाणावर चालू झाले. आसाम मधील पाकिस्तानी लुटारू टोळ्यांच्या हल्यांच्या प्रतिकारार्थ गस्ती टेहळणी वाढविण्यात आली, तेव्हापासून हल्यांचे प्रमाण कमी झाले. सीमावर्ती लोकांनी शस्त्रासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यात येतो. पण सीमाभाग मोकळा

करण्यापेक्षा तेथील लोकात आत्मविश्वास वाढविणेच इष्ट होय म्हणून सैनिकी गस्त वाढविण्यात आली.

कच्छचा युद्धविराम पत्करला. तो देशात कित्येकाना नापसंत होता. त्याने जणू अवसान हेरून भारतातील पाकिस्तान धार्जिण्यांनी जोर करावयास सुरवात केली. त्यातच अन्नधान्याच्या टंचाईमुळे कम्युनिस्ट व त्रस्त जनता यांनी सरकारी कचेऱ्यावर भूक मोर्चा काढावयास १९६५ जुलई पासून प्रारंभ केला. तेव्हा भारतावर प्रहार करण्याला ही सुसंधी चालून आल्याचे मानून चीनच्या प्रेरणेने पाकिस्तानने व पाकिस्तानच्या प्रेरणेने भारतातील पाकिस्तान धार्जिण्यांनी आपला हात उचलला. इतका की ऐन गणपती उत्सवात (४ सप्टेंबर रोजी) साताऱ्यातील गुरुवारातील मारुतीची मूर्ती फुटली. खटाव तालुक्यातही तसेच प्रकार घडले. जनता मग एवढी चिडली की १९४८ ची पुनरावृत्ती होऊन मुसलीमांची घरे, मशिदी, दुकाने भस्मसात झाली. तेव्हा सरकारला आततताई पणातून निर्माण होणारे अत्याचार टाळण्याकरिता भूक मोर्चांची दंगल उठविणारांना आणि संशयित पाकिस्तान धार्जिण्यांना स्थानबंदी करून ठेवावे लागले. सरकारच्या कैचितून त्यापैकी कोणाची सुटका कोठल्याही सबबीवर कोणी केली, करवली तर तो जनतेच्या धिक्कारास पात्र होऊ लागला. अशा स्थितीत ४ सप्टेंबर रोजी कऱ्हाडास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुरुजी गोळवलकरांनी साहजिकच जनतेला आवाहन केले की. " परस्पर सहयोगाने भारतीय जवानांच्या मागे रहा ! " आणि ता. ९ सप्टेंबर रोजी वडूज येथे जेव्हा हुतात्मादिन साजरा झाला तेव्हा राष्ट्रीय इभ्रतीच्या व स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ प्रसंग पडेल तशा सर्वस्वाच्या त्यागार्थ तयार राहण्याचाच आदेश देण्यात आला.

१९०६ सालापासून " फोडा झोडाच्या " धोरणाने राज्य करणाऱ्या आंग्लाईने उठविलेल्या मुस्लीम लीगच्या " भयंकर भुताने " १९४७ साली भारताचे विभाजन करून पाकिस्तानचा राक्षस निर्माण करून ठेवला, त्याबद्दल इंग्लंडला अपत्यवत् प्रेम वाटावे आणि इतर स्वार्थ्यांनी त्याकडे ' हुकमीपत्ता ' म्हणून भारतावर छाप ठेवण्यासाठी वापरावयाचे ठरवावे यात काही नवल नाही ! पण एकवेळच्या आपल्याच रक्तामासाचे व परंपरातुटीचे ते भावंड आहे म्हणून पाकिस्तानशी संपूर्ण माणूसकीने भारत वागत असता, दीड तपाच्या सहनशीलतेचा व शांतीचा अर्थ भलताच समजून, जेव्हा पाकिस्तान उठले तेव्हा ? रशियाचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे राजकीय साप्ताहिक ' न्यू टाईम्स ' याने काश्मीरच्या बाबतीत इंग्लंड आणि अमेरिका यांची कूटनीति १७ आक्टोबर १९६५ पूर्वी बाहेर फोडली ती अशी की, " दुसरे महायुद्ध चालू असता १९४५ साली अनेक अमेरिकन हस्तकांनी आणि फितुरांनी

काश्मीरमध्ये बंगले बांधून तेथे आपली वस्ती केली. सुप्रसिद्ध अमेरिकन पत्र पंडित लॉरेन्स रिसेंजर हा आपल्या ' इंडिया अँड यू. एस्. ए.' या ग्रंथात असे लिहितो की— काश्मीर हे भारत, पाकिस्तान, आफगाणिस्तान, चीन आणि रशिया या पांच राष्ट्रांनी सगळ्या बाजूने घेरले असल्याने आंतरराष्ट्रीय आणि लष्करी दृष्टीने त्याला विलक्षण महत्त्व आहे. अशा मोक्याच्या ठिकाणी अमेरिकेने लष्करी तळ बांधावे आणि सर्व राष्ट्रांना विशेषत: रशियाला शह देता यावा अशी अमेरिकन मुत्सद्यांची खात्री झाली होती. म्हणून काश्मीर भारता सारख्या तटस्थ राष्ट्राच्या ताब्यात न राहता, पाकिस्तान सारख्या आपल्या बगलबच्याच्या ताब्यात असावा हे इष्ट आहे. अशी रशियाला शह देण्याच्या दृष्टीने आंग्लो-अमेरिकन मुत्सद्यांची धारणा होऊन बसली. ''

या धारणेप्रमाणे अमेरिकेने गिलगित आणि चित्रळ या भागात आपले लष्करी तळ उभारले. १९४७ साली पाकिस्तानी हल्लेखोरानी काश्मीरवर पहिली चढाई केली. तीत अमेरिकेचा हेर रसेल व्हाईट हा प्रमुख होता. फार काय ५ जुलई १९५३ च्या न्यूयॉर्क टाईम्सने सुचविले की काश्मीरचा वायव्य भाग पाकिस्तानला द्यावा व जम्मू आणि लडाख भारतात ठेवावा आणि काश्मीरच्या दरीचे स्वतंत्रराज्य युनोच्या छत्राखाली निर्माण करण्यात यावे, अशी योजना प्रसिद्ध केलेली होती, म्हणूनच आठरा वर्षे चिमटे–ओचकारे–बोचकारे काढीत कुरापत काढून युद्ध पेटवण्यास टपलेले पाकिस्तान धारिष्ट करून भारतावर तुटून पडू लागले.

५ ऑगस्ट १९६५ पासून जम्मू काश्मीर मध्ये हजारोंच्या संख्येने सशस्त्र पाकिस्तानी घातपात्यांनी लपून छपून श्रीनगरच्या सभोवतालच्या खोऱ्यात प्रवेश केला व धुमाकूळ घातला. त्याच्या बातम्या दिल्लीत येऊ लागल्या. त्या घूस-खोरांना जागच्या जागीच डांबून ठेवण्याचे काम ६ ऑगस्ट पासूनच सुरू झाले. पण पाकिस्तानी शेजारधर्म जगाच्या चव्हाट्यावर येणे जरूरच होते. १९५४ साली ९ ऑगस्टला शेख अबदुल्ला याला राष्ट्रद्रोही म्हणून अटक झाली होती! त्या अटकेची आकरावी पुण्यतिथी घातपाती, अराजक व बंड उभारून साजरी करण्याचा पाकिस्तानी कावा होता. ता. १६ ऑगस्ट रोजी (पूर्वीच काबीज केलेल्या पण " युनो " राष्ट्र संघाच्या आग्रहाने सोडून दिलेल्या) कारगीलच्या चौक्या पुन्हा काबीज केल्याची घोषणा संरक्षण मंत्री चव्हाण यांनी केली व २० ऑगस्ट १९६५ च्या दिवशी होणारी पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री भुट्टो यांची भारत भेट रहित करण्यात आली!

पाकिस्तानी घुसखोरी म्हणजे एकजिनशीपणाच्या पोटात घुसणारी वाघ-नखे आहेत हे हेरून भारतीय सेनेने युद्धठाणी ऊर्फ मनगटेच आवळून धरली. ही घोषणा ना. चव्हाणानी संसदीय लोकप्रतिनिधीसमोर ता. २५ ऑगस्ट रोजी

केली. सर्व जग त्याने खळबळले ! रशियाचे उपपंत प्रधान माझुराय भारतात येऊन सरकारचा कानोसा घेऊ लागले ! कारण शान्ति सम्राट भारतच आक्रमक आहे असा ग्रह बाहेरच्या देशांचा होता. पण कोणाला काही वाटले तरी एकदा शस्त्र उपसल्यावर नुसत्या वाटाघाटी आणि गैरसमजांचे दूरीकरण करीत बसण्यात काय अर्थ ? ते कार्य चालू ठेवूनच टिथवालचा ताबा भारताने मिळवला होता. पण तेवढ्याने भागणार नाही, कारण घूसखोरांची रसद व मनुष्यबळ थांबणार नाही, ही खूणगाठ पक्की मनाशी बाळगून भारतीय सेनेने उरी व हाजीपीर खिंड ही महत्त्वाची पाकिस्तानी ठाणी ताब्यात घेतली; एवढेच नव्हे तर काश्मिरात घुसलेल्या मुजाहिदाची शिकार भारतीय सेनेने अशी केली की, बंडाचा आपला जुगार हरला अशी जाणीव पाकिस्तानला झाली !

पाकिस्तान त्या गोष्टीवर चवताळून भारतीय हद्दीत छांब भागात आक्रमण करू लागले. पाकिस्तानने अमेरिकेकडून घेतलेल्या अजस्र सत्तर पॅटन् टँक्स व प्रचंड पायदळ यांची ती डुक्कर मुसंडी होती ! भारताने त्यावर हवाई दलाचा वापर करून त्या मुसंडीची शिकार साधली. त्यामुळे अघोषित अशा भारत-पाक युद्धाला सुरुवात झाली ! मग काय ? जगभर चर्चा उग्र उग्र उग्र होऊन राहिली !! राजकारणाच्या अंती रण आहेच, हे निश्चित झाल्यावर ता. ६ सप्टेंबर सोमवारी पाहाटे पश्चिम पंजाबची आंतरराष्ट्रीय सरहद्द ओलांडून भारतीय सेनेने तीन नव्या आघाड्या ओलांडल्या. लाहोर व सियालकोट या दोन प्रमुख शहराकडे कूच करण्यास सुरुवात झाली. सिंहाच्या गुहेत शिरून सिंहाचे आयाळ उपटण्याचा जमाना भारताने उभा केला. रशिया, कॅनडा, न्यूझीलंड, युगोस्लाव्हिया आणि इजिप्त यांचा पंचमुखी मारीच मग पाकिस्तानचे आगळीकी आक्रमण लक्षात न घेताच भारताला शांतिपाठ शिकवू लागला !!

यूनोचे सचिव यू थांट मग शान्ती दूत म्हणून आले. ब्रिटन व अमेरिका यांनी भारताकडे मदत म्हणून जाणारी युद्ध सामग्री थांबवण्याचा विचार चालविला. चीन व इंडोनेशिया यानी भारतालाच आक्रमक ठरविण्याच्या 'उलटचा बोंबा' सुरू केल्या. भारताच्या पंत प्रधानांनी मग घोषणाच केली की, "ज्याचे नशीब त्याचे बरोबर !" टाकलेल्या पावलाला आता माघार नाही, हा भारताचा निर्धार व भारतीय सेनेने पाकिस्तानच्या धसमुसळेपणाला दिलेला मार लक्षात घेऊन चीन भारताची शक्ति विकेंद्रित करण्याकरता आक्रमणाची पावले टाकू लागला आणि त्यासाठी भारतानेच तीन हद्दीवर आक्रमण केल्याची आवई त्याने उठविली.

काश्मीरात सार्वमत तीन महिन्यात घेतले जावे, नाहीतर आम्ही 'जंग'

हजार वर्षे चालवू अशी पाने यू थांटच्या तोंडाला पाकिस्तानने पुसली. तरीही २० सप्टेंबर रोजी दोन दिवसात युद्ध विरामाचा आदेश भारत पाकिस्तान यांना त्याने दिला. पांच ऑगस्ट पूर्वीच्या ठिय्यावर उभय राष्ट्रांनी यावे, यावर यूनोचा कटाक्ष होता. यूनोच्या या आदेशानंतरही पाकिस्तान्यानी अमृतसर-वर हल्ले करून माणसांचे बळी घेतले. व तीच पशुवृत्ती अजूनही संपली नाही. रेल्वे, पूल, वाहतुकीचे मार्ग व सर्व सामान्य जीवन यांचे संरक्षण पंजाबी भारतीय जनता दक्षतेने करीत होती. पाकिस्तानी "छत्रीधारी" सैनिकांना पकडण्यातही जनता जागरूक होती. कितीतरी पाक छत्रीधाऱ्यांना जनतेने साफ साफ पाक करून टाकले. पंजाबचा नागरिक युद्धाला रूळला, शत्रू सैनिक कैद्याकडून माहिती मिळवू लागला. मग सुभेदार राजूच्या तोफखान्याची चांगलीच धास्ती पाकिस्तान्यानी घेतली असली तर नवल काय? जवानासाठी जरुरीच्या वस्तुच काय पण रक्तदान करण्यात भारतीय पंजाबी जनता राष्ट्रधर्माचे पालन पवित्रपणे करताना आढळली. साऱ्या भारताचा एकजिनसी जिव्हाळा भारत-पाक चकमकीत प्रत्ययाला आला. संरक्षण मंत्री व आरमार प्रमुख महाराष्ट्रीय, लष्कर प्रमुख बंगाली, विमानदल प्रमुख पंजाबी !! विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील इंग्रजाना दाब देणाऱ्या लाल–बाल–पाल या त्रिमूर्तींचा जणू नवा अवतार !!!

बुर्की, इच्छोगिल कालवा आणि लाहोर अशा क्रमाने पाकिस्तानला वेढण्यास दहा सप्टेंबर पासूनच सुरुवात झाली होती. हदियारा-बुर्कीची तुंबळ लढाई पाकिस्तानात आठ मैल घुसल्यावर झाली; पहिल्या पाकिस्तानी चिलखती तुकडीचे कंबरडे भारतीय सैन्याने मोडले, पाकिस्तानी पॅटन टँक्स भारी वजनाचे, चिवट व सहसा तोफेच्या गोळ्याला दाद न देणारे! पण भारतीय जवानांच्या निर्धाराने ते पोलादी राक्षस मोडू लागले, फुटू लागले! गळू लागले !! कारण भारतीय जवान अमेरिकेच्या वा चीनच्या "जीवाचे पाठिंब्यावर" उभे नव्हते, स्वतःच्या मन-मेंदू-मनगटावर भिस्त ठेवून होते. मोंगल सैन्याला जसा मराठेशाहीत धनाजी जाधव जळी-स्थळी-काष्टी-पाषाणी दिसत असे तशी अवस्था पाकिस्तान्यांची लाहोरच्या "रणचंडीत" झाली. लाहोर, सियालकोट, जम्मू, पूंच कोठल्याही रण क्षेत्रात पाकिस्तानी सैन्याचे कंबरडे मोडण्यात आले. भारताचा शांतिब्रह्म दधीची जमदग्नी होऊन दुर्वासाच्या संतापाने आपला सात्त्विक स्वाभिमान जगाच्या डोळ्यात, डोक्यात व डिंडिमात घुमवू लागला. दिल्ली दरवाजावर पाकिस्तानी हत्ती यावयास निघाले होते. पण लाहोरला त्यांचे उंट करून सोडले भारतीय वैमानिकानी व रणवीरानी !!

कोरियन युध्द १९४८–४९, भारत-चीन युद्ध १९६२ व पाक-भारत युद्ध १९६५ ही अघोषित युद्धे घोषित युध्दाच्या तीव्रतेने आपआपल्या रक्त

सांडीमुळे इतिहासात नमूद आहेत. २३ सप्टेंबर १९६५ आंतरराष्ट्रीय दृष्टीने युद्ध-तहकुबी झाली असली तरी ती कागदोपत्री आहे. पाकिस्तानचे उपद्व्याप चालूच आहेत. युद्धबंदीचा भंग पाकिस्तानने १३ ऑक्टोबरपर्यंतच्या वीस दिवसात दोनशे एकावन्न वेळा केला आहे. "विनाशायच दुष्कृताम्" हा भारताचा निर्धार आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या नाकाची दुर्दशा शूर्पणखेच्या नाकाची लक्ष्मणाने केली तशी होणारच असेल तर भारताचा त्याला नाईलाज आहे ! म्हणून माणुसकी सोडून युद्ध भंग रोज पाकिस्तान करीत राहील तर त्याचा समाचार विश्वरूप दर्शन देऊनही भारत घेत राहील. कारण आगळीकी शिवाय शिक्षा भारताने कोणासच केली नाही ! भारताचे शान्तिब्रह्म विवेकी असल्या कारणाने कदाचित् पाश्चात्य चोरावर क्षमेचे छत्र धरील ! पण संन्याशाला चुकूनही फाशी द्यावयाचे नाही. निरीक्षकांच्या गटात इतके स्पष्ट झाले आहे की प्रस्तुत भारत-पाक झटापटीत भारतातील जनजागरण, रण आणि कारभारी धोरण एकदिल आहे. भारताचे गृहमंत्री नंदा रणांगणावरील जवानांचा पाठीराखेपणा करावयास गेले असता त्यांच्या मोटारी पासून तीस यार्डावरच पाकिस्तानी बॉम्ब पडला होता. "बळी" चुकला हे पाकिस्तानला आढळल्यामुळेच, "शूराच्या अहिंसेची" मूर्ती असलेले गुजरातचे मुख्यमंत्री विमानाने एका मुलकी कार्यक्रमाकरता जात असता, त्यांना नंदाजी समजून पाकिस्तान विमानाने त्यांचा बळी घेतला ! युद्धात अशा जखमा व घोर साहजिकच असतात. त्याने कोणी खचून जाता कामा नये. हे जाणूनच गृहमंत्री नंदा प्रमाणेच संरक्षण मंत्री आणि पंतप्रधान शास्त्री हेही रणांगणावरील जवानांची समक्ष विचारपूस करून व भारताच्या इज्जतीसाठी आपली जान कुर्बान करणाऱ्या जवानाला श्रद्धांजली वाहून आलेले आहेत. तेच आपले कर्तव्य राज्य यंत्रणेचे सूत्रधार जनसामान्याप्रमाणेच युद्ध (घोषित वा अघोषित) चालेल तेव्हा तेव्हा आणि इतरही प्रसंगी करण्यास चुकणार नाहीत. यावेळी, छत्रपती शिवाजी महाराज, पहिले बाजीराव, महादजी शिंदे, थोरले माधवराव यांची महाराष्ट्रीय परंपरा जी जनसामान्याशी समरस होऊनच राष्ट्रसेवा करण्याची असे, ती भारतीय पातळीवरून चालविण्यात महाराष्ट्राचे व सातारा जिल्ह्याचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण युद्धनीतीचे संचालक आहेत ही गोष्ट जशी अभिमानास्पद आहे, तशीच महाराष्ट्रीय जवानानी आपला मर्दुमकीचा व जरूर त्या आहुतीचा वाटा या युद्धात उचलला आहे, ही देखील अभिमानास्पद व इतिहास स्फूर्तीची गोष्ट आहे. सातारा जिल्ह्याचे एकोणतीस सुपुत्र या कामी कारणी लागले आहेत. भारतीय जवानानी पाकच्या सदतीसशे सैनिकाना अल्लाह चरणी धाडले आहे, पाकचे चारशे रणगाडे व सत्तर विमाने नष्ट केली आहेत आणि पांचशे सैनिक व वीस लष्करी अधिकारी

आतापर्यंत गिरफदार केले आहेत. "संत येति घरा। तोचि दिवाळी दसरा।" हे जितके खरे तितकेच "कर्तृत्व कर्तव्या कळा। अमृत सिद्धीचा मळा।" हेही खरे आहे.

भारक पाक यांच्या या १९६५ च्या धकाधकीत भारताचे नऊशे बारा सैनिक व चौसष्ट अधिकारी कामास आले. त्या रणमर्दात सातारा जिल्ह्यात रेठरे बुद्रुक येथील दत्ता जाधव, देवधर, कृष्णा सावंत (ता. पाटण), केशव साळुंखे (बोरगाव), बाळासाहेब मोहिते (किन्हई), पांडुरंग पोवार (काळभोर), बबन फाळके (पाडळी), नामदेव देवकर (मोही), अर्जून जाधव (नरहरवाडी), गनर कृष्णा (चिवटेवाडी), गनर शिवाजी नलवडे (नुनेवाडी), दत्तात्रय कदम व रघुनाथ यादव पुसेसावळी, नागू तानूगडे (कोडोली), मारुती श्रीपती कांबळे (वाई), खाशाबा पवार (वडोली) निळेश्वर, कृष्णा पवार तांबवे, वसंतराव चव्हाण (फलटण), हणमंत कांबळे (इंदोली), आप्पा कवळे (मरळी), रघुनाथ यादव (रहिमतपूर), शंकर भोसले (ओगलेवाडी), नामदेव चव्हाण (वेलवडे), श्रीधर सोनवणे (हडदेवाल), मारुती कदम (वर्धनगड,) चंदर पांढरे (वेळे), या जवानांचा समावेश असून लान्स नाईक लक्ष्मण नाईक (करंजे), एस्. पी. आर. शंकर पवार (कुर्ले), नाईक हरी जाधव (भिवंडी), नाईक शंकर निकम (अपशिंगे) असे अधिकारी असून विमान दलातील सेकंड लेफ्टनंट प्रकाश कोटणीस कऱ्हाड व राजगुरु अतीत, कॅप्टन वसंतकुमार लक्ष्मण चव्हाण (दहिवडी) हेही होते. सातारा जिल्ह्याच्या या राष्ट्रसेवक हुतात्म्यांना कृतज्ञ अभिवादन. महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. चेरियन या सर्व हुतात्म्यांच्या कुटुंबियांचा समक्ष समाचार घेऊन गेले आणि महाराष्ट्र राज्यानेही त्यांचा अर्थपूर्ण समाचार घेतला. गंभीरपणे जखमी झालेले कोडोलीचे जोतीराम जाधव आणि बोरखळचा सुभेदार गंगाराम लक्ष्मण रसाळ पाटील यांचाही समाचार नेत्यानी घेतला आहे.

सैन्य भरतीच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये सातारा जिल्हा पूर्वी अग्रेसर होता तो आजही आघाडीवर आहे. घरटी एक जवान नव्हे एकाएका घरातून दोनदोन तीनतीन सैनिक असलेली सातारा जिल्ह्यात काही गावे आहेत. कराड तालुक्यातील तळबीड, कोरेगांव तालुक्यातील कोरेगांव, ल्हासुर्णे, मंगळापूर; पाटण तालुक्यातील, वाजेगाव, त्याचप्रमाणे सातारा तालुक्यातील कोडोली, चिंचणेर, अपशिंगे व खिडवाडी, ही गावे "जिथे जन्मती वीर बहादूर" म्हणून ख्यातकीर्त आहेत. आणि म्हणूनच पाकिस्तानी आक्रमणानंतर सैनिक भरतीचा सातारा जिल्ह्याला ठरवून दिलेला इष्टांक या जिल्ह्याने अवघ्या पंधरा दिवसात पूर्ण करून दाखविला आहे.

"पोटासाठी व इंग्रजाकरिता आम्ही लढलो. पण आता तुम्हाला स्वातंत्र्यासाठी व स्वत:करिता जगायचं नि मरायचं आहे." अशी शिकवण निवृत्त

वृद्ध सैनिकांकडून नव्या जवान पोरांना मिळत राहते आणि साहजिकच स्वातंत्र्य देवतेला हव्या असणाऱ्या ताज्या कमलपुष्पांचा पुरवठा साताराच्या जवानातून होऊ शकतो!

झालेल्या आणि घडणाऱ्याचा विचार करता भारत-पाक युद्ध म्हणजे दोन परस्पर विरोधी राजकीय जीवन-मूल्यांचा वाद आहे. एकाबाजूला धार्मिक पायावर उभारलेली इस्लामी हुकुमशाही व दुसऱ्या बाजूला सर्व–धर्म–समान लोकशाही आणि तीही प्रजासत्ताक लोकशाही, असा हा वाद पाकिस्तानने भारतावर आक्रमण करून निर्माण केला. रणांगणावर दिलेल्या वज्र-मुष्टीने पाकिस्तानला जसा धडा मिळाला आहे, तसाच भारताच्या अंतर्गत वावरणाऱ्या गुलामगिरीच्या आणि देशद्रोहाच्या अवशेषानाही मिळणे जरूर आहे. तरच अनार्याना आर्य करून घेत घेत शंभर वर्षे जगावे, संतती वीर्यवान निपजावी, ऐश्वर्य मिळवावे, बुद्धि सतेज रहावी, प्रतिभा जागृत ठरावी, शत्रूचा नाश व्हावा आणि फुके मरण्यासाठी नव्हे तर उत्तम जीवन जगून अमर कीर्त व्हावे, अशा वैयक्तिक आकांक्षा बरोबर सर्वांनी एकचित्त होऊन भारतीय संघशक्ति तेजस्वी व्हावी ही भारतीय संस्कृतीची ऐतिहासिक शिकवण व्यवहार शुद्ध व तेजस्वी राखता येईल. पराक्रम आणि प्रज्ञावन्त ज्ञानसंपादन वा ज्ञानदान करताना मरण येण्यातच जीवनाची सार्थकता भारतीय परंपरा मानते. तो जीवनिकेचा व्यवहार सातत्याने चालावा, कारण " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । विकृतिर्जीवितमुच्यते ।। "

सातारा जवानांच्या पराक्रमाला मोठी परंपरा आहे. १९४८ लंडन येथील ऑलिम्पिक सामन्यात खाशाबा जाधव याने कुस्तीत ६ वा क्रमांक मिळविला ही महत्त्वाची गोष्ट मानली जाते. १९५२ साली हेलेंसिंकी (फिनलँड) येथे त्यानेच कुस्तीचे रौप्य पदक मिळविले व भारतीय कुस्तीचे वैशिष्ट्य जगाच्या डोळयात भरविले. पॅरिसमध्ये तीन तासात २७ मैल पळण्याचा पराक्रम करून आलेल्या औंधच्या महादेवराव हिंग्यांच्यानंतर हा क्रीडा पराक्रम साताराचे वाटचास आला. खाशाबानंतर श्रीरंग जाधव प्रभृत्ती नांवारूपास येऊन त्यांनी सातारा जिल्ह्याचे नांव केले. हे सर्व व्हावयास सातारा जिल्ह्याने हेतुपुरःसर प्रयत्न केले आहेत. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धात (१९१४-१९ व १९३९–४५) झालेल्या पराक्रमांच्याही पाठिमागे या जिल्ह्यातील तरुणाना असलेले क्रीडा नैपुण्याचे व तालीमबाजीचे वळण आहे आणि ते ऐतिहासिक काळापासून तरी निश्चित आहे. टिपरीसारखे सांधिक खेळ भगवान श्रीकृष्णापासूनचे काळापासून चालत आले आणि त्यातूनच आमच्या स्त्री-पुरुषांच्या सणवारांच्या जत्रायात्रातील नी पालखी रथ मिरवणुकीतील वाद्य संगीताच्या ठेक्यावरील शिस्तबद्ध खेळांचा आणि सामने जिंकण्याचा

परिपोष झाला तो भारताच्या इतर प्रदेशाप्रमाणेच झाला असे मानले तरी मोंगल शाही आणिसुलतानशा ही यांच्या कचाटयात सापडलेल्या महाराष्ट्राला स्वराज्याचा आनंद सोहळा प्राप्त करून देण्याकरिता शिव-समर्थांनी आखाडे, मैदानी आणि दसरा-रंग-पंचमीचे खेळ करवून व वज्रांग बलभीमाची उपासना लावून जी तरुणवर्गाची तयारी केली होती, तीमधूनच "विटा, भाला, बाना, बनेटी, दांडपट्टा ढाल, तरवार, जंबिया," यांच्या बरोबरीच्या शस्त्रक्रीडेची तरबेजी निर्माण झाली होती. बाजी प्रभू या वीररत्नाने "वीटा" च्या जोरावरच पावनखिंड यशस्वीपणे लढविली होती. अगदी अलीकडे कोल्हापूरच्या शिवाजी क्लबच्या हणमंतराव कुलकर्ण्यांची "विटा" शस्त्रक्रीडा पाहूनच रेसिडेंट फेरिस गुदमरून खवळला होता, मराठेशाहीत प्रसिद्धीस आलेले सर्व सेनापती, लढवय्ये सैनिक तशा खेळांच्या नैपुण्यावरच सातारा जिल्ह्याने पुरविले होते. त्यामुळेच एकोणिसाव्या शतकात सुद्धा तालीम आखाडयांच्या संघटनाना इंग्रज भीत असे. एकोणीसाव्या शतकाअखेरीस सातारचे छत्रपती आबासाहेब महाराज स्वतः मोठे बलशाली असून पदरी पहेलवान सांभाळून शिव-समर्थांची परंपरा चालवीत. राजाश्रयावांचूनही खाजगत वस्तादांच्या तालमी असत. छत्रपतींचे आश्रित लोणारी, बाळावाघ, बाळाभाई बागवान, तुकाराम भोसले हे जसे नामांकित खेळाडू होते, तसेच खासगत तालमीचे खेळाडू मारुतराव चौकवाले, विठ्ठल कोमटी, उंबर पहेलवान, केसर पैलवान, वजीरभाई महंमदभाई हे सातारकर गाजलेले होते. त्यांच्या समकालीन औंध संस्थानचे तात्यासाहेब, फलटणचे युवराज उत्तम कुस्तीगीर असत. वाईचे पुजारी, कृष्णा परकंदीकर, शंकरराव घाडगे, कऱ्हाडचे गंगाराम तेली व हसन मुंजावर, कोरेगावचे गणपतराव बर्गे, रहिमतपूरचे श्रीपती माने वगैरे नामवंत कुस्तीगीर सातारा जिल्ह्याचे नाव करीत होते. "दामोदर गुरूंच्या" शिष्य सांप्रदायापैकी विठोबा आण्णा दप्तरदार, बाळाभाऊ सबनीस, आचार्य गजेंद्रगडकर व सरदार पिंगळे यांच्या तालमी स्वतंत्र होत्या. त्यांचे पहेलवान, सातारा हायस्कूलचे तालीममास्तर गणपतराव भावे, व त्यांचे शिष्य गणपतराव साठे (गजानन व्यायाम शाळेचे उस्ताद) यांच्या शिष्य परंपरा, सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे भिडे गुरुजींस शिष्यप्रशिष्य यानी लष्करी शिक्षणास लागणारी चपळाई, प्रसंगावधान, नेतृत्व कौशल्य, व्यूह रचना, कोंडीफोड, याचे सराव आपआपल्या विद्यार्थ्याकडून करून घेतले होते. अशाच तऱ्हेची तयारी मिरजेची अंबाबाई तालीम, सांगलीचे समर्थ व्यायाम मंदीर, तासगाव येथील आबासाहेब जोगांची व्यायाम शाळा व मसूरचा ब्रह्मचर्याश्रम करून घेत असत. औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी, मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन, आणि कोल्हापूरचे शाहूमहाराज यांच्या तालमीतील पहिलवान शत्रूला चीत करणारेच निपजले आहेत.

कैसरी कंदनानंतर १९२१ साली त्या सर्व कुशलतेस शास्त्रीय स्वरूप देण्याच्या दृष्टीने साताराजिल्हा सामनामंडळ स्थापन होऊन श्री. बाळासाहेब औंधकर यांच्या नेतृत्वाने साताऱ्यात सामने भरवले. त्यामुळे १९१५ ते १९२५ या काळात जिल्ह्यात अनेकानेक व्यायाम संस्था निर्माण होऊन नवचैतन्य संचरले. १९२३ व १९२६ त नियमबद्ध क्रीडा सूत्रावली सामना मंडळाने केली. सांगलीचे दातार, साताराचे शंभुराव सप्रे, हणुमंता दुधा कैकाडी, कुडाळ खोऱ्यातील दुकाने हे वारे वेगाचे पलायन पटू मग लोक निदर्शनास आले. साताराच्या राष्ट्रीय शाळेचे व्यायामपटू व तासगांवचे थोरबोले चिकाटीचे लाठीबहाद्दूर १९३३ अखेर सातारा जिल्ह्याचे नांव गाजवीत होते. साताराच्या शारीरिक शिक्षण परिषदेनंतर लगेच १९३९ साली हिटलरी होरपळ सुरू झाली. कैसरी कंदनाप्रमाणेच हिटलरी होरपळीतही जर्मनांचा समाचार मराठी रणधुरंधरानी घेतला. त्यात सातारा जिल्ह्याचे वीर होतेच. स्वराज्य प्राप्तीनंतर एन. सी. सी.; ए. सी. सी., गृहरक्षक, बालवीर असे अनेकानेक प्रकार तरुणांची मने आणि मनगटे मेंदूसह बळकट करण्याकरिता लोकराज्यानीच सुरू केले. १९५३ साली सातारा जिल्ह्याने स्त्रियासही शिस्तबद्ध शारीरिक शिक्षण द्यावयास सुरवात केली. भिडे गुरुजींचे पाठिमागे त्यांचे शिष्यवर दत्तोपंत परांजपे प्रभृतींनी भिडे गुरुजी व्यायाम शाळा काढून वीरांगना आणि रणधीर निर्माण करण्याची आकांक्षा धरली आहे. गणपतरावजी साठे यांचे क्रांतिस्मृती विद्यालयही त्याच प्रेरणेने चालले आहे. हेलिसिंकी, सिलोन, इराणमध्ये सातारा जिल्ह्याचे खेळाडू क्रीडा कौशल्य गाजवून आले आहेत. अशा तालमीतून तयार झालेल्या मंडळींच्या हातूनच कैसरीकंदनाप्रमाणे आणि हिटलरी होरपळीप्रमाणे पाक-भारताच्या द्वंद्वात तेजस्वी कुर्बानी झाली आहे, आणि निश्चयी व पोलादी पराक्रम उभा राहिला आहे. साताराचे सैनिकी विद्यालय १९६१ जूनमध्ये सुरू झाले तेव्हा २३१ छात्र त्यात होते. ते १९६५ साली २९१ झाले आहेत. अशा तऱ्हेने उत्तम नागरिक तो उत्तम सैनिक, उत्तम सैनिक तो उत्तम नागरिक तयार राखण्याची सातारा जिल्ह्याची शिव-समर्थ परंपरा संततधारेने चालेल आणि भारतीय जीवन तेजोमय राहील.

भारतीय मुत्सद्यांच्या ध्यानी, मनी, स्वप्नी नव्हते की, बंधुभावाने निर्माण केलेले पाकिस्तान त्याच दिवशी "नौखाली" करून देशात स्वकीयांच्या रक्ताच्या नद्या वाहवील ! तसेच इंग्लंड.अमेरिकेच्या हे ध्यानी, मनी, स्वप्नी नव्हते की आपण निर्माण करून पोसलेले बाळ चीनशी दोस्ती करून आपल्या नाकात सुई खुपशील. राजकारणाचा हा अपघात ! पाकिस्तानला दिलेले रणसाहित्य परत मागता येईना, की अमेरिकन तज्ज्ञानी उभारलेले शास्त्रीय स्थापत्य स्वत: नष्ट करून अमेरिकेला मोकळे होता येईना ! तेव्हा पाकिस्तानच्या युद्ध खोरांचा

डाव भारतीय जवानांनी उलटविताच अमेरिकन शस्त्रास्त्रांचा संभार उध्वस्त झालेला व शास्त्रीय स्थापत्य धुळीला मिळालेले पाहून व तेही गोऱ्या माणसांच्या रक्ताचा एक थेंब न सांडता झालेले पाहून "युनोने" शस्त्रसंधी करण्यास पाक-भारताना आवाहन केले ! ! आणि तरीही पाकिस्तानच्या हल्याना दम नाहीच !!! तथापि, पाक – भारत धुमश्चक्रीत १९६५ च्या सप्टेंबर मध्ये हे स्पष्ट झाले आहे की— (१) पाकिस्तानी हस्तक काश्मीरमध्ये घुसले तेव्हा त्यांना कोणताही प्रतिसाद तेथील बहुसंख्य मुसलमान जनते-कडूनही मिळाला नाही. (२) शेकडा ९० टक्के मुसलमान असणाऱ्या काश्मीरच्या भागात हिंदू व शीख यांचे जीवन सुरक्षितच राहिले. (३) पाकिस्तानी आक्रमणामुळे भारतात कोठेही जातीय दंगली झाल्या नाहीत. त्या अजूनही चुकून झाल्याच तर त्या परिस्थितीवर भारत मात करू शकेल असा आत्मविश्वासहि निर्माण झाला आहे. (४) भारताशी एकनिष्ठ असणाऱ्या मुसलमानाला भारतात संपूर्ण सुरक्षितता आहे, ही गोष्ट सिद्ध झाली, एवढेच नव्हे तर भारताशी एकनिष्ठ असणेच राष्ट्रवादी दृष्टी कोनातून व व्यावहारिक भूमीकेवरून इष्ट आहे, याची जाणीव बहुसंख्य मुसलमानांना झाली. चुकीच्या मार्गाने अगर धर्मसंबंध म्हणून जे पाकिस्तान धार्जिणेपणा करतील त्यांची गय केली जाणार नाही. हा निर्धार आणि ही शक्ती प्रत्ययाला आली आहे. या तिहेरी जाणिवेमधून मुसलमानाविषयीचे भारताचे धोरण माथेफिरूपणाचे किंवा दुर्बल आर्जवीपणाचे न राहता व्यवहारी समंजसपणाचे होईल व राष्ट्रीय एकात्मता दृढतर होत जाईल. (५) अन्नधान्याच्या टंचाईसारख्या बिकट समस्या सुटल्या नाहीत तरी राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगी जनता आपल्या राष्ट्राला त्या समस्यांचा पेच घालीत नाही आणि सर्व अंतर्गत प्रश्न सर्वथैव बाजूला सारून राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास जनता घेते. (६) भारताची सेना आक्रमणास समर्थपणे प्रतिकार करूं शकते आणि साधनांचा तुटपुंजेपणा प्राणपणाने शौर्य गाजवून भरून काढते. राष्ट्राचा स्वाभिमान व वीरवृत्ती उल्हासित करणारा हा अनुभव आहे. आणि (७) परकीय राष्ट्रावर कोणत्याही रीतीने विसंबून न राहता, ज्याचे नशीब त्याच्या मनगटावर हेच ऐतिहासिक तेजस्वितेचे सत्यच त्रिकालाबाधित आहे.

३५० जवानांचा साताऱ्यात सत्कार

तारीख २८ नोव्हेंबर १९६५ रोजी सातारा जिल्ह्यातील रजेवर आलेल्या ३५० जवानांचा सत्कार साताऱ्च्या नव्या राजवाड्यातील दरबार हॉलमध्ये झाला.

संरक्षण समितीच्या अध्यक्ष श्रीमंत छत्रपती सुमित्रा राजे भोसले राणी-साहेब यांनी सर्व जवानांना पुष्पगुच्छ देऊन आशीर्वाद दिला. सातारा जिल्ह्याकडून ५०० तरुणांची अपेक्षा असताना पाकिस्तानच्या आक्रमणानंतर साताऱ्याने ३० हजार तरुण पुरविले. आज सैन्यात सातारा जिल्ह्यातील १५ हजार लोक प्रत्यक्षपणे भाग घेत आहेत. सातारा जिल्ह्याचा संरक्षण निधी १९६२ मध्ये रुपये १३,८६,०४४·८६ व सोने १८२२ ग्रॅम, ९४१ मि. ग्रॅम. आणि १९६५ मध्ये राष्ट्रीय संरक्षण निधी, जवान कल्याण निधी व काश्मीर मदत फंड मिळून रुपये ३,५२,४८६·२४ इतका जमला.

भाग २ रा

१ : राजकारणी वृत्तपत्रे

ब्रिटिश रियासतीबरोबर पाश्चात्य संस्कृती, त्या संस्कृतीबरोबर तिची उपकरणे आणि उपकरणाबरोबर ती वापरावयाची विद्या हिंदुस्थानात मूळ धरून बसली. वृत्तपत्रांचा संसार हा एक त्यातील भाग असून लोकशिक्षण, लोकमत प्रदर्शन आणि सार्वजनिक जीवनाची दैनंदिनी या दृष्टीने वृत्तपत्रे म्हणजे आज-काल एक शस्त्रशक्ति किंवा सत्तादंड होऊन बसली आहेत. सातारा जिल्ह्याला वृत्तपत्रानी काय राष्ट्रीय वळण लावले ते पाहिले म्हणजे जिल्ह्यातील लोक-शक्तीची चिकित्सा ज्याची त्यास करता येईल. महाराष्ट्राच्या राजकीय जागृतीच्या इतिहासात पुणे, मुंबई प्रमाणेच सातारा जिल्ह्यानेही भाग घेतला आहे. (रा. गो. कानडेकृत मराठी नियतकालिकांचा इतिहास पृ. ४२ पहा.)

सातारचे राज्य खालसा झाल्यावर आणि १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध पार शमत आल्यावर ता. १० डिसेंबर १८५८ रोजी सातारा जिल्ह्याचे पहिले वृत्त-पत्र निघाले त्याचे नांव शुभसूचक. नांवाभोवती बाण लावलेले धनुष्य काढून संपादक रामचंद्रपंत चितळ्यांनी शुभसूचक काय व कसे कार्य करू इच्छितो हे दाखविले. कदाचित 'रामराज्याला' तशी तयारी हवीही असेल. त्याच्या पूर्वीही "बोधामृत" नांवाचे एक पत्र होते म्हणतात. काही असले तरी १८९५ पर्यंत तरी शुभसूचक हे सातारा जिल्ह्याचे निर्विवाद प्रातिनिधिक पत्र राहिले यात शंकाच नाही. पुढे तेच काम इसलामपूर व सातारा या दोनही ठिकाणी प्रसिद्ध होणाऱ्या कशाळकर--मुंडल्यांच्या 'प्रतोद'ने व फणसळकरांच्या 'प्रेक्षक'ने केले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचविशीत पांडोबा भोसल्यांचे 'महाराष्ट्र--वृत्त' निघे ते ज्योतिराव फुल्यांच्या पठडीतील असे. १८९७ चे प्लेग नंतर मारुतराव गुजर यांनी "मित्रोदय" काढला होता; पण त्यांच्या मृत्युबरोबरच तो संपला. भाऊराव कारेकर यांचा "छत्रपती" हि छत्रपतींचे अभावी बंद पडला. राजारामपंत सोहनी तासगांव येथे 'भागवत' हे पत्र १८९७ पासून चालवीत. ते चार वर्षातच बंद पडले. १९०६ च्या अखेरीपासून भाऊसाहेब सोमणांच्या 'प्रकाश'ने ती धुरा १९२४ पर्यंत खांद्यावर घेतली. यापुढे भिडे-गोडशांचा 'प्रकाश' व वाग्भट देशपांड्यांचे 'ऐक्य' यांनी १९३० पर्यंत तर ऐक्य आणि समर्थ, भारतमाता व श्रीशाहू या चतुष्टयाने १९३५ पर्यंतचा सातारा जिल्हा

प्रतिबिंबित झाला होता. १८५८ च्या शुभसूचक पासून १९६५ त निघालेल्या 'रोमांच,' 'शिवसंदेश' (फलटण) पर्यंत अनेक वर्तमानपत्रे सातारा जिल्ह्यात निघाली. साताऱ्यास १८७२ च्या जुलईत 'बोधसुधाकर,' १८८१ त 'महाराष्ट्रमित्र,' १८९९ मध्ये 'श्रीशाहू,' १८९९ च्या २४ आक्टोबरला 'प्रेक्षक,' १९०६ त 'प्रकाश,' १९०८ त 'प्रतोद' (सातारा), १९२३ त 'ऐक्य', १९२६ मध्ये 'समर्थ', आणि १९३४ त 'हंस'. त्यानंतर 'ग्रामोद्धार' १९३५, 'लोकक्रांती' १९३८, 'जनक्रांती' १९४६ व 'जनसेवा' १९५२; 'ध्रुव' १९५७, वाईला १८८५ त 'वृत्तसार' व १८९० चे ७ ऑगस्ट रोजी भाऊशास्त्री लेले यांचे 'मोदवृत्त'; कऱ्हाड येथे १८८४ त 'विदुषक', १८८७ त 'चित्रगुप्त,' १८९६ त 'सुमंत' व १९२४ साली कळंबे यांचे 'कैवारी' व १९२८ मध्ये 'अभ्युदय'; विटे येथे १८९४ त 'विटावृत्त;' तासगाव येथे १८८१ मध्ये विनायकराव कौलगीकरांचा 'चंडांशु' व सदाशिवशास्त्री भिडयांचा 'आर्यभानु'; इसलामपूर येथे १८८३ ला 'प्रतोद', १९१० 'भारतमाता', १९२७ 'सातारा', शहापूर (सांगली) येथे १८९० 'विजय', अशी कितीतरी वृत्तपत्रे राजकीय गोष्टींचा खल करणारी उत्पन्न झाली. शिवाय कऱ्हाडास 'पंचानन' व १८९० पासून सुमारे दोन तपे 'वृत्तसुधा' व 'महाराष्ट्रवृत्त' ही दोन पत्रे साताऱ्यास चालू होती. १९२० साला नंतर तासगाव येथे काही दिवस 'सत्य प्रकाश' आणि सातारा येथे काही दिवस 'सातारा–विजय,' आणि इसलामपुरास 'भारत–विजय', अशीही पत्रे निघत असत. याच सुमारास केशव सीताराम ठाकरे यांचे 'प्रबोधन' सातारारोड येथे निघे. कॉंग्रेसच्या राजकीय धोरणाविरुद्ध सामान्यतः कोणत्याच पत्राने आपली दिशा आखली नाही. मग चितळयांच्या शुभसूचक सारखे एखादे कॉंग्रेसला सत्तावीस वर्षांनी वडील, वैद्यांच्या 'वृत्तसारा' सारखे बरोबरीचे अगर वाग्भट देशपांडयांच्या 'ऐक्या' सारखे अगदी लहान, कसलेही पत्र असो, परत भेटीची पत्रे वाचावयास धडपडणारांची वाचन मंदीरेच या वृत्तपत्रांच्या कचेऱ्या असत. त्यातून हौशी लेखकांना संधी मिळून संपादकांचेही पुष्कळ काम वाचत असे. अगोदर १९०६ च्या राष्ट्रीय सभेपासून, आणि विशेषतः सुरतेच्या राष्ट्रीय सभेतील बखेडयानंतर, मतमतांतरांच्या हातोडीने राष्ट्रीय सभेच्या राजकीय धोरणाला धक्का बसला, तसा तो साताऱ्यात बसावयाचा ! पण एका टोकाला जाणे, तरवारीच्या धारेवर नाचणे, ज्वलजहालपणा करणे, हे बियाणे सातारच्या थंड स्वभावभूमीत रुजत नसल्या कारणाने वृत्तपत्रांच्या संसारातूनही ते आढळले नाही, तर नवल नाही. लोकांच्या लायकीप्रमाणे त्यांची राज्यपद्धती असते अशी एक म्हण आहे. पण लोक तसा प्रत्येक गोष्टीचा झोक असतो, आणि दुरतिक्रम स्वभाव वृत्त-

पत्रावर तरी कसा बहिष्कार टाकील ? अर्थात फटकविला तर चमक देणारा, पण वरून अगदी थंड अशा चकमकीच्या धोंड्यासारखा सातारा जिल्ह्याचा स्वभाव सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या बेसुरानंतरही वृत्तपत्रातून एकसारखा ओघ राखून राहिला. वासुदेवरावजी मुंडल्यांच्या प्रतोदने 'यद्यदाचरति श्रेष्ठ-स्तत्तदेवेतरो जनः' या न्यायाने जनता जहाल होण्याकरिता पुढाऱ्यानी व लोक-मताला वळण लावणाऱ्या पत्रानी प्रथम जहाल अगदी लवंग्या मिरचीसारखे झाले पाहिजे म्हणून जंग जंग पछाडले; पण उपयोग झाला नाही. दैववशात १९०६ पासून १९२४ पर्यंत सातारा जिल्ह्याचे लोकमत निदर्शक व लोकमत प्रवर्तक होऊन राहण्याचे ज्यांच्या वाटचास आले त्या सोमणांच्या 'प्रकाश' पत्राने १९०६ साली स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, आणि राष्ट्रीय शिक्षण यांनी चेतविलेला अग्नि विझू दिला नाही, तर वेळेला थोडा फार फुलविलाच; भाऊसाहेब सोमणांचे सातारा हायस्कूल मधील स्नेही औंधचे श्रीमंत नाना-साहेब पंतप्रतिनिधी यांचे कारकीर्दीत औंधचे सरकारनियुक्त कारभारी जेकब बापुजी इस्त्राईल यांचा पिऱ्या मांगाकडून खून करविण्याचा कट केल्याचे विनाकारण आरोपावरून त्यांना गादीला मुकावे लागले त्या बाबत सी. ए. किंकेड व लोगन यांच्या चौकशी कमिशनचे काम सातारा रेसिडेन्सीतील दरबार हॉलमध्ये व पुढे महाबळेश्वरी चालू असता फिर्यादी तर्फे रा. ब. काळे व जहागीरदारातर्फे बॅ. ब्रॅन्सन, दाजी अबाजी खरे व दादासाहेब करंदीकर काम चालवीत असता प्रकाशने दैनिक आवृत्या काढून बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे "नानासाहेबांचे" राघोभरारी काका आहेत हे दाखविले, पण प्रतोदच्या अपेक्षेप्रमाणे चेतविला नाही, हे तितकेच खरे आहे. अगदी तोच नमुना पुढे ऐक्य, हंस, ध्रुव व रोमांचच्या बाबतीत आढळून येतो. १९२१ सालच्या असहकारातील बहिष्कारसत्राचा मार्ग हा एकांगी आणि आत्मघातकी असा वाटल्यामुळे विशेषतः कौन्सिल – बहिष्कार अगर अडवणुकीच्या धोरणाचा कौन्सिल प्रवेश अमान्य असल्यामुळे जनतेला प्रागतिक तत्त्वज्ञान शिकवण्या-करता अवतरलेल्या ऐक्याने १९३० -- ३४ ची कायदेभंगाची चळवळ नापसंत असूनही, त्यायोगे दिसणाऱ्या तरुणातील लढावूवृत्तीचा तेजोभंग तर केला नाहीच, पण उलट सरकारी दडपशाहीलाच चपराका दिल्या. दुसऱ्या गोलमेज परिषदेपासून मुसलमानांना विशेष सवलतीने वागविण्याचे जे धोरण राष्ट्रीय सभेने स्वीकारले त्याबद्दल ढवळे यांचा 'श्रीशाहू' आणि हरि-जनांच्या मंदीरप्रवेशादि बाबीबद्दल वेलणकरांचा 'हंस' गांधीना व गांधीछाप असलेल्या कॉंग्रेसला धुडकावून लावीत असले, तरी, स्वातंत्र्योन्मुख राजकीय चळवळीला त्यांनी हातभार आणि आशीर्वादच दिले आहेत. विष्णुपंत आठले यांची भारतमाता, बाबूराव वैद्यांचा समर्थ आणि कोल्हापुऱ्यांचा

अभ्युदय ही वृत्तपत्रे तर यथाशक्ति नेहमीच राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाच्या यशासाठी प्रयत्न करीत.

पारतंत्र्याबद्दल तिटकारा हाच कालखंडाना आणि पक्षोपपक्षाना गोवणारा धागा वरील विवेचनावरून आढळेल. राष्ट्रीय सभेच्या जन्मापूर्वीपासून वृत्तपत्रांची ही वृत्ती आपल्याला पहावयास सापडेल. तारीख २३ सप्टेंबर १८७० चा शुभसूचक "इंग्रज लोक आमच्या देशाविषयी योग्य ती काळजी बाळगतात काय?" असा अग्रलेख लिहितो. १८७१ जानेवारी २७ ला "कायद्यांना पूर व लोकांचा चूर" असाही लेख आला आहे. "इंग्रज लोकांस आमच्या लोकांचे पाऊल पुढे पडलेले पाहवत नाही, किंवा ते केवळ आम्हास पाण्यात पाहतात हे आमच्या वाचकांचे लक्षात येईल" (इंग्रजी न्यायाचा मासला-शुभसूचक १० नवंबर १८७१) असे स्पष्ट अभिप्राय त्या वेळी प्रगट झाले आहेत. ही शुभसूचकची परंपरा पुढे महाराष्ट्रमित्राने व विशेषतः बोधसुधाकराने चढत्या सुराला लावली व १९३५ पर्यंत ती कायद्याच्या कमी अधिक कचाटयाप्रमाणे अखंड चालू होती.

पारतंत्र्याविरुद्ध चाल करण्यात बंडखोरी नाही पण अंगचोरीही नाही, अशी शिकवण शुभसूचक देई. "प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या आगमनानंतर त्यास संतोष होऊन आपणास फारसे गोत्यात यावे लागणार नाही, अशी योजना करावी" (२।४।७५) या प्रकारची राजनिष्ठा शिकविणारा शुभसूचक लॉर्ड नार्थब्रुकच्या कारकीर्दीत नेटिव्ह वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य नाहीसे झाले तसे (१७।३।७६) लिहितो. "असे केल्याने इंग्रज अधिकाऱ्यांच्या जुलमी व अन्याय्य वर्तनाने लोकात जो असंतोष उत्पन्न होईल, त्याचा वर्तमानपत्रात परिस्फोट न होता तो आतल्या आत धुमसत राहील. पण लोकांचा असंतोष आतल्या आत धुमसत राहणे हे भयंकर आहे."

तात्पर्य तडजोडीच्या राजकारणाची ही परंपरा "मँचेस्टरचे व्यापारी आमचे राजे आहेत काय?" (१३।८।७७) असा सवाल टाकून "डाग लावते पण आग लावीत नाही." इतक्याच तीव्रतेने म्हणजेच कायद्याने दिलेल्या शेवटच्या सवलतीच्या परिसीमेत नांदण्याची शिकवण शुभसूचकने प्रथम जिल्ह्याला दिली, आणि ती जिल्ह्यातील वृत्तपत्रांनी अखंड पाळली.

कायद्याच्या परिसीमेवर "तारेवरील नाच" करावयाचा म्हणजे पाय घसरणीचे व आपटी खावयाचे प्रसंग यावयाचेच. त्याचेच थोडेसे पर्यालोचन करू. शुभसूचकवर असा प्रसंग "धारा! धारा!! धारा!!!" या शेतकऱ्यांच्या कळकळीने ता. १४ जानेवारी १८८१ रोजी लिहिलेल्या लेखामुळे आला. त्या लेखाबद्दल कलेक्टर साहेबांची नोटीस येऊन धडकली.

१८८२ मध्ये बर्वे प्रकरणात केसरी, मराठाकर्त्यांची बाजू महाराष्ट्र

मित्राने उचलून धरल्यामुळे अब्रु नुकसानीच्या दाव्याचे कचाटयात महाराष्ट्र मित्र सापडला होता. " पद न म्हटल्यास आगण राजद्रोहाच्या आरोपात येऊन अखेरीस जड जाईल " अशी धमकी देऊन महाराणीचे स्तुतिस्तोत्र जमलेल्या मुलींकडून गावविले आणि एकदाचा तो समारंभ पूर्ण केला. पण तेव्हापासून मि. लिवॉर्नर साहेबांचे डोके फिरून गेले. आणि त्यांनी फुणगी पेटविण्यास आरंभ केला. ते म्हणतात " **पुणेकर ब्राह्मण माजोरी, राजद्वेष्टे आहेत हे सिद्ध करण्यास वरील कारण पुरे** " असे सिद्धतेत घेऊन जमलेल्या मंडळींच्या मागे असे खुसपट लावले की महाराणीचे स्तुतिस्तोत्र गावविण्याची तुम्ही बळे हेळसांड केली. आम्ही सुद्धा अशा स्त्री–शिक्षणाच्या विरुद्ध मुळापासून आहो, म्हणून त्यातील मंडळींचे पाय मोडून त्यास पांगळे करण्याचा आमचा हेतू मुळी नाही. मि. लिवॉर्नर यांनी रचलेले कुभांड अगदी खोटया मताचे आणि निर्दय स्वभावाचे आहे. (महाराष्ट्र मित्र सातारा वर्ष १८ अंक ६, ता. २२ आक्टोबर १८८५)

१८८८ मध्ये चित्रगप्तकर्त्यास सहा महिने सक्त मजुरी व ५०० रु. दण्ड अशी शिक्षा डि. डे. क. मॅजि. स्कॉट यांना ७ जन रोजी ठोठावली. ते कऱ्हाडच्या सबरजिस्टर साहेबांनी लाचलुचपती घेणेचा सपाटा चालविल्याबद्दल चित्रगुप्ताने हल्ला केला होता. शिक्षेवर अपील करण्यात आले, तेव्हा सेशन कोर्टातून निर्दोषी होऊन ता. ३० जून रोजी चित्रगुप्तकर्ते सुटले.

वाईच्या मोदवृत्तातील लेखांकाबद्दल ता. २९ आक्टोबर १८९१ रोजी ताकीद झालीच. पण १८९७ चा मोदवृत्तावरील खटला साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून बसला. काशिनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले हे मोदवृत्ताचे संपादक असल्यामुळे त्यांच्या घराची व कचेरीची झडती ता. ३० ऑगस्ट रोजी झाली. ता. १३ मे व ३ आणि २४ जूनचे अंक जप्त केले. १२४ कलमाखाली म्हणजे राजद्रोहासाठी वारंट लावून भाऊशास्त्र्यास सातारा येथे रवाना केले. "बध्या तापापासून फायदा" व " राज्य पद्धतीचे धोरण " या लेखांबद्दल खटला होता. पोलिस सुपरिंटेन्डेंटनी फिर्याद दाखल केल्यावर, तशी फिर्याद करण्यास मंजुरी मिळाली होती. शास्त्रीबुवांनी तशी तक्रार केली, उपयोग झाला नाही. पुढे हायकोर्टातून पांच हजारांचा जामीन व तितकाच जात मुचलका घेऊन लेले खुले झाले. त्यांचे बॅ. रॉबर्टसन यांनी आरोपीच्या अजारीपणामुळे खटल्याची तहकुबी मागितली तीही न्यायमूर्ती रानडयांनी दिली, तथापी खटला चालवावयाचा तो ७ युरोपियन व २ नेटिव्ह यांच्या ज्युरीपुढे चाललाच. "आमचा सरकारवरचा विश्वास अगदी उडाला" व " अमर शिवाजी" असे जादा दोन लेख पुराव्यात दाखल करण्यात आले. मोदवृत्त हे राजकीय वृत्तपत्र अगर लेखातील अमुक वाक्य राजद्रोही असल्याचे सरका-

रला दाखवता आले नाही. पण भाऊशास्त्री दोषी ठरले आणि त्यांना नऊ महिन्यांची साधी कैद झाली. १८९२ साली शहापूरचे 'विजय'वर बेअब्रूची फिर्याद झाली पण माफी मागताच संपली.

मोदवृत्तकारांच्या अगोदरच अशी धाड इसलामपूरच्या प्रतोदवर आली होती. १८८७ च्या २६ एप्रिल रोजीच सदर पत्रावर सरकारचा रोष होऊन ५०० रु. च्या गोत्यात ते पत्र आले होते असे म्हणतात. पण खरा जबर तडाखा प्रतोदला १८९२ त बसला. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात साताराचे फॉरेस्ट ऑफिसर मि. फॅगन जावली तालुक्यातील पाली, जुंगटीकडे शिकारीस गेले असता, त्यांचे हातून एका जाळीचे तोंडाशी पाठीवर केस सोडून बसलेली धनगरीण मारली गेली. पण ती अस्वल असावी असे समजून फॅगन साहेबांनी मारली अशी बातमी आली. ही बातमीच प्रतोदचे फॅगन साहेबावरील सणसणीत टीकेस 'कारणीभूत' झाली. त्या टीकेबद्दल खटला होऊन २७ ऑगस्ट रोजी सहा महिने शिक्षा व ५०० रु. दंड प्रतोदचे संपादक कशाळकर यांना झाला. कृष्णाजी अबाजी गुरुजी काशी येथे गेले पांच महिने 'कालिदास' पत्र प्रसिद्ध करीत आहेत. त्यातील "काळा व गोरा" व "धर्मांचे राक्षसी ढोंग" हे लेख जाती-वैमनस्य वाढविणारे असल्यामुळे १०।१० हजारांचे जामीन सरकारने मागितले. (४५० प्रति निघतात) दादासाहेब करंदीकर वकील होते. १०००० हजार रु. जामीन मागितले. (केसरी ३०-१०-१९००)

प्रतोदवरील दुसरा व राजद्रोहाचा खटला १८९७ साली झाला. त्या सालात " स्वतंत्र होण्याची तयारी " हा लेख प्रतोदमध्ये आला. सदर लेख १२४ अ खाली येतो म्हणून पोलिस सुपरिंटेन्डेन्ट म्याक्टियर यांनी डि. मॅजिस्ट्रेट कडे फिर्याद गुदरली व मिस्टर ऑस्टन यांच्या सेशन कोर्टात खटल्याची सुनावणी झाली. हरमलकर प्रकाशक व कशाळकर संपादक या आरोपीतर्फे बॅ. कोला व दादासाहेब करंदीकर यांनी काम चालविले. ता. २० ते २७ ऑगस्ट पर्यंत काम चालून ता. ३० रोजी आरोपी हरमलकर यास ७ वर्षे सक्त मजुरी व संपादक कशाळकर यास जन्मठेप काळे पाणी झाले. या अमानुष शिक्षेबद्दल हायकोर्टात अपील करण्यात आले. तेव्हा वरील शिक्षा अनुक्रमे ३ महिने व १ वर्षावर आली.

अर्थातच प्रतोदची तांबडी चिंधी पाहून सरकार दबकून जाऊ लागले. १९०६ साली महाडास मुंबईच्या गव्हर्नराचे भाषण झाले; त्यावर प्रतोदात टीका येताच कुलाब्याच्या कलेक्टराची नोटीस येऊन धडकली म्हणून प्रतोदची वादी तुटली नाही, की फाटली नाही. पुढे १९०८ साली टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाल्यावर प्रतोदने न्या. दावरच्या निकालावर कडकडून टीका केली. २६ जुलईच्या या लेखाबद्दल १९ ऑक्टोबर रोजी दिलगिरी दाखवून प्रतोदचे

छोटे कशाळकर बिलामतीतून रिकामे झाले खरे; पण १९०९ साली फेब्रुवारी २५ रोजी प्रतोद सरकारी हातात चांगलाच गवसला. वंगभंगानंतर हिंदुस्थानात झालेली अभूतपूर्व चळवळ आणि विशेषत: त्यातील स्वराज्याची मागणी म्हणजे ' आकाशातील चांदोबा ' आहे अशी हेटाळणी करून, भरीला हिंदुस्थान व इस्लामी हिंदुस्थान अशा भारताची दोन छकले करून ज्या मोर्लेमिंटो सुधारणा इकडे अवतरू लागल्या त्यावर प्रतोदने " आजच्या देशाची सांप्रतची स्थिती " वर्णन करून सवाल टाकला की " प्रचंड मातला वडवानळ ! प्राणी होती अति विव्हळ !! उपाव म्हणून बिंदुमात्र जळ वर्षता काय निष्पत्ती? " या सवालाबरोबर १२४ अ संपादक मुंडल्यांला घेरून बसले आणि ८ एप्रिल १९०९ रोजी दीड वर्ष सक्त मजुरी व ५०० रु. दंड हा सरकारी प्रसाद मुंडल्याना मिळाला. अशासारख्या कराव्या लागणाऱ्या दिव्यामुळे प्रतोदचा अवतार संपला. त्याच्यानंतर सोमणांचा प्रकाश हा सरकारचे ' लक्ष्य ' झाला. १९१० ला प्रकाश पत्रास प्रतोद प्रमाणेच प्रेस ॲक्ट खाली सरकार मान्य संस्थातून बंदी करण्यात आली. फार काय ? वाईचे भाऊशास्त्री लेले यांनी शंकराचार्यांचे ' सौंदर्य लहरी ' स्तोत्र मुद्रकाचे नांव न छापता प्रसिद्ध केले म्हणून पांच रुपये दंड झाला. (केसरी २२–८–१९११) ऑगस्ट १९०७ मध्ये सावरकरांच्या ' म्याझिनीचे ' परीक्षण तीन लेखामधून प्रकाशमध्ये आले, त्यांचा संबंध औंध बॉम्ब केस व त्या केसमधील आरोपी चालवू पहात असलेली क्रांति संस्था यांच्याशी जोडण्याचा सी. आय. डी. इन्स्पेक्टर छबी यानी आपल्या जबानीत प्रयत्न केला; इतकेच नव्हे तर त्या खटल्याचा निकाल देणाऱ्या पर्सीव्हलनीही म्याझिनी वरील लेख गुप्त कटास उत्तेजन देणारे आहेत. तेव्हा योग्य अधिकाऱ्यांनी योग्य तरतूद करावी अशी औंध बॉम्ब केसच्या निकाल पत्रात शिफारस केली. तसे काही झाले नाही हा भाग वेगळा. तथापी होम रूल लीगची चळवळ घुमू लागताच सरकारमान्य सार्वजनिक वाचनालयातून केसरी आदि पत्राबरोबर प्रकाशलाही मज्जाव झाला.

याशिवाय १९३० ते १९३२ सालच्या दहशतशाहीच्या तडाख्याने 'प्रकाश' गारद होऊन शुभसूचक, वृत्तसार आणि अभ्युदय यांना ताकिदी मिळाल्या होत्या. आणि समर्थ पत्रास आपणहून विराम पावावे लागले होते. इतकेच नव्हे तर ३१ जुलई १९३२ रोजी जिल्हासभेचे जे अधिवेशन वाड्यापुढे पोलिस पहाऱ्यात झाले त्याचे अध्यक्ष आगाशे यांच्या भाषणाच्या प्रति आनंद छापखान्यात छापल्याच्या संशयावरून ता. १ ऑगस्ट रोजी आनंद प्रेसची तीन तास झडती झाली. पण आक्षेपार्ह काही सापडले नाही. १९३० च्या शांतिसंग्रामावेळी ऐक्यात व इतरत्र जी गीते अभंगानी प्रसिद्ध केली ती ' मेजवानी ' या पुस्तकरूपाने प्रसिद्ध होताच १९३२ साली ती प्रेस ॲक्टला बळी पडलीच.

पुढे १९४६ साली काँग्रेस मंत्री मंडळाने त्यावरील बंदी उठवली तरी त्यापूर्वीच्या १९४२–४५ सालच्या ' चलेजाव ' चे चळवळीचे वेळी समर्थ पत्राने अप्रसिद्धीच्या गुहेत संपादक वैद्य स्थानबद्धतेत गेल्यामुळे, अनुष्ठानच आरंभिले होते !!

या प्रकारे आपल्या मगदुराप्रमाणे कायद्याचे अंतीम सीमेवर तारेवरला नाच करताना सातारा जिल्ह्यातील वृत्रपत्रांना वरीलप्रमाणे सरकारी रोषास पात्र व्हावे लागले. तरीपण वृत्तपत्र संचालनाच्या शास्त्राच्या कसोटीला सर्वथैव उतरेल असे उदाहरण, जिल्ह्यात एकही नाही. १९०० पूर्वी काही वृत्तपत्रे लिथोवर व काही टाईपावर निघत व त्यापुढे विशेषत: १९०२ नंतर सर्व पत्रे टाईपावर निघू लागली. संपादक हा एक लेखक समूहाचा प्रतिनिधि असून शुभसूचकमध्ये गोळे व अनंतशास्त्री पेंढारकर, विदुषकमध्ये पांडुरंगराव देसाई वगैरे आणि प्रेक्षकमध्ये चिरमुले, द्रवीड, फणसळकर, ठाकूर, केळकर, देशपांडे, ' चिद्र फटाके दे " अशी त्या संपादक वर्गाची प्रसिद्धी आहे. आणि पुढे प्रामुख्याने नानासाहेब आगाशेही लिहीत असत. प्रथम प्रथम इहवृत्ताच्या सदरात जिल्ह्यातील सर्व बातम्या असावयाच्या आणि घरच्यापेक्षा दारच्या व बाहेरच्या गोष्टीवर आर्टिकले लिहिण्याचा प्रघात होता. ह्या वृत्तीवरून हळूहळू दारच्या व बाहेरच्या विषयावरोबरच सातारा जिल्ह्यातील पत्रे घरच्या विषयांचा उहापोह अधिक करू लागली. अच्युतराव कोल्हटकरासारख्या लेखकाचा पहिला लेख शुभसूचकने प्रसिद्ध केला व श्रीशाहूत तर त्यांचे अनेक इंग्रजी मराठी चुरचुरीत लेख आले. तसेच कै. कृष्णाजी अबाजी गुरुजी हे अखेरपर्यंत साताराच्या कोणत्या ना कोणत्या पत्रात लिहीत, इत्यादि गोष्टीना आपआपल्या परी महत्त्व आहे. पण जिल्ह्याच्या वृत्तपत्रानी जिल्ह्याच्या कारभारावर प्रगतीवर लक्ष ठेवून जागरुकतेने अधिकाऱ्यावर टीका व जनतेला मार्गदर्शन केले पाहिजे, हे काम आपआपल्या काळी बोधसुधाकर, महाराष्ट्र मित्र, वृत्तसार, आर्यभानु, विशेषत: प्रतोद, विदूषक, प्रेक्षक आणि प्रकाश यांनी केले. वर्तमानपत्रे ही लोकांचे कोतवाल होत असे विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणत, " या कोतवालानी सर्वत्र गस्त घालीत असावे " हे खरे. पण तसे भाग्य सातारा जिल्ह्याला सर्वस्वी लाभलेले नाही.

सन १८३५ ते १८६० या काळात भारतात मुद्रण स्वातंत्र्य होते. १८४० नंतर वृत्तपत्रानी लोकशाही नी राजकारणासंबंधी काही स्पष्ट लेख लिहिले. लॉर्ड कॅनिंगनी १८५७ त वृत्तपत्र नियंत्रण जारी केले. १८६० मध्ये इंडियनपीनल कोड झाले. त्या अन्वये १८८२ चा टिळक आगरकरांवरील पहिला राजकीय खटला झाला. १८७० पासून चालत आलेल्या दुष्काळांनी १८७६ आलेल्या दिल्ली दरबाराने (तो लोकांची दूरवस्था लक्षात न घेता बडेजावीने साजरा झाल्यामुळे) आणि १८७९ च्या वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाने जे लोकमत

खवळले त्यावर तोडगा म्हणून लॉर्ड लिटनने प्रेस ॲक्ट करवून दडपशाही केली. भारतीय भाषेतील वृत्तपत्रांची गळचेपी करणारा कायदा जन्मास घातला तो थोडे दिवस टिकला. लार्ड रिपनने लिटनचा 'मुद्रण कायदा' रद्द केला. १८८७ साली प्रतोद इसलामपूर, मोदवृत्त वाई, यांच्यावरील खटले झाले व जबर शिक्षा दिल्या गेल्या. १९१० पर्यंत हा प्रकार वाढत्या प्रमाणातच होत राहिला. त्यासाली मुद्रण स्वातंत्र्याचा अपहार करणारा कायदा झाला. त्या कायद्याचा धाक चांगला १९२२ पर्यंत होताच. १९२२ साली बरेच जुलमी कायदे रद्द झाले. तेव्हा तो धाक गेला. पण फिरून १९३१ साली मुद्रणावर नियंत्रण घालणारा कायदा झाला. तथापी १९२० त असहकारितेचा, १९३० साली कायदेभंगाचा, १९३२ साली सत्याग्रहाचा, १९४० चा युद्ध विरोधाचा लढा व १९४२ चलेजाव, असे सहा राजकीय संग्राम भारतात झालेले; त्यांचे नेतेपण म. गांधींकडे होते. "राजद्रोह हा माझा धंदा आहे," असे म. गांधी म्हणत. राजकीय ऊर्जितावस्थेच्या लढ्यातील सैनिक या नात्याने वृत्तपत्रे आपली कर्तव्ये करीत आली. लोकजागृतीचे कार्य वाढत्या जोमाने फैलावत जाऊन दडपशाहीला हार खावी लागली. असा वृत्तपत्रांचा विजयी इतिहास आहे.

आपल्या जिल्ह्यातील सोयी, गैरसोयी, खेडेगावातील शेतकऱ्यांच्या तक्रारी, जमिनीची माहिती व पीकपाण्याचे हालहवाल, वगैरे संबंधातील जिल्ह्याची संपूर्ण हकीकत जिल्हापत्रात यावयास पाहिजे याची जाणीव आपल्या जिल्ह्याची मुखपत्रे म्हणविणाऱ्या बहुतेक सर्व वृत्तपत्राना आलेली दिसत नाही. या बाबतीत गेल्या पंधरा वर्षात निघालेल्या काही जिल्ह्यातील साप्ताहिकांनी नवीन युगास अनुसरून नमुनेदार प्रगती केली आहे. सातारचे ऐक्य व समर्थ ही वृत्तपत्रे आपआपल्या जिल्ह्यात कामगिरी बजावीत आहेत. (मराठी वृत्तपत्राचा इतिहास लेखक कानडे पान ६७)

सरकारची इतराजी झाली तरी लोकांना राष्ट्रीयत्वापासून ढळविणाऱ्या गोष्टी कोणत्या, सरकारच्या दडपशाहीला कोठे, का आणि कसे भिऊ नये, त्याच प्रमाणे लोकांचे लोकानी स्वावलंबी कसे व्हावे हे रोजच्या प्रश्नांचा उहापोह करून सांगण्यास भाऊसाहेब सोमणांच्या प्रकाशने (१९०६ ते १९२४) कमी केले नाही. त्यामुळेच १९२३ साली प्रकाशमध्ये जर्मन लॉटरीची एक जाहिरात प्रसिद्ध झालेचे निमित्त करून सरकारने खटला केला व प्रकाशक गोडसे आणि मुद्रक बाबूराव वैद्य यांना प्रत्येकी चारशे रुपये दंड ठोठावला; पण सोमणांनी अपील चालवून दंड पुढे माफ झाला! तशीच १९१८-१९ साली "शिकविता पांडु वेगळाची" या प्राथमिक शिक्षकाने डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डावर लिहिलेल्या टीकात्मक लेखाबद्दल संपादक सोमणांना लेखकाच्या नांवाबद्दल छेडले असता, "सर्व जबाबदारी संपादकानी स्वीकारली आहे. असे सोमणानी बजावताच फिर्यादीचे

डोळे थंड झाले होते. १९२५ साली बाबूराव भिडे प्रकाशचे संपादक असता, तारळे ग्रामपंचायतीच्या अनागोंदी कारभाराबद्दल आलेल्या टीकेवरूनही एक तोहमत येणार होती; पण संपादकानी टणकपणा दाखवताच तेही वारे जिरले. सोमण प्रभृतींचे संपादकीय असे टणक असलेमुळेच १९२१ मधील शुभसूचक वरील प्रसंगात त्याला धर व धीर मिळाला. हे सर्व टक्के टोणपे सहन करताना जिल्हापत्रे कशी चालवावीत याबद्दल सोमणांनी एक दिशा आखून दिली होती. ती अशी की " नवीन बदललेल्या काळातील तरुणांचा उत्साह ज्यामुळे वृद्धिंगत होत जाईल असे भारदस्त, पण स्फूर्तीदायक लेख निरनिराळ्या लेखकाकडून मिळवून ते प्रसिद्ध करणेची विशेष कोशीस करावी. सार्वजनिक कार्य करताना कोणावरही करावी लागणारी टीका सडेतोड असली तरी केव्हाही तीत शिष्ठतेचा भंग न होईल याबद्दल खबरदारी घ्यावी. अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील वस्तुस्थितीची जितकी जास्तीत जास्त ओळख करून देता येईल तितकी करून देण्याची खटपट करावी." या धोरणास अनुसरूनच सातारा जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रे तरी चालत आली आहेत. त्यात अगदीच तरतम नाही, असे मात्र नव्हे. ऐक्य, समर्थ व ध्रुव यांचे सिंहावलोकन त्या दृष्टीने बोधप्रदच होईल.

रेशमी हातमोजानी नटविलेली पोलादी मनगटाची रगच आपल्या मायदेशाच्या सेवेला लावण्याचा बाणा राखणाऱ्या रानडे-गोखले यांच्या विवेचक, विवेकी प्रथेचे अनुयायित्व ऐक्याचा जीवनरस. महात्मा गांधींच्या चळवळीतील तेजो निर्मितीचे स्वागत ऐक्याने केले. लोकल बोर्डाचा कारभार, वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनी व कलेक्टर कचेरीतील कारभार,अशा दैनंदिन कारभाराच्या जीवनातील प्रश्नापासून बिळाशीचे बंड, त्यावेळचे कऱ्हाडचे पोलीस पुराण, १९४२ चे वडूज, इसलामपूर कडील अमानुष गोळीबार, अशा सगळ्या जाड्या राजकीय प्रकरणापर्यंत आणि स्वराज्यातील अन्नवस्त्र व आघाडीपर्यंत ऐक्याने मर्मग्राही परामर्ष घेतला आहे. भाऊराव पाटलांच्या शिक्षण कार्याचा व अनेक ग्रामसेवकांच्या समाज सेवेचा मन मोकळा पुरस्कार ऐक्याने वारंवार कर्तव्य बुद्धीने केला आहे. १९४२ च्या सातारा जिल्ह्यातील भूमीगत चळवळीतून जे सामाजिक सामर्थ्याचे शीलसंहारक प्रकार मधूनमधून ऐकिवात येत, त्याचा निधडा धिक्कार ऐक्याने मोठ्या नैतिक पातळीवरून केला होता. शैक्षणिक व औद्योगिक विशेषांक हे संदर्भ पुस्तकासारखेच उपयोगी पडणारे अंक श्री. चंडीराम हरी पळणीटकरानी वाग्भट देशपांडे, शिंदकर, नानासाहेब जोशी यांच्या संपादकीय परंपरेची बूज राखून सालोसाल प्रसिद्ध केले. ऐक्यात प्रसिद्ध झालेली सडेतोड बातमीपत्रे लोकांच्या व सरकारच्या मेंदूला भिडली आहेत. साहित्य अंक, दिवाळी अंक, औद्योगिक अंक, शंकरराव ओगले अंक असे ऐक्याचे खास अंक ही ऐक्याची संस्मरणीय कर्तबगारी आहे. श्री. चंडिराम पळणीटकरांच्या कैलास-

वासानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती कमलाबाई यांनी संपादिका होऊन एक वर्ष ऐक्य चालविले, हे या जिल्ह्यात एक अपूर्व आहे. त्यांच्यानंतर सुरेश पळणीटकर यांनी ऐक्य द्विसाप्ताहिक म्हणून काही दिवस चालविले.

कविवर्य त्र्यंबक रामचंद्र अभंग यांच्या ध्रुवाच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत विनोबाजी भाव्यांच्या ग्रामदानातील उदात्त तत्त्वप्रणाली दैनंदिन जीवनात निदान सुशिक्षित समाजाने तरी उचलावी, म्हणून मोठाच अट्टाहास झाला आहे. 'वेळेवरचा टाका नवांचा राखा' या प्रचीतीची जाणीव ध्रुवाने प्रस्थापित सरकारपासून सार्वजनिक सेवा करणाऱ्या सत्ता स्थापित लोकनियुक्तापर्यंत सर्वांना निर्भिडपणाने दिली आहे. ध्रुवाच्या विविध अंगी लिखाणात ध्रुवाच्या भर उदयोन्मुख पिढीवर जबरदस्त असून कुमारी सुधा भडकमकर हिची सातारा साहित्य सम्मेलनावरील लेखमाला मार्मिकपणे गाजली आहे. ध्रुवाचे संपादकीय खोचक, बोचक व रोचक तर ठरेलच; पण दरसालच्या प्रजासत्ताकदिनी वाढदिवसाचे काढलेले अंक आणि भाऊराव पाटील, दारुबंदी, महाराष्ट्र दर्शन, सातारा-रेल्वे असे काढलेले ध्रुवाचे खास अंक कणखर ध्येयवादाने अन्यायाला वाचा फोडणारे, वास्तववादी गरजा दाखविणारे व गुणगौरव करणारे ठरले. जिल्ह्यातील अन्नधान्याचा प्रश्न ध्रुवाने १९५८ सालीच पोटतिडकीने मांडला असून जिल्हावृत्तपत्रांच्या आवश्यक जीवनासाठी दिवाकर समितीच्या प्रश्नावर ध्रुवानेच सर्व महाराष्ट्रात झगझगीत प्रकाश टाकला आहे. शिक्षकांचे तुटपुंजे पगार, बँक कारभारातील विशेष, पंचायत राज्य, अशा ध्रुवाच्या लेखमाला लोकमानसात कायमचे ठाण मांडून बसल्या आहेत. ध्रुवातील ग्रंथ परीक्षणे सदैव मार्मिक ठरली असून पत्रकारांच्या सहली, गोंदवल्याचे कविसंमेलन, संपादकीय लेखणीच्या निशाण्या ठरल्या आहेत. जिल्ह्यातील कर्तबगार संस्थांचा आणि व्यक्तींचा समयसंमत गुणगौरव दक्षतेने करण्यात ध्रुव नेहमी अग्रेसरच राहिला आहे. ध्रुवाच्या अशा चौफेर लोकशिक्षण सेवेचे कौतुक नारायण हरी आपटयांसारख्या सात्त्विक साहित्यिकाला जिव्हाळ्याने वाटते यातच ध्रुवाचे यश आहे.

'पुसलेल्या पाटया' या ऐतिहासिक लेखमालेने १९५८ साली व १९४३ साली अन्नधान्य लेखमालेने गाजलेल्या सातारा जिल्ह्यातील श्रीशाहूचा पन्नासावा वाढदिवस केसरीकार ग. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर रीतीने १९४९ साली झाला होता. आणि ६० वा १९५९ साली शाहू कचेरीतच साजरा झाला होता. तसे भाग्य दुसऱ्या कोणत्याही वृत्तपत्राने भोगले नसले तरी शाहूची लेखक-लेखनसंग्रहाची परंपरा सगळयाच वृत्तपत्रांनी चालविली आहे. श्री. वैद्य यानी काढलेला समर्थही त्यास अपवाद नाही, सातारा जिल्ह्यातील संस्थांनासुद्धा सर्व परामर्ष घेणारा १९३२ पर्यंतचा समर्थचा कालखंड,

त्या पुढील १९४२ पर्यंतचा राष्ट्रीय घडामोडीवर भर असलेला कालखंड व त्यापुढील १९४६ पासून १९५१ अखेरचा तिसरा कालखंड मिळून समर्थांचे संपादक बाबूराव वैद्य यांच्या संपादन संगोपनाचे आणि नरूभाऊ लिमये यांच्या संपादन कुशलतेचे असे तीन कालखंड समर्थ जीवनात ठरतात. त्यातही नरूभाऊ लिमये वैयक्तिक सत्याग्रहात १९४१ साली सरकारी पाहुणचारास गेले असता, एक वर्षभर कऱ्हाडचे बाबुराव गोखले कार्यकारी संपादक होते. त्यानंतर समर्थ जीवनाचा चौथा कालखंड श्री. अनंत कृष्ण कुलकर्णी यांच्या संपादनाच्या १९६५ अखेरचा असून मध्यंतरी अडीच वर्षे समर्थाच्याच धोरणाने (१९५० ते १९५२ पर्यंत) प्रकाश नांवाचे दैनिक नरूभाऊ लिमये, सातारा-कऱ्हाड येथे चालवीत होते. या सर्वही कालखंडात जिल्ह्यातील वृत्ते सादर करताना समर्थने दाखविलेला नियमितपणा व बिनचूकपणा आणि विधायक दृष्टी इतरत्र क्वचितच आढळणारी आहे. लोकशिक्षणाच्या दृष्टीने विवेकवर्धन व विचार-प्रवर्तन समर्थने हरएक तऱ्हांनी केले असून स्मृतिपटलावर कायम राहतील असे व्याख्यानाचे परिणामकारक कितीतरी अहवाल दिले आहेत. समर्थचे संपादकीय सीधे व वास्तव असून प्रसंगवशात चिमटा घेणारे असले तरी चिमटणारे कधीच नव्हते व नाही. समर्थाचे नियमित निघणाऱ्या दीपावली व स्वातंत्र्य दिनाचे अंकापेक्षाही भाऊसाहेब सोमण, नाथ घाणेकर, चलेजाव चळवळ समालोचन, दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन व महाराष्ट्र साहित्य संमेलन (सातारा) हे विशेष अंक, समर्थातील आत्मवृत्तातून लोकशिक्षण, आंग्लाईच्या आरपार, मराठी क्रांतीकारक, सशस्त्र स्वराज्य संग्राम इत्यादी लेखमालांच्या इतके ऐतिहासिक मोलाचे नसले तरी साभिमान संपादन कुशलतेचे व सार्वजनिक जीवनातील गौरव कृतज्ञतेचे आहेत. समर्थच्या कित्येक लेखमाला ग्रंथरूप धारण करण्याच्या योग्यतेच्या असून समर्थात आलेल्या कर्तबगारांच्या यशोलोचनाभ्यास-प्रवर्तक आणि निष्णात व पुढारलेल्या संपादनसंपत्ती म्हणून साजणाऱ्या आहेत.

सातारा जिल्ह्याची वृत्तपत्र सृष्टी अशी अभिनामास्पद असलेमुळेच, १९४८ च्या जानेवारी ३१ रोजी सातारा येथे मराठी पत्रकार परिषदेचे अधिवेशन दे. भ. बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली भरवावयाचे ठरले होते. त्याचे स्वागताध्यक्ष कऱ्हाडचे बाबुराव गोखले होते. कारण वृत्तपत्र सृष्टीत आपली जिल्हापत्रे चुकूनसुद्धा मागे पडू नयेत म्हणून लेखन मार्गदर्शन करून पुन्हा "दे दान गुप्त उपकार करी, न बोले।" ही परंपरा जी अच्युतराव कोल्हटकर, भाऊसाहेब सोमण, न. गं. जोशी यांचेकडून चालत आली तिचे ते प्रतीक होते. ती पत्रकार परिषद म. गांधींच्या अनपेक्षित मृत्यूने प्रत्यक्षत: भरली नसली, तरी स्वागताध्यक्षांचे भाषण जे छापून निघाले होते, ते वृत्तपत्र सृष्टीत मान्यता पावलेले आहे.

२ : सार्वजनिक खटले

"हिंदुस्थानच्या प्रतिनिधींची पार्लमेंटात आवश्यकता" अशी टकळी तोंडाने व लेखणीने चालवून अर्ज विनंत्यांच्या चळवळीचा काळ सातारा जिल्हा घालवीत असता, कृतीचा काळ आपले किरण फेकत होता. हिंदुस्थानच्या द्रव्य शोषणावर "हिंदुस्थानात यांत्रिक विद्येची आवश्यकता" वाईचे वृत्तसार प्रतिपादित आहे, त्याच्या पूर्वीच साताऱ्यास पोलिसांच्या "अघटित कृत्यांचा" प्रसाद मिळत होता. १८८५ चा फेब्रुवारी ५ चा महाराष्ट्र मित्र म्हणतो की, मांढरदेव, वालेघर, वाई, कोडोली, वासली, शेंदूरजन, केंजळ, आबापुरी, दुमाला अटीटा, नगलोटी, दुमाला करंजावडी, खंडाळा, विंग, अगोली, खानावडी, दुमाला धाओडी, गोळेवाडी, अशा गावावर एक वर्षाचे आत प्युनिटिव्ह पोलिसचे १२८४० रु. बसले. गव्हर्नर साहेब महाबळेश्वरास जात असता सार्वजनिक सभेतर्फे त्यांना मानपत्र देऊन नानासाहेब वैद्यांनी त्या भुर्दंडाबाबतचा अन्याय निदर्शनास आणला आणि वाईकरावरील किटाळ व जाच कमी करून घेतला.

(२) पण १८९४ च्या सप्टेंबरात नवीनच वादळ उठले. मुंबई, येवले वगैरे ठिकाणी हिंदु–मुसलमानांचे दंगे झाले आणि तसे सातारा जिल्ह्यात नाहीत हे काही सैतानी डोक्यांना खपेना असे दिसते. तेव्हा गणपती उत्सवाचे निमित्त करून तो देखावा उभारण्याचा प्रयत्न झाला. गणेश चतुर्थीपूर्वी वाईला 'द्वारे' निघतात. द्वार म्हणजे चार दिशेने मुले यात्रेस बाहेर जाऊन गावात परत येतात. त्यावेळी त्यांच्या मिरवणूकी निघतात. गावचे लोक या मुलांना सामोरे जातात व त्यांस वाजत गाजत गावात आणतात. मिरवणुकीच्या वाटेवर एक मशीद आहे. आदल्या वर्षी वहिवाटी प्रमाणे मशिदीवरून 'द्वारे' वाजत गेली. यंदा गाडे उलटले व ठराविक जाहीरनामा लागला. तो रद्द होईपर्यंत मानला पाहिजे, म्हणून पुढाऱ्यांनी मशिदीपुढे वाद्ये थांबविलीही. पण कोणा एका बेजबाबदार मनुष्यास वेसुमार हौस येऊन त्याने एकटयाने झांज वाजविली. अर्थात खटला फारतर या एकावर व्हावा; पण इतर लोक साथिदार मानण्यात येऊन तेरा संभावित पुढाऱ्यावर खटले भरून त्यांना बेडया घालून वाईहून साताऱ्यास एकवीस मैल पायी चालत नेले. खटला भरणारा दुल्लेखा सबइन्स्पेक्टर व संमती देणारे रँड साहेब असिस्टंट कलेक्टर ! ही दोन नांवे महाराष्ट्रात महशूर आहेतच. झांज वाजविण्याचा प्रकार झाला त्यावेळी दुल्लेखा

बरोबर देशमुख मॅजिस्ट्रेट हजर होते. या पुढील हकीकत इंदुप्रकाश देतो ती अशी की, 'फौजदाराने देशमुखास म्हणजे मॅजिस्टेटास असे सांगितले की, केनेडी साहेबांच्यापुढे खटल्यात साक्ष देताना आरोपीवर गुन्हा शाबीत होईल अशी साक्ष द्या. मी सांगतो त्या प्रमाणे तुम्ही वागला नाही तर परिणाम आपणास भोगावा लागेल. पण ज्या पवित्र जागेवर आपण आहोत तिची नापत करण्यापेक्षा आपले नुकसान झाले तरी पतकरले असा मॅ. मि. देशमुख यांनी फौजदारास जबाब दिला. इतके झाल्यावर ते स्वस्थ बसले नाहीत, तर आपले वरिष्ठ जे मामलेदार यास त्यांनी ही गोष्ट कळविली व परंपरया ती केनेडी साहेबांचे कानावर घातली." अनुभव नसल्याने तरूण असि. कलेक्टर केनेडी साहेबांनी 'हिंदु साक्षीदार तेवढे बेभरंवशी असा शेरा मारून' झांज प्रकरणाच्या वेळी हजर नसलेल्याही संभावितास शिक्षा दिल्या. ता. २७ सप्टेंबर रोजी झालेल्या शिक्षा अशा:– तात्यासाहेब गाडगीळ २१ दिवस, वि. अ. ऊर्फ तात्यासाहेब पंत २१+२१. वाई म्यु. चे चेअरमन हरी बावाजी पुरोहित २१ दिवस, म्यु. कौन्सिलर व न्यू स्कूलचे चालक बंताजी गंगाधर जोशी २१ दिवस, वासुदेव बाबुराव पंडीत २१ दिवस, लो. बो. चेअरमन व कन्सिलिएटर नानसो वैद्य ३० दिवस, वामन बाबाजी कुलकर्णी २१+२१+४० रु. दंड, जनार्दन अप्पाजी एरंडे २१ दिवस, कृष्णा तात्या ढवळीकर ३० दिवस + ४० रु. दंड.

अशा शिक्षा केनेडी साहेबांनी दिल्या खऱ्या. पण पुढे देशमुखांची ग्रेड तोडण्याचा प्रसंग आल्यावर लाटकर मामलेदारासकट ज्या काही साक्षी झाल्या, त्यावरून निराळाच प्रकाश पडला. त्याच्या योगे 'अखेर पर्यंत वाई हा शब्द उच्चारलेला ऐकला की, ते (केनेडी साहेब) लज्जेने खाली मान घालीत. कारण अपीलाससुद्धा आरोपींना जागा न राहण्यासारखी शिक्षा साहेबांच्या हातून झाली होती. ते काहीका असेना, २८ आक्टोबर १८९५ चा प्रतोद लिहितो की, 'गतवर्षी वाईकर मंडळीवर जो प्रसंग गुदरला त्याचे मुळाशी केवळ झांजेचा खटला असेल असे वाटत नाही. त्यास काहीतरी पोलिटिकल कारणे असावी व ती हीच की, वाईतील बरीच मंडळी सार्वजनिक कामात असतात. ती एकदा डँबीस ठरवून टाकली म्हणजे इतर ठिकाणच्या लोकांसही ते एक प्रकारचे उदाहरण होईल व अलीकडे सरकारी अधिकाऱ्यावर जो ओरडा होत असतो तोही नष्ट होईल."

प्रतोदचे हे प्रवचन खरे दिसते. कारण 'शिक्षा भोगून झाल्यावर साताराचे लोक त्यांचा जाहीर सन्मान करतील म्हणून सातारच्या अधिकाऱ्यांनी त्या विरुद्ध आधीच जाहीरनामे काढून ठेवले!' पण नऊ जण सुटले त्यावेळी म्हणजे बुधवार ता. १७ आक्टोबर १८९४ रोजी जे साताऱ्यास होऊ शकले नाही ते ता. १७ नोव्हेंबर रोजी वाईस घडले. रा. ब. जनार्दन सखाराम

गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली त्या तेरा जणांच्या सन्मानार्थ सभा झाली. मुंबई व धारवाडहून सांत्वनपर पत्रे आली होती. सभेच्या शेवटी नानासाहेब वैद्यानी आभार मानताना सांगितले की, 'आम्ही सार्वजनिक कामे करीत असताना कारागृहवासासारखे जरी प्रसंग आले तरी आम्ही देशहिताच्या कामापासून कदापि पराङ्मुख होणार नाही ' 'प्रतोद'.

(३) सार्वजनिक हिताकरता कसल्याही आपत्तींची पर्वा न करण्याइतकी बेपर्वाई १८९६ च्या दुष्काळात कऱ्हाडास दिसून आली. ता. १० नवंबर रोजी सकाळी ८ पासून ११ पर्यंत कऱ्हाडची पेठ लुटून गोरगरिबांना नेववतील तितके जोंधळे वस्ताद हसन मुजावर प्रभृती मंडळींनी दिले. पेठ लुटण्याचे कारण असे घडले होते की, दुष्काळामुळे अन्न कसे ते मिळण्याची रोजच्यारोज पंचाईत होऊ लागली. व्यापाऱ्यांनी यावेळी नफेबाजी करण्याचेच जणु ठरविले. आणि रामनाथ, दरू, आशाराम प्रभृती मारवाड्यांनी धान्याच्या राशीच्या राशी विकत घेतल्या व पोत्यांच्या थडीच्या थडी जेथे तेथे लावून ठेवल्या होत्या. आणि मग रुपयास चार शेर प्रमाणे जोंधळे विकावयास काढले. हसन मुजावर हे इनामदार होते व वस्ताद होते. त्यांनी व्यापाऱ्यास रुपयास ८ शेर धारण करून परोपकार करण्यास विनविले. पण व्यापाऱ्यांनी ऐकले नाही. उलट गाड्या भरून कऱ्हाड बाहेर दुसऱ्या बाजारात विकावयास सुसज्ज झाले. हसन साहेबांना व्यापाऱ्यांच्या गुर्मीचा सात्त्विक संताप आला; आणि त्यांनी व्यापाऱ्यास सांगितले की आपण बाजार लुटणार, मग काय व्हावयाचे असेल ते होवो ! पण व्यापारी नमते घेईनात. फक्त तलुकचंद गुजर, ज्ञानोबा बटाणे आणि भागवत भुसारी कंपनी यांनी वस्तादांच्या शब्दांप्रमाणे रुपयास ८ शेराप्रमाणे धान्य विकण्याचे कबूल केले. म्हणून तेवढी दुकाने व त्यांची कोठारे सोडून वस्तादांनी आपल्या साथीदारासह पेठ लुटण्यास सुरवात केली. व गोरगरिबास धान्य पुरविले. लुटीला आरंभ होताच मोतीराम रेवचंद गुजरांनी ५० रुपयांची दाण्याची पोती देऊ केली, छोटूमल मारवाड्यानी ५० रुपये नफा देतो व शिवलिंग शेठनी १०० रु. नफा देतो, अशी लालूच दाखविली. पण एवढ्या करता का वस्ताद लूट करीत होते ! वस्ताद व त्यांची मंडळी मुळीच बोटचेपी लागेनात, तेव्हा व्यापारी सहजच पोलिसाकडे धावले.

किंबहुना लुटीची बातमी लागताच जमादार दुदुस्कर व येरगट्टी फडणीस पेठेत आले. किल्लेदार मामलेदार आणि प्रांतसाहेब मि. क्लेमेंट पाटणकडे असल्या कारणाने जमादारावरील जबाबदारी दुप्पट वाढली. पण ते पेठेत आले तो एकच तोबा उठला होता. लूट थांबवण्याचे त्यांच्याने जमेना, तेव्हा त्यांनी पाटणाकडे निरोप पाठविला. अकरा वाजता लूट संपत आली. रस्ते

जोंधळयांनी आणि धान्यानी व ते वेचून नेणारांनी फुलून गेले. त्यातला ओसरता भाग क्लेमंट साहेबांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी दोन दिवसात सुमारे दोनशे माणसे मामलेदार कचेरीत पकडून कोंडली.

हसन मुजावर साहेबाना पकडताना साहेबांना फारच अवघड गेले. लूट झाल्यावर वस्ताद घराजवळील पिंपळाखाली खुर्ची टाकून स्वस्थ बसले होते. पोलिसांचा फेरचा फेर भोवती उभा राहिला, पण वस्तादांना पकडण्याची कोणाची छाती नव्हती. शेवटी 'कायद्याप्रमाणे गुन्हा होत असल्या कारणाने अधिकाऱ्यांच्या स्वाधीन व्हावयास पाहिजे' असे बाबा कुलकर्णी यांनी सांगितले. त्यावर घराची झडती घेऊन लुटीपैकी एकही दाणा मजजवळ नाही अशी खात्री करून घ्या, म्हणजे बाबांच्या शब्दाकरिता स्वाधीन होतो, असे वस्तादांनी साहेबास सांगितले. या प्रमाणे सर्व विधी झाल्यावर वस्ताद आपण होऊन सरकारच्या स्वाधीन झाले. शनिवार ता. १३ नोव्हेंबर रोजी पकडलेले लोक परोपकारी व निर्दोष असल्यामुळे त्यांना साहेबांनी सोडून द्यावे म्हणून खुद्द साहेबांच्याकडे बळवंतराव नवाथे यांनी अर्ज दिला. पण त्यामुळे काही एक पाझर न फुटता ४९ लोकांवर रीतसर लुटीबद्दल खटले चालले आणि त्या टोळीचे प्रमुख म्हणून चार वर्षे सक्त मजुरी वस्तादास, वस्तादांचे सहाय्यक कोंडी काटकर, इंगवले, वामन खेर, सीताराम ठाकर प्रभृतींना २।२ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली.

या शिक्षाविरुद्ध नानासाहेब आगाशे, दादासाहेब करंदीकर यानी अपील लावले. पण उपयोग काही झाला नाही.

(४) एप्रिल १८९९ मध्ये महाबळेश्वराच्या वामनभट पुराणिकाजवळ एक शिवाजीचा फोटो व एक तरवारीची मूठ सापडली. रँड खुनानंतर स्थानबद्ध झालेल्या बळवंत व हरी रामचंद्र नातू बंधूना सोडवून आणि लोकमान्य टिळकांना येरवड्यातून मुक्त करून आणण्याचा त्याचा कट होता असा आरोप ठेवून त्यास आठरा महिने स्थानबद्ध करण्यात आले!!

यावर एक दशक गेले, आणि सार्वजनिक सेवेसाठी शिक्षा खालीलप्रमाणे वाटयास आल्या!!

५) स्वजन हितैषी नाटक मंडळीचा 'ड्रॉप' पडदा व 'स्वदेशी आणि राष्ट्रोद्धार' या नाटकाच्या हस्त लिखित प्रति पोलिसांनी सातारा येथे जप्त केल्या असून मंडळीचे मालक व नट पकडले जाणार आहेत अशी तेथे वदंता पसरली आहे. 'स्वदेशी' हे नाटक अनेकदा रंगभूमीवर आले असून 'राष्ट्रोद्धार' हे नाटक नवीन आहे. ड्रॉपच्या पडद्यावर तीन चित्रे आहेत, पहिल्यात श्रीमंत व्यापारी स्वदेशी मालाची विक्री करीत असून युरोपियन आश्चर्यचकित होऊन पहातो आहे. दुसऱ्यात एतद्देशीय राजाच्या दरबारात युरोपियन गुडघे टेकून

व्यापाराला परवानगी मागतो आहे व तिसऱ्यात नेटिव्हाने ओढावयाच्या 'रिक्षा' गाडीत बसून एक युरोपियन चालला आहे. अशी या देशातील युरोपियनांच्या ३ स्थितींची चित्रे आहेत. (केसरी २३–७–१९०७)

(६) सातारा कलेक्टरने तांबेशास्त्री राजद्रोही पुराणे सांगतात असे समजून त्यास धावडशीहून घोडेस्वार पाठवून, भर पावसात अनवाणी आणले बंगल्यावर आणले आणि " सातारा जिल्हा सोडून ताबडतोब चालते व्हा " असे सुनावले. पुणे कलेक्टरानीही ता. ७।९ रोजी त्यांना पुण्यात पुराणे सांगण्यास मनाई केली. ता. १०–९–१९०० (केसरी २०–८–१९०७)

(७) लोकमान्य टिळकांना मंडालेला पाठविल्यावर त्यांचा बालेकिल्ला असलेल्या साताऱ्याच्या मागे सरकार हेतुपुर:सर लागलेले. सरदार गणपतराव पानसे या सद्‌गृहस्थांनी सर्व दर्जाच्या लोकांनी एकत्र जमण्यासाठी युनियन क्लब काढलेला. तेथे सर्व भेदभाव विसरून लोक खेळत. १८९७ साली केसरी वरील खटल्यात टिळकांना शिक्षा झाल्यावर अॅडव्होकेट ऑफ इंडियाच्या मुंबई अंकात आलेला एक टिळकांचा फोटो सागवानी चौकटीत बसवून बळवंतराव सहस्रबुद्धे यांनी सहज क्लबात लटकाविला होता. बारा वर्षांत त्यामुळे कोणाच्या कपाळाला तिडीक उठली नव्हती, ती १९०९ त सरकारी अधिकाऱ्यांच्या डोक्याला उठली. ते चित्र काढण्याबद्दल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचे फर्मान आले. क्लबला टाळा बसेल असे वातावरण निर्माण झाले. क्लबच्या सभासदांचे मत बॅलट बॉक्स मधून घेता सरकारी धोरणाच्या सपशेल विरुद्ध गेले. लोकमताचा असा दिलासा पटल्यावर बळवंतराव सहस्रबुद्धे यांचे चिरंजीव आण्णासाहेब यांनी क्लबकडे त्या फोटोची मागणी करून तो घरी नेला. १८४४ ते १८६२ व विशेषत: १८५९ साली शस्त्र जप्तीचे हुकूम सुटले असता, ज्यांनी आपल्या पूर्वजाना इतिहासात स्थान दिले त्या शस्त्रांना भिंतीत माचून टाकणाऱ्या, दसऱ्या दिवशी त्यांची पूजा करणाऱ्या बापजाद्यांचा आठव सहस्रबुद्धयांना प्रेरक होता. परदेशी साखर अशुद्ध असल्याच्या जाहिराती व्हिक्टोरिया लायब्ररीत लागल्या म्हणून आणि टिळकांचा फोटो युनियन क्लबमध्ये असतो उमटतो म्हणून १९०९-१० च्या काळात त्या संस्थांचे सभासद होण्याचे सर्व युरोपियन नाकारीत.

(८) पुढे ते व्रत कोरेगाव तालुक्यात उमटले. ता. १८ जानेवारी १९०९ चे वृत्तसार सांगते की "देऊर गावी गुजर मराठे मिळून ११ इसम व कोरेगाव शाळेतील तालीम मास्तर गुरव यांनी मागील भाऊबिजे दिवशी पारावर व्याख्याने देऊन पिकेटिंग केले. म्हणून इं. पि. को. क. १५१ व २९१ खाली अबकारी इ. मि. गार्डन यांनी वाई मॅ. वर्ग २ कडे खटला दिला. आरोपीतर्फे २४ साक्षीदारांची यादी कुडेकर, पाटणकर, भट वकील यांनी दिली. २५

जानेवारी व पुढे खटला चालून पिकेटर्स पैकी तिघास २५ रु. दुसऱ्या तिघास १० रुपये दंड झाला. बाकीचे ६ निर्दोषी सुटले. "

(९) देऊरचा खटला पिण्याच्या दारूवर निरोधन करण्यासंबंधी झाला. पण १९१० ला स्फोटक दारूचा खटला औंधात उद्भवला. औंध येथील बॉम्ब खटल्याचा पूर्वरंग आणि उत्तररंग निरनिराळे आहेत. पण हरिदासाची कथा जशी मूळ पदावर, तशी औंध बॉम्ब प्रकरणालाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र प्रयत्न करणाऱ्या नाशीकच्या " अभिनव भारत संस्थेकडे " संबंध सिद्ध झाला. आता याचा पूर्व रंग असा की औंध हायस्कूलातील ड्रॉइंगमास्तर हिंगे या गृहस्थानी एक बॉम्ब तयार करून तो माळावर उडवून पाहिला म्हणे! पण त्याचा आवाज औंधात ऐकू येण्याऐवजी पुण्याच्या न्यू इंग्लीश स्कूलच्या वसतीगृहाच्या सुपरिंटेन्डन्टच्या कानी गेला. (ता. १७ मे १९१० मंगळवार) सदर हिंगे हे आपल्या वसतीगृहातील भाऊसाहेब पंताचे एकवेळ मित्र असल्याकारणाने त्या विद्यार्थ्यांच्या आणि आपल्या वसतीगृहाच्या पाठीमागे काही लचांड पुढेमागे लागू नये म्हणून आपल्या कानी आलेली बातमी सदर वसतीगृहाचे सुपरिन्टेन्डन्ट प्रो. गोविंदराव भाटे यांनी साताराच्या कलेक्टरास १८ मे १९१० चे रजिस्टर पत्राने कळविली. झाले! ! सरकारी सूत्रे हलू लागली. कलेक्टरसाहेब हे औंधचे पोलिटिकल एजंट असल्या कारणाने त्यांनी औंधचे दरबारकडे हिंग्यांची हकीकत कळविताच तेथेही चक्रे फिरू लागली. औंधच्या गादीसंबंधी जी १९०८ साल पूर्वीच भानगड उपस्थित झाली होती, तिच्याशी हिंग्यांच्या बॉम्बचा काही संबंध आहे की काय अशा संशयाने काही दिवस संशोधन चालले होते; कारण हिंग्यांच्याबरोबर गुप्त पोलीस खात्याने हिंगे, मेहेंदळे व आठल्ये असे तीन विद्यार्थी सामील असल्याचा शोध लावला होता, आणि त्यापैकी पहिले दोघे औंधचेच होते. पण कारभारी जेकब बापू यांना प्रारंभी तसा वास आला, तरी साधा ओशटपणादेखील औंधच्या गादीशी बिलगण्यासारखा हिंग्यांच्या बॉम्बला नसल्याकारणाने औंध संस्थानला सरळ तो खटला ब्रिटिश अधिकाऱ्याकडे सुपूर्त करावा लागला.

तथापि या पूर्व रंगाला रंग यावयास येथील पोलिसांनी हिंग्याना पकडण्यासाठी केलेली क्लृप्ती कारण झाली. शाळेला मे महिन्याची सुट्टी असल्याकारणाने औंध सोडून गेलेले हिंगे सहज पकडता यावे म्हणून, हिंग्यांच्या घराची झडती (२४।२५ मे) व शाळेतील खोलीची झडती (२३ मे) रोजी घेऊन हिंग्यांच्या भावाला ओलीस म्हणून अडकवून ठेवले. (२३ मे) कोल्हापूरास आठल्ये यांना भेटावयास गेलेल्या हिंग्याना सदर गोष्ट कळली. त्यासरसा ते एकदम औंधास दाखल झाले, मॅजिस्ट्रेट पुढे उभे राहिले व पकडले गेले. (२६ मे) घराची झडती झाली, काही कागदपत्र जप्त झाले,

' पोलिसने न विसरेल अशी समज " दिली, तरी आपणास्वत:शिवाय कोणी कटात असल्याचे हिंगे सांगेनात. आणि इकडे मेहेंदळयानी तर पुष्कळच बाबतीत पोलिसच्या होस हो ठेवून दिले होते.

या पूर्वरंगानंतर सदर खटला ज्यावेळी ब्रिटिश पोलिसांच्या हवाली साताऱ्यास झाला, त्यावेळी हिंग्यांच्या बंधूंचा पाश सुटला. ब्रिटिश पोलिसांच्या पुढील व कमेटिंग मॅजिस्ट्रेटपुढील जबानीत हिंगे पूर्ववतच अढळ राहिले व मेहेंदळयानी पूर्वीसारखाच होस हो दिला. दरम्यान कलकत्त्याला शिकत असलेल्या आठल्यांच्या कानावर सातारचे पडसाद गेले. तेव्हा तेही परत कोल्हापूरास दाखल झाले, आणि पोलिसांनी त्यांना पकडले व करावयाचे ते सर्व विधी केले.

ता. १९ सप्टेंबरपासून डि. मॅजिस्ट्रेट पुढे चौकशी सुरू झाली. तेव्हा अष्टपुत्रे वकील, आरोपीतर्फे काम पहात होते. ता. २४ ऑक्टोबर रोजी १२१ ते १२४ अ सर्व कलमाप्रमाणे सर्व आरोपीवर चार्ज ठेवला. हिंग्याना मेहेंदळयानी, मेहेंदळयाना बर्वे यांनी व आठल्याना गणेश दामोदर सावरकर यांनी शपथा देऊन नाशीकच्या अभिनव भारत संस्थेचे सभासद करून घेतल्याचे सरकारतर्फे पुराव्याने मांडण्यात आले.

पुढे खटला सेशनात गेला, तो २१ नोव्हेंबर पासून १९ डिसेंबर पर्यंत चालला. पोलिसांचे छळाचे भीतीने प्रथम पोलिसांच्याजवळ दिलेली जबानी आपण दिल्याचे मेहेंदळयानी सांगितले. अष्टपुत्र्यांचे जोडीस फणसळकर, आगाशे, करंदीकर यांनीहि सेशनात काम चालविले. एक महिनाभर साताऱ्यात हा खटला गाजला; राजद्रोहाचे आरोप लागू पडत नाहीत म्हणून वकिलांनी आपली शिकस्त केली; तरीपण क्रांतिकारक कटाचा व इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्याचा आरोप सिद्ध होऊन पर्सिव्हल साहेबांनी हिंग्याना आठ वर्षे, आठल्याना पांच वर्षे व मेहेंदळयाना ३॥ वर्षे शिक्षा दिल्यावर सर्वांच्या मिळकती जप्त करण्याचा हुकूम झाला. तेव्हा वंदेमातरम्‌च्या गजरात हजारो प्रेक्षकांचे कडे वळून आठल्ये व हिंगे यांनी न्यायाधिशांनी दिलेल्या शिक्षांचा स्वीकार केला. नंतर अपील झाले. पण शिक्षा ढळल्या नाहीत. तथापि मिळकतीची जप्ती सुटली.

(१०) गणपतरावजी फणसळकरापर्यंतही एकदा बॉम्बने आपला मोर्चा वळविला होता. पूर्वी रेव्हिन्यू खात्यात काम करून सहकारी खात्यात आलेले कॅम्बेल हे येरझारा घालू लागले. किकली ता. जावली येथील त्यांचा हस्तक भाऊ बाबर यास घोडदौड करावयास घोडा मिळाला. त्या घोडदौडीतून बाबरानी चार भोळी माणसे पुढे करून १९०९ साली जानेवारीतल्या पहिल्या पंधरवड्यात फणसळकर वकिलांचे तांबट आळीतील घरात एक

वकिलपत्र द्यावयाचे निमित्त करून भाकरीचे गाठोडे म्हणून एका खुंटीला एक बॉम्बसारखा पदार्थ आणून ठेवण्यात आला. फणसळकर वकीलांचे लोकधुरिणत्व न खपणाऱ्या मनोवृत्तीची अधिकृत स्फूर्ती त्या भाऊ बाबराला असल्याची त्या काळी लोकवार्ता होती. फणसळकर वकिलांनी वर्दी दिल्यावर पोलीस खात्याने नेट धरला, गुन्हेगार व त्याचे साथीदार कोंडिबा, महादेव कुलकर्णी हे शोधून काढले, आणि खटला रीतसर चालवून भाऊ बाबाजी बाबर यास ५, महादेव कुलकर्ण्यास ४ आणि कोंडीबा कुंडलकरास ३ वर्षे सक्त मजुरी झाली. श्रीपती गुरव दोषमुक्त सुटला. (केसरी ११–५–१९०९)

(११) बॉम्बच्या बाबतीत लोकांचे हात शेकले, तर अगदी सहाजिक. महायुद्धात इंग्रजाना पैसा व माणसांची मदत करावयास लोक तयार असताना रंगरूट गोळा करणाऱ्या हपिसरांच्या, यात्रेतील भरपंगतीतून देवळात शिरून रंगरूट उचलणाऱ्या हडेलहप्पीमुळे उडतरे प्रकरण माजले व लोकांच्या आंगावर आले, याचे कोणालाही आश्चर्यच वाटेल. इतिहास हा कधीकधी कादंबरीपेक्षा अद्‌भुतरम्य कसा असतो पहा !

३१ डिसेंबर १९१९ अखेर उडतरे प्रकरणाबाबत जादा पोलिस बसले, वाई तालुक्यातील उडतरे, विरमाडे, कळंबे या गावावर. जावली तालुक्यातील अनेवाडी, सरजापूर, रायगाव गावे होती, त्यात सहकार्याला आरोपी एकूण तीस होते. ते रायगाव १, कळंबे २, सरजापूर ३, उडतरे २२, सोनगांव १, वाई १, अशी त्यांची गाववार वाटणी. कोर्टात त्यांचे आणखी एकातऱ्हेने वर्गीकरण केले होते ते असे की, ब्राह्मण ४, मराठे १९, मुसलमान ३, चांभार २, महार १ व मांग १. यापैकी ११ जण निर्दोषी सुटले. बाकीच्याना ता. २६ सप्टेंबर १९१९ रोजी शिक्षा झाल्या त्या अशा :– धोंडी वामन पवार, वामन केशव कुलकर्णी, प्रत्येकी २२, रामा बाळा सोनावणे, महादेव निळकंठ साठे, आबा तुकाराम सोनावणे, गोपाळ सखाराम प्रत्येकी १९, जम्या व।। बाबजा, बाबजा व।। हसन, अल्ली व।। राजुभाई प्रत्येकी १६, खंडू कृष्णा चांभार, नाना पिरा मांग प्रत्येकी १२, पर्वती धोंडी ९, महादु नारू निंबाळकर, गणपती बाबाजी बाबर, कुंडलिका मुरारी सोनवणे, प्रत्येकी ६ महिने सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या. शिवाय श्रीपती वामन पवार २२, हरी भिकू महार १२, व केसू येसू माळी ६ महिने अशा साध्या कैदेच्या शिक्षा झाल्या त्या निराळ्याच. या शिक्षा इं. पि. को. क. १४५, १४७, ३२३ व ४५२ प्रमाणे झाल्या. आरोपींच्यातर्फे अष्टेकर वकीलांनी आर्ग्युमेंट केले होते. त्यापूर्वी एक आठवडाभर दादासाहेब करंदीकरादि मंडळी तर्कदुष्ट वागणूक मिळाल्यामुळे कोर्ट सोडून आली होती.

हे झाले मोठ्या खटल्याचे पुराण. त्याच्या जोडीला धाकटाही एक खटला होता. त्यात सातच आरोपी होते. त्या सर्वांना ३२३ व १४९ क. प्रमाणे ९ महिने आणि १४७ प्रमाणे ६ म. सक्तमजुरी अशा शिक्षा भोगावयाच्या होत्या, पण त्या एकदम भोगावयाच्या असा निकाल मिळाला.

हा एवढा विस्तार ज्या वृक्षाचा झाला त्याचा बुंधा असा. भुईंज पोलीस ठाण्याचे सबइन्स्पेक्टर तुकाराम कान्होजी गावडे यांनी वरील आरोपीवर इं. पि. को. २४७. १४८, १२४, ३३२, ३५३ व ३२३ या कलमाखाली फौजदारी केली होती. सन १९१८ च्या १० मे रोजी उडतऱ्यास दंगल माजली म्हणून सदर फौजदारी झाली. या दंगलीची चौकशी शनिवार ता. ११ रोजी करंदीकर-सोमण वगैरे मंडळीनी येऊन आपल्यापरी केली होती.

दंगलीचा तरी मुळवा असा. रिक्रूटिंग ऑफिसर आबा तात्या व मुलकी पट्टेवाले गुलाब-गोविंदा हे उडतरे येथील काळेश्वराच्या देवळात भंडारा चालला होता, तेथे ऐन भंडाऱ्याच्या ठिकाणी पादत्राणे घालून गेले व चार माणसांची नांवे त्यानी रंगरूट म्हणून टिपून घेतली. असल्या सक्तीचा अर्थ लोकांना कळेना. शिवाय भंडाऱ्यामध्ये पादत्राणे आल्यामुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या. त्यावरून वर्दळ होऊन लोक व अधिकारी हातघाईवर आले. पण लोकांच्या समुदायापुढे अधिकाऱ्यांना लांबवर जावे लागले. हातघाईचे प्रकरण झाल्यामुळेच पोलीसपार्टी घेऊन कलेक्टरसाहेब तेथे गेले. आणि त्यांनी लोकांचे सांत्वन कसेबसे केले. पण गुन्हेगार सापडावयास पंधरा दिवस लागले. व उडताऱ्यास ७०० रुपयांचे प्युनिटी पोलीस बसले.

(१२) कोल्हापूरच्या मंगळवार तालमीचा वस्ताद महादू गवंडी याने जबरदस्तीने होणाऱ्या (१९१४–१८) च्या रंगरूट भरतीला विरोध केला. कोल्हापूरच्या धर्मशाळेत सोजीर लोक रहात व धडधाकट दिसेल त्याला रंगरूट म्हणून उचलीत. महादू गवंड्याने कोल्हापुरातील सगळ्या तालमींचे संघटन केले व एक दिवस ठरवून चारशे पेहेलवानानिशी शुक्रवारच्या धर्मशाळेवर त्याने हल्ला केला. सोजीरांना लाठीचा मार बसला. मग छत्रपती शाहूनी त्याला ताब्यात घेतले व जामिनावर सोडले. पण लोकांनी महादूचाच जयजयकर केला, तशी महादूस फिरून अटक करण्यात आली व सरकारी कामात अडथळा केल्याबद्दल आरोप ठेवून त्यास सात वर्षांची शिक्षा झाली.

(१३) लष्करी हपीसरामुळेच १९२१ साली असेच एक प्रकरण देऊर येथे माजले होते. मिलिटरी सुभेदार मुरारराव शिंदे यांच्यासाठी १४ डिसेंबर रोजी पर्सनल ॲसिस्टंट बास्कर व्हिले यांच्या समोर भाऊ नागप्पा ओझर्डे रावजी परमचंद गुजर, फुलचंद गुलाबचंद गुजर, गोविंदराव विनायक काकडे, वासुदेव केशव एरंडे, मोतिचंद देवचंद गुजर, राघू रामजी कदम, बाजीराव

रावजी कदम, कृष्णा मुबू कदम, मनु कृष्णा भुइटे, राघू मधू कदम, मधू बळी कदम, धोंडीराम बाळा कदम, सीताराम चिमणाजी कदम, रुद्रा बाळा कदम, नामदेव भाऊ कदम, पिराजी मधू कदम, अशा सतरा इसमावर फिर्याद झाली. देऊरवर हा जबर तडाखा होता. पूर्वी सरकारी सारा वसूल करण्याकरता १३ एप्रिल रोजी ओढ्यावर शिपाई बसवून मामलेदार साहेबानी पन्नास माणसांना पाणी भरण्याचीच बंदी केली होती. पण या खेपेला मिलिटरी सुभेदाराचा रंग निराळाच होता. सुभेदार मुरारराव शिंदे २ ऑक्टोबर १९२१ रोजी देऊर येथे गेले असता त्यांची अब्रुनुकसानी होण्यासारखे वर्तन, गोविंदराव काकड्यासारख्या ८५ वर्षांच्या म्हाताऱ्यासुद्धा वरील आरोपीकडून घडल्याचा दावा सबइन्स्पेक्टर सय्यद इब्राहीमभाई यांनी आपल्या फिर्यादीत मांडला होता. तेव्हा आरोपीस झालेला हजार रुपये दण्ड शिंदे यास अब्रुनुकसानीबद्दल मिळाला यात अनपेक्षित काय? तांदूळवाडीच्या पेन्शनर सुभेदारांचा प्रश्न असाच दहा जणाना शंभर-शंभर रुपये दण्ड होऊन सुटला. इतरापैकी गुन्ह्याबद्दल गोविंदराव काकड्यासुद्धा चार आरोपीस एक वर्ष सक्तमजुरी व दोघास सहा महिने सक्तमजुरी अशा शिक्षा मिळाल्या व एकजण निर्दोषी सुटला. हा निकाल २९ जानेवारी १९२२ ला लागला. शिंदेसाहेब देऊरला गेले होते ते युवराजांच्या (८ वे एडवर्ड) आगमनाचे वेळी सर्व लष्करी लोकांना पुण्यास एकत्र करावयाचे होते, त्याचे निमंत्रण गावोगाव पोचते करण्यासाठी हिंडत असत! तेव्हा गैर कायदा जमाव करून व दंगा करून शिंद्यांच्या अंगावर "गांधी महाराजकी जय" म्हणून आरोपींनी धूळ टाकली होती हा आरोप होता.

(१४) देऊर प्रकरणा प्रमाणेच कलेक्टर बास्कर व्हिले यांच्या पुढे १९२१ साली दारू निरोधनाचे खटले गाजले. या साली असहकाराची चळवळ जोरात होती. चहाप्रमाणेच दारूवरील बहिष्कार व निरोधन मे व जून महिन्यात जोरात आले. साताऱ्यात उमर पहिलवान व नबीसाहेब वगैरेंनी निरोधन केले. शांतपणे निरोधन करणाऱ्या या मंडळीवर जूनमध्ये खटले भरण्यास सुरवात झाली. मनु कुंभारास तीस रुपये दण्ड व इतर चौघास २०० रुपये दण्ड झाला. तसाच चार खटल्यात सोळाशे साठ रुपये दंड बास्कर व्हिलेनी ठोठावला. उघडच लोकानी १६ जून रोजी कडकडीत हरताळ पाळला आणि सभेत भाऊसाहेब सोमण प्रभृतींची भाषणे झाली. ते निमित्त करून हुजुर डेप्युटी मि. डोमिंगो यांनी सोमण, अष्टपुत्रे, नाथ घाणेकर, हकीम, नजमुद्दीन यांना भाषणबंदी केली. पुढे त्याच डोमिंगो साहेबाने सोमण, श्रोत्री, गो. म. कुबेर, डॉ. भिडे, मराठे प्रभृतीना १४४ क कलमाखाली "युवराजाचा अपमान होण्याचा संभव ज्यामध्ये आहे, अशा सर्व सभांना बंदी करण्यात आली आहे."

अशा नोटिसा ता. १६ नोव्हेंबर रोजी ऐन सभेच्या अगोदर काढल्या. तेव्हा भाषण बंदीची नोटीस आव्हानपूर्वक स्वीकारून सोमणानी थोडकेच आणि कायद्याचे मर्यादेत असे परिणामकारक भाषण केले की १७ नोव्हेंबरचा युवराजांच्या आगमनावरील बहिष्काराचा हरताळ कल्पनातीत यशस्वी झाला.

(१५) दारुनिरोधनाबाबत नारायणराव केळकर व तीन इसम यांना २३ जुलई १९२१ रोजी शंभर-शंभर रुपये दंड व दीड महिन्याची शिक्षा झाली. कऱ्हाडासही पांडुआण्णा शिराळकर, गणपतराव बटाणे, बळवंतराव जाधव व इनायतुल्ला कागदी यांचेवर निरोधनासंबंधी खटले झाले. पण शिराळकर निर्दोषी सुटले व बाकीच्यास पन्नास पन्नास रुपये दण्ड झाला.

(१६) १९२२ साली प्रचार कार्यासाठी शिक्षा होणेस सुरवात झाली. वाईचे (इतिहाससंशोधक) गणेश हरी खरे हे जावली व पाटण तालुक्यात टाटा कंपनी बांधणार असलेल्या कोयनेच्या धरणासंबंधी लोक जागृती करीत हिंडत असता, त्यांचेवर जमानतीचा खटला भरण्यात आला व एक वर्ष साधी कैद कोठावाला यांनी ठोठावली. ता. २ जून रोजी, खऱ्यांच्या बरोबर गोव्याचे सोनोपंत आपटे व हेळवाकचे शेंडे यांना, प्रायश्चित्त भोगावे लागले. त्यांच्या अगोदर एक महिनाभर विष्णु लक्ष्मण मराठे, यांना तासगाव येथे रिसबूड यांनी क. १०८ प्रमाणे नऊ महिन्याची शिक्षा दिली होती. अशा चाप्टर-केसीस भरावयास मार्चमध्ये साताऱ्यास आरंभ झाला होता ! उमर पहिलवान, नबीसाहेब, दादू महात, बुधकर व पैहलवान गणपतराव साठे, यांना एक वर्ष सजा झाली, ती भोगून गणपतराव साठे यांनी प्रशंसनीय कामगिरी केली. विसापूरसारख्या हालआपेष्टांचा तुरुंगवास त्यांनी कंठला. १७ नोव्हेंबर १९२१ रोजी जो कडकडीत हरताळ साताऱ्यास पडला होता, त्याने जिल्ह्याची नोकरशाही चिडली होती. त्या चिडीत १९ डिसेंबर रोजी झालेल्या विदेशी कापडाच्या होळीने भर पडली. तेव्हा ६ जानेवारी १९२२ रोजी पोलीस ॲक्टच्या ३१ कलमाखाली बनोबा डोंगरे व मनोबा कुंभार यास बास्करव्हिले यानी तीस रुपये दण्ड ठोठावला. कुंभार, अष्टपुत्रे व शेखमिया यास तशीच तंगी दिली. तरी देखील लोक आपल्या असहकाराच्या व्रतापासून ढळत नाहीत, असे दिसल्यावरून शेख मिया यास पांचशे रुपयांचे दोन जामीन सरकाने मागितले आणि चॅप्टरचे खटले भरले. राष्ट्रीय सभेने पुकारलेल्या असहकाराच्या तत्त्वाकरता झगडणाऱ्यावर नोकरशाहीने उनाडटप्पू म्हणून खटले भरले तरी, राष्ट्रीय सभेची इज्जत गमवावयाची नाही, मग वैयक्तिक कमीपणा किती का येईना अशी जबाबदारी गणपतरावजीवर येऊन पडली होती. उनाडटप्पू म्हणून खटले भरल्याबरोबर जेथे इतरे जनानी नोकरशाहीला "शरणंप्रपद्ये" व्हावे. तेथे गणपतरावांनी विसापुर भोगून बाणेदारपणा दाखविला हीच त्यांची शहामत खरी !

(१७) युवराजाच्या बहिष्काराचा ताशा सातान्यात असा वाजला; तर वाईस नुसत्या बहिष्काराचे सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल काकाराव पंडितांचे इनाम मॉयसी कलेक्टरांचे हुकमाने जप्त झाले. मग कऱ्हाड तालुक्यात अनंतराव येळगावकरानी सारावंदीला उत्तेजन दिले असा त्यांच्यावर आरोप असता, त्यांचे इनाम कसे टिकणार! या दोनही प्रकरणी अपिले, जाहीर नोटीसा झाल्या, पण इकडची काडी तिकडे झाली नाही. शेवटी १९३८ मध्ये काँग्रेस मंत्रिमंडळाने ती इमाने मोकळी केली.

सुशिक्षित-अशिक्षित, हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, साधा-सुधा-पांढरपेशा, शेतकरी-इनामदार, कसलाही मनुष्य असला तरी सरकारी धोरणाच्या कात्रीत तो सापडल्यावर नेमका कातरला जातो. असा जर येथपर्यंतचा अनुभव तर १९३०-३४ चे शान्ति संग्रामात निराळा कोठून येणार? बोलून चालून कायदेभंगाचा काळ तो! तेथे रोज खटले व रोज शिक्षा अशी केवढी तरी सरासरी पडणार! त्यातही—

(१८) बिळाशी बंडाचा खटला सुप्रसिद्ध आहे. विष्णू जोशी, गणपतराव पाटील, दत्तात्रय वासुदेव कुलकर्णी, (बिळाशी शिबीराधिपती), मुरलीधर शंकर देशपांडे, महादेव ज्ञानू, विठ्ठल केशव कुलकर्णी (काले), श्रीपती हरी सावंत, जनार्दन श्रीधर जमदग्नी, बापूसाहेब नानासाहेब देशमूख व मारुती विष्णू ऊर्फ बाबूराव चरणकर हे सदर खटल्यातील आरोपी. बिळाशीला ता. १८ जुलई १९३० ला झेंडा लावणारे लक्ष्मणराव हसबनीस व सात सत्याग्रही यांना ता. २५ रोजी पकडले. पण त्यापूर्वी ता. २१ पासून जो पूर्ण अनत्याचारी असा सामाजिक बहिष्कार अधिकाऱ्यावर पडला, त्याचाच "बिळाशीचे बंड" म्हणून बंकटसिंगनी रिपोर्ट केला होता. त्यामुळे ता. २८ ऑगस्ट जंगल सत्याग्रह झालेवर ता. ५ सप्टेंबर रोजी कलेक्टर सय्यद अमीनुद्दीन यांनी बिळाशीचे बंड मोडून वरील नऊ जणावर रीतसर खटला भरला. इं. पि. को. कलम ३५३, ३२४, ३७९, ४११, १४३, १४८, १४९ व ११४ या कलमान्वये बंकटसिंग खटला चालवीत. प्राथमिक चौकशानंतर कोर्टाने फक्त १४७, १४९, ३५३ व ४११ एवढ्याच कलमाखाली खटला चालविण्याचे ठरविले, "म्हणजे बंडाचा आरोप जाऊन फक्त गर्दी करून दंगा केल्याचा, चोरीचा माल विकत घेतल्याचा व सरकारी अधिकाऱ्याच्या कामात अडथळा केल्याचा एवढेच आरोप राहिले." एकंदर खटल्यास इतके सौम्य स्वरूप येण्यास इसलामपूरचे वकील गोविंदराव सागावकर, कऱ्हाडचे वकील राघुआण्णा धोपाटे, पांडुतात्या भाटे, व विशेषतः वामनराव फडके यांचे कौशल्य कारणीभूत झाले. तथापि आरोप ठेवल्यानंतर साताराचे रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर यांनीही आपले वकिली चातुर्य लढवून "सरकारी पुराव्याचा फोलपणा दाखवून दिला." तरी

२२ डिसेंबर १९३० रोजी नऊही आरोपींना फक्त ३५३ व १४७ या दोनच कलमाखाली प्रत्येकी सहा महिने सक्तमजुरी व शंभर रुपये दण्ड व तो न दिल्यास दोन महिने सक्तमजुरी अशा शिक्षा झाल्या. दोन्हीही शिक्षा एकाच वेळी भोगावयाचा होत्या !!

(१९) बिळाशी बंडाचा खटला म्हणून महत्त्वाचा तर कऱ्हाड येथील राज्यपालांच्या मानपत्राचा खटला किंवा इंग्लंडभर गाजलेला "काळ्या निशाणाचा" खटला त्यातील आरोपामुळे बिळाशी सारखाच! ता. १३ जुलई रोजी कऱ्हाडास राज्यपाल नगरपालिकेत मानपत्र समारंभ स्वीकारून व नगराध्यक्षाकडील खाना आटोपून दुतर्फा काळ्या निशाणांच्या रांगातून परत गेल्यावर बंदोबस्ताचे पोलीस ताबडतोब काढून घेण्यात आले. काळ्या निशाणांनी स्वागत करण्याकरता आलेली मंडळीही आपल्या मुक्कामी निघून गेली. परगावकऱ्यांची कृष्णेच्या घाटावर जेवण्याची व्यवस्था होती तिकडे ती परतली. पण हे सर्व होत असता गर्दीचा फायदा घेऊन कोणी पिशाच्य-वृत्तीच्या लोकानी नगरपालिकेने उभारलेल्या सहा कमानी मोडल्या, रस्त्याचे तेरा कंदील फोडले, क्वचित दगडफेक केली. त्याबाबद ता २१ सप्टेंबरपासून कऱ्हाडास पकडा पकडीला सुरवात होऊन त्यात पांडुअण्णा शिराळकर, राघु-आण्णा धोपाटे, सदाशिवराव वैद्य, गुलाब बागवान, तुकाराम पत्की, बाबूराव गोखले, नरसोपंत धोपाटे, बाबूराव अष्टेकर, मोहनलाल शर्मा, रामचंद्र शर्मा, मारुतराव महाडीक, झारी व दादू संकपाळ (म्होपरेकर) अशी तेरा मंडळी आरोपी म्हणून गोवली. फौजदार जाधव यानी १५ जुलई रोजी इं. पी. कोड १४७, १४९, ४२७, ३८०, ३४, ३३७, ११४ इतक्या कलमाखाली फिर्याद दाखल केली होती. सप्टेंबरात पकडा पकड झाल्यानंतर आरोपींना जामीनावर सोड-ण्याबद्दल विनायकराव फणसळकर वकिलांनी अर्ज दिला. कराड कोर्टाने तो नाकारला. साताऱ्यास अपील होऊन दोनशे रुपयांचा जामीन व दोनशे रुपयांचा जात मुचलका प्रत्येकी घेऊन ६ आक्टोबर रोजी आरोपी कोजागिरीस खुले झाले, नंतर साताराचे सिटी मॅजिस्ट्रेट पोतनीस यांच्या पुढे खटल्यास आरंभ झाला. मुख्यतः विनायकराव फणसळकर, व्यंकटराव सखदेव, तात्या भाटे व साताराचे वाग्भट देशपांडे, न. गं. जोशी, दाभोळकर, दादासाहेब करंदीकर वगैरे वकिलांनी आरोपीतर्फे काम चालविल्यामुळे सरकारतर्फे सव्वीस साक्षी होऊन, तारीख ६ जानेवारी १९३० रोजी फक्त १४३, १३९, ४२७, व ३३६ खाली सर्व आरोपीवर व आरोपी १ वर आणखी ११४ व्या कलमाखाली चार्ज ठेवण्यात आला. त्यापुढे दादासाहेब करंदीकरांनी केलेल्या फेर तपासणीत फौजदार–साक्षी दारांची त्रेधातिरपीट उडाली; इतकी की एका साक्षीदारास मॅजिस्ट्रेट म्हणाले की–" अरे, निदान खरे भासेल असे तरी काही सांग!! " पण शेवटी ५ मार्च

१९३१ रोजी–गांधी–आयर्विन करार झाल्यावर सरकारने खटला काढून घेतला म्हणूनच ते फजीतीतून बचावले!!!

(२०) आणखी काही खटले लक्षात घेण्यासारखे झाले. गुरुवार ता. २१ ऑगस्ट १९३० रोजी मुंबई सरकारच्या जादा गॅझेटने सातारा जिल्ह्यातील जिल्हा कॉंग्रेस कमेटी, हिंदुस्थानी सेवादल व महाराष्ट्र कायदेभंग मंडळ ही बेकायदेशीर ठरविली; पण ते गॅझेट पहाण्यात येण्यापूर्वीच वाईस गणपतराव वैद्य, आणि वैशंपायन वकील, साताऱ्यास सोमण, श्रोत्री, बाबूराव भिडे, विठ्ठलराव हडप, होनराव व हणमंत महाजनी, निळुभाऊ घाणेकर, शिवरामपंत मोडक, व माधवराव आठल्ये प्रभृती दहा स्वयंसेवक; कऱ्हाडास शिराळकर, गणपतराव आळतेकर, तासगावी आबासाहेब जोग व विनायकराव जोगळेकर, या सर्वांवर क्रि. लॉ. अ. १७ (१ व २) प्रमाणे खटले भरले. पैकी हडप, घाणेकर महाजनी यानी खटले चालविले नाहीत. तरी २० सप्टेंबर रोजी तीन ते सहा महिन्यांच्या शिक्षा झाल्याच! त्या खटले चालविणाराना!! हायकोर्टात त्या पुढे रद्द झाल्या, पण त्यापेक्षा हे खटले चालविण्याचा खरा परिणाम असा दिसून आला की, १९३२ चे फर्मानी कायदे निघाले ते पकडा पकडीच्या अगोदर दोन दिवस निघाले!! सोमण प्रभृतीवर खटला चालला असता ३० सप्टेंबर रोजी त्यांच्यासह सर्व आरोपी तुरुंगापासून कोर्टापर्यंत रस्त्याने बेड्या हातात घालून नेण्यात आले. तेव्हा त्या अपमानकारक वागवणुकीचा निषेध म्हणून खटला चालविणारे आरोपीचे वकील दादासाहेब करंदीकर, वाग्भट देशपांडे, व नाना साहेब जोशी कोर्टातून निषेधार्थ निघून गेले, आणि सायंकाळी पाठक हालमध्ये जाहीर सभेत सरकारी अमानुषतेचा निषेध करण्यात आला.

(२१) असाच मानापमानाचा प्रश्न उत्तर भागाचे प्रांत आफिसर बडवे यांचे कोर्टात ५ ऑगस्ट रोजी शंकरराव साठे वकीलपत्र गुदरावयास गेले असता, त्यांना त्यांच्या गांधी टोपीमुळे बडवे वकीलच समजेनात त्यामुळे उद्भवला. तेव्हा तसा लेखी हुकूम घेऊनच साठे बाहेर आले! पण पुढे ता. ७ ऑगस्ट रोजी कोर्टाने साठ्यांकडे लेखी दिलगिरी प्रदर्शित केली. १९३२ त सत्याग्रहींचा वैयक्तिक मानापमानाचा प्रश्नच उरला नव्हता. पण २१ डिसेम्बर रोजी वामनराव कुलकर्णी यास जत संस्थानात व लक्ष्मणराव गाडगीळ यास मुख्यतः सांगलीस हद्दपार करण्यात आले होते.

(२२) [१९३०-३४] च्या शान्ति संग्रामातील केवळ अन्यायाने झालेल्या शिक्षेचा नमुना म्हणून १९३० डिसेंबरच्या २ तारखेस राघुआण्णा लिमये व विष्णु मास्तर निगडीकर यांना चार महिन्यांची शिक्षा झाली, तिचे देता येईल. जवाहरलाल नेहरूंचे अटके दिवशी त्या मंडळीनी साराबंदी उपदेशिली असा त्यांचेवर आरोप होता. वटहुकमाची मुदत संपल्यामुळे ते

अपिलात जानेवारी ३१ मध्ये निर्दोषी सुटले. खटले झालेल्यापैकी काही जणानी माफ्या मागितल्या हे खरे; पण त्या विपरित मार्गदर्शितांची संख्या " दर्यामे खसखस " होती.

[२३] १९४२ मधील शिरवडे स्टेशन जळिता बद्दलचे खटल्यात पुरावा पडून सर्व जोडीदार निर्दोषी सुटले असताही सदाशिवराव पेंढारकर (कऱ्हाड) रंगा पाटील (तांबवे) यांना सात सात वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या. शिरवडे स्टेशने जळीतातून पांच बंदुका व दीडशे काडतुसे " गुप्त्यांनी " लांबविली असा सरकारी आरोप होता. खटल्याचा निकाल मार्च १९४३ साली झाला. शिक्षा भोगत असता सदाशिवराव पेंढारकर आजारीच आजारी झाले. त्यांना डॉ. जीवराज मेहतानी तपासले पण दुखणे विकोपाला गेल्यामुळे सरकारने त्यांना घरी पोचविले पण त्या दुखण्यातच त्यांचा १२ एप्रिल १९४६ रोजी कऱ्हाडास दुःखद अंत झाला. पुढे अधिकारारूढ झालेल्या कॉंग्रेस मंत्री मंडळाने सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता केल्यावर रंगा पाटीलही सुटले.

(२४) बार्शी–लाईट–रेल्वे वरील स्टेशने जाळल्याच्या खटल्यातील इचलकरंजी (कोल्हापूरचे) डॉ. कुलकर्णी, शंकरराव माने, दत्तोबा तांबट, तुकोळ, ईश्वरा पहेलवान, इचलकरंजीचे शाम पटवर्धन, पाटील प्रभृतीना सातारा सेशनमध्ये शिक्षा १९४४ साली झाल्या तरी, हायकोर्टात " कबुली जबाब देणाऱ्या साता " शिवाय बाकीचे निर्दोषी सुटले. खरे पहाता १९४२ सालीच अरग, बेडग, सलगरे, धुळगाव ही स्टेशने व धुळगांवचा बंगला जाळण्यात आला होता.

मिरज आणि पंढरपूर दरम्यानची मधली सर्व रेल्वेस्टेशने एका रात्री एकदम जाळण्याचा बेत केला होता. या कामासाठी जरूर तेवढे कार्यकर्त्यांचे गटही केले होते. पण सर्व गटांचे कडून अपेक्षे प्रमाणे काम झाले नाही. वसंतराव पाटील वगैरे मंडळी या कामात धोंडीराम माळी यांच्या पाठीशी सहकार करून होती.

३ : राष्ट्रीय सभेत

" सर्व धर्मांच्या व जमातींच्या लोकांना एका भूमिकेवर आणील अशी राष्ट्रीय ऐक्याची भावना प्रस्थापित करण्याचे धोरण " राष्ट्रीय सभेने आखले होते. या धोरणाचे पर्यवसान हिंदुस्थानच्या स्वयंपूर्ण स्वातंत्र्यात व्हावयाचे असल्या कारणाने " परकीयांच्या हातातील सत्ता काढून घेणे हे आपल्या लढ्याचे केंद्र असले पाहिजे " हे उघडच होय. तेवढ्यासाठी, राष्ट्रीय सभेच्या इज्जती करिता, तन–मन–धन--लेखनाने सातारा जिल्ह्याने कशी झीज सोसली हे पाहिल्यावर खुद्द राष्ट्रीय सभेच्या कार्यातील सातारा जिल्ह्याचा भाग अवलोकन करणे बरे !

१९२९ पर्यंत अव्याहतपणे राष्ट्रीय सभेची वारी निष्ठेने करणारे आणि तेथपर्यंत सर्व कमेट्यावर असलेले दादासाहेब करंदीकर यांनी राष्ट्रीय सभेचे अधिवेशनच सातारा जिल्ह्यात भरविणे बद्दल १८९५ व १९२९ अशा दोन साली तयारी दाखविली होती. सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरावयाची की नाही, असा वाद माजून पुण्यास राष्ट्रीय सभा भरते किंवा नाही याची शंका उत्पन्न झाल्यामुळे, पहिल्या खेपेस दादासाहेबांनी तार देऊन साताऱ्यास राष्ट्रीय सभा बोलावली; त्यावेळी त्यास वाईकर मंडळींचा सहकार होता. पण त्यावेळेस पुण्यासच अधिवेशन झाले. त्या नंतर तीन तपे महाराष्ट्रात अधिवेशन झाले नाही, म्हणून १९३० ची राष्ट्रीय सभा साताऱ्यास करावयाची असा सातारा जिल्हा सभेच्या कार्यकारी मंडळाने लिंब येथे ठराव (८ डिसेंबर १९२९) मुक्रर करून भाऊसाहेब सोमण, पांडुआण्णा शिराळकर, दादासाहेब करंदीकर, बुवा गोसावी, व बाबुराव वैद्य अशी मंडळी पुण्यास योजना मुक्रर करण्यासाठी गेली होती. पण पुण्याई, अपुरी पडलीच असे म्हणावे लागते !

पण याच्या पेक्षाही दादासाहेबांनी राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनातून प्रत्यक्ष भाग घेतला होता. तिसऱ्या राष्ट्रीय सभेने नेमलेल्या घटनासमितीचे ते सभासद होते; आठव्या अधिवेशनात जंगलच्या कायद्याच्या जाचकपणाचा ठरावही त्यांनी मांडला; नवव्या अधिवेशनात हिंदी टंकसाळी संबंधीच्या वाच्छांच्या ठरावास त्यांनी दुजोरा दिला, तर मुधोळकरानी ११ व्या अधि-अधिवेशनात मांडलेल्या लँडएलिनेशन – हक्काच्या ठरावास अनुमती दिली; बाराव्या अधिवेशनात चंद्ररायांच्या ज्यूरी पद्धतीचे ठरावास दादासाहेबांनी

अनुमोदन दिले, सरदार मानसिंगच्या लष्करी वरिष्ठ नोकऱ्यांच्या ठरावास (१६ व्या अधिवेशनात) पुष्टी, उच्चशिक्षणास मदत व मॅन्युअल ट्रेनिंगची आवश्यकता प्रतिपादणाऱ्या पाध्यांच्या ठरावास २० व्या अधिवेशनात दुजोरा व वरिष्ठ – कनिष्ठ कायदे मंडळे व त्यांची सत्ता वाढ व्हावी म्हणून मागणी करणाऱ्या (२१ व्या अधिवेशनात) चौधरींच्या ठरावास पुष्टी, ना. गोखल्यांच्या प्राथमिक शिक्षणावरील विधेयकाचे कौतुक करणारा ठराव गोविंदराघव अय्यरनी मांडला त्यास (२६ व्या अधिवेशनात) अनुमोदन आणि त्याच वेळी पोलीसखात्याच्या सुधारणेचा स्वतः मांडलेला ठराव -- अशी दादासाहेब करंदीकरांची थोडक्यात कामगिरी सांगता येईल.

करंदीकरांच्या प्रमाणेच नानासाहेब आगाशे व गणपतराव फणसळकर यानीही राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात प्रत्यक्ष भाग घेतला होता. प्लेग-प्रतिबंधाचा खर्च सरकारने करावा, लोकाकडून घेऊ नये या व्ही. सी. देसीकाचारीअर यांच्या (१४ व्या अधिवेशनात) ठरावास अनुमोदन व पंजाब लॅण्ड एलिनेशन बिलास (१५ वे अधिवेशनात) पुष्टी आणि अंबिकाचरण मुजुमदारानी मांडलेल्या न्याय व अम्मल बजावणीच्या विभक्तीकरणाचे ठरावास (१५ वे अधिवेशन) पाठिंबा अशी अनुक्रमे फणसळकर व आगाशे यांची कामगिरी होय.

आठव्या राष्ट्रीय सभेत मिठावरील कर, प्राप्तीवरील कर, पोलीस, लष्कर वगैरे संबंधीचा संमिश्र ठराव व चौदाव्या अधिवेशनात 'स्थानिक स्वराज्याची' सरकारने थट्टा चालविल्याबद्दल निषेधाचा ठराव असे खापर्डेनी मांडले त्याला बळवंतराव सहस्रबुद्धयांनी पुष्टी दिली.

यानंतर १९२९ साली राष्ट्रीय सभेचे विषय नियामक समितीत अप्पासाहेब आळतेकरांनी "स्थानिक स्वराज्य संस्थावर" कॉंग्रेसच्या मंडळीनी बहिष्कार घालू नये अशी सूचना पसंत करून घेतली. मॉंटफोर्ड सुधारणापासून राष्ट्रीय सभेने राज्ययंत्रणेवर घातलेल्या बहिष्कारात लोकतंत्रीय झालेली स्थानिक स्वराज्येसुद्धा येतात, अशा भ्रमात पुष्कळ मंडळी होती, तो भ्रम यायोगे उतरला. यापूर्वीच १९२५ साली बाबूराव भिडे यांनी साताऱ्यास "सार्वजनिक म्यु. मंडळ" स्थापन केले होते. आणि १९ मार्च १८९९ रोजी स्थापन झालेल्या सातारा-रेट-पेयर्स असोशिएशनचेच काम चालविले होते. ते काम, त्याची जबाबदारी व हेतू हे आळतेकरांना पटल्यामुळेच त्यांचा वरील प्रयत्न झाला.

याशिवाय, ऑलइंडिया कॉंग्रेस कमेटीवर दादासाहेब करंदीकर, आप्पासाहेब आळतेकर, पांडुआण्णा शिराळकर, भाऊसाहेब सोमण, हकीम, बुवा गोसावी यांची निवडणूक वर्ष दीड वर्ष झाली होती. अधिकारपदापेक्षा राष्ट्रीय

सभेचे पाईक म्हणून काम करण्यात सातारा जिल्ह्याने भूषण मानले आहे. करंदीकर, बळवंतराव सहस्रबुद्धे, गोविंदराव लिमये, कोठावळे, नारायणराव पाटणकर, शिराळकर अशी कितीतरी मंडळी राष्ट्रीय सभेची निष्ठावंत वारकरी असून नानासाहेब वैद्यापासून हजारो हजार स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सभेचा अभिमान सतत जागृत ठेवून जिल्ह्यात जी राष्ट्रीयत्त्वाची भूमिका सतत अढळ ठेवण्याची परंपरा पाडली, तिच्याच जोरावर, शहरांच्या तिप्पट खेडेगावातून राष्ट्रीय सभेचे सभासद हवेत हा राष्ट्रीय सभेच्या घटनेचा नवा दण्डक ही १९३५ साली आपल्या ४९०० सभासदात सातारा जिल्ह्यांने पाळला होता.

यानंतर प्रदेश काँग्रेस कमेटीमार्फत स्वामी रामानंद व यशवंतराव चव्हाण पूर्वी आप्पासाहेब आळतेकर, सोमण निवडून गेले होते तसेच ऑलइंडिया काँग्रेस कमेटीवर १९४६ नंतर निवडून गेले. यशवंतराव तर १९५७ त मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झालेवर कांग्रेसच्या वर्किंग कमेटीत तारीख तागायत समाविष्ट होत आले असून काँग्रेसच्या खजान्ची पासून जबाबदाऱ्या स्वीकारीत राहिले. पुढे पुढे त्यांच्या सल्ला मसलतीची वजनदारीही वाढत जाऊन काँग्रेस श्रेष्ठींचे ते हळू हळू विश्वास–निधान होऊन राहिले.

४ : *प्रांतिक परिषदातून*

राष्ट्रीय सभेच्या दरबारातील कामकाजांची तपशीलवार बजावणी प्रांतिक सभेमार्फत व्हावयाची. हिंदुस्थानचे राजकीय विभाग इंग्रजसरकारने पाडले आणि चालविले तसेच राष्ट्रीय सभेने प्रारंभी घेतल्याकारणाने मुंबई प्रांतिक परिषदेच्या छत्राखाली अर्थातच सातारा जिल्हा नांदे. उघडच राष्ट्रीय सभेच्या दरबारात जरी उठावाने सातारा जिल्हा १९५० पूर्वी झळकला नाही तरी प्रांतिक कारभारात वजनदार ठरला होता.

पुण्यास दुसरी प्रांतिक सभा १८८९ च्या २० ते २३ मे पर्यंत झाली. तिला सातारा जिल्ह्याचे नव्वद प्रतिनिधी गेले होते. त्याचे कौतुकच अध्यक्ष लोकहितवादी गोपाळराव हरी देशमुख यांनी केले. पुढच्या सालापासून संमती वयाच्या कायद्यासंबंधी लोकमत प्रगट व्हावयास सुरवात झाली. "सामाजिक सुधारणेसंबंधी कायद्याची जबरदस्ती सरकारने करू नये" असे लोकमत १८९७ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा जिल्ह्याने सामान्यतः प्रकट केले होते. पुण्याला वादाच्या

ठिणग्या १८९१ मे पर्यंत चकमक करीतच होत्या; त्यामुळे चवथ्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्षस्थान धुमश्चक्री घालणाऱ्या दोनही पक्षांच्या अविरोधाने वाळवे तालुक्याचे पुढारी गोविंद धोंडदेव लिमये यांच्याकडे आले. पुणे मुक्कामी ता. ११ व १२ मे रोजी झालेल्या त्या प्रांतिक अध्यक्ष स्थानावरून लिमये विचार प्रवर्तक बोलले की– "ही सभा काय किंवा तिचे उद्देश काय हे सर्वश्रुत आहेच—आज चार वर्षात तिने बरेच श्रम केले. तेव्हा तिला विघ्न येणे अनिष्ट होय. आरंभिलेले कार्य तडीस न्यावे यासाठी विघ्न टाळून टाकले, ही आनंदाची गोष्ट होय. काही गोष्टींनी दुफळी होण्याचा संभव असला तर त्या दुफळीचा त्या कृत्याशी संबंध ठेवू नये."

लिमयांच्या भाषणातील गोडी व कामातील चतुराई धारवाड येथील प्रांतिक परिषदेत बळवंतराव सहस्रबुद्धयांनी प्राप्तीवरील व मिठावरील कर कमी करण्यासंबंधी केलेल्या जोरदार भाषणात दिसून आल्यामुळे "त्यांची वाखाणणी चांगली झाली. शेतकी, व्यापार व कलाकौशल्य या विषयाबद्दल राष्ट्रीय सभेने अवश्य काळजी घेतली पाहिजे. या तीन विषयांच्या वृद्धीप्रीत्यर्थ राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक प्रतिनिधीने झीज सोसली पाहिजे." हे ता. २७ जुलई रोजी (१८९१) वृत्तसारने प्रतिपादलेले मत हेच सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय चळवळीचा प्रथमपासून ध्रुवतारा असल्याकारणाने तदनुषंगिक विषयासंबंधी सातारा जिल्ह्यातील प्रतिनिधींनी प्रांतिक परिषदातून सुद्धा आपल्या उत्साहाचा व क्वचित भाषणांचा कारंजा केला. अशामुळे १८९७ सालची प्रांतिक परिषद साताऱ्यास भरावी म्हणून दिनशा एदलजी वाच्छा यांच्या जोडीला करंदीकर, सहस्रबुद्धे, गो. वि. रानडे, गणपतराव फणसळकर यांची चिटणीस म्हणून नेमणूक झाली. पण प्लेगने सारखी गांजणूक मांडल्यामुळे १९०० सालापर्यंत तो योग जमला नाही. त्यासाली १२ व १३ मे रोजी (शनिवार व रविवार) साताऱच्या घाटे थिएटरात दहावी प्रांतिक परिषद झाली. सिंध शिवाय सगळीकडचे दोनशे प्रतिनिधी आले होते. "प्रेक्षक अफाट". रा. ब. पाठक स्वागताध्यक्ष होते. आणि गोकुळभाई पटेल अध्यक्ष होते. टिळक, आण्णासाहेब परांजपे, विजापूरकर, गोखले, छत्रे, नायर अशी मंडळी आली होती. फिरोजशहा मेहता न आल्यामुळे थोडा विरस झाला तथापी परिषदेचे काम मोठ्या उत्साहाने होऊन दुष्काळ, प्लेग, नातू प्रकरण, १८२७ चा २५० वा ठराव रद्द करणे, गुप्त समित्या मोडणे, प्राप्तीवरील कर कमी करणे, वैद्यक खात्याची सुधारणा, ज्यूरीचा हक्क वाढविणे, हत्याराचा परवाना, मादक पदार्थांचा कायदा. मीठ व जंगले बाबत सवलती असे ठराव पसार झाले.

तथापी अशा मामुली कामगिरीने त्या परिषदेचे वैशिष्टच तरी काय? पुढे राष्ट्रीय सभेत जे दोन तट पडले आणि त्या मवाळ जहालांचे भांडणापेक्षा

दोघामधील एकोप्यानेच राष्ट्रकार्य हे नहमी प्रभावशाली होईल असा सातारा जिल्ह्याने जो आग्रह धरला – चालविला, त्या दोहोंचा मुळवा अथवा उमट १९०० सालच्या प्रांतिक परिषदेत पाहण्यात आला. अध्यक्षांच्या भाषणानंतर विषयनियामक समितीच्या निवडीसंबंधी थोडा लढा पडला; तो कसाबसा मिटल्यावर निर्विवाद असे ठरावांचे मसुदे तयार झाले; पण लॉर्ड सॅन्ढर्स्टे यांच्या कारकीर्दीवर रण माजले, "दुष्काळी व्यवस्था, प्लेगचा प्रतिबंध, यःकश्चित कारणावरून केलेले वर्तमान पत्रावरील खटले, केसरीवरील खटला, नातूबंधूंची कैद, पुण्यावरील जादा पोलीस" वगैरेनी सँढर्स्टची कारकीर्द अप्रिय झाल्याचे जाहीर करणारा ठराव, सँढर्स्टचे नाव गाळून पुढे मांडला तरी अध्यक्षपद सोडून जाण्याचा धाक परेख यांनी घातला. तेव्हा तो ठराव विषय-नियामक समितीत परत घेण्यात आला.

पण अध्यक्षांचा धाक हा एक अधिकाराचा अतिक्रम आणि जो ठराव एकाने माघारी घेतला तो दुसऱ्याने पुढे आणण्यास तितकेच स्वातंत्र्य ! तेव्हा १२४ प्रतिनिधींच्या सह्यांनी १३ मे रोजी अध्यक्षांच्या हाती दोन अर्ज देण्यात आले. एकात सभेच्या संमतीशिवाय अनेक लोक विषयनियामक मंडळात घेतल्याची तक्रार होती. दुसऱ्यात असा ठराव मांडण्याची परवानगी मागण्यात आली होती. की "गेल्या काही वर्षात मुंबई सरकारच्या हातून काही गोष्टी घडल्या त्या लोकावर त्यांचा विश्वास नसल्यामुळे त्यांचा पाडाव करण्याच्या हेतूने सरकारने केलेल्या होत्या याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे. आणि सभेची अशी प्रार्थना आहे की ही राज्य पद्धती बदलून त्या ठिकाणी लोकावर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरता झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे, तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यात यावा." पण टेबलावर अर्ज येताच अध्यक्ष कावरे बावरे झाले, वय, अनुभव, विद्या, कार्याची आवड ही सर्व बाजूला राहून, "परिषद बरखास्त करून राजिनामा देऊन निघून जाण्याचा दपटशा त्यांनी दाखविला." तेव्हा प्रकरण इतके बेताला आले की सभागृहाला गुजरीचे स्वरूप आले. परिषद उधळली जाऊ नये म्हणून करंदीकर, सहस्रबुद्धे, फणसळकर वगैरे सातारकर मंडळींनी दोन्ही पक्षाना समोपचाराच्या गोष्टी सांगितल्या आणि टिळकांच्या मार्फत अशी तडजोड सुचविली की अध्यक्षानी ठराव मांडण्यास परवानगी दिली नाही तरी चालेल; परंतु अर्ज सह्यानिशी वाचून दाखवावा आणि तो दप्तरी ठेवण्यास संमती द्यावी. ही तोड सर्व संमत झाली. त्याप्रमाणे घडून आले आणि "तडजोडीच्या राजकारणाची राजधानी" असा साताराचा लौकिक झाला.

यानंतर १९०७ साली सुरतेस राष्ट्रीय सभेत जहाल, मवाळ अशा दोन फळ्या पडल्या. यावेळी साताऱ्याला विशेष खबरदारी घ्यावीशी वाटली.

१९०६ च्या कलकत्ता राष्ट्रीय सभेत पसार झालेल्या स्वदेशी, बहिष्काराच्या अनुरोधानेच १९०७ च्या प्रांतिक सभेत धोरण ठेवण्याबद्दल प्रतिनिधींना बजावण्यात आले होते. राष्ट्रीय मनोवृत्तीचा हा पारा सुरतेच्या बखेडचा नंतरही खाली उतरू नये म्हणून सातारा जिल्ह्याने काळजी घेतली. ११ आक्टोबर १९०८ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेत अध्यक्ष देसाई यानी स्पष्टच बजावले की, " हॅम्लेट नाटकातील संविधानकाची तुलना करता येईल अशी सुरतेच्या बखेडचानंतरची आपली स्थिती आहे. टिळक–गोखले यांच्यासारखे जहाल मवाल पुढारी आम्हाला श्रेष्ठ आहेत. तेव्हा त्यांनी एकीकरून राष्ट्रीय सभेचे १९०८ चे अधिवेशन भरवावे आणि राजकीय प्रगती अखंड चालवावी " कन्व्हेनशनच्या समितीतर्फे गोपाळराव देवधर व चिंतोपंत देवळे आले होते. त्यांना अशा परिषदेत सातारा जिल्ह्याचे मत कळले इतकेच नव्हे, तर प्रांतापुरती तरी एकी साधण्यासाठी सातारा जिल्ह्याने बांधलेला चंगही आढळला. दादासाहेब करंदीकर, गणपतराव फणसळकर, भाऊसाहेब सोमण प्रभृतींची एक समिती नेमून महाराष्ट्रातील जहाल मवाळांची प्रथम एकी साधण्यासाठी त्या समितीने प्रयत्न करावे असे ठरले. सदर ठरावाप्रमाणे सातारकर मंडळीनी २७ एप्रिल १९०८ रोजी झालेल्या धुळच्याच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष गणेश व्यंकटेश जोशी यांना मध्यस्थ घालून महाराष्ट्रातील एकीचा प्रयत्न करण्याचे ठरविले. कारण धुळच्याच्या परिषदेत चिंतामणराव वैद्य व न. चिं. केळकर यांच्या चिटणीशीची एक समिती नेमून राष्ट्रीय सभेत ऐक्य घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला होता; तो अनेक तऱ्हानी खटपटी करूनही फलद्रुप झाला नसला तरी गणेश व्यंकटेश जोशी यांच्या मध्यस्थीने ती जुळणी होईल अशी सातारकराना तरी आशा होती. म्हणून रा. ब. पाठकांच्या स्वतंत्र प्रयत्नाप्रमाणेच सातारा समिती जोशांच्याकडे जाऊन आली. विसाव्या शतकाच्या तोंडाशी गोखले वरिष्ठ कायदे मंडळात जोशांना अर्थशास्त्रीय गुरू मानूनच काम करीत, याची आठवण देऊन जोशांचे वजन सातारकरांनी गोखल्यांवर घातले आणि यशाची चिन्हे दिसू लागताच १९१४ साली साताऱ्यास प्रांतिक परिषदेचे अधिवेशन करून सातारकरांनी मवाळ जहालाना सांधले व त्यातूनच विकासवादाने १९१६ च्या प्रांतिक परिषदेत ऐक्य प्रस्थापित झाले.

धुळचानंतर भरणारी ही १९१४ ची प्रांतिक परिषद पहिलीच होती. ती २६ एप्रिल रोजी बेळगावचे दत्तोपंत बेळवी यांचे अध्यक्षतेखाली साताऱ्यास झाली. स्वागताध्यक्ष दादासाहेब करंदीकर होते. मवाळ-जहालांच्या एकीवरच दोघांनीही आपापल्या भाषणातून भर दिला. अध्यक्षांची सूचना नानासाहेब आगाशे यांनी मांडली, फणसळकरांनी विषय-नियामक मंडळात प्रामुख्याने भाग घेतला. १९११ च्या राज-भेटीबद्दल अभिनंदनाचा पहिला ठराव रा. ब. पाठ-

कांनी सभेपुढे ठेवला, कायदे मंडळाचे क्षेत्रविस्ताराबद्दल करंदीकरांनी ठराव पुढे आणला, कुलकर्णीवतनावरील ठरावावर (तासगावचे) रामभाऊ कुलकर्ण्यांनी अनुमोदनपर व पालीच्या धोंडोपंत कुलकर्ण्यांनी पुष्टीपर भाषण केले. आयुर्वेदीय औषधासंबंधीच्या ठरावास डॉ. भिडे व वाईचे वैद्य गाडगीळ यांनी उचलून धरले, लोकलबोर्डांच्या सुधारणेबद्दल आण्णासाहेब चिरमुले यांनी प्रस्ताव केला, घाणेकर वकीलानी जिल्हाबाबीसंबंधी कलेक्टरानी लोकांना विश्वासात घेऊन चालावे अशा ठरावाला पुष्टी दिली, अबकारीवरील ठरावास श्रोत्री वकिलानी अनुमोदन दिले, तेच काम लँड रेव्हेन्यू बिलाबाबतच्या ठरावास मुतालिक वकिलानी केले. म्युनिसिपल बिलाविषयी नापसंतीचा ठराव रामभाऊ कुलकर्ण्यांनी व प्रेस ॲक्ट संबंधीचा ठराव भाऊशास्त्री लेल्यानी सभेपुढे जारी केला. शिवाय आनंदराव शिंदे यांनी लँड रेव्हिन्यू पॉलिसीवरील ठरावास पुष्टी दिली, वगैरे सातारा जिल्ह्यातील लोकांनी १९१४ च्या प्रांतिक परिषदेत घेतलेला भाग एकादृष्टीने मामुली होता.

तथापी अडीचशेचे अडीचशे प्रतिनिधींना जे पटले व समाधानाचे वाटले ते हे :— महत्कार्य साधत असल्यास क्षुल्लक गोष्टी बाजूस ठेवण्याने मन उदार होते. सातारकर मंडळीनी समेटाचा ठराव सगळयास संमत होईल असा बेळवींच्या नेतृत्वाखाली मंजूर करून घेतला. परिषदेकरता साताऱ्यास मंडळी आल्यापासून विषय–नियामक–समितीत व २८ एप्रिल रोजी सभेच्या सुरवातीपर्यंत दोनही पक्षात कडाक्याचे वाद चालत. पण ऐक्याचे महत्त्व सगळेच ओळखत असल्यामुळे सरतेशेवटी नगरच्या चितळयांनी मांडला व शिवरामपंत परांजप्यानी अनुमोदिला तो ठराव असा :—" बेळवी, पाठक, चिंतामणराव वैद्य, चितळे, पाटणकर, गंगाधरराव देशपांडे, साने (बार्शी) या गृहस्थांना राष्ट्रीय सभेतील दोनही पक्षांचा पुढे दिलेल्या शर्तीवर सलोखा घडवून आणण्याचा अधिकार देण्यात आला आहे. शर्त अशी की ब्रिटिश साम्राज्यातील कोणत्याही सार्वजनिक भारतीय संस्थेने किंवा जाहीर सभेने प्रतिनिधी म्हणून निवडून दिलेल्या प्रत्येक मनुष्याचा काँग्रेसमध्ये प्रवेश व्हावा; मात्र त्याने हिंदी राष्ट्रीय सभा – नियमावलीच्या पहिल्या नियमातील सर्व अटी मान्य आहेत अशी लेखी कबुली दिली पाहिजे." राष्ट्रीय सभा नियमावलीतील पहिला नियम " ब्रिटिश साम्राज्यातील स्वतंत्र वसाहतीच्या राज्यपद्धतीप्रमाणे राज्यपद्धती हिंदुस्थानला मान्य करून घेणे, हे हिंदी राष्ट्रीय सभेचे ध्येय असून ते साध्य सनदशीर उपायानी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा. "

सुरतेनंतर मवाळ पक्षाने उत्पन्न केलेल्या घटनेतील कडक अटीमुळे काँग्रेसची मर्यादा संकुचित झाली होती ती विस्तृत करावी याच एका हेतूने वरील ठराव आणला असल्याकारणाने आणि त्याला मुदतही राष्ट्रीय सभांच्या

दोन अधिवेशनांचीच असल्याकारणाने तो ठराव संमत झाला. " क्षुल्लक मतभेद बाजूला ठेवून भावाप्रमाणे हातात हात घालून राष्ट्रकार्यास तयार झाल्यास राष्ट्राची शक्ति वाढेल " असे गोपाळराव गोखल्यांचे वचन आहे. त्याचा अनुभव पुढे येत गेला. लखनौच्या राष्ट्रीय सभेत सातारकरांनी १९०८ पासून धरलेल्या इच्छेला गोड फळ आले.

उवडच १९१५ चे पुण्यास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे अधिवेशनास (८,९,१० मे) सातारा जिल्ह्याचे ९५ प्रतिनिधी मोठ्या उत्साहाने गेले. बॅप्टिस्टांचे अध्यक्षते खालील त्या परिषदेत दादासाहेब करंदीकरांनी अबकारी संबंधीचा व लोकांच्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे कामी लार्ड हार्डिंज यांची मुदत वाढविण्याचा उपयोग काही होईल, अशा आशयाचा दुसरा ठराव मांडला. कुलकर्णी वतनावरील ठराव पालीच्या धोंडोपंत कुलकर्ण्यांनी मांडला. तर नरसिंह चिंतामण केळकरांच्या नेतृत्वाखाली परिषदेचे काम चालू राहण्याकरता पगारी लोकांची वर्षभर नेमणूक करावी असा आप्पासाहेब आळतेकरानी प्रस्ताव करून घेतला.

यापुढे १९१७ च्या प्रांतिक परिषदेत सांगलीच्या गणपतराव अभ्यंकरानी स्वराज्याचा ठराव मांडला. १९२० च्या सोलापुर येथील प्रांतिक परिषदेत पंजाब प्रकरणी कॉंग्रेस कमेटीच्या रिपोर्टाची मुक्तता व विलायतेस शिष्टाई, आणि (उडतरे प्रकरणातील सुद्धा) राजकीय कैद्यांची सुटका या विषयावरील ठरावास दादासाहेब करंदीकरानी पुष्टी दिली आणि लँड-ॲक्विझिशन बिलाच्या दुरुस्ती संबंधीच्या ठरावाला मारूलकर (कऱ्हाड) वकिलानी शब्दभार लावला.

असहकाराच्या पोटी १९२१ साली कॉंग्रेसने आपल्या कारभारासाठी भाषानिहाय प्रांतरचना केली व तेव्हापासून पूर्वीच्या मुंबई–इलाखा प्रांतिक परिषदे ऐवजी महाराष्ट्र प्रांतिक परिषद स्वतंत्र भरू लागली. पेण येथे दुसरी प्रांतिक परिषद भरली असता, कॉंग्रेस कार्यक्रमाबद्दलच्या ठरावास भाऊसाहेब सोमणानी पुष्टी दिली, इतकेच नव्हे तर, त्यांची नेमणूक महाराष्ट्रातील ब्राह्मण -- ब्राह्मणेतर एकत्र आणण्याच्या समितीवर झाली.

तथापी असहकाराच्या ऐन भरास ओहोटी लागण्यास १९२२ सालीच सुरूवात झाली होती. कारण १९१४ पूर्वी मवाळांच्या घटनेने जसे संकुचित स्वरूप राष्ट्रीय सभेला प्राप्त झाले होते, तसेच असहकारातून उत्पन्न झालेल्या घटनेनेही येऊ पहात होते. " महात्मा गांधींनी कॉंग्रेसची धुरा हाती घेतल्यापासून देशात जे ओज उत्पन्न झाले ते कमी न होता कॉंग्रेस-संस्था सर्वसंग्राहक कशी करता येईल हा प्रश्न सोडवणे त्यावेळी अगत्याचे होते. " सुतास मत हीच कॉंग्रेसच्या सभासदत्वाची मुख्यत्वे लायकी " त्यावेळी गणली जाई. " देशावरील सर्व पक्षांचा समावेश कॉंग्रेसमध्ये व्हावा आणि असहकारवादी

उजव्याडाव्या बगलांचे शक्तिसर्वस्व काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाच्या यशस्वीतेवर एकवटले जावे ही गोष्ट सुकर होण्याकरता, " १९०० व १९१४ प्रमाणेच साताऱ्यास पुन्हा एकदा एकीचा प्रयत्न करावा या सदिच्छेने प्रेरित होऊन सातारा जिल्ह्याचे पुढारी दादासाहेब करंदीकर व जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष आप्पासाहेब अळतेकर या उभयतांनी जळगावास १९२५ च्या प्रांतिक परिषदेला सातारा येथे आमंत्रण दिले.

मेच्या ११ व १२ तारखांस बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली व यशस्वी झाली. काही नाफेरवाल्याशिवाय, महाराष्ट्रातून सर्व पक्षांचे तीनशे प्रतिनिधी हजर होते. त्यामुळे अमृतसर काँग्रेसची प्रत्येकास आठवण येई. सांगलीच्या विठ्ठलराव जोशानी व आप्पासाहेब आळतेकरानी देशमुखांच्या अध्यक्षत्वाचा ठराव मांडला. अध्यक्षस्थानावरून देशमूख म्हणाले की– "सुताला मत हे जेव्हा काँग्रेसने मान्य केले, तेव्हा असे सांगण्यात आले की कर्तृत्ववान मनुष्य हा या संस्थेचा सभासद असला पाहिजे, सूत कातणारा हाच कर्तबगार ही व्याख्या कोठली ? " त्यापूर्वी स्वागताध्यक्ष सोमणांनी सुताच्या अटीसंबंधी चार पर्याय सुचविले होते तेः– १) स्वतः कातलेले सूत देऊन सभासद होता येते. (२) सुताच्या किंमती इतकी अल्पशी वर्गणी रोखीने देऊन काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमापैकी एखाद्याप्रीत्यर्थ प्रत्यही विवक्षित काल अंगमेहनतीने खर्ची घालणे. (३) रोखीने वर्गणी देऊन काँग्रेसच्या बहिष्कार समितीने ज्या विदेशी वस्तूंचा बहिष्कार व्यवहार्य आहे असा अभिप्राय दिला आहे, त्यापैकी एकाहून अधिक वस्तूंचा बहिष्कार आचरणात आणू असे प्रतिज्ञापूर्वक कबूल करणे. (४) रोखीने वर्गणी देऊन शहरात स्थायिक झालेल्या कोणीही सुबुद्ध अगर पांढरपेशा माणसाने खेडेगांवच्या परिस्थितीचा अभ्यास करून विधायक कार्यक्रम प्रसृत करण्याकरिता किमानपक्षी खेडेगावात पंधरा दिवस राहण्याची अट पाळणे. या पर्यायावरून सुतास मत ठेवण्यातील जो हेतू की प्रत्येक राष्ट्रभक्तानें शेतकरी गरीब वर्गाशी समरस झाले पाहिजे, तो सोमणांनी दृष्टीआड बिलकूल केला नव्हता. म्हणूनच ज्या वेळी सुताची वर्गणी रद्द करून रोख पैशाचीच वर्गणी ठेवण्याबद्दल परिषदेत ठराव आला, तेव्हा गणपतराव मारूलकर व गणपतराव आळतेकर यानी "सुतात किंवा पैशात " वर्गणी घ्यावी असा विकल्प सुचविला. हकीमनी विरोध केला. पण शेवटी "हिंदुस्थानच्या राजकारणाची गाडी फिरून लोकमान्यांच्या मार्गावर आणण्याचा निश्चय महाराष्ट्राने जाहीर केला " व सुताचीच वर्गणी रद्द होण्याचाच ठराव जवळजवळ एक मताने पसार झाला आणि तशा एकमतामुळे परिषद बोलावणाऱ्या सातारकरांचा हेतू सफळ झाला. या सभेस विठ्ठलभाई पटेल, मिसेस बेझंट, केळकर प्रभृत्ती मंडळी हजर होती.

राष्ट्रात उत्पन्न झालेले ओज कमी न होऊ देता राष्ट्रात ऐक्य नांदेल अशी काळजी घेऊन बहुजन समाजाचे हिताचे कार्यक्रम करावयाचे, हा सातारा जिल्ह्याचा ब्रीदमंत्र असल्यामुळे १९२८, १९२९, व १९३१, च्या प्रांतिक परिषदातून जिल्ह्यातील लोकांनी त्याच दृष्टीने भाग घेतला. मुंबई सरकारच्या जमीन महसुलाच्या अरेरावी धोरणाच्या निषेधास नानासाहेब देशपांड्यांनी पाठिंबा दिला, सायमन कमिशनवरील बहिष्काराचा ठराव सोमणांनी मांडला, ब्रिटिश मालावरील बहिष्काराचा ठराव आप्पासाहेब आळतेकरांनी सूपूर्त केला, व महादेवशास्त्री दिवेकरानी त्यास पुष्टी दिली. स्वदेशीचा ठराव पांडुआण्णा शिराळकरांनी सादर केला, अबकारी धोरणाच्या निषेधाच्या ठरावास दत्तुनाना करंदीकरांनी पुष्टी दिली, जिल्हानिहाय शंभर तरी स्वयंसेवक तयार करावेत म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक दले स्थापण्याचा ठराव डॉ. आठल्यांनी मांडला व प्रचारक मंडळात सोमणांची नेमणूक झाली. १९२८ त हे झाले. तर १९२९ च्या प्रांतिक परिषदेत साताराच्या ग्रामसेवा संघाच्या कार्याला मान्यता मिळाली, मद्यपान बंदीच्या ठरावाला दत्तुनाना करंदीकरानी दुजोरा दिला, परदेशी कापड बहिष्कार व स्वदेशी प्रसार हा ठराव आप्पासाहेब आळतेकरानी जारी केला; या गोष्टी प्रामुख्याने लक्षात ठेवल्या तर " राजशक्तेरधिष्ठानं लोकशक्तिर्विशिष्यते " आणि ती लोकशक्ति समर्थ व्हावयास ऐक्य व त्या ऐक्याचा पाया बहुजनहित बुद्धीची सेवा असेल तरच भारतमाता अभ्युदय पावेल, हा सातारा जिल्हयाच्या आचरणाचा ध्रुव सिद्धांत प्रत्येकास पटेलच पटेल.

९ : *जिल्हा सभा*

सन १९२५ चे प्रांतिक परिषदेच्या वेळी डॉ. ॲनि बिझांट यांचे भाषण होऊन त्यावेळचे मुंबई शेतकीखात्याचे दिवाण ना. देहलवी यांच्या हस्ते स्वदेशी प्रदर्शन आणि आण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक परिषद साजरी झाली. या तीनही प्रकरणी हे स्पष्ट निदर्शनास आले की तपशिलापेक्षा तत्त्वाचरणाला आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर असल्या शुष्कवादापेक्षा जातिवंत राष्ट्रीयत्वाला सातारा जिल्हा अधिक मानीत असून समाजात उत्पन्न झालेले ओज-तेज लवमात्र खाली न आणता सर्वांचे ऐक्य साधून सातारा जिल्हा प्रगती करू इच्छितो.

बहुजनसमाज लोकशाहीसाठी तयार व्हावा या दृष्टीने सातारा जिल्ह्याने सातत्याने सातारा–जिल्हा–सभा या संस्थेमार्फत सेवा केली आहे. "कोकोनाडा व चिंगलपट येथील समारंभासारख्या जिल्हा–सभा मुंबई

इलाख्यातही भरवा " अशी सूचना २१ जून १९०३ रोजी प्रतोदने केली तरी सातारा जिल्ह्यात जिल्हासभा मूळ धरून बसली ती १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या त्या अर्थाच्या ठरावानंतरच होय. " राष्ट्रीय सभेच्या हेतूचा प्रचार करणे, राष्ट्रीय सभेस लागणारी माहिती गोळा करणे, जिल्हाच्या औद्योगिक उन्नतीप्रीत्यर्थ झटणे " या उद्देशानी तालुकातालुक्यांचे मत घेऊन व तालुका सभा स्थापून जिल्हासभा ३० जून १९०७ रोजी घाटे थिएटरात दादासाहेब करंदीकरांच्या हस्ते अस्तित्वात आली. पहिल्या अधिवेशनाची हकीकत अशी :-

" तालुक्या तालुक्यातून सुमारे साठ प्रतिनिधी आले होते. प्रथम ४॥ वाजता राष्ट्रगीत होऊन फणसळकर वकिलांनी दादासाहेबांच्या खटपटीचे यश सांगून झाल्यावर कऱ्हाड–तासगावचे जोग यांनी सुचवून बहुलेकरानी अनुमोदन दिल्यावर करंदीकर अध्यक्षस्थानापन्न झाले. जिल्हासभा स्थापनेचा ठराव रहिमतपूरच्या गोपाळराव परांजप्यानी मांडला व तासगांवच्या रामभाऊ कुलकर्ण्यांनी अनुमोदिला. (२) ठिकठिकाणी झालेल्या व होणाऱ्या तालुका सभानी निवडून दिलेले इसम जिल्हासभेचे सभासद समजले जावे, असा ठराव विटयाचे पेण्डसे वकिलांनी मांडला, त्यास इसलामपूर येथील पाटणकर वकिलांनी अनुमोदन दिले. (३) जिल्हा सभेच्या उद्देशाचा ठराव नानासाहेब आगाशे यांनी मांडला व इसलामपूरच्या कृष्णराव देसाई वकिलानी पोक्त भाषण करून आणि वैद्य (वाई) यांनी मार्मिक विनोदी बोलून दुजोरा दिला. (४) जिल्हासभेचे कार्यकारी मंडळ म्हणून इसलामपूरचे दळवी, रहिमतपूरचे परांजपे, विटयाचे पेंडसे, वाईचे अभ्यंकर व अष्टपुत्रे, तासगांवचे भिडे, कऱ्हाडचे काका बहुलेकर, खटावचे वैद्य, दहिवडीचे पोतदार, सातारचे आगाशे, दिवेकर, डॉ. भिडे व घाणेकर असे सभासद, अध्यक्ष करंदीकर व चिटणीस फणसळकर असे नेमावे असा ठराव कऱ्हाडचे शिराळकर यांनी मांडला, हरिदास घमंडे बुवानी सुश्राव्य भाषणाने अनुमोदिला व वाईच्या अभ्यंकरानी दुजोरिला. शेवटी दळवी, अष्टपुत्रे, अभ्यंकर, शंकरशास्त्री महाजन, जोग, घोडके (खटाव), पोतदार (म्हसवड), जोशी (जावली) यांची भाषणे झाली. "

या प्रकारे सुरू झालेल्या जिल्हा सभेची पहिली नऊ अधिवेशने चिटणीस म्हणजेच स्वागताध्यक्ष धरून झाली. त्यापुढे चिटणीस व स्वागताध्यक्ष ही कामे निरनिराळचा व्यक्ती करू लागल्या. जयरामस्वामी वडगाव १९२७ च्या जिल्हा सभेपासून कार्यकारी मंडळाच्या बैठकी तालुक्यांच्या निरनिराळ्या ठिकाणी बाबूराव वैद्यांच्या सुचनेप्रमाणे भरू लागून वर्षभर जिल्हा सभेची जागृती राहू लागली. तथापी जिल्हासभेचे १९२१ अखेरचे सर्व पक्षीय स्वरूप व त्यानंतरचे केवळ राष्ट्रीयसभानिष्ठ स्वरूप ही सहजच नजरवेध करतात. त्या दोनही स्वरूपात आणखी बारकावे आहेत ते निराळेच !

सातारा जिल्हा सभा सर्वपक्षीय, तरी १९०७ च्या सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर हिंदुस्थानातील अर्भकाप्रमाणेच तिच्यावर गण्डांतर येते की काय अशी भीति होती. " जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष वामनराव घाणेकर वकील व चिटणीस फणसळकर-आगाशे ही मंडळी टिळकांच्या पक्षाला अनुयायी म्हणूनच होती. कन्व्हेन्शनचे सभासद झालेले रांगोळे, दत्तोपंत जोशी, नजमुद्दीन शेठ, अष्टपुत्रे व डॉ. भिडे इत्यादी मंडळी ' राष्ट्रीय पक्षाला समाविष्ट करून घेऊन होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या बाजूची होती. ' फार काय, श्री. वि. तथा तात्यासाहेब जोशी, वामनराव गोवईकर, रणभोर, श्रोत्री, वासुदेवराव सहस्रबुद्धे, मुंडले, सीताराम गुजर, वासुदेवराव गोळे, रघुनाथराव महाबळेश्वरकर, पुरुषोत्तमशेठ गुजर, दत्तोपंत चितळे, सोमण, लक्ष्मणराव आपटे, गणपतराव रामदास वगैरे साताराची २९,वाईची १२, जावलीचे साहेबराव जोशी, खटावचे वैद्य-इनामदार, विटचाचे पेंडसे, चावरे, लिमये, रानडे, आदि मंडळी, राष्ट्रीय पक्षाचा अंतर्भाव करणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या बाजूची असल्याबद्दल जाहीर झाले होते. राजोपाध्ये, पाठक, दिवेकर, लक्ष्मणराव जोशी हेही वरील मंडळीत समाविष्ट होते. पण उलट २ डिसेंबर १९०८ रोजी कन्व्हेन्शनतर्फे होणाऱ्या मवाळांच्या राष्ट्रीय सभेला रा. ब. पाठक, लक्ष्मणराव जोशी, दिवेकर, नाबर, कडूसकर, कऱ्हाडचे भाऊसाहेब भागवत, मारूलकर असेही प्रतिनिधी जाहीर झाले होते. पण तिसऱ्या जिल्हासभेत म्हणजे ऑक्टोबर १९०८ मध्येच असा ठराव पास झाला की :— ' अलाहबाद येथे १८ व १९ एप्रिल रोजी कन्व्हेन्शनच्या सभेत पास झालेल्या तर्जुम्यातील आर्टिकल नं. १ मधील राष्ट्रीय सभेचे हेतू सातारा जिल्हा सभेस मान्य आहेत. ' त्यामुळे राष्ट्रीय व प्रागतिक पक्षात प्रांतापुरती एकी तरी घडवून आणावी या हेतूने पाठक, आगाशे, फणसळकर यांची समितीही नेमली होती. या योजनेतील मर्म रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यासही पटले आणि सातारा जिल्ह्यातील दुफळी टळली. " टिळक-गोखल्यांच्यामुळे महाराष्ट्र त्या काळी राष्ट्रीय सभेत अग्रेसर होता. तेव्हा त्यांची एकी होऊन १९०६ चे कलकत्ता-काँग्रेसमध्ये स्वराज्य-चतु:सूत्रीमुळे उत्पन्न झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या अंशाखाली जनतेने जाता कामा नये, अशी दक्षता घेतली पाहिजे, ही सातारा जिल्ह्याची दृष्टी पुढे अभिनंदनीय ठरून यशासही गेली.

तिसऱ्या जिल्हा सभेत कन्व्हेन्शनतर्फे गोपाळराव देवधर आदि मंडळी आली होती व त्यांच्या बुद्धिवादास शिराळच्याच्या बाळाजी दामोदर प्रभृतींनीच बुद्धिवाद सांगून विषयनियामक मंडळात गप्प केले होते. कलकत्त्याच्या चतु:-सूत्रीचा प्रभाव अशा तऱ्हेने कानावर असलेले विचारवन्त जिल्ह्याच्या तेजोरक्षण तत्परतेचे व ऐक्याबद्दलच्या उत्सुकतेचे कौतुक करीत. म्हणूनच

१९०७ ते १९१० याकाळी स्वदेशीत सातारा जिल्हा सरसावल्यामुळे सरकारी इतराजीस पात्र झाला असता, दडपशाहीने दबलेल्या लोकास धीर देण्याकरता रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी बोलावल्याबरोबर जिल्हा सभेला प्रेक्षक म्हणून येत, आपल्या सल्लामसलतींचा फायदा देत आणि आपल्या अर्थशास्त्रीय सम्यग्ज्ञानावर आधारलेले एखादे व्याख्यानही देऊन जात.

" नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता " असा गणेश व्यंकटेश जोशासारखा (एक वेळचा सातारा हायस्कूलचा हेड मास्तर) गृहस्थ पाठीशी आशीर्वादाचे हात उभारून असल्यामुळे त्या धीरावर १९१३ अखेर सातारा जिल्हासभा स्थिरपणे भरत आल्या. १९१४ ची प्रांतिक परिषद भरवून मवाळ जहालांच्या एकीचा पाया सातारा जिल्ह्याने घातला व पुढे लोकमान्य मंडालेहून परत आल्यावर त्यांच्या स्वराज्य संघाच्या – होमरूलच्या चळवळीत समरस झाला.

मॉंटफोर्ड सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक अशा असल्या तरी त्या राबवून घ्याव्या असे ठरले. तरी रौलेट ॲक्ट व जालीयनवाला-बाग यांच्या कृपाप्रसादाने राष्ट्रात जो असहकाराचा कल्होळ उठला, त्यात १९२१ साली विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जिल्हासभेने असा आज्ञापक सूर काढला की राष्ट्रीय सभेतील असहकाराचा कार्यक्रम ज्याला झेपेल, तेवढ्यानीच जिल्हा सभेच्या निशाणाखाली रहावे. १९१८ साली कऱ्हाडास कृ. प्र. खाडीलकरांचे अध्यक्षतेखाली मॉंटफोर्ड सुधारणासंबंधी मतप्रदर्शन करण्याकरता जिल्हासभेचे जादा अधिवेशन भरवून सातारा जिल्ह्याने जो दम दाखविला होता, त्याला अनुरूप असाच १९२१ चा सूर होता. तथापि असहकाराचे तत्त्व राष्ट्रीय तेजोवर्धक असल्याचे कबूल असूनही चळवळीच्या तपशीलाबाबत मतभेद असणारांचा संग्रह १९२१ त जिल्हासभेच्या निघालेल्या आज्ञापक सुरात नव्हता. तेवढ्यासाठी असहकाराचा ऐन भर होता तोपर्यंत हा प्रश्न कोणी धसाला लावला नाही तरी ऑगस्ट सप्टेंबर मध्ये त्यासंबंधी वाटाघाटी सुरू झाल्या आणि १९२२ पासून जिल्हासभेची अधिवेशने जिल्हाकॉंग्रेस कमेटीच्या वतीने व परवानगीनेच भरविण्याचे ठरले. त्याप्रमाणे इसलामपूर येथे वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सभेचे पहिले अधिवेशन डॉ. भाऊराव वैद्य यांच्या पुढाकाराने भरलेही. त्या अधिवेशनात (कौन्सिल) कायदेमंडळ प्रवेशाच्या प्रश्नाचे निमित्ताने उलट सुलट बुद्धिवाद सांगण्यात आले. आणि तडजोड म्हणून परवानगीवजा कायदेमंडळ प्रवेशाला मान्यता देणारी एक उपसूचनाही आली. पण बहिष्काराचाच ठराव जिल्हासभेने मान्य केला.

" सुतास मत " व कायदेमंडळ बहिष्कारामुळे लोकमताच्या खोट्या

नांवावर होयबा हाताशी धरून सरकारने चालविलेला खेळखंडोबा पहावत नाही अशी एक फळी; तर बहुजनसमाजाच्या जीवित जपणुकीचा प्रश्न हाती घेऊन स्वावलंबनाने स्वराज्य मिळवू पहाणाऱ्या असहकाराच्या कार्यक्रमाला उचलून धरणारे निष्ठावंत आज चारच असले तरी त्यांच्या तपश्चर्येच्या जोरावरच सगळी जनता त्यांच्या मागून येईल या श्रद्धेने, सरकार कशाला लोकमत म्हणते याची पर्वा न करणारी दुसरी फळी; पहिली व्यवहार सावध तर दुसरी तत्त्वजीवन ! राष्ट्रीय पक्षातील या दुपाखी संसाराची तोंडमिळवणी करणारा कोणी सर्वमान्य "गणेश व्यंकटेश" सातारा जिल्ह्याला यावेळी न लाभता हे दोन्ही पक्ष एकमेकावर कोसळून पडण्याची दक्षता दाखवीत होते. तरी जिल्हासभेला सामुदायिक प्रगतीही सुवर्णमध्याने होते आणि सुवर्णमध्य फक्त तपशीलाच्या बाबतीतच साधावयाचा असतो, हे पूर्णपणे ठाऊक होते. काँग्रेस मधील स्वराज्य पक्षाची स्थापना आणि त्यायोगे अखिलभारताच्या वातावरणात झालेले फेरबदल यांचा व्हावयाचा तोच परिणाम सातारा जिल्ह्यावरही झाला. आणि सातारा जिल्हा सभा फिरून जयरामस्वामी वडगावला १९२७ त भरली. तेथून तिची अधिवेशने कायदेभंगाच्या चळवळीतील सरकारी दडपशाहीचा प्रतिबंध सोडला तर नियमितपणे १९३७ अखेर भरत आली होती.

सातारा जिल्हासभा १९२१ पर्यंत साधारणपणे तालुक्याच्या गावी अगर रहिमतपूरसारख्या तालुक्यातील प्रमुख गावीच भरत असे. पण असहकारातून बहुजन समाजाच्या जीवनाशी समरस होऊन राजकारणाचे खरेखुरे भागिदार जर खेडकरी शेतकऱ्यांना करावयास हवे आणि त्यादृष्टीने जिल्हा सभेचे अधिवेशन हे जर एक राजकीय शिक्षण आहे, तर जिल्हा सभेची अधिवेशने तालुक्या तालुक्याच्या पोटातील खेडेगावात झाली पाहिजेत, ही कल्पना पटल्याबरोबर जयरामस्वामी वडगाव, लिंब, चाफळ, मसूर, बिळाशी, बुध अशी गिरकी जिल्हासभेच्या अधिवेशनानी घतली. स्थळाप्रमाणे काळाचाही विचार करता मवाळ जहालांची एकी करणारी प्रांतिक परिषद भरवून ती यशस्वी करण्याच्या कामात कार्यकर्त्यांची उत्साहपूर्ण सवड आटल्यामुळे १९२४ साली १९२२ ते १९२७ मधील काळात असहकाराच्या तपशीलावरून होणारा राष्ट्रीयांचा गृहकलह टाळण्यासाठी व १९३२ व १९३३ साली कायदेभंगाच्या धुमधडाक्यात जिल्हासभा बंद राहिली आहे. एरवी ती नियमाने भरली आहे, आणि या तिच्या नियमितपणाबद्दल केसरी, बापूजी अणे, चिंतामणराव वैद्य अशानीं कौतुकही केले आहे. आता दरएक साली कार्यकर्त्यांच्या बोलावलेल्या अध्यक्षांच्या आणि राष्ट्रीय चळवळीच्या ओघांच्या दृष्टीनेच जिल्हासभेचे दिवस धरण्यात आले, ही गोष्ट खरी पण स्थळ, काळ कोणतेही असले तरी जिल्हा-

सभेचे ठराव आपआपल्या तालुक्यात व पंचक्रोशीत प्रसृत करण्याची जबाबदारी जिल्हासभेच्या प्रतिनिधीवर व हितचिंतकावर १९०७ प्रमाणेच म्हणजे आरंभासारखीच नेहमीही आहेच. याबाबतीत जिल्हासभेचे स्थळ, काळ व कार्यकारी मंडळाच्या फिरत्या बैठकी तुलनात्मक दृष्टचा स्थायी कार्य अपेक्षे इतके कसे करू शकतील ?

तथापि हा प्रश्न कोणी काढीतही नाही. स्वागत सभासद, प्रेक्षक व प्रतिनिधी याबाबत जिल्हासभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी जो उत्साह दिसला तसा पुढे स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने सरकारने निर्माण केलेल्या दहशतशाहीस बावरून जनतेला दाखविता आला नाही. पण १९१५ सालापासून म्हणजे लोकमान्य मंडालेहून सुटून येऊन राष्ट्रात फिरून चैतन्य ओतावयास त्यांनी सुरवात केल्यापासून लोकास जसा धीर येऊ लागला तशी जिल्हा सभेची आस्था जनतेने वाढत्या प्रमाणात दाखविली आणि मसूरच्या व बिळाशीच्या जिल्हा परिषदाना ३००० व ५००० शेतकरी आपुलकीने झटून आला हे राष्ट्रीय सभेशी आजवर निष्ठेने जिल्ह्यातील कार्यकर्ते वागले हे जनतेला मनोमन पटल्याचे गमकच मानण्यात आले. काही एक गैरभुलावणीने १९२० च्या रहिमतपूरचे अधिवेशनाचे वेळी सत्यसमाजाचे जलसे करण्याचा घाट घालून जिल्हासभा उधळून लावण्याचा बूट निघाला होता. पण भाऊसाहेब सोमणांसारखा लोकसंग्राहक अध्यक्ष जिल्हासभेची पहिल्यापासूनची सर्वश्रुत अशी शेतकऱ्याबद्दलची कामगिरी आणि प्रत्यक्ष त्या अधिवेशनातील कार्यपद्धती पाहून सत्यसमाजाच्या नांवावर होणारी अचरट उधळपट्टीही थंड पडली.

जिल्हा सभांच्या चिटणीसाची निवड वर्षभर काम होण्याच्या दृष्टीने जशी होई, तशीच स्वागताध्यक्षाची निवडणूक पूर्व कालीन जनसेवा (मग ती गाजावजा न करताही केलेली असेल.) जनतेवरील वजन, आणि कामाचा उरक या गोष्टी लक्षात घेऊन होई. अध्यक्षाच्या निवडणुकीतही त्यांनी केलेल्या तावत्कालपर्यंतच्या राष्ट्रसेवेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा इरादा जसा असे, तसाच प्राप्त परिस्थितीत मार्गदर्शन करणारा कुशल कर्णधार म्हणूनही त्यांच्याकड पाहण्यात येई. म्हणूनच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या गळचात जशा जिल्हा सभेने अध्यक्षपदाच्या माळा घातल्या तशाच पुण्याचे केळकर, खाडिलकर, गाडगीळ, वऱ्हाडचे वामनराव जोशी, बाबासाहेब देशमुख, माधवराव अणे, अगर गुजराथी जमनादास द्वारकादास, विठ्ठलभाई पटेल यांच्याहि गळचात घातल्या.

जिल्हा सभेच्या खर्चासंबंधी विचार करता हे सर्व सामान्यपणे सांगता येईल की पुढाकार घेणाराना त्या कार्यासाठी अखंड पदरमोडच करावी लागली आहे आणि पहिल्या तीन अधिवेशनास तर दादासाहेबांनी दोनशे ते पांचशे रुपये असे स्वतःच खर्चून तसे उदाहरण घालून दिले होते. शेतकरी

परिषदेचे आणि अगदी अलीकडे कायदेभंगाचा अगदी गरीब स्वयंसेवक हे सन्मान्य पाहुणेच समजले जात. व स्वागतसभासदांची आणि प्रतिनिधींची फी इतकी तोकडी असे की खर्चाच्या मानाने ती अपुरीच पडे. नाही म्हणावयास १९३१ साली कराची काँग्रेसने उघडा मंडप घालून काटकसरीचे उदाहरण घालून देताच त्याच धर्तीवर मसूर व बिळाशी येथे जिल्हा सभा भरल्या. तेव्हा पूर्वापार अंदाजाच्या मानाने बराच खर्च कमी येऊ लागला. तरीसुद्धा बाबूराव चरणकर प्रभृती बिळाशीकरांना मोठी घस सोसावी लागली.

स्वागताध्यक्षांची भाषणे अगर जिल्ह्यातीलच अध्यक्ष निवडलेले असतील तर त्यांची भाषणे बहुशः आपल्या स्थानिक व जिल्ह्याच्या गरजांचे आविष्करण जिल्हासभेच्या कामाचा थोडा फार आढावा आणि प्रांतिक व राष्ट्रीय प्रश्ना-वरील मार्गदर्शन यानी भरलेली असावयाची; तर जिल्ह्याबाहेरून आलेल्या अध्यक्षांची भाषणे राष्ट्रीय राजकारणांच्या गुंतागुंती सोडवून समाधान करणारी असावयाची. मधून मधून शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर अशासारख्या सन्मान्य पाहुण्यांच्या वक्तृत्वपूर्ण राजकारणी अभ्यासाचाही फायदा मिळाल्या कारणाने जिल्हासभेच्या एकंदर कामाला खरोखरच उठाव आला आहे.

या सर्वांचा आणि जिल्हासभेने पसार केलेल्या ठरावांचा विचार करता जिल्हासभेच्या कामाचा एकंदरीने आपणास आढावा काढता येईल तो असा, १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये ठरल्याप्रमाणे राष्ट्रीय सभेच्या व स्थानिक अडचणी निवारण्याच्या कार्यासाठी जिल्हासभा स्थापन झाली. अर्थात त्याच वृत्तीने अवलोकन केले पाहिजे.

१९१७ सालचे स्वागताध्यक्ष कडूसकर स्वराज्यासंबंधी बोलताना म्हण-तात की " संयुक्त राष्ट्रीय सभेच्या बाबतीत या जिल्ह्याने केलेल्या खटपटीस देशातील सर्व पुढाऱ्यांच्या सहकारितेची जोड मिळाल्या कारणाने त्या प्रयत्नास पूर्ण यश प्राप्त झाले व डिसेंबरात (१९१६) लखनौ येथे पहिली संयुक्त राष्ट्रीय सभा भरून तीजमध्ये स्वराज्याचा ठराव एकमताने मान्य झाला ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. " पण काळ बदलला तशी सरकारची धोरणे व जनतेच्या चळवळीची दिशाही बदलली आणि १९२१ साली जिल्हा सभेने असहकारास जशी संमती दिली तशी ' नागपूरच्या काँग्रेसने ठरविलेल्या हिंदु-स्थानच्या लोकांनी सर्व न्याय्य व शांततेच्या मार्गांनी मिळविण्याच्या स्वराज्यास'ही संमती दिली. पुढे १९२९ साली, सर्वपक्षीयपरिषदेने परिश्रमपूर्वक तयार केलेल्या "नेहरू रिपोर्टास" सातारा जिल्हा सभेनें संमती दिली; येवढेच नव्हे तर " लाहोरच्या राष्ट्रीय सभेने मान्य केलेले पूर्ण स्वराज्याचे ध्येय या सभेस मान्य असून त्याबाबत काँग्रेसने केलेल्या ठरावास या सभेचा पूर्ण पाठिंबा आहे. " असाही ठराव १९३० साली जिल्हा सभेने

केला. स्वातंत्र्यसार ठरावाला एकदा अशी मान्यता दिल्यावर हे जिल्हा सभस क्रमप्राप्तच होते की आता ज्या होअर विलिंग्डन सु (?) धारणा येणार आहेत त्या संबंधी १९३४ साली जिल्हा सभेने खालील ठराव करावा:-

त्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला बाधक संस्थानीप्रजेचे प्रतिनिधित्व नाकारणाऱ्या आणि साम्राज्यशाही कायम करणाऱ्या त्याचप्रमाणे मॉंटफोर्ड घटनेपेक्षाही कित्येक महत्त्वाच्या बाबतीत पिछेहाटीच्या आहेत म्हणून त्या सुधारणा त्याज्य आहेत. "

अर्थात राष्ट्रीय आकांक्षांबरोबर सातारा जिल्ह्याने आपल्या आकांक्षा राखल्या. त्या आकांक्षा वर्तनांतरित करण्यासाठी नेहमी अडचण जी येते ती बहुधा हिंदूमुसलमानांच्या बेकीची. सातारा जिल्ह्यापुरताच विचार केला तर हा प्रश्न स्वतंत्र तीव्रतेने येथे कधीच उभा नव्हता. पण उत्तर हिंदुस्थानचे वारे जिल्ह्यात कधी कधी चार दोन दिवस भोवते असा अनुभव आल्या कारणाने, आणि मोर्लेमिंटो सुधारणांनी मुसलमानांचा सवतासुभा पाडून " हिंदु हिंदुस्थान व मुसलमान हिंदुस्थान " असली राजकीय छकले सुरू केली. त्या धोरणाला १९२७ पासून इस्लामी संस्थामार्फत ऊत आल्या कारणाने " तसल्या धोरणांचा राष्ट्रीय सभेने स्वीकार करू नये " अशा इषाऱ्याच्या विनंतीचा ठरावही जिल्हा सभेने १९२८ साली केला होता.

तथापि हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मणब्राह्मणेतर कोणीही असला तरी तो आपआपल्यापरी स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध, आणि सुखी घटक झाल्याखेरीज राजकीय तत्त्वज्ञान अगर त्याने मिळालेले स्वातंत्र्य टिकणारे नव्हे, म्हणून गांधींनी ग्रामोद्धाराची चळवळ काढल्यावर वा मूलभूत हक्काचा कराची येथे तीस कलमी ठराव कॉंग्रेसने केल्यावर सातारा जिल्हा सभेने मान्यता दिली तर जिल्हासभेचे वैशिष्टच काहीच नव्हे. पण वस्तुस्थिती अशी आहे की जिल्हासभेच्या जन्मापूर्वीपासून सहस्रबुद्धे व करंदीकर यांनी शेतकऱ्यात राज्यघटनेचा व आपली दुःखे नाहीशी करून घेण्याच्या मार्गाचा फैलाव करण्याकरता आपल्या " सहस्रकर " छापखान्यामार्फत साध्या भाषेत शेकडो पुस्तके वाटून जो उपक्रम केला, त्याच्या हेतूची परिपूर्तता जिल्हा सभेने अव्याहत केली आहे. शेतसाऱ्यात सूट, शेतसाऱ्याच्या थकबाकीमुळे होणाऱ्या खालसा जमिनीविरुद्ध तक्रार, रानडुकरापासून त्रास होतो म्हणून शेतकऱ्यास योग्य हत्यारे बाळगण्याची परवानगी, दुभत्या व शेतीच्या उपयोगाची जनावरे जोपासावी म्हणून गायराने व जंगलच्या सवलती, कृष्णा कॅनॉलवरील पाण्याच्या सोई, उसाच्या लागवडीबाबत व गुऱ्हाळाबाबत सुधारणा व्हावी म्हणून सरकारी मॉडेल फार्मची आवश्यकता, गुरांच्या दवाखान्यागणिक एक एक वळू ठेवून सशक्त बैलांच्या उत्पत्तीची जरूरी, गोरक्षण, अन्यायाची व पिळून काढणारी सारा-

वाढ बंद झालीच पाहिजे असा अट्टाहास, पुरवणी धंदा म्हणून राहाटावर शेतकऱ्यांनी सूत काढण्याची शिफारस, शेतकऱ्यांच्या कायदेशीर चळवळीस सरकारने प्रतिबंध करण्याकरता हात उचलताच तीव्र निषेध, कोयनाधरणासंबंधीचे सरकारी धोरण स्पष्ट करण्याची मागणी, तुकडेपट्टीच्या बिलाची खेच, इनामदारांचा खंड बदलणाऱ्या धान्याच्या भावाप्रमाणे घेण्याची शिफारस, शेतीच्या मालावरील अन्याय्य दस्तुऱ्या विरुद्ध तक्रारी, शेतकरी पूर्ण ऋणमुक्त व्हावा म्हणून शेतकरी बँकांची व्यवस्था वा भावनगरसारखी योजना करण्याबद्दल शिफारस, या सगळ्या निरनिराळ्या ठरावातून आलेल्या गोष्टी सातारा जिल्ह्यातील मुख्य समाज जो शेतकरी त्याच्या जिव्हाळ्याच्या आहेत.

या गोष्टी वर्तनांतरित व्हावयाच्या आणि त्या बहुजन समाजाच्या बहुजनसमाजाने करावयाच्या तर सहकारी पतपेढ्या, इन्कम्-टॅक्सच्या तत्त्वावर शेतीच्या निव्वळ उत्पन्नावर सारा, आणि शेतकरी जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूवर प्रत्यक्षच काय पण अप्रत्यक्ष कर देखील कमालीचे कमी असले पाहिजेत. जिल्ह्याची औद्योगिक पहाणी करून अस्तित्वात असलेल्या उद्योगधंद्यास सरकारने मदत करावी आणि लोकांनी लुप्त झालेल्या उद्योगांचे पुनरुज्जीवन व असलेल्या उद्योगांचे उत्तेजन करावे. औद्योगिक शाळा जिल्ह्याच्या मध्यवर्ती जागी सुरू करून ती लोकलबोर्डाचे ताब्यात असावी. कऱ्हाडच्या आगपेट्यांचा कारखान्याला किंवा नांगराऔतांच्या कारखान्याला सरकारने व रेल्वेने सवलती द्याव्या. स्वतःच्या शेतावरील कामाचे अभावी शेतकरी ज्यावेळी मजूर म्हणून कामावर जातो, त्यावेळी त्याला आठ तासापेक्षा जास्त काम पडू नये, योग्य मजूरी मिळावी व माणुसकीचे सर्व हक्क असावे. असेही ठराव जिल्हासभेने पास केले आहेत.

हरिजनांची अस्पृश्यता ही "सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टीने हानिकारक आहे." असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून त्यांच्या उन्नतीची शिकस्त करावी असा इषारा जसा जिल्हासभेने दिला आहे तसा कुलकर्णी वतनासंबंधीचा कुलकर्णी मंडळींच्या म्हणण्याचा सरकारने सहानुभूतीने विचार करावा, आणि इनामदारांच्या वसुलासंबंधीची जबाबदारी सरकारने आपल्या सारा वसुलीबरोबरच पत्करावी असाही अभिप्राय जिल्हासभेने प्रकट केला आहे. आपल्या हद्दीतील संस्थानिकानाही "आपल्या प्रजेला जबाबदारीचे स्वराज्य द्या" असा निर्वाळ्याने विनंती करणारा ठराव जिल्हासभेने वेळोवेळी केला.

तात्पर्य समाजात अन्यायित कोणी राहू नये आणि सर्वांचे हितसंबंध अविरोध नांदावेत म्हणून जिल्हासभेने काळजी घेतली असून त्या हितसंबंधाचे कपाळ ज्याच्यायोगे फुटते किंवा उमटते ते जिल्ह्याच्या कारभाराचे सरकारी

रिपोर्ट (निदान गुप्त भाग वगळून) जनतेच्या पुढाऱ्यांना पहावयास मिळावेत आणि जनतेला विश्वासात घेऊन जिल्हादरबार कलेक्टरानी भरवावे आणि लोकांच्या सहकारितेने व्यवहार्य मार्ग काढावा, असेही ठराव जिल्हा सभेने केले आहेत.

मग प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे, सरकारी हायस्कूलातून वगैरे वाढलेले फीचे दर कमी करावे, सातारा न्यू इंग्लिश स्कूलसारख्या संस्थांची वाढ मोकळेपणाने होऊ द्यावी, शिक्षणाकरता जमविलेला, वाढलेल्या लोकलफंडासारखा पैसा शिक्षणाकरताच खर्च करावा, मोफत वाचनालयांचा प्रसार वाढवावा, आणि टिळकराष्ट्रीय विद्यालयासारख्या घाणेकरबंधू व त्यांचे सहकारी यांच्या स्वार्थत्यागाने चाललेल्या अस्सल राष्ट्रीय शिक्षण संस्थांना लोकांनी सढळ हाताने व स्थानिक स्वराज्य संस्थांनी झेंपेल तशी मदत करावी; सर्व स्थानिक स्वराज्य संस्था पूर्णपणे लोकनियुक्तांच्या असाव्या; देशीवैद्यकाचा प्रामुख्याने अवलंबन करावा; मादक पदार्थांच्या प्रसारास आळा घालून दारूचे बाबतीत जिल्हा कोरडा ठणठणीत करावा; पैसा फंडासारख्या औद्योगिक निधीस सर्वतोपरी साहाय्य करावे; स्वदेशी हे स्वराज्याचे अमोघ साधन आहे, तेव्हा वैयक्तिक झीज सोसूनही स्वदेशीच वस्तू प्रत्येकाने वापराव्या, आणि आपला पोषाख शुद्ध खादीचा ठेवावा; स्थानिक स्वराज्य संस्थानी आपल्या नोकरास द्यावयाचे गणवेश खादीचेच द्यावेत; रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाचे उतारूंच्या सुखसोईकडे लक्ष कंपन्यांनी पुरवावे व वाहतुकीच्या दृष्टीने युरोपियन, नेटिव्ह असा भेद करू नये; शेतकऱ्याला दिलेल्या कर्जावरील सावकारी व्याजाचे दर अत्यंत कमी असावे; इत्यादी स्वरूपाच्या सामान्य जीवानाला आवश्यक असलेल्या गोष्टीविषयी वर्षानुवर्ष जिल्हासभेने आपले शेकडो हात वर करून ठराव केले असले तर तिने आपले कर्तव्य केले नाही का ?

या ठरावांच्या बाबतीत जरूर तेव्हा शिष्ट मंडळे नेमून कायदे मंडळात ठराव आणवून व प्रश्न विचारून आणि सालोसाल तालुकानिहाय माणसांची कार्यकारी मंडळे स्थापून जिल्हासभेने थोडेफार कार्य घडवून आणले. पण जिल्हा सभेचा खरा विश्वास ग्रामसंघटना, सेवादल, आणि बलसंवर्धन यावर असल्या कारणाने त्या गोष्टीवर भर देऊन खेडोपाडी जागृत, सुसंघटित आणि स्वावलंबी करण्याच्या अल्पस्वल्प प्रयत्नांचे जिल्हा सभेने आदरून कौतुक केले. त्यात सातारा तालुका ग्रामसेवासंघाचे काम सत्त्व शुद्ध झालेले पाहून विलेपार्ले येथे भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक सभेनेही शाबासकी दिली होती.

असो. १९१३ साली, " आज नाही उद्या आपण आंगिकारलेल्या गोष्टींचा पिच्छा पुरवतो असे सरकारास आढळून आल्यास योग्य विचार होऊन आपल्या म्हणण्यास मान मिळालाच पाहिजे, " अशी आशेची मनोवृत्ती होती; ती दीड तपात इतकी बदलली की जिल्हा सभा बोलू लागली, " जनता जनार्दनाची

विखुरली तोंडे एका दिशेला आणून स्वातंत्र्य संपादण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले. हल्लीच्या काळी हा एकीकरणाचा मंत्र सिद्ध करावयास आपण त्यागी बनले पाहिजे. आत्मसमर्पण केले पाहिजे."

या तयारीने स्वयंसैनिकांचीही एक परिषद मसूरच्या जिल्हा सभेला जोडून झाली होती. तीत संघटनात्मक चळवळच सत्याग्रहींनी करावी असे ठरले. कारण "पुढाऱ्या इतके ज्ञान जनतेला नसले तरी जनता पराक्रमी असावी लागते."

जनतेच्या हातून पराक्रम चढत्या वाढत्या पायरीने अखंडपणे व्हावा म्हणून ज्यांनी ज्यांनी जिल्ह्यात व बाहेर आणि एकंदर राष्ट्राकरिता खटपटी केल्या त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरणही जिल्हा सभेने केले आहे. पण एवढ्याने अगर कोठे रेल्वेने सवलती दिल्या म्हणून, कलेक्टरांच्या दरबारात थोडी सहानुभूती मिळाली म्हणून, तुकडे पट्टीसारखे बिल सरकारने माघारी घेतले म्हणून, किंबहुना स्वराज्याचे जाहीरनाम्यावर जाहीरनामे निघाले म्हणून, जिल्हासभेचे समाधान नसून संपूर्ण स्वराज्य मिळाल्याशिवाय जिल्हासभेला समाधान नव्हते, की ती आपले कार्य झाले असे मानीत नव्हती. १९३५ साली तिला इतकेच समाधान होते की "लोकांनी पोटाच्या उद्योगात व प्रपंचाच्या अडचणीत सदोदित गुरफटून रहावे म्हणजे आपली चंगळ विर्वेधपणे चालेल असे नोकरशाहीच्या चालकास वाटते; पण त्यांची ही इच्छा सफल होण्याचे दिवस आता राहिले नाहीत." जिल्हा सभेला हे समाधान राजकीय चळवळीच्या अखंड सातत्याने लाभले होते. तरी कार्यकर्त्यांना संघटनेने एकसूत्री व एकमुखी काम करावयास चालना मिळावी आणि त्यायोगे सर्व आपत्तीस कारण असलेल्या पारतंत्र्याला जनतेने बाजूस सारावे, म्हणून जिल्ह्यापुरती मध्यवर्ती राष्ट्रीय संस्था काढण्यासाठी एक लक्ष रुपये जमवावेत असा ठराव मसूर जिल्हा सभेने केला. व दादासाहेब करंदीकरांनी आपल्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १९३१ सालीच त्या लक्ष रुपये निधीचा प्रारंभ जिल्ह्याचे बहिश्चर प्राण भाऊसाहेब सोमण यांच्याजवळ एक हजार रुपयांची देणगी देऊन केला होता. त्यावर जिल्ह्याचे शिक्कामोर्तब झाले. १९३७ साली बुध येथे रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झालेले जिल्हा सभेचे अधिवेशन हे "पूर्णाहुती" अधिवेशन समजले जाते. तीस वर्षातील सातत्याच्या जोरावर सात्त्विकतेने प्रांतिक परिषदांच्या अध्यक्षस्थानी विराजमान होण्याच्या तोलाचे महाभाग सातारा जिल्हा सभेला लाभले. लोकमान्यांच्या मंडालेकडील बंदिवासाच्या अगर महात्माजींच्या असहकार–कायदेभंगाच्या काळी पारतंत्र्याच्या उग्र दडपशाहीचे काळात सातारा जिल्हासभा नेमाने भरत राहिल्या. मसूर अधिवेशनासारख्या अधिवेशनास तर प्रांतिक परिषदेची प्रतिष्ठा लाभली.

५ जिल्हा सभा

अ. नं.	केव्हा	कोठे	प्रेक्षक	प्रतिनिधी	चिटणीस	स्वागताध्यक्ष	अध्यक्ष
१	३० जून व १ जुलै १९०७	सातारा	१०००	६०	ग. ब. फणसळकर	—	दादासाहेब करंदीकर
२	२० मार्च १९०८	सातारा	...	३५	,,	—	पांडुरंगराव देसाई वकील
३	११ ऑक्टोबर १९०८	सातारा	...	४१	,,	—	,,
४	१५ मे १९०९	वाई	...	५३	म. वि. काथवटे	—	कृ. प्र. खाडीलकर
५	१३।१४ मे १९१०	सातारा	...	२५	रा. ग. सोमण	—	ग. ब. फणसळकर
६	२४ एप्रिल १९११	सातारा	...	...	डॉ. भिडे	—	दादासाहेब करंदीकर
७	११ मे १९१२	कऱ्हाड	४८०	...	आप्पासोा आळतेकर	—	न. चिं. केळकर
८	८।९ जून १९१३	तासगाव	...	...	श्रीनिवास चिपाडे	—	ना. कृ. आगाशे
९	३।४ मार्च १९१५	सातारा	...	१००	ग. ब. फणसळकर	—	रा. ब. वि. ना. पाठक
१०	२२।२३ मार्च १९१६	इसलामपूर	...	१७५	आप्पासोा आळतेकर	स. वि. दळवी	रा. ब. चिं. वि. वैद्य
११	२४।२५ एप्रिल १९१७	सातारा	...	१२५	आळतेकर, गोखले	कृ. नी. कडूसकर	जम्नादास द्वारकादास
१२	१७।१८ एप्रिल १९१८	पाटण	६००	१२५	आळतेकर	गोपाळराव फडके	गंगाधरराव देशपांडे
जादा	४ ऑगस्ट १९१८	कऱ्हाड	८००	१५०	आळतेकर, भाटे	वा. गुं. धोपाटे	कृ. प्र. खाडीलकर
१३	२१ एप्रिल १९१९	वाई	४०० शेत.	...	डॉ. वैद्य	म. वि. काथवटे	लोकनायक अणे
१४	२८।२९ मार्च १९२०	रहिमतपूर	६००+१५० स्त्रिया	२५० शेत.	डॉ. वैद्य	शं. ना. महाजन	लोकप्रिय सोमण
१५	१५।१६ मे १९२१	सातारा	८००	३००	वैद्य, सोमण	गोविंदराव श्रोत्री	विठ्ठलभाई पटेल

टीप ... यांचे आकडे उपलब्ध नाहीत.

काँग्रेस नेतृत्वाखालील ५ जिल्हा सभा

अ. नं.	केव्हा	कोठे	प्रेक्षक	प्रतिनिधी	चिटणीस	स्वागताध्यक्ष	अध्यक्ष
१	२।३ डिसेंबर १९२२	इसलामपूर	१५०० हरिजनसुद्धा	२०६	शं. द. जावडेकर	डॉ. श्री. म. वैद्य	वीर वामनराव जोशी
२	२८।२९ मे १९२७	वडगाव ज. स्वामी	...	...	शंकरराव गोडसे	बंडोपंत लोमटे	बाबासाहेब देशमूख
३	७।८ एप्रिल १९२८	लिंब	१००० शेतकरी७००	...	बाबूराव वैद्य, गोडसे	धनी वेलणकर	पांडुआण्णा शिराळकर
४	२७।२८ एप्रिल १९२९	चाफळ	१२००	२५०	बुवा गोसावी, नाना सप्रे, आप्पा पेंढारकर	आण्णासो देशपांडे	न. चिं. केळकर
५	५।६ एप्रिल १९३०	सातारा	१६००	२००	भिडे, बाबूराव वैद्य	गो. वा. श्रोत्री	पंडित सातवळेकर
६	१ मे १९३१	मसूर	३१०० शेतकरी ५०० स्त्रिया ४००	३५०	बाबूराव भिडे, सीताराम गरूड	बा. शि. जोशी	लोकनायक अणे
७	२५ डिसेंबर १९३४	बिळाशी	७००० पैकी ५००० शेत.	३५०	आत्माराम पाटील	बाबूराव चरणकर	काकासाहेब गाडगीळ
८	२२।२३ मे १९३७	बुध	३०००	२००	भैय्याशास्त्री वाटवे	गौरीहर सिंहासने	रावसाहेब पटवर्धन

खास सत्याग्रही परिषद

	२ मे १९३१	मसूर	८००	३६४		ग. ज्ञा. बटाणे	सौ. लीलावती मुनशी

टीपः-... यांचे आकडे उपलब्ध नाहीत.

जिल्हा सभेतील ठरावांचे विषय—

(१) आर्थिक व सहकारी सोसायटचा, (२) औद्योगिक, (३) इनामदार, (४) कमिशने, (५) कारभार, (६) कार्यकारी मंडळ, (७) कुलकर्णीवतन, (८) गायराने, जंगल, (९) ग्रामसंघटना, (१०) शिष्टमंडळे, (११) देशी वैद्यक, (१२) धोरण, (१३) नवीन योजना, (१४) न्यू इंग्लिश स्कूल सातारा, (१५) पैसाफंड, (१६) प्रासंगिक, (१७) मादक पेये, (१८) मोडी लिपी, (१९) म्युनिसिपालिटचा, (२०) मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शन, (२१) राष्ट्रीय शिक्षण, (२२) रेल्वे, (२३) शेतकी, (२४) शैक्षणिक सुधारणा, (२५) संस्थाने, (२६) सेवादल व बलसंवर्धन (२७) स्वदेशी, (२८) स्वराज्य, (२९) हरीजन.

६ : कायदे मंडळात

लोकांच्या लोकांनी जाहीर परिषदातून केलेली कामगिरी संक्षेपाने पाहिल्यावर सरकारी यंत्रणेच्या सभा–दरबारातून लोकांनी काय काय महत्त्वाचे काम केले तिकडे नजर टाकणे अत्यावश्यक वाटते.

या संबंधाने विचार करताना सातारा जिल्ह्याकडे आपली माणसे स्वतंत्र्यरीत्या पाठविण्याची कामगिरी १९२० सालापर्यंत नव्हतीच म्हटले तरी चालेल. १८९२ साली प्रांतिक सरकारच्या कायदेमंडळाचा किंचित विस्तार झाल्यावर १८९५ त लो. टिळक व १८९९ त ना. गोखले यांना लोकलबोर्डाचे मताने व पुढे मोर्लेमिंटो सुधारणानंतर गणेश व्यंकटेश जोशी यांस म्युनिसिपालिटीचे मताने मुंबई कायदे मंडळात सातारा जिल्ह्याने निवडून दिले. दरम्यान सातारा जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब जिल्हा दरबार भरवून रयतेची सुखदुःखे चर्चून टाकीत. पण तेथे रयतेच्या निवडणुकीपेक्षा सरकारी निमंत्रितांचाच भरणा असल्यामुळे, १९११ साली दादासाहेब करंदीकर मुंबई कायदे मंडळात निवडून येईपर्यंत, त्यांच्यासारख्या " खेळीमेळीच्या राजकारणी " पुरुषालाही दरबारास आमंत्रण नसे हे लक्षात ठेवले तर, सातारा – जिल्हा – दरबारात रयतेच्या प्रत्यक्ष कल्याणाकडे कितपत लक्ष दिले गेले असेल याची कल्पना येईल.

तथापि असलेल्या मर्यादित कक्षेतसुद्धा डोसाभाई माणेकजी, रा. ब. पाठक, फणसळकर, करंदीकर वगैरेनी अनेक प्रश्न विचारून आणि रयतेच्या मागण्या पुढे मांडून मिळवेल तेवढा सरकारी सहानुभूतीचा ओलावा मिळविलाच. कैसरीकंदनाची धुमश्चक्री चालू असता जिल्हादरबारात रयतेबद्दल बरीच सहानुभूती प्रगट करण्यात आली व सातारा जिल्ह्यातील मर्द मराठ्यांनी रणांगणावर गाजविलेल्या पराक्रमाचे मुक्तकंठाने गोडवेही गाण्यात आले. पण अडचणीत सापडलेलें साम्राज्य, राजनिष्ठेने होणारी प्रजेची मदत आणि स्वत: कलेक्टरसाहेबांचा उदार स्वभाव यांचा एकजीव मेळ त्यावेळी होता म्हणूनच या गोष्टी घडल्या. १९२१ साली असहकाराच्या चळवळीने स्वावलंबनाचा मार्ग जनतेने अनुसरावयास सुरवात केल्याबरोबर अरेराव नोकरशाहीने जिल्हा दरबारचा देखावाही बंद केला, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. एतावता, मॉन्टफोर्ड सुधारणा येण्यापूर्वी सातारा जिल्ह्यातर्फे १९११ चे मे महिन्यात फक्त दादासाहेब करंदीकर मुंबई सरकारच्या कायदेमंडळात

जाऊन बसले होते, तेवढा गणेश व्यंकटेश जोशांच्या अकाली मृत्युमुळे आलेला कौन्सिल कामाचा वाटा जर सोडला तर माँटफोर्ड सुधारणापासूनच सातारा जिल्ह्यातील मंडळीनी कायदेमंडळातून कामे केली असे म्हणावयाचे.

१९२० साली माँडफोर्ड सुधारणांच्या पहिल्या वहिल्या निवडणूकीवर काँग्रेसने बहिष्कार घातल्यामुळे लोकमान्यांच्या डेमोक्राटिक स्वराज्य-पक्षातर्फे उभे राहिलेले भाऊसाहेब सोमण, कडूसकर, नरसिंहपुरकर बाळा-साहेब पाटील, हे घरी बसले तरी रा. ब. काळे, खा. ब. कूपर व पांडुरंगराव आढाव ही मंडळी मुंबई कौन्सिलात निवडून आली. १९२२–२३ या काळात भास्करराव जाधव सरकार नियुक्त सभासद म्हणून मुंबई कौन्सिलात बसू लागले. १९२३ साली स्वराज्यपक्षातर्फे निवडणुकी लढविल्यावर भाऊसाहेब सोमण प्रचंड बहुमताने पहिले निवडून आले, तर त्यांच्या जोडीला जाधव व कूपर कौन्सिलात शिरले. १९२६ सालच्या निवडणुकीत प्रतियोगी सहकार पक्षातर्फे कऱ्हाडचे लक्ष्मणराव देशपांडे व रा. ब. काळे आणि जाधव निवडले गेले. १९३० च्या मे महिन्यात सरकारच्या अकारण दडपशाहीच्या धोरणाचा निषेध म्हणून देशपांड्यानी राजिनामा दिल्यावर सरदार पाटण-कर काही दिवस मुंबई कौन्सिलात होते. १९३० च्या निवडणुकीत कूपर, आचरेकर, शिंदे अशी मंडळी निवडून आली आणि कूपरसाहेब प्रथम स्थानिक स्वराज्यखात्याचे दिवाण व पुढे ‘ फिनान्समेंबर ’ झाल्यावर काँग्रेसचे उमेदवार म्हणून भाऊसाहेब सोमणांचा प्रवेश कौन्सिलमध्ये झाला, आणि १९३० च्या निवडणुकीत मुंबई विश्वविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून रा. ब. काळेही निवडून आले.

या अवधीत दादासाहेब करंदीकर, सोमण, काळे, देशपांडे यांची पद्धती अशी असे की, लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न वर्तमानपत्रावरून, आपल्या निरी-क्षणावरून आणि लोकांकडून मागवून कौन्सिलात विचारावयाचे व लोकहित-दक्ष राहून सरकारी यंत्रातूनच निघालेल्या माहितीवर सरकारी कारभाराच्या चुका सरकारच्या नजरेस आणावयाच्या. दादासाहेबांनी पहिल्याच तडाख्याला ११५ प्रश्न विचारले होते आणि फक्त ७८ प्रश्नांचीच उत्तरे मिळाली. असाच मोर्चा सोमण व विशेषतः दर वेळी काळे यांनी सरकारकडे वळविला; दादा-साहेब व देशपांडे यांची बजेटवरील पहिलीच भाषणे अभ्यासू असल्याचा कबुली जबाब तत्कालीन सरकारी गोटाच्या मुख्यानी दिला; जिल्ह्या जिल्ह्याच्या कोणत्या प्रतिनिधीकडून कोणते प्रश्न विचारावे याचा विचार करून तशी व्यवस्था करंदीकर करवीत, तर काळ्यांचा अभ्यास सर्वगामी असल्याकारणाने त्यांचा चौफेर असा सनदशीर हल्ला विधायक व विघातक स्वरूपात झाल्यामुळे “ विरोधी पक्षाचे नायकत्व ” त्यांच्याकडेच १९२६ पासून पाऊण तप येऊन

येऊन राहिले होते. निवडणुकीनंतर मतदाराकडे सवड सापडेल तसे पुन्हा जाऊन त्यांच्या गाऱ्हाण्यांची समक्ष चौकशी करण्याचा पायंडा सोमणांनीच पाडला होता; तो एक दोघांनी पुढे अनुसरला. अर्थातच सातारा जिल्ह्यातर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधीत सरकारलाही कोणी मंडळी जवळ करण्याची बुद्धी कशी व्हावी ? ती झाली असती तरच नवल !

असो. १९०८ साली स्वतःचे हजारावर आणि जिल्ह्यातील लोकांनी दिलेले दोन हजार रुपये घेऊन इंग्लंडातच लोकमान्य टिळकांच्या खटल्यात वकिली करावयास गेलेले दादासाहेब करंदीकर १९११ साली मंबई कायदे मंडळात निवडून येताच त्यांना दिल्ली येथील त्या सालच्या बादशाही राज्यारोहण समारंभास आमंत्रण आले होते, आणि दादासाहेब गेलेही होते. ब्रिटिश साम्राज्य म्हणजे जगाचा एकपंचमांश भाग ! भारत ब्रिटिशसाम्राज्याचा चौतकोर क्षेत्रफळाने, पण पाऊण पट लोकसंख्येने ! मुंबई प्रांतासाठीचा तंबू बादशाही तंबूपासून दिल्लीस पांच मैलावर ! रामायण-महाभारतातील तळांची आठवण दादासाहेबांना झाली ! ना. गोखले प्रभृतीना भेटून काँग्रेसमध्ये एक फळी करण्याची दादासाहेबांनी बोलणी केली. बहुधा शेवटच्या बादशाही दरबारातील बोलणी ! ! पण त्यांचे कायदेमंडळातील काम मात्र बादशाही दरबारी थाटाचे न होता, १९१८ साली विलायतेत काँग्रेसचे शिष्ठ म्हणून जसे लोकांच्या मागण्या पुरस्कारणाऱ्या वकिलीचे झाले, तसेच १९११ ते १९१२ अखेर "तुटमुदतीचे" कौन्सिलात झाले. वैद्य नोंदणीच्या कायद्याचे विधेयक पहिल्या वाचनासाठी पुढे आले त्यावेळी त्यातील जाचकपणा करंदीकरांनी दाखविला; डि. पो. ॲक्ट व बॉम्बे सिव्हिल कोर्ट ॲक्ट यामध्ये लोकसुखकारक दुरुस्त्याबद्दल आग्रह धरला; १९१२ साली पोलीस खात्याला वीस हजार रुपये खैरात म्हणून काढले असता त्याला विरोध केला, "लोकांच्या वाढत्या दारूबाजीस आळा पडणे शक्य असेल तर त्या करता सरकार अबकारीचे सर्व उत्पन्न गमावण्यास खुषीने तयार होईल." या सरकारने १८४४ साली दिलेल्या आश्वासनाची आठवण देऊन विविक्षित निवडक स्थळी तरी दारूची अजिबात बंदी मागितली; रयतेच्या सांपत्तिक स्थितीची चौकशी करण्याची आवश्यकता आणि शेतकऱ्यांचा सारा कमी होण्याचे दृष्टीने फेरपाहणी होण्याची जरूरी प्रतिपादन केली; आणि शेवटी अबकारी रेव्हिन्यूमधून योग्य रक्कम डिस्ट्रिक्ट बोर्डास मिळालीच पाहिजे असा आग्रह दादासाहेबांनी धरला. कायदेमंडळातील लोक तुटपुंज्या अधिकार क्षेत्राच्या मोर्ले–मिंटो सुधारणांच्या कायदेमंडळात दादासाहेबांनी कामाचे हे जे वळण लावून दिले त्याच्याच पुस्त्या माँटफोर्ड सुधारणांच्या विस्तृत अधिकारांच्या कायदे मंडळातही सातारा जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी काढल्या. आचरेकरानी १९३२ साली काळचांच्या बरोबरीने सरकारी फर्मानशाही कायद्याला

विरोध केलाच पण १९३५ मध्यें फर्मानी कायद्यांच्या निषेधार्थ आचरेकरही कौन्सिलातून उठून आले. १९३५चे कायदेमंडळाच्या प्रतिनिधींनी प्रत्येक विषयावरील लोकमत पडताळून कायदे करण्यास सरकारी यंत्रणेला जरूर तो सहकार देणे, होऊ घातलेल्या व झालेल्या कायद्यासंबंधी लोकमत सुशिक्षित करणे, प्रत्येक विषयाची वास्तववादी हिशोबी माहिती गोळा करणे, आणि निवडणुकीचे वेळी कोणी कोणास विरोध केला असला तरी, निवडून आल्यावर सर्व प्रतिनिधींनी सहकार समन्वयाने वागणे, ही कर्तव्ये मानावीत, असा दंडक दादासाहेबांनी घालून दिला होता. (करंदीकर दैनंदिनी ५–११–१९३२) दुसऱ्या बैठकीत असा ठराव आचरेकरानी आणला की "सातारा जिल्ह्यातील लोकलफंड दोन आणे आहे तो एक आणा निदान दीड आणा करावा." शेतकऱ्याकडून वसूल केलेला हा लोकलफंड वास्तविक सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाकरता असताना डॉ. परांजप्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यात अभिप्रेत असलेली सरकारी ग्रँट सरकार सातारा जिल्हा लोकलबोर्डाला देऊ शकत नाही म्हणून, लोकलफंडाचे पैसे बोर्डाजवळ लाखानी उगाच उरले किंवा मूळ हेतूपेक्षा अन्य प्रवाही सरकू लागले.

डॉ. परांजपे यांच्या प्राथमिक शिक्षणाचे कायद्यासंबंधात भास्करराव जाधवांनी प्रशंसनीय कामगिरी मिळालेल्या स्वायत्ततेप्रमाणे केली आहे. १९२३ च्या निवडणुकीत यशस्वी होऊन शिक्षणमंत्री झाल्याबरोबर परांजप्यांच्या कायद्याचीं अंमलबजावणीची जबाबदारी जाधवांवर पडली; दिवाणासुद्धा सरकारचे कारभारीमंडळ हे एक "एकत्र कुटुंब" असून "सगळ्या खात्यांच्या सोई पाहूनच कारभार हाकणे जरूर असते," म्हणून आपल्या परी आटोकाट प्रयत्न करून सातारा जिल्ह्याला प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचा फायदा जाधवांनी प्रथम दिला. सातारा जिल्ह्यावर प्राथमिक शिक्षणाकरिता तीस हजार रुपये पूर्वी सरकार खर्च करी, ते साठ हजार रुपये जाधवांच्या खटपटीने करू लागले. तथापि शिक्षण-दिवाण म्हणून त्यांची एवढीच कामगिरी नाही. इलाख्यात जेवढ्या म्हणून "बिल्डिंग ग्रॅन्टस" द्यावयाच्या उरल्या होत्या त्या जाधवांनी देऊन टाकल्या; एकच रुपया फी ठेवण्याच्या अटीवर एका बोहरीने लाख रुपयांची देणगी (व्याजातून खर्च भागविणेस) देऊन घोलका स्कूल चालविण्याची तयारी दाखवताच जाधवांनी त्याला परवानगी दिली; असहकाराच्या चळवळीत ज्या गुजराथी शिक्षकांनी भाग घेतला होता त्यांना परत कामावर घेतले; ग्रँड मेडिकल कॉलेजचा डीन युरोपियनच ठेवावयाचा असा पूर्वी अट्टाहास असे तो बदलून तेथे हिंदी माणसाची नेमणूक केली; आणि मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या करता "डिस्ट्रिक्ट स्कॉलरशिप्स" दिल्या. शिक्षण मंत्र्याप्रमाणेच १९२८ मध्ये (डॉ. परांजपे "सेक्रेटरी ऑफ स्टेट" चे

कौन्सिलात मेंबर होऊन गेल्यावर) जाधव शेतकी दिवाणही झाले. त्या कारकीर्दीत त्यांनी गो–वर्धनासाठी ग्रँटस मंजूर केल्या व इंपिरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकलचरच्या स्थापनेत भाग घेतला. या दोन दिवाणगिऱ्या शिवाय १९२२-२३ साली सरकारनियुक्त सभासद असताना व १९२६ च्या निवडणुकीनंतर शेतकी दिवाण होण्यापूर्वी, चुनिलाल मेथांच्या "एक्साईज कमेटीवर" 'तुकडेपट्टी बिलाचे कमेटीवर' व 'युनिव्हर्सिटी कमेटीवर' ही जाधवांनी कामे केली. तरीपण जाधव दिवाण झाल्यावर शेतसारा आदिकरून गरीब रयतेवरील बोजा कमी होईल ही जनतेची अपेक्षा अंशानेसुद्धा पुरी होऊ शकली नाही ही गोष्ट बरीक खरी.

युनिव्हर्सिटी बिलाने असा एक चमत्कार मुंबई कायदे मंडळात दाखविला की, काळे–देशपांडे यांच्यासारख्या सरकार-विरोधी पक्षातील माणसांनी ते विधेयक अनेक तऱ्हानी दोषपूर्ण असूनही सरकारी सभासदांच्या बरोबरीने उचलून धरले. कारण इतकेच की विश्वविद्यालयासारख्या निर्लेप शिक्षणसंस्थेत सुद्धा मुसलमानाकरिता विशेष हक्क राखून ठेवण्याची कारवाई त्यावेळी चालू होती. आणि कोणत्याही जमातीला विशेष हक्क शिक्षणसंस्थातून द्यावयाचे म्हणजे त्यांच्या पावित्र्याचे विडंबन व्हावयाचे. ते टाळण्यासाठी सरकारशी इतर समंजस सभासदाप्रमाणेच काळे-देशपांड्यानी सहकार केला. बाकी 'ये यथा मां प्रपद्यंते' हाच दंडक नेहमीचा.

देशपांड्यांच्या कामगिरीचा विचार करताना सायमन् कमिशनवरील बहिष्काराबाबत काळ्यांशी संपूर्ण सहकार त्यांनी केला. १९२६–२७ मध्ये झालेल्या सातारा जिल्ह्यातील सारावाढीची फेरतपासणी त्यांनी मागितली. फोटो रजिस्ट्रेशनला व तुकडेपट्टी बिलाला आटोकाट विरोध केला. फार काय वीस मजूर ज्या शेतात काम करीत असतील तेथील नियंत्रण फॅक्टरी ॲक्टसारखे करण्याचा अधिकार लोकलबोर्डाला देण्याची मोहिनी सरकार टाकीत असता, "आजचा मालक शेतकरी पैरेकऱ्याच्या शेतात काम करण्यास उद्या गेला म्हणून या परस्पर सहकारात मालक-मजूर प्रश्न कोठे उद्‌भवतो ?" असा प्रश्न करून ती सरकारी मोहिनी देशपांड्यांनी हाणून पाडली. याशिवाय डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटीज्, लोकल बोर्डस् व सिटी म्युनिसिपालिटीज् ॲक्ट संबंधीच्या सिलेक्ट कमेटीवर काळ्यांचे बरोबर देशपांड्यांनी काम केले असून मुंबई कायदेमंडळाच्या फिनान्स कमेटीवर त्याचप्रमाणे १९२९ मध्ये कायदे मंडळाचा प्रतिनिधी म्हणून सदर्न मराठा रेल्वेच्या सल्लागार मंडळावरही देशपांड्यांनी काम केले.

या उप्परही पाटण, जावली तालुक्यात होणारे टाटा कंपनीचे धरण लोकांच्या तक्रारीला पूर्ण अवसर देऊनच जेव्हा केव्हा व्हावयाचे तेव्हा होईल असे जे सरकारी उत्तर देशपांड्यांनी मिळविले, त्या प्रकरणाला आरंभ १९२६ चे

मार्च मधील कौन्सिलचे बैठकीत प्रश्न विचारून भाऊसाहेब सोमणांनीच केला होता. १९२३ त स्वराज्य पक्षातर्फे निवडून आल्यावर त्यांनी त्या त्रैवार्षिक कारकीर्दीत लँडरेव्हेन्यू कमिटीवर काम केले. आणि असा अभिप्राय व्यक्त केला की "उत्पन्नाच्या १७ ते ५० टक्के पर्यंत हल्ली सारा झाला असून शेतकऱ्याच्या कुटुंबाचा खर्च व लागवडीचा खर्च हे दोन्हीही ठोकळ उत्पन्नातून वजा जाता राहील ते निव्वळ उत्पन्न मानावे" हा शेतकऱ्यासंबंधी उघड उघड अन्यायावरचा तोडगा जसा सोमणांनी सुचविला, तसाच त्यांच्यावर गुपचूप होणारा आघातही उघडकीस आणला. कोणी मरे पेन्मन् नांवाचा चहाच्या मळेवाल्यांचा हस्तक सातारा जिल्ह्यात मुदतबंदीचे मजूर तीन महिने गोळा करीत (१९२५ च्या डिसेंबर पर्यंत) राहिल्याचा सरकारी जबाब १९२६ च्या मार्चमध्ये सोमणांनी एका प्रश्नाने मिळविला.

सातारा जिल्ह्यातील विशेषतः शिराळे भागातील सरकारी जंगला शेजारील खाजगी पड जमिनीत असलेली झाडे सरकारी निरख देऊनही तोडण्याची परवानगी मिळत नव्हती, तेव्हा सोमणांच्या (ऑक्टोबर १९२४) प्रश्नाने ती झाडेच मालकाकडे सोपविण्याचे काम झाले. १९२२ साली तयार झालेले कॅनॉलच्या पाण्याचे नियम सातारा जिल्ह्यातील लहान कॅनॉलना लागू करण्याचे कारण नसताना ते लागू करून अधिकाऱ्यांनी खटाव तालुक्यात वसूलही केला होता. तेव्हा १३ ऑक्टोबर १९२४ रोजी एका प्रश्नाने सोमणांनी सरकारकडून असे अश्वासन घेतले की सातारा जिल्ह्यातील कृष्णा कॅनाल आदि करून सहाही बारिक कॅनॉलवरील ३१ डिसेंबर १९२५ अखेर बागायतदाराकडे १९२९ च्या कॅनॉल नियम ११ व १२ यांची अम्मल बजावणी होणार नाही आणि एवढ्यावरच न थांबता खटाव तालुक्यातील लोकांना मुंबई सरकारचे दिवाणास भेटवून निष्कारण वसूल झालेले त्यांचे वीस हजार रुपयें सरकारकडून सोमणांनी परत देवविले. मग, लहान लहान पाटबंधाऱ्याबाबत ओढे कोरडे पडले तरी पाण्याचा कर भरावा लागे किंवा त्याची तरमात जमा होऊन तशी वसूली होई; या सर्व प्रकारास सोमणांनी आळा घालविला. जिल्हा सभेचे वेळी मागणी केल्याप्रमाणे जिल्ह्याच्या कारभाराचे अहवाल जिल्हाधिकाऱ्याकडून कायदे मंडळाच्या सभासदांना तरी विकत मिळण्याची व्यवस्था सरकारी फर्मान निघून सोमणांच्या खटपटीने झाली. या शिवाय लँड-रेव्हेन्यू कोडाच्या दुरुस्ती बिलावरील सिलेक्ट कमेटीवर व सिंध-हिंदु-मॅरेज बिलाच्या सिलेक्ट कमेटीवरही सोमणांनी मर्मग्राही कामे केली आहेतच. मुंबई कायदे मंडळात परकीय सत्तेचा सामनेवाला म्हणून उभ्या राहिलेल्या राष्ट्रीयांच्या मध्ये सोमण हे सामर्थ्याचा क्षेत्ररक्षक समजले जात होते.

१९३५ च्या पहिल्या कौन्सिल बैठकीत सोमणांनी बागलाण, कळवण मधील शेतकऱ्यांच्या दु:स्थितीसंबंधी एका ठरावाने सरकारी खडकात कोठे पाणी लागते का पाहिले, शिराळे पेट्यातील गावेच्या गावे पोस्टाच्या यत्किंचित सोयी शिवाय सुधारलेल्या इंग्रजी राज्यात असल्याचे सरकारी तोंडांनी जाहीर व्हावयास एका प्रश्नाने लावले, आणि शेवटी दुसऱ्या बैठकीत फर्मानी कायद्यांच्या जोरावर सरकार इलाखाभर ठाण्या-ठाण्याला ज्यांच्या-विरुद्ध दाद मागण्याची बंदी सर्वथैव आहे असे "चिमणे हुकूमशहा" (पेटी गव्हर्नर्स) शांततेच्या काळात अकारण निर्माण करून ठेवण्याचा आपला हट्ट सोडीत नाही असे पाहिल्यावर सरकारच्या निषेधार्थ काळे प्रभृतींच्या बरोबर सोमण यांनीही "वॉक औट" केला.

फर्मानी कायद्यांच्या जोरावर शांतता–सुव्यवस्था राखल्याचा अभिमान कोणत्याही सरकारने बाळगणे हे तत्त्वच घातुक असल्याकारणाने, सरकारच्या निषेधार्थ मेथा-गोखल्यांनी तीन तपापूर्वीच उदाहरण घालून दिल्याप्रमाणें आपण "वॉक औट" करणार असल्याचे विरोधी पक्षाचे अध्वर्यू म्हणून अगाऊ बजावूनच काळे आपल्या तत्वांकित मित्रांसह कौन्सिलातून बाहेर पडले होते. कारण ऐन कायदेभंगाचे वेळी देखील आरोपिताना न्याय मिळविण्याच्या वाटा बंद होणे काळचांना सर्वस्वी नापसंत होते, आणि म्हणूनच १९३२ च्या सप्टेंबरात, वटहुकूम मागे घ्यावे आणि १९३१ च्या फेब्रुवारीत सर्व राजबंद्याना माफी देऊन मुक्त करावे, असे ठराव काळचांनी धाडले व नैतिक विजय मिळविला. शिवाय १९३२ साली फर्मानी कायदा मुंबई कौन्सिलात पास झाला त्यावेळी काळचांनी जोराचा विरोध केला होता. अशा तीनही वेळी जिल्ह्याच्या प्रतिनिधीपैकी एकट्या आचरेकरांशिवाय दुसरा कोणताही प्रतिनिधी काळचांना पाठिंबा देत नव्हता; म्हणून जिल्ह्यात सर्वत्र असमाधान होते. १९२२ साली अशीच असमाधानाची स्थिती असताना देखील २८ जुलै रोजी राजकीय कैद्याना पहिल्या प्रतीच्या गुन्हेगारांना इंग्लंडात जशी वागवणूक देण्यात येते त्या प्रकारची इकडे देण्यात यावी, या ठरावास जोराचा पाठिंबा देऊन "लोकमताचा सल्ला न घेता आम्हीच आपल्या इच्छेप्रमाणे गोष्टी करू" अशा प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रवृत्तीबद्दल काळचांनी नापसंती दाखविली.

तथापि "केवळ लोकहितावरच दृष्टी ठेवून लोकोपयोगी बाबी सरकारने हाती घेतल्यास शक्य तेव्हा त्यांच्याशी सहकार्य व न घेतल्यास जरूर तेथे त्यांना विरोध करून लोकहित साधणे" हे काळचांचे सामान्य धोरण. त्या धोरणाप्रमाणे काम करताना प्रेसिडेन्सी एरिया (इमरजन्सी) सिक्युरिटी बिल १९२९, तुकडेपट्टी बिल व मुंबई विश्वविद्यालय बिल (१९२७) आणि लँड-

रेव्हिन्यू कोड दुरुस्ती बिल, वतन ॲक्टच्या दुरुस्तीचे बिल, डिस्ट्रिक्ट लोकल-बोर्ड ॲक्टच्या दुरुस्तीचे बिल व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचे बिल, (सर्व १९२० ते १९२३) या बाबतच्या सिलेक्ट कमेट्यांवर काळयांनी प्रामुख्याने कामे केली असून, १९२०-२३ च्या तिन्हीही फिनान्स कमेटचा, व कौन्सिल लायब्ररी कमेटी, मुसलमान वक्फ कमेटी आणि डिलिमिटेशन कमेटी १९३५ यांच्यावरही काळयांनी समर्थपणे कामे केली आहेत. त्याचप्रमाणे १९३१ साली सदर्न मराठा रेल्वे सल्लागार मंडळावर त्यांची नेमणूक झाली होती.

काळयांची बजेटावरील भाषणे " बिलातील " ठरावातील खाचाखोचा उलगडणारी अन्वेषणे, आणि देशी वैद्यक, न्याय व अम्मल बजावणी खात्यांची फारकत (१९२०-२३) व प्राथमिक शिक्षणावरील २० टक्के कपात रद्द करणे (१९३२) असे त्यांचे महत्त्वाचे ठराव कायदेमंडळात शांतपणे काम करू इच्छिणारासही प्रबोधक होतील, पण या सर्वांपेक्षा वारसा हक्कावरील करास विरोध १९३१, तुरुंगात फटक्याच्या शिक्षेस बंदी करण्याबद्दलचा आग्रह (१९२२-२३) आणि गोऱ्याच्या दंग्यात वामनराव मुकादमासारख्या प्रतिष्ठितांच्या प्राणावर बेतण्याचा प्रसंग आला होता, त्या प्रकरणी भीमभाई नाईकाबरोबर काळयांनी लावलेला छडा, यांनी काळयांची कामगिरी जो उठाव घेऊन बसली, त्याच्यावर काळयांच्या " सायमन कमिशनवर अविश्वास व्यक्त करून त्याजशी कौन्सिलने कसलाही संबंध ठेवू नये " या ठरावाने (१९२८) कळस चढविला.

मुंबई कायदे मंडळाव्यतिरिक्त मॉंडफोर्ड सुधारणान्वये आलेल्या दिल्ली-सिमल्यांच्या वरिष्ठ कायदे मंडळातही सरदार मुतालिक १९२०—२३ व भास्करराव जाधव (१९३०-३४) यांनी आणि "कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये प्रो. काळयांची टॅरिफ बोर्डावर नेमणूक झाल्यावर दादासाहेब करंदीकरांनी (१९२५) कामे केली आहेत. पैकी करंदीकरांनीच प्रकाश पत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटल्याप्रमाणे कौन्सिल ऑफ स्टेट ही काचेच्या घरातील प्रेक्षणीय वस्तु असल्याकारणाने स्वराज्य पक्षाचा एकटा एकच पाठिराखा म्हणून दादासाहेबांनी तेथील कामात कीर्ती मिळवली आणि टारिफ बोर्ड, व ली कमिशन यांच्या संबंधीच्या टीकेने सरकारी सभासदांना " आपण लोकनियुक्त मंडळात बसलो नाहीना ? " असा भ्रम उत्पन्न केला. वरिष्ठ कायदे मण्डळात सरदार मुतालिक यांनी आणीबाणीच्या प्रसंगी लोकपक्षाची बाजू पुरस्कारून व सावरून धरली म्हणूनच लोकपक्षास विजय मिळत गेले ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. मध्यवर्ती असेंब्लीचे प्रतिनिधी म्हणून मुतालिकानी १९२५–२६ साली आर्मी अकौंटस् कमेटीवर बिन सरकारी सभासद म्हणून काम केले. तसेच ना. विठ्ठलभाई पटेल अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास व सरकारी अर्थसंकल्प फेटाळला जाण्यास आपल्याच एकामताचे आधिक्य लोकपक्षाचे सेवेस मुतालिकांनी लावले. १९३२

साली प्रांतिक फ्रँचाईस कमेटीवरही त्यांनी काम केले. भास्करराव जाधवानीही असेंब्लीतील मुदतीत फर्मानी कायद्यास तीव्र विरोध करून लोकपक्षास पोषक अशी कामगिरी केली. व गोलमेज परिषदेस हजर राहण्याचाही मान मिळविला !

पसतीसच्या सुधारणाखाली १९३७ च्या निवडणुकीत मुंबई विधान परिषदेसाठी भाऊसाहेब सोमणांना काँग्रेसतर्फे उभे करण्यात आले. पदवीधरांच्या व जमीनदारांच्या इतमामी मतदार संघातून निवडणूक सातारा-पुणे जिल्ह्यातून व्हावयाची होती. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल रॅन्गलर महाजनी ह निवडणुकीस प्रागतिक पक्षातर्फे उभे होते सातारा जिल्ह्याचे हे दोघेही सुपुत्र निवडून आले. एवढेच नव्हे तर १९३७ जुलईमध्ये सोमण विधान परिषदेचे उपाध्यक्षही निवडले गेले. आणि तरीही १६ व १७ जुलई १९३८ रोजी पुणे गोखले हॉलमध्ये कूळ–कायदा, कर्ज–सवलती या कायद्यासंबंधी सभा झाली असता आपल्या मतदार संघाच्यावतीने सोमणांनी केलेले सडेतोड भाषण अनुत्तरीतच राहिले. विधान परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून सोमणांनी आपल्या मतदारांची व जिल्ह्याची सेवा अशा कसोशीने केली की, ब्रिटिश रियासतीत ज्यांचेवर अन्याय झाले होते त्यांचे न्याय्य हक्क त्यांना मिळवून दिले. प्राथमिक शिक्षकापैकी ग. पां. कुलकर्णी यांचा ए. इन्स्पेक्टर होण्याचा हक्क कितीतरी वर्षे डावलला होता तो सोमणांनी सुपूर्त केला.

भारत स्वतंत्र झाल्यावर भारताच्या सर्वच राज्यांचे राज्यपाल भारतीय नेमले गेले. १९३७ साली मुंबई विधान परिषदेचे अध्यक्ष झालेले ना. पक्वासा हे मध्यप्रदेशचे राज्यपाल म्हणून गेल्या कारणाने भाऊसाहेब सोमण विधान परिषदेचे अध्यक्ष एकमताने निवडले गेले. त्यांनी ती जबाबदारी लोकमताला मान देऊन पत्करली. भारतीय जीवनाला उच्चता आणण्याचे दृष्टीने कायदेकानू बनविण्यापासून लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यापर्यंत जबाबदाऱ्या अंगावर पडल्या असता सातारा जिल्ह्याचे गणपतराव तपासे उद्योगमंत्री होऊन आणि यशवंतरावजी चव्हाण गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी होऊन प्रत्यक्ष राजकारणाची काही सूत्रे हलवू लागले. यातच समाधान मानून ते राहिले नाहीत. तर १९४७ साली विधान परिषदेचे अध्यक्ष झाल्यापासून सोमणांनी आपले काम सर्वपक्षीयांना राजी राखून लोकसेवा बुद्धीनेच केले. लोकांना स्वाभिमानपूर्वक संथ आणि सुखी जीवन स्वराज्यात मिळाले पाहिजे, या जाणिवेने कोणत्याही पक्षाच्या विचारसरणीस पूर्ण वाव देण्याचे धोरण सोमणांनी आपल्या कारकीर्दीत निर्वेधपणे राखले होते. रामभाऊ मंडलीक, रामभाऊ खेडगीकर अशा काँग्रेस व्यतिरिक्त पक्षातील विचारवन्त नेत्यानीही सदर गोष्ट मुक्तकंठाने मान्य केली आहे. अर्थसंकलपाच्या भाषणात वैद्यक–बोर्ड निवड-

णूकीचा प्रश्न मंडलिकांनी १९४७ साली घेतला असता, त्यांनी काही तक्रार अर्ज वाचून दाखविले व ना. गृहमंत्र्यानी त्याबद्दल हरकत घेतल्यावर, कळावयाची तेवढी सगळी बाजू गृहाला कळली आहे असे पाहून सोमणांनी गृहमंत्र्यांच्या शब्दास मान दिला. सरकारसमोर प्रत्येक प्रश्नावरील लोकमत प्रगट होण्याकरिता आणि दैनंदिन लोकांची दुःखे नाहीशी होण्याकरिता, अगर लोकांना पाहिजे असलेल्या प्रगतीच्या सोई करून घेण्याकरता, विधिमंडळाचा कोणी सभासद खटपट करीत असेल तर त्याला सूचकपणे आपला नैतिक पाठिंबा देण्यास सोमण मागे घेत नसत. या जिव्हाळ्याने १९५१ अखेरपर्यंत चाललेले होते. अशा तऱ्हेने लोकविश्वासाचे सार्थक करणाऱ्या सोमणासंबंधी मुंबईचा विविधवृत्त संपादक लिहितो की :--"सोमण म्हणजे सातारा जिल्ह्यातर्फे काँग्रेस तिकिटावर प्रचंड बहुमतांनी निवडून आलेले प्रतिनिधी. गबाळ्यात जमा होण्या इतक्या साध्या पण नीटनेटक्या खादी पोशाखातील ही मूर्ती रुबाबाने शोभत नाही, वक्तृत्वाने गर्जत नाही. की एकांडी शिलेदारी करून डोळ्यावर येत नाही. मोजकी आणि मुद्देसूद पण साधी आणि सात्विक भाषा वापरून तत्त्वनिष्ठेने सोमण असे काही मर्मग्राही विवेचन करतात की लोकपक्षीयांना तर त्यांच्याबद्दल आदर वाटतोच, पण सरकारी बाकावरील प्रतिपक्षीयांनाही सोमणांच्या रेशमी रुमालाखालील अस्वली गुदगुल्या जाणवल्या तरी सोमणांबद्दल आनादर वाटत नाही."

१९३७ च्या निवडणूकीत शंकर हरी तथा तात्यासाहेब साठे, आखाडकर बाबासाहेब शिंदे, खानबहादूर कूपर, महादेव खंडेराव सावंत, पांडुआण्णा शिराळकर, आत्माराम पाटील, आण्णासाहेब कल्याणी, खानसाहेब कच्छी व शंकरराव मोहिते, निवडून आले होते. पैकी मोहिते पुढे सरकारी नोकरीत शिरल्यावर त्यांचे जागी कामेरीचे कारभारी चंद्रु पाटील निवडून आले. या सर्वांनी आपआपल्या कार्यक्षेत्राप्रमाणे लक्ष देऊन सरकारदरबारी लोकांची कामे करून व करवून घेतली. तात्यासाहेब साठेच फक्त कायदेशीर काटेकोरपणे विधिमंडळाचे कामकाजाकडे लक्ष ठेवीत आणि शिराळकर केव्हातरी प्रश्नोत्तरीत भाग घेत. तथापि १९३९ मध्ये हिटलरी होरपळ सुरू झाल्यामुळे, विधिमंडळाचे कामकाजच " इटकुली – मिटकुली " गोष्ट ठरली हेहि विसरून चालणार नाही.

त्यानंतर युद्धोत्तर व "चलेजाव" च्या चळवळीचे समाप्तीनंतर झालेल्या १९४६ चे निवडणुकीत आखाडकर बाबासाहेब शिंदे, गौरीहर सिंहासने, गणपतराव तपासे, बुवासाहेब गोसावी, व्यंकटराव पवार, के. डी. पाटील, बाबुराव गोखले, यशवंतराव चव्हाण आणि सय्यद दादामिया हे साताऱ्यातर्फे निवडून गेले. तसेच रयतशिक्षण संस्थेचे रामभाऊ नलावडे

खटाव व लक्ष्मण तात्या भिगारदेवे विटे हे अनुक्रमे नगर व सोलापूर जिल्ह्यातून निवडून आले होते.

या मंडळीना ब्रिटिश राजवटीनिष्ठेच्या प्रथम १९४६ मध्ये शपथा घ्याव्या लागल्या हे परंपरेप्रमाणे सहजच होते. पुढे १९४७ साली स्वतंत्र भारतनिष्ठेच्या व १९५० साली भारतीय स्वायत्त प्रजासत्ताकनिष्ठेच्या शपथा घ्याव्या लागल्या, हेही कालोचितच होय. १९५२ पर्यंत ही मंडळी विधिमंडळात होती. तेव्हा बाबासाहेब आखाडकर शिंदे, या ज्ञानेश्वरी भक्ताचे कार्य मागील सारखेच सर्व लोकांचा भलेपणा घेऊन चालू होते. बुवासाहेब गोसावी हेही आपल्या सज्जनपणाने सगळ्यांचा दुवा घेऊन काँग्रेस पक्षाच्या सेक्रेटरी पदावर होते व अगदी हिशोबी नेमकेपणाने त्यांनी जशी पक्षाची शिस्त सांभाळली व सांभाळवली तशीच गुणी व पात्रतासिद्ध मंडळीना त्यांच्या त्यांच्या कार्यविषयक समित्यावर काम करण्याची संधीही त्यांनी दिली. विधिमंडळात बुवासाहेब बोलले तीन वेळाच पण मुद्देसूद व आटोपशीर, के. डी. पाटील प्राथमिक शिक्षणाच्या विधेयकावर एक भाषण गाजवूनच जे बाहेर पडले, ते पुढे दुर्दैवाने देवाघरीच गेले. त्यांच्या जागी आलेले विनायकराव थोरात हे सरळ व सत्प्रवृत्त गृहस्थ आखाडकर शिंद्यांच्यासारखीच आपली कामगिरी अबोलपणे करून लोकसेवा करीत. गौरीहर सिंहासने हे बहुधा कार्यव्यापृत असून विधिमंडळात एकाच एका विषयावर बोलल्याचा दाखला आहे. गणपतरावजी तपासे हे उद्योग मंत्री प्रथम होते, आणि स्वराज्य आल्यावर त्यांनी आणखीही खाती हाती धरली. मंत्री पदावर त्यांनी दलितवर्गाची सेवा निष्ठेने केली. मच्छिमारी संस्थांना त्यांनी उत्तेजन देवविले व सातारा जिल्ह्यापुरतेच बोलावयाचे तर सातारा बस स्टॅन्ड, राणंद येथील धरण आणि साताऱ्याच्या इंडस्ट्रिअल स्कूलचा हायस्कूलात विकास विस्तार ही त्यांची चिरस्मरणीय सेवा आहे. व्यंकटरावजी पवार यांनी विधिमंडळाच्या प्रश्नोत्तरीत नियमितपणे भाग घेतला आणि त्यांच्या विविध विषयावर भाषणांची संख्या सातारा प्रतिनिधीत उच्चांकीच आहे. त्यांचा संयुक्त महाराष्ट्रासंबंधीचा सर्वत्र गाजलेला ठराव आणि श्री. शिवजयंती व टिळक पुण्यतिथीं या सार्वजनिक सुट्टया करण्याबद्दलच्या प्रश्नास मिळालेले सरकारी उत्तर सार्वजनिक चर्चेचे विषय झाले होते. बाबूराव गोखले हे काँग्रेस पक्षीय शिक्षण समितीचे जाणकार सभासद होते. आणि प्राथमिक शिक्षण विधेयकाच्या, सार्वजनिक सुरक्षिततेच्या, कूळकायदा विधेयकाच्या संबंधात ज्या चिकित्सा समित्या झाल्या त्यांवरही त्यांनी एरवी दुर्लक्षित होणाऱ्या मंडळींच्या हिताकडे आणि मुद्याकडे लक्ष घालून सेवा केली. स्वपक्षीय सरकारकडून अनवधानानेही चुका व कोणाचे अहित होऊ नये म्हणून त्यांची प्रश्नोत्तरे अचूकपणे नेमस्त असत. सहा वर्षातील प्रश्नोत्तरीचे पांच प्रसंग तर असे

आले की एखाद दुसराच प्रश्न अन्य आमदारांचा बाकी प्रश्नोत्तरी सर्व गोखल्यांचीच. प्राथमिक शिक्षण विधेयकावरील त्यांचे भाषण सरकारी यंत्रणेपासून शिक्षक वर्गापर्यंत व त्यांच्या संघटनेच्या सूत्र चालकापर्यंत मर्मग्राही व मार्गदर्शक वाटले. जंगल कायद्यावरही त्यांचे भाषण तसेच आटोपशीरपणे मर्मग्राही होते. केवळ पक्षसभेत गाऱ्हाण मांडण्याने सरकारला ते दूर दूर करण्याची निकड वाटत नाही आणि गाऱ्हाणे मांडणाऱ्या सभासदांची कामगिरीही प्रकाशात येत नाही. प्रश्नांचा तास (१९६२ साली यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री म्हणाले त्याप्रमाणे) हाही राज्यकारभार कसा चालला आहे याचे दिग्दर्शन करणारा व लोकांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडणारा असतो. रामभाऊ मंडलीक आणि कऱ्हाडचे समाज सेवक पु. पां. गोखले यांनी प्रश्नोत्तरांच्या साधनांचा विशेष उपयोग करून घेतला. मंडलीक विरोधी पक्षीय तरी होते. पण श्री. गोखले यांना प्रश्नोत्तरविषयीचा त्यांचा उत्साहच नडला अशी बोलवा आहे. (वि. स. बापट केसरी १७।४।६२)" बृहन्मुंबई योजनेच्या कायद्यावर त्यांनी तटस्थपणा स्वीकारला आणि पक्षमंडळात शिस्तीचा प्रश्न उभा करून ठेवला. गुण्ड प्रतिबंधक कायद्यातील वृत्तपत्रीय स्वातंत्र्यास आळा घालणाऱ्या कलमांचेवेळी मतदान करताना ज्यांची नावे मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदासाठी सुचवली गेली आहेत ... असे पुजारी बडवे खालच्या मानेने 'आय' म्हणत होते! पण कुठे पाटसकर व गोखले आणि कुठे हे खालच्या मानेचे "आयवाले" (विविधवृत्त ५ मार्च १९५०).

१९३७ साली सातारा प्रतिनिधी म्हणून निवडून गेलेल्या खानबहादूर कूपरानी औट महिन्यांची राजवट गाजवली होती; तर माहुलीचे सावंत हे हरीजनोद्धाराकडे लक्ष देऊन असत. १९४६ साली मुंबई विधान सभेत निवडून आलेले (रयत शिक्षण संस्थेचे) रामभाऊ नलावडे हे तर दलित वर्गांबरोबरच गरिबांच्या उन्नती साधनेसाठी दक्ष असतच; पण १९४७ नंतर जी भारताच्या प्रजासत्ताकाची घटना समिती स्थापन झाली तिचे सभासद म्हणून काम करण्याचा मोका त्यांना मिळाला. वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांस मताधिकार देण्याचा एकदम उदारपणा करण्यात जी मंडळी प्रथमपासून अनुकूल होती, तीत राम-रामभाऊ नलावडे होते.

मुस्लीम लीगच्या तिकिटावर निवडून आलेले प्रतिनिधी सय्यद दादामिया सय्यद इब्राहिम हे मूलतः शिक्षक व पुढे शिक्षणाधिकारी असल्या कारणाने, ते शिक्षण विषयात विशेष लक्ष घालीत. इतर विषयासंबंधी ते तटस्थ नसले तरी पक्ष नियंत्रणात राहून शिक्षणाशिवाय कसल्याही विषयावर तोंड उघडत नसत.

१९४६ चे निवडणुकीने सातारा जिल्ह्याचे एक प्रनिनिधी म्हणून यशवंतराव चव्हाण मुंबई विधान सभेत निवडून गेले. गृहखात्याचे उपमंत्रीपद त्यांना मिळाले. कारभार कुशलतेच्या त्या उमेदवारीत त्यांनी आपले न्यायीपण, कर्तव्य

कठोरता, समाज सेवेची कळकळ इत्यादी गुण प्रगट केल्यामुळे १९५२ साली जिल्ह्याने त्यांना आपला प्रतिनिधी म्हणून सन्मानताच, ते पुरवठा खात्याचे मंत्री झाले. तो घास मोजून अन्न विकत मिळण्याचा काळ लौकरात लौकरच संपविण्यात मध्यवर्ती ना. किडवाईंना ना. यशवंतराव चव्हाणांचा सहकार प्रभावीपणे सहाय्यक ठरला व जनतेचे हाल संपुष्टांत आले. त्यानंतर सहकार मंत्री म्हणून, जंगलमंत्री म्हणून, स्थानिक स्वराज्य मंत्री म्हणून यशवंतरावनी यशस्वी कामे केली. व "नडलेल्या खात्याचे यशस्वी मंत्री" अशी त्यांनी वाहवा मिळविली. १९५७ च्या निवडणुकीनंतर ते मुंबई राज्याचे मुख्य मंत्री झाले व आठराशे सत्तावनचा शताब्दिमहोत्सव आणि छत्रपति शिवाजी महाराजांची राज्यधारणा पं. नेहरूंच्या हस्ते त्यांनी भारतीय मान्यतेची प्रस्थापित केली. त्यावेळी ते द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्य मंत्री असताना जनतेवर गोळीबार करून राज्य करण्याची कारभार कुशलता देशाच्या लोकशाहीला मारक ठरेल, असे स्पष्टपणे यशवंतरावजींनी काँग्रेस श्रेष्ठींना बजावले म्हणूनच स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती त्वरेने होऊ शकली हे इतिहास विसरू शकणार नाही.

भाषिक वादाने भारताला ग्रासले व विनाकारण उत्साह कीर्तीला कमीपण आणले. १९१७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्ये भाषावार प्रान्तरचनेची मागणी झाली होती. व १९२० च्या नागपूर काँग्रेसनंतर भाषावार काँग्रेस कमेटया अमलात आल्या होत्या. स्वतंत्र भारतात भाषावार प्रांतरचना झाली त्यावेळी महाराष्ट्र, गुजराथ व पंजाब यांना तो दिमाख मिळाला नाही. त्यामुळे लोकात अन्यायाच्या जाणीवेने तीव्र असंतोष माजला. १९५१-५२ च्या निवडणुकीनंतर भाषावार प्रांतरचनेच्या अभिमान्यानी अन्यपक्षीयांची साथ काँग्रेसबाहेर पडून केली. काँग्रेस श्रेष्ठींना भाषावार प्रांत रचनेला विरोधी असण्यात आनंद नव्हता; मुंबई इलाख्याचा कारभार एल्फिन्स्टन्च्या वेळेपासून परिणती प्रगती राखून लौकिकाने चालत आला होता. भारताच्या एकजिनसीपणाचे प्रात्यक्षिक छोटया प्रमाणात सतत डोळयापुढे असावे आणि व्यापारकुशल गुजराथी व पराक्रमप्रभावी महाराष्ट्रीय यांच्या एकजीव मिळणीने व सामाजिक-आर्थिक सरणीने मुंबईराज्य स्वावलंबी व समर्थ रहावे अशी द्विभाषिक मुंबई राज्याच्या निर्मितीत अपेक्षा होती. ती जनतेला पटविण्याचे बाजूला राहून तो एवढया इज्जतीचा प्रश्न झाला की, गोळीबारानी लोकमताची बेपर्वाई ब्रिटिशाहीनाही मागे सारणारी झाली. तथापि १९५७ च्या निवडणुकी नंतर ना. यशवंतराव चव्हाण यांच्या धीरोदात्ततेनेच मुख्यत: व त्याचबरोबर इतरांच्या प्रयत्नसहकार सौहार्दाने १९६० च्या मे पासून महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य होऊन लोकमताचा विजय झाला. १९६२ च्या निवडणुकीनंतर फिरून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांची मुख्य कामगिरी म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण

व्यवहार शुद्ध होण्यासाठी त्यांनी १ मे १९६२ पासून अमलात आणलेला जिल्हा परिषदांचा कायदेशीर उपक्रम होय. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये यशवंतरावजींचा लोकसंग्रही व लोककल्याणकारी दृढनिश्चयाचा सेवाभाव लक्षात घेऊनच, चिनीआक्रमणाच्या (१९६२) आणीबाणीचे वेळी पं. नेहरूंनी त्यांच्या महाराष्ट्रीय अस्मितेवर संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी टाकली. त्याचे चीज, यशवंतरावजींनी काश्मीरवर व अन्यत्र पाकिस्तानने केलेल्या १९६५ च्या आक्रमणाचा धुव्वा उडविण्याचे धोरण आखून व पाकिस्तानच्या सहायार्थ भारताची कोंडी करावयास आलेल्या चिनी उद्दामपणाला तोंड देऊन (राष्ट्राची प्रतिष्ठा व आत्मविश्वास वाढविल्याने) खास केले आहे. जवानात मिळून मिसळून जनजागरण रण आणि कारभारी धोरण यांचा सहकार समन्वय घालणारा मंत्री म्हणून त्यांनी आपल्या लौकिकाने सातारा जिल्ह्याची उंची वाढविली आहे.

विरोधी पक्षीयांनाही दिलासा देऊन व लोकविश्वास संपादन करून चढत्या वाढत्या पदवीने चाललेले हे कृष्णेचे पाणी गोदावरीच्या तीर्थाभिषेकाची साथ घेऊन दिल्लीस मराठी अस्मिता गाजवीत बसले आहे. त्या यशवंतरावांच्या जोडीने १९५२ साली सातारा जिल्ह्याचे मुंबई विधि मंडळात प्रतिनिधित्व करावयास गेलेले बाबुराव घोरपडे, व्ही. एन. पाटील, गणपतरावजी तपासे, नाईक निंबाळकर, पुसेगावकर, तात्या जाधव आणि बाळासाहेब देसाई ही मंडळी जनतेच्या प्रश्नात विशेष लक्ष घालीत. पैकी गणपतरावजी तपासे, व नाईक निंबाळकर हे पूर्व क्रमानुसार मंत्रिमंडळात गेले आणि ना. मुरारजी देसाई मंत्रिमंडळाचे सभासद म्हणूनच त्यांनी दक्षतेने सेवा केली. व्ही एन. पाटील १९६२ पर्यंत विरोधी पक्षाची एक दणदणीत तोफ होती तर बाबूराव घोरपडे लढवय्ये असे काँग्रेस पक्षीय गोलंदाज असून त्यांनी परळी तारळे भागातील लोकांच्या सोयी पाहण्याकडे विशेष लक्ष पुरविले. पुसेगांवकर जाधवांनी त्यांचाच कित्ता गिरविला. पण बाळासाहेब देसाई हे आपल्या धोरणी व कारभारकुशलतेच्या पूर्वानुभवातून जनतेचे, आमदारांचे व सरकारी यंत्रणेचे असे लक्ष वेधू लागले की, १९५७ च्या निवडणुकीत ते यशस्वी झाल्यावर त्यांच्याकडे प्रथम बांधकाम मंत्रीपद आले. परळी खोरे, पाटण तालुका आणि त्यांच्या अनुषंगिक जिल्ह्यातील परिसर यांचा खरोखर कायापालट बाळासाहेबांनी घडवून आणला. हाच आपुलकीचा जिव्हाळा त्यांनी इतरही जिल्ह्यासंबंधी दाखवला. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर राज्ययंत्रणेच्या सूत्रधारांचा असा विश्वास बसत गेला की १९६२ सालच्या निवणुकीनंतरही त्यांना मंत्री मंडळात मानाचे स्थान मिळाले. शिक्षण मंत्र्यापासून गृहमंत्र्यापर्यंत आणि विधिमंडळाच्या काँग्रेसपक्षाच्या डेप्युटी लीडरपर्यंत त्यांना उंचीपदे प्राप्त झाली.

कोल्हापूर विद्यापीठाची स्थापना आणि पाकिस्तानी आक्रमणाच्या आणीबाणीत त्यांनी लोकांस विश्वासात घेऊन सांभाळलेले स्वास्थ्य व सुरक्षितता यांच्यायोगे त्यांच्या कारभार कुशलतेने जनमनांत आदराचे स्थान पटकावले आहे.

कऱ्हाड दक्षिण विभागातर्फे यशवंतराव मोहिते १९५२ पासूनच्या तीनही निवडणुकीत यशस्वी होऊन मुंबई विधिमंडळात गाजले व गरजले आहेत. पहिल्या दोन खेपेस ते काँग्रेस विरोधी पक्षात होते, तरी त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आकडेवारीने व माहितीने भरलेली असत. कोयनाप्रकल्प, अन्नधान्य–प्रश्न आणि पोलीस व्यवस्था यासंबंधी त्यांची झालेली भाषणे प्रभावीच होती. काँग्रेसचे धोरण बहुजनसमाज–सेवेस व्यवहारतः अनुकूल झाल्याचा वास त्यांना लागल्यावर ते काँग्रेस पक्षातच आले व गृहखात्याचे उपमंत्री म्हणून सत्ता पदस्थ झाले. १९६२ चे निवडणुकीत ते काँग्रेस पक्षातर्फेच निवडून आले, आणि कारभार–यंत्रणेच्या सोईसाठी म्हणून गृहखात्याच्या उपमंत्रीपदाचे जबाबदारीतून ते शेतकीखात्याचे उपमंत्री पदावर येऊन बहुजन समाजाच्या स्वास्थ्य–सुबत्ततेची सेवा करू लागले.

रहिमतपूरचे १९५७ साली निवडून आलेले विश्वासराव बापूसाहेब माने बहुजन समाजाचे दुःख निवारण करीत रहात. विट्याचे लक्ष्मणराव भिंगारदेवे १९४६ पासून मुंबई–महाराष्ट्र विधान सभेचे सभासद असून हरिजनांचे उन्नतीचे प्रश्नात आणि ग्रामोद्धाराच्या प्रश्नात आस्थेने लक्ष घालीत आले आहेत. मालोजीराव नाईक निंबाळकर, शिवाजीराव पवार, तुषार पवार, भिलारे गुरुजी, काँग्रेस पक्षीय शिस्तीने चालत असतात. केंजळ ता. वाई येथील दादासाहेब जगताप हे १९५२ पासून विरोधी पक्षातून निवडून आले तर १९६२ साली काँग्रेसतर्फे निवडून आले. ते मोठे लोकसंपर्क साधणारे व सहकारी चळवळीतील व्याप सांभाळणारे गृहस्थ असून साताऱ्यातर्फे निवडून आलेले धोंडीराम ऊर्फ दादासाहेब जगताप हे उपमंत्री पदावर आरूढ असून साताऱ्याजवळून दक्षिण रेल्वे जाण्यात व साताराची औद्योगिक उन्नती साधण्यात लक्ष घालीत आले आहेत. १९६२ साली नोव्हेंबर ११ ला ना. यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री होऊन गेल्यावर मंबई विधानसभेत त्यांचे जागी कऱ्हाड नगरपालिकेचे अध्यक्ष व राज्यपाल–नियुक्त विधान–परिषदेचे सभासद पी. डी. पाटील हे एप्रिल १९६३ मध्ये निवडून आले. राज्ययंत्रणेच्या काँग्रेस पक्षाचेच ते असल्याकारणाने त्या धोरणानेच त्यांचे काम चालू असते.

मुंबई प्रांतिक कायदेमंडळाच्या वरिष्ठ शाखेत म्हणजे विधान परिषदेत पुणे-सातारा मतदार–संघातर्फे प्रथमक्रमांकाने निवडून आलेले प्रि. रँ. गणेश सखाराम महाजनी हे त्यांच्या बरोबर निवडून आलेल्या भाऊसाहेब सोमणांच्या पुढच्या

पिढीतील सातारा जिल्ह्याचे विद्वान व विद्वन्मान्य सुपुत्र होत. गणिताचे स्मिथ प्राईज मिळविलेले मुंबई प्रांतातील हे एकमेव (१९३७ पर्यंततरी) विद्वद्रत्न १९२७ पासून युनिव्हर्सिटी टेरिटोरिअल फोर्समध्ये कमिशण्ड ऑफिसर म्हणून होते. प्रागतिक पक्षातर्फे हे निवडून आल्याकारणाने फर्ग्युसन कॉलेजच्या पूर्वसूरी प्रमाणेच (ना. गोखले, रँ. परांजपे) हे सार्वजनिक बाबतीत जातिनिरपेक्ष, वर्गनिरपेक्ष अशा दृष्टीचे, राजकारणातही केवळ आध्यात्मिक नसली तरी उच्चनैतिक पातळी सांभाळणारे आणि " प्रस्तुत अनुसरताना " ऐतिहासिक व तुलनात्मक अभ्यासाने वैचारिक आविष्कार करणारे असे कायदेमंडळाचे सभासद होते, हे सांगण्याची आवश्यकताच नाही. मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीचे तत्त्व प्रांतिक कारभारातही पाळले जाऊन मुंबई प्रांत कार्यक्षमतेने अग्रेसर राहण्यास जेवढा सहकार राज्ययंत्रणा हाताळणाऱ्या पक्षाला देणे कर्तव्य तितका त्यांनी जिव्हाळचाने दिला. प्रांताप्रांताची आणि एकंदर भारताची आर्थिक स्वायत्तता प्रस्थापित होण्यावरही त्यांचा कटाक्ष असे.

सुशिक्षित व अशिक्षित लोकांची बेकारी दूर होऊन औद्योगिक उन्नतीसाठी राष्ट्रनिष्ठेने व राष्ट्रीय दृष्टचा वर्गसमन्वयाने कार्यक्रम आखण्याबद्दल त्यानी आग्रह धरला. व शैक्षणिक संस्थातून कार्यक्षम कारागीर निर्माण होतील त्यांचा फायदा सरकारने आणि कारखानदारांनीही अग्रहक्काने घ्यावा असा डॉ. महाजनींचा नेमकेपणे रोख असे. शेतीला किफायतशीर धंद्याचे स्वरूप येणे हाच शेतकरी कर्ज निवारणाचा उपाय होय, असे त्यांनी रोकठोक बजावले. जमिनदार व कुळे आणि सावकार व ऋणको यांचे संबंध " गरजवंताला अक्कल नाही " अशा लाचारीचे वा उन्मादाचे न होता, बंधुभावाच्या नसले तरी, शेजारधर्माच्या सलोख्याचे सांभाळले जावेत असा त्यांनी राज्ययंत्रणेला इषारा केला. आरोग्याकरता मद्रासप्रमाणे मुंबईच्याही खेडचापाडचातून देशी औषधांच्या सुलभ व परिणामकारक सोयी होण्याची आवश्यकता व्यवहारशुद्ध असल्याचे त्यांनी प्रतिपादले. त्यासंबंधात जरूर तर १९१२ चा मेडिकल ॲक्ट दुरुस्त करावा आणि खेडचातून कमितकमी सहामहिने काम केल्याशिवाय कोणालाही रजिस्ट्रेशन देऊ नये असा ठराव डॉ. महाजनी यांनी ९ एप्रिल १९४७ रोजी आणला. तो थोडचाफार फरकाने मान्य झाला. १९३७ साली प्रथमच अर्थसंकल्पावर बोलताना त्यांनी खेडचापाडचात पिण्याच्या पाण्याची सोय जरूरीने केली पाहिजे असे सरकारवर ठसविले. सज्ञान लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी शिक्षणाचा सर्वत्र प्रसार आणि त्याचा व्यवहारान्तरित वापर झाला पाहिजे आणि व्यक्तिमात्राच्या कर्तृत्वाला पूर्ण वाव मिळाला पाहिजे, हे सूत्र राज्ययंत्रणेच्या डोळचासमोर अक्षय्य हवे असे मान्य करूनही उच्च शिक्षणाच्या पोषणावरील सरकारने आपले लक्ष चळ देता कामा नये; उलट उच्च शिक्षणावर प्रमाणशीर

खर्च केलाच पाहिजे असे सरकारकडून त्यांनी घडविले. तिसऱ्या अर्थसंकल्पात आदले वर्षी रँ. महाजनींनी केलेल्या सूचना सरकारने स्वीकारल्याचे स्पष्टच झाले. बिगर सरकारी कॉलेजांचे अनुदानात झालेली कपात रद्द झाली; दक्षिणा फेलोशिपच्या रकमा पुन्हा सुरू झाल्या; आणि सरकारी हायस्कूलांचे रूपांतर औद्योगिक प्रशालात झाले. प्रांतामध्ये नवीन विद्यापीठे काढण्याबद्दलचा महाजनींचा ठराव पास झाल्यावर जयकर–कमेटीची नेमणूक झाली आणि परिणामतः अनेक विद्यापीठे अमलात आली. त्यानंतर १२ आक्टोबर १९५० रोजी डॉ. महाजनींनी कौन्सिलमध्ये असा ठराव मांडला की, वेगवेगळ्या विद्यापीठाकडे त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांतील प्रशालान्त परीक्षा शिक्षणाच्या कार्यक्षमतेसाठी सोपवाव्यात. चर्चेनंतर हा ठराव परत घेतला. लष्करी शिक्षणाबद्दलचा महाजनींचा ठरावही तसाच परिणामकारक ठरला.

ना. बाळासाहेब खेरांसारख्या मुख्य मंत्र्यापासून सर्व विचारवंतांच्या आदरासच महाजनींचे काम ठरले. (१९५२ नंतर ते मग नुसत्या मुंबई प्रांताचे न उरता भारतीय महत्त्वाच्या पायऱ्या चढू लागले. भारतीय पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद म्हणून त्यांनी काही दिवस काम केले. जयपूर व दिल्ली आणि नंतर उदेपूर विद्यापीठाचे कुलगुरु झाले, व अमेरिकेहून शैक्षणिक व शेती विषयक निरीक्षण करून येऊन त्याचा उपयोग ते भारताच्या पुनर्रचनेस देत राहिले.)

१९३७ साली कूपर मंत्री मंडळाचे कारकीर्दीपासून राज्यपालांचे नियुक्त म्हणून पाटणचे सरदार भाऊसाहेब पाटणकर हे विधान–परिषदेचे सभासद होते. ग्रामपंचायतीच्या विधेयकावर त्यांनी केलेले भाषण हे त्यांच्या स्वतःच्या अनुभवसिद्धीतून झाल्याकारणाने उद्बोधक होते. काव्र्याचे संभाजीराव थोरात हेही गेल्या दशकातील विधानपरिषदेचे सभासद असून आपल्या परिसरातील जनतेची दुःखनिवारणाची कामे जशी त्यांनी केली, तसेच काव्र्याजवळ कृष्णेला पूल उभारण्याचे कार्य सरकारकडून चिकाटीने घडवून त्यानी वहातूक व्यापाराचा दुवा घेतला.

मुंबईहून दिल्लीकडे लक्ष देता सन १९५२ च्या निवडणुकीत मध्यवर्ती सरकारच्या (असेंब्लीचे) लोकसभेचे सभासद म्हणून आनंदराव चव्हाण व गणपतरावजी आळतेकर सातारा जिल्ह्यातून निवडून गेले. चव्हाण काँग्रेस-विरोधकातून निवडले गेले. पण त्यांनी मध्यवर्ती अर्थ-संकलपावर केलेली भाषणे आणि अन्नधान्य–प्रश्नावर अभ्यासपूर्वक आकडेशास्त्र–संमत आपली मते मांडली व छाप पाडली. त्यापुढील निवडणुकात ते १९६२ साली काँग्रेस तिकिटावरच निवडून गेले व पूर्वार्जित कीर्तीने लष्करी व मुलकी अन्नखात्याचे उपमंत्री पदावरून ते काम करू लागले. पाकिस्तानी आक्रमणाचे आणीबाणीत

जवानांना रसद पोचविण्यात ते कसोशीने दक्ष राहिले, हे त्यांस व जिल्ह्यास भूषणावहच ठरले आहे.

गणपतराव सदाशिव आळतेकर १९५२ साली लोकसभेत निवडून आल्यावर ते लोकसभेचे विचारवन्त व विचारप्रवर्तक सभासद म्हणून प्रतिष्ठा पावले. अखिल भारताच्या एकजिनसीपणाला व भक्कमपणाला धक्का लागता कामा नये आणि भारताची सेवा करण्यासाठीच महाराष्ट्राचा व सातारा जिल्ह्याचा दृष्टीकोन आपल्या वैशिष्ठ्यासह तेथे उमटला पाहिजे असे धोरण धरून आळतेकरांनी पांच वर्षे आपली कामगिरी बजावली. राज्यकारभाराच्या व विधेयकांच्या अनेक चिकित्सा-समित्यावर त्यांची योजना झाली. तेथे पक्षाची शिस्त न सोडताही आपली स्पष्ट मते त्यांनी वेळेस भिन्न मतपत्रिका जोडूनही निर्भीडपणे मांडली. लष्कर, परराष्ट्रीय धोरण, हिंदुविवाह, अर्थसंकल्प यावरील त्यांची भाषणे गाजली असून तारीखतागायत शस्त्रास्त्रानीपूर्त भारत सज्ज राहिला तरच तो जगाला देत असलेला शान्तियुगाचा आदेश यशस्वी होईल असे त्यांनी बजावले होते. मालवाहू व लढावू जहाजे भारताने बांधून आगगाड्यातील सोई वाढवल्या पाहिजेत व लोणंद–पंढरपूर व कऱ्हाड–चिपळूण वगैरे नवे फाटेही निघाले पाहिजेत, दक्षिण रेल्वे ब्रॉडगेज करणे जरूर आहे; विद्यार्थ्यांच्या शिक्षण–सहली व शेतकऱ्यांच्या निरीक्षण–सहली सोप्या झाल्या पाहिजेत; कोयना, कुकडी, वीर, खडकवासला ही धरणे उद्योग–धंद्याची वाढ व बेकारी निवारण यास उपयुक्त होतीलसे पाहिले पाहिजे; शेतकी हा किफायतशीर धंदा होऊन महाराष्ट्रात उसाचा उतारा उत्तम असल्याने साखरेचे कारखाने निघालेच पाहिजेत; रत्नागिरी–कोल्हापूरकडे अॅल्युमिनमचे उत्पादन वाढीस जोर लावला पाहिजे; विमा–व्यवसायादी, काच–लोखंडाचे कारखान्यांचे जे उपक्रम उद्योग–महर्षींनी सातारा येथे केले, त्यांचे स्वाभिमान-संरक्षणपूर्वक संगोपन झाले पाहिजे; प्रांत पुनर्रचनेत मुंबई–वऱ्हाडसह महाराष्ट्र निर्माण झालाच पाहिजे वगैरे आळतेकरांचे आग्रह लोकादरास पात्र ठरले आहेत.

१९५७ साली सातारा (उत्तर) तर्फे कॉमरेड नाना पाटील दिल्लीच्या लोकसभेत प्रतिनिधी म्हणून गेले व तेथे दोनवेळ गर्जून त्यांनी आपली मर्दानी वृत्ती प्रगट केली. पूर्वी मुंबईच्या विधानपरिषदेचे एक सभासद म्हणून सरावलेले किसनवीर १९६२ च्या निवडणूकीत खासदार झाले. पक्षाची शिस्त काटेकोर पाळून बोलण्यापेक्षा विधायक सेवा करण्यावर त्यांचा भर असे.

७ : संस्थानी स्वराज्यात

हिंदी राष्ट्रावर स्वातंत्र्याचा सूर्य प्रकाशत रहावा म्हणून खालसातील लोक जितक्या तळमळीने चळवळ करणार, तितक्याच तळमळीने संस्थानातील लोकांनाही करावीशी वाटते व ते करतात. कारण गतइतिहासाचे अवशेष म्हणून संस्थानिक असले तरी, त्या अभिमानास्पद अवशेषांनी " राजा प्रजानु रंजनात् " हे धोरण सोडले. सातारा जिल्ह्यात ब्रिटिश रियासतीला १८४८ पासून सुरुवात झाली असे मानले तरी १८१८ त पेशवाईचे अंताबरोबर प्रतिनिधी-पटवर्धन आणि फलटणकर हेही ब्रिटिश सरकारने चारदोन वर्षांच्या अवधीत आवरले सावरले होतेच. १८२१ त कोल्हापूरचे संभाजी ऊर्फ आबासाहेब यांनीच सरदार केलेल्या सयाजी मोहित्याने आबासाहेब यांचा खून केला. व १८२२ त एप्रिल १५ पासून सातारा छत्रपती कृष्णा वारणेमधील चौदा परगण्यांचे राजे झाले. १८२५ त करवीरकर बुवासाहेबांनी बंड केले पण इंग्रजांच्या सहा हजार फौजेचे दर्शन होताच ते संपले, व १८२६ त इचलकरंजीकर व कागलकर यांचे हक्क अबाधित राखण्याची हमी करवीरकरांनी घेतली पण पटवर्धनी मुलखावर हल्ला केला. परिणामत: इंग्रजी फौजा कोल्हापुरात व तेथील मुख्य प्रधानाची नेमणुक इंग्रजामार्फत व्हावयाची असे ठरले. तरी १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळी कोल्हापूर रिसाल्याने थोडीशी जी गडबड केली ती चिमासाहेबांच्या प्रोत्साहनाने केली अशा संशयाने चिमासाहेबास कराचीस स्थानबद्ध होऊन रहावे लागले. तरी १८६० मध्ये सर्व संस्थानिकांना अशी सनद देण्यात आली की, निपुत्रिक संस्थानिकांनी खुशाल दत्तक घ्यावेत. गैरकारभार संस्थानात झालाच तर दण्ड भूर्दंड काय व्हावयाचा तो होईल, पण संस्थान जप्त व्हावयाचे नाही. कोल्हापूरचा कारभार सुधारणेसाठी माधवराव बर्वे कारभारी आले हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. या कालखंडात लोक आपआपल्यापरीने चळवळ करीत होते, आणि संस्थानिकांनी चळवळीस सहकार, मदत व मार्गदर्शन करावे अशीही लोकांची अपेक्षा होती. कारण संस्थानिकांना लोक जुन्या इतिहासाचे अवशेष समजत.

ब्रिटिशाशी १८१२ व १८२० साली दक्षिणी संस्थानिकानी जे तह केले त्यांचे पालन ते एकनिष्ठेने करीत होते, असे बव्हंशाने म्हणता येते. म्हणूनच १८७० साली पुण्यास सार्वजनिक सभा निघाली तेव्हा औंधच्या पंत प्रतिनिधीना अध्यक्ष करण्यात आले होते; १८९४ साली कोल्हापूरच्या राज्या-

रोहणाचे वेळी शाहू छत्रपतींना सार्वजनिक सभेचे व डेक्कन एज्युकेशन सोसा-यटीचे मानपत्रही झाले. १८७९ साली वासुदेव बळवंत फडक्यांनी आपले उठावास संस्थानिकांची मदत घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे, संस्थानिकांना आपल्या हातची बाहुली करून टाकली पाहिजेत असा स्वच्छ निर्णय ब्रिटिश सरकारने घेतला होता. त्याची चुणूक पुण्यास टिळक प्रभृती लोक जी चळवळ करतात तिला करवीरकर शाहू महाराजांची सहानुभूती आहे, आणि म्हणून त्यांनी रेसिडेंट मि. रे यांच्यावर बटलर फरनंडिस याच्या मार्फत विषप्रयोग केला अशा संशयाने १८९८ साली कामही चालले. त्यात निष्पन्न काही झाले नाही हा भाग निराळाच; पण करवीर घराण्यावरील अशा प्रसंगावरून बाकीचे संस्थानिक आपआपल्या ठिकाणीच कसे चूर होऊन राहिले असतील आणि १८८९ पासून राष्ट्रीय सभेवर ब्रिटिश सरकारचा डोळा वक्र होऊ लागल्यावर त्यांनी लोकांच्या चळवळीवरून १८९४ अखेर सहानुभूतीचे सर्व पदर का काढून घेतले असतील याची कल्पना होईल.

तरी पण "पुरुषाला आपली सद्सद्विवेक बुद्धी, स्त्रीला आपले पातिव्रत्य आणि राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य यांच्या पलीकडे काहीही प्रिय असत नाही." हे १९१२ साली कऱ्हाड येथे सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावरून तात्यासाहेब केळकरानी काढलेले उद्गार सार्थ नाहीत असे कोण म्हणेल? याच अंतरीच्या जाणिवेने संस्थानातील प्रजाजनांनी काही प्रयत्न केलेच. राष्ट्रीय उत्थापनाकरिता शिवाजी महाराजांचा उत्सव लोकमान्यांनी पुण्यास सुरू केला. पण कोल्हापुरास "शिवाजीच्या मार्गानी" स्वराज्य मिळवावयाचे या हेतूने १८९३ साली शिवाजी क्लब स्थापन झाला. मात्र, शिवाजीची राजनीती–कुशलता अगर 'धर्मासाठी फकिरी' हे काहीएक न अंगिकारता क्लबाचे चालक क्लबासकट नेस्तनाबूत झाले.

त्या अगोदरच १८८५–८६ साली प्रथम लोकसभा ही जन्मास आली. कळंब्याच्या तलावाबाबत निकाल शहरवासी लोकातर्फे मिळविला. त्यानंतर दहा वर्षांनी ही सभा पुन्हा पुढे आली. १८९४ साली शाहूमहाराजास मानपत्र अर्पण केले.

ब्रिटिश मुलखातील राष्ट्रीय सभा, प्रांतिक सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद व प्रदर्शने वगैरे गोष्टीविषयी ज्ञान करवीर संस्थानातील प्रजेस झालेले आहे. पुणे, मुंबई येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेस अगदी अव्वलपासून कोल्हापूराहून पुष्कळ लोक गेले होते, व इतर लांबच्या ठिकाणीही जात असत. (कोल्हापूर लोकप्रतिनिधिसभा पान ३).

कोल्हापूर संस्थानची गणना दोस्त सरकारात आहे. कोल्हापूर संस्थानात प्रतिनिधी सभा असावी वती श्रीमन्महाराज शाहू छत्रपती यांच्या मुखत्यारीच्या

वाढदिवशी म्हणजे २ एप्रिल रोजी भरवावी अशाबद्दल रा. रा. सदाशिव खंडो आळतेकर यांचे पहिले पत्र "समर्थ" पत्रात ता २९ मार्च १९०५ इसवीस आले होते.

समर्थाच्या पुढच्याच अंकात गडहिंग्लज, शिरोळ वगैरे ठिकाणाहून सभा आवश्य असावी अशी पत्रे आली. नंतर त्याच वर्षाच्या, डिसेंबर महिन्याचे २० तारखेस सदर आळतेकर यानी पुन्हा एक पत्र समर्थास " कोल्हापूर व राष्ट्रीय सभा " या मथळ्याखाली लिहिले. त्यात प्रत्येक संस्थानात छोटचा राष्ट्रीय सभा असाव्या व म्हैसुरात प्रतिनिधी सभेस मि. रंगाचार्लू यानी जशी मदत केली तशी कोल्हापुरात रा. ब. सबनीस दिवाण साहेबानी करावी अशी विनंती होती. तिसरे पत्र १२ सप्टेंबर १९०६ च्या समर्थात आले. प्रतिनिधी सभेची पहिली बैठक ता. २ आक्टोबर १९०६ रोजी उत्तम रीतीने पार पडली (कोल्हापूर लोक–प्रतिनिधी सभा पान ७).

पण याशिवायही सनदशीर, शान्ततामय आणि तडजोडीच्या राजकारणाला साजतील अशाही चळवळी चालू होत्या. त्यापैकी स्वदेशीची चळवळ संस्थानातून व खालसातही श्रीपाद शास्त्री देवधर व गणपतराव भुसारी करीत. त्यांचीच परंपरा पुढे चालवून ही मंडळी स्वदेशीच्या चळवळी बरोबर पैसाफंडाचे प्रचारकार्यही करीत असत. तेव्हा ब्रिटिश अम्मलात "लोकशाही स्वराज्य म्हणजे आकाशातील चांदोबा असे मोर्लेसाहेब म्हणण्यापूर्वीच प्रातिनिधिक कारभार संस्थानात स्थापण्याची इच्छा करू लागणे हा आत्यंतिक साहसाचा प्रकार वाटल्यास नवल काय ? " १९०२ साली आण्णासाहेब विजापूरकरानी साक्षरतेची मागणी केली आणि १९०५ साली समर्थ विद्यालय काढले, तेव्हा असा परिणाम झाला की आळतेकर गोखल्यांच्या चळवळीचा संबंध शिवाजी–क्लबाशी व बॉम्ब प्रकरणाशी लावण्याचा प्रयत्न होऊ लागला, आणि परिणामी आळतेकराना कऱ्हाडास व रामभाऊ गोखल्याना कोरेगावास येऊन प्रपंचाचा गाडा व देशसेवेचे कार्य चालवावे लागले, आणि १९०८ त समर्थ विद्यालय तळेगावास गेले !!

पुढे १९१४ साली मंडालेच्या कारागृहातून लोकमान्य सुटून येईपर्यंत सगळीकडेच सामान्यत: शांतता होती, तशी संस्थानातूनही होती. पण लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या चळवळीने 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवणारच' हा आत्मविश्वास जनतेत उत्पन्न केल्याबरोबर सांगलीस के. रा. छापखाने, गो. रा. बिनीवाले, व वा. रा. फडके प्रभृतींच्या युनियन क्लबने हातपाय हालवावयास सुरवात केली, आणि छापखान्यांनी होमरूलच्या प्रचारासाठी दौरे काढले, गणपतराव अभ्यंकरांनी प्रांतिक परिषदातून संस्थानी कारभारात प्रजेच्या प्रतिनिधीचाच हक्क असावा

म्हणून ठराव आणण्यास सुरवात केली आणि कोल्हापुरात वासुदेव बाळकृष्ण कुलकर्णी (सागावकर) प्रभृती मंडळींनी कुलकर्णी असोशिएशन स्थापून संस्थानिकांच्या पिढिजाद राज्यावरील हक्काप्रमाणेच कुलकर्ण्यांच्याही वतनाचा पिढिजाद हक्क कायम ठेवा म्हणून टाहो फोडला.

यापेक्षाही १९२० साली एका बाजूने मॉंटफोर्ड सुधारणा येत होत्या. लॉर्ड कर्झन, लार्ड मिंटो व लार्ड हार्डिज यांच्या कारकीर्दी म्हणजे बंगालच्या फाळणीपासून कैसरीकंदनाच्या समाप्तीपर्यंतचा काळ होता. निरनिराळ्या संस्थानच्या प्रतिनिधींचे मिळून एक मंडळच मॉंटेग्यूचेल्म्सफर्ड सुधारणात होते. एवढा वशीकरणाचा उद्योग संस्थानिक व ब्रिटिश सत्ताधाऱ्यात झाला होता.

तथापि " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविणारच " या घोषणेचा परिणाम संस्थानिकांचे ही मनावर झाल्याशिवाय राहिला नव्हता. साम्राज्य सरकारने आपले अंतर्गत कारभारात बिलकूल हात घालू नये असा दिमाखाचा स्वाभिमान त्यांच्यात जागा झाला होता. व्यापारी आयात-निर्यातीचे कर ठरविण्यात व वसूल करण्यात आपल्या शब्दाला मान मिळाला पाहिजे असाही दावा ते सांगू लागले होते. १९२९ च्या बटलर कमिशनने दिलेल्या अभिप्रायावरून ब्रिटिश सरकारला आपले महत्त्व फारच वाटते असे संस्थानिक धरून चालले. दुसऱ्या बाजूने असहकाराची किरणे खालसा मुलखावर चमकू लागली असता संस्थानी प्रजेने स्वावलंबनाची चळवळ नेटास लावली. महात्मा गांधींचा दौरा सांगली, कोल्हापूर येथे झाला, आणि " यद्यत्परवशंदुःखं यद्यदात्मवशंसुखं " हा असहकाराचा महामंत्र महात्माजींनी प्रचंड लोक-समुदायापुढे समजावून सांगितला.

तो संदेश घेऊन खादीचा प्रसार करण्याकरिता खादी भांडारे व चरखा-संघ स्थापन झाले आणि त्या कार्याची धुरा कोल्हापूरास मेथे मास्तरानी मोठ्या नेटाने खांद्यावर घेतली. कोल्हापूरच्या 'विद्याविलासने' निर्भीडपणे महात्माजींचा स्वावलंबन संदेश फैलावण्यास सुरवात केली, व त्या उपक्रमात ता. २९ ऑक्टोबर १९२० चे अंकात आळतेकर यांच्या सहीने एक पत्र कोल्हापूर-संबंधी छापले. तेव्हा विद्याविलासच्या १९१८, १९, २० च्या फायली जप्त करण्यात आल्या, ५०० रुपये जामीन व तेवढाच जातमुचलका घेऊन संपादकांची कच्ची कैद सुटली तरी पुढे १५३ व १२४ खाली दोन वर्षांची शिक्षाही झाली.

संस्थानी कारभारावर टीका केल्यामुळे विद्याविलासावर संस्थानी अधिकाऱ्यांनी आपआपली अब्रु साफ करून घेण्याकरिता लहान मोठे आठ एक खटले भरले होते आणि त्यात संपादक गोखल्याना लहान मोठ्या शिक्षाही झाल्या होत्या.

तथापि १९१८ ते १९२९ या काळातील ब्रिटिश हद्दीतून भारतीयांनी चालविलेल्या चळवळीचे पडसाद एवढ्या तीव्रतेने संस्थानी हद्दीत उठत गेले की लोकप्रतिनिधीना जबाबदार अशी राज्यपद्धती संस्थानिकांनी सुरू करावी एवढीच मागणी होऊन न राहता ऐनजिनसी संस्थानेच संपवून टाकावीत असे म्हणण्यापर्यंत कित्येकांच्या विचाराची झेप गेली. ब्रिटिशांचे सर्व संबंधच तोडून टाकावेत असे काही भारतीय पुढारीच त्या वेळी बोलत, त्याचेच हे प्रतिबिंब होते.

हे खरे आहे की कोल्हापूरने १८८९ पासूनच स्थानिक स्वराज्यसंस्था सुरू केल्या होत्या; सांगली व्यापारीकेंद्र बनत होते; आणि शैक्षणिक दृष्टचा संपन्न होत होते. कारभार कुशलतेत फलटण नांव कमवीत होते; आणि याठिकाणचे लोकाग्रणी असे होते की राष्ट्रीय चळवळीचे चैतन्य ते आपापल्या परिसरात खेळवीत होते. कोल्हापूरात १८८५ पासूनच लोकसभा स्थापन होऊन कळंबी तलावाची वगैरे दुःखे दूर करून घेत होती; इचलकरंजीला छोटी काँग्रेस भरत होती; डिग्रज येथे लोकहितवर्धिनी सभेचे कार्य १८९७ च्या टिळकांवरील खटल्यात त्यांना निधी मिळवून देण्यापर्यंत चालू होते; कोल्हापूरच्या शिवाजी क्लबची कामगिरी सर्वश्रुत असून छत्रपतीनाच डेक्कन एज्युकेशन सोसायटीने आपले अध्यक्ष निवडले होते; काँग्रेसने आपल्या ९ व्या व १२ ते १४ अधिवेशनात संस्थानिकांबद्दल आदरातिशयाने ठराव पास केले. आणि १७ व्या अधिवेशनात तर त्यांना लष्करी कमिशने द्यावीत व संस्थानी वृत्तपत्राना संपूर्ण मतस्वातंत्र्य असावे अशी मागणी केली होती. असे असूनही ब्रिटिश सरकारची काँग्रेसवर इतराजी होऊ लागताच १८९२ च्या २४ सप्टेंबरला कोल्हापूरने लोकसभेची मान्यता काढून घेतली, १८९७ नंतर शिवाजी उत्सवास बंदी केली. १९०४ मध्ये नगरपालिकेतील लोकप्रतिनिधींचे हक्क काढून घेतले.व कामगाराकरता चाललेल्या रात्रीच्या शाळा बंद केल्या. इचलकरंजी वगैरे संस्थाने ब्रिटिश हद्दीतील राजकीय चळवळीशी संबंध ठेवतात अशा संशयाने त्यांच्यावर दात धरण्यात आला. तेव्हा १९०१ ते १९१० या काळात ब्रिटिश सरकारने लोकावर जे जे जुलमी कायदे केले त्याची सहीनक्कल करण्यात कित्येक संस्थानिकांनी जन्माचे सार्थक मानले. त्यामुळे लोक समजून चुकले की "नमता सहकार देणारी ब्रिटिश सरकारची बाहूली" यापेक्षा संस्थानिकात आता फारसा दम उरला नाही.

औंध, कोल्हापूर, फलटण, सांगली येथे शिक्षणाच्या व अर्थव्यवहाराच्या बाबतीत प्रगतीची पावले टाकण्यात येत होती. त्या मानाने इतरत्र नव्हती. तरीही उगार, मिरज, सांगली वगैरे ठिकाणचे देशभक्त जे ब्रिटिशराज्य आपले राजकीय गुलामगिरीस कारण आहे, त्याला दहशत निर्माण करण्याच्या मार्गाला लागले. सहाजिकच कोल्हापूरचे विश्ववृत्त मासिक, त्याचे मुद्रक

विनायक नारायण जोशी व प्रा. विष्णु गोविंद विजापूरकर यांच्यावर खटले झाले; प्रेस ॲक्ट अमलात येऊन विजापुरकरांचा समर्थ व गोखल्यांचा विद्याविलास बंद पाडण्यात आले; व सदाशिव खंडो आळतेकर, रामचंद्र नारायण गोखले अशा लोकसभेच्या कार्यकर्त्यांना हद्दपार करण्यात आले. मिरजकर लहरीने वागत. औंधकर व कुरुंदवाडकर आपआपल्या भाऊबंदक्या चालवीत. नाही म्हणावयास बर्क सारखा कारभारी असूनही सांगलीस तरूण देशभक्तांना मवाळांचे राजकारण उजळ माथ्याने करता येई, त्या मुळेच वामनराव पटवर्धनासारखा मनुष्य ना. गोखल्यांच्या भारतसेवक समाजास मिळाला.

पहिले जागतिक युद्ध ऊर्फ कैसरीकंदन पुढे उभे राहिले तेव्हा ब्रिटिश साम्राज्यशाहीला लोकांच्या व संस्थानिकांच्या सहकार्याची तीव्र गरज भासू लागली. १९१६ साली दिल्लीला सर्व संस्थानिकांचा एक दरबारच घेण्यात आला. तेथे संस्थानिकांचे एक मंडळ असावे, अशी मागणी झाली. १९१७ त माँटेग्यू येथे आले, तेव्हा लोकप्रतिनिधीमार्फत कारभार करण्याचे राजकीय हक्क देण्याची इंग्लंडची इच्छा असल्याचे ते बोलू लागले. सांगलीचे प्राध्यापक गणपतराव अभ्यंकर यांनी संस्थानी प्रजाजनातर्फे माँटेग्यूंची गांठ घेतली व भारताच्या राज्यघटनेत संस्थानी प्रजेचे हक्क समाविष्ट करावे लागतील याबद्दल त्यांची खात्री पटवून दिली. १९२० च्या नागपूर काँग्रेसने लोकप्रतिनिधींना जबाबदार असा लोकशाही कारभार संस्थानिकानी आपापल्या संस्थानात ताबडतोब सुरू करावा असा ठराव केला.

संस्थानी प्रजेचे पुढारी आता त्यादिशेने नेटाची पावले टाकू लागले. २४ व २५ मे १९२१ रोजी पुण्यास दक्षिणी संस्थान प्रजाजनांची परिषद झाली. दक्षिणीसंस्थान हितवर्धकसभा स्थापन होऊन १९२७ मध्ये अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषद स्थापन होईपर्यंत तिने स्वतंत्रपणे काम केले. सांगलीचे प्रा. अभ्यंकर, वामनराव पटवर्धन व तात्यासाहेब केळकर यांचा यात पुढाकार होता.

औंध संथानच्या गादीवर १९१० सालापासून बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे पदवीधर आले होते. आपल्या प्रजेच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी आपले संस्थानात ते दरसाल एक महिनाभर दौरा करीत. किर्लोस्कर, ओगले अशा कारखानदारांना आपल्या संस्थानात सर्वथैव मदत करून आपल्या प्रजेच्या बेकारी निवारणाचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. आपली दुःखे बोलून दाखविण्याइतकी धीट प्रजा प्रथम याच संस्थानात झाली. १९१६ त ग्रामपंचायतींची व्यवस्था बाळासाहेबानी लावून दिली. संस्थानच्या बहात्तरही गावात एका आठ वर्षात प्रजा व तिच्या ग्रामपंचायती कार्यक्षम झाल्या. १९२० साली बाळा-

साहेबांनी पहिली रयतसभा स्थापली आणि अर्थसंकल्पावर प्रजेचे मत अजमावले. याच साली महात्मा गांधींची असहकाराची चळवळ सुरू झाली आणि राष्ट्रात नवेच वारे संचरू लागले.

कैसरीकंदनाचे वेळी सांगलीने साम्राज्य सरकारला पैसा आणि मनुष्य-बळ भरपूर पुरविल्यामुळे, साम्राज्य सरकारचा विश्वास संपादन झाला होता. संस्थानिकांना अकरा तोफांचा मान एव्हाना मिळाला. प्रा. अभ्यंकर यांनी १९१७ पासूनच "देशी संस्थाने व युद्धोत्तर सुधारणा" असे पत्रक काढले होते. १९२० मध्ये लोकमान्य व १९२१ मध्ये महात्माजी यांच्या भेटी झाल्या होत्या.

ब्रिटिश राजवटीतील लोकाबरोबरीने संस्थानी प्रजेची प्रगती झालीच पाहिजे असा हिय्या धरून १९२२ साली सांगली संस्थानाधिपती आप्पासाहेब पटवर्धन यांनी प्रजापरिषद घ्यावयाचे ठरविले आणि केशवराव छापखाने व विठ्ठलराव जोशी यांची निवडणूक अखिल भारतीय काँग्रेस कमेटीवर झाली. संस्थानिकाचे मंडळ जसे माँटफोर्ड सुधारणाखाली काढण्याचे साम्राज्य सर-कारने ठरविले, तसेच संस्थानी प्रजेचेही काढावे अशी मागणी संस्थानी प्रजा-परिषदेनेही केली. फार काय, छोटचा छोटचा संस्थानांचे एक फेडरल कोर्टही त्या परिषदेने मागितले. १९२२ त तर प्रत्येक संस्थानात जबाबदार राज्य-पद्धतीची मागणी झाली. या झपाटचाला १९२४ चे कूपवाड अधिवेशनात धक्का बसला. तेथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने डोके खुपसले. तथापि १९३३ पर्यंत दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेची अधिवेशने चळवळीतील सामर्थ्य निर्माण करीतच होती. संस्थानिकांच्या खाजगी खर्चाला कात्री लावण्यासंबंधात व सर्व संस्थानानी मिळून दारूबंदीचे एकमार्गी धोरण अमलात आणण्याबद्दल मागणी करण्याचा धीर प्रजापरिषद करू शकली. स्वावलंबनाची शिकस्त म्हणजे संस्थानचा कारभार सर्वस्वी प्रजा-प्रतिनिधींच्या हातात हवा असे प्रतिपादन करीत राहिल्यामुळे काही एक कारण न देता हंटरपत्राकडून १७ सप्टेंबर १९३० रोजी पांच हजार रुपयांचा जबर जामीन कोल्हापूर दरबारने मागितला आणि ते पत्र बंदच पडले. सदर पत्राचे संपादक माधवराव बागल वाळवे तालुक्यात येऊन खादी प्रसारासाठी खेडोपाडी हिंडतात व कायदेभंगाचा प्रचार करतात म्हणून हंटरच्या जामिनकीची आपत्ती त्यांच्यावर ओढवली असा त्यावेळी एक लोकप्रवादही बराच प्रचलित होता. त्यात काही तथ्य असो वा नसो, ग्रामोद्धारापासून लोक-मतानुवर्ती सर्व राज्यकारभार चाललाच पाहिजे असे ब्रिटिश मुलखातील मानाच्या सभामधून प्रतिपादन करणारे संस्थानचे मालक स्वतःच्या संस्थानात त्यातले काहीच करीत नाहीत, अशी तक्रार करीत राहिल्या कारणाने 'हंटर' सारखेच सांगलीच्या विजय पत्रासही १९३४ साली बंद व्हावे लागले. अन्याय्य

कायदे मोडलेच पाहिजेत असे म्हणण्याची जनतेची मनोवृत्ती तयार झाली असता जर वरील तऱ्हेचे प्रयोग होतात, तर १९०७।८ च्या दहशतशाहीच्या काळात विजापुरकरानी कोल्हापुरास चालविलेल्या विश्ववृत्त व समर्थ या मासिक साप्ताहिकांची काय अवस्था झाली असेल बरे ? जुलमशहा एखाद्या छत्रपतीने सुद्धा होऊ नये, अशा अर्थाचे एक वाक्य विजापूरकरांच्या नियतकालिकांतून येताच ती तर बंद पडलीच, पण स्वयंपूर्ण विद्यार्थी तयार करणारे विजापूरकरांचे समर्थ विद्यालयही कोल्हापूराहून हलले व पुढे बेकायदेशीर संस्था म्हणून १९१० त बंदही पडले होते.

स्वावलंबनाच्या चळवळीला असे आघात जरी संस्थानात बसत असले तरी लोक मात्र दबले नाहीत. ब्रिटिश मुलुखात जाऊन आपली दुःखे वेशीवर मांडण्यास सांगलीच्या विठ्ठलराव जोशानी व गणपतराव अभ्यंकरांनी सुरवात केली. त्याचाच परिणाम म्हणजे सातारा जिल्हासभेपासून तो राष्ट्रीय सभे-पर्यंत संस्थानी प्रजेला संस्थानच्या कारभारात मोकळ्यामनाने बोलता, हालता व चढता आले पाहिजे असे ठराव झाले. अशा सहानुभूतीमुळेच संस्थानी प्रजा परिषदेचा जन्म झाला व लोकांचा वाढता उत्साह, जागतिक इतिहासाचा लोक-शाही कल, आणि पूर्वी महायुद्धाच्या अडचणीमुळे तर आता १९२१-२२ साली गाजविलेल्या जुलूमशाहीची जागतिक बेअब्रु होऊ नये म्हणून जबाबदार ब्रिटिश मुत्सद्यानी स्वराज्यदानाची हिंदुस्थानला दिलेली आश्वासने यांचा एकमेव परिणाम होऊन काळाच्या ओघात सापडलेल्या संस्थानिकांनी प्रजापरिषदा संस्थानच्या हद्दीत भरविण्यास परवानगी दिली. मिरज, कुरुंदवाड, भोर, सांगली, औंध, या संस्थानातून प्रजापरिषदा बऱ्याच उशिराने भरल्या आणि आता त्याचे बीज रुजले असले तरी अजून त्याचे चीज झालेले नव्हते. नाही म्हणावयास १९२८ च्या सायमन कमिशनवरील बहिष्कारापासून १९३०-३४ च्या कायदेभंगाअखेर खालसा मुलुखात झालेल्या चळवळीत आपल्या प्रजाजनानी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घेतलेला भाग पाहून, ऐकून आपले परंपरेने आलेले आढ्यतेचे स्थान ढिले झाले तरी ढळू नये आणि साधल्यास ते दृढही करावे म्हणून आपल्या संस्थानात लोकमत स्थापण्यास त्यांनी सुरवात केली. कोल्हापुरने इलाखा-पंचायत लोकानुवर्ती करून शिक्षण सोयी झापाट्याने करीत राहण्याचा सपाटा चालविला. भोर, बुधगाव, सांगली, मिरज, औंध येथे प्रत्यक्ष लोकसभा स्थापल्या; इतकेच नव्हे तर रा. ब. काळ्यांसारखे अध्यक्ष त्या सभाना लाभून दिले. मिरजेस एकवेळ लोकपक्षातर्फे चळवळ करणाऱ्या जोशास दिवाण नेमले; आणि औंधचे घटक स्वयंपूर्ण स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने "पैशात परवडत नसेल तर हाताने कातलेल्या सुतात सारा घेण्याची प्रथा पाडून" आणि शेवटी लोकनियुक्त प्रतिनिधी लक्ष्मणराव किर्लोस्कर यास

मंत्री व लोकपक्षाचे वाग्भट देशपांडे यास दिवाण (१९३५) नेमून प्रजानुरंजनाचे श्रेय घेतले.

असहकाराच्या जन्माबरोबर प्रो. फडक्यांच्या व्याख्यानामुळे सांगलीचे 'विलिंग्डन' कॉलेज 'ओस पडले'. त्यावरून तरूण अंतकःरणाचा कल उमगून आला. आणि ह्या स्वावलंबन वृत्तीचा ध्वज छापखाने–राजवाडे–बिनिवाले–मेथे–फडके प्रभृतीनी लावला तसाच तो अव्याहत फडकत ठेवण्यासाठी मिरजेचे पुंडलीकजी कातगडे गांधी तत्त्वज्ञानाचे अखंड प्रचारक बनले. बाळकृष्ण विठ्ठल शिखऱ्यानी तर मिरजेत अफाट वाढविलेल्या सारावाढीविरुद्ध शेतकऱ्यांच्या कैवाराने अशी चळवळ केली की, त्यांना कारागृहवास तर भोगावा लागलाच पण सरतेशेवटी "फारेनर्स ॲक्टखाली" आपल्या जन्मभूमीला मुकावे लागले. त्याच्या अगोदर १९२९ सालीच काँग्रेसची ध्वजा खांद्यावर घेऊन भरणाऱ्या तिसऱ्या जिल्हासभेचे स्वागताध्यक्ष होऊन सांगली गजानन मिल्चे मालक विष्णुपंत वेलणकर यांनी लिंब येथे एकप्रकारे खालसातील व संस्थानातील प्रजाजनांचे हितसंबंध एकसूत्री असल्याचेच जाहीर केले होते. आणि तोच धागा पुढे ओढून १९३०–३४ च्या शांतिसंग्रामाला संस्थानी प्रजाजनानी तनमनधनाने हातभार लावला.

सदर शांतिसंग्रामाचा "श्रीमन् महागणाधिपतयेनमः" औंधच्या पुरुषार्थाचे संपादक पंडित सातवळेकर यांनी सातारा जिल्हासभेच्या अध्यक्षपदावरून असा केला की, "हिंदुस्थानच्या अफाट किनाऱ्यावर फुकट मिळणारे मीठसुद्धा राजसत्तेने महाग केले आहे. जगात आजपर्यंत कोणीही केले नाही असे शांतीच्या क्रांतीचे कार्य मिठाच्या कायदेभंगाच्या रूपाने महात्माजीनी सुरू केले आहे. हे व्यापक दृष्टीचे जनहो, हे मित्र प्रवृत्तीचे लोकहो, तुम्ही व आम्ही सर्व मिळून विस्तृत व बहुताकडून पालन केल्या जाणाऱ्या पूर्ण स्वराज्यासाठी यत्न करू या."

आणि जिल्हा सभेच्या व्यासपीठावरून सातवळेकर उतरले ते जिल्ह्यात अन्याय्य कायदे मोडण्याचा प्रचार करीतच हिंडू लागले. पण मे १९३० च्या पहिल्या आठवड्यातच औंध संस्थानने त्यांना प्रचार कार्याची बंदी केली. व मग पंडितजीनी आपले लक्ष औंध संस्थानच्या ग्रामसंघटनेत व लोकसभेच्या यशोमार्गात घातले.

तरी संस्थानी मुलखातील व विशेष म्हणजे सांगली व त्या पेक्षाही कोल्हापूर येथील तरूण साताराच्या शिबिरात येऊन दाखल झाले, संस्थानातून पैसाही येऊ लागला आणि रत्नागिरी, शिरोडे, विलेपार्ले वगैरे मीठसत्याग्रहाच्या केंद्रातून माने, हविरे, वर्डे मास्तर वगैरे तरुणांनी अप्रतिम कामगिरी केली. यात विशेष म्हणजे कोल्हापूर कॉलेजमधील प्रोफेसरी सोडून सत्याग्रही म्हणून

प्रो. मोहनलाल सातारा शिबिरात दाखल झाले, हे डोळचात भरण्यासारखे आहे. धारासन्यास सत्याग्रहीवर घोडे घालण्यात आले तेव्हा मेथे मास्तरांच्या हाताखालील कोल्हटकर प्रभृती "कृष्णाकाठचा मराठा"च निभला. बाहेरील या चळवळीबरोबर मद्यपान निरोधन, खादी प्रचार, प्रभात फेऱ्या वगैरे कार्यक्रम संस्थानात चालू होतेच. त्यात विठ्ठलराव जोशी, वसगडेकर, साने, बंडोपंत बर्डे, वगैरे सांगलीच्या व्यापाऱ्यांनी ठिकठिकाणच्या प्रभात फेऱ्यांचा मेळावा करून जवाहरलाल दिना दिवशी काढलेली दहाहजार माणसांची खादी-पोषाखातील प्रभात फेरी रोमांचकारी झाली. कोल्हापूरात तर खादी प्रचार संघ, स्वतंत्र चरखा संघ, करवीर इलाखा खादीसंघ, दरिद्रिनारायण संघ, खादी प्रदर्शन आणि खादी संमेलन, यांच्यातर्फे खादीचा प्रचार आजकालही सतत चालू आहे. भरीला संस्थानी सप्ताह संस्थानामधून साजरे झाले, आणि "स्वतःचा राज्यकारभार लोकास स्वतःच्या मर्जीप्रमाणें चालविता यावा, दैनिक जीवनक्रमातील लहान मोठें सर्व व्यवहार करता यावे व आपणावरील राज्यकारभार आपल्या सुखाकरता असा चालविला अशी शहरवासी व खेंडवळ या सर्वांची खात्री पटावी असे स्वराज्य पाहिजे" असे जनतेच्या मनावर ठसविण्यात आले. अर्थातच सत्ता प्रकोप आता आपले चटके पहिल्यापेक्षाही तीव्र करू लागला. आणि त्यात "बेकायदेशीर" ठरलेल्या संस्थापैकी मिरजेची काँग्रेस कमेटी १९३५ चा अखेर झाला तरी बेकायदेशीरच राहिली. मग, ता. ५ ऑगस्ट १९३० रोजी पं. मालवीय वगैरेंच्या अटकेबद्दल हरताळ पाडण्यासाठी कोल्हापूरात गंगावेशीत दुकानदारास विनंती चालली असता गुत्याजबळ गडबड झाली आणि सत्याग्रहींच्या अंगावर घोडे घालण्यात आले, अगर ता. ६ ऑक्टोबर १९३० रोजी प्रभात फेऱ्या व झेंडा वंदनाला बंदी होऊन तडकाफडकी माने यास शिक्षा झाली यात काय नवल ?

लोक अशा तऱ्हेने आपले उग्र तेज दाखवीत असताना जनता–जनार्दनाची आराधना करण्याऐवजी संस्थानाकडून होअर सुधारणामध्ये फेडरेशनची पद्धती आली तरी संस्थानिकांचे स्थान अचल रहावे अशी जोराची खटपट झाली. तिला तोंड देऊन फेडरेशनच्या हिंदी पार्लमेंटात ब्रिटिश प्रजाजनांच्या प्रतिनिधींबरोबर संस्थानी प्रजाजनांचे प्रतिनिधी बसले पाहिजेत म्हणून गणपतराव अभ्यंकरांनी खुद्द इंग्लंडात व हिंदुस्थानात जिवापाड प्रयत्न केला. पण त्याला अपयश आले तसा परावलंबी उपायावरील तरुणांचा होता नव्हता तो सर्वच विश्वास उडाला.

अर्थातच १९३०–३१ चे पहिल्या शान्ति संग्रामात कोल्हापूरचे १६६ व सांगलीचे ३० असे सत्याग्रही तुरुंगवास भोगून जसे आले, त्याच हिय्याने १९३२–३४ च्या शान्ति संग्रामातही संस्थानानी आपआपल्या परी भाग घेतला,

याबाबतीत नमूद करण्यासारखे एकच उदाहरण दिले म्हणजे बस्स होईल. मेथे मास्तर व धर्माधिकारीप्रभृती त्यांचे मित्र यांना चळवळीत भाग घेण्याची बंदी करण्यात आल्यामुळे, ही मंडळी वर्ध्याच्या आश्रमात गेल्यावर नागपूरकडील सत्याग्रहात त्याना कारागृहवास घडला. तसेच कित्येक छोटेमोठे मेथे–धर्माधिकारी सर्वच संस्थानातून जिल्ह्यात व अन्यत्र पावन झाले.

आणि शान्ति संग्रामात कोल्हापुरच्या तरुणांनी विशेष धडाडीने भाग घेतल्यामुळे की काय, ता. ४ जुलई १९३५ रोजी म्हणजे राष्ट्रीय सभा पूर्ण सनदशीर मार्गाचा अवलंब करू लागल्यावरही करवीर सरकारानी जादा गॅझीट काढून एकंदर राजकीय चळवळीलाच आपल्या सत्तेचा पूर्णविराम घातला ! !

दरम्यान औंध संस्थानात ग्रामराज्याचा लोकशाही उभार झाला होता. आणि उद्योग-महर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना मंत्रीपद मिळाले होते. " गाव करील ते राव काय करील " ही म्हण गावोगावच्या एकजिनसी जीवनामुळेच मराठीत रूढ झाली. या जीवनाचा नाश इंग्रजी राज्याच्या प्रखरतेने केला. जीवनाचा बाजार झाल्यामुळे खेडी विस्कटली. 'दुही माजवा आणि राज्य करा' या दण्डकामुळे, जो तो बुद्धी सांगू लागला; पण कोणी कोणाला पुसेना, म्हणून राजा कालस्य कारणं ! एवढी रड गात देशभक्त बसले नाहीत. इंग्रजी राजवटीतील लोकशाहीचे तंत्र त्यांनी उचलावयाचे ठरविले. म्हणून देशभर " व्हिलेज सॅनिटरी कमेट्या झाल्या. " एका बाजूने नव्या काळातील जगाचे अफाट अज्ञान खेड्यात पसरले होते; दुसऱ्या बाजूने त्याच अज्ञान जनतेला जगाच्या मामल्यात तारीख तागायत प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावयाची होती. काळाच्या गांधीप्रणित प्रवाहाचा फायदा घ्यावयाचा असे औंधच्या श्रीमंतानी ठरविले. १९३० साली आरोग्याबरोबर रस्त्यासारख्या काही गोष्टींचा कारभार औंध संस्थानच्या खेड्यातून सुरू झाला. १९३९ साली. औंध संस्थानाचा नवीन घटना कायदा करून श्रीमंत पंतप्रतिनिधीनी त्याला महात्मा गांधीचा आशीर्वाद मिळविला. आरंभी साक्षर प्रौढांनी निवडलेले पांच तरी पंच प्रत्येक गावचे कारभारी नेमले. " आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, सुखसोयी आणि खेड्याची आर्थिकठाकठीक." इतक्या गोष्टीकडे पंचायतीनी लक्ष पुरवून लोकांच्या सेवेचा विडा उचलावा एवढीच अपेक्षा प्रारंभी श्रीमंतानी केली होती. पुढे न्यायसभा, आरोग्यसभा, उद्योगसभा, शिक्षणसभा, सार्वजनिक कार्यसभा, संरक्षण सभा, सहकार्यसभा, व देवस्थानसभा, अशी खाती पाडून कारभार सुरू केला. हिंदुस्थानात खेड्यांचे स्वराज्य ऊर्फ शेतकरी कामकऱ्याचे राज्य व्हावयाचे म्हणजे त्यांना कमीतकमी अन्न, वस्त्र, शिक्षण, सहकार, संरक्षण, शेजार धर्म आणि सामुदायिक जीवन यांचा कारभार खेड्यांना करता आला पाहिजे, त्या

दृष्टीने पाहता औंधकरांनी केलेली ग्रामराज्याची खातेविभागणी, कौतुकास्पदच आहे. नवीन मुलाना कातण्या-विणण्याचे व बुटचा, चटया, बनविण्याचे शिक्षण-वळण लावून बेकारीच्या बकासुराचा अंगठा गेल्या पंचवार्षिक कार्यक्रमात (१९४०-४५) औंधच्या ग्रामराज्यानी मोडून पाडला आहे. आणि प्रारंभिक पराक्रम म्हणून त्याचे कौतुकही आहे.

व्यवसायातून विकास करणारे शिक्षण जीवनाचा पाया भरभक्कम घालीत असते, या न्यायाने आटपाडी महालातील विशेषत: आळसुंद गावातील शिक्षण आदर्श ठरण्याइतकी ग्रामराज्यांनी प्रगती केली. १९३९ मध्ये औंध्र संस्थातील चार हजार मुले शाळेत जात तर पांच वर्षात सात हजार मुले शाळेत जाऊ लागली. १५१ शाळांच्या ऐवजी २५० शाळा झाल्या. खर्च १ लक्ष १७ हजार २७४ वर चढला. हा सारा ७२ गावतला विकास आहे.

कोणाही दोघांच्या हितसंबंधाचा विरोध उत्पन्न झाल्याबरोबर त्यांनी लवाद करावा; लवादाचा तोडगा न जमल्यास महाजन सभेकडे जावे, महाजनसभेमार्फत समाधान न झाल्यास ग्रामपंचायतीच्या न्यायदानमंडळाकडे धावावे, तेथे आल्यावर दोनशे रुपयेपर्यंतचे दिवाणी दावे आणि तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटच्या कक्षेतील फौजदारी खटले चालावयाचे. त्या करता सरपंचासह आकरा पंचांची न्यायसभा असावयाची. सरपंच व उपसरपंच यांच्याशिवाय बाकीचे पंच तीन तीनच्या क्रमाने प्रत्येक वर्षी फेरपाळीने निवडून द्यावयाचे. त्यांनी गावासमक्ष खटला चालवून निकाल द्यावयाचा. एखाद्या अवघड खटल्यात सर न्यायाधीशानी आपल्या फिरतीत न्यायसभेला मदत करावयाची व वरच्या दर्जाचे खटलेही चालवावयाचे. ही सर्व व्यवस्था ब्रिटिश रियासतीत लागणाऱ्या कोर्टफीच्या निम्या दरात होई.

ग्रामपंचायतीच्या एकंदर व्यवस्थेसाठी गावच्या जमीन महसुलापैकी अर्धा महसूल त्या त्या गावांना मिळण्याची व्यवस्था राजेसाहेबांनी लावून दिली. खेडेगावापासून संस्थानच्या मुख्य मध्यवर्ती कारभारापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण औंध संस्थानने साधले. ग्रामपंचायतीचे पंच प्रौढांनी निवडले म्हणजे त्यांनी आपला सरपंच निवडावयाचा. तो एकमताने निवडावयाचा; तेथे एकमत होत नसेल तर अमेरिकेच्या प्रेसिडेंट प्रमाणे गावच्या प्रौढानी आपल्या सरपंचांची निवड करावयाची; गावोगावच्या सरपंचांची एक तालुका समिती; तालुका समितीचे सरपंच व प्रत्येक तालुका निहाय एकेक स्वतंत्र प्रतिनिधी मिळून औंधची असेंब्ली. त्यातील लोकनियुक्तापैकी दोन मंत्री राजेसाहेब कारभारासाठी घेणार, असा लोकशाहीचा उभार औंधास साधला. (समर्थ सातारा खास क्रांती अंक ९ ऑगस्ट १९४६ ले. पु. पां. गोखले.) पुढे ना. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात पंचायत राज्य जिल्हा तालुका निहाय निर्माण केले,

त्याचा प्रारंभ हा असा होता. संस्थानिकांना संस्थानी प्रजेपासून भिन्न समजून इंग्रजांनी याच काळात बटलर कमिशन नेमले.

बटलर कमिशनच्या रिपोर्टावर व संस्थानिक सुरक्षिततेच्या विधायकावर सडेतोड मत प्रगट करून १९३१ ते १९३४ मध्ये संस्थानी–प्रजा-सप्ताह जे पाळण्यात आले, त्यांची प्रेरणा दक्षिणी-संस्थान-प्रजा-परिषदेतूनच होती.

या सप्ताहाबाबत मिरजेच्या बाळकृष्णपंत शिखऱ्यांचा उठाव अभिमानास्पद होता. १९३६ मध्ये भारतीय प्रजा–परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभिसितारामय्या यांचा दौराच शिखरे यांनी आखला. १९३० साली गोलमेज परिषदेत प्रा. गणपतराव अभ्यंकरांनी संस्थानी प्रजेचे साफ साफ मत मांडले होते. तेच पुढे इंडियन स्टँडर्स्ट कमेटि, जाईंट पार्लमेंटरी बोर्ड आणि काँग्रेस यांच्यापुढे मांडण्यात आले व मिरज शेतसारा वाढीतून निर्माण झालेल्या सत्याग्रहाची माहितीही अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेपर्यंत पट्टाभींच्या दौऱ्याने ठसून गेली. १९३७ पासून परिषदच दक्षिणी संस्थान लोकसभा म्हणून नांदू लागली. आणि १९३८ सचे अधिवेशन सांगलीत वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्याच्याच जोडीला आण्णासाहेब भोपटकर यांचे अध्यक्षतेखाली संस्थानी कायदेमंडळाच्या सभासदांची परिषद झाली.

नामदार चिंतामणींचे अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय प्रजा परिषदेचे (मुंबई) स्वागताध्यक्ष प्रा. अभ्यंकर यांना संस्थानी–अत्याचार–चौकशीचे एक सभासद म्हणून घेण्यात आले, व दुसऱ्या गोलमेज परिषदेत अभ्यंकरानी महात्माजींच्यामार्फत संस्थानिकांच्या स्वैराचारांचा स्फोटही केला. तिसऱ्या गोलमेज परिषदेत तात्यासाहेब केळकरानीच संस्थानी प्रजापरिषदेची भूमिका व लोकशाहीमध्ये संस्थानांचे स्थान यासंबंधी सर्व काही विशद केले. १९३४ साली काँग्रेसनेच संस्थानी प्रजेचा प्रश्न हाताळावा म्हणून प्रयत्न झाले. तेव्हा १९३६ च्या लखनौ काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरूनीच जाहीर केले की लोकशाही भारतात संस्थानिकांचा स्वतंत्र राजे म्हणून टेंभा चालणारच नाही. हरिपूरा आणि त्रिपूरा येथील काँग्रेस अधिवेशनात संस्थानी प्रजेचे अधिकार इतर भारतीयांच्या इतकेच मान्यता पावतील असा दिलासा राष्ट्राने दिला.

मिरज, कोल्हापूर येथील संस्थानिकांच्या स्वैराचाराचे वाभाडे प्रा. गणपतराव अभ्यंकर प्रभृती काढीत असता, १९१० पासून हाताखालील संस्थानिकावर कोल्हापूरचा जो जुलूम होत होता, त्याला वाचा फोडल्याबद्दल वृत्तपत्रावर जी गंडांतरे आणली गेली होती, १९३१ साली जे न्यायदानाचे सर्वच हक्क गुण्डाळण्यात आले होते, शेतसारा वाढीबद्दल जो मिरज–शिरोळ येथे आवाज उठत होता, त्यामुळे, ज्या चळवळी झाल्या त्यांची साधक बाधक चर्चा १९३८ साली जोराने झाली. त्यामुळे १८ ऑगस्ट रोजी कोल्हापूर

संस्थानने राजकीय सुधारणा प्रजेस देण्याची घोषणा केली. वीरन् गौडा पाटील यांच्याशी विचार विनिमय करून बुधगाव संस्थानने प्रजेला शेतसाऱ्यात सवलती दिल्या आणि कुरुंदवाडने आठ लोकप्रतिनिधींचे कायदेमंडळ निर्माण केले. सांगली येथे तर रयतअसेंब्लीची सुरवातच झाली. मग मिरजकर प्रजेला जबाबदार राज्यपद्धती देतो म्हणाले तर नवल काय? फलटणने १९२० सालीच प्रजा-सल्लागार-समिती नेमून घेतली होती. तीतून १९२८ मध्ये लोकानुवर्ती कार्यकारीमंडळ केले होते. व १९२९ साली कायदेमंडळ निर्माण करून १९३१ मध्ये न्याय व अम्मलबजावणी ही खाती विभक्त केली होती. पुढे १९३५ मध्ये शेतकी सुधारणा व औद्योगिक सुधारणा–निधी सुरू केले. आणि १९३८ त प्रजेला राजकीय हक्कच देऊन टाकले. स्वतंत्र हायकोर्ट व संस्थानची स्वतंत्र बँक स्थापणाऱ्यात सांगली व औंध ही संस्थाने होती. पैकी १९३८ साली शेतकऱ्यांच्या मोर्चांचे स्वागत करणारे पहिले संस्थानिक म्हणूनच औंधकरांचा गौरव झाला. १९३९ मध्ये महात्माजींच्या सल्ल्याने बाळासाहेबांनी औंध संस्थानची संपूर्ण लोकशाही करून टाकली.

कुरुंदवाडच्या छोट्या पातीतील प्रजेवर १९२७ साली झालेल्या सारावाढीत पन्नासटक्के कपात करण्याचे श्रेय पोलिटिकल एजंटानेच मिळवले होते. तरीही तो सारा असह्य असल्याने लोक राजेसाहेबास भेटावयास गेले असता, २ नोव्हेंबर १९३० रोजी त्यांचे स्वागत माधवनगरास गोळीबारानेच झाले होते. तेव्हा राजांना गादी खाली करावी लागली. १९३७ मध्ये लोकानी शेतकरी-संघ स्थापन केला. पण त्यालाही दगड-माराने राजवाड्यातून प्रतिसाद मिळाला! अगदी १९३९ मध्ये मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन सदैव सदिच्छेचे पण संस्थानातील लोकांच्या चळवळीने साम्राज्यसरकारची भुवई वाकडी होऊ नये ही त्यांची कळकळ! विसाव्या शतकाचे पहिले दशकात कोल्हापूरने सार्वभौम सत्तेकडे तक्रार केली होती की, क्रांतिकारकांचा प्रवेश कोल्हापुरात झाला तो मिरजेमार्फत! त्यामुळे कोल्हापूरची धास्तीही मिरज संस्थानिकाना. पण त्या मानाने प्रजा-पुढारी पुष्कळच जगाबरोबर धावत. १९२२ ते १९२८ पर्यंत त्यांनी प्रजापरिषदेची चार अधिवेशने भरवली. १९२८ च्या सुमारास राजानी शेतसारा वाढविला होता. तो साठ वर्षानंतर! पण तो सरसि ५० टक्के व लक्ष्मेश्वरसारख्या ठिकाणी सत्तर टक्के! शेतकऱ्यांचे म्हणून मोर्चे निघाले व बाळकृष्णपंत शिखऱ्यांनी बार्डोली करण्याचा बेत आणला! शिखऱ्यांना हद्दपारीच्या सुद्धा शिक्षा झाल्या. मिरज–काँग्रेस–कमेटी बेकायदेशीर ठरली. सार्वजनिक सभांना बंदी झाली! १९३२ नंतर वल्लभभाई पटेलांनी जेव्हा शेतसारा वाढीची चौकशी संस्थानी प्रजापरिषदेच्या वतीने करण्याचे ठरविले, तेव्हा १९३७ साली "राजे" पदवी घेताना राजानी सहानुभूती प्रगट केली व

संस्थानला एक कायदेमंडळ देण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे सत्तर हजारांचा विश्वस्त निधि शेती सुधारणेसाठी काढून ठेवण्याचा मनसुबा हाकला.

मिरजेची सुपारी अशी कठीण तर कोल्हापूरचा नारळ यापेक्षाही कठीण. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक चळवळींना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या हुल्लडबाजीला तेथे भरपूर वाव मिळे. पण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासून तेथे जी राजकीय दडपशाही माजली तिने कुलकर्णी वतने जप्त केली, आणि ब्रिटिशांना खूष करण्याकरता स्वदेशी-खादीच्या चळवळींच्या सुद्धा कोंडचा करण्यात आल्या. त्यामुळे शिवाजीच्या वंशवेलीचे राज्य म्हणून त्याचा उदोउदो करण्यात काही अर्थ नाही, हे लोक समजून चुकले. १९३६ साली मग प्रजापरिषदेची स्थापना झाली आणि तिची अधिवेशने ब्रिटिश हद्दीत भरू लागली. शेतकऱ्याना शेतसाऱ्याचा जाच एवढा होता की शिरोळ पेटा सत्याग्रहास उठला. नाना जगदाळचांच्या साहाय्याने व बाळकृष्णपंत शिखरे यांच्या मार्गदर्शनाने माधवराव बागलानी मोर्चे काढले. लाठी हल्ले व पुढाऱ्यांना शिक्षा यांच्या जोरावर चळवळ दडपण्याचे दरबारचे मनातील मांडे मनातच चुरले गेले. प्रजेने जबाबदार स्वराज्याची मागणी केली. १९३९ मध्ये दरबारने सव्वासहा टक्के शेतसारा कमी केला पण चळवळ थांबेना तेव्हा दरबारने ब्रिटिश सरकारच्या पातळीवर शेतसारा आणण्याचे वचन दिले.

याच सुमारास हिटलरी होरपळ सुरू झाली आणि जगाचा जमानाच पालटला!! हिंदुस्थान युद्धमान असल्याचे ब्रिटिश साम्राज्याने जाहीर करताच, जगात व हिंदुस्थानात एक क्रांती होत असल्याचा प्रत्यय येऊ लागला. भारतात सुरू झालेली वैयक्तिक सत्याग्रहाची व "चलेजावची" चळवळ नेताजी सुभाषचंद्राच्या "चलो दिल्ली" चा यशोमार्ग आखीत असल्याचेच सिद्ध मानण्यात येऊ लागले. भारतीय संस्थानांचे अस्तित्वच कालविपर्यस्त म्हणूनच ऐतिहासिक उतक्रांतीवादाचे अभ्यासक मानीत होते, इंग्लंडमधल्या मुत्सद्यांचे लक्ष "प्रथम सुखरूपता" या तत्त्वावर खिळले असल्याकारणाने, 'ब्रिटिश सरकारने संस्थानिकांना लेखीटाकी जरी दोस्त म्हणून संबोधले असले तरी, रेसिडेंटच त्यांचा भाग्यविधाता व्यवहारतः होता. पण १९४० सालापासून संस्थानी प्रजाजन उघडपणे लोकशाही स्वराज्यासाठी एवढे अधीर होते की, चलेजावच्या चळवळीला त्यानीं कमालीबाहेर उधाण आणले. तेव्हा ब्रिटिश सरकारचीच जेथे धडगत नाही तेथे त्यांच्या जिवावरच चरणाऱ्या आपणाला स्थान कोठचे? हे मनात आणून संस्थानिकांची वाणी निराळचा तऱ्हेने फुलू लागली.

संस्थानी प्रजेच्या चळवळीला अखिल भारताचा पाठिंबा असल्याची जाणीवही संस्थानिक अधूनमधून दाखवू लागले. हरिपुरा काँग्रेसपासून लोकचळवळीतील संस्थानी पुढारी राजरोसपणे भारतीय महत्त्व पावलेले ब्रिटिशा-

सुद्धा सर्वांना दिसत होते. अशा स्थितीत औंधच्या राजेसाहेबांच्या पावलावर बाकीच्या संस्थानिकानी पाऊल टाकले असते तर स्वराज्याच्या प्रश्नाला वेगळे, आगळे, विलोभनीय स्वरूप आले असते. सनदी स्वातंत्र्याचा अप्रतिहत वापर हाच कोणत्याही प्रगतीचा राजरस्ता होऊन बसतो. संस्थानिकानी तो शहाणपणा न दाखवता दक्षिणेतील संस्थानी प्रजाजनांच्या चळवळीला १९४६ त चढलेले तेज ऐनजिनसी संस्थानांचे विलिनीकरण अपेक्षित आहे, हेही त्यांच्या लक्षात भरले नाही. १९४२ च्या १३ डिसेंबरला सांगली येथे शंभरएक संस्थानी कार्यकर्ते जमून त्यांच्या विचारविनिमयाचे संमेलन असे झाले की लोकशाही स्वराज्याकडे प्रगती करण्याची ताकद कोठल्याही एकटचा दुकटचा संस्थानात नाही. म्हणून सर्व दक्षिणी संस्थानांचा एक गट निर्माण करावा व सर्वांचे मिळून एकच हायकोर्ट असावे या योजनेला १९४३ साली औंधचे संस्थानिकानी उचलूनच धरले. त्या सालच्या डिसेंबर अखेर पं. सातवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जमखिंडी येथील प्रजापरिषदेच्या अधिवेशनात वरील योजनेला चिकित्सापूर्वक अनुमती मिळाली व सगळीकडे विजेची एक चमक निर्माण झाल्यासारखे झाले. लॉर्ड लिन्लिथगो यांच्या उपदेशाप्रमाणे संस्थानिकानी बॅ. जयकराकडून एक समाईक हायकोर्टाची योजना आखून घेतली, ती औंध व फलटण यांनी ताबडतोब मान्य केली. कारण शून्यापेक्षा साक्षात्कार बरा ! त्यानंतर सहा संस्थानांची मान्यता आल्यावर मिरज संस्थानचा कुंभकर्ण काही राजकीय सुधारणांच्या जांभया देऊ लागला, आणि कोल्हापूर १९४४ मध्ये समाईक हायकोर्टाला होकार भरू लागले- पण संस्थानिकांच्या मर्ज्या राखावयास काळ आता खोळंबत नव्हता. १९४५ शेवटी सांगली संस्थान प्रजापरिषदेने शेजारचे बिगरसंस्थानी भागात संस्थाने विलीन व्हावीत असा ठरावच केला. बाकी संस्थानी प्रजा तसाच सूर काढू लागल्या. लहान लहान संस्थाने विलीन व्हावीत किंवा त्यांचे फेडरेशन बनवावे असा सल्ला लॉर्ड वेव्हेल यांनी या वेळेला पुढे केला. त्यातील दुसऱ्या सूचनेप्रमाणे १९४६ चे मार्च महिन्याचे पहिले तारखेस कोल्हापूर, औंध, फलटण आणि मिरज यानी औंध संस्थानिकांचे अधिपत्याखाली एक हायकोर्ट प्रस्थापित केले. पण संपूर्ण स्वातंत्र्याकडे भारतीय राजकारणाची वाटचाल जसजशी होऊ लागली तसतसे दक्षिणी संस्थानास आपले फेडरेशन (संघराज्य) बनवण्याची बुद्धी होऊ लागली. व ता. ८ ऑक्टोबर १९४६ रोजी पुणे येथील हिंद सेवक समाजाच्या कचेरीत शंकरराव देवाना मदतीस घेऊन आपआपल्या पंतप्रधानांच्या मार्फत संघराज्याचा एक आराखडा संस्थानिकांनी तयार करविला. विलिनीकरणाची ही नांदी आहे असेच प्रजा परिषदेचे पुढारी समजले. तेवढचात छत्रपतींचे वंशज म्हणून कोल्हापूरकरांनी आज्ञापत्रके काढली !! कोल्हापूरचा वरचष्मा कोणासच

नको होता. फलटण व जमखिंडीने मग एकदमच विलिनीकरणाला संमती देऊन टाकली.

संस्थानिकांचे फेडरेशन या कल्पनेतील रम्यता २३ ऑगस्ट १९४६ ला जवाहरलाल नेहरूनी भारतीय सरकारची सूत्रे हाती घेतल्यापासून संपलीच होती. भारताच्या धटनासमितीवर संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी आपण घेणार अशी नेहरूनी घोषणा केल्यापासून तर विलीनीकरणाचा उद्घोष सर्वत्र झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा २६ जानेवारी १९४८ रोजी संस्थानिकांच्या फेडरेशनने विलीनकरणाचा ठराव केला आणि ९ मार्च १९४८ रोजी सर्व संस्थानांच्या विलिनीकरणाचा सुवर्ण दिवस उगवला. फक्त कोल्हापूरच एक वर्षाने उशीरा विलीन झाले.

८ : ' अशी होती आर्थिक अवस्था '

"राजा काल्स्य कारणं ? " या न्यायाने ब्रिटिश रियासतीत आर्थिक'दृष्टचा १८७६ साल महत्त्वाचे ठरले. कुप्रसिद्ध लिटनशाही यासाली सुरू झाली. आणि इंग्लंडच्या साम्राज्य विषयक धोरणाचा हिंदुस्थानवर विशेष पगडा बसला. यावर्षी मद्रासकडे भयंकर दुष्काळ पडून लाखो लोक अन्नान्न करून मेले. याचवेळी युरोपातील प्रमुख राष्ट्रानी आपल्या देशातील चांदीचे नाणे बंद केल्यामुळे जगातील व्यापारात चांदीचा भाव उतरू लागला. यामुळे हिंदुस्तान सरकारला विलायतेत पाठवाव्या लागणाऱ्या पौंडाबद्दल अधिकाधिक चांदी पाठवावी लागली. हिंदुस्थानच्या तिजोरीवर खर्चाचा बोजा वाढला त्यातच अफगाण युद्ध केवळ इंग्लंडच्या सम्राज्यविषयक धोरणासाठी सुरू होऊन त्याचा सर्व खर्च हिंदुस्थानवर पडला. हे अफगाण युद्ध १८८० साली संपले. या युद्धाचे खर्चामुळे हिंदुस्थानचे जमाखर्चात तूट येऊ लागली. त्याच्याच जोडीला १८७८ पासून मँचेस्टरच्या कापडावरील जकात ५॥ टक्यावरून ३॥ टक्यावर उतरविण्यात आली. लिटनशाही १८८० त संपली. रिपनशाहीची तीन चार वर्षे बरी गेली म्हणावयाची ! १८८४ साली रिपन स्वदेशी गेल्यावर डफरीनशाही सुरु झाली, ती लिटनशाहीची सख्खी बहीण ठरली !!

मध्य आशियातून रशियाचा हल्ला होईल या अवास्तव भयास्तव सरहद्दीवर सैन्याची तयारी कडेलोट होऊ लागली, व साम्राज्य तृष्णेने इंग्लंडने ब्रम्हदेशाचा बळी घेऊन तो हिंदुस्थानच्या डोक्यावर लादला. १८८७ पासून तूट भरून काढण्यासाठी दुष्काळ निवारकनिधी उभारला होता. तरी त्याचा

उपयोग भलताच होऊन १८८६ साली प्राप्तीकर सुरू करण्यात आला. १८८७ त मिठावरील कर वाढला. पुढे १८९०-९१ साली अशी स्थिती आली की, हिंदुस्थानचे दिवाळे वाजणार!!! चांदीचा भाव उतरू लागण्यापूर्वी १८७३-७४ साली एक कोटी तीस लक्ष पौंड होम चार्जेसची रुपयास २२ शिलिंग या भावाने १४, २६, ५७,००० रु. किंमत होती; १८९२-९३ साली एक कोटी पासष्ट लक्ष पौंड होम चार्जेसची किंमत रुपयास १४ शिलिंगाचे भावाने २६, ४७, ८४, १५० रु. झाली. म्हणजे चांदीचा भाव उतरल्याने ८, ७२, ६४, ९५० रु. अधिक पाठवावे लागले. या शिवाय वाढलेल्या विनाकारण खर्चाचे गचके होतेच.

हिंदुस्थानातील टंकसाळी लोकास बंद करून व रुपयाची कृत्रिम किंमत वाढवून तात्पूर्ती सोय लावली तरी हिंदुस्थानातला पैसा हिंदीलोकांच्या हितासाठीच खर्च व्हाययास पाहिजे, हे तत्त्व सरकारकडून आचरणशुद्ध करून घेण्याकरताच, १८९३ साली ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आलेले भारताचे राजकीय प्रपितामह दादाभाई नौरोजी यांनी वेल्बी कमिशनची योजना करविली. तरीही परकी सरकारचा सोस सुटला नाहीच. १९०० मध्ये लँडरेव्हेन्यू कोडाची दुरुस्ती म्हणून झाली, तीत सर्व शेतजमिनी सरकार मालकीच्या ठरवून जमीनदार " वरिष्ठ धारण करणारा व कुळे कनिष्ठ धारण करणारा ठरला, मुंबई इलाख्यात हे घडत असता, हिंपुस्थानची तिजोरी जी १८९५ साली पार डबघाईला आली होती ती १९०२ च्या सुमारास बाह्यतः तरी बरीच सावरली होती. १८८५ पासूनची पुढील बारा वर्षे सरकारास चांदीच्या भावामुळे अतिशय ओढाताणीची गेली. रुपयाची किंमत एक पेन्स उतरताच एक कोटी रुपयांचा हिंदुस्थानच्या तिजोरीवर ताण बसतो असे त्यावेळचे फडणीस सर डेव्हिड बार्बर यानी म्हटले आहे. ही वाढती तूट भागविण्यासाठी (१) प्रांतिक सरकारास देण्यात येण्याची दुष्काळी अनुदाने कमीच कमी करण्यात आली. (२) प्रांतिक सरकारकडून दरवर्षी घेण्यात येणाऱ्या रकमा वाढविण्यात आल्या. (३) प्रांतिक सरकारकडून जादा रकमा मागविण्यात आल्या. (४) जमीन महसूल १८९० ते १८९६ पेक्षा १८९६-१९०१ पर्यंत दोन कोटी ब्याऐंशी लक्ष वाढविण्यात आला. (५) जादा कर बसविण्यात आले ते १८८६ इनकमटॅक्स, १८८८ मिठावरील कर १८८९ पेट्रोलियमकर, व पटवारी करवाढ, १८९० परदेशी दारूच्या आयातीवर कर; १८९१ देशी दारूवर कर; १८९२ खारलेल्या मासळीवर कर; १८९४ कापडाच्या आयातीवर सरसहा ५ टक्के कर, १८९६ मँचेस्टरच्या ओरडीमुळे पन्नास लाखांची बूड सोसून परदेशी सुतावरील जकात उतरविली; कापडावरील जकात ५ टक्यावरून ३॥ टक्के वर आणली; पण देशी कापडावरही ३½ टक्के कर बसविला; १८९८ साखरेवर जकात. (ना. गोखले यांचे अंदाजपत्रकी भाषण १९०२.)

अशा स्थितीत दरमाणशी वार्षिक उत्पन्न सरासरीने ३० रुपयांचे व त्या मुळेच चार कोटी लोकांना एकवेळ जेवून राहण्याची पाळी!! १८७६ ते १८७८ चा महाप्रलयी दुष्काळ, १८८५ ते १८९६ या काळात रुपयाची किंमत १९ पेन्स वरून १३ पेन्सवर आली. या गोष्टी कोणाही निरीक्षकाच्या चटकन डोळ्यात भरतील. पण १८८५–८६ सालीच सर ऑकलंड कॉलव्हिन् यानी अर्थ क्षेत्रात कायापालट होत असल्याचा इषारा दिला होता, तिकडे फक्त लोकमान्यांचे वर्ग बंधू श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर, वाई यांच्यासारख्या एकाद्याचेच लक्ष गेले आणि त्या काळपालटीला तोंड द्यावयास "विना सहकार नही उद्धार"! हा उपाय सुचविला; आणि आपण नोकरी करीत असलेल्या बडोदे संस्थानात, त्याचप्रमाणे सवड होताच नाशीक, खानदेशात इतक्या कळवळ्याने केला की संस्कार समारंभसुद्धा सर्व सामाजिक जीवनच सहकारमय करून सोडावे, याची व्यावहारिक आखणी त्यानी केली. (ज्ञानप्रकाश १८८६ व श्री. सयाजीराव गायकवाड गौरवग्रंथ भाग ३ पहा.)

त्या तसल्या प्रजाजनांचे चळवळीकडे फारसे कोणी आस्थेने लक्ष दिले नाही व १८८७ च्या दुष्काळातील उपाय योजनेसाठी साडे सात कोटी रुपये खर्च होऊनही १८९१ च्या दुष्काळात टिकाव धरताना सोलापूर जिल्हा घाईला आला! त्यातून १८८५ ते १९०० या काल खंडात कृषिविषयक व औद्योगिक घसरगुंडी भलतीच झाल्याने १८९५-१८९७ दुष्काळाच्या "गंडस्योपरि पीटिका संवृत्ता" प्लेगची!! त्यातच भर पडली, बोअर वॉर सुरू झाली. तिच्या परिणामांची अशा अवस्थेत १९००–१९०१ चे दुष्काळी वर्षात साडेनऊ कोटी रुपये सरकारने खर्च करूनही लोकाना "देमाय धरणी ठाय" झाले. १८७५ ते १९०० पर्यंत एकंदर लहानमोठे आठरा दुष्काळ झाले, १८९६ पासून छळणारा प्लेग १९०६ पर्यंत सत्त्व पहातच राहिला आणि मॅकडोनाल्ड यानी म्हटल्याप्रमाणे १८९५ ते १९०५ हे दशक दुःख, दुर्दैव, दैन्य यानी दारूण ठरले!! १९०० ते १९२५ या कालखंडात पांच दुष्काळ झाले, त्यांत १९०३ आणि १९०७ चे एवढे जाचक ठरले की १८५७ नंतर १९०९ हेच वर्ष लक्षात राहण्यासारख्या तुटीच्या अर्थ संकलपाचे झाले. दरम्यान शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेवर उपाय म्हणून १९०४ साली सहकारी पत पेढ्यांचा कायदा जारी झाला. त्यापूर्वीच १९०३ पासून बाजारदरांची चढती कमान होऊ लागली होती. तेव्हा परिस्थितीच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी २६ जानेवारी १९०६ रोजी बॉम्बे अर्बन को–आपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी काढून लोकानी आर्थिक नव जीवनास प्रारंभ केला. पण त्याच सुमारास व नंतर झालेल्या राजकीय उलाढाली आणि कैसरी कंदनाच्या (१९१४-१८) च्या छाया एवढ्या जाचक ठरल्या की समाज जीवनात समान्य माणसाला स्वास्थ्य हा शब्दच विस्मरणात ढकलावा लागला.

त्यातच साठ लक्ष लोकांचा बळी घेणारी १९१८ ची इन्फ्ल्यूएंझाची साथ येऊन बसली!! विसाव्या शतकाच्या या दुसऱ्या दशकातच सहकारी पतपेढ्या व सहकारी बँकानी आपले आस्तित्व दाखविण्यास सुरवात केली, त्यामुळेंच १९२९ मध्ये जगभरीची आर्थिक उलथापालथ होऊन १९३३ च्या बेकारीने समाज स्वास्थ्याचे नरडे धरले असता हिटलरी होरपळीचे जे ढग उठू लागले होते, त्याना दमदाटीने तोंड देणे जनतेला शक्य झाले!!!

सन १९३३ जगाचा उत्साह भंग व महायुद्धाची छाया पडू लागलेले वर्ष! बेकारी भीषण स्वरूप धरू लागलेली, उद्योगधंदे प्रेतकळा घेऊन बसलेले, बेघर अवस्थेत कित्येक जीव कोलमडलेले, आणि कित्येक तर भूक बळी व्हावयाच्या पंथाला लागलेले!! सर्वत्र अशांतता सरकारी जुलूमशाही आणि कर्ज बुडव्या क्लृप्त्या! बँका आपआपल्या व्यवहाराला कुलपे ठोकावीत की काय या विवंचनेत पडलेल्या. त्यातून एप्रिल १९३३ च्या पहिल्या आठवड्यानंतर अॅडाल्फ हिटलर जर्मनीचा चॅन्सेलर झाला आणि त्याच्या नाझी मंडळीनी जर्मनीला रणांगणसिद्ध शस्त्रागार करण्याचा विडाच उचलला. रशियात स्टालिनच्या उपासमार-उचलबांगडी धोरणाने खेडी उध्वस्त झाली, जपान मांच्युरियावरील स्वारीची जय्यत तयारी करून बसला. आणि बेकारी, भिकारी व भुकारी यांच्या आगीनी सुशीलता भाजूनच निघाली!! अशा स्थितीत मालविली तरी विझणारच नाही, अशा चिकाटीची ध्येयनिष्ठा असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या व संस्थेच्या जीवनाची प्रतिष्ठा टिकणे शक्य नव्हते. "हाय खायचे भय" सर्वत्र पसरले असता, "अभयं सत्वसं शुद्धी-ज्ञानयोग व्यवस्थितिः" ज्यांनी राखली ते खरोखरच धन्य होत!

रुपयाचे अवमूल्यन १९२९ ते १९३४ च्या काळात ४० % झाले होते. त्या वेळी १९३०-३१ व १९३१-३५ साली लवाद, फिर्यादी, दरखास्तीच सर्वत्र निघाल्या. त्याचप्रमाणे १९५१ साली रुपयाचे अवमूल्यन १९३९ च्या २५ % झालेने लवाद, फिर्यादी, दरखास्ती गर्दी करून होत्याच. थकबाकी बाबतही १९३६ ते १९४२ सालातील जुन्याच अनुभवांची पुनरावृत्ती होत राहिली १९५१ साली!! १९२१-२२ सालात आर्थिक क्रयापसरणाचा कालखंड आला होता. त्यापुढे १९२३ ते १९२९ असा उद्यमधनोत्पादनाचा कालखंड उदयास येऊन १९२९ ते १९३५ या कालखंडावर अर्थमंदीची दाट छाया पसरून राहिली होती. मध्येच १९३५ ते १९३७ असा खडतर वार्षिकाचा कालखंड भोगावा लागून १९३७ ते १९३९ असा लोककल्याण अर्थधारेचा प्रपंच सुरू झाला. हिटलरी होरपळीच्या १९४० ते १९४५ अशा समरसंकट पण सुधारसंयोजनाचा कालखंड आणि त्यापुढील लोककल्याण अर्थधारेच्या पुनरावृत्तीचा कालखंड, असे आर्थिक टप्पे चिकित्सेचे विषय होऊन बसले होते.

१९५० च्या मे महिन्याचे मध्यास सुरू झालेली मंदी सप्टेंबर अखेर टिकली आणि तेथून तेजी झाली, तिने १९५२ च्या फेब्रुवारीचा मध्यही पाहिला नाही. तेथून एक महिनाभर मंदीची लाट एवढी सार्वत्रिक, सर्वांगीण आणि सहनशक्तीच्या पलीकडची होती की– मार्च १९५२ च्या मध्यापासून किंमती फिरून चढ धरू लागल्या तरी आणि भारतातील किंमती आता जागतिक बाजाराच्या समतोलात येऊ पहात असल्या तरी मंदीच्या तडाख्यातून आणि ताटकळचातून निवांतपणे उसासा टाकण्यास मध्यमवर्गीय व्यापाऱ्याना आणि गोरगरिबाना उसंत मिळाला नाही.

सन १९४७–४८ हे वर्ष अनेक उलाढालींचे आणि खळबळीचे गेले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यातून स्वतंत्र झाला तरी अखंड हिंदुस्थान दुखंड होऊन ज्या अनेक सामाजिक, तशाच आर्थिक आपत्ती ओढवल्या त्यांनी सामान्य-माणसाचे जीवनावर परिणाम करावयास सोडले नाही. आगोदरच इंग्रजीसाम्राज्याने एवढी दुरवस्था करून ठेवली होती की, अमेरिकेत दर माणशी दरसाल जेवढे उत्पादन होते त्याच्या निम्याहून थोडेसे अधिक ब्रिटनसारख्या कोळसा लोखंडाच्या देशात देखील होत असता, हिंदुस्थान निसर्गसंपन्न देशात ते फक्त अमेरिकेच्या ७% होत आले. अशा स्थितीत हिटलरी होरपळीचा (१९३९–१९४५) भर ओसरेपर्यंत आपल्या सरकारी कडक बंदोबस्ताखाली जे उत्पादन टिकवून धरण्यात आले होते, ते युद्धातील यशाची आशा उमटू लागल्यापासून हेलकावे खावू लागले आणि १९४४ पासून हिंदुस्थानातील एकंदर घटले, १९४६ पासून खालावले, १९४७ पासून निकृष्ठावस्थेला गेले आणि कल्पना, उत्पादनाचे आराखडे व संपत्तीच्या विनियोगाची आखणी आणि उपभोगाची साधने यात प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने पण सामुदायिक निरुपद्रवीपणावर भर देऊन व्याप वाढविला जाणे हे ध्येय ग्रामीण उद्योगांचा, नागरी व्यवसायांचा किंवा शहरी कारखान्यांचा विकास साधताना सहकारी संस्थांच्याही डोळचापुढून चळता कामा नव्हते व नाही.

आर्थिक स्वस्थता १९४८–४९ सालीही अनुभवाच्या पलीकडचीच होती. सातारा जिल्ह्यातील जीवनमान (१९३९ चे १०० धरून) १९४८ च्या जुलईस २९७, ऑगस्टात ३०६, सप्टेंबरात ३०८, ऑक्टोबरात ३००, नोव्हेंबरात ३०२, डिसेंबरात ३११, व सन १९४९ च्या जानेवारीत ३०१, फेब्रुवारीत २९२, मार्चांत २९६, एप्रिलात २९०, मे मध्ये २९१ व जून मध्ये २९३ असे होते. पौर्वात्य व पाश्चिमात्य जगातील जीवनकलह जसा याला कारण होता तसाच अन्नोत्पादनातील अपुरेपणा, संपप्रवृत्ती वगैरेनी विकासक्षमतेला बसलेला आळा हेही कारण होते. १९४८ चे प्रारंभी हाती आलेले धनधान्य दक्षिण महाराष्ट्रात तरी महात्मा गांधींच्या अमानुष वधानंतरच्या

प्रक्षोभाचे आगीत करपून, कोळसून गेले !! फार काय, त्या अस्वस्थ काळात पुण्यापासून सांगलीपर्यंत छोटचा मोठ्या साठ कारखान्यांची अक्षरशः राख रांगोळी झाली आणि तिचा हिशोब लाखो रुपयांनी करावा लागला !!! दुकाने, घरे, मालमत्ता यांच्या नुकसानीचे हिशेब आकडेमोडीच्या आवाक्यात घालणेच शक्य नाही. एकटचा सातारा जिल्ह्याचा हिशेब नुसता मनोमन केला तरी पन्नास हजार लोकांच्या जीवितयात्रेचा प्रश्न "आ" वासून उभा राहिला. जागतिक नि राष्ट्रांतर्गत अनेकानेक गुंतागुंतींच्या प्रश्नामुळे ओढवणारे आर्थिक प्रसंग नजरेआड केले तरी, दैनंदीन जीवनाची स्थिरता सुतराम् नव्हती. बाजार भावानी केवढा ताळ सोडला होता. हे लक्षात येण्यासाठी सातारा जिल्ह्यातील महागाईचे ओझरते दिग्दर्शन असे :–

	१९३९	१९४७ एप्रिल	१९४८ एप्रिल	एक वर्षात वाढ
खाद्य पदार्थ	१००	२७९.९	३४८.८	२४.६ %
औद्यो. कच्चामाल	१००	३५६.२	४१४.६	१६.४ %
अर्धवट पक्कामाल	१००	२४९.७	२९९.८	२०.१ %
पक्कामाल	१००	२७०.१	३२५.८	२०.६ %
इतर माल	१००	४६७.६	४७८.५	२.३ %
किर. उपयुक्त माल	१००	२८९.६	३४८.०	२०.२ %

अशा महागाईस आळा बसविण्यास सहकारी संस्थाना केवढा तरी वाव होता. सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या सभासदांचे लोकसंख्येशी प्रमाण फक्त ४.३५ होते आणि जिल्ह्यातील त्या वेळच्या १३५७ गावापैकी सहाशे गावानाही एकेक सहकारी पतपेढी झाली नव्हती ! मि. स्लेन ओव्हलटेन याने म्हटल्या-प्रमाणे कारखान्यातून होणारे उत्पादन व शेतीतून होणारे उत्पादन यांच्या मध्ये मेळ राखला गेला तरच आर्थिक स्वास्थ्य राखण्यास मदत होते. मानवी सौख्याबरोबर सौंदर्याच्या, सोईच्या व सहजपणाच्या १९५०–५१ साली मोठमोठ्या पेठातूनसुद्धा नेहमीच्या सरासरीने ९ ते ११ आणे देवघेव झाली. मात्र या देवघेवीचा व्यवहारखर्च जबरच होता म्हटले तरी चालेल. सर्व जगातच विसकटलेली आर्थिक घडी, नाणे बाजारातील तंगी, जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतूक वाटणीतील अस्थिरता, व्यापार व्यवहारातील अनपेक्षित उतार, बाजार नियंत्रणासंबंधातील चंचल असे सरकारी धोरण, सरकारी रोख्या-वरील घसारे, अशी ही आंधळ्याच्याही डोळ्यात भरणारी अनेकानेक कारणे होती. प्रमाणाबाहेर नफेबाजीचे दुखणे हिटलरी होरपळीच्या काळात रणरंगत (वॉर क्वालिटी) वस्तुमात्रांच्या प्रसाराने परकीय सत्तेने सुरू केले होते ते याही वर्षी ओसरले नव्हते. (व पुढेही फारसे नाहीच) धान्ये दसपट महागली. मजुरी सहापट वाढली पण उत्पादन मात्र सर्वत्र संकुचित झाले. १९४८ च्या

३० जूनला बँकाकडील ठेवीच्या रकमांनी सर्वत्र शीग गाठली होती. आणि १९४९ च्या आक्टोबरपर्यंत कराचा भार व वाढती महागाई यांच्या योगे शिल्लक टाकण्याची कुवतच एकंदरीने कमी झाल्याचा प्रत्यय येऊ लागला. शिलकीपेक्षा उचल हा सामान्य माणसाचा शिरस्ता होऊन बसला. पूर्वी टाकलेल्या शिलकांची घुशीसारखी उकर–उचल हा मुंबई राज्यातील दैनंदिनी अनुभव ठरला. १९४९ साली सर्वत्र बँकांनी ठेवीच्या ७०% हून अधिक रक्कम कर्जाऊ दिली होती. १९५१–५२ साली तर काय, सुटा पैसा ओढून धरण्याच्या नाणे बाजारातील प्रवृत्तीमुळे कित्येक ठिकाणी कर्जांना " न फुटणाऱ्या बाभळीच्या गाठीचे " स्वरूप आले. नाणे बाजारातील पैशाची आखड–आवर १९५० च्या शेवटी शेवटीच सुरू झाली होती, आणि ती १९५१ मध्ये धारदारच होत राहिली होती. त्यामुळेही १९५२ च्या फेब्रुवारीपासून मार्चचे मध्यापर्यंत सर्व बाजूंनी हैराण करणाऱ्या मंदीची झडप सामान्य माणसाच्या आणि मध्यम वर्गीय मिळकतीच्या व्यापाऱ्याच्या लक्षात आली नसलेमुळे ते बेजार झाले. १९४८ साली बँकातील ठेवींनी जास्त उच्चांक गाठला होता. तसा १९५१–५२ साली बँकातील कर्जांनी उच्चांक गाठला, सरकारी रोख्यातील गुंतवण आणि हातातील पैसा कमी झाला; बाजारच्या महागाईने दुकानाच्या चालू भांडवलासाठी मध्यमवर्गीय व्यापारी बँकावरच भर देऊन बसले आणि बडे व्यापारी नी उद्योगपति " राष्ट्राच्या अंतर्गत वस्तुकिंमती उतरू लागल्या तरी आंतरराष्ट्रीय किंमती चढायच्याच अशा अपेक्षेने साठेबाजीकडे वळू लागले. " म्हणून उत्पादनावर व व्यापारावर दुष्परिणाम होऊ न देता बँकाकडील कर्जाच्या " पती " ची वाढ तातडीने आवाक्यात आणणे व तिचे दीर्घकाल नियंत्रण करणे, त्याचप्रमाणे नाणे बाजारात पतीला लवचिकपणा आणणे, हे तीन हेतु पुढे ठेवून रिझर्व बँकेने १९३५ पासून सतरा वर्षे कायम असलेला आपला व्याजाचा दर ३% वरून ३½% वर नेला आणि सरकारी रोख्याची खरेदी न करता, त्यांचे तारणावर कर्जे देण्याचे ठरविले. सन १९५१ चे नोव्हेंबर मध्ये अर्थातच सरकारी रोख्याच्या किंमती खाडखाड कमी झाल्या आणि १९५२ पासून निव्वळ नफ्याच्या १०% तरी रक्कम रोखे तुटीच्या भरपाईची तरतूद म्हणून काढून ठेवण्याबद्दल अधिकारी मंडळी परिपत्रके काढू लागली. बँकाबँकातील मिळावयाचे कर्जावरील व्याजाचे दर वाढले आणि खुद्द सरकारला सावकारी नियंत्रण कायद्यातील ६¼ टक्के व्याजाची कमाल मर्यादा ९% व १२% वर न्यावी लागली ! ! ! हातउसने घेतलेल्या कर्जाचे गुपचुप व्याजाचे दरही २४% ते ३६% वर गेल्याचा बोभाटा दक्षिण व पश्चिम महाराष्ट्रात झाला होता !

१९४७ ते १९५३ साली सहकारी चळवळीला ज्या अडचणीच अडचणी सोसाव्या लागल्या, त्यांची तुलना झालीच तर १९२० च्या सुमारास त्या चळवळीस

सोसाव्या लागणाऱ्या अडचणीशीच होऊ शकेल. श्री. कावसजी जहांगीर यानी १९५२–५३ हे वर्ष एकंदर व्यापार उदीमाला आणि त्यातल्या त्यात बँकांच्या व्यवसायाला कठीणच गेले, असा अभिप्राय नमूद केला आहे. आर्थिक व्यवहाराच्या सूत्रधारानी पैशाला फुगवटी आणली आणि तो गुंतविणेस कारखानदारी करावी तर औद्योगिक क्षेत्रातील आवश्यक ती यंत्रसामुग्री मिळणे कठीण होऊन बसले होते !! त्यामुळे आणि काळाची पाऊले वैयक्तिक सावकारीला अपशकुनी पडताहेत हे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीपासून माहित असल्यामुळे भारतात बँकांची वाढ झपाट्याने होऊ लागली, तिला १९४३ च्या भारतसरकारच्या वटहुकुमाने आळा घातला नसता तर व्यवसाय क्षेत्रातील लोकसंख्या व तिची मिळवती व संचयवती कुवत न पाहाता चाललेली ती वाढ कोणत्या थराला जाती कोणास ठाऊक! ! भारत सरकारने १९४४ पासून "बँकिंग कंपनीज अॅक्ट" घडावयास घालून तो १९४५ त जारी केला, तरी १९४६ त बँकांची प्रगती झपाट्याचीच होती. १९४७ त मात्र हिंदुस्थान दुखंड होऊन जो हल्लकल्लोळ झाला त्यात अनेक सामाजिक व राजकीय आपत्तिबरोबरच आर्थिक आपत्तीच्या वावटळीत बँकाही सापडल्या. तरी कालानुरूप धोरण धरल्यामुळेच १९४८ साली बँकाना आपलेकडील ठेवी टिकवता आल्या. त्या वर्षी रिझर्व बँकेचे राष्ट्रीयकरण करून भारत सरकारने आर्थिक व्यवहार आटोक्यात ठेवण्याची शिकस्त केली. १९४९ त भारतीय रुपयाचे अवमूल्यन झाल्याने जुलई १९४८ चे मानाने आक्टोबर १९४९ मध्ये व्यापाराचे पारडे फिरले; सरकारी करांचे ओझे वाढले, किमतीचा भरमसाट चढ झाला आणि बँकांच्या ठेवी घसरू लागल्या. १९५० मध्ये व्यापाराची घडी थोडी सुधारली. बँकांच्या ठेवीही वाढू लागल्या तरी कर्जदारांची वतनदारी जणु मूळ धरू लागली ! खर्च वाढू लागले !! तशा बारक्या सारख्या ताकदीच्या बँकांना कालोदरात वा मोठ्या बँकांच्या पोटात इतिहासजमा संस्थानाप्रमाणे विलीन व्हावे लागले ! घाऊक बाजारभाव उतरण्यास १९५१ च्या दुसऱ्या सहामाहीत आरंभ झाला. १९५२ च्या पहिल्या तिमाहीत बाजारभाव आणखी खाली घसरले. एप्रिलमध्ये घसरगुंडी थांबली, जून १९५२ पासून बाजारभाव हळूहळू वाढू लागले असे की ते सप्टेंबर मध्ये ६ टक्के चढून बाजारभावांचा निर्देशांक ३८९ झाला. ऑक्टोबरमध्ये पुन्हा ४ टक्के भाव घसरले. कारण प्रस्तुत चौमाहीत बाजारी पैशांचा पुरवठा भरपूर होऊन आयात आकसल्यामुळे मालाच्या उठावाची परिस्थिती कठीण झाली. १९३३–३४ चे जीवनमान १०० धरून १९५३ मार्चमध्ये ६३० असले तर त्यात अन्न, वस्त्र, घर, सरपण वगैरे आवश्यक वस्तूंचा खर्च ४४९ होता तर मे मध्ये जीवनमान ६०६ होऊनही आवश्यक वस्तूंचा खर्च मात्र ४५६ झाला. त्यामुळे मनात असूनही वेळेवर कर्जे भरण्यास वाढत्या वेकारीने आणि भोव-

तालच्या भिकार भविष्याने मोजक्या प्राप्तीच्या माणसाला उसंत सापडेना !!

सन १९५३–५४ सालातील मंदी, बाजार भावातील अस्थिरता, महागाई, नियंत्रण-विनियंत्रणातील फेरफार, विक्रीकरांच्या चढत्या उतरत्या भांजण्या, दुष्काळाची छाया आणि तिची प्रतिक्रिया अशी प्रतिकूलपणे अस्थिर अवस्थाच होती. पैसा गडप वा महाग करणारा हा काल! त्यात अस्थिरतेच्या लाटा येत असताना बँकादि संस्थांचे व्यवस्था खर्च फारसे काय पण थोडे सुद्धा कमी होणे नव्हते ! खेळत्या पैशाच्या कमतरतेमुळे व बाजारमंदीमुळे एकंदरीने हात राखूनच पाणी चाखावे लागे. बेकारी हा भारतापुढील एक व्यापक व बिकट प्रश्न ठरून छोटे उद्योगधंदे व ग्रामोद्योगाना प्रोत्साहन देण्याचा कार्यक्रम हाच बेकारीवर तोडगा दिसला. तरी रिझर्व्ह बँकेने तसेच सहकारी खात्याने ठेवींच्या ६० टक्के व खेळत्या भांडवलाच्या ५० टक्के रक्कम फक्त बँकानी कर्जाऊ द्यावी असा निर्बंध घातला. भारतीय खेड्यात राहणाऱ्या आणि ना खेडे, ना शहर, ना उद्यमकेंद्र, ना संशोधन केंद्र असलेल्या व्यापारी उलाढालीच्या शहरात राहणाऱ्या जनतेची अधिक कुचंबणा थांबवण्यासाठी सहकारी बँकेशिवाय उपाय नाही, असा निर्वाळा फ्लॉरेन्स नाइटिंगेल या रणशुश्रुकेने एकोणीसाव्या शतकाच्या सहाव्या दशकातच दिला होता व त्या दिशेने १८७९ पासून प्रयत्न चालू होता, त्या प्रयत्नाला १९०४ सालापासून कायदेशीर मान्यता मिळाल्याने पन्नास वर्षाच्या अवधीत मुंबई राज्यातील निम्म्याहून अधिक गावात सहकारी संस्था निघाल्या तरी ३० टक्के लोकच संपर्कात आले. १९१३ व १९१७ तील बँकावरील गण्डांतरे, १९३२ साली जागतिक मंदीचा उठलेला वणवा, १९४८ साली भारतीय रहाणीला आलेली अवकळा अशा एकेक कालकठोरतांचा विचार करता, मुंबई राज्यातील सहकारी संस्थातील ७० टक्के संस्था कर्जे देण्याचेच फक्त व्यवहार करीत. हे लक्षात घेऊनही, एकंदरीत सहकारी चळवळीने १९१२ ते १९२० पर्यंत सर्वांगीण उन्नतीची पावले टाकली, १९२० ते १९३० या काळात सहकारी सभासदांची संख्या १९१२ ते १९२० च्या दुप्पटीने आणि कर्जाच्या रकमा तिप्पटीने व्यवहारी केल्या; या उत्साही व्यवहाराच्या भरात थकबाक्या कोठे कोठे दसपटीवर गेल्या, त्या फिरून (दुसऱ्या महायुद्धाच्या) हिटलरी होरपळीच्या काळात आटोक्यात आल्या; इत्यादी गोष्टींचा आढावा सहकारी कायद्याच्या सुवर्ण महोत्सवा (१९५४) निमित्ताने कर्तव्यतत्पर अभ्यासकांचे मनावर ठसल्याशिवाय राहिल्या नाहीत. अशाच भूतकाळ निरीक्षणाने प्रत्ययास आले की १९५४–५५ हे वर्ष आर्थिक मंदीचे होते. शेतमालाच्या घसरलेल्या किंमती आणि मध्यम वर्गीयामधील वाढती बेकारी यांच्यामुळे परिणामकारक अस्वस्थताच अस्वस्थता होती. त्यातून सातारा जिल्ह्याची गतअठ्ठाविशी दाखवीत होती की : —

सन	सातारा जिल्ह्यातील गावे	दुष्काळ पीडित लोक
१९२५–२६	७३	५४,३१५
१९२९–३०	३८	२२,३२६
१९३१–३२	१४	११,२१७
१९३२–३३	२३	२०,४६८
१९३५–३६	१२	—
१९३६–३७	१२	—
१९३७–३८	११	—
१९३८–३९	१२	—
१९३९–४०	१२	—
१९४०–४१	१२	—
१९४१–४२	२७	११,३७६
१९४५–४६	१५३	१,४९,५९८
१९४७–४८	१४	—
१९५०–५१	५४	—
१९५१–५२	६१	—
१९५२–५३	१६४	१,६५,८१५
१९५३–५४	१६	—

यातसुद्धा १९४५-४६ चा व १९५२-५३ चा दुष्काळ जीवनाची दाणादाण उडवीत होता. शेकडो उपायांनी सरकारला व लोकांना त्यातून बाहेर पडता पडता जिकिरीस यावे लागले. १९५४-५५ साली साठेबाजीचे झालेले विसर्जन व धान्य पुरवठ्याबाबत झालेली प्रगती यामुळे शेतमालाच्या किंमती घसरल्याचे सांगण्यात येई, पण त्यांचा परिणाम बँकांच्या व्यवहारावर झाल्याशिवाय राहिला नाही. आर्थिक अडीअडचणीच्या त्या काळातच डिसेंबर १९५४ ते डिसेंबर १९५५ या वर्षांत खाजगी क्षेत्रातील इंपिरियल बँक सरकारजमा झाली; भारतीय समाजाची "समाजवादी घडण" करण्याचे ध्येय सरकारने घोषित केले; शेतकऱ्याना सुलभ पत लाभण्याचे दृष्टीने सावकारी नियंत्रण वा शेतकरी ऋणविमोचन आदि करून कायदे होऊनही सरकारला नाणे बाजारातून सावकार व महाजन यांची गरज निपटून काढता आली नाही. सहजच १९५७ अखेर आर्थिक उलाढाली सर्व जगभरच अनिश्चित स्वरूपात होत आल्या हे लक्षात घेतले पाहिजे. इंग्लंड, बेल्जम, डेन्मार्क, जर्मनी, नेदरलँडस्, अमेरिका यातून बँकरेटच्या झालेल्या उतारामुळे व रिझर्व्ह बँकेने इतर बँकाना कर्ज देणे आखडते घेण्याचा सल्ला दिल्याने नाणे बाजारात पैशाची तंगी होण्यास सबळ कारण घडले. त्याचा परिणाम जसा मोठ्या व्यापारावर होण्यास सुरवात

झाली तसा तो लहान व बारिक सारीक व्यापारावर होऊन त्याचा शेवट आवश्यक गरजेच्या वस्तूंच्या महागाईत झाला. त्याने सर्वसाधारण माणसाचे जीवीत खडतर बनत असल्याचे दिसून येऊ लागले. दोन महायुद्धाच्या काळात नव्हती एवढी महागाई वाढत गेल्याने रोजच्या व्यवहारात लागणारी पैशाची गरज वाढत जाऊन अर्थव्यवस्थाच धोक्यात येते की काय अशी भीति वाटत होती. साहजिकच बँकेकडून घेतलेल्या रकमांची परतफेड ठराविक मुदतीत होणे अवघड होऊ लागले. खाद्य धान्यांच्या किमतींचा प्रश्न चिंताजनक होऊन बसला आहे तो तेव्हापासून. १९४९-५० च्या मानाने १९५७-५८ साली किमतीच्या दरात जवळ जवळ २५ ते २७ टक्के वाढ झाली. पंचवार्षिक योजनांच्या पूर्ततेसाठी लागणाऱ्या पैशामुळे धान्यांच्या उत्पन्नावर ताण पडला व धान्याच्या उत्पादनात घट आली. शेवटी किमती चढतच गेल्या; जीवनोपयोगी वस्तू मिळण्याच्या अडचणीत भरच पडली. धान्याबाबत साठेबाजी वाढली; यावर उपाय म्हणून सरकारने धान्याचे साठे ताब्यात घेण्यासाठी स्वतःकडे जादा अधिकार घेतले. हे सर्व करूनही तंगीची परिस्थिती आवाक्यात येईल अशी खात्री पटेना. १९५८ च्या एप्रिल पासून परिस्थिती थोडी सुधारू लागली. परराष्ट्रीय चलन विनिमय, स्वदेशी वापरदारांचा महागाईस विरो आणि मजुरांचे संप यामुळे भारतीय रुपयाचे अवमूल्यन करावे लागणार अशी भीतीच उत्पन्न झाली. पण धीमेपणाने सर्वांनी परिस्थितीला तोंड दिल्याकारणाने अर्थ व्यवहार त्यातल्या त्यात सुगम होऊ लागले. तरीही पुरवठ्यापेक्षा वस्तूमात्राला अधिक मागणी असणाऱ्या काळात वरील सर्व गोष्टींचा गंभीरपणे विचार सुरू होणे अपरिहार्यच होते. जीवन दर्शकांक जून १९५८ च्या शेवटच्या आठवड्यात १०५.६ वरून ११३.५ वर आला होता. १९५४ ला जो अन्नधान्य तुटवडा भासू लागला तो १९६४ अखेर वाढत्या क्रमानेच चालू राहिला. १९५०-५१ ते १९६०-६१ या दशकात कर्जवाढी एवढ्या झाल्या की बँकानी दिलेल्या घेतलेल्या कर्जांची प्रमाणे त्यांच्या स्वीय निधींच्या मानाने धोक्याची वाटू लागली. तरीही नागरी बँकानी आपल्या गंगाजळचा आदिकरून निधी शाबूत राखले. ता. ३० जून १९६१ रोजी नागरी बँका भारतात ३०४ होत्या. त्यातील ठेवी ४१.५८ कोटी रुपयांच्या होत्या तर ॠण संस्थिते ५७.७२ कोटी रुपयांची व कर्जे ३४.९९ कोटी रुपयांची होती. १९६२-६३ सालात मजुरीचे दर वाढले एवढेच नव्हे तर एका बाजूने धनोत्पादक पिके आणि अनुषंगिक कारखाने वाढले, तर दुसऱ्या बाजूने अन्नधान्याची निर्मिती कमी झाली आणि वाढती लोकसंख्या समाजात काढूपणा व काढता पाय अशी वाढलेली वृत्ती आणि बाजार दराने भूमिती श्रेणीने होणारी वाढ ह्यानी १९६५ सालाला "खटाटोपो भयंकरः" असे नामाभिधान बिलगून बसले. सहजच असमाधानाचा

आराखडाच त्याने मांडला. दुष्काळाने एवढे उग्र स्वरूप धारण केले, की ५००-५०० रुपयांच्या म्हशी ऐशी ऐशी रुपयास विकून कोठेतरी पोट जाळण्याकरिता सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागातील माणसे देशोधडीला लागली.

जिल्ह्याच्या अर्थव्यवहारातील औद्योगिक प्रगती संबंधी विचार करता यावा म्हणून उभारलेल्या व बुडालेल्या भूतकाळातील कारखाने सोडून विचार करावयाचा. स्वराज्यापूर्वी हे कारखाने चालत :—

कारखान्याचे नांव	गाव	स्थापना
ओगले ग्लास वर्क्स लि.	ओगलेवाडी	१९१९
फडके इंडस्ट्रियल वर्क्स	कऱ्हाड	१९२१
कूपर इंजिनियरिंग लि.	सातारा रोड	१९२२
दी फलटण शुगर वर्क्स लि.	साखरवाडी	१९३३
वेस्टर्न इंडिया इंजिनिअरिंग वर्क्स	नीरा	१९३७

स्वराज्यामध्ये महाराष्ट्रात १५ साखरेचे कारखाने असून सालीना पांच लक्ष टन साखर काढण्याची त्यांची सिद्धता आहे. या कारखान्यामध्ये सुमारे चाळीस हजार ग्रामीण भागातील कामगारास रोजगार मिळू शकतो. फलटण, साखरवाडी येथे साखरेशिवाय स्पिरीट, कन्फेक्शनरी सारखा मालही हे कारखाने काढू शकतात. महाराष्ट्रात आणखी दहा साखर कारखाने निघू शकतील. शिवनगर रेठरे बुद्रुक येथे कृष्णा सहकारी साखर कारखान्यात वरील सर्व सोयी व्हावयाच्या असून पोल्ट्रीची जोडही त्यास देण्यात आली आहे.

(२) कापड व सूत :—या बाबतीत इचलकरंजी, माधवनगर, मिरज, सांगली, कोल्हापूर या ठिकाणी कापड व स्त्रियासाठी पातळे तयार करणारे अनेक छोटे व मध्यम पॉवरलूम कारखाने चालत आहेत. टेप व सुतळी हा मालही इकडे तयार होतो. १९४९ पासून हे सर्व कारखाने सांगली जिल्ह्याचे घटक झाले आहेत.

(३) सातारा येथील वेस्टर्न इंडिया विमा संस्थेने अखिल भारतीय स्थान मिळविले होते. आता ती इन्शुअरन्स कार्पोरेशनमध्ये सामील झाली असून तिचे एक केंद्र सातारा येथे आहे.

(४) कूपरवाडी सातारा, ओगलेवाडी, कऱ्हाड या ठिकाणी इंजिनिअरिंगमध्ये मोडणारे कित्येक कारखाने आहेत. अशा ठिकाणी कित्येक लहान कारखाने व रिपेअर शॉप्स स्थापन झालेली आढळतात. या कारखान्यातून पंप्स्, स्लूस, व्हाल्व्हज, नांगर, चरक, यासारखी शेतीची आऊते, मशीन टूल्स, हरिकेन कंदील, स्टोव्ह, जॅक्स, व्हाईसेस (शेगडे) घरगुती कामासाठी काचेची वगैरे भांडी इत्यादी माल तयार होतो.

(५) कांच व एनॅमल :— ओगलेवाडी येथे काचेचे व एनॅमल्ड सामानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असते. साताऱ्यात प्लॅस्टिक पावडर तयार होत होती.

(६) कागद :—ओगलेवाडी येथे रोजी सुमारे ११०० पौंड कागद काढता येईल असा कारखाना होता. तो नोव्हेंबर १९६५ मध्ये बंद करावा लागला.

गेल्या ७५ वर्षात राजकीय चळवळीवरच राष्ट्राला भर द्यावा लागला. स्वदेशी चळवळ सुरू झाली तीही राजकीय चळवळीचा एक भाग म्हणूनच. तेव्हा त्या चळवळीने महाराष्ट्रात उद्योगाचे बीजारोपण केले तरी त्याला आपले आसन वाढवून ते स्थिर करण्याची संधी मिळाली असेल तर ती पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात. आमच्या औद्योगिक विकासाबद्दल निश्चित धोरण अद्याप ठरलेले नाही. देशात लहान कारखाने उत्तम का मोठे ? कुठले कारखाने सरकार चालवणार व कुठले खाजगी चालवायला मोकळीक, याबद्दल वाद आणि खाजगी कारखाने चालवणाऱ्याला उत्तेजन मिळण्यापेक्षा त्याच्यावर सक्त बंधने कशी घालता येतील इकडे कायदे करणारांची विशेष दृष्टी दिसून येते. दक्षिण महाराष्ट्रातील कारखानदार परंपरागत कारखानदार नसून स्वत:च्या कष्टाने आणि महत्त्वाकांक्षेने काम करणारे लोक आहेत, तसेच आजचे कारखानदार जवळ जवळ ५० वर्षापूर्वी मजुरी करीत असलेल्या लोकांमधूनच निर्माण झालेले आहेत. त्यांनी त्यागाने व निढळाच्या घामाने आजची कारखानदारी उभी केली आहे. तथापि आता ते कामगारकायदे, प्राप्तीकर व इन्स्पेक्टरांचा ताफा यांच्या बंधनातून उद्योग उंचावीत आहेत.

देशात संपत्ती नाही म्हणून देश भिकार होऊ शकतो किंवा देशात संपत्ती असूनही तिची योग्य वाटणी झालेली नसली म्हणजे देश भिकार होतो. उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडील देश, मध्य-आफ्रिकेतील देश आणि समुद्रातील काही काही खडकाळ बेटे येथे खरोखरच संपत्ती नसलेमुळे ते प्रदेश कंगाल अवस्थेत पडलेले दिसत. परंतु पृथ्वीच्या पाठीवर असे काही हतभाग्य देश आहेत की तेथे अपरंपार संपत्ती असूनही भिकार देशात त्यांचा पहिला नंबर लागण्याची पाळी येते. त्या देशात अनिवार संपत्ती असते परंतु तिचा दुरुपयोग होत असतो. त्यामुळे लाखो लोकांना उपाशी मरावे लागते. शेते चांगली पिकलेली असतात आणि त्यांची राखण करणारा शेतकरी भुकेने तळमळत असतो. पोती वाहणाऱ्या हमालाच्या पोटात भुकेने काहूर उसळून टाकलेले असते. असे कशाने होते ? याचे उत्तर संपत्तीची वाटणी बरोबर होत नाही हे होय. आधी सगळ्यांची पोटे भरल्यावांचून आपला पैसा चैनबाजीत उधळून टाकण्याचा कोणालाही अधिकार नाही. आणि जो असे करतो तो परमेश्वराची आज्ञा मोडतो ही मनोवृत्ती जनसामान्यापर्यंत मूळ धरून बसेल अशी शिक्षणाची

व्यवस्था समाजजीवनात सतत होत राहिली तर धंद्यातील कोणत्याही घटकावर अन्याय होऊ नये आणि अन्याय्य चढाओढीत देशी उत्पादकापैकी कोणाचाही पाण-उतारा होऊ नये. म्हणून समाजस्वास्थ्याचे दृष्टीने कारखान्याचे चालक, कामगार व गिऱ्हाईक जरूर ती नीति पाळतीलच. पण त्याना लागणारा कच्चा माल, योग्य वाहतुकदरानी वेळच्या वेळी मिळण्याची व्यवस्था सरकारी यंत्रणेने केली पाहिजे. सातारा शहर आणि जिल्हा यांच्या औद्योगिक उन्नतीसाठी मुख्यतः कोरेगाव–महाबळेश्वर रेल्वेची मागणी जिल्ह्याने फार पूर्वीपासून केली होती. कैसरी कंदनापूर्वी माहुलीस कृष्णेवर बांधलेला पूल लोकांच्या त्या इच्छापूर्ती-साठीच होता. पण व्हर्सायिचे तहाचे वेळी त्या पुलाची पहाणी होऊन रेल्वेच्या दृष्टीने तो पूल नाकाम ठरविण्यात आला. दरम्यान जग आणि जमाना निसर्गा-नुक्रमाने बदलत असताच, कोयनाधरण हेळवाकजवळ व्हावयाचे स्वराज्यात नक्की झाले. धरणाच्या विजेचा उपयोग शेतीच्या अनुषंगिक व इतरही उत्पादनासाठी करून जिल्ह्याची आर्थिक भरभराट साधावी म्हणून आराखड्या-करिता जिल्ह्याची पाहणी करावी अशी सूचना विधिमंडळाच्या प्रश्नोत्तरीत आमदार गोखल्यांनी केली असता, योग्य वेळी योग्य गोष्टी होतील, अशा मोघम उत्तराची पाने जिज्ञासू उदयोन्मुखाच्या तोंडास पुसण्यात आली. हेळवाक-कडे सॉ मिल्, जिह्याच्या परिसरात दूध व अनुषंगिक निर्मितीचा उभार, जरंडा व महाबळेश्वर येथे औषधी कारखाना व मधुकेंद्र, वर्धनगडच्या आसपास जिनिंग फॅक्टरी असे नवे धंदे विजेच्या जोरावर उभारून आता जर ब्रॉडगेज होणारी दक्षिण रेल्वे रामशास्त्री प्रभुण्यांच्या संगममाहुलीजवळून जाणार आहे, तर शागीर्दाचा शास्त्री झालेल्या त्या उद्योगोत्कर्ष–पुरुषाचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवून साताऱ्च्या आयुर्वेदिक अर्कशाळेची औषधे, रेशीम, बटणे, बांगड्या, मातीच्या विटा–कौले, आरारूट, साखर आणि सुकीर्त कंदी पेढे, ब्राह्मीतेले, केतकीतून रेशीम, घोंगड्या आणि १९३५ साली कऱ्हाडच्या विनायक बाळकृष्ण हर्डीकर यानी जनसामान्यासाठी तयार केले होते तसे रेडिओ यांचे कारखाने आपली जाळी पसरून बसावयाय नकोत काय ? (ध्रुव सातारा २५ ऑक्टोबर १९६५ पहा.)

' समालोचन '

वसईच्या तहानंतर घडत असलेला सातारा जिल्ह्याचा लौकिक इतिहास हा असा आहे. कालमहात्म्याने लोक जेवढ्या भूभागाला सातारा जिल्हा समजत आले त्याचा हा इतिहास आहे. ब्रिटिश रियासतीच्या प्रारंभी नवीन राज्य शिस्तीचे, घड्याळाच्या काट्यासारखे, म्हणून ते ' रामराज्य ' वाटले आणि एकोणिसाव्या शतकाच्या साठी-सत्तरीला त्या घड्याळाच्या काट्याची टिक्‌टिक् कान किटवू लागली, तरी राज्यकर्त्यांच्या उदारमनस्कतेवर मदार ठेवून वैयक्तिक व क्वचित सामुदायिक अर्ज होऊ लागले. सातारा जिल्ह्याने १८५२ सालीच पूर्ण दारूबंदी व्हावी म्हणून एक अर्ज केल्याचा दाखला मिळतो. पण अशा तुटक व तुरळक प्रयत्नाला १८७१ पासून ' सार्वजनिक सभांच्या द्वारा ' संघटित स्वरूप येऊ लागले आणि स्वदेशी व लवाद कोर्टे वगैरे स्वावलंबनाच्या चळवळींची मेहनत-मशागत झाली. १८८९ पासून म्हणजे राष्ट्रीय सभेचे स्थापनेनंतर राष्ट्रीय सभेच्या छोट्या आवृत्त्या तालुकानिहाय निघावयास सुरवात होऊन एकपरी राष्ट्रीय सभेचा संदेश खेड्यापाड्यातील घराघरापर्यंत पोचवावा आणि उलट दुसरेपरी आपल्या स्थानिक दुःखाना वाचा फोडून त्यातील जो भाग राष्ट्रव्यापी सुखदुःखांच्या दृढभाजकास उपयोगी पडेल तो राष्ट्रसभेपर्यंत पोचवावा असा उपक्रम झाला. या छोट्या काँग्रेसात १८९३ मधील वाळव्याची छोटी काँग्रेस राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूमसाहेब यांनाही थक्क करण्यासारखी झाली. छोट्या काँग्रेसचे चक्र १८९७ त मंद होऊ लागले आणि प्लेग, दुष्काळ व अनुषंगिक आपत्ति यांनी त्रासलेल्या सातारा जिल्ह्याने ग्रामसंघटनेच्या तत्त्वावर शेतकरी सभा केल्या आणि १९०० सालची मुंबई प्रांतिक परिषद भरवून लॉर्ड स्टँढर्सच्या कारकीर्दीतील लोकमतविन्मुख धोरणाच्या धिक्कारानें येऊ पाहणारा लोकपक्षातील वांधा टाळून सांधा जुळवला. पुढे वंगभंगामुळे कलकत्त्यास १९०६ साली लोकमान्य-प्रणित स्वराज्याची चतुःसूत्री राष्ट्रीय सभेने पास केल्यावर, त्याच सभेच्या ठरावान्वये १९०७ जूनमध्ये सातारा जिल्हासभा स्थापन झाली. ती सातत्याने १९३७ पर्यंत काम करीत आली. राष्ट्रीय आंदोलनात ज्या लाटा आल्या त्यांची शक्यतोवर कड लावण्याची कामगिरी जिल्हासभेने केली.

सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय सभेत मवाळ, जहाल असे पक्षभेद पडले आणि पुढे नाशिकास १९०९ साली जॅक्सनसाहेबांचा खून झाला त्यामुळे,

स्वदेशीसारख्या व्रताचा अंगिकार-पुरस्कार १९०४ पासून केलेला सातारा जिल्हा संशयग्रस्त नोकरशाहीच्या तडाक्यात संकटग्रस्त झाला. तरीपण स्वदेशी चळवळीने जे स्वावलंबनाचे तेज विकसविले ते काही काळ मंद झाले तरी लुप्त होताच कामा नये इतक्या दक्षतेने जिल्ह्यातील जहाल–मवाळ वागले. राष्ट्रीय सभेतील मवाळ–जहालांनी एकी करून राष्ट्रीय प्रगती मार्गाला लावावी असा सातत्याने पाठपुरावा केला आणि १९१४ ची प्रांतिक परिषद यशस्वी करून राष्ट्रीयसभेतील एकीचा पाया घातला.

लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर या एकीच्या प्रयत्नाला बाळसे आले आणि होमरूलची चळवळ सुरू झाली. महायुद्धात गुंतलेल्या इंग्लंडला पैशापुरुषाचे सहाय्य करून आपल्या स्वराज्याच्या मागणीचा ठेका सोडावयाचा नाही असा तो काल होता. स्वावलंबनशास्त्राची ही प्रगती असल्याकारणाने सातारा जिल्ह्यातील बाळाजी दामोदर हासबनीसानी होमरूलसाठी आपली एक मिळकत अर्पण केली, एवढी आठवण ठेवली म्हणजे लोकमान्य–प्रणित स्वराज्यसंघाची चळवळ सातारा जिल्ह्याने केवढ्या आस्थेने केली याची बरोबर कल्पना येईल.

" उजाडले पण सूर्य कोठे आहे ? " असे लोकमान्यांच्या लेखणीतून प्रश्नचिन्ह उतरविणाऱ्या माँटफोर्ड सुधारणा हिंदुस्थानात अवतरल्या आणि त्याच वेळी जालियनवाला बाग प्रकरणातील हिंदुस्थानवरील अन्यायाचे परिमार्जन नोकरशाही करीना म्हणून १९२० साली महात्माजींच्या असहकाराचा अवतार झाला. असहकाराची परिणती अन्याय्य कायदे मोडण्यात झाल्यावर ५ मार्च १९३१ रोजी आयर्वीन-गांधी-करार झाला आणि त्यात राष्ट्रीय सभेला हिंदुस्थान सरकारच्याबरोबरीने मान मिळाल्यामुळे १८९३ साली बाळव्याच्या छोट्या काँग्रेसमध्ये ह्यूमसाहेबांनी काढलेले " काँग्रेस हे दुसरे सरकार आहे " असे उद्गार सार्थ असल्याचे सातारा जिल्ह्याला पटले. तथापि त्याची अंधुकजाणीव आणि स्वावलंबनाचा निश्चित विकास असहकारात असल्यामुळे सातारा जिल्ह्याने १९२० पासूनच ते व्रत पत्करिले आणि यावच्छक्य आचरूनही दाखविले. १९२१ च्या सातारा जिल्हासभेच्या अध्यक्षानी म्हटल्याप्रमाणे काँग्रेसने सर्व वर्गासाठी समतेच्या तत्त्वावरील स्वराज्य मिळविण्याचे ध्येय पत्करिले आहे ..... परराष्ट्राशी आपला संबंध काय शर्तीवर असावा हे ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानला हवा आहे; आणि यालाच जर निर्भेळ स्वातंत्र्य म्हणावयाचे असेल तर तसे स्वातंत्र्य काँग्रेसला पाहिजे आहे. हिंदुस्थान हा साम्राज्याचा घटक राहावा, असे असेल तर हिंदुस्थानला मोकळ्यामनाने भागिदारी मिळाली पाहिजे. हीच स्वावलंबनसहकाराची आकांक्षा सातारा जिल्ह्याची होती आणि असहकाराचे तत्त्व त्या आकांक्षेच्या परिपूर्ततेला कारण होईल म्हणूनच जिल्ह्याने त्याचा अवलंब केला.

पण त्यायोगे दुसरी एक आपत्ती आली. ती म्हणजे प्रागतिक बाजूला सरले तर राष्ट्रीयातील ज्यांचा असहकाराच्या तपशीलाबाबत मतभेद होत, ते तेवढ्या पुरते उदासीन राहिले. राष्ट्रीय सभेच्या अभिमान्यात असे पक्ष उत्पन्न होण्याचे कारण म्हणजे राष्ट्रीय सभेचा सभासद व्हावयास "सुताची वर्गणी" आणि जेथून कायदे होऊन त्यांचा पुढे अंमल होतो. ती कायदे-मंडळे बहिष्कृत होती, हेच मुख्यतः होय. याबाबत खुद्द काँग्रेसमध्येच स्वराज्यपक्ष स्थापन झाला आणि सातारा जिल्ह्यात त्या पक्षाच्या उमेदवारालाच पहिल्या प्रतीची मते १९२३ चे निवडणुकीत मिळाली. तशी १९२५ साली प्रांतिक परिषद साताऱ्यास भरून राष्ट्रीय सभानुयायांची एकी झाली. त्यानंतर कायदेभंगाच्या पहिल्या मोहिमेत आणि दुसऱ्या स्वाभिमान-संरक्षण-कार्यात, फार काय, त्या नंतरच्या सनदशीर चळवळीतही सातारा जिल्हा महाराष्ट्रात मागे बिलकुल पडला नाही. याचे कारण स्वावलंबन-विकासक्षम पण ऐक्य-पोषक अशी सातारा जिल्ह्याची मनोवृत्तीच होय. ता. १० आक्टोबर १९०८ चे प्रतोदने म्हटल्याप्रमाणे "लोक समंजस असल्यामुळे विकारवश होण्यापेक्षा विचारवश होऊन तडजोडीने जी काय थोडी कामे करावयाची ती करतात, त्यामुळे मतभेदामुळे बाजूला सरलेले प्रागतिक असोत, कौन्सिल-प्रवेश-वादी राष्ट्रीय असोत, संपूर्ण असहकारवाले समाजसत्तावादी असोत, अगर नेटस ब्राह्मणेतरांचे कैवारी असोत, सर्वजण दुसऱ्याचा तेजोभंग करण्याची काळजी घेतात आणि आपआपल्या निश्चित क्षेत्रात होईल तेवढी उत्कृष्ठ कामगिरी करण्याचा प्रयत्न करतात. त्यायोगे कोठे कोठे दिसणाऱ्या व्यक्तिस्वार्थाच्या थोड्याशा जळवा दुर्लक्षित केल्या तर बहुतेक सर्वांचे असेच मत आहे की "जोहार व दान याला स्वावलंबी, स्वाभिमानी माणसे व राष्ट्रे किंमत देत नसतात .. स्वातंत्र्य हे मिळवावयाचे असते. ते मिळविण्याच्या प्रयत्नात आज दान उलटे पडले आहे. अर्थात आपण किती जरी 'माघार' घेतली तरी कोठे तरी एका रेषेवर उभे रहावे म्हणजे शत्रुसुद्धा पाठलाग करण्यास दबकेल. सिंह भुकेला व त्रस्त झाला तरी गवत खाणार नाही. सध्याचा काळ संघटनेचा आहे. स्त्रियाना पातिव्रत्य व पुरुषाना पराक्रम हे गुण बहुमोल आहेत. त्याचप्रमाणे गावानी राव होण्यात महत्त्व आहे. गोपुराच्या सोन्याच्या कळसाइतकेच खालील दगडाना महत्त्व असते हे जाणून समाजातील सारा देणाऱ्या व मजुरी करणाऱ्या शेतकऱ्यातसुद्धा चैतन्य निर्माण करून सर्वांच्या सहकार्याने स्वराज्याचा लढा लढविला पाहिजे" (जिल्हा सभा १९३४ अध्यक्ष).

याच दृष्टीने काँग्रेसच्या कार्यक्रमाशी काही मतभेद असणारे ससाजसत्तावादी अगर लोकशाहीपक्षाचे लोक स्वतंत्र कार्यक्रम अथवा जुन्या मार्गाची उजळणी सुचवित होते. नव्या कार्यक्रमाची उभारणी नेहमीच जुन्या मार्गातून

उत्क्रांत झाली तर ती झेपावयाला जड जात नाही आणि दमछाट करीत नाही. त्यायोगे निश्चित प्रगती होते. या गोष्टीवर नजर देऊन भारतीय अभ्युदयासाठी सातारा जिल्ह्याने प्रारंभापासूनच खटपटी केल्या होत्या. भारतनिष्ठेने मराठी प्रयत्नांच्या विचारवादाची याद अशी की, विष्णुशास्त्री चिपळूणकरानी स्वाभिमान आणि सत्ता-संपादन ह्यांच्या इतकाच स्वावलंबन व स्वार्थत्याग ह्यावरही भर दिलाच. विचारातील समतोलपणा व सर्वंकशता, स्वभावातील सहिष्णुता व औदार्य, लोकहिताची तळमळ आणि लोकसंग्रहाची हातोटी यामुळे महाराष्ट्रातीलच काय पण अखिल हिंदुस्थानातील कार्यकर्त्यांनी न्यायमूर्ती रानडयांना गुरुस्थानी मानले. जुन्या आणि नव्या प्रवृत्ती यांच्यातील विरोध, व्यवहारात आणीवाणीच्या वेळी शास्त्रांच्या वेदीवर अखेर विचारस्वातंत्र्याचा बळी देतो. आगरकरानी सुधारणावादातील ही विसंगती, ही विफलता काढून टाकली. आणि लोकमान्य टिळकानी संपूर्ण स्वातंत्र्याची उघड घोषणा करून तरूण पिढीला पराक्रमाची स्फूर्ती दिली. प्रतिकाराची न्याय्य व परिणामकारक साधने लोकासमोर मांडून त्यांची त्याग–भावना जागृत केली आणि सामान्य जनांच्या सामुदायिक प्रतिकाराची आवश्यकता प्रतिपादून निरनिराळचा प्रश्नावर लोकमत संघटित करण्याचा पायंडा पाडला. हिंदुस्थानातील विधि-मंडळामार्फत सनदशीर राजकीय प्रगती करीत राहण्याचा आणि बहुजन-समाजाच्या अंतीम कल्याणाच्या दृष्टीने विधायक सेवेचा महात्मा फुल्यानी रुळविलेला मार्ग प्रतिष्ठेस चढविण्याची व सुसूत्र प्रचलित करण्याची प्रथा भारत-सेवक गोखल्यांनी रुळविली. त्यात मग, विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सशस्त्र क्रांतीची मनोवृत्ती पेरित राहिलेले काळकर्ते परांजपे यांचेही स्मरण विचारप्रवर्तक राष्ट्ररचना–कौशल्यात झाल्या शिवाय राहीलच कसे ? या सर्व पूर्वसूरीनी ब्रिटिश रियासतीत महाराष्ट्रीय अस्मितेला आपापल्या छटानी जो रंग आणला, त्याचाच कवडसा, (सातारा हा महाराष्ट्राचा व भारताचा एक अविभाज्य जीवनांग म्हणून,) साताररच्या सार्वजनिक जीवनात १९३५ पर्यंत कमी अधिक प्रमाणात दृग्गोचर झाला. त्यापुढे मात्र त्या सर्व विचारधारातून एक चपखल ओघ निर्माण झाल्याशिवाय राहिला नाही. कारण १९२० पासून महात्मागांधीनी विधायक सेवा आणि अनत्याचारी असहकार व पुढे सत्याग्रही प्रतिकार राष्ट्रीय जीवनात घालून अलौकिक असूनही " अलौकिक नोहावे लोकाप्रती " अशी एक धारा सुरू केली होती. त्याची कुंडली काळकर्ते परांजपे यांनी अशी मांडली होती की " अनत्याचाराचे रूपांतर अत्याचारात पुढे मागे केव्हा होणारच नाही असे नाही. अनत्याचार फक्त ठराविक मुदतीपर्यंतच पाळाव-याचा होता. महात्मा गांधीनीही आपला अनत्याचारीत्त्वाचा आग्रह सोडला नसता व शेवटी त्यांनी आपली एकटी व्यक्ति सबंध जनतेतून काढून घेतली

असती, तर मग अर्थात त्यावेळी जनतेने महात्मा गांधीना टाकूनच दिले असते. आणि अनत्याचारित्वाच्या तत्त्वाने संपादन केलेल्या शक्तीवर थोडचाशा अत्याचाराने म. गांधींच्या मदतीशिवाय जनतेने यशःप्राप्ति करून घेतली असती." (शि. म. परांजपे, स्वराज्यातील निवडक निबंध पृ. ११९–२०) ऐवढेच कशाला ? " लोक आपल्या स्वतंत्र आणि नवीन निर्माण केलेल्या साधनानी आपली सर्व राजकीय कार्ये सरकारच्या कोणत्याही खात्याची अपेक्षा न धरता उरकून घेऊ लागले, म्हणजे ही सगळी सरकारी खाती आपोआपच अर्धांगवायू झालेल्या अवयवाप्रमाणे लुळी आणि निर्जीव होऊन वाळून आणि गळून जातील आणि हेच स्वराज्य होय." (शि. म. परांजपे, स्वराज्य ता. ९ सप्टेंबर १९२०)

काळकर्त्यांच्या भविष्यवाणीला १९३६ पासूनच व्यवहारातः सुरवात झाली. सेनापती बापटांनी स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी प्राण-यज्ञ-दलाची कल्पना काढली आणि तिला सातारा जिल्ह्यात व इतरत्र साथ मिळू लागली. हे जुलुमशाहीला आव्हान होते व सत्याग्रहाला पराकष्ठेच्या सहनशक्तीचे (भक्त प्रल्हादाप्रमाणे) आवाहन होते. १९३७ साली सनदशीर चतुःसीमातही राज्यपालांच्या निर्णायक-मताचे हक्काचे उपयोगाबद्दल जी अटीतटी झाली, ती १९३१ च्या गांधी-आर्यविन-करारान्वये काँग्रेसला मिळालेल्या प्रतिष्ठेला परकीय सत्तेकडून आव्हान होते तर त्या सत्तेला काँग्रेसची मान्य झालेली प्रतिष्ठा लोकप्रातिनिधिक असल्याचे वचनकृति करून दाखविण्याबद्दल आवाहन होते. अशा मनोवस्थेत हिटलरी होरपळीच्या वेळी हिंदुस्थानच्या संमतीशिवायच हिंदुस्थानला युद्धमान राष्ट्र म्हणून इंग्लंडने आपल्या खाकोटीत मारल्यावर पहिला सात्त्विक प्रक्षोभ हिंदुस्थानने युद्धविरोधाबाबत वैयक्तिक सत्याग्रह सुरवातून सौम्यपणे प्रगट केला. तो महात्मा गांधींच्याच कुलमर्यादेत चालावयाचा असे ठरले असूनही, काही देशभक्तानी मधल्या पायऱ्या गाळून थेट महात्माजीपर्यंत आपल्या सत्याग्रहेच्छेची तळमळ कळविली व त्यांच्या परवानगीने सत्याग्रह केला; तर काहींनी कसलाच निर्बंध न पाळता सत्याग्रह केला. सातारा जिल्ह्यातही तसे प्रकार घडले. "येनकेन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्" अशा उत्-शृंखल वृत्तीचे अपवाद सोडले, तर राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काचा अवमान इंग्रज राज्यकर्त्यांनी केला याबद्दलचा सात्त्विक संतापच त्या बेशिस्त सत्याग्रहाच्या रूपाने उसळला नव्हता काय ? तरीही "वेळेवरचा टाका। नवांचा राखा" हा न्याय ब्रिटिश राजवटीने अमलात आणला नाही. १९३८ सालापासून महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस यांच्यातील विकोपास गेलेले मतभेद आपल्या "फोडा–झोडा" च्या राजनीतीस पोषक होतील असे तिने मानले. पण प्रत्यय वेगळाच आला. नजरबंदी म्हणून संगीन-पहाऱ्यात ठेवलेल्या

बाबू सुभाषचंद्र बोस यांनी जो अपूर्व वैयक्तिक सत्याग्रह केला, तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'आग्र्याहून सुटकेचा' कालपरिपक्व ऐतिहासिक असा नवा पाठ ठरला. भारतीय असंतोषाच्या त्या तरुण "नेताजींनी" हिटलरी होरपळीमुळे इंग्लंडच्या झालेल्या अवस्थेचा फायदा घेऊन "आझाद सैन्य" उभारले, सिंगापूर रेडिओवरून भारतीयांना "चलो दिल्ली" चा आदेश दिला व अंदमानचे आसमंतात "स्वतंत्र भारत-सरकार" स्थापन केले. हिटलरी होरपळीत जपान हिंदुस्थानवर चालून आला तर, त्याचे संरक्षण करण्याची कुवतच इंग्लंडच्या दमबाजीत उरली नसल्या कारणाने "क्रिप्स मिशन" पाठवून हिंदुस्थानातील असंतोषावर थातुरमातुर करून "अशुभस्य काल हरणं, कालं विघ्नेन योजयेत्" हा न्याय इंग्लंडने अवलंबिला. पण त्याचा काही एक उपयोग न होता, हिंदुस्थानातील असंतोषाचा उपशम "ज्याचे नशीब त्याच्या मन-मेंदू-मनगटावर" या न्यायाचेच होईल, या तरणोपायावर शान्तिब्रह्म गांधी व परिणामतः काँग्रेस आली. म्हणूनच १९४२ च्या ऑगस्टचे पहिल्या आठवड्यात ऑल इंडिया काँग्रेसची बैठक होऊन इंग्रजाना "चले जावचा"! आदेश मिळाला आणि त्यासाठी "करेंगे या मरेंगे!" या निर्धाराने चळवळ उभारण्याचे राष्ट्राने उद्घोषित केले. नेताजींच्या सशस्त्र होणाऱ्या आक्रमक स्वारीतून ज्या आझादीची अपेक्षा होती, तिलाच हा भारताच्या "आतल्या आवाजाचा" सहकार होता. ही "अंतरीची जाणीव" असल्यामुळेच, तोलामोलाचे भारतीय नेतृत्व इंग्रजांनी शृंखलाबद्ध करताच, लोकांनी "कायदा-सुव्यवस्था" यासह सर्व काही आपल्या हाती प्राणपणाने घेतले व परकीय सत्तेच्या बळकटीची खिळखिळी एका बाजूने, तर भारतीय लोकसत्तेची उभारणी दुसऱ्या बाजूने करण्याचा "खटाटोपो भयंकरः" केला. त्या "चलो दिल्ली" व "चलेजाव" या दोनही आन्दोलनात सातारा जिल्ह्याचे सुपुत्र अहमहमिकेने होते. उत्साहातिरेकाने त्यांच्या हातून काही ठिकाणी मर्यादातिरेक झाला, हे खरे असले तरी, अनत्याचारात्मक असहकाराच्या अहिंसामय आचाराची ऊर्फ शूराच्या अहिंसेची मर्यादा सुटली पण परकीय सत्तेची पकड "परती करून" स्वकीय सत्तेची आपुलकी व्यवहारशुद्ध राखली, ती सातारा जिल्ह्यानेच सर्व भारतात अधिक महिने "प्रतिसरकार" स्थापून! या उभारात प्राणहानी झाली तीत तत्त्वभ्रष्टता वाट्यास आली आणि काही ठिकाणी वैयक्तिक वा जातीय हेवेदावेही उगवण्यात आले, हा भ्रष्टाकार झाला!!! पण नेतृत्वाच्या सत्त्वसंपन्न अभावात असे घडले, हे लक्षात घेतले पाहिजे. उत्सव उभारला म्हणजे "पांडुरंगी जेणे घडे अंतराय। हो का बाप माय त्यजावी ते॥" इतक्या परमार्थाने रंगून सर्वांनी जावे हे इष्टच. पण तेथेही "जोडेचोर आणि जोड्या-जोड्यावर नजर ठेवणारे नष्ट-चांडाळ-पापी" भेटतात की! राष्ट्रीय उत्थापनातही

या मनुष्य-स्वभावातील छटा लक्षात घेऊनच मूल्यमापन झाले पाहिजे. ते तसे झाले म्हणूनच भारताचे भाग्यविधाते "जय सातारा!" म्हणून सातारा जिल्ह्याचा गौरव करून बसले. चले जावच्या व चलो दिल्लीच्या चळवळीनी इंग्रेजी साम्राज्य जसे हैराणले होते, तसे हिटलरी होरपळीत इंग्लंडला मिळालेल्या विजयानेही इंग्लंडची आंतरराष्ट्रीय इज्जत घसरली होती. ती न सावरल्यामुळे इंग्रेजी साम्राज्य जिकिरले होते. म्हणून काळाने शिकविलेला धडा घेऊन, हिंदुस्थानवरील आपले राजकीय आधिपत्य इंग्लंडने सोडावयाचे ठरवून उदारतेच्या व दाक्षिण्याच्या सांगीने आपली प्रतिष्ठा जगात ठेवावयाची असे ठरवले. व्हिक्टोरिया राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्याचा शब्द पाळण्याचा इंग्लंडने आव आणला व १९४८ च्या आत काँग्रेस, मुस्लीम लीग वगैरेनी परस्परात समजोता करून ब्रिटिश सत्तेला रजा द्यावी असे सुचविले. १९०६ सालापासून हिंदु-मुस्लीम फारकतीचे जे विष आपण पेरून ठेवले, त्याची परिणती "आपण एक होऊ शकत नाही, या मतावर एक आहोत" असेच कांग्रेस व मुस्लीम म्हणतील आणि आवळचाची मोट कोणी बांधू पाहील तर यादवीशिवाय काही पदरी येणार नाही, असेच गणित सगळचा भारतीय विचारवन्तांचे येईल, अशी इंग्रजाला खात्री होती. त्यांची ही अटकळ खरी ठरली. तरी हिंदुस्थानातून तुम्ही जाऊ नका, असे मात्र इंग्रजाना कोणीच म्हणेना!! कारण वसईच्या तहानंतर चतुरसिंग भोसल्याच्या उठावापासून चलेजाव-चलो दिल्लीच्या उत्थानापर्यंत निर्भेळ स्वातंत्र्यासाठी जे प्रयत्न पुरुषार्थ झाले, त्यातून झालेल्या स्वाभिमानी स्वावलंबनाचा पीळ लाचारी भाषा बोलण्याइतका "गबाळा" राहिलाच नव्हता!!!

जागतिक वातावरणातील वारेही त्याच वृत्तीला पोषक ठरत आले होते. कैसरीकंदनापासून स्वयंनिर्णयाचा विचार प्रत्येक देशात धर धरून बसला होता. साम्राज्य-विस्तारवादासाठी, आपल्या देशातील औद्योगिक उत्पादनाचे साध्य अवघड वाटल्यामुळे पराक्रमाच्या नांवाखाली लोकांच्या बेकारी निवारणासाठी अगर कमीतकमी म्हणजे स्वसंरक्षणासाठी व स्नेही राष्ट्रांच्या सहकारासाठी माणसांनी माणसांचा खाटीकखाना रणांगणीसुद्धा उभारावयास, विद्वानांच्या विघातक शोधांनी माणूसकी विटली होती. परिणामतः 'शांन्तिसाठी युद्धसिद्धी' आणि 'शान्तिसाठी साधने' प्रचारली गेली व झालीही! विसाव्या शतकाच्या पंचविशीनंतर जगाच्या ७७ % भूभागावर आणि ७० % लोकसंख्येवर वसाहतवादाची जबरदस्त पकड होती. ती मग हिटलरी होरपळीनंतर लोपत जाऊन ब्रिटिश साम्राज्यातील ६० % भूप्रदेश आणि ९० % लोक त्या साम्राज्याच्या कायदेशीर लूटमारीतून राष्ट्रवादाचे जोरावर बाहेर पडले आहेत. हिंदुस्थानचे 'भारत' 'पाक' असे दुखंड देश झाले तरी, सर्व हिंदुस्थान इंग्रजांचे

पारतंत्र्यातून बाहेर पडले. हा देखील त्या वसाहतवादाच्या पराभवाचा व राष्ट्रवादाच्या जयाचा एक महत्त्वाचा किस्सा आहे.

जागतिक प्रवृत्तीतून आणि स्वत: हिंदुस्थानने उभारलेल्या चळवळीतून स्वराज्य आले आणि त्या स्वराज्याप्रीत्यर्थ जीवनांचे, कुलांचे आणि संपत्ती-कीर्तीचे बलिदान केलेल्या देशभक्तांच्या स्मृतीला कृतज्ञतेचे वंदन करून, डोळ्यात त्यांच्या वियोगाने उभे राहणारे अश्रु डाव्या हाताने निवारत निवारत, उजव्या हाताने युनिअन जॅकला निरोप देऊन भारताचा "**तिरंगा**" अभिमानाने व आत्मविश्वासाने भारताच्या इतर घटकाप्रमाणेच सातारा जिल्ह्यानेही उभारला व त्याला मानवंदना दिली.

यापुढे राज्य यंत्रणा लोकशाही पावले टाकून लोकमानसाशी आणि लोक पुढाऱ्यांच्या अभ्यस्त आणि अनुभविक सल्ला–मसलतीशी समरस होऊन त्या तिन्ही शक्तींच्या सहकार–समन्वयाने भारताची पुनर्रचना "हे राज्य असे गरिबांचे।" म्हणून सुरवात व्हावयाची. तशी ती घोषवाक्यांनी आणि कागदावरील योजनांनी झालीही. त्यामुळेच थकले भागले देशभक्त आपल्या कर्मयोगाला निराळ्या वाटा काढून बसले. लोकसेवासंघ, शेतकरी संघ प्रभृती संस्था करीत असलेली लोकसेवा सरकारी यंत्रणेतील भारतसेवक समाजानी व विकास–योजनांनी अंगिकारल्यामुळे लोकाश्रित संस्थांनी आपल्या सेवाकार्याचे कायापालट केले आणि नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना भारताच्या व त्यातील जनसामान्यांच्या तेजस्वी जीवनासाठी "पैशापायी नडले!" असे म्हणू द्यावयाचे नाही, असे सरकारी यंत्रणेने ("तुटीचे अर्थसंकल्प" करूनही व परदेशी कर्जाचे डोंगर उभारूनही) ठरविले. त्यायोगे शाळा–शिक्षणाचा प्रसार झाला. कोयनाप्रकल्पासारखे प्रकल्प उभारले गेले आणि धनोत्पादक पिकापासून औद्योगीकरणाच्या प्राथमिक अंगापर्यंत थोड्या फार हालचालीही झाल्या. पण जनसामान्यांच्या जीवनाची उंची सात्विकपणे वाढण्यापेक्षा राहणी महागडी झाली, ती सहनशक्तीला ताण देणारी!! १६ नोव्हेंबर १९६५ च्या कलेक्टरांच्या सांगीप्रमाणे सातारा जिल्ह्यात ४५८ गावी पीक ४ आण्याहून कमी, ६४८ गावी पीक ६ आण्यापर्यंत, आणि केवळ ३७ गावी पीक ८ आण्यापर्यंत आले असल्यामुळे महागाईला दुष्काळाने साथ दिली, त्यामुळे जनतेची हलाखी वाढली! शिक्षणाच्या "फी" सवलती पासून सर्व सवलती मातबरानी उपटल्या, तगाईची प्रतिज्ञाबद्ध कार्ये बाजूस पडून दुसरीच ख्याली–खुशाली झाली व दारूबंदी सारख्या कायद्यांचे जीवन्मरण ओढवून माणुसकीचे मातेरे, नीतिमत्तेचे खोबरे वाजण्यापर्यंत झाले!!! आणि याचे कारण काय, तर देशभक्तीतील सेवाव्रतापेक्षा आरतीच्या गर्दीने "पावला प्रसाद आता जातो आपुल्या स्थळा।" ही वृत्ती वाढली म्हणून! समाजाच्या तळातील डोंगर-

कपारीच्या खेडुताला दिल्लीला ठरणारी धोरणे समजावून देण्याचा आणि त्या खेडूताच्या आशा–आकांक्षाचा आवाज दिल्लीस समजावणारा समाजसंपर्क व्यवहारशुद्ध हवा तसा झाला आहे काय? १९५० च्या २६ जानेवारीस भारत सर्वंतंत्र स्वतंत्र लोकसत्ताक झाल्यावर तरी आपले नशीब आपल्या मन-मेंदू-मनगटावर आहे, याची अंतरीची जाणीव ठेवून "आधी प्रपंच करावा नेटका!" तो केल्यावर तरी राष्ट्राच्या सेवेसाठी, त्याच्या तेजस्वी फेर-उभारणीसाठी तरी, प्रत्येक जाणत्या माणसाने आयुष्याचे काही क्षण, रक्ताचे काही कण, बुद्धीचे काही पैलू, शक्तीचे काही प्रभाव नियमितपणे देऊन जनता, नेते आणि सरकारी यंत्रणा यांच्या सहकार-समन्वयाची एकजिनसी साखळी निर्माण करण्या-करिता कितीसे प्रयत्न झाले? तसे करावयास अनेकानेक संधीही होत्या. सह-कारी कायद्याचा सुवर्ण महोत्सव, नगरहवेलीचे सशस्त्र बंड की ज्यात सातारा जिल्ह्यातील सदुभाऊ पाटील (रेठरे बुद्रुक) प्रभृती दहा मंडळी होती ते, गोवामुक्तीचा सत्याग्रह, अठराशे सत्तावनचा समर–शताब्दि, संयुक्त महा-राष्ट्राचा प्रश्न, धान्यटंचाई व भूकमोर्चे, आणि शेवटी चीन-पाकिस्तानची आक्रमणे!!! पण या सर्व प्रश्नांचे वेळी चळवळी झाल्या त्या लोक–शिक्षणा-पेक्षा आणि समाजसन्मुख सेवाव्रतापेक्षा भिन्नमतियांच्या पराभवासाठी आणि स्वमतियांच्या प्रतिष्ठेसाठीच अगर आपणच मोठेपणाने मिरवण्यासाठी.

अशातच १९६२ सालापर्यंत काही स्वाभिमान कर्तृत्वाच्या गोष्टी थोडयाफार घडल्या; नाही असे नाही! सातारा जिल्ह्याच्या दृष्टीने १९६२ साल हे अधिक महत्त्वाचे ठरले. त्या साली ना. यशवंतराव चव्हाणांच्या मुख्यमंत्री पदाखाली सत्तेचे विकेंद्रीकरण लोकमार्गी करण्याचा उपक्रम "जिल्हा परिषद" कायद्याच्या अम्मलबजावणीने झाला आणि सातारा येथे काकासाहेब गाडगीळांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा सोहळा अपूर्वाईने पार पडला. एवढेच नव्हे तर जवळपास मिळणाऱ्या साधन–सामुग्रीने नदीच्या डोहावरून, बैलगाड्यांची व जीपची वहातूक करू शकणारा (दोन टन उसाचे ओझे घेऊन जाणाऱ्या,) "घालता काढता येणारा पूल" तयार करण्याचा प्रयोग कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने रेठरे बुद्रुकचे (साधे मॅट्रिक पर्यंत शिकलेल्या) सदाशिवराव भाऊ पाटील व त्यांचे सहकारी यानी यशस्वी केला. आणि खेडयातही बुद्धिकृतिकौशल्य पिकते याचा प्रत्यय आणून दिला. तशा बुद्धिकृतिकौशल्याचा उपयोग विकेंद्रित सत्तेची केंद्रस्थाने झालेल्या जिल्हा परिषदापासून मध्यवर्ती राज्य–यंत्रणेपर्यंत लोक–कल्याणार्थ करून घ्यावा म्हणून, समाज संपर्काचा तो प्रयत्नपुरुषार्थ उभारणे जाणकारांचे कर्तव्य नाही काय? हा विचार सातारा जिल्हा मनात आणित असताच, सर्व देशावरच एक अकल्पित संकट ओढवले. त्याचे सर्वसामान्य स्वरूप ऐतिहासिक

दृष्टचा असे की--डॉ. स्वेन अँडर्स हेडीन या स्विडिश प्रवासी व भूप्रदेश-संशोधक यांच्या जन्म शताब्दीचे १९६५ वर्ष! त्याने राजा ओस्कर याच्या मदतीने १८९३ पासून मध्य व पूर्व आशियात प्रवास करून व पामीर पठार लॉन्नार सरोवराच्या भोवतालचा प्रदेश व उत्तर तिबेट पाहून तो पेकिंगला गेला होता. मग चीन, सायबरिया करून १८९७ त त्याने युरोप गाठले व फिरून १८९९ त लॉबनार प्रदेशाची बारिक माहिती घेऊन यात्रेकरू म्हणून ल्हासात जाण्याचा प्रयत्न केला. पण तिबेटने त्याला परत पाठविले. १९०८ मध्ये तो गंगा-ब्रह्मपुत्राच्या उगम स्थानापर्यंत मजल मारून बसला होता. त्याच्या प्रवास पुस्तकावरूनच १९६२ सालचे चीनने तिबेट व भारत यांचेवरील आक्रमणाचे आराखडे तयार करण्याची पहिली प्रेरणा घेतली होती.

अशा आणीबाणीच्या वेळीच सह्याद्रि हिमालयाच्या सहकार-संरक्षणा-साठी धावला. नामदार यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री झाले. आणि पुढील तीन वर्षात चीनच्या खिशात जाऊन बसलेल्या पाकिस्तानने भारतावर ऑगस्ट १९६५ मध्ये आक्रमण केले असता व त्याचीच साथ करण्याकरता चीनही फिरून धाऊन आला असता, भारताचे जवान काही मेलेल्या आईचे दूध प्याले नाहीत असा प्रत्यय, काडचा ओढून उगीचच होळी पेटवीत बसणाऱ्या युरोपियन राष्ट्रासुद्धा सर्वांना येऊन चुकला.

सन १९६५ च्या १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र होऊन अठरा वर्षे झाली आणि २६ जानेवारी १९६६ ला भारत स्वयंतंत्र स्वतंत्र असा घटनात्मक लोकसत्ताक झाला, त्याला सोळा वर्षे झाली. दरम्यान २८ डिसेंबर १९६५ ला काँग्रेसचा अवतार होऊन ऐंशी वर्षे झाली. शेतकरी-कामकरी आदि करून गरीब जनतेच्या "हिताय सुखाय" स्वराज्य चालले पाहिजे आणि लोकशाहीच्या तंत्रात प्रत्येक धडधाकट मनुष्याला काम, कामाचा भरपूर मोबदला ठरणारा बाजार भावाने दाम, दामातून मानवी जीवनाला आवश्यक असलेला आराम आणि त्या आरामातून नव्या उत्साहाचा, उद्योगाचा नि कर्तृत्वाचा व कर्तबगारीचा राम निर्माण होत राहील असे रामराज्य भारताला स्थिरावयाचे आहे. स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही तर रामराज्याची तहान सुराज्याने भागत नाही.

स्वराज्य हे सुराज्य असलेच पाहिजे, त्याचबरोबर ते रामराज्यही हवे. म्हणजेच ते आपले आहे असे प्रत्येक भारतीयास जिव्हाळ्याने वाटेल व परमार्थाने ते स्वराज्य होईल. त्यासाठी अन्नस्वावलंबन, वस्त्रस्वाव-लंबन आणि संरक्षण-स्वावलंबन यांच्यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवणारे लोक-शिक्षण-व्याख्यान-प्रवचनाप्रमाणेच कृती-प्रयोगानीही चालू राहिले पाहिजे. सातारा जिल्ह्याचा तसा अभ्यासही आहे. स्वदेशीच्या बाबतीत

खादीची निपज स्वतंत्र व मोठ्या प्रमाणावर कोठे झाली नसली तरी देशी कापडाच्या बाबतीत कोल्हापूरच्या शाहू मिल्स्, सांगलीची गजानन मिल् आणि कऱ्हाडचे (१९३१ पर्यंत) फडके टेक्स्टाईल अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल वर्क्सचा उल्लेख केला पाहिजे. परिपूर्ण स्वदेशी या दृष्टीने सातारा–कोल्हापूरची खादी भांडारेच अभिमानास्पद आहेत. पण दुय्यम स्वदेशी या नात्याने वरील कारखान्याना महत्त्व आहे हे नाकबूल करून चालणार नाही. या दृष्टीनेच ओगल्यांचा काच-कंदीलाचा कारखाना, किर्लोस्करांचा लोखंडी कारखाना, समर्थपूरचे माजी डेक्कन इंडस्ट्रियल वर्क्स, कूपर इंजिनिअरिंग वर्क्स, कऱ्हाड येथील माजी आगपेट्यांचा कारखाना व आंधळी येथील माजी भिडे कार्डबोर्ड मॅच वर्क्स, फलटण, सांगली, रेठरे बुद्रुक व कोल्हापूर साखरेचे कारखाने, ओगलेवाडी–कऱ्हाडचे माजी वाशेक्स व माणिक सोप वर्क्स, आणि उंब्रजचे राष्ट्रीय कलाभुवन यांचा विकास लक्षात आणला तर स्वदेशीच्या बाबतीत सातारा जिल्हा आघाडीला नसला तरी पिछाडीला खास नाही. प्रसंगाप्रसंगाने भर दिला तशी बहिष्काराची चळवळ सातारा जिल्यात प्रभावी झाली आणि शक्य तेवढ्या "परकीयत्वा" वरील बहिष्काराची मनोवृत्ती तयार झाली.

आर्थिक दृष्ट्या विचार करता वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे खालोखाल को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचा विचार केला पाहिजे. समाजातील तळच्या थरा-पासून सर्वांना काटकसरीची राहणी व निष्कर्जीपणा प्राप्त व्हावा म्हणून गोपाळराव देवधरानी १९१६ च्या सुमारास सातारा जिल्ह्यात को-ऑपरेटिव्ह सोसायट्या स्थापन व्हाव्या म्हणून अतिशय खटपट केली व तिला यश येऊन प्रॉव्हिंशियल बँकेच्या शाखा जिल्ह्यात ठिकठिकाणी निघाल्या. बाबूराव पेडकर, धोंडजी पाटील, केशवराव विचारे, पांडुरंगराव आढाव, बापूसाहेब राजाज्ञा, आणि नंतर लक्ष्मणराव देशपांडे, बाबूराव गोखले, रघुनाथराव चोरेकर प्रभृती त्यातील तज्ज्ञ म्हणून जिल्ह्यात पुढे सरसावले. आता सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (१९५०) व शेतकरी ऋण–विमोचन बँक (१९३५) ह्या स्थापन झाल्या आहेत. पण यापेक्षा शेतकऱ्यांच्या खऱ्या सुधारणेसाठी तालुका निहाय शेतकी-सुधारणा-संघ स्थापन झाले असून प्रदर्शने वगैरे मार्गांनी शेत-कऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो. याशिवाय शेतकरी–जीवनाला व त्याचप्रमाणे एकंदर समाजाच्या जीवनाला उपयुक्त होणारे म्हणजे चौंडे महाराजांचे गोरक्षण कार्य होय. वाई गोवर्धन संस्था आणि तिच्या शाखा या बाबतीत उत्कृष्ट कार्य करित असून पाटणच्या कंटकानी गुरांच्या जोपासनेविषयी सातारा जिल्ह्याचा आकडेवार अहवालच तयार केला होता.

बौद्धिक-शिक्षणाचा विचार करता, जिल्ह्यात अक्षरमित्रतेचा प्रसार प्रौढातही झाला असून पांचपांच मैलावर प्रशाळा व पंचवीस मैलावर

महाविद्यालयें झाली आहेत. बहुजन समाजाच्या प्रतिनिधीच्या हातात समाजाची सर्व अधिकारसूत्रे हवीत म्हणून रयत शिक्षण संस्था सातारा, विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर आणि ठिकठिकाणच्या लोकसंस्था यानी डॉ. परांजप्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचा भरपूर फायदा जिल्ह्यास करून घेण्याचे मनावर घेतले आणि म्हणूनच काळाच्या प्रगतीबरोबर सरकारने कऱ्हाडला तांत्रिक शिक्षणाच्या प्रशाळेसह महाविद्यालयही चालविले आहे. सांगलीच्या इंजिनिअरिंग व कूपवाडचे विलिंग्डन कॉलेजशी खटाव, वाई, सातारा, फलटण येथील आर्टस्, कामर्स कॉलेजे सहकार करीत आहेत. स्वस्त व स्वावलंबी आणि संमिश्र राहणीचे शिक्षण-वसतीगृह हरएक ठिकाणी असून हरिजनांची बौद्धिक सेवा त्याने केली आहे. याशिवाय या शैक्षणिक कामगिरीचा थोडाफार उपयोग राष्ट्राला होत असला तरी खरे खणखणीत असे राष्ट्रीय शिक्षणाचे नाणे म्हणून वाईच्या प्राज्ञपाठशाळेकडे आणि विशेषतः साताऱ्च्या टिळक विद्यालयाकडे बोट दाखविता येईल. वाईची वसंत व्याख्यान माला, सातारा येथील विविध व्याख्यान माले नंतरची ज्ञानविकास मंडळाची व्याख्यानमाला, कऱ्हाड नगर-वाचनालयाचे नवरात्र सत्र व ज्ञानेश्वर जयंती प्रवचन-माला-सातत्याने लोक शिक्षण साधीत असतात. राष्ट्रीय शिक्षण घेतलेला तरूण स्वाभिमानी, स्वावलंबी, शूर व राष्ट्रासाठी तळहातावर शिर घेण्याइतका त्यागी निघाला पाहिजे, ही अपेक्षा १९३०–३४ च्या व १९४०–१९४२ च्या लढ्यात या संस्थांच्या चालकां-प्रमाणेच विद्यार्थ्यांनी पुरी केली. तथापि प्राज्ञपाठ शाळेचे कार्य धर्म वलयांकित असून संस्थेचे उत्पादक नारायणशास्त्री मराठ्यानी सुरू केलेले धर्मकोशाचे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीनी अंगिकारलेले विश्वकोशाचे काम पुरे झाल्यावर त्या संस्थेचा इष्ट कार्यप्रकर्ष होणार आहे. साताऱ्च्या टिळक राष्ट्रिय-विद्यालयाने आपल्या तेजस्वी कार्याचे जोरावर एक तपाच्या आतच " मुहुर्तं ज्वलितं श्रेयः " हे वचन सार्थ करून दाखविले आहे. म्हणूनच ही त्याची कामगिरी पाहिल्यावर इमारती, शिक्षणसाधने व चालू खर्च यांच्यासाठी राष्ट्रीय विद्यालयाने आपण आनंदाने दिलेले सुमारे ४५ हजार रुपये बारा वर्षात खर्चून संपूर्ण शिक्षणक्रम झालेले ७० स्वावलंबी व तेजस्वी विद्यार्थी तयार केले याबद्दल जनतेस अभिमानच वाटत राहिला आहे.

तथापि राष्ट्रीय भावनेचा दूधसागर जिल्ह्यातील माणसा-माणसागणिक ज्यायोगे उचंबळून राहील तेच टिकावू व भरीव असे राष्ट्रीय-शिक्षण आपल्या कीर्तनातून ते सामुदायिक पद्धतीने देण्याचा उद्योग ह. भ. प. घमंडे, माटे, पिलुबुवा वडूजकर व डॉ.दत्तोपंत पटवर्धनानी आजवर सारखा सात तपे केला. पण त्यापेक्षाही घरटी जाऊन समाजाच्या तळच्या माणसाचीही सुखदुःखांची चौकशी करून, त्याला आर्थिक, सामाजिक, बौद्धिक,औद्योगिक व राजकीय दृष्ट्याही स्वावलंबनाने

आणि स्वयंपूर्णतेने परिस्थिती समजून घेऊन आपले प्राप्त कर्तव्य राष्ट्रीय दृष्टया कसे करावे, याचे शिक्षण परचुरे शास्त्र्यांनी सातारा ग्राम सेवा संघातर्फे काम करून दिले आणि त्या मार्गाने जाणारासाठी प्राथमिक पुस्तक म्हणून "खेड्यातील यात्रा" हे पुस्तकही प्रसिद्ध केले. पण दुर्दैव जिल्ह्याचे की जवाहरलाल नेहरूनीही गौरविलेला हा राष्ट्रीय-शिक्षक व त्याचे कार्य आता केवळ स्मृतिशेष झाले आहे!!!

याशिवाय तीनही प्रांतिक परिषदांच्याबरोबर भरलेल्या सामाजिक परिषदा व १९१२ सालासारखी क्वचित एकादी भरलेली जिल्हा सामाजिक परिषद, स्वदेशीची व औद्योगिक प्रदर्शने यांचा संकलित चित्रपट व त्या पाठीमागील मनोवृत्तीचे विश्लेषण समोरासमोर असल्याशिवाय जिल्ह्याच्या राजकीय रेखाचित्राच्या गुणदोषांचा बिनचूक हिशोब व ताळेबंद होणार नाही. आता, इतिहासाच्या कारखान्यातील खातावणीपैकी एक खाते पुरे केल्यासारखे वाटले, तरी ऑस्टनसारख्या कडक न्यायाधीशाची अन्याय्य भाषा आपल्या सचोटीने चालविलेल्या वकीलीच्या धंद्यासंबंधी आल्याबरोबर तेथून तडक निघून येऊन ऑस्टनसाहेबांनी दिलगिरी प्रदर्शित केल्यावरच ज्या बळवंतराव सहस्रबुद्धयानी ऑस्टनसाहेबाच्या कोर्टात पुन्हा पाऊल टाकले ते सहस्रबुद्धे स्वतःच्या मृत्यूपर्यंत दादासाहेब करंदीकरांच्या "सर्व कार्यात समरस आणि स्फूर्तीचे ठिकाणी असत हे सांगितल्याशिवाय" सातारा जिल्ह्याच्या राजकीय खात्यापुरतेदेखील चिकित्सक व सूक्ष्म हिशोब तपासनीसाचे समाधान नाही खरे; पण प्रत्येक बाबीची अशी तपशीलवार फोड व्हावयास स्थल, काल, साधने तरी पुरेशी कोठे आहेत?

तात्पर्य, बहुजन समाजाच्या हितसंबंधाचे संगोपन करून राष्ट्रीय अभ्युत्थानासाठी झालेल्या सातारा जिल्ह्यातील सर्व खटपटीत असे कितीतरी सुपुत्र व सुकन्या आहेत की, ज्यांची शांतपणे व निरलसपणे केलेली कामगिरी नमूद करावयास इतिहास असमर्थ आहे; कार्लाईल म्हणतो त्याप्रमाणे इतिहास थोरांच्या चरित्रांचा झालेला असतो खरा, पण हे थोर लोक बऱ्यावाईट तऱ्हेने लोकांच्या पुढे आलेले असतात. म्हणूनच सेनापति व "व्हिक्टोरिया क्रॉसवाले" सैनिक आणि मुत्सद्दी व त्यांचे उलाढाले हस्तक यांची नावे व कामगिरी इतिहास पाठ म्हणत असतो. आणि इतिहासाने पाठ म्हटलेली नांवे प्रातिनिधिक असतात असे जे म्हणण्यात येते ते येवढ्या साठीच. म्हणून राष्ट्रातील नेपोलियनचे अगर शिवाजीचे नांव ज्यावेळी इतिहास घेतो, त्यावेळी त्या राष्ट्रात आपआपल्या विवक्षित क्षेत्रातील किती तरी अप्रसिद्ध नेपोलिअन व अप्रसिद्ध शिवाजी नांदतात असे मानण्याची चिकित्सकांची चाल आहे. कारण खरे पाहिले असता अशा छोट्या व अप्रसिद्ध निरपेक्ष कामगिरीतूनच राष्ट्रीय उत्कर्षाचा धवलगिरी उंचावत असतो.

ठिकठिकाणच्या अशा सामर्थ्यवन्ताना संघटित करावे, त्यांचे कार्य शक्यतोवर उजेडात आणावे (कारण प्रसिद्धी हे एक नवीन शक्ति निर्माण करण्याचे स्फुर्तिसाधन ठरते.) आणि कोपऱ्यातील खेडेगावापासून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणापर्यंत सार्वजनिक चळवळीची शास्त्रशुद्ध साखळी अशी जोडावी की तिच्या जोरावर भारतीय स्वातंत्र्याविषयी जागृत असलेला सातारा जिल्हा राष्ट्रीय तेजोवर्धनाला निर्धाराने सहाय्यक व्हावा.

शिस्त आणि संघटना यांच्याशिवाय शहाणपणाचा उपयोग होत नाही. लोकमान्यांचा फोटो युनियन क्लबात असे तो अगर " परदेशी साखर अशुद्ध असल्याच्या जाहिराती व्हिक्टोरिया लायब्ररीवर लागल्या " म्हणून त्या संस्थेचे सभासद राहण्याचे एकजात सर्व युरोपियनानी १९०९–१० च्या काळात नाकारण्यात जी मार्मिक संघटना व शिस्त दाखविली ती डोळयापुढे ठेवली तर गंतुर येथे (१३ नोव्हेंबर १९३५) राजेंद्रबाबूनी म्हटल्याप्रमाणे " देशासाठी जगून आयुष्याचा प्रत्येक क्षण देशसेवेकडे खर्च करणे हा आत्यंतिक त्याग " थोडया तरी महाभागाना आचरता येईल. त्याचबरोबर १९४३ पासून पुढील सहा वर्षांत घास–मोजणी (रेशनिंग) चे नियम सांभाळूनही कलेक्टर डायस, पुरवठा अधिकारी श्रीपादराव सप्रे आणि रेशनिंग ऑफिसर विनायकराव फणसळकर प्रभृतीनी आपल्या कर्तव्यनिष्ठेने जी लोकसंतुष्टता राखली, तिचा अवलंब सर्वत्र झाला, तर १९४१ साली कऱ्हाड कृष्णा घाटाचा दावा हिंदूंच्यातर्फेने मुसलमानानी अकारण अगळीकी विरुद्ध चालवून यश मिळविण्यात गणपतराव आळतेकर प्रमृतीनी अन्यायाचे परिमार्जन केले अथवा त्याच (१९४१) सालच्या मद्रास येथील लिबरल फेडरेशनमध्ये डॉ. गणपतराव महाजनीनी पाकिस्तान निर्मिती विरुद्धचे ठरावास अनुमोदन देण्यात जी कर्तव्य कठोरता दाखविली, त्या वृत्तीचा विकास समाजाच्या तळापासून होत जाईल. फार काय, महाजनीनीच १९४३ साली मुंबईच्या लिबरल फेडरेशनमध्ये काँग्रेस पुढाऱ्यांना बिनशर्त मुक्त करण्याच्या ठरावास पाठिंबा दिला आणि १९४५ साली लाहोरच्या फेडरेशनमध्ये हिंदुस्थानचे संरक्षणव्यवस्थेबाबत ठराव मांडला; त्या दोनही प्रसंगी त्यांनी सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक परंपरेचा वारसाच चालविला. तो म्हणजे सातारा हायस्कूलच्या शतसांवत्सरिक महोत्सवप्रसंगी (नोव्हेंबर १९५१) त्यांनीच अभिमानाने जाहीर केल्याप्रमाणे सातारा जिल्ह्याचे शिल्पकार आपआपल्या मतस्वातंत्र्याप्रमाणे प्रगत सेवा करताना कुणाचाही तेजोभंग होऊ नये ही दक्षता घेतात. या सर्व गुण समुच्चयांचा सहकार–समन्वय स्वराज्यातीलही तेजोवर्धनास उपयुक्त ठरणारा आहे.

सहजीवनातील प्रगती व मैत्री आणि त्या दोहोंना धरून असणाऱ्या साहसी ध्येयवादाने भारून गेलेल्या तरुणांचा उत्साह यावर आंतरदेशीय व

जागतिक शान्ति अवलंबून आहे. आपल्या सामुदायिक दुःखांच्या बेड्या तोडू पाहणाऱ्या खेड्यातून व कुडा-झोपड्यातून राहणाऱ्या लोकांना, आपल्या पायावर उभे राहण्याच्या प्रयत्नात, सर्व बाजूनी वाव व साथ हवी आहे. त्या दृष्टीने नोव्हेंबर १९६५ मध्ये कऱ्हाडास स्थापन झालेल्या (टेक्निकल ट्रेनिंग कॉलेज) तंत्र दीक्षा महाविद्यालय जिल्ह्याच्या जीवनात बहुरंगी चैतन्य खास निर्माण करील. चैतन्यशील समाजरचना होत चालली की "आहे त्यात आत्मसंतुष्टतेला" थारा रहात नाही. १९६४ साली साताऱ्यास व १९६५ त कऱ्हाडास झालेल्या रणजीकरंडक सामन्यासारखे तरी काही व्हावे, करावे अशी सहाजिकच आकांक्षा निर्माण होत जाते. जन सामान्याला पहावयास सहसा सापडत नाही, ते घडवावे ही राष्ट्र सेवेची भावना त्या आकांक्षेत असते; शिवाय कऱ्हाडास झाला तसा ५ गुणांनी (पॉईंटसनी) महाराष्ट्राचा गौरव होवो न होवो, अखिल भारतीय एकजिनसी पणाचे वळण स्नेहाळू खेळापासूनही गिरवता येते, हे त्यात लोक-शिक्षण आहे. सातारा न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनाम-निर्दिष्ट अशा सात्त्विक परिश्रमार्जितानी तेराशे रुपयांचा जो संरक्षण निधी (१९६५) दिला त्यातही एकजिनसी राष्ट्रीय भावनेची सेवाबुद्धीच आहे. या चालिवरच सेवायोगी तरुणांचे सातत्य रहावे या ध्येयाने समर्थ सेवामंडळ जिल्ह्यात बाबूराव वैद्य प्रभृतीनी सुरू केले. चाफळ, सज्जनगड देवस्थानांचे स्वामी व विश्वस्तमंडळ याना सहकार देऊन " बहुत जनास चाळवी नाना मंडळे हालवी " अशी पावले समर्थ सेवा मंडळ टाकीत आले आहे. त्याच्या ध्येयाचे तेज प्रभावित प्रगतिशील, निष्कलंक, लोकसंपर्कानेे कर्तृत्वातून कुर्रा आणि त्यातून क्रूरता (प्रतिसरकारातून पत्री सरकार झाले त्याप्रमाणे) प्रसंगोपात्त निर्माण होते त्या प्रकाराला सर्वथैव आळा पडेल.

ते साधावयास प्रत्येक माणसातील निसर्गदत्त सामर्थ्याचा सात्विकपणे तेजस्वी विकास झाला पाहिजे व परिस्थितिसापेक्ष काळ-काम-वेगाने त्या सामर्थ्यानी स्वयंपूर्ण सेवायोग साधला पाहिजे. सार्वजनिक जीवनाच्या अशा आध्यात्मीकरणाचे वळण घरादारातून आणि शैक्षणिक-सार्वजनिक कार्यक्षेत्रातून शीलवन्तानी लावून भारतीय संस्कृतीचा नंदादीप तेवत ठेवला पाहिजे. रामशास्त्री प्रभुण्यांच्या माहुली येथे झालेल्या एकतपावरील स्मारकाप्रमाणेच त्यांच्या न्यायनिष्ठुर स्पष्टवक्तेपणाचा व्यवहारशुद्धतेने सातारा जिल्हयात खासगत आणि सार्वजनिक संसार चालू लागणे ही स्वराज्याच्या तेजस्वीपणासाठी आता कालपरिपक्व गरज आहे. ती गरज भागविताना, १८९३ नंतर सत्तर वर्षानी ज्यांच्या हरिवरदाचे आठखंडात पुनर्मुद्रण त्यांचे वंशज दयार्णव कोपर्डेकरानी साधले, त्या कोपर्डेकर कृष्णदयार्णव कविवरांची ज्ञानसंपन्न भक्ति सदैव कर्तव्यजागृत हवी; आणि त्या भक्तिनेच, गांधीस्मारक समितीतर्फे २८ नोव्हेंबर

१९६५ रोजी मामासाहेब देवगिरीकरांच्या अध्यक्षतेखाली मढें येथे झालेल्या गांधीसेवा–समितीत–मार्गदर्शन झाल्याप्रमाणे खेडे नि खेडे अन्न-वस्त्र-शिक्षण-संरक्षण–स्वावलंबी करण्याचा प्रयत्न नेटाने व्हावयास हवा. इतिहासाचे परिशीलनप्रवीण टॉयनबी Taynbee काही वर्षापूर्वी एडिंबरो येथे व्याख्यान देताना म्हणाले की एकोणिसाव्या शतकाने धर्माला पदच्युत करून तंत्राला त्याच्या जागी बसविले, पण एकविसाव्या शतकात धर्म आपली जागा फिरून घेईल. इतिहासाची अशी पुनरावृत्ती होवो, न होवो कैसरी कंदनानंतर जर्मनीच्या लोकसत्ताकाचा अर्थमंत्री झालेला ज्युइश तत्त्वज्ञानी व मुत्सद्दी रेदेन्यू (Ratheneau) आपल्या 'अर्थ व्यवस्थेचा मार्ग' या पुस्तकात म्हणतो त्याप्रमाणे राष्ट्राच्या सर्वसमर्थ बांधणीसाठी आत्मोन्नतीच्या वाटाच चोखाळल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील व भारतातील सन्तशिकवणूक यापेक्षा काय निराळी आहे !

महाराष्ट्र – भारताच्या सन्तशिकवणीप्रमाणेच भारत-पाक-संग्रामामुळे काश्मीर परिसरात विस्थापित झालेल्या आपल्या देशबांधवासाठी जिल्ह्यातील जनसंघ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यानी कपडचालत्त्यापासून सर्व त-हेची जी मदत जनतेकडून १९६५ चे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्याअखेर मिळवली ती संस्मरणीय असून दुष्काळी परिस्थितीशी झगडणाऱ्या माण देशातील धैर्यवान किसानांचा त्या पुण्याईत भरघोस हातभार आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे.

तशीच आणखी एक घटना म्हणजे ता. २६ डिसेंबर १९६५ रोजी सातारा येथे ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्सचे जाईंट सेक्रेटरी श्री. प. ह. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झालेले जिल्ह्यातील मुद्रक-संमेलन होय. " स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धि लभते नरः । " या न्यायाने त्यांनी आपली संघटना बांधण्याचे ठरविले ही समाजसन्मुख जीवनाची कर्तव्यदक्षताच होय. संमेलनाचे स्वागताध्यक्ष अनंतराव कुलकर्णी (आनंद प्रेस), उद्घाटक यशवंतरावजी पार्लेकर (जिल्हापरिषदाध्यक्ष) आणि संमेलनाध्यक्ष पटवर्धन यांच्या मार्गदर्शक भाषणातून छत्रपती प्रतापसिंह महाराजांपासून चालत आलेल्या मुद्रणव्यवसायाचे समालोचन होऊन आजच्या जगातील प्रगत कलेने टिकाव धरण्याबद्दल जो आदेश देण्यात आला तो इतरही व्यावसायिकानी अनुसरण्यासारखा आहे. ही परंपरा १९५८ पासूनच महाराष्ट्र-इंटकने सातारा येथे परिषद भरवून संघटनेचा भक्कम पाया घातला तेव्हापासून चालू आहे.

गतिमान जीवनातील महाप्राण असेल त्यालाच इतिहास म्हणतात. ती ही " कथा लोकसुमंगला " असावी लागते. म्हणून " मंगलाय च लोकानां क्षेमाय च भवाय च । " झटण्याचा प्रयत्न करणारेच इतिहासाच्या घडणीचे शिल्पकार होऊ शकतात.

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेतून

या इतिहासाचे लेखक श्री. बाबूराव गोखले यांची असा सर्वांगीण, सर्व पक्षांच्या राजकीय कार्याचा इतिहास लिहिण्याची योजना दिसते. सातारा जिल्ह्यात जे जे सार्वजनिक स्वरूपाचे राजकीय कार्य झालेले दिसले त्याची स्थूल कल्पना वाचकास करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय सभेच्या जन्मापूर्वीचा काळ, राष्ट्रीय सभेच्या जन्मानंतर १९०७ पर्यंतचा काळ, १९०७ ते १९२० पर्यंतचा काळ, १९२० ते १९३२ पर्यंतचा काळ व १९३२ नंतरचा आजतागायतचा काळ असे या इतिहासाचे मुख्यतः पांच भाग करता येण्यासारखे आहेत. साताराचे राज्य खालसा झाल्यापासून इंग्रजी अमदानीतील नव्या तेजाने दिपलेल्या प्रजाजनांची राजकीय कामगिरी ती काय असणार ? परंतु या काळातीलही त्या वेळच्या सार्वजनिक हितबुद्धी असणाऱ्या तुरळक व्यक्तीनी व वृत्तपत्रकारानी आपापल्यापरीने नवीन राज्यपद्धतीची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्याचा थोडाबहुत प्रयत्न कसा केला, याचे दिग्दर्शन लेखकाने सन १८८५ च्या पूर्वीच्या वृत्तपत्रातील उतारे देऊन केले आहे. सन १८८५ पासून सन १९०७ पर्यन्त त्या काळचे सातारा जिल्ह्यातील पुढारी यांनी तत्कालीन कॉंग्रेसच्या धोरणास अनुसरून ठिकठिकाणी जिल्हासभा, तालुकासभा वगैरे भरवून सरकारचे कानावर प्रजेची गाऱ्हाणी घातली. कॉंग्रेसच्या इतिहासात सातारा जिल्ह्याचे जर काही वैशिष्टय असले तर दुसऱ्या कॉंग्रेसपासून ते अव्याहत १९०७ पर्यंत सातारा जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी कॉंग्रेसच्या सभास हजर राहून कॉंग्रेसचा संदेश जनतेस पोचविणे हे कार्य मोठ्या निष्ठेने केले आहे. १९०७ साली कॉंग्रेसमध्ये दुफळी होऊन लोकमान्य टिळकांचे नेतृत्वाखाली नवा पक्ष निर्माण झाला. त्या पक्षाला सातारा जिल्ह्यानेही बराच पाठिंबा दिला असून पुन्हा कॉंग्रेसमध्ये दोन्ही पक्षांची एकी घडवून आणण्याचे आपल्या परीने कसे आटोकाट प्रयत्न केले याचेही दिग्दर्शन या इतिहासात दिसून येणारे आहे. कै. लोकमान्य टिळक तुरुंगात असता सन १९१४ साली जी प्रांतिक सभा साताऱ्यास भरली त्या प्रांतिक सभेच्या कार्यात त्यावेळचे सातारा जिल्ह्यातील पूज्य नेमस्ताग्रणी कै. रावबहादूर पाठक यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. कॉंग्रेसची दुफळी झाल्यानंतर महाराष्ट्रात कॉंग्रेसचे कार्य अल्प प्रमाणात का होईना कोठेही चालल्याचे आढळून येत नव्हते व अशा निराशामय कालात देखील सातारा जिल्ह्याने आपले जिल्हासभेचे कार्य कै. रा. ब. पाठकांसारख्या नेमस्त सद्‌गृहस्थांचे मदतीने सातत्याने चालविले ही गोष्ट या जिल्ह्यास भूषणावहच समजली जात असे.

सन १९१४ च्या प्रांतिक सभेने अल्पांशाने का होईना काँग्रेसमध्ये दोन पक्षात एकी घडवून आणण्यास मदत केली असे उद्गार कै. लोकमान्यांनी तुरुंगातून सुटून आल्यावर चार दोन वेळा तरी काढल्याचे आम्हास माहीत आहे. कै. लोकमान्यांच्या हयातीत नव्या पक्षाचे बीजारोपण सातारा जिल्ह्यात होऊन त्या पक्षाची वाढ बरीच झपाट्याने झाल्यामुळे १९२० नंतरच्या असहकार-काळात सातारा जिल्हा इतर ठिकाणच्या मागे राहु शकला नाही. आणि १९३० - ३२ सालच्या सत्याग्रह-युद्धात सातारा जिल्ह्याने सत्याग्रहींचा पुरवठा इतर कोणत्याही ठिकाणाप्रमाणेच आपल्या मगदुराप्रमाणे आटोकाट केला असे अभिमानपूर्वक बोलता येण्यास जर कोणते एखादे विशिष्ट कारण असेल तर त्याचे श्रेय सातारा जिल्ह्यातील पूर्व काली चालू असलेल्या राजकारणाच्या थोड्याबहुत सातत्यालाच दिले पाहिजे.

देशात जी जी राजकीय चळवळ चालेल त्या त्या राजकीय चळवळीस सक्रीय पाठिंबा देण्यास सातारा जिल्हा सदैव तयार होता व आहे या गोष्टीचे प्रत्यंतर या इतिहासावरून सहज मिळण्यासारखे आहे. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यात राजकारणाचे बाबतीत मतभेद नाहीत असे नाही. अगदी नेमस्ता-पासून तो नव्या उदय पावलेल्या समाजसत्तावादी पक्षापर्यंत प्रत्येक पक्षास थोडेबहुत अनुयायी या जिल्ह्यात आहेत. तथापी या सर्व पक्षांची एकीने काम करण्याची सातारा जिल्ह्यातील भूमिका उज्ज्वल आहे असे स्वाभिमानपूर्वक म्हणता येईल व हीच ऐक्याने काम करण्याची प्रथा यापुढेही चालू राहिल्यास सातारा जिल्हा महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्याच्या मागे राहू शकणार नाही.

या इतिहासाचे लेखक श्री. गोखले यांनी हल्लींच्या इतिहासास सामुग्री गोळा करण्यात किती परिश्रम घेतले आहेत व त्यांना त्या कार्यासाठी किती वृद्ध-तरूण कार्यकर्त्यांच्या गांठी घ्याव्या लागल्या व जिल्ह्यातील जुने लिखाण मिळवून त्यातून योग्य ती माहिती घ्यावी लागली याची जाणीव आम्हास आहे. श्री. गोखले हे जिल्ह्यातील तरूण पिढीतील एक उत्साही कार्यकर्ते आहेत. त्यांची राष्ट्रसभेबद्दलची निष्ठा उच्च प्रकारची आहे. तथापि हा इतिहास लिहिताना आपल्या जिल्ह्याचे चित्र यथातथ्य रेखाटण्याची त्यांची सदिच्छा ही लक्षात घेतली असता वाचकांनी त्यांच्या इतिहासलेखनाकडे सहृदयतेने पहावे अशी वाचकांस विनंती करणे मला युक्त वाटते.

सातारा
ता. १७–१२–३५

–रा. ग. सोमण

जागृत सातारा (पहिली आवृत्ती)

ग्रंथाची व जिल्ह्याची वैशिष्टये

एकमेवाद्वितीयम् ग्रंथ—

श्री. गोखले यांचा हा इतिहासात्मक ग्रंथ सर्वस्वी अभिनव आहे यात संशय नाही. भावी इतिहासकारांना देशातील लहान मोठ्या भागातील सार्वजनिक आयुष्यक्रमाची संकलित सामुग्री एकत्रित करून मिळण्याच्या दृष्टीने असे जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनाचा आढावा घेतलेले आमच्या माहिती-प्रमाणे तरी हे पहिलेच पुस्तक होय. श्री. गोखले यांच्या या ग्रंथाचे अपूर्वत्व, वैशिष्टय व महत्त्व या एकाच गोष्टीत आहे. हा ग्रंथ लिहिण्याचे काम त्यांनी प्रकाशनासह अवघ्या साडेतीन महिन्यात संपविले असले तरी त्याची सामुग्री जमविण्याकरिता त्यांनी किती दीर्घ परिश्रम केले आहेत याची कल्पना त्यांनी पुस्तकाच्या आरंभी दिलेली आधारांची नामावली सहज देईल. या बाबतीत आम्हा स्वतःस जी माहिती आहे, त्यावरून आम्ही बिनदिक्कत असे सांगू शकतो की ही साधनांची जुळणी करताना त्यांनी केलेले परिश्रम तेच करू जाणोत. या पुस्तकात गेल्या पाऊण शतकाच्या कालखंडातील या जिल्ह्याची इतकी सांगोपांग माहिती ग्रथित करण्यात आलेली आहे की ती वाचीत असता आपण या काळाचा चलच्चित्रपटच पहात आहोत की काय अशी जी वाचकांची भावना होते ती आमच्या म्हणण्याची सत्यता सहज पटवील. या परिश्रमाबद्दल श्री. गोखले यांना आम्हाप्रमाणेच जिल्ह्यातील प्रत्येक वाचक खात्रीने धन्यवाद देईल.

जिल्ह्याच्या भूमिकेचे योग्य मनोविश्लेषण—

श्री. गोखले यांच्या सदर पुस्तकाचा दुसरा विशेष म्हणजे त्यात दिसून येणारी पक्ष–निरपेक्ष, गुणग्राही व खऱ्या इतिहासकाराला साजेशी सत्यान्वेशी दृष्टी हा होय. श्री. गोखले हे काँग्रेसचे कट्टे भक्त व जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातील प्रमुख कार्यकर्ते आहेत. ते पूर्णांशाने सत्याग्रही आहेत व गेल्या दोन्ही सत्याग्रही लढ्यात धडाडीने भाग घेऊन त्यांनी अत्यंत स्वार्थत्यागही केलेला आहे. असल्या जाज्वल्य निष्ठेच्या काँग्रेस भक्ताला इतर काँग्रेस पक्षीयात हमखास आढळणाऱ्या अभिनिवेशाचे वारे लागले असते तर त्यात आश्चर्य नव्हते. परंतु आनंदाची गोष्ट ही की, त्यांनी स्वतःस त्यापासून पूर्णपणे अलिप्त ठेवल्याची साक्ष त्यांचे हे पुस्तक देत आहे.

सर्वपक्षीय ऐक्याची भूमिका व भिन्न पक्षीय कार्यकर्त्यांची स्वतःचे पक्षस्वातंत्र्य राखूनही शक्यतोवर एकोप्याने काम करण्याची प्रथा हे जे साताराजिल्ह्याचे वैशिष्टय आहे ते आधारभूत धरून त्यावरच त्यानी आपल्या या ग्रंथाची उभारणी केली आहे. किंबहुना त्यांच्या ग्रंथातील नरनिराळ्या परिच्छेदाना व एकंदर कथा-भागाला गुंफणारा तोच एक मुख्य धागा आहे असे म्हटल्यास हरकत नाही. त्यांच्या पुस्तकाच्या भागातील आठ्ठावन्नाव्या पृष्ठावर सातारा जिल्ह्याचे हे वैशिष्टय खालील शब्दात मांडले आहे.— " राजशक्तेर-धिष्ठानं लोकशक्तिर्विशिष्यते आणि ती लोक शक्ति समर्थ व्हावयास ऐक्य व त्या ऐक्याचा पाया बहुजन हितबुद्धीची सेवा असेल तरच भारतमाता अभ्युदय पावेल, हा सातारा जिल्ह्याचा आचरण सिद्धांत प्रत्येकास पटेलच पटेल." श्री. बाबूरावनी केलेले जिल्ह्याच्या मनोभूमिकेचे हे विश्लेषण सर्वस्वी बरोबर आहे यात संशय नाही.

ग्रंथातील विवेचनाची रूपरेषा—

परीक्षणभूत ग्रंथाचा आणखी एक विशेष म्हणजे त्याची कौशल्यपूर्ण व समर्पक मांडणी हा होय. जिल्हयातील भिन्नपक्षीयांच्या भिन्न स्वरूपातील कामगिरीला एकसूत्रता आणून ती वाचकांच्यापुढे गौरवपूर्ण व ऐक्यसंवर्धक दृष्टीकोनाने मांडणे हे खरोखरच अत्यंत कठीण काम होते; परंतु श्री. गोखले यांनी त्याकामी पूर्ण यश संपादन केले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय चळवळीचे अधिष्ठान पुण्यपत्तनी राहण्याचे कारण त्याच्या स्वराज्याचे ते अखेरच्या काळा-तील केंद्र होते; व त्यामुळे तेथील नागरिकांची राजकीय हक्कांची जागृती अव्वल इंग्रजी अमदानीत ताजी होती, असे देण्यात येते. या विधानात जर सत्यता असेल तर तो नियम पुण्यापेक्षाही अधिक यथार्थाने सातारा शहरास लागावयास पाहिजे हे उघड आहे. श्री. गोखले यांनी हा सिद्धांत मनात आणून साताऱ्याच्या जागृतीचा मुळवा तेथेच नेऊन भिडविला असून या जिल्हयाच्या सार्वजनिक व संघटित जीवन-क्रमाला सन १८५२ पासून म्हणजे महाराजांचे राज्य खालसा झाल्यापासून अवघ्या चार वर्षांनीच कशी सुरवात झाली; व आजही छत्रपतीच्या अवशिष्ट वंशाला जिल्ह्यातील रहिवासी कसे आदरतात, हे आपल्या प्रारंभीच्या प्रकरणात सांगूनच आपल्या इतिहास कथनाला सुरवात केली आहे. हा प्रारंभ यथोचित आहे, यात संशय नाही. एका दृष्टीने पाहिले तर त्यानंतरच्या काळातील या जिल्ह्यातील सार्वजनिक जागृती देशातील इतर भागातील जागृतीहून भिन्न काय असणार? देशात ज्या ज्या चळवळीच्या व जागृतीच्या लाटा उसळल्या त्या त्या इतर ठिकाणाप्रमाणे या जिल्हयातही येऊन आदळल्या, त्यांचे पडसाद या जिल्हयात उमटले; व या जिल्हयातील कार्यकर्त्यांनी एक दिलाने राष्ट्रीय जागृतीचे हे लोण खेडोपाडी नेऊन पोहोचविले

हेच या इतिहासाचे मुख्य सार असावयाचे हे तर खरेच व रा. गोखल्यानी आपल्या पुस्तकात तेच प्रामुख्याने कथिले आहे. त्यातही या जिल्ह्याची काही वैशिष्टचे आहेतच व ती त्यांनी अत्यंत कुशलतेने मांडली असून सर्व संविधानक त्यांच्या भोवतीच गुंफण्याचे कौशल्य दाखविले आहे.

समेटभूमी अर्थात सातारा –

या वैशिष्टचापैकी कार्यकर्त्यांची पक्षाभिनिवेश निरपेक्ष सहकारी वृत्ती हे एक वैशिष्टच आम्ही वर सांगितलेच. दुसरे, अशीच अभिनिवेश विरहित व कार्यैक–निष्ठ–वृत्ती देशातील राजकारणात नांदावी म्हणून जिल्ह्याने वेळोवेळी यशस्वी प्रयत्न करून या जिल्ह्यास समेट भूमीचा अभिनंदनीय दर्जा मिळवून दिला हे या वैशिष्टचाचा इतिहासही ग्रंथ कर्त्याने समर्पकरीतीने दिला आहे. तिसरे वैशिष्टच म्हणजे या भूमिकेमुळे या जिल्ह्यातील सार्वजनिक कार्याकरता निघालेल्या स्वतंत्र संस्थांचा इतिहास हे होय. गेल्या शतका अखेर जिल्ह्यात सालोसाल भरलेल्या छोटचा काँग्रेसा, तदनंतर सन १९०७ पासून १९२० साल पर्यंत भरलेल्या जिल्हासभा व महायुद्ध पूर्व कालात राष्ट्रीय सभेचा संदेश जिल्ह्यात सर्वत्र पोहोचवून तिचे कार्य आपल्या पुरते अखंड चालू ठेवण्याचा भिन्न पक्षीय कार्यकर्त्यांनी केलेला प्रशंसनीय प्रयत्न हे या इतिहासाचे मुख्य भाग होत; व त्यांचे वर्णन श्री. गोखले यांनी मोठचा अभिमानाने करावे हे रास्त आहे. त्यांच्या ग्रंथाचा हा भाग, किंवा या जिल्ह्यातील हिंदु–मुसलमान कार्यकर्त्यात सतत असलेला अपूर्व एकोपा याचे त्यांनी केलेलें विवेचन जिल्ह्यातील कोणाही रहिवाशाला अभिमानास्पद वाटेल यात संशय नाही.

काँग्रेस पक्षाच्या कर्तृत्वाचे यथार्थ वर्णन—

त्यांनी इतर पक्षांच्या कामगिरीचे केलेले वर्णन अल्प असले तरी यथार्थ, गुणग्राही बुद्धीने केलेले, व सत्य स्वरूपात मांडलेले आहे. त्याला स्वपक्षास अनुकूल अशी मुरड घालण्याचा इतरत्र हमखास होणाऱ्या प्रयत्नाचा वास लागलेला नाही. प्रागतिकांचे व ब्राह्मणेतरांचे कार्य, रा. ब. काळे व श्री. वाग्भट देशपांडे यांची भाषणे, रा. ब. काळे व श्री. आचरेकर यांच्या कौन्सिल मधील कार्यांचे महत्त्व वर्णन वगैरे स्थळे त्यांच्या या निःपक्षपाती दृष्टिकोनाची साक्ष पटवितील. श्री. गोखले यांची ही वृत्ती जिल्ह्यातील इतर सर्वच कार्यकर्त्यांच्या अंगी बाणेल तर या जिल्ह्याच्या सार्वजनिक चळवळीला हल्लीपेक्षाही कितीतरी अधिक जोम चढेल ! ब्राह्मणेतरातील जागृतीमुळे या जिल्ह्यात प्राथमिक शिक्षण व सहकारी संस्था यांच्या झालेल्या विकासाचा त्यांच्या निवेदनात यथोचित गौरव करण्यात आला असून रा. भाऊराव पाटलांचे कार्य सुद्धा या गौरवपूर्ण उल्लेखातून सुटलेले नाही.

ग्रंथाची फुलत्या फुलोऱ्यासारखी भाषा—

श्री. गोखले यांची पुस्तकातील भाषा फुलत्या फुलोऱ्यासारखी आल्हादकारक आहे. भिन्नप्रसंगातून अचूक अनुमाने काढून ती समर्पकरीतीने मांडण्याची, व बाह्यत: विसंगत दिसणाऱ्या गोष्टींचा उचित समन्वय घालण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे— काँग्रेसचे ठराव आज्ञात्मक समजावे की अनुज्ञात्मक, या वादग्रस्त प्रश्नावर नैमित्तिक व चढाईच्या वेळी ते आज्ञात्मक व नित्याचे प्रसंगी ते अनुज्ञात्मक समजावेत, असा समर्पक समन्वय घालून या जिल्ह्यातील काँग्रेस कार्यातून तसा निष्कर्ष काढण्याचा जो त्यानी यशस्वी प्रयत्न केला आहे तो आमच्या वरील विधानाची सहज साक्ष पटवील.

अनुकरणीय आदर्श व महत्त्वाची सेवा—

अशा तऱ्हेचे अभिनव व उपयुक्त पुस्तक लिहून श्री. गोखले यांनी इतर जिल्ह्यातील लेखकांना अभिनंदनीय उदाहरण तर घालून दिले आहेच; पण जिल्ह्यातील जनतेला हा स्फूर्तीदायक आढावा सादर करून कार्यप्रवण करण्याचे महत्कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी ग्रंथाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे हा शब्दपट " वडिलांची कीर्ति " सांगून " पढतमूर्खत्त्व " पदरी घेण्याकरिता चितारला नसून " वडील पिढीच्या कार्यांच्या आढाव्याने तरूण पिढीला आपल्या कार्यक्षेत्राचे क्षितिज निश्चित करण्यास समर्थ करण्याच्या " बुद्धीनेच तो रंगविला आहे. हे कार्य अत्यंत प्रकर्षाने या ग्रंथात साधले आहे असे आम्ही आनंदाने नमूद करतो. व सातारा जिल्ह्याची अशी महत्त्वाची सेवा केल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करून या ग्रंथाचे एकवार तरी पारायण करण्याबद्दल आमच्या सर्व वाचकांना जोराची शिफारस करतो.

— सातारा, ऐक्य– ता. २९ डिसेंबर १९३५.

या पुस्तकाचे आधार

१) केसरी, नवाकाळ, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, टाईम्स, शुभसूचक, महाराष्ट्रमित्र, प्रकाश, ऐक्य, श्रीशाहू, समर्थ, भारतमाता, विद्याविलास, वृत्तसार, अभ्युदय, विदूषक, लोकशक्ति, विजय, पुरुषार्थ, नवसंदेश, महाराष्ट्र, चित्रमयजगत् इत्यादि नियतकालिके.

(२) सार्वजनिककाकांचे चरित्र (बोरवणकर), लोकमान्य टिळक चरित्र (केळकर), काळकर्ते परांजपे चरित्र (परांजपे), वासुकाका जोशी व त्यांचा काळ (देवगिरीकर), काकासाहेब खाडिलकर चरित्र (खाडिलकर), प्रतापसिंह महाराज (राणे), श्रीशाहूमहाराज (लठ्ठे), लोकप्रिय भाऊसाहेब सोमण (गोखले); पुरुषोत्तम (रा. ब. काळे चरित्र, पळणीटकर), डॉ. आठल्ये यांचे आत्मचरित्र

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांचे अहवाल, विनायकराव फणसळकर वकीलांकडील जुने दप्तर, जिल्हासभा दप्तर, जिल्हा–प्रांतिक सभांचे अहवाल, कायदेमंडळातील कामकाजांचे अहवाल, वाई सार्वजनिकसभेचे दप्तर, सातारा दप्तर वगैरे.

(४) चिरोलकृत भारतीय असंतोष, आठराशेसत्तावनचा महाराष्ट्र (गोखले); राजधानी सातारा (प्रो. कुंभारे), काँग्रेसपक्ष (गोखले), दादासाहेब करंदीकर व रामभाऊ कुलकर्णी (तासगांव) यांच्या रोजनिशा, ब्रिटिशांच्या संरक्षणाखालील संस्थानिक (चुडगर), संस्थानी स्वराज्याचा इतिहास (शा पटवर्धन)

(5) Story of Satara (Major Basu), How India wrought Freedom (Dr. Besant), With the Indians in France (General Sir James Will-Cocks) etc.

(६) कै. नाथ घाणेकर, भाऊसाहेब सोमण, गणेश अंताजी जोशी, रामभाऊ कुलकर्णी (तासगाव), ना. भास्करराव जाधव, आणि विद्यमान न. गं. जोशी, ल. म. देशपांडे, डॉ. आठल्ये, डॉ. शेणोलीकर (उत्तमराव) कोल्हापूर आणि उदेपूरच्या विद्यापीठाचे कुलगुरु रँ. महाजनी (पत्रद्वारा) यांच्या वेळोवेळीच्या मुलाखती.

या पद्धतीनी माहिती घेऊन व तिचा धावता का होईना अभ्यास करून या ग्रंथाची रचना मी केली आहे. इतिहासाची ही वाङ्मयी सेवा वरील आधाराशिवाय मला शक्यच झाली नसती; म्हणून त्या सर्व आधार-स्तंभांना कृतज्ञतापूर्वक माझे सदैव अभिवादन.

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले.

शुद्धि पत्र

पृष्ठ	ओळ वरून	चूक	अचूक
३	१	प्रतिनिधी	प्रतिनिधीनी
३१	२०	ता. ५ जुलई १९५८	ता. ५ जुलई १८५८
३८	०९	(खेळीच्या केपा देखील)	
५०	२७	पुनर्ज्जीवित	पुनरुज्जीवित
५३	३२	राष्ट्रीय महात्त्वावर	राष्ट्रीय सभेच्या
५५	१७	तांबे कारकूनाच्या	तांबे कारकुनाच्या
६५	९	(तालुताई बर्वे विटे)	(वालुताई जोग विटे)
७४	१३	झालेले असले	झालेले हवे असले
७६	१४·१५	कळंब्यांची मंडळी यात्रा करून आल्यावर	(कळंब्याची मंडळी यात्रा करून आल्यावर)
७८	१.१२-३०	पराडकर	वराडकर
७८	३१	विवडक	निवडक
८०	१८	मन नेहा राष्ट्रभक्त	मन ने हा राष्ट्रभक्त
८३	१०	वाईला	वाकला
८६	१२	भोसले	भोसे
८७	२	पडक्कं	क्लार्क
८७	५	बसगिरी बुवा मार्फत	ब्रम्हगिरी बुवामार्फत
८९	२७	प्रामुख्यांने करून	प्रामुख्याने
९४	२९	चैतनोद्बोधनाचा	चैतनोद बोधनाचा
९५	१६	वृत्तीचे	वृत्तीने
१०१	२	लब्ध अगर प्रतिष्ठितपणा खाली	अगर लब्ध प्रतिष्ठित-पणाखाली
१०४	१	राखीव जागा	राखीव जागासाठी
१०४	२९	नलवड	नलवडे
१०८	४	बहिष्कार घातला	काँग्रेसने बहिष्कार घातला.
१२५	१६	स्वातंत्र दिन	स्वातंत्र्य दिन
१३६	४	बतमी	बातमी
१३८	१२	वेंगुल	वेंगुर्ले
१४१	२३	बिळशीत्त्र	बिळाशीस

पृष्ठ	ओळ वरून	चूक	अचूक
१५७	२	राजूवीराने	राष्ट्रवीराने
१७८	४	सर्वज्ञ:माधवा:।	सर्वज्ञ:माधव:।
१७८	२०	शान्ति युगाची	शान्ति युगाची
१८०	२३	हजार लोक	हजार लोक आले
१८३	१९	डिग्रज रत्नागिरी	डिग्रज रत्नागिरी व
१९३	५	व्यवस्थापक होते	व्यवस्थापक होते,
१९३	२०	वडजाईस जमली	वडजाईस ते जमले
१९५	३०	आटपाडीस सातारी	आटपाडीस आणले
२०३	२१	रायफल जळीत खटलाव	सातारी रायफल व जळीत खटल्यातील
२०७	१४	" जलेजावच्या "	" चलेजावच्या "
२०८	११	१९४३ चे	१९४६ चे
२११	२६	येईल	येई
२१५	५	लक्रिमन	क्रिमिनल
२१९	३०	विरोधनाचा	निरोधनाचा
२२१	४	जलेजावच्या	चले जावच्या
२२५	४	उच्चारीना	उच्चारीना !
२२५	५	वर्गीयांच्या !	वर्गीयांच्या
२२५	२२	९ मे १९४९	९ मे १९४६
२४८	२४	अध्यक्षतेखाली त्यावेळी	अध्यक्षतेखाली झाला त्यावेळी
२५४	२०	साजरा झाला, सालच्या,	साजरा झाला, याच सालच्या
२६६	२७	परंपरा, सातारा भिडे-गुरुजीस	परंपरा व सातारा भिडे गुरूजींचे
२७७	२	सापडला होता	सापडला होता कारण
२७७	१५	७ जन रोजी ते	७ जून रोजी ते
२७८	१७.१८	१०००० हजार रुपये मागितले	
२८१	२२	वृत्तपत्रे आपआपल्या	वृत्तापत्रे आपल्या
२८९	३	(२३-७-१९०७)	(२३-७-१९०७) म्हणून कंपनी बंद पाडण्यात आली.

पृष्ठ	ओळ वरून	चूक	अचूक
२८९	५	आणलें	आपले
२८९	८	ता. १०-९-१९००	
२९५	३३	" शरणं प्रपद्ये " व्हावे.	"शरणं प्रपद्ये" व्हावे,
२९७	२६	झाले,	झाले.
२९७	३०	६ जानेवारी १९३०	६ जानेवारी १९३१
३०४	२३	बावरे झाले,	बावरे झाले.
३०४	३४	स्ववरदारी वाढली,	खबरदारी वाढली.
३०५	५	तिसऱ्या सभेत	तिसऱ्या जिल्हा सभेत
३१०	१७	आगाशे यांनी मांडला व इसलामपुरास	आगाशे यांनी मांडला व त्यास इसलामपुरास
३१३	२५	घतली	घेतली
३१६	४	त्या	" त्या
३२८	२१	अखेर बागा. १९२९	अखेर बागा. १९२२
३६१	१५	हिंदुस्थान	हिंदुस्थानसारख्या
३६१	२०	हिंदुस्तानातील	हिंदुस्तानातील ते
३६७	१६	महागाई विरो	महागाईस विरोध
३६७	३३	आणि बाजार दराने	बाजार दरांची

लोकसेवासंघ, सातारा.